# मराठी संशोधन

## – १ –

(मराठी संशोधन पत्रिकेंतील, ऑक्टोबर १९५३ ते जुलै १९६१ या कालावधींतील
निबंध, टाचणें वगैरे.)

म. ग्रं. सं. ठाणें
निबंध.
क्र. 9e20

संपादक

अ. का. प्रियोळकर

REFBK-0015205

मराठी संशोधनमंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४
१९६६

मूल्य ५ रुपये

# मराठी संशोधन

## — १ —

(मराठी संशोधन पत्रिकेंतील, ऑक्टोबर १९५३ ते जुलै १९६१ या कालावधींतील
निबंध, टाचणें वगैरे.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ६४९८५ दि: ९७/३/०७
ग्रंथांक ९९२० दि:
६४९८५
९७/३/०७
९९२०

संपादक

**अ. का. प्रियोळकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९

मराठी संशोधन मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५२०४
संद. शाखा (स्थल प्रत)

REFBK-0015205
REFBK-0015205

मुंबई म[illegible]ई १४

१९८८

**मूल्य ५ रुपये**

संपादक–मुद्रक–प्रकाशक : **अ. का. प्रियोळकर**, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई १४, मुद्रणस्थळ–मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१ सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव मुंबई नं. ४.

## विषयानुक्रमणिका


| विषय | पृ. |
| --- | --- |
| १. जुन्या मराठी ग्रंथांचें आरंभींचें संपादन व प्रकाशन (अ. का. प्रियोळकर) | १ |
| २. संशोधनाकरितांच खास संस्था स्थापन करावी (सर चिंतामणराव देशमुख) | २५ |
| ३. माधव चंद्रोबाचीं पत्रें | २८ |
| ४. सिद्धीस न गेलेला संकल्प (कै. प. व. गोडबोले) | २९ |
| ५. शालापद्धति (अ. का. प्रियोळकर) | ३१ |
| ६. कुडीआत्म्याचें भांडण ,, | ३३ |
| ७. नवनीताची शताब्दि ,, | ३७ |
| ८. किताब गाईच्या देवीची उत्पत्ती व गुण याचा तपशील ,, | ४१ |
| ९. शिमगा शब्दाची व्युत्पत्ति ,, | ४८ |
| १०. मराठी वाङ्मयांतील इस्लाम (न. र. फाटक) | ४९ |
| ११. द्राविड भाषासंघ व मराठी भाषा (म. अ. करंदीकर) | ६५ |
| १२. ज्ञानदेवांचें शंकास्पद वाङ्मय–द्रोणपर्व (अ. का. प्रियोळकर) | ८९ |
| १३. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण (बा. मा. खुपेरकर) | १०७ |
| १४. अक्षी शिलालेख (शं. गो. तुळपुळे) | ११६ |
| १५. 'योगराज टिळक' आणि अमृतानंद (रा. चिं. ढेरे) | ११८ |
| १६. गोव्यांतील भाषेसंबंधीं कांहीं विचार (ल. व्यं. प्रभुमेंब्रे) | १२३ |
| १७. ज्ञानदेवांचें शंकास्पद वाङ्मय (रा. चिं. ढेरे) | १३७ |
| १८. 'रंभा मंजरी'तील मराठी पद्य (के. वा. आपटे) | १३९ |
| १९. मराठींतील सुलभीकरण ,, | १४३ |
| २०. जुन्या मराठी ग्रंथांचीं पोर्तुगीज भाषांतरें (अ. का. प्रियोळकर) | १५१ |
| २१. केकावलींतील एक शंकास्थळ (एक वाचक) | १५६ |
| २२. केकावलींतील एक शंकास्थळ (खुपेरकर–चाफेकर–पेंडसे –बनहट्टी–लागू–एक वाचक) | १५९ |
| २३. थोडें यदुमाणिकाविषयीं (रा. चिं. ढेरे) | १६८ |
| २४. 'पद्मावतां'त राघवचैतन्य ,, | १७० |
| २५. फांसिस्की पंथीयांचा मराठीचा अभ्यास (वि. बा. प्रभुदेसाई) | १७१ |
| २६. मुरलीचें चरित्र (कवि शिवराम) | १८४ |
| २[illegible] [illegible]गवताचा एकनाथी दशम स्कंध ! (अ. का. प्रियोळकर) | १८७ |
| २८. मराठींतील आकारान्त विशेषणें (के. वा. आपटे) | १९९ |
| २९. संशोधनाची भाषा कोणती असावी ? (अ. का. प्रियोळकर) | २०२ |
| ३०. मराठी व्याकरणावरील इंग्रजीची छाप (म. अ. करंदीकर) | २०३ |
| ३१. मोरोपंतविरचित रामाष्टक | २२१ |
| ३२. बळी पडलेली "राष्ट्रीय काव्याची बादशाही" (द. वा. पोतदार) | २२३ |
| ३३. कानारी, कोंकणी आणि मराठी (वि. बा. प्रभुदेसाई) | २२९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ८४९८५ वि:
क्रमांक १८२० नों दि: १५/१३/५७
दा. क्र. १४२०४

# जुन्या मराठी ग्रंथांचें आरंभींचें संपादन व प्रकाशन*

## (१८१८-१८६७)

**कर्नल व्हॅन्स केनेडी** यांनीं १८२४ सालीं, A Dictionary of the Maratha Language नांवाचा एक कोश लिहिला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात,

"It must be observed that the Maratha is merely a spoken "language and that it has never been cultivated or refined by "authors either in prose or verse."

या उद्गारांवरून त्या काळच्या मराठी भाषेच्या इंग्रज अभ्यासकांना, किंवा निदान व्हॅन्स केनेडींना तरी, आपलें बखरींसारखें गद्यवाङ्मय सोडाच, परंतु ज्ञानेश्वरापासून मोरोपंतापर्यंतच्या कवीश्वरांचें जें पद्यवाङ्मय, त्याची दादच नव्हती, असें म्हणावें लागतें.

आधुनिक गद्यवाङ्मयाला इंग्रजांकडूनच चालना मिळाली ही गोष्ट जरी खरी असली, तरी जुन्या करारांत लिहिल्याप्रमाणें–ईश्वर म्हणाला, "Let there be light and there was light", अशी इंग्रजांनीं केवळ शून्यांतून ही मराठी वाङ्मय-सृष्टि निर्माण केली, ही जी केनेडींची समजूत, ती भ्रामक म्हणावी लागते ! वास्तविक केनेडींना आपल्या प्राचीन वाङ्मयाची माहिती असावयाला पाहिजे होती; कारण त्यांच्याविषयीं बाबा पदमनजी आपल्या 'अरुणोदय' या आत्मचरित्रांत म्हणतात,

"माझ्या वडिलांस जनरल वान्स केनडी यांची चांगली माहिती होती. हे "जुने विद्वान गृहस्थ त्यांच्या तरुणपणीं मुंबईत प्रसिद्ध होते. त्यांजविषयीं ते मला "असें सांगत कीं, त्यांची हिंदुधर्मावर मोठी श्रद्धा होती, त्यांस गायत्रीमंत्र येत होता "व ते गीता वाचीत; त्यांनीं ब्राह्मणांस पुष्कळ द्रव्य द्यावें व त्यांच्या संग्रहीं

---

* 'विविधज्ञानविस्तार' मासिकाचे आद्य संपादक कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्या स्मरणार्थ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें सुरू केलेल्या 'गुंजीकर व्याख्यानमाले' मध्यें ता. १६ जाने. १९४४ रोजीं श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं, त्यावेळचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामण द्वारकानाथ देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं केलेलें ( अजूनपर्यंत न छापलेलें ) भाषण. या प्रसंगीं समारोपाच्या वेळीं मराठी संशोधनाकरितांच खास संस्था असावी, अशी कल्पना श्री. देशमुखांनीं पुढें मांडली आणि तिलाच १९४७ सालीं मराठी संशोधनमंडळाच्या स्थापनेनें मूर्त स्वरूप मिळालें. मूळ भाषण व अध्यक्षीय समारोप हीं दोनहि येथें दिलेलीं आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम वि:

" हिंदुधर्माच्या पुष्कळ पोथ्या होत्या. ते ख्रिस्ती नव्हते, मिशनेरी लोकांशीं फार वाद " करीत इ०. ह्या बोलण्यास मीं असें उत्तर द्यावें कीं, असें जरी होतें तरी ब्राह्मणांनीं " त्यांच्या गळ्यांत जानवें घातलें नाहीं व त्यांस आपल्या पंक्तीस घेतलें नाहीं." [ अरुणोदय–स. १८८८, पृ. २३२ ] केनेडींची अशी वृत्ति कोश लिहिल्यानंतर पुढें केव्हां तरी झाली असणें शक्य आहे.

मुंबईच्या हैंदशाळा शाळा पुस्तकमंडळीचें, ता. ८ एप्रिल १८२५ चें, " ग्रंथांचीं " भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिस विषयीचें प्रसिध्धिपत्र " आपल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहाल्यांत आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, " जो कोणी फार चांगला ग्रंथ " करून आणील तो पाहून या मंडळीस दिसेल कीं या ग्रंथ करणारास पांच हजारांपेक्षां " अधिक बक्षिस असावें, तर तें त्यास द्यावयासाठीं गवरनर कौंशल यांस शिफारस केली " जाईल." मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टननें अर्स्किन पेरींना १८२७ सालीं पाठविलेलें एक खाजगी पत्र उपलब्ध आहे; त्यांतदेखील नवीन ग्रंथ लिहिणाऱ्यांना पांच हजार रुपयांपर्यंतचीं बक्षिसें आपण जाहीर केल्याचें लिहिलें आहे. या उत्तेजनामुळें–किंवा आमिषामुळें म्हणा–व्याकरणें, कोश आणि शालोपयोगी, कथात्मक, शास्त्रीय किंवा ऐतिहासिक इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें, अशासारखें नवें मराठी गद्यवाङ्मय भराभर निर्माण झालें; परंतु आपलें जें जुनें पद्यवाङ्मय आहे, तें छापून लोकांपुढें आणण्याकडे लोकांचें लक्ष होतें असें दिसत नाहीं. तें जर असतें तर बिचारा व्हॅन्स केनेडी नुकतेच सांगितलेले उद्गार कशाला काढता ?

आपलें प्राचीन मराठी वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा पहिला पद्धतशीर प्रयत्न १८४० सालीं, पांडुरंग बापू जोशी पावसकर यांनीं " ज्ञानचंद्रोदय " नांवाच्या मासिकाच्या द्वारें केला. † या मासिकाचे कार्तिक मास शके १७६२ पासून पुढील कांहीं अंक ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहाल्यामध्यें आहेत. त्यांत संस्कृत सुभाषितें व त्यांचें मराठी भाषांतर ( गद्य ) आणि विक्रमचरित्र, ज्ञानदेवकृत हरिपाठ, राधाभुजंग, मुक्ताबाईचे अभंग अशीं काव्यें छापलेलीं आढळतात. रा. कानडे यांनीं ' मराठी नियतकालिकांचा इतिहास ' नांवाचें जें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांत या मासिकाचा

---

† याहीपूर्वी म्हणजे इ. स. १८३६ सालीं याच पावसकरांनीं प्रसिद्ध केलेली रुक्मिणी-स्वयंवराची एक पोथी आम्हांस अलिकडेच उपलब्ध झाली आहे. तिच्या शेवटीं पुढील मजकूर आढळतो, " श्रीएकनाथजनार्दनचरणारविंदी दृढभाव ठेऊन " पांडूरंग बापू जोशी पांवसकर यांणी रुक्मिणीसैंवराच्या दशोदेशीच्या जुनाट प्रती ३१ " मिळवून यथामती शुद्धकरून रखमाजी देवजी शिंपी मुळे यांचे हातून लिहवून मुंबईत " गणपत कृष्णाजी थळे भंडारी याणी आपले शिळा छापखान्यांत हा ग्रंथ छापिला. शके " १७५८ दुर्मुखनाम संवत्सरे श्रावण कृष्ण ८ कृष्णजयंती शुक्रवारी संपविला. ॥ "

"ग्रंथ १, कागद २ * मार्गशीर्ष श. १७६२" च्या अंकाच्या मुखपत्राचें छायाचित्र दिलें आहे तें जिज्ञासूंनीं पाहावें. 'ज्ञानचंद्रोदय' हें मासिक गणपत कृष्णाजीच्या शिळा-छापखान्यांत छापलें जाई. "ठिकाणा बोरीबंदरचे लैनीजवळ जुनी जांबळी "मशिदीची आळी येथें असे," असा या मासिकाच्या प्रकाशन-स्थलाचा उल्लेख पहिल्या अंकावर सांपडतो. गणपत कृष्णाजीनें या काळीं खिळे-छापखाना तयार केला नव्हता. तो त्यानें बरोबर शंभर वर्षांमागें, म्हणजे १८४३ सालीं केला असें गोविंद नारायण माडगांवकर यांच्या 'मुंबईचें वर्णन' या पुस्तकावरून दिसून येतें. माडगांवकर लिहितात, "शके १७६५ मध्यें यांनीं स्वतः टैप करण्याचें कसब साध्य करण्याचा "उद्योग मांडिला. आणि मोठ्या प्रयत्नानें अक्षरांचे सांचे तयार करून ओतिवण्याचा "कारखाना घातला. आणि सर्व प्रकारचीं अक्षरें तयार करून टैपाचा छापखाना "चालू केला." (मुंबईचें वर्णन–इ. स. १८६३, पृ. २४७.)

मुंबई युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीमध्यें 'गीतार्थबोधिनी' नांवाचा, याच प्रकाशकानें प्रसिद्ध केलेला एक ग्रंथ आहे. त्यावर शके १७६४ (म्हणजे सन १८४२) हा प्रकाशनकाल नमूद केला आहे. प्रथम मूळ गीतेचा श्लोक, त्यापुढें वामनी समश्लोकी, मोरोपंती आर्या, तुळशीदासकृत दोहरे, मुक्तेश्वरकृत ओव्या आणि शेवटीं तुकारामकृत अभंग, अशी या ग्रंथाची रचना आहे. "मुंबईंत सदाशिवशास्त्री "सातारकर आणि पांडुरंग जोशी पावसकर याणीं यथामति शुद्ध करून सखाराम अमनाजी "दाणी याचे हस्तें लिहवून गणपत कृष्णाजीचे शिलाछापखान्यांत छापला," असा या ग्रंथावर मजकूर आढळतो. न्या. रानडे, गुंजीकर किंवा चिपळूणकर यांपैकीं कोणीहि या 'ज्ञानचंद्रोदया'चा उल्लेख केलेला नाहीं. त्यावरून या मासिकाचें त्यांना अस्तित्वच माहीत नव्हतें असें म्हणावें लागतें. 'ज्ञानचंद्रोदया'चे मूळ संस्थापक पांडुरंग जोशी पावसकर यांचे कोणी वंशज आज आहेत कीं काय याचा मीं तपास केला; पण अद्याप मला त्यांचा शोध लागलेला नाहीं. या गृहस्थांसंबंधीं कोणाला माहिती असल्यास त्यांनीं आम्हांला द्यावी. त्यांचें छायाचित्रहि आमच्या ग्रंथसंग्रहालयांत प्राचीन काव्याचे आद्य प्रकाशक म्हणून ठेवण्यास आम्हांला अभिमान वाटेल. या पावसकरांसंबंधीं थोडी माहिती आपणांस दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रांत सांपडते. सोसायटीच्या मराठी शाळेंतील आपल्या वेळच्या शिक्षकांसंबंधीं माहिती देतांना, पांडुरंग जोशी पावसकरांसंबंधीं दादोबा लिहितात–" हे जोशीबुवा वरच्या

---

* त्या काळीं ज्याला आपण आज अंक म्हणतों त्याला 'कागद' असें म्हणत. 'प्रभाकर' पत्रामध्यें हीच परिभाषा योजिलेली आढळते. पण याच कालीं निघणाऱ्या 'दिग्दर्शन' मासिकाच्या पौष श. १७६२ च्या अंकावर 'अंक' अशी शब्दयोजना केलेली दिसून येते.

" वर्गांत गणित शिकविण्याचे कामावर होते. यांणीं हिंदूंचें जोतिःशास्त्र म्हटलें होतें;
" म्हणजे भास्कराचार्यांचें बीज व लीलावती यांणीं म्हटलीं होतीं. म्हणोन यांस
" इंग्लिश गणिताचे ग्रंथावरून क्यापटन जार्विस साहेबानें मराठींत तर्जुमे केलेल्या
" ग्रंथावरून तो विषय मुलांस शिकवायास फारसा आयास लागत नसे. हे जोशीबावा
" सरळ बारीक अंगाचे पुरुष होते, आणि फार बुद्धिमान पुरुष होते, असें त्यावेळेस
" सर्व लोक म्हणत असत. यांची बुद्धि फार चंचल होती. यांनीं मला पूर्णांक,
" अपूर्णांक, क्षेत्रफल, घनफल आणि वर्गसमीकरणापर्यंत बीज शिकवलें. त्यावेळेस
" एथपर्यंत गणित मराठी शाळेंत शिकवित असत; आणि इंग्लिश स्कुलांत तर मुळींच
" गणित शिकवणें नसे, आणि असलेंच तर त्रैरासिकपर्यंत असेल असें मला वाटतें."

दादोबांनीं वर्णिलेली ही हकीकत १८२७ सालची आहे. १८४० सालीं 'ज्ञानचंद्रोदय' निघाला. हें मासिक किती वर्षें चाललें व बंद कां पडलें, तें कळत नाहीं. पहिल्या वर्षाच्या आश्रयदात्यांचीं नांवें त्यांत दिलीं आहेत, तीं दोनशेंवर आहेत. 'गीतार्थबोधिनी'वर जीं नांवें आहेत, त्यांवरून त्या ग्रंथाचे पावणेंचारशें ग्राहक होते असें दिसतें. या ग्राहकांत आजच्या पुष्कळशा मुंबईकरांना आपले पूर्वज आढळतील! सुप्रसिद्ध डॉ. भाऊ दाजी यांचेंहि नांव 'भाऊ दाजी सनाय' असें त्यांत आढळतें! 'ज्ञानचंद्रोदयाचे' ग्राहक अपुरे होऊन हें मासिक बंद पडलें, कीं संपादकाच्या निधनानें या मासिकाची इतिश्री झाली, तें कळण्यास मार्ग नाहीं.‡

जुन्या वाङ्मयाला त्या काळीं राज्यकर्त्यांचें बिलकुल उत्तेजन नव्हतें. नव्या विद्वानांचा ओढा मराठीपेक्षां इंग्रजीकडेच जास्त होता. 'प्रभाकर' कर्ते आपल्या ता. १२ डिसेंबर १८४१ च्या अंकांत लिहितात, " त्यांस ( नवीन विद्वानांस ) असें
" वाटतें कीं, मराठी ती काय आडु लोकांची भाषा आहे. यामुळें विलियम दि कांकरर
" राजापासून इंग्लंडांत जसि फ्रेंच भाषा मोठे इष्की मंडळींत बोलण्याचा परिपाठ
" कांहीं दिवस पडला होता तसाच इंग्रेजी भाषेचा. घरींदारीं हावें तसें बोलतात.
" याजमुळें त्यांस मराठी म्हणजे केवळ परभाषेप्रमाणें होऊं लागली आहे. सारांश
" इंग्रेजी शाळेंतील मुलें मराठी भाषेपेक्षां इंग्रजींत अधिक हुशार आहेत, असें
" म्हटल्यास यथायोग्य साजेल."

तेव्हां अशा 'इष्की' लोकांना ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम, मोरोपंत, सोहिरोबा हे 'आडु' लोकांचे कवीश्वर कसे रुचावेत ?

राज्यकर्ते किंवा नवशिक्षित यांची ही रड; पण निदान जुन्या लोकांचा तरी

---

‡ या मासिकाचे १८४० ते १८४४ चे कांहीं अंक पुण्याच्या महाराष्ट्र ग्रंथालयांत आहेत.

प्राचीन ग्रंथप्रकाशनाला आश्रय असावा ? जुने लोक धार्मिक वाङ्मय मुद्रित व्हावें यालाच मुळांत विरुद्ध होते, हें येथें मला विशेषेंकरून सांगावयाचें आहे ! दादोबा पांडुरंग यांनीं ता. २८ ऑगस्ट १८४२ रोजीं सुरतेहून पाठविलेलें एक पत्र ' प्रभाकर ' पत्राच्या ता. १८ सप्टेंबर १८४२ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून दादोबांना जुन्या संस्कृत किंवा मराठी ग्रंथांच्या शुद्धीकरणाविषयीं किती आस्था होती तें कळतें; पण त्याहिपेक्षां जुन्या काव्यांच्या मुद्रणाला जुन्या लोकांचा विरोध कां होता, याचीहि कल्पना होते. या पत्राचा आरंभींचा कांहीं भाग आपणास वाचून दाखवतां—

" विनंति विशेष, सुमारें सन १८३० चा सालीं शिक्षामंडळाचा शिला-
" छापखाना पुण्यास जार्विस साहेबांहीं नेला. त्याकाळीं तेथें तो छापखाना असतां
" शिक्षामंडळीचे पंडितांहीं भागवत छापण्याचा निश्चय ठरावून तें कार्य त्यांहीं सिद्धीस
" नेलें. त्यांत माजी बाळशास्त्री घगवे, जांची काव्यव्युत्पत्ति फार प्रसिद्ध आहे, ते
" प्रमुख होते. बापुशास्त्री शुक्ल वय्याकरण हे प्रुफ,—म्हणजे पहिला छापलेला कागद
" तपासावयाचा असतो तो—शोधण्याच्या कामावर होते. यावरून अनुमान होतें कीं
" दुसऱ्या पंडितांहीं पुण्यांतील अनेक भागवताच्या पोथ्या एकत्र करून त्यांत जी
" उत्तम निघाली असेल तींत जेथे जेथे शोध घालण्याची आवश्यकता असेल तेथे
" तेथे तो घालून उत्तम प्रकारची प्रत करून, त्यावरून पुढें छापायाचें काम चालू
" केलें असावें, असें सहाजिक अनुमान निघतें. कां कीं लिहिलेल्या पुस्तकांत दोष फार
" असतात, व अशा सदोष पुस्तकांचाच प्रचार फार चालला आहे, त्यास तो मोडून
" सर्व भरतखंडांत नाहीं तर नाहीं, परंतु महाराष्ट्र व गुजरात या देशांत तरी, सर्वत्र
" एक अप्रतीम पुस्तकांचाच प्रचार असावा असें उद्देशून महाराष्ट्र पंडितांहीं
" इतर हिंदु लोकांचा छापलेल्या पुस्तकाविषयीं कांहीं अमंगल पदार्थ छापण्याचा शाईत
" पडतो या निमित्ताने जो अनादर आहे, त्याचा हा त्यांहीं ब्राह्मण होत्साते उदार-
" पणाने त्याग करून, या छापलेल्या पुस्तकांची प्रवृत्ति घातली असावी. परंतु हें
" पुस्तक हातीं धरून याचें पारायण मांडलें म्हणजे ही वर सांगीतली ती सर्व
" अटकळ असें अनुभवास येतें"—( येथें या छापील भागवतांतील अशुद्धें दाखवून पुढें दादोबा लिहितात )—"इतकें लिहिण्याचें कारण हें कीं, हे अशे दोष छापलेल्या पुस्तकांत
" कसे राहिले हें मला मोठें आश्चर्य वाटतें....आणखीं मागें जगन्नाथजी शंकरशेट यांहीं
" आपल्या उदारपणानें चातुर्मास भागवताचीं पुस्तकें ब्राह्मणांस दान केलीं, तें पाहून
" आणखी कोणा गृहस्थाचा मनांत ईर्षा उत्पन्न होऊन भागवत अथवा भारत दान
" करणें जहाल्यास ते जसे कीर्ति अथवा पुण्याकडेस लक्ष देऊन या कर्मास प्रवर्तात
" तसेंच पुस्तकाच्या शुद्धपणाकडेसही लक्ष दिल्हें असतां त्यांचा मोटा लोकोपकार
" होईल. "

दान देतांना ग्रंथ शुद्ध असावा असें १८४२ सालीं दादोबा म्हणतात;

परंतु शंभर वर्षांनंतर आज कॉलेजांत पाठ्यपुस्तक नेमावयाचें झालें तर तें शुद्ध असावें, ही दृष्टि आमच्या विश्वविद्यालयांनाहि अद्याप आलेली नाहीं, ही अत्यंत खेदाची आणि शरमेची गोष्ट होय. दादोबांनीं आपल्या आत्मचरित्रांतहि ग्रंथ छापला म्हणजे ओवळा होतो याबद्दल खोट्या समजुतीचा एक प्रसंग नमूद केला आहे. ते लिहितात,—

"सन १८४३ त मी एक वर्षापासून नर्मयरामशास्त्री याजपाशीं लघुकौमुदी "पढों लागलों. सकाळीं ती पढावी आणि लागलेच त्यांत पाणिनीचीं अष्टाध्यायींतलीं "सूत्रें येतात तीं अक्षरशः व पदशः समजून घेऊन त्यांचें महाराष्ट्र भाषांतर करावें, "असा क्रम चालला असतां, सन १८४३ त त्यांतील सारें सुबंत प्रकरण आपल्या "हातानें सुंदर लिहून ठविलें तें पुढें बोर्ड आव एजुकेशन या मंडळीकडेस आश्रय "देण्याकरितां पाठविलें. त्यांहीं तें त्यावेळचे मोठे प्रख्यात विद्वान बाळ गंगाधर शास्त्री "यांजकडेस अभिप्रायाकरितां पाठविलें. त्यांहीं तें साद्यंत लक्ष लावून तपासलें. परंतु "त्यांतलीं पाणिनीचीं अष्टाध्यायींतलीं सूत्रें हीं वेदोक्त आहेत, तीं तूर्त छापून अशीं "ओंवळीं केलीं असतां लोकांस आवडणार नाहींत, असा आपला अभिप्राय दर्शविला. "यावरून तो ग्रंथ पुढें न चालवितां मीं तसाच बांधून ठेवला. तो पुढें माझ्या "संग्रहीं तसाच राहिला. माझे मित्र बाळशास्त्री यांहीं जो त्या ग्रंथाविषयीं आपला "अभिप्राय दिला तो त्या काळच्या समजुतीस अनुसरून होता. मला त्यांत कांहीं "फारसा विषाद वाटला नाहीं. कांहीं महिन्यांची माझी मेहनत मात्र फुकट गेली."

प्रो. बाळशास्त्री जांभेकरांसारख्या त्या काळच्या जाड्या विद्वानांनाही या समजुतीनें झपाटलें होतें, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या लोकभ्रमासंबंधीं गोविंद नारायण माडगांवकर आपल्या 'मुंबईचें वर्णन' या ग्रंथांत लिहितात,—

"आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास "भीत असत. आणि अद्याप [ म्हणजे १८६३ सालीं ] मुंबईत व बाहेरगांवीं छापील "कागदास शिवत नाहींत, व छापलेलें पुस्तक वाचीत नाहींत असे पुष्कळ सांपडतील." (पृ. २४८)

याच वेडगळ समजुतीविषयीं आणखी एक गोष्ट सांगतों. १८६७ सालीं रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं तुकारामाचा गाथा छापविला होता. तो छापण्यापूर्वी त्याच्या पंढरपुराकडे वारकरीमंडळीमध्यें कसा काय खप होईल, अशी रावसाहेबांनीं रावजी सखाराम लिमये नांवाच्या तिकडील एका गृहस्थाकडे चौकशी केली असतां त्या गृहस्थाकडून आलेल्या ता. २७–३–१८६७ च्या पत्रोत्तरांतील उतारा, रा. हवालदार यांनीं मंडलिकांच्या आपल्या चरित्रांत उद्धृत केला आहे. तो असा—

"तुकारामाच्या गाथांच्या प्रती पुष्कळ खपतील. परंतु छापील प्रती

" घेण्यास लोकांचा अंदेशा आहे. कारण शाईत कांहीं वर्ज्य पदार्थ आहेत, असें
" त्यांच्या मनानें घेतलें आहे. अक्षर मोठें सुवाच्य व शिळाछाप असावें व शाईची
" खात्री घ्यावी."

रावजी दातार हे आपल्या ता. १२–९–१८५८ च्या पत्रांत वसईहून रा. सा. मंडलिकांना लिहितात,—

" श्रीमद्भागवत व छापील पुस्तकें पाठविलीं त्यांचें अवलोकन करीत आहें.
" आमचे वडिलांनीं नाशिकास आश्रम संपादन केला तेव्हां चैत्र मासीं दर्शनास गेलों
" होतों. तेथें या शाईविषयीं शंका उत्पन्न झाली. आतां सहजीं सुचवितों कीं शाईच्या
" कृतींत कांहीं अधर्म आहे काय ? * माहिती असल्यास कळवावें."

" रावसाहेब मंडलिक ज्या पोथ्या सोवळ्यांनीं वाचीत त्या हस्तलिखित असत, " असेंहि रा. हवालदार यांनीं नमूद केलें आहे ! ( रावसाहेब मंडलिक यांचें चरित्र— पृ. २७७ )

आतां सांगितलेल्या निरनिराळ्या पुराव्यांवरून प्राचीन ग्रंथप्रकाशनाला आमच्या-पुढें असलेल्या वाङ्मयकालाच्या अगदीं अखेरपर्यंत, म्हणजे १८६७ पर्यंत, जुन्या लोकांचा कसा जोराचा विरोध होता तें स्पष्ट कळून येईल.

जुन्या काळीं जेव्हां ग्रंथ छापण्याची प्रथा पडली नव्हती, त्या काळीं ग्रंथ अर्थातच हातानें लिहून काढावे लागत असत. ग्रंथांची नक्कल करणारे व त्यावर चरितार्थ चालविणारे लेखक असत. हे लेखक स्वतः किंवा त्यांचे अडते, असे हे ग्रंथ डोक्यावर किंवा खटाऱ्यांत घेऊन गांवोगांव हिंडत. या ग्रंथांची किंमत अर्थातच भारी असे, व भटभिक्षुकांना ते विकत घेणें शक्य नसे. परंतु गांवांतील धनिक त्यांच्याकडून ते

---

* छापण्याच्या शाईची कृति **दिग्दर्शन** मासिकामध्यें (पु. १, अं. ८, १८४०, पृ. २१२–२१३ ) दिली आहे ती अशी :—

" लाख चपट्या वड्या तोळे ४, साबु विलायती तोळे ४, रुमामसतकी तोळे ५,
" मेण पिवळें तोळे ३, तूप अथवा चर्बी तोळे ४. अथवा चर्बी अथवा तूप तोळे ४ ,
लाख तोळे ४, मेण तोळे ४, साबण तोळे ४."

वरील कृति देऊन हा संपादक लिहितो, " या छापाच्या शाईंत चर्बी पडत
" असती, यामुळें छापलेलें पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे. म्हणोन या-
" विषयीं कांहीं लिहिलें पाहिजे.वर जिनसाच्या यादी लिहिल्या आहेत त्यांत तूप अथवा
" चर्बी असें आहे, परंतु हें दिग्दर्शन ज्या छापखान्यांत छापतात तेथें चर्बीच्या ठिकाणीं
" तुपाचा उपयोग करितात, व तेणेंकरून काम चर्बीप्रमाणेंच होतें. परंतु तुपामध्यें चरबी-
" प्रमाणें तेज नाहीं. म्हणोन कांहीं मेहनत जास्त पडती."

विकत घेऊन गरीब ब्राह्मणांना दान करीत. मघाशीं वाचून दाखविलेल्या 'प्रभाकरां'-तील दादोबांच्या पत्रांत या पद्धतीचा उल्लेख आलाच आहे. जुन्या काळीं मुंबईमध्यें परभूलोकांमध्येंदेखील जुन्या वाङ्मयासंबंधीं किती आवड असे हें दादोबा पांडुरंगांनीं आपल्या आत्मचरित्रांत 'भाई परभाची' जी माहिती दिली आहे त्यावरून कळून येईल. ती अशी—

"ते पाताणे परभु असून वैष्णवाप्रमाणें कानशिलावर मुद्रा लावीत असत. व "असें पाहीं कीं निरंतर यांच्या एथें प्राकृत पोथ्या लिहून घेण्याचा मोठा कारखानाच "असे. सतत एकदोन लेखक याणीं कित्येक वर्षे ठेविले होते. व त्यांच्या हातून "पुष्कळ प्राकृत ग्रंथ सुंदर अक्षरांनी सुंदर कागदावर लिहून मोठ्या फरम्याचे सांचे "करून त्यांस वरखालीं जरीच्या बुट्यांचीं पुष्टिपत्रें लावून वर लांकडाच्या फळ्या "त्याच सांच्याच्या ठेवून तो रुमालांत लांब फितींनीं बांधून मोठ्या जतनेनें तयार "करीत. जो प्राकृत ग्रंथ म्हटला तो याप्रमाणें तयार केलेला त्यांच्या संग्रहीं असे. हे गृहस्थ "ग्रंथाचे फारच शोकी असत. स्वतः कागदाचे सांचे कापावे, दोरीच्या फळ्यावर "रेखाटावे, त्यांच्या समासावर वेलबुट्या काढाव्या इतकें काम हे स्वतः करीत असत. "यांचा कित्ता घेऊन आमच्या तीर्थरूपांनींहि आपल्या शक्तीप्रमाणें बराच प्राकृत "ग्रंथांचा संग्रह केला होता. प्रसिद्ध हरिविजय, पंढरीमाहात्म्य, शिवलीलामृत हे ग्रंथ "त्यांणीं माझ्या जाणतेपणाच्या अगोदर पूर्वीच लिहून ठेवले होते." इ.

शंभरवर्षांमागें प्राकृत ग्रंथांसंबंधीं ब्राम्हणेतरांतदेखील व मुंबईबाहेरील बेळगांव-सारख्या भागांतही किती आस्था होती, हें बाबा पदमनजींच्या आत्मचरित्रावरून कळून येतें. ते लिहितात,—

"मला प्राकृत ग्रंथ शिकविण्याकरितां एक हरिदास ठेवला होता. जेव्हां माझी "त्यांत गति होऊं लागली तेव्हां मी घरांतील बायांस ते वाचून दाखवूं लागलों. "शेजारपाजारच्या सोनार वगैरे अब्राम्हण जातीच्या आयाबायाही माझें पुराण ऐकायास "येऊं लागल्या. मी त्या आळींत एक लहानसा पुराणिक बनलों. चौरंगावर ग्रंथ "ठेवून, व मी पाटावर बसून, हातांत त्याचीं पानें धरून वाचीत असें. ग्रंथारंभीं "मंगलाचरणाचा संस्कृत श्लोक म्हणावा, व समाप्तीस दुसरा एक श्लोक म्हणून "आरती करावी. कोणी बाया साखर, केळीं वगैरे पोथीपुढें ठेवीत, आणि माझ्या "गळ्यांत फुलांची माळ घालीत. हे ग्रंथ वाचण्याचे दीर्घकाळ चातुर्मासांतील रात्री "असत. त्याशिवाय वर्षांतील अनेक पर्वणीचे दिवशीं म्हणजे रामनवमी, जन्माष्टमी, "महाएकादशी, महाशिवरात्र इ. दिवशीं मी प्राकृत धर्मग्रंथ वाचीत असें. ते ग्रंथ येणें-"प्रमाणें होते. हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, भक्तविजय, संतलीलामृत, शिवलीला-"मृत, अश्वमेध, कथाकल्पतरु, पंढरीमाहात्म्य, रुक्मिणीस्वयंवर, गुरुचरित्र इ०. हे ग्रंथ

" त्या काळांत छापले नव्हते व ते मिळविणें कठीण पडे. आमच्या घरीं ज्या पोथ्या " नसत, त्या आम्ही दुसऱ्याच्या मागून आणाव्या. समग्र ग्रंथ कोणी एकदम देत " नसत, थोडे थोडे अध्याय आणून परत करावे, अशी चाल होती. आमच्यापाशीं " हरिविजयाचा ग्रंथ होता. तो पंधरा रुपयांस घेतला होता. त्याचें अक्षर फार सुंदर " होतें. ( आतां छापील प्रत एक रुपायास मिळते ! ) "

हे बाबा पदमनजी पुढें १८५४ सालीं खिस्ती बनले !

न्या. रानडे यांच्या A Note on the Growth of Marathi Literature च्या (१८९८) प्रस्तावनेवरून १८३७ ते १८४७ या दशकांत ज्ञानेश्वरी, हरिविजय, व रुक्मिणीस्वयंवर हे ग्रंथ प्रसिद्ध झाले होते, असें दिसून येतें. न्या. रानडे लिहितात,

" A more hopeful feature of the publications of this period appears to be that for the first time private publishers began to bring out editions of the old Marathi poets. *Dnyaneshwari*, *Hari-Vijaya* and *Rukmini-Swayamwara*...were for the first time published during this period. "

यावरून मासिक ' ज्ञानचंद्रोदया ' च्या कार्याची न्या. रानडे यांना माहिती नव्हती, हें स्पष्टच दिसतें.

आपल्या जुन्या वाङ्मयाकडे देशी व विदेशी लोकांचें लक्ष वेधण्याचें किंवा तें जास्त लोकप्रिय करण्याचें कार्य परशुरामतात्या गोडबोले यांनीं आपल्या ' नवनीता- ' च्या द्वारें केलें. महाराष्ट्रभाषेंतील कवितांच्या वेंच्यांची ' नवनीता 'ची १८५४ सालची ही पहिली एडिशन आमच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत आपणांस पहावयास सांपडेल. तिच्या मुखपृष्ठावर, " हें पुस्तक मेहेरबान मेजर कँडी साहेबबहादूर, पुणें पाठशाळेचे " प्रिन्सिपाल यांच्या आज्ञेवरुन परशुरामपंत गोडबोले यांनीं संग्रह करून रचिलें, तें " मेहेरबान बोर्ड ऑफ एज्युकेशन ह्यांच्या हुकूमावरून पुणें पाठशाळेकडील छापखान्यांत " छापिलें, " असा मजकूर आढळतो. या पहिल्या संपादणीच्या " पांचशें प्रती छापल्या " त्या सर्व संपल्या. याहून जर अधिक असत्या तर त्याही खपल्या असत्या, " असें १८५७ सालच्या द्वितीयावृत्तीच्या प्रस्तावनेंत असिस्टंट मराठी ट्रान्सलेटर, भास्कर दामोदर पाळंदे, यांनीं लिहिलें आहे. या उताऱ्यावरून ' नवनीता 'च्या जन्माचा इतिहास व आरंभींची लोकप्रियता लक्षांत येईल. ' नवनीता 'च्या १८५४ सालच्या पहिल्या संपादणीच्या प्रस्तावनेंत स्वतः परशुरामतात्या लिहितात,—

" मराठी भाषेंत कविताग्रंथ पुष्कळ व मोठाले आहेत, त्यांत छंद व " चालीही अनेक प्रकारच्या आहेत. त्यांची गोडी लागून तिकडे तरुणांच्या मनाची " प्रवृत्ति व्हावी ह्याकरितां मराठी भाषेंतल्या बहुतेक कवितांतील थोडेथोडे वेंचे घेऊन " हें एक लहानसें पुस्तक केलें आहे. हें मन लावून वाचिलें असतां कवितांचे प्रकार

" व रीती व त्यांतील चमत्कार व रस हीं सर्व थोडक्यांत समजतील. ह्या लहानशा " पुस्तकाचा अभ्यास चांगला झाला असतां मोठाले ग्रंथ पाहाण्यास मार्ग सुलभ होईल. " किंबहुना कविता करण्याची शक्तीही प्राप्त होईल. "

'नवनीता'च्या पहिल्या संपादणीमध्यें कवितांचा क्रम कवींच्या कालाप्रमाणें नव्हता, तर प्रथम अभंग, त्यापुढें ओव्या, त्याच्या पुढें वामनी श्लोक, मग मोरोपंती आर्या वगैरे, त्यानंतर कितीएक कवींनीं केलेलीं आख्यानें, कटिबंध, पदें वगैरे असा होता; तो कवींच्या कालानुक्रमें करून व कविचरित्रें व पद्यरचनेसंबंधीं भास्कर दामोदर पाळंदेकृत एक निबंध जोडून दुसरी आवृत्ति १८५८ सालीं छापण्यांत आली. पुढें १८६०, १८६२, १८६४, १८६८, १८७१, १८७३, १८७८, अशा आवृत्त्या भराभर निघाल्या. आरंभीं या ग्रंथाची किंमत रु. १–८ होती. इतकी मोठी किंमत देण्यास भारी वाटते अशा लोकांकरितां याच कवींचे दुसरे नवे उतारे निवडून नऊ आणे किंमतीचें "नवनीत भा. २ रा" किंवा "कवितासारसंग्रह" नांवाचें एक पुस्तक परशुरामपंत गोडबोल्यांनीं तयार केलें व पुणें येथें ज्ञानप्रकाश प्रेसमध्यें छापून १८६३ सालीं तें प्रसिद्ध झालें. सुप्रसिद्ध दिंडीबद्ध ध्रुवाख्यान याच 'सारसंग्रहा'त प्रथम प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. पुढें १८७८ च्या आवृत्तींत तें मूळ 'नवनीता'त समाविष्ट करण्यांत आलें. 'नवनीता'नंतर मराठी कवितांचे वेंचे निवडून अनेक लोकांनीं आजवर प्रसिद्ध केले. पण तात्यांनीं दाखविलेली रसिकता अन्यत्र कोठेंहि आढळत नाहीं. 'नवनीता-'च्या शेवटीं तात्यांनीं जीं चार स्वकृत पदें जोडिलीं आहेत, त्यापैकीं पहिल्यांत म्हटल्याप्रमाणें—

" काव्यामृताचा नवनीतभेला
" हा गोड लागो तुमच्या जिभेला
" याची तुम्हीं चाखुनि घ्याल गोडी
" तरी सुखाची मिळवाल जोडी, "

हें खरेंच आहे. असें असलें तरी हा " काव्यामृताचा नवनीतभेला " आज बाजारांत विकत मिळत नाहीं. इतकेंच नव्हे, तर प्रस्तुत ग्रंथसंग्रहालय किंवा आपल्या घराचा जुना बाजार केलेलीं माणसें यांच्या संग्रहाखेरीज इतरत्र कोठेंही हा ग्रंथ पाहावयास देखील सांपडणें दुर्दैवानें अशक्य झालें आहे !

'नवनीता' मुळें त्याकाळीं जुन्या काव्यासंबंधीं लोकांमध्यें किती प्रेम, कुतूहल व उत्साह निर्माण झाला होता, हें 'पुणें शालापत्रका'च्या १८६२ च्या एप्रिलच्या अंकांत मुंबईच्या एका शाळेंतील बक्षिससमारंभाची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे, तिच्यावरून कळून येतें. या हकिकतींत सदर बातमीदार लिहितो, "मुंबईतील सरकारी मराठी "शाळेंत मेहेरबान इन्स्पेक्टरसाहेब व डेप्युटि एज्युकेशनल इन्स्पेक्टरसाहेब यांनीं

" मुलांची परीक्षा घेऊन इनामें दिलीं. त्या दिवशीं एका मुलानें कोमल आणि अति
" सुरस कविता गायली ती—

" श्रवण करावें गीत ॥ प्रभुजी श्रवण करावें गीत ॥ धृ ॥
" पूर्वीं शाळेमाजी नवतें ॥ आतां झालें नवनीत ॥ प्रभूजी ॥ १ ॥
" सूर न ठावा, अर्थ न ठावा म्हणतों मी भीत भीत ॥ प्रभूजी० ॥ २ ॥
" विद्यामृत बहू साहेब देती स्वच्छ बसूं तें पीत ॥ प्रभूजी० ॥ ३ ॥
" पंत विनायक आर्यजनाला पद्यानें रिझवीत ॥ प्रभूजी० ॥ ४ ॥ "

या एज्युकेशनल इन्स्पेक्टरचें नांव मिस्टर कोक असें होतें. त्याचेंही नांव एका गाण्यांत पद्यनिविष्ट केलें आहे तें पहा—

" गुरुरायांनीं कष्ट फार केले ।
" म्हणुनि त्यांचे आभार मानियेले ।
" पाहावया साहेब कोक आले ।
" बालकांचे हेतुही पूर्ण झाले ॥ "

नवनीताचा मेला खाऊन पुष्कळ नव्या कवींना त्याकाळीं असेच कंठ फुटले असतील !

परशुरामतात्यांची मुख्य कामगिरी संस्कृत ग्रंथाचे मराठी भाषांतरकार म्हणून आहे. परंतु तो आपला प्रस्तुत विषय नाहीं.

' ज्ञानचंद्रोदय ' झाला किंवा ' नवनीत ' झालें तरी प्राचीन मराठी काव्य-प्रकाशनाचें खरें भरीव कार्य माधव चंद्रोबा यांनीं ' सर्वसंग्रह ' नांवाचें केवळ जुन्या मराठी काव्यप्रकाशनाला वाहिलेलें मासिक जन्माला घालून १८६० सालीं सुरू केलें. त्या काळीं धार्मिक ग्रंथांच्या मुद्रणाला लोकांचा कसा विरोध होता, हें मीं दाखविलेंच आहे. असें असतां स्वयंप्रेरणेनें आपलें प्राचीन वाङ्मय छापून काढण्याला माधव चंद्रोबांनीं कंबर कसलेली पाहून त्यांच्या धाडसाचें व मातृभाषेवरील प्रेमाचें कौतुक करावेंसें वाटतें. ' नवनीत ' हें सरकारी हुकुमावरून तयार करण्यांत आलें तरी पुढें येणाऱ्या चित्रपटाला जसा ट्रेलरचा उपयोग होतो तसा ' नवनीता 'चा ' सर्वसंग्रहा 'ला झाला, यांत शंका नाहीं. सर्वसंग्रहाच्या दर अंकाला ९६ पृष्ठें असत व त्याची किंमत आठ आणे होती. दर महिन्यास निरनिराळ्या कवींच्या लेखांचा थोडा थोडा भाग दिला जाई, परंतु त्यांची रचना अशी योजिली होती कीं, शेवटीं प्रत्येक कवीच्या ग्रंथाचीं निरनिराळीं पुस्तकें बांधतां यावीं. माधव चंद्रोबांनीं स्वतः लिहिलेल्या एप्रिल १८६० च्या ' सर्वसंग्रहा 'च्या पहिल्या वर्षाच्या प्रस्तावनेंतील कांहीं भाग आपणांस वाचून दाखवितों, म्हणजे त्यांच्या हेतूचा व कार्यपद्धतीचा आपणांस बोध होईल. माधव चंद्रोबा लिहितात,—

"या महाराष्ट्र देशांत प्राकृत भाषेंत कविता करणारे मुकुंदराज, ज्ञानेश्वर,
"एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, रामदास, तुकाराम, मोरोपंत, अमृतराय,
"रघुनाथपंडित, इत्यादि पुष्कळ रसिक विद्वान कवि होऊन गेले. त्यांचे
"ग्रंथ, अभंग, श्लोक, आर्या, ओवी इत्यादिबद्ध फार उत्तम प्रकारचे असतांहि जसे
"प्रसिद्ध असावे तसे नाहींत...भाषेचें पूर्ण ज्ञान त्या भाषेच्या कवितेच्या पूर्ण ज्ञानाखेरीज
"होणें अशक्य. भाषा सुधारण्याचें हें एक मुख्य व मोठें साधनच होय. असें असतां
"आपल्या अशा उत्तम ग्रंथांचा बहुधा लोप झाला आणि बाकीच्यांचीहि तीच गति
"होणारसें स्पष्ट दिसून येतें, हें किती दुःखकारक आहे! या कारणास्तव हें 'सर्वसंग्रह'
"या नांवाचें मासिक पुस्तक काढण्याचें योजिलें आहे. यांत सर्व प्राकृत कवींच्या
"काव्यांचा संग्रह केला जाईल. त्यास सूज्ञ जन आश्रय देऊन हें शेवटास नेतील
"अशी मोठी आशा आहे. आर्या श्लोकबद्धादि कविता समजण्यास फार कठीण
"असतात म्हणून त्या सुगम व्हाव्या या हेतूनें त्यांचीं पदें पाहून जे दुर्बोध शब्द
"आले त्यांचे पृष्ठाचे खालीं टीपीच्या रीतीनें अर्थ दाखविले आहेत. त्यांचीं बहुतेक
"पदांगें वेगळीं करून अर्थहि दाखविला आहे, आणि कित्येक कवितेंत विरामचिन्हें
"घालण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हा प्रयत्न पहिलाच आहे. तेणेंकरून त्यांत
"न्यूनार्थकत्वाचे दोष पुष्कळ आढळतील; तथापि विद्वज्जन त्याकडे लक्ष न
"देतां त्यांतील तिळप्राय जो गुण असेल तोच ग्रहण करतील अशी आशा
"करतों. या कृत्यास रा. रा. परशुरामपंत तात्या गोडबोले यांचें सहाय घेतलें
"आहे. प्राकृत कवींच्या ग्रंथांतून निवडक भाग घेऊन केलेलें जें 'नवनीत',
"आणि 'वेणीसंहार' व 'उत्तररामचरित्र' या दोन्ही संस्कृत नाटकांचीं प्राकृत
"भाषांतरें यांवरून या गृहस्थाची विद्वत्ता आणि मराठी भाषेची अभिरुचि, या
"प्रसिद्धच आहेत. यांच्या सहायानें या 'सर्वसंग्रह' ग्रंथास किती योग्यता येईल हें
"सूज्ञजनांस सांगावयास नको. या परोपकारी पुरुषानें केवळ लोकहितार्थच आम्हांस
"सहाय देण्याचें पत्करिलें आहे. या स्तुत्य कृत्यानें यांहीं आम्हावर जो उपकार केला
"आहे त्याविषयीं त्यांचे या स्थळीं उघडपणें आभार मानल्यावाचून माझ्यानें राहावत
"नाहीं. या ग्रंथास रा. रा. बाळ यज्ञेश्वर पाध्ये, निसबत सरकारी मराठी शाळा, या
"विद्वान गृहस्थांचेंही सहाय घेतलें आहे. तथापि या पुस्तकांत जे कांहीं दोष असतील
"त्याविषयीं जबाबदारी मजकडेसच.—माधव चंद्रोबा."

माधव चंद्रोबांना 'सर्वसंग्रहा' च्या कार्यांत त्यांचे बंधु डॉ. अनंत चंद्रोबा यांचें पुष्कळ साहाय्य असे. या बंधुद्वयासंबंधीं उपलब्ध असलेली माहिती मी आपणांस सांगतोंः

पोर्तुगीजांच्या धार्मिक वरवंट्याखालीं अगदीं आरंभीं—म्हणजे सोळाव्या शतकाच्या मध्यामध्यें—सांपडलेल्या गोमंतकांत कळंगुट नांवाचा एक गांव आहे. तेथें चंद्रोबा

डुकले नांवाचे एक गृहस्थ राहात होते. त्यांना माधव व अनंत असे दोन मुलगे होते. माधवाचा जन्म १८२५ मध्यें व अनंताचा जन्म ता. १० सप्टेंबर १८२९ रोजीं झाला. आपल्या जन्मभूमींत नशीब काढण्यास बिलकुल वाव न मिळाल्यामुळें चंद्रोबा आपली पत्नी व मुलें यांना घेऊन मुंबईस आले. मुंबईला येऊन कोठें त्यांचा जम बसतो न बसतो तोंच चार–पांच वर्षांच्या आंत त्यांच्यावर काळाची झडप पडली, आणि हें कुटुंब अनाथ झालें! जवळ असलेल्या शिलकेंतून या मुलांच्या आईनें मोठ्या काटकसरीनें दिवस चालविले. पण शेवटीं निरुपाय होऊन माधव व अनंत या दोघांही मुलांना आपली शाळा सोडून टांकसाळीमध्यें दरमहा तीन रुपये पगारावर नोकरी धरावी लागली. त्यांची शाळा सुटली तरी घरीं अभ्यास चालूच होता. त्यामुळें पुढें कांहीं दिवसांनीं वडील बंधु जो माधव त्यानें टांकशाळेंतील नोकरी सोडून कारकुनी पत्करली. व त्यानिमित्त त्याला इंदूर, कराची वगैरे शहरांत प्रवास करावा लागला. माधवाचा स्वभाव स्वाभिमानी व बाणेदार असल्यामुळें त्याच्या प्रकृतीला ही परवशता मानवली नाहीं. नोकरीला रामराम ठोकून तो लवकरच परत मुंबईला आला. येथें त्यानें एक फार्मसी उघडून विलायती औषधें आणून ती गुजराथी व्यापाऱ्यांना विकण्याचा धंदा सुरू केला व त्यालाच पुढें फोटोग्राफीच्या धंद्याची जोड दिली. (हा धंदा माधव चंद्रोबांच्या वंशजांनीं अद्याप चालू ठेविला आहे.) माधवाचा थोडासा जम बसतांच त्यानें आपला धाकटा बंधु जो अनंत त्याला नोकरी सोडावयास लावून १८४४ सालीं एल्फिन्स्टन हायस्कुलांत इंग्रजी शिक्षणाकरितां घातलें होतें. या मुलाची स्मरणशक्ति इतकी दांडगी असल्याचें सांगतात कीं, शेजारचा एक श्रीमंत मुलगा मोठ्यानें वाचीत असतां तें ऐकूनच यानें आपला अभ्यास पुस्तकाशिवाय करावा. प्रसिद्ध बाळशास्त्री जांभेकर यांचें या मुलाकडे लक्ष गेल्याखेरीज राहिलें नाहीं. त्यांनीं अनंताला उत्तेजन दिलें. पुढें १८४५ सालीं ज्या वेळीं ग्रांटमेडिकल कॉलेज स्थापन झालें त्यावेळीं मुलांच्या परीक्षा घेऊन ज्या चाळीस मुलांना या कॉलेजांत प्रवेश मिळाला त्यांपैकीं अनंत हा एक होता. १८५१ सालीं या कॉलेजांतून तयार झालेल्या पहिल्या आठ डॉक्टरांमध्यें तीन खिश्चन, दोन पारशी, व तीन हिंदु होते. हे पहिले तीन हिंदु डॉक्टर म्हणजे पहिले सुप्रसिद्ध भाऊ दाजी लाड, दुसरे प्रस्तुत अनंत चंद्रोबा डुकले, व तिसरे व्याकरणकार दादोबांचे धाकटे बंधु, आत्माराम पांडुरंग तर्खडकर, हे होत.

अनंत चंद्रोबा डॉक्टर झाल्याबरोबर सरकारनें त्यांची एका पलटणींत सबअसिस्टंट सर्जन म्हणून नेमणूक करून इंदुरास पाठविलें व तेथून दीड वर्षानें त्यांची बदली भोपाळास केली. परंतु तेथें हवा न मानवल्यामुळें ते परत मुंबईला आले. पुढें १८५४ सालीं ते कराचीला गेले व तेथील म्युनिसिपालिटीमध्यें डॉक्टर होते. येथें त्यांचा व रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांचा स्नेह जमला. मुंबईला जसे डॉ. भाऊ दाजी, तसे कराचीमध्यें

डॉ. अनंत चंद्रोबा मंडलिकांचे मित्र व गृहवैद्य होते. रावसाहेब मंडलिकांच्या सांगण्यावरून त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. मंडलिकांना अनंत चंद्रोबांनीं सिंधी व्याकरण शिकविलें व मंडलिकांनीं अनंत चंद्रोबांना बीजगणित शिकविलें. त्यांना मस्तिष्कविद्या (म्हणजे मस्तकावरच्या टेंगळांवरून स्वभावपरीक्षा व दैवपरीक्षा करण्याची विद्या) अवगत होती व इच्छाशक्तीचे प्रयोग करण्याचा नाद होता. शेक्सपिअरचीं नाटकें अनंत चंद्रोबा व मंडलीक बरोबरच वाचीत. वामनी श्लोक व मोरोपंत श्लोक यांचा अर्थ लावण्याचाही अनंत चंद्रोबांना भारी नाद असे. कराचीस असतांना तेथील कमिशनर सर बार्टल फ्रियर यांनीं त्यांच्या कामाची फार वाहवा केली होती; परंतु त्यांच्या मातोश्रीच्या निधनानें चित्त उद्विग्न झाल्यामुळें व त्यांची प्रकृतीहि तेथें ठीक न राहिल्यामुळें ते पुन्हा मुंबईला आले. विनायक कोंडदेव ओक यांनीं 'बालबोधा-' मध्यें त्यांचें मुंबईला येण्याचें वर्ष १८६७ असें लिहिलें आहे†. परंतु रा. हवालदार यांनीं रा. सा. मंडलिकांना कराचीहून आलेलें त्यांचें जें एक पत्र उद्धृत केलें आहे त्यांत त्यांच्या आगमनाची तारीख १५ जून १८५९ अशी आढळते.‡ 'मुंबई गॅझेटियर' मध्यें व्हॅक्सिनेशनच्या चळवळीची हकीकत देतांना, "In the year "1858, the first superintendent of the vaccination, the late Dr. "Anant Chandroba, was appointed"* असें लिहिलेलें आहे. कसेंही असो, डॉ. अनंत चंद्रोबा मुंबईस आल्यावर 'सर्वसंग्रह' सुरू करण्याच्या कल्पनेला माधव चंद्रोबांनीं मूर्त स्वरूप दिलें. त्यांचा औषधें व फोटोग्राफी यांचा धंदा उत्तम प्रकारें चालला होता तरी विद्याव्यासंगही अखंड चालूच होता. जुन्या मराठी हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह करण्याचा त्यांना विलक्षण नाद होता. हें आपलें प्राचीन ग्रंथभांडार लुप्त होत चालल्याबद्दल त्यांना किती दुःख होत असे, याची कल्पना आतांच वाचून दाखविलेल्या सर्वसंग्रहाच्या प्रस्तावनेवरून सहज होईल. 'सर्वसंग्रहा'ला सुरुवात करण्याच्या अगोदर त्यांनीं कांहीं फुटकळ कविता लहान लहान पुस्तकांच्या रूपानें प्रसिद्ध केली असावी. कारण मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत अमृतरायकृत 'शुकचरित्र' नांवाचें एक पुस्तक आहे, त्याच्यावर "माधव चंद्रोबा यांच्या छापखान्यांत छापलें. ठिकाण लोहार "चाळ, शके १७८१," असा मजकूर आढळतो. माधव चंद्रोबा हे मोठे कल्पक संपादक होते. शब्द न तोडतां काव्याचे चरण अखंड लिहिण्याची किंवा छापण्याची पूर्वी पद्धत होती. परशुरामतात्यांच्या 'नवनीता' मध्यें १८७३ च्या आठव्या आवृत्तीपर्यंत ही अखंड चरण छापण्याची चाल आढळून येते. पुढें सन १८७८ च्या

† बालबोध, वर्ष ४, पृ. ६१.

‡ रा. सा. वि. ना. मंडलिकांचें चरित्र, भा. २ रा, पृ. १०९२.

* Bombay Gaz. Part III, 1910, P. 200.

नवव्या आवृत्तीपासून ही ‘ सर्वसंग्रहा ’ ची पद्धती ‘ नवनीता ’ नेंही स्वीकारली. शब्द तोडण्याप्रमाणें समासाचीं पदें वेगवेगळीं स्पष्ट करून दाखविणें व विरामचिन्हें देणें ही सुधारणा माधव चंद्रोबांनींच मराठीमध्यें प्रथम रूढ केली. आश्चर्याची गोष्ट ही कीं, दादोबा पांडुरंगांनींहि १८६५ मध्यें आपली ‘ केकावली ’ छापतांना ही माधव चंद्रोबांची उपयुक्त पद्धति अवलंबिलेली दिसत नाहीं. ‘ सर्वसंग्रहा ’ च्या मुखपृष्ठावर, “ माधव चंद्रोबा यांनीं रा. रा. परशुराम बल्लाळ गोडबोले यांच्या सहायानें शुद्ध करून “ छापिला, ” असा मजकूर आढळतो. त्यावरून माधव चंद्रोबा म्हणजे केवळ मुद्रक किंवा प्रकाशक होते व संपादनाची सर्व जबाबदारी परशुरामतात्यांवर होती, अशी कांहीं लोकांनीं आपली चुकीची समजूत करून घेतलेली दिसते. उदाहरणार्थ, पांगारकर आपल्या मोरोपंतावरील ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लिहितात, “ माधव चंद्रोबा व परशुरामपंत “ तात्या या जोडीप्रमाणेंच जावजी दादाजी व वामनराव ओक यांचीही जोडी मराठी “ भाषेच्या सुदैवानें महाराष्ट्रास मिळाली. ” वस्तुस्थिति अशी कीं, ‘ सर्वसंग्रहा ’ च्या संपादनाचें काम डुकलेबंधु पाहात. विशेष कठीण व दुर्बोध स्थळांपुरती ते थोडी-फार परशुरामतात्यांची मदत घेत. “ वामन पंडित, मोरोपंत इत्यादि महाराष्ट्र “ कवींचा उद्धार करण्याकरितां मोठ्या प्रयत्नानें त्यांचे ग्रंथ जमवून शुद्ध रीतीनें “ व विरामचिन्हांदिकांनीं युक्त करून, अन्वय स्पष्ट करून, कठीण शब्दांच्या आणि “ अर्थाच्या टिपा देऊन छापविणारे, आणि आपणास दांभिकपणाचा दोष लागूं नये इतक्या “ करतांच अल्प स्वल्प साह्यास्तव सर्व ग्रंथावर परशुरामतात्यांसारख्यांचें साहाय्य मोठ्या “ सौजन्यानें मांडून ठेवणारे, ” असें एके ठिकाणीं माधव चंद्रोबा व अनंत चंद्रोबा या डुकले बंधूंचें वर्णन रामभाऊ गुंजीकरांनीं केलेलें आहे. ( भ्रमनिरास, पृ. १६२ )

‘ सर्वसंग्रह ’ सात–आठ वर्षें चालून पुढें बंद पडला. याबद्दल विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं ‘निबंधमाले’ मध्यें ठिकठिकाणीं हळहळ व्यक्त केली आहे. उदारणार्थ मोरोपंतावरील आपल्या निबंधाच्या सुरुवातीलाच ते लिहितात, “ ‘ सर्वसंग्रह ’ पुस्तक “ सहासात वर्षेंच काय तें चालून त्यांत जो काय थोडाबहुत महाराष्ट्र कवितेचा जीर्णोद्धार “ झाला तो झाला. त्याचा आयुर्दाय संपून आज दहा वर्षें होत आलीं; व इतक्या “ काळांत शेंकडो गोष्टींचें ‘ उत्तेजन ’ व ‘ वर्धन ’ झालें पण इतक्या लोककल्याणेच्छूंत “ एकदोनहि आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्र कवींच्या वांट्यास आले नाहींत. रा. माधव “ चंद्रोबा ‘ सर्वसंग्रहा ’ चे मालक यांनीं सरकारचा आश्रय तुटला असतां आपल्या “ देशबंधूंची जी काकुळत केली ती केवळ अरण्यरुदनाप्रमाणें निष्फळ झाली ! ” असो.

‘ सर्वसंग्रहा ’ च्या अवतारसमाप्तीमुळें मराठी काव्याची झालेली हानी भरून काढून त्याचें कार्य पुढें चालविण्याकरितां मालाकारांनीं ओक व साने यांच्या साहाय्यानें १८७८ मध्यें–म्हणजे ‘ सर्वसंग्रह ’ बंद झाल्यावर दहा वर्षांनीं–‘ काव्येतिहाससंग्रह ’ जन्मास घातला. यांत काव्यांबरोबर ऐतिहासिक कागदपत्रही छापले जात. तोहि दुर्दैवानें

बंद पडल्यावर १८९० सालीं ‘ निर्णयसागर ’चा ‘ काव्यसंग्रह ’ निघाला. या दोन्ही काव्यप्रकाशनप्रयत्नाच्या नांवांत ‘ संग्रह ’ हाच शब्द होता. यावरून ‘ सर्वसंग्रहा ’ची परंपरा पुढें चालविण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट दिसतो. पुढें दर कवीच्या काव्यप्रकाशनाला वाहिलेलीं सूर्याजी महात्म्यांचे वामनी ग्रंथ ( १८८९ ), पैंचा योगीराज सोहिरोबा ( १९०५ ), देवांचें रामदास आणि रामदासी ( १९१५ ) अशीं नियतकालिकें निघालीं. हे सगळे प्रयत्न आमच्या कालमर्यादेच्या बाहेर असल्यामुळें त्यांच्यासंबंधीं मी जास्त कांहीं सांगू इच्छित नाहीं. ‘ सर्वसंग्रहा ’च्या द्वारा जे ग्रंथ प्रसिद्ध झाले त्यांचीं नांवें मी आपणांस वाचून दाखवितों :

१. मोरोपंतकृत आर्या : एकंदर १८ पर्वांचे भाग २, श्रीमद्भागवत १२ स्कंध, ब्रह्मोत्तरखंड, हरिवंश, भगवद्गीता, सप्तशती, मदालसोपाख्यान, बृहद्दशम उत्तरार्ध, मंत्ररामायण, नलाख्यान.

२. मोरोपंतकृत रामायणें : एकूण भाग ४.
३. तुकारामकृत अभंग : एकूण भाग ५.
४. वामनपंडितकृत श्लोक : एकूण भाग ४.
५. सर्वसंग्रह म्हणजे अनेक कविता : एकूण भाग ५.
६. रामदासकृत अभंग.
७. नामदेवकृत अभंग.
८. मुक्तेश्वरकृत कौतूहलनाटकरामायण.
९. सुभानंतकृत भीष्मपर्व ओव्या.
१०. मुक्तेश्वरकृत : आदिपर्व, सभापर्व, विराटपर्व.
११. एकनाथकृत आत्मसुख.
१२. पंचतत्त्व.
१३. वेदांतसूर्य.

आतां जी यादी आपणांस वाचून दाखविली तिच्यामध्यें मुक्तेश्वराच्या आदि, सभा व विराट या पर्वांचा निर्देश आहे; परंतु विराटपर्वाच्या आधींच्या वनपर्वाचा नाहीं. आमच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या छापील कॅटलॉगमध्यें ‘ सर्वसंग्रहा ’ची वनपर्वप्रत असल्याचा उल्लेख आहे; पण ती चूक होय. ‘ सर्वसंग्रहां ’त वनपर्व छापलेलेंच नाहीं ! हें पर्व ‘ सर्वसंग्रहां ’त प्रसिद्ध न झाल्यामुळें आपण स्वतः छापणार आहों व १ नोवेंबर १८७६ चे सुमारास तयार होईल, अशी जाहिरात रा. रामचंद्र भिकाजी जोशी, रत्नागिरी हायस्कूल, यांनीं ‘विविधज्ञानविस्तारा’च्या जून १८७६ च्या अंकाच्या मुखपृष्ठावर दिलेली आढळते; परंतु ही जोशीकृत प्रत माझ्यातरी पाहाण्यांत नाहीं. जोशीबुवांचा हा संकल्प सिद्धीला गेलेलाच दिसत नाहीं ! काव्येतिहाससंग्रहांत

हें पर्व पुढें शके १८०१ मध्यें (म्हणजे सन १८७९ मध्यें) छापलें गेलें व पुढें १८९८ मध्यें 'काव्यसंग्रहा'मध्येंही तें प्रसिद्ध झालें. या काव्यसंग्रहप्रतीच्या पहिल्या पृष्ठावरच संपादक वामन दाजी ओक तळटीप देतात ती अशी—

"उद्वेगजनक व अशुभ अशा कथानकांनीं पूर्ण असल्यामुळें महाभारत व "विशेषतः वनपर्व वाचूं नये, अशी पुष्कळ भोळ्या माणसांची समजूत आहे. ही "समजूत तैलंगणांत फारच जारीनें चालू आहे. त्यांची ही अशी समजूत होण्यास एक "विशेष कारण झालें तें असें : संस्कृत भारताचें तेलगु भाषेंत भाषांतर करीत असतां "वनपर्वापर्यंत येऊन तो भाषांतर-कर्ता एकाएकीं मृत झाला. पुढें दुसऱ्या भाषांतर-"कर्त्यानें वनपर्व सोडून बाकीच्या पर्वांचें भाषांतर केलें. आपलें नांव प्रसिद्ध न "केल्यामुळें तो वांचला खरा, परंतु त्याला पुष्कळ त्रास सोसावा लागला, अशी त्या "लोकांची समजूत आहे. 'भारत' वाचतांना तेलंगी लोक नेहमीं वनपर्व गाळतात! "व कित्येक भोळे म्हातारे आपल्या महाभारताच्या पोथींतून वनपर्वाचीं पानें गाळून "टाकतात."

'सर्वसंग्रहां'त वनपर्व न छापण्यास हीच समजूत कारण झाली नाहीं ना? पण मोरोपंती वनपर्व त्यांत प्रसिद्ध झालें आहे. 'चिपळूणकर आणि मंडळी' च्या वनपर्वाच्या प्रस्तावनेंत तें पर्व प्रसिद्ध करतांना, 'आमची अगदीं दशा दशा झाली,' असें लिहिलेलें आढळतें. 'काव्येतिहास–संग्रह,' 'काव्यसंग्रह,' 'इंदुप्रकाश,' 'कर्नाटक प्रेस' इत्यादि वनपर्वाचे संपादक व प्रकाशक यांचा अनुभव काय आहे तें मला माहीत नाहीं; परंतु 'भांडारकर ओरिएंटल रिसर्च इंस्टिट्यूट'चा जो महाभारत-संपादनाचा आन्तरराष्ट्रीय प्रयत्न चालू आहे त्याचे संपादक, विद्वद्वर्य डॉ. वि. स. सुखठणकर हे त्यांनीं संपादिलेलें महाभारताचें वनपर्व प्रसिद्ध होतांच लवकरच एकाएकीं वारले, ही दुर्दैवी घटना जुन्या लोकभ्रमाला पुष्टी देणारी आहे. आरण्यक पर्वाचा पूर्वार्ध (Fascicule I) १९४१ मध्यें व उत्तरार्ध (Fascicule II) १९४२मध्यें प्रसिद्ध झाला व ता. २१ जानेवारी १९४३ रोजीं डॉ. सुखठणकरांचें निधन झालें. माझा अशा गोष्टींवर विश्वास नाहीं; परंतु काकतालीयन्यायानें कां होईना, गेल्या वर्षीच घडलेला दुर्दैवी प्रकार नमूद केला इतकेंच. प्राचीन काव्यांच्या संरक्षणाच्या आड येणारे एक दोन लोकभ्रमाचे प्रकार सांगितले. आतां त्याच्या उलट एक सांगतों:—पांच-सहा वर्षांमागें धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिर व राजवाडेसंशोधनमंदिर या संस्थांतील मराठी हस्तलिखितें पाहाण्याकरितां तिकडे कांहीं दिवस मी जाऊन राहिलों होतों. तेथें मला एकनाथी 'रुक्मिणी–स्वयंवरा'चीं पुष्कळच हस्तलिखितें आढळलीं. हें असें कां, असा प्रश्न करतांच तिकडे त्यावेळीं असलेले डिस्ट्रिक्ट जज्ज श्रीयुत पु. म. लाड म्हणाले, "ज्यांचे विवाह होत नाहींत अशा लोकांनीं या स्वयंवराची नकल करतांच ते घडून "येतात, अशी जुन्या काळीं लोकांची कल्पना होती, आणि तिचें हें दृश्य फल आहे."

(आजच्या विवाहोत्सुक तरुण–तरुणींनीं प्रयोग करून या गोष्टीचा अनुभव घेण्यासारखा आहे !)

माधव चंद्रोबांना 'सर्वसंग्रहा'च्या प्रकाशनांत बिलकुल प्राप्ति नव्हती. उलट वर्षाकांठीं त्यांना बरीच पदरमोड करावी लागत असे. असें असूनही केवळ मातृभाषेच्या प्रेमामुळें त्यांनीं हा उद्योग चालविला होता. १८८५ सालच्या डिसेंबर महिन्यांत दत्तजयंतीच्या दिवशीं माधव चंद्रोबा स्वर्गवासी झाले. 'सर्वसंग्रहा'चे दुसरे संपादक डॉ. अनंत चंद्रोबा हे जस्टिस ऑफ दी पीस व मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो होते. नामदार व्हाइसरॉय साहेबांचे ऑनररी असिस्टंट सर्जन ही पदवीही त्यांना मिळाली होती. त्यांचें निधन ता. १९ ऑगस्ट १८८४ रोजीं झालें, आणि मुंबईचे सारे लोक हळहळले ! बाळबोधकार त्यांच्यासंबंधीं लिहितात, "हे मोठे बुद्धिवान होते. त्यांची स्मरणशक्ति जबरदस्त होती....त्यांचें लक्ष "गरिबांकडे विशेष असे....हे मोठे रसिक होते. ह्यांस वामनी श्लोक आणि मोरोपंती "आर्या हीं लावण्याचा नाद फार असे. ह्यांचे बंधु रा. रा. माधव चंद्रोबा हे "'सर्वसंग्रह' नामक मासिक पुस्तक काढीत असत. त्यांत त्यांना डॉक्टर अनंत ह्यांचें "पुष्कळ साह्य असे."

प्राचीन काव्यप्रकाशनाचे आणखी जे तीन फुटकळ परंतु विद्वत्तापूर्ण व मार्मिक प्रयत्न झाले, त्यांच्यासंबंधीं चार शब्द सांगून मी माझें भाषण पुरें करणार आहें. ते म्हणजे—

(१) १८६३ सालीं शंकर पांडुरंग पंडित यांनीं सटीप प्रसिद्ध केलेला मोरोपंतांचा बृहद्दशम अथवा कृष्णविजय,

(२) १८६५ सालीं केकावलीवर दादोबा पाडुरंगांनीं लिहिलेली यशोदापांडुरंगी नामक टीका, व

(३) १८६७ सालीं याच काव्यावर रसिकवर्य परशुरामतात्या गोडबोले यांनीं लिहिलेली केकादर्श नामक टीका.

शंकर पांडुरंग पंडित संस्कृतज्ञ म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. The Bombay Sanskrit Series मध्यें प्रसिद्ध झालेल्या मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व रघुवंश या ग्रंथांवरील त्यांच्या सटीप व चिकित्सक संपादण्या विद्वन्मान्य आहेत. इंग्रजी, संस्कृत व लॅटिन भाषांवर त्यांचें इतकें प्रभुत्व असतांही त्या काळच्या इतर कांहीं नव्या विद्वानांप्रमाणें मायभाषेविषयीं त्यांना तिटकारा नव्हता. आपल्या भावी लौकिकाचा पाया त्यांनीं १८६३ सालीं एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें सीनियर स्कॉलर असतांना मयूरकृत बृहद्दशम या मराठी ग्रंथावर टीपा लिहून घातला.

पंडितांचें विद्यार्थिदशेंतील पांडित्य या ग्रंथांत आपल्या प्रत्ययास येतें. याच वर्षी

त्यांनीं Marathi Classics या विषयावर लेख लिहून तो Elphinstone School-paper च्या ऑक्टोबर १८६३ च्या अंकांत प्रसिद्ध केला आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनंतर पंडितांना दक्षिणा प्राइझकमिटीचे चिटणीस नेमलें व १८६६ पासून १८६९ पर्यंत ते त्या जागीं होते. या मुदतींत त्यांनीं मराठी भाषेविषयीं चांगलीच आस्था दाखविली. " टीकाचिन्हांकनादिकांनीं सुबोध " केलेला बृहद्दशम हा ग्रंथ त्यांनीं डॉ. भाऊ दाजी यांना अर्पण केला आहे. या इंग्रजी अर्पणपत्रिकेंत—" This humble attempt "at the promotion of the study of Marathi poetry is most respect- "fully dedicated as a token of approbation of his zeal and labours "in the cultivation of Marathi Literature," असें पंडितांनीं म्हटलें आहे. त्यावरूनही त्यांचें मराठीवरील प्रेम दिसून येतें. पंडितांनीं 'तुकारामाचा गाथा' संपादिला असून 'वेदार्थयत्न' म्हणून वेदांच्या मराठी भाषांतराचाही प्रयत्न केला होता. परंतु हे प्रयत्न आपल्यापुढील कालमर्यादेबाहेरील असल्यामुळें त्यांच्यासंबंधीं मी आज येथें जास्त बोलूं इच्छित नाहीं. पंडितांचा हा प्रयत्न इंग्रजी वळणाच्या 'ॲनोटेशन्स' च्या धर्तीवर होता; परंतु जुन्या संस्कृत पद्धतीच्या घाटणीवर केलेली टीका म्हणून रा. ब. दादोबा पांडुरंग यांचा मोरोपंतांच्या 'केकावली'वर लिहिलेला 'यशोदापांडुरंगी' हा टीकाग्रंथ केवळ अपूर्वच नसून अप्रतिमही आहे. जुन्या मराठी वाङ्मयाचा चिकित्सक पद्धतीनें अभ्यास कसा करावा, याचा नमुना म्हणून हा ग्रंथ आजही पुढें ठेवण्यासारखा आहे. या ग्रंथाच्या निर्मितीचा इतिहास दादोबांनीं प्रस्तावनेंत दिला आहे. तो त्यांच्याच शब्दांत सांगतों :—

" माझी परम आवडती व सुशील कन्या कावेरीबाई, जिला जगदीशानें आतां "दोन वर्षे झालीं आपल्या सन्निध नेलें, तिला ज्या रीतीनें हें काव्य सुबोध होईल अशा "रीतीनें पाल्हाळ करून म्यां याजवर टीका लिहिली. ...मनांत कीं, तिला या अशा "पद्धतीच्या टीकेवरून हा ग्रंथ लागला तर इतर बाळांसहि सहज लागेल. ...त्यानंतर "२३ वी मे सन १८६३ इसवीच्या रात्रीस त्या कन्येस जगदीशानें आपल्याजवळ नेलें. "त्या तिच्या वियोगानें अत्यंत दुःखितान्तःकरण होत्साता आपल्या मनांत विचार करूं "लागलों कीं, तिचें स्मरण राहाण्याकरितां वापी, कूप, तडाग अथवा धर्मशाळा बांधून "एखादें पूर्त काम करावें तितकें द्रव्यसामर्थ्य आपल्यास नाहीं; तेव्हां जिच्या अभ्यासा- "करितां जो ग्रंथ लिहिण्यास प्रथम लेखणी हातीं धरली तोच ग्रंथ आतां तिच्या स्मरणास "अर्पण करून प्रसिद्ध करावा."

ही विस्तृत प्रस्तावना विद्वत्तापूर्ण असून दादोबांची रसिकताहि तिच्यावरून चांगल्याप्रकारें दिसून येते. या टीकेसंबंधीं पांगारकर आपल्या मोरोपंतचरित्राच्या प्रस्तावनेंत लिहितात, "ह्या ग्रंथानें बरेंच काम केलें. ज्ञानप्रसारक, इंदुप्रकाश "इत्यादिकांनीं 'यशोदापांडुरंगी'वर 'कुलपी' गोळ्यांचा भडिमार करून तिच्या

" कर्त्यांच्या पदरांत प्रमादबाहुल्याचें गाठोडें बांधलें. 'यशोदापांडुरंगी' टीकेंत पुष्कळ
" दोष आहेत, अर्थाची ओढाताण केली आहे, तथापि ह्या ग्रंथानें तेव्हां मोठी चळवळ
" उडवून दिली. पंतांच्या अत्युत्कृष्ट काव्याकडे ह्या ग्रंथामुळें महाराष्ट्रवाचकांचें लक्ष
" वेधलें. मालाकारांना पंतांच्या कवितेची गोडी 'यशोदापांडुरंगीनें'च लाविली."

असो. त्या काळीं रा. ब. दादोबा पांडुरंग म्हणजे एक बडें प्रस्थ होतें. त्यांच्या ग्रंथावर झालेली 'इंदुप्रकाशां'तील टीका मीं पाहिलेली नाहीं, पण 'ज्ञानप्रसारकां'तील टीका मीं वाचलेली आहे. या टीकेला कुलपी गोळ्यांचा भडिमार म्हणतां येणार नाहीं. ती मोठ्या सहानुभूतीनें व रावबहादुरांसंबंधीं अत्यंत आदर ठेवूनच लिहिलेली आहे. 'यशोदा-पांडुरंगी शुद्धीकरण' या मथळ्याखालीं 'ज्ञानप्रसारका'च्या ऑक्टोबर १८६५ च्या अंकापासून ती सुरू होऊन पुढें पांच-सात अंक ती चालू होती. ही टीका भास्कर दामोदर पाळंदे यांनीं लिहिली असावी, असें मला वाटतें. या टीकेमध्यें दाखविलेलीं कांहीं स्थळें मतभेदाचीं असलीं तरी बरींचशीं प्रमादस्थळेंही आहेत. परंतु 'यशोदापांडुरंगी' या टीकेचें महत्त्व विशेषतः एक विशिष्ट टीकापद्धति जी दादोबांनीं महाराष्ट्रापुढें नव्यानेंच ठेविली तिच्यांत आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर लिहितात,—

" रावबहादूरांच्या आवृत्तींत पुष्कळ प्रमाद आहेत, हें खरें. तथापि त्यांच्या-
" सारख्या विख्यात विद्वानानें आमच्या कवीच्या अत्यंत रमणीय कृतीचा पुरस्कार
" करून 'यशोदापांडुरंगी' सारख्या महाराष्ट्रटीकेचा अपूर्व प्रकार प्रथम सुरू केला,
" याबद्दल सर्व रसिकांनीं व महाराष्ट्रभाषेच्या हितचिंतकांनीं त्यांचे आभार मानणें अवश्य
" होय. वरील टीकेचें नांव तर आम्हांस अत्यंत प्रिय आहे. आमच्या वाचकांस येथें
" सांगण्यास फारशी हरकत दिसत नाहीं कीं, मयूरकवीचा अपूर्व टाहो आमच्या कानीं
" समग्र पडण्यास सदरील टीका–ग्रंथच कारण झाला."

'यशोदापांडुरंगी' प्रसिद्ध झाल्यावर पुढें दोन वर्षांनीं म्हणजे १८६७ सालीं परशुरामतात्यांनीं आपला 'केकादर्श' प्रसिद्ध केला. केवळ अर्थाच्या दृष्टीनें पाहिलें तर ही टीका 'यशोदापांडुरंगी' पेक्षां निःसंशय वरच्या दर्जाची आहे. अर्थातच 'यशोदापांडुरंगी' व तिच्यावर अनुकूल प्रतिकूल झालेली टीका यांचा फायदा, 'पुढच्यास ठेंच मागचा शहाणा' या न्यायानें, तात्यांना मिळाला असला पाहिजे. 'केकादर्शा'च्या प्रस्तावनेंत तात्या म्हणतात,—

" कवींचें हृदय तर समजणें कठिणच आहे. तथापि ईश्वरानें दिलेल्या बुद्धीच्या
" बळानें आणि विद्वज्जनांच्या साह्यानें जितका अर्थ उघड करवेल तितका थोडक्यांत
" करावा अशी वांछा धरली आहे."

या 'केकादर्शा'वर अभिप्राय लिहितांना 'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्याच वर्षाच्या चौथ्या अंकांत रामभाऊ गुंजीकर म्हणतात, " केवळ कवीचा भावार्थ

"स्पष्ट केला म्हणजे इतक्यानेंच टीकाकाराचें सगळें काम झालें असें आमचें मत नाहीं....
"मोरोपंताच्या स्वकल्पित ग्रंथांमध्यें हा ग्रंथ मुख्य असून यांत त्याणें शब्दपांडित्य पुष्कळ
"दाखविलें आहे, व याच ग्रंथावरून काय ती त्याची कविताशक्ति विशेष दृष्टोत्पत्तीस
"येणार. याकरितां तिजमध्यें वास्तविक प्रशंसेस पात्र जे पुष्कळ गुण आहेत ते दाखवून
"तदनंतर मोरोपंताचे शब्द म्हणजे केवळ ब्रह्मवाक्य, ही कल्पना सोडून त्याच्या
"प्रतीच्या एकशेंवीस श्लोकांमध्येंच जो पूर्वापार असंगतपणा, किंवा जे इतर दोष अस-
"तील तेही दाखविणें हा टीकाकाराचा धर्म आहे." (अशीं कांहीं दोषस्थळें उदाहर-
णादाखल दाखवून ते पुढें म्हणतात)—"अशा प्रकारचा पूर्वापर विरोध आणि या शिवाय
"त्याच्या कल्पनेच्या ओघानें पुनः पुनः जाहलेलें परिभ्रमण इत्यादिकांविषयीं टीका-
"काराचीं मतें 'केकादर्शा' मध्यें आलीं असतीं तर फार चांगलें झालें असतें."

(वि. शा. वि. पु. १, अं ४, पृ. ६४)

गुंजीकर सुचवितात ती टीकापद्धति केकादर्शामध्यें तर नाहींच, पण यशोदा-पांडुरंगीमध्येंही दादोबांनीं दाखविलेली दिसत नाहीं.

जुन्या मराठी वाङ्मयाचे जे संपादनप्रकाशनाचे मुख्य प्रयत्न झाले त्यांची मीं आतांपर्यंत माहिती सांगितली. या शिवाय शिलाछापखान्यांत ज्या पोथ्या किंवा लहान लहान पुस्तकें छापून प्रसिद्ध केलेलीं मला आतांपर्यंत आढळलीं, त्यांची मी पद्धतशीर यादीच तयार केलेली आहे. यामध्यें अभंग, आरत्या, धांवे अशासारखीं पैशादोनपैशांचीं किंवा आणा-दीड-आण्याचीं पुस्तकेंच फार आहेत. विशेष महत्त्वाच्या ग्रंथांचीं नांवें पुढें देतों—

| | | | |
|---|---|---|---|
| रुक्मिणी–स्वैंवर (एकनाथ), | गणपत कृष्णाजी, | मुंबई | १८३६ |
| ब्रह्मस्तुतीची टीका (वामन), | ,, | ,, | १८४२ |
| शिवलीलामृत (श्रीधर), | ,, | ,, | १८४४ |
| ज्ञानेश्वरी (ज्ञानदेव), | प्रभाकर | ,, | १८४५ |
| भक्तलीलामृत (महिपति), | गणपत कृष्णाजी | ,, | १८४६ |
| हरिविजय (श्रीधर), | वि. स. अग्निहोत्री | ,, | १८४७ |
| शिवलीलामृत ( ,, ), | गणपत कृष्णाजी, | ,, | १८४८ |
| श्रीशिवगीता (मंगेशात्मसदाशिव), | बा. ह. देवळेकर, | ,, | १८५६ |
| भक्तविजय (महिपति), | बा. स. शेट हेगिष्टे | ,, | १८६० |
| गुरुचरित्र (सरस्वती गंगाधर), | जगन्मित्र, | रत्नागिरी | १८६१ |
| शनिमाहात्म्य (तात्याजी महिपति), | बुद्धिप्रकाश, | पुणें | १८६३ |
| जैमिनी अश्वमेध (श्रीधर), | बा. स. शेट हेगिष्टे, | मुंबई | १८६४ |
| पांडवप्रताप ( ,, ), | बा. ह. शेट देवळेकर, | ,, | १८६४ |

| | | | |
|---|---|---|---|
| यथार्थदीपिका (वामन), | जगन्मित्र, | रत्नागिरी | १८६४ |
| गुरुचरित्र (सरस्वती गंगाधर), | ना. आ. गोडबोले, | पुणें | १८६४ |
| अमृतानुभव (ज्ञानेश्वर), | गं. गो. सापकर, | पुणें | १८६५ |
| पांडुरंगमाहात्म्य (श्रीधर), | जगन्मित्र, | रत्नागिरी | १८६७ |

जुन्या ग्रंथांच्या संपादनाच्या दृष्टीनें टीपा किंवा टीका वगैरेचें स्थान किंवा महत्त्व दुय्यम आहे. संपादकाचें मुख्य कार्य म्हणजे ज्या स्वरूपांत कर्त्यानें तो ग्रंथ रचिला तें मूळ स्वरूप शक्यतोंवर त्या ग्रंथाला प्राप्त करून देणें हें होय. कारण प्राचीन कवींचीं जीं काव्यें आपल्यापुढें आहेत त्यांच्यामध्यें पुष्कळ अशुद्धें, प्रक्षेप (interpolations), अवक्षेप (omissions), भाषेचें आधुनिकीकरण इत्यादि संस्कार झालेले असतात. हे सर्व अपपाठ कसे होतात व ते दूर करून ग्रंथाला मूळ स्वरूप कसें प्राप्त करून द्यावें यासंबंधीं पाठचिकित्सेचें स्वतंत्र शास्त्रच युरोपांत सिद्ध झालें आहे. माझ्या 'दमयंतीस्वयंवरा'च्या संपादणीमध्यें या विषयावर विस्तृत निबंध मीं लिहिलेला आहे. किंबहुना हें पाठचिकित्सेचें शास्त्र समजावून सांगण्याकरितांच हा निबंध मुख्यतः लिहिला असून केवळ त्याकरितां 'दमयंती-स्वयंवर' या काव्याची मदत घेतली आहे, असेंहि म्हणावयास हरकत नाहीं.

या पाठचिकित्सेच्या शास्त्राचें कसब आतांपर्यंत सांगितलेल्या कांहीं ग्रंथांमध्यें दिसून येत नाहीं. अर्थाच्या दृष्टीनें चांगला पाठ स्वीकारून ग्रंथाची दुर्बोधता घालविणें या पलीकडे विशेष शास्त्रीय दृष्टि या मंडळीला नव्हती. दादोबा 'यशोदा पांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत म्हणतात,—

"या केकावली ग्रंथावर पुढील टीका लिहिण्यास आरंभ करावयाच्या पूर्वी म्यां "या ग्रंथाच्या शुद्ध प्रती जितक्या मिळतील तितक्या मिळविण्याचा प्रयत्न केला." (पुढें पंतांच्या पणताजवळ पंतांच्या हातच्या केकावलीची प्रत मागितली असतां त्यांनीं दिली नाही असें सांगून ते लिहितात) "शेवटीं केकावलीचें एक पुस्तक शिळाछापावर "छापिलें होतें त्याची एक प्रत माझ्या संग्रहीं होती, ती आणि पुण्याहून आमचे जुने "मित्र राजश्री परशुरामपंत गोडबोले यांनीं आपल्या हातानें केकावलीचें पुस्तक शुद्ध "लिहिलें होतें तें त्यांजकडून कांहीं दिवस मागून आणविलें तें, अशा दोन प्रतींवरून "कोठें शुद्धाशुद्ध पाहून ही पुढील प्रत सिद्ध करून या ग्रंथावर टीका केली आहे." शंकर पांडुरंग पंडित बृहद्दशमाच्या प्रस्तावनेंत म्हणतात, "आपल्या भाषेमधील हे असे ग्रंथ "छापण्याची परिपाठी नसल्यामुळें छापण्याकरितां शुद्ध प्रत मिळण्याची अडचण सर्वांना "ठाऊकच आहे. दैववशांत आम्हांस सांपडलेली प्रत शुद्ध होती." यावरून पंडितांनींही पाठदृष्ट्या कसब दाखविलेलें दिसत नाहीं. माधव चंद्रोबांनीं कांहीं ठिकाणीं पाठांतरें दिलीं आहेत, त्यावरून कांहीं काव्यांच्या त्यांच्यापुढें एकापेक्षां अधिक हस्त-

लिखित प्रती होत्या हें सिद्ध होतें. परंतु आपणास किती प्रती मिळाल्या, कोठून मिळाल्या, किती जुन्या, मूळ संहितेकरितां कोणती प्रत वापरली, पाठभेद कोणत्या प्रतींतले, हें कळण्यास जो *apparatus criticus* म्हणजे चिकित्सासामुग्री द्यावयाची ती त्यांनीं दिली नाहीं. अजूनही अशा प्रकारच्या चिकित्सक संपादण्या तयार करण्याकडे आपलें लक्ष नाहीं. म्हणूनच मि. लेनार्ड सेज्विक, आय्. सी. एस्., यांनीं १९१२ सालीं इंग्लंडमध्यें जी रघुनाथ पंडितांच्या ‘ दमयंती–स्वयंवरा ’ ची संपादणी प्रसिद्ध केली आहे तिच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात :—

“ Textual criticism is unfortunately not considered of “ much importance among Indian students of Marathi poetry. “ Editions appear every year in which either no attempt has been “ made to give the various readings, or a few are given here and “ there, but without any reference to the authorities in which “ they respectively occur. The *apparatus criticus* is an Occidental “ adjunct of learning, it is true; but since it is of value it must be “ adopted by the East. ”

आमच्यापुढें असलेल्या कालांतील माधव चंद्रोबादि संपादकांनीं ही चिकित्सा-पद्धति स्वीकारली नाहीं, याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं. कारण त्यांना ती अज्ञात होती. आपल्या इकडील आरंभींच्या पंडित, तेलंग, भांडारकर वगैरे संपादकांनीं या पद्धतीप्रमाणें जीं संस्कृत काव्यें किंवा नाटकें प्रसिद्ध केलीं तीं आमच्या पुढील काला-नंतरचीं आहेत. युरोपियन लोकांनीं या कालांत जीं संस्कृत काव्यनाटकें संपादण्याचे प्रयत्न केले ते आरंभीं मुख्यतः लॅटिन, जर्मन, किंवा फ्रेंच भाषेंत होते. उदाहरणार्थ :– प्रो. लासेनचा गीतगोविंद ( १८३६ ), स्टेंझलरचा कुमारसंभव ( १८४८ ) व मृच्छकटिक ( १८४७ ), हे लॅटिन भाषेंत आहेत. इतर ग्रंथ राहोत पण ज्या नाटकामुळें युरोपियन लोकांचें संस्कृत भाषेकडे प्रथमतः लक्ष वेधलें त्या कालिदासाच्या शाकुंतलाची पहिली चिकित्सक संपादणी M. Che'zy यानें १८३० सालीं पॅरिस येथें बंगाली प्रतीवरून फ्रेंच भाषेंत केली. शाकुंतलाच्या या बंगाली recension मध्यें पुष्कळ प्रक्षिप्त मजकूर होता. Sir William Jones नें जें इंग्रजी भाषांतर केलें तें या बंगाली प्रतीवरून होय. यांत इतका प्रक्षिप्त भाग आहे कीं, आमच्यापुढें असलेल्या देवनागरी प्रतीमध्यें दुष्यंत व शकुंतला यांच्यामधील जो प्रणयप्रसंग आहे त्याच्या चौपट या बंगाली प्रतींत आहे ! देवनागरी प्रतीच्या साहाय्यानें शाकुंतलाची एडिशन १८४२ सालीं Dr. Boehtlingk यानें जर्मन भाषेंत Bonn येथें छापिली. या Boehtlingk च्या संहितेच्या आधारावरच १८५३ सालीं Monier-Williams यानें आपली इंग्रजी भाषेंतील एडिशन त्यांत आणखी कांहीं शोध घालून तयार केली. हे सर्व प्रयत्न पाहिले म्हणजे परकीय लोकांच्या दांडग्या उद्योगाचें कौतुक वाटतें,

व त्यांच्यासंबंधीं अत्यंत आदर उत्पन्न होतो; परंतु अंधारांत चांचपडत असल्यासारखीच या लोकांची स्थिति होती, हेंही तितकेंच खरें आहे. आपल्या लोकांनीं ज्यावेळीं हे प्रयत्न स्वतः सुरू केले त्यावेळींच संस्कृत काव्यनाटकांच्या संहितांना सध्यांचें शुद्ध व निश्चित स्वरूप प्राप्त झालें. मॅक्समुल्लरनें १८४९ सालीं प्रसिद्ध केलेल्या ऋग्वेदसंहितेच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत पाठचिकित्सेच्या पाश्चात्य पद्धतीची थोडक्यांत माहिती दिली आहे. ती माधव चंद्रोबांनीं पाहिली होती कीं काय, हें सांगवत नाहीं. कदाचित् पाहिली असल्यासही त्यांच्यासमोर एवढें प्रचंड कार्य होतें कीं, इतक्या खोलांत जाण्यास त्यांना सवडच झाली नसावी. १८१८ ते १८६७ या आमच्या पुढें असलेल्या पन्नास वर्षांच्या कालांत नव्या चिकित्सक पद्धतीच्या अज्ञानामुळें आपल्या मराठी काव्यसंहितांचें शुद्धीकरण झालें नाहीं, हें एक वेळ क्षम्य मानतां येईल; परंतु १८६८ ते १९४३ या पुढील पाउणशें वर्षांच्या कालांत चिकित्सक संपादनाचे पांचसातापेक्षां जास्त प्रयत्न होऊं नयेत, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. या नव्या चिकित्सक संपादनपद्धतीचें महत्त्व प्रतिपादणें हा माझा आजचा विषय नाहीं, हें मी जाणतों. आरंभींच्या म्हणजे १८१८ पासून १८६७ च्या पन्नास वर्षांतील प्राचीन ग्रंथसंपादनप्रकाशनाचा इतिहास सांगावयाचा तो मीं आपणांस सांगितलाच आहे. परंतु आपणांस नव्या पद्धतीच्या चिकित्सकपद्धतीची आज माहिती झाली असतां, व एखाद्या काव्याच्या हस्तलिखित प्रती उपलब्ध असतां, यापुढें अशुद्ध काव्यें छापून प्रसिद्ध करणें हा तर मी गुन्हाच समजतों, हेंही मला आपल्या नजरेस आणावयाचें आहे. असो.

आपलें जुनें वाङ्मय शुद्ध व चिकित्सक पद्धतीनें कसें प्रसिद्ध व्हावें हा प्रश्न तुमच्यापुढें विचाराकरितां ठेवून व माझें भाषण आपण शांतपणें ऐकून घेतलें याबद्दल आपले आभार मानून आपली रजा घेतों.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों दि ......

# संशोधनाकरितांच खास संस्था स्थापन करावी

## सर चिंतामणराव देशमुख यांचें समारोपादाखल भाषण

या कार्यांत काडीमात्र अधिकार नसतांही मला हातभार लावण्याची संधि दिल्याबद्दल व गौरवाबद्दल मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या व्यवस्थापकांचे मनःपूर्वक आभार मानून व श्री. प्रियोळकर यांच्या विद्वत्तापूर्ण, उद्बोधक व उत्तेजक व्याख्यानाबद्दल आपणां सर्वांतर्फे त्यांचें अभिनंदन करून आजच्या समारंभाचा पुढील क्रमांक म्हणजे कै. माधव चंद्रोबा डुकले यांच्या छायाचित्राचें अनावरण करतों. कै. डुकले ह्यांस मराठी वाङ्मयाच्या शास्त्रीय संशोधनाचे जनक असें म्हणावयास हरकत नाहीं. यांच्या हातून कोणती कामगिरी झाली, व सन १८६० सालीं 'सर्वसंग्रह'रूपी संशोधनकार्याची मुहूर्तमेढ रोवून स्वतःची पदरमोड करून महाराष्ट्र–वाङ्मयभांडारांत त्यांनीं कोणती भर घातली, याची कल्पना आजच्या व्याख्यानावरून चांगली आली असेल. मात्र भाषेला असेच भक्त लाधून तिची उन्नति व तद्द्वारा महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या जीवनाला पुष्टी येवो, अशी आशा प्रदर्शित करून या "परमश्लाघ्य" महाराष्ट्र-सारस्वतोपासकाच्या छायाचित्राचें मी अनावरण करतों.

"ऋषीचें कुळ व नदीचें मूळ शोधून काढण्याच्या भानगडींत पडूं नये," अशी आपल्या पूर्वजांची विचारप्रवृत्ति, अर्वाचीन चौकस समाजाला कोठवर पटते हें मला माहीत नाहीं; तरी पण समाजसंस्कृतीच्या शुद्धीकरितां व प्रगतीकरितां वाङ्मयगंगेचें मूळ अविश्रांत प्रयासानें शोधून काढणें फार इष्ट आहे, असें माझें ठाम मत आहे. कारण वाङ्मय म्हणजे समाजाच्या नैतिक, बौद्धिक व आध्यात्मिक संस्कृतीच्या वृक्षाला टवटवीत ठेवणारा एक जिवंत जलप्रवाह आहे, व हा प्रवाह नेहमीं शुद्ध, निर्भेळ व कसदार राहिला तरच त्या वृक्षाची वाढ जोमाची होईल. पारतंत्र्याच्या वाळवंटांत ठिकठिकाणीं लुप्त झालेली मराठीची वाङ्मयगंगा आपल्या नजरेला आणून देण्याचा मुं. म. ग्रंथसंग्रहालयाचा गुंजीकर-व्याख्यानरूपें केलेला यत्न अत्यंत प्रशंसनीय आहे, व त्याबद्दल महाराष्ट्र-समाजावर त्यांचें फार ऋण झालें आहे. या ऋणाची फेड म्हणजे या कार्याला सामर्थ्यानुरूप हातभार लावणें. संशोधन व प्रकाशन या कार्यविभागाचें क्षेत्र किती विस्तृत व ओस पडलेलें आहे, हें श्री. प्रियोळकर यांच्या व्याख्यानावरून स्पष्ट दिसत आहे. "**एकः शब्दः सम्यग् ज्ञातः सुप्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुग् भवति**" ही व्याकरणकारांची अतिशयोक्ति मानली तरी आपल्या पूर्वजांचें लिखाण शुद्ध स्वरूपानें अजरामर व्हावें, त्यांत अवक्षेप, प्रक्षेपादि दोष राहूं नयेत याबद्दल मतभेद असेल, असें मला वाटत नाहीं. संहिता–संपादनाकरितां किंवा पाठस्थिरीकरणाकरितां श्रम घेणें म्हणजे व्यर्थ कालव्यय करणें असें मत

बाळगणारे व पाठभेद पाहिल्यावर खवळून जाणारे शिक्षक, प्राध्यापक, आचार्य वगैरे आहेत असें माझ्या ऐकिवांत आहे. पण माझी खात्री आहे कीं, त्यांनासुद्धां विचारांतीं किंवा तद्विषयक लिखाण वाचल्यावर शुद्ध संहितासंपादनाचें महत्त्व समजून येईल.

या विषयाचा उल्लेख आजच्या या विद्वत्ताप्रचुर व्याख्यानांत ओघाओघानें झालाच आहे. पण या व्याख्यानाचा कांहींहि परिणाम मनावर झाला असल्यास आज येथें जमलेल्या सभासदांनीं–पूर्वीं वाचला नसल्यास–श्री प्रियोळकर यांच्या ' दमयंती-स्वयंवरांतील ' साधनचिकित्सा व पाठचिकित्सा हा भाग जरूर वाचावा, व त्याचप्रमाणें महाराष्ट्र-साहित्याचे आधारस्तंभ व उदार साहित्यिक श्रीमंत भवानराव पंडित प्रतिनिधि संस्थान औंध यांनीं याच ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना वाचावी, अशी माझी अगत्याची सूचना आहे. त्या ग्रंथांत व प्रस्तावनेंत जीं मतें व्यक्त केलीं आहेत, तीं मला मान्य आहेत व वाचनांतीं दुसऱ्यांनाही पटतील अशी मला आशा आहे. कोणत्याही कार्याचा पाया म्हणजे अनुकूल लोकमत व ध्येयाविषयीं एकवाक्यता. प्राचीन मराठी ग्रंथांचें संपादन व प्रकाशन आस्थापूर्वक व पाठचिकित्साशास्त्रानुसार व्हावें, हें ध्येय सर्वमान्य आहे असें गृहीत धरून पुढचा पल्ला कसा गांठावा याचा विधायक विचार करणें क्रमप्राप्त आहे.

या बाबतींत महाराष्ट्र किती मागासलेला आहे, याची कल्पना श्री. प्रियोळ-करांच्या पुढील उद्गारांवरून येईल.

दमयंतीस्वयंवराला जोडलेल्या " साधनचिकित्सा व पाठचिकित्सा " या मथळ्याच्या भागाअखेर ते म्हणतात : " आपलीं इतर जीं मराठी काव्यें आहेत त्यांच्या " शुद्ध आवृत्त्या तयार करण्याची स्फूर्ति प्रस्तुत ग्रंथ वाचून जर कोणाला झाली तर मी " कृतार्थ होईन; परंतु या कामाला महाराष्ट्रांत अगर महाराष्ट्राबाहेर जीं हस्तलिखितें " आहेत त्यांचा Theodor Aufrecht च्या संस्कृत हस्तलिखितांच्या कॅटलॉगच्या " धर्तीवर *Catalogus Catalogorum* तयार होणें अवश्य आहे. त्याशिवाय अभ्यास-" कांना एखाद्या काव्याचीं हस्तलिखितें कोठें सांपडतील, हें कळणें कठीण जाईल. " मराठी हस्तलिखितांची अशी बृहन्नामावलि तयार करण्याचें हें काम एकाद्या मोठ्या " संस्थानानें हातीं घेण्यासारखें आहे. महाराष्ट्र–साहित्य–परिषदेनें या बाबतींत अद्याप " कांहींच करूं नये, हें तर अक्षम्यच आहे. "

या उताऱ्यावरून कोणती मौलिक योजना अपेक्षित आहे, हें लक्षांत येईल. संशोधनासारखें किचकट व नीरस पण अत्यावश्यक काम एकट्यादुकट्याच्या उत्साहा-वर किंवा विद्याद्रव्यबळावर सोडून देणें अगदींच गर्ह्य होईल. विशेषतः आपल्या बहुतांशीं अशिक्षित व दरिद्री समाजांत प्रचलित संस्थांकडून हें काम होण्यासारखें

नसल्यास किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रांत त्यांचा समावेश होऊं शकत नसल्यास साहित्याच्या या अंगाबद्दल कळकळ बाळगणाऱ्या व्यक्तींनीं मिळून **संशोधनाकरितांच खास संस्था स्थापन करावी** अशी माझी सूचना आहे. अशी संस्था अस्तित्वांत येऊन काम पार पडूं लागल्यावर एक महत्त्वाचा फायदा होण्यासारखा आहे. तो हा कीं, सार्वजनिक विश्वास व द्रव्यसाहाय्य व्यक्तीपेक्षां संस्थेला अधिक प्रमाणानें व शिस्तवार मिळेल व कार्यकर्त्यांची कार्यक्षमतेप्रमाणें निवड होऊन कार्यसंविभाग योग्य तऱ्हेनें होईल. आज श्री. प्रियोळकर यांचीच गोष्ट घ्या. त्यांना पोर्तुगीज भाषेचें चांगलें ज्ञान असल्यामुळें व जेझुइट मराठी वाङ्मयसंशोधनाचा अंतर्गत क्षेत्रविभाग विस्तृत असल्यामुळें, त्यांनीं इतर संशोधनांगें सोडून या विभागावरच परिश्रम केले तर कार्यनिर्वाह यशस्वी होईल; पण तज्ज्ञ समाजांतसुद्धां ह्या सर्वच साहित्यअंगाविषयीं अनास्था असल्यामुळें त्यांना सध्यां तसें करण्याची मोकळीक व सवड मिळत नाहीं. इष्ट स्वरूपाची संस्था स्थापन झाल्यावर संस्थेनें उद्दिष्ट कार्याची मर्यादा आंखावी, अशी माझी दुसरी सूचना आहे. ही आंखण्यापूर्वीं, इतर दुनियेंत नाहीं तरी निदान हिंदुस्थानांत तरी इतर भाषांविषयीं संशोधनप्रकाशनाची काय सामुग्री आहे, कितपत प्रयत्न चालले आहेत, वगैरे गोष्टींचें समीक्षण व्हावें. यासंबंधीं व्यापक माहिती अर्थात् माझ्यासारख्या साहित्यिकेतराला असणें शक्य नाहीं; पण 'गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी' या नांवाच्या संस्थेचा अहवाल थोड्या दिवसांपूर्वीं अकस्मात् माझ्या हातीं आला त्यावरून गुजराती भाषेचें संशोधनकार्य शिस्तवार पद्धतीनें व उत्साहानें चाललें आहे, असें मला दिसून आलें. हिंदी व बंगालीविषयीं नागरी–प्रचारिणी सभेसारख्या संस्थेकडून असेच प्रयत्न चालले असतील, ह्याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. ह्या भाषांच्या निदान पूर्ण जोडीची जी आपली मराठी त्या भाषेंत अशा प्रमाणावर तुल्य प्रयत्न अजून होत नाहींत, ही खेदाची गोष्ट आहे. कार्यक्षेत्र आंखण्यापूर्वीं यच्चयावत् हस्तलिखितें मिळविलीं पाहिजेत, असाहि माझा आग्रह नाहीं. आरंभसौकर्याकरतां तंजावर, धुळें व इतर ठिकाणीं जे हस्तलिखितांचे संग्रह आहेत तेच काळजीपूर्वक चाळून पुढील दहावीस वर्षांत कोणत्या ग्रंथांच्या संहिता काढल्यास वाङ्मयअभिवृद्धि होईल, हें ठरविल्यास चालेल. कार्यक्षेत्र निश्चित झाल्यावर मनुष्यबळ व द्रव्यबळ कसें संपादन करावें, हा प्रश्न उभा राहतो. माझ्या मतें हीं दोन्ही तऱ्हेचीं बळें विद्यापीठांच्या सहानुभूतीखेरीज व आर्थिक मदतीखेरीज मिळणें शक्य नाहीं. पाठ्य पुस्तकांची कोणती संहिता वापरावी ह्या बाबतींत कोणत्याही तऱ्हेचें नियंत्रण सध्यां नाहीं, असें श्री. प्रियोळकर यांजकडून आपण ऐकलेलेंच आहे. अशा तऱ्हेची ढिलाई सोडून जर शुद्धसंहितेशिवाय इतर संहिता नेमलेल्या पुस्तकांमध्यें गणल्या जाणार नाहींत, असा वैश्विक निर्बंध झाला तर आजची ह्या बाबतींतील अनास्था चटकन् दूर होईल व शिक्षक, प्राध्यापक वगैरे

विद्वानांमध्यें उत्साह जागृत होईल. अशा कार्यांत भाग घेऊं इच्छिणाऱ्या साहित्योपासकास योग्य दक्षिणा मिळण्याची योजना संस्थेकडून झाल्यास हा उत्साह द्विगुणित होऊन चिरस्थायी होईल अशी मला खात्री वाटते. इष्ट कार्याची सिद्धि असुकच मार्गानें गेल्यास होईल असें सांगण्याची माझी योग्यताही नाहीं, व इच्छाही नाहीं. माझें म्हणणें एवढेंच कीं, महाराष्ट्र–साहित्यप्रेमी लोकांमध्यें या गोष्टीवर सखोल विचारविनिमय होऊन अनास्थानगराचें सीमोल्लंघन व्हावें व ध्येयप्राप्तीची विवेकपूर्वक योजना व्हावी. श्री. प्रियोळकरांसारखे मार्गदर्शक आहेत ही आपल्या भाषेच्या भाग्याची गोष्ट. पण त्यांच्या अनुभवाचा व उत्साहाचा पूर्ण उपयोग करून घेणें हें प्रत्येक भाषासेवकाचें व महाराष्ट्रीय संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्याचें कर्तव्य आहे.

☆

## माधव चंद्रोबांचीं पत्रें

जावक नंबर ५५

राजमान्य राजश्री परशुरामपंत तात्या गोडबोले मु॥ पुणें यांस—

विनंति वि॥ आपणाकडे आदिपर्वांतील कांहीं आर्या अर्थाकरितां या पत्राबरोबर पाठविल्या आहेत. अवकाशाअंतीं पाहून परत पाठविण्याची मेहरबानी व्हावी. कळावें बहुत काय लि॥ लोभ सदोदित असावा हे विनंति. ता. ९ एप्रिल सन १८६३.

(सही) M. Chandroba
सर्वसंग्रहाचे मालक

नंबर ११५ श्री

राजमान्य राजश्री परशरामपंत तात्या गोडबोले यांसीं विनंति विशेष– अर्थ समजण्याकरितां आर्या लिहितों त्या येणेंप्रा॥ : *

कर्णपर्व अध्याय ३३ आर्या ४६, अध्याय ३४ आर्या ३४, वनपर्व अध्याय ४ आर्या ९२, १३१, १५६, १८७, १९३, २१०, २१८, २४७, २६३, २६५, २७४.

वामनपंडितकृत यज्ञपत्न्याख्यानांतील श्लो. ८ व १४.

वाम० कृ० वेणुसुधेच्या अध्यायांतील श्लोक ४० सावा.

येणेंप्रा॥ आर्या व श्लोक लिहिले आहेत. तरी मेहरबानीनें अर्थ लिहून द्यावे. श्लोकांविसीं प्रती चार पाहिल्या, परंतु सर्व प्रतींवर एकसारखे पाठ आहेत. कळावें लोभ करावा ही विनंति.

ता. १२ जून (सही) M. Chandroba
सर्वसंग्रहाचे मालक

* येथें मूळ आर्या न देतां त्यांचीं स्थळें तेवढीं आम्हीं निर्दिष्ट केलीं आहेत. सं०

# सिद्धीस न गेलेला एक संकल्प*

## ले० नवनीतकर्ते कै. परशुरामपंत बल्लाळ गोडबोले

मराठी भाषेचें पूर्णज्ञान लोकांस व्हावें म्हणून सरकारानें अनेक उपाय योजिले आहेत. गांवोगांव मराठी शाळा घातल्या आहेत. ज्यांत मराठी शाळा नाहीं असे गांव थोडेच राहिले असतील. मराठी स्कूलमास्तर तयार करण्याकरितां पुना ट्रेनिंग-कालेज स्थापिलें आहे. कोणी विद्वान नवीन पुस्तक उत्तम करील त्यास बक्षीस देण्याकरितां दक्षिणाप्रैजकमिटी स्थापिली आहे. यावरून जे नवीन पुस्तक करितात त्यांस बक्षीसही मिळत आहे. येणेंकरून मराठी भाषेंत नवीन ग्रंथ लिहिण्यास लोकांस उत्तेजन येण्याचा मार्ग स्थापित झाला आहे. कितीएक मासिक पुस्तकें निघतात त्यांसही सरकारनें आश्रय दिला आहे. असे अनेक उपाय लोक–कल्याणार्थ सरकारनें चालविले आहेत. त्याप्रमाणें त्यांचें फलही लोकांस प्राप्त होत आहे. मराठी भाषेचें पूर्ण ज्ञान म्हटलें म्हणजे कोणताही मराठी ग्रंथ लिहिण्याची शैली प्रौढ व उत्तम प्रकारची साधली पाहिजे. तशी शैली साधण्यास मराठी प्राचीन कवींच्या कवितांचें अवलोकन होऊन त्यांतील विषयांचें ज्ञान व वर्णनाची पद्धति व त्यांतील संकेत समजले पाहिजेत, असें मला वाटतें. संस्कृत भाषेंतील जे काव्यें, नाटकें, चंपू, पुराणें इत्यादि मान्य ग्रंथ त्यांत जें शब्दलालित्य, अर्थगांभिर्य, शब्दालंकार, अर्थालंकार इत्यादि जे चमत्कार आहेत त्या सर्वांचा समावेश ज्यांत झाला आहे अशा प्राचीन मराठी कविता (ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनी केलेल्या)–ओव्या, श्लोक आर्या वगैरे प्रकारच्या–बहुत आहेत. अशा ह्या उत्तम कविता जरी आहेत तरी पूर्वकाळीं या कवितांचा अभ्यास करणारे फारच थोडे होते. पूर्वी छापखाना नसल्यामुळें त्या ग्रंथांचीं पुस्तकें फार दुर्मिळ होतीं. तरी हरदास लोक मोठ्या प्रयासानें कोठें पुस्तक मिळालें तर आपल्या कामापुरते त्यांतील कांहीं भाग घेऊन त्यांचा अभ्यास करीत. परंतु सर्वसाधारण लोकांस हे ग्रंथ दुर्मिळ असल्यामुळें त्या ग्रंथांतील गोडींचा लाभ होणें फार अशक्य होतें. मला या गोष्टीचा लहानपणापासून छंद असल्यामुळें मीं मराठी भाषेचा व मराठी कविताग्रंथांचा बराचसा अभ्यास केला. या कारणानें माझ्या मनांत फार दिवसांपासून आलें होतें कीं, मराठी उत्तम कवितांचे

---

* परशुरामपंत गोडबोले यांच्या हातचें वरील टांचण त्यांचे वंशज पुण्याचे श्री. एस्. आर. गोडबोले यांच्या संग्रहीं सांपडलें. मराठी काव्यार्थदीपिका प्रसिद्ध करण्याचा तात्यांचा हा संकल्प सिद्धीस गेलेला दिसत नाहीं. प्राचीन मराठी ग्रंथांच्या प्रकाशनाची आरंभींची माहिती या दृष्टीनें या टांचणाला महत्त्व आहे.

मासले एतद्देशीय लोकांच्या दृष्टीस पाडावे. या मनांतील कल्पनेस मेजर क्यांडीसाहेब, संस्कृत कॉलेजाचे माजी प्रिन्सिपल यांगीं उत्तेजन दिल्यावरून मीं नवनीत या नांवाचें प्रथम पुस्तक केलें. त्या पुस्तकांत प्राचीन मराठी कवितांचे सर्व मासले आहेत. यामुळें तें पुस्तक सरकारास तसेंच लोकांस फार आवडलें, अशी माझी खात्री झाली. कशावरून तर पहिली आवृत्ति छापून निघाल्यावर ती इतकी लौकर खपली कीं दुसरी आवृत्ति लागलीच काढावी लागली. याप्रमाणें पांच किंवा साहा आवृत्ति छापल्या गेल्या असें ऐकतों. नवनीत पुस्तक झाल्यापासून लोकांस मराठी कवितांची योग्यता समजून त्यांची गोडी लागत चालली आहे. हेंच समजून माधव चंद्रोबा यांनीं सर्वसंग्रह पुस्तक छापण्याचा बेत केला. नवनीत पुस्तक करण्यापूर्वीं मराठी कवितांचीं प्राचीन पुस्तकें मिळविण्यास श्रम पडले. तीं पुस्तकें त्यांनीं फार श्रम करून व खर्च करून मेळविलीं. त्या कामास मजकडून झाली तितकी मींही त्यांस मदत केली. त्यांनीं सर्वसंग्रह पुस्तक छापण्याचें काम सुमारें दहा वर्षें चालविलें. इतक्या समयांत त्यांनीं बहुतेक मराठी प्राचीन कविता छापून काढल्या. येवढें कृत्य तरी त्यांस सरकारचा आश्रय मिळाला होता म्हणून त्यांजकडून घडलें. त्यांनीं कवितांचे पुष्कळ ग्रंथ छापिले. तरी अजून पुष्कळ राहिले आहेत. सर्वसंग्रहपुस्तक छापल्यानें इतकें झालें कीं मराठी कवितांचीं पुस्तकें पहिल्यानें फार दुर्मिळ होतीं तीं आतां पाहिजेत तितकीं विपुल झालीं. आतां हीं सर्वसंग्रहाचीं पुस्तकें सरकारनें घेऊन बहुतेक शाळांमधून ठेविलीं आहेत व लोकही हौसेनें घेऊन वाचतात. परंतु त्यांतील कवितांचा अर्थ बराबर समजत नसल्यामुळें वाचणारास कंटाळा येऊन ते पुस्तकें एकी (कडेस) ठेवितात. ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. नवनीत पुस्तक छापल्यानंतर मराठी भाषा शिकविण्याची रीत इतकी बदलली कीं, शाळांत शिकावयाच्या पुस्तकांत कवितांचा प्रवेश झाला. या सुधारलेल्या शिक्षणपद्धतीमुळें शाळांतील मुलांसही कवितांची गोडी लागत चालली. शाळेंत मुलांस कविता शिकवाव्या असा सरकारचा हुकूम असल्यावरून मास्तरलोक मुलांस कविता शिकवितात. परंतु अर्थ सांगतांना चुकतात, असें बहुत ठिकाणीं घडतें. तरी हा मास्तरलोकांना दोष लावतां येत नाहीं. कवितांचा एक कायम अर्थ लिहिलेला कोठें नाहीं. यामुळें एकाचा अर्थ एकास मिळत नाहीं. युनिवर्सिटींत विद्यार्थ्यांची परीक्षा घेतात. तेथेंही मराठी कवितांचे अर्थ विचारतात. तेथेंही अर्थ सांगण्यांत फरक पडतो. आलीकडे एक हजार व दोन हजार रुपयांचीं बक्षिसें नेमून साहेबलोकांनीं मराठी कवितांची परीक्षा द्यावी, असें प्रसिद्ध केलें आहे. यावरून साहेबलोक मराठी कवितांचा अभ्यास करतील त्या प्रसंगीं कवितांचा अर्थ समजून देणारे पंडित यांना मतभेद पडून परीक्षेंत एकसारखें उत्तर पडणें कठीण होईल. इतक्या अडचणीवरून कवितांतील कठीण अंश असतील त्यांचा एक अर्थ कायम लिहिलेला असावा, ह्या गोष्टीची जरूरी सहज दिसून येते.

मराठी कवितांचा सुबोध अर्थ लिहावा असें माझ्या मनांत बहुत वर्षांपासून आलें आहे. परंतु वेळ आणि द्रव्यबळ यांच्या कमताईमुळें घडलें नाहीं. आतां असें मनांत येतें कीं, माझ्या आयुष्याचा काळ थोडाच उरला आहे. तितक्यांत लोकोपकारबुद्धीनें मराठी कवितांचा सुबोध अर्थ होईल तितका लिहून ठेवावा. तो असा कीं प्रतिमासीं एक पुस्तक ६४ पृष्ठांचें छापावें त्यांत प्रथम वामनी किंवा मोरोपंती कवितांपैकीं कांहीं प्रकरणें घेऊन त्यांचा सुबोध अर्थ लिहावा. अशा मानानें जरी लिहीत गेलों तरी माझ्या हयातींत हें काम शेवटास जाईल असें नाहीं. पण आशा इतकीच, आरंभ करून ठेवलेला असला तर पुढें कोणी तरी चालवून शेवटास नेईल.

हें काम नफा मिळविण्याकरितां करणार असें कोणी समजू नये. केवळ परोपकार-बुद्धीनें करणार आहें. या कामास आमच्या हिंदु लोकांपाशीं मदत मागावी तर ती मिळणें कठिण आहे. सरकार जर उदारपणानें आश्रय देईल तरच हें घडणार आहे. तो आश्रय असा कीं, मुंबई इलाख्यांत जितक्या मराठी शाळा सरकारी आहेत तितक्या शाळांच्या लैब्ररींत ठेवण्याकरितां दरएक शाळेंत एक प्रत याप्रमाणें २००० प्रति सरकारनें घ्याव्या. त्याचा किंमतीचा पैसा महिन्याचे महिन्यास मला मिळावा. छापण्याच्या खर्चाची चौकशी करतां दर माहे दोन हजार प्रती छापल्या तर २१० रुपये खर्च छापणारास दिला पाहिजे. खालीं ४० राहातील त्यांत शाई कागद लिहिणावळ वगैरे खर्च जाऊन कांहीं थोडे पैसे उरले तर मी आपल्या मेहनतीबद्दल घेईन.

★

# शालापद्धति

## ( मराठींतील एक ' अप्राप्त ' ग्रंथ )

' शालापद्धति ' या नांवाचा एक ग्रंथ सुप्रसिद्ध मराठी कोशकार मोल्स्वर्थ व हैंद शाळापुस्तकमंडळीचे एक पंडित जगन्नाथशास्त्री क्रमवंत या दोघांनीं मिळून तयार केला होता. १८२४ सालीं तो मुद्रित झाला. १८०३ सालीं ज्योजेफ लँकेस्टर यानें प्रसिद्ध केलेल्या ' शैक्षणिक सुधारणा ' या पुस्तकाच्या आधारानें या ग्रंथाची रचना केली आहे. जास्त शिकलेल्या मुलांकडून कमी शिकलेल्या मुलांना शिकविणें, हें या लँकस्ट्रियन शालापद्धतीचें मुख्य तत्त्व असून Monitorial system म्हणून ही पद्धति प्रसिद्ध आहे.

खरें पाहिलें असतां, ही मूळ भारतीय शिक्षणपद्धति असून डॉ. अँड्रू बेल नांवाच्या एका क्रिस्ती धर्मोपदेशकानें युरोपाला तिचा प्रथम परिचय करून दिला. डॉ. बेल हा मद्रास येथें आठदहा वर्षें क्रिस्ती अनाथबालकाश्रमाचा सुपरिन्टेन्डेन्ट होता. येथें विद्यार्थ्यांची संख्या फार वाढली व पगारी शिक्षक नेमण्यास जवळ पुरेसे पैसे नसल्यामुळें स्थानिक देशी शाळांमध्यें असलेली काटकसरीची शिक्षणपद्धति त्यानें उचलली व तिच्यामध्येंच पुष्कळ सुधारणा केल्या. १७९७ सालीं इंग्लंडांत परत गेल्यावर आपले मद्रासेंतील शैक्षणिक प्रयोग पुस्तकरूपानें त्यानें प्रसिद्ध केले. त्यामुळें Madras system असें त्याच्या या शिक्षणपद्धतीला नांव मिळालें. डॉ. बेलच्या या पुस्तकावरून लँकेस्टरला या भारतीय शिक्षणपद्धतीची माहिती झाली व आपल्या शाळेमध्यें तिचा त्यानें अवलंब केला. या पद्धतीमध्यें पुष्कळ सुधारणा करून १८०३ सालीं त्यानें 'शिक्षणांतील सुधारणा' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, आपल्याकडील धुळीवर लिहिण्याच्या पद्धतीचा या दोघांनींही अवलंब केला होता. यांची ही शिक्षणपद्धति त्याकाळीं इतकी लोकप्रिय झाली कीं, केवळ इंग्लंडांतच नव्हे, तर युरोप व अमेरिका येथेंही या पद्धतीचा सर्वत्र फैलाव झाला.

दुर्दैवानें 'शालापद्धति' या ग्रंथाची मराठी प्रत जगामध्यें कोठल्याही सार्वजनिक किंवा खासगी संग्रहामध्यें आज उपलब्ध असलेली दिसत नाहीं. आरंभीं या पुस्तकाची किंमत युरोपियन लोकांना आठ रुपये व देशी लोकांना तीन रुपये ठेवण्यांत आली होती. या ग्रंथाचें गुजराती भाषांतर जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांनीं केलें होतें. त्याची प्रत ब्रिटिश म्युझियममध्यें आढळली. तिची मायक्रोफिल्म–नक्कल करवून मराठी संशोधनमंडळाकरितां आणण्यांत आली आहे.

ह्या Monotorial पद्धतीच्या मूळ कल्पनेचें जनकत्व लँकेस्टर किंवा बेल यांच्याकडे त्यांच्या भक्तांकडून दिलें गेलें जातें; परंतु मराठी संशोधनमंडळांत २१ ऑगस्ट १९५३ रोजीं वाचलेल्या निबंधांत श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं ह्या शालापद्धतीचा उगम भारतीय कसा आहे, तें विस्तारानें दाखविलें आहे. हा निबंध त्यांनींच इंग्रजीमध्यें लिहून गुजराती 'निशाळनी पद्धती'सह मुंबई युनिव्हर्सिटीच्या जर्नलमध्यें (सप्टेंबर १८५३) प्रसिद्ध केला असल्यामुळें तो 'मराठी संशोधनपत्रिकें'त आतां प्रसिद्ध करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. या इंग्रजी निबंधाच्या गुजराती शाळापद्धतीसह कांहीं स्वतंत्र प्रती काढण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ज्यांना त्याची प्रत विकत हवी असेल त्यांनीं आमच्याकडे पत्रव्यवहार करावा. म्हणजे तोपर्यंत शिल्लक असल्यास ती पाठविण्यांत येईल.

—संपादक

✶

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

# कुडीआत्म्याचें भांडण

[ मुक्तेश्वराच्या नांवावर असलेलें वरील छोटें काव्य किंवा मोठें पद तंजावरच्या सरस्वतीमहाल लायब्ररींत उपलब्ध झालें. सिनेमांत जसें द्वंद्वगीत किंवा duet असतें, तशा प्रकारचें याचें स्वरूप आहे. आत्मा किंवा जीव हा पति, व कुडी किंवा शरीर ही पत्नी अशा कल्पनेवर या संवादाची उभारणी झालेली आहे. याचा कर्ता मुक्तेश्वर व महाभारतकर्ता मुक्तेश्वर हा एकच कीं काय, याचा विद्वानांनीं विचार करावा.

कुडीआत्म्याच्या संवादाची कल्पना नवीन नाहीं. अशा प्रकारचें एक पद विष्णुदास नाम्याच्याही नांवावर प्रसिद्ध आहे. इतर कवींचींही अशीं पदें असावींत. 'श्रीमंत संपतराव गायकवाड यांच्या संग्रहांतील क्रमपुस्तक' (बडोदें १८९०) या नांवाच्या कॅटलॉगांत 'कुडीआत्म्याचीं पदें वगैरे', अशा नांवाच्या एका पुस्तकाची नोंद असून 'बाळा विठ्ठल शेट धामणस्कर' असा त्याच्या मुद्रकाचा नामनिर्देश आहे. प्रकाशनाचें स्थल व काल दिलेलीं नाहींत. विष्णूदासनामा व मुक्तेश्वर यांच्या उपरिनिर्दिष्ट कवनांचा अन्तर्भाव या पुस्तकांत झालेला आहे किंवा नाहीं, हें तें पुस्तक शोध करूनही सांपडलें नसल्यामुळें सांगणें अशक्य आहे. तरीपण मुक्तेश्वराचें पद त्यांत प्रसिद्ध झालें नसावें. कारण तें लोकांपुढें आल्यास काव्यसंग्रहाच्या 'महाराष्ट्रकविवर्य मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें', या ग्रंथाच्या प्रतींत त्याला खचित स्थान मिळालें असतें. वाचकांच्या सोयीकरितां मुक्तेश्वराच्या पदाबरोबर विष्णुदासनाम्याचेंही पद खालीं देण्यांत येत आहे. —संपादक. ]

## [ मुक्तेश्वरकृत ]

काया म्हणे जीवा, ऐकें रे दुष्टा ॥ सांडोनियां जातोसि मज नष्टा ॥ न पुर्वितां आस माझी पावसि कष्टा ॥ गुंतोनि वासनेपासीं पडसी जन्माचे गोठां ॥ १ ॥ आरे जीवा प्राणपति, तूं तंव अंतरींचा सखा ॥ एकवाट वाढलों दोघें समान भोगिलें सुखा ॥ निरऊनि कोणाचे हातीं चालिलासि परलोका ॥ प्राब्धें गाईली गोरि [ डि ? ] किती आठवुं दुःखा ॥ आरे जीवा प्राणपति ॥ धृ० ॥

जीव म्हणे काये, ऐकें वो मूढे ॥ अज्ञाने अविवेकी तुज नेणतां पुढें ॥

खरें पाहिलें असतां, ही मूळ भारतीय शिक्षणपद्धति असून डॉ. अँड्रू बेल नांवाच्या एका क्रिस्ती धर्मोपदेशकानें युरोपाला तिचा प्रथम परिचय करून दिला. डॉ. बेल हा मद्रास येथें आठदहा वर्षें क्रिस्ती अनाथबालकाश्रमाचा सुपरिन्टेन्डेन्ट होता. येथें विद्यार्थ्यांची संख्या फार वाढली व पगारी शिक्षक नेमण्यास जवळ पुरेसे पैसे नसल्यामुळें स्थानिक देशी शाळांमध्यें असलेली काटकसरीची शिक्षणपद्धति त्यानें उचलली व तिच्यामध्येंच पुष्कळ सुधारणा केल्या. १७९७ सालीं इंग्लंडांत परत गेल्यावर आपले मद्रासेंतील शैक्षणिक प्रयोग पुस्तकरूपानें त्यानें प्रसिद्ध केले. त्यामुळें Madras system असें त्याच्या या शिक्षणपद्धतीला नांव मिळालें. डॉ. बेलच्या या पुस्तकावरून लँकेस्टरला या भारतीय शिक्षणपद्धतीची माहिती झाली व आपल्या शाळेमध्यें तिचा त्यानें अवलंब केला. या पद्धतीमध्यें पुष्कळ सुधारणा करून १८०३ सालीं त्यानें 'शिक्षणांतील सुधारणा' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, आपल्याकडील धुळीवर लिहिण्याच्या पद्धतीचा या दोघांनींही अवलंब केला होता. यांची ही शिक्षणपद्धति त्याकाळीं इतकी लोकप्रिय झाली कीं, केवळ इंग्लंडांतच नव्हे, तर युरोप व अमेरिका येथेंही या पद्धतीचा सर्वत्र फैलाव झाला.

दुर्दैवानें 'शालापद्धति' या ग्रंथाची मराठी प्रत जगामध्यें कोठल्याही सार्वजनिक किंवा खासगी संग्रहामध्यें आज उपलब्ध असलेली दिसत नाहीं. आरंभीं या पुस्तकाची किंमत युरोपियन लोकांना आठ रुपये व देशी लोकांना तीन रुपये ठेवण्यांत आली होती. या ग्रंथाचें गुजराती भाषांतर जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांनीं केलें होतें. त्याची प्रत ब्रिटिश म्युझियममध्यें आढळली. तिची मायक्रोफिल्म–नक्कल करवून मराठी संशोधनमंडळाकरितां आणण्यांत आली आहे.

ह्या Monotorial पद्धतीच्या मूळ कल्पनेचें जनकत्व लँकेस्टर किंवा बेल यांच्याकडे त्यांच्या भक्तांकडून दिलें गेलें जातें; परंतु मराठी संशोधनमंडळांत ३१ ऑगस्ट १९५३ रोजीं वाचलेल्या निबंधांत श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं ह्या शालापद्धतीचा उगम भारतीय कसा आहे, तें विस्तारानें दाखविलें आहे. हा निबंध त्यांनींच इंग्रजीमध्यें लिहून गुजराती 'निशाळनी पद्धती'सह मुंबई युनिव्हर्सिटीच्या जर्नलमध्यें (सप्टेंबर १८५३) प्रसिद्ध केला असल्यामुळें तो 'मराठी संशोधनपत्रिकें'त आतां प्रसिद्ध करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. या इंग्रजी निबंधाच्या गुजराती शाळापद्धतीसह कांहीं स्वतंत्र प्रती काढण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ज्यांना त्याची प्रत विकत हवी असेल त्यांनीं आमच्याकडे पत्रव्यवहार करावा. म्हणजे तोपर्यंत शिल्लक असल्यास ती पाठविण्यांत येईल.

—संपादक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# कुडीआत्म्याचें भांडण

[ मुक्तेश्वराच्या नांवावर असलेलें वरील छोटें काव्य किंवा मोठें पद तंजावरच्या सरस्वतीमहाल लायब्ररींत उपलब्ध झालें. सिनेमांत जसें द्वंद्वगीत किंवा duet असतें, तशा प्रकारचें याचें स्वरूप आहे. आत्मा किंवा जीव हा पति, व कुडी किंवा शरीर ही पत्नी अशा कल्पनेवर या संवादाची उभारणी झालेली आहे. याचा कर्ता मुक्तेश्वर व महाभारतकर्ता मुक्तेश्वर हा एकच कीं काय, याचा विद्वानांनीं विचार करावा.

कुडीआत्म्याच्या संवादाची कल्पना नवीन नाहीं. अशा प्रकारचें एक पद विष्णुदास नाम्याच्याही नांवावर प्रसिद्ध आहे. इतर कवींचींही अशीं पदें असावींत. 'श्रीमंत संपतराव गायकवाड यांच्या संग्रहांतील क्रमपुस्तक' (बडोदें १८९०) या नांवाच्या कॅटलॉगांत 'कुडीआत्म्याचीं पदें वगैरे', अशा नांवाच्या एका पुस्तकाची नोंद असून 'बाळा विठ्ठल शेट धामणस्कर' असा त्याच्या मुद्रकाचा नामनिर्देश आहे. प्रकाशनाचें स्थल व काल दिलेलीं नाहींत. विष्णूदासनामा व मुक्तेश्वर यांच्या उपरिनिर्दिष्ट कवनांचा अन्तर्भाव या पुस्तकांत झालेला आहे किंवा नाहीं, हें तें पुस्तक शोध करूनही सांपडलें नसल्यामुळें सांगणें अशक्य आहे. तरीपण मुक्तेश्वराचें पद त्यांत प्रसिद्ध झालें नसावें. कारण तें लोकांपुढें आल्यास काव्यसंग्रहाच्या 'महाराष्ट्रकविवर्य मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें', या ग्रंथाच्या प्रतींत त्याला खचित स्थान मिळालें असतें. वाचकांच्या सोयीकरितां मुक्तेश्वराच्या पदाबरोबर विष्णुदासनाम्याचेंही पद खालीं देण्यांत येत आहे. —**संपादक.** ]

## [ मुक्तेश्वरकृत ]

काया म्हणे जीवा, ऐकें रे दुष्टा ॥ सांडोनियां जातोसि मज नष्टा ॥ न पुर्वितां आस माझी पावसि कष्टा ॥ गुंतोनि वासनेपासीं पडसी जन्माचे गोठां ॥ १ ॥ आरे जीवा प्राणपति, तूं तंव अंतरींचा सखा ॥ एकवाट वाढलों दोघें समान भोगिलें सुखा ॥ निरऊनि कोणाचे हातीं चालिलासि परलोका ॥ प्राब्धें गाईली गोरि [ डि ? ] किती आठवुं दुःखा ॥ आरे जीवा प्राणपति ॥ धृ० ॥

जीव म्हणे काये, ऐकें वो मूढे ॥ अज्ञानें अविवेकी तुज नेणतां पुढें ॥

जन्ममरण तुजलागीं भवभ्रांतीचें कोडें ॥ अविनाश मी आत्माराम संत जाणति निवाडे ॥ २ ॥ सरसर वेडिये मूढे नांव कुडी तूं काया ॥ साजणे यासवें चोराचें कैसी लाविसि माया ॥ तूं तंव मसनिचि माती । मी तों जातों निज ठाया ॥ सर सर वेडिये मूढे ॥ धृ० ॥

नादा बिंदा दोहिं होतांचि मेळ ॥ जीवनरूप तया आकारा मूळ ॥ जल-बिंदुमाझारी तुंवा देहे दाविला स्थूल ॥ सोडूनि जातोसि सेखीं निष्ठुर तूंचि रे काळ ॥ अरे जीवा प्राणपति ॥ ३ ॥

निर्गुण मी निराकार नित्यमेव शुद्धबुद्ध ।। तुझियेनि संगति मज जाला संसारबन्द ॥ विषय तो काळाचा फांसा मोहो प्रत्यक्ष मैंद ॥ उपकार तो तुझाचि ऐसा जैसा मधुर विषकंद ॥ सर सर वेडिये मूढे ॥ ४ ॥

नांव ना रूप तुज म्यां आणिलासी व्यक्ती ॥ नानापरिचे विषयभोग माझीये संगती ॥ मजवीण तूं अंधपंग जैसा पदभ्रष्ट भूपति ॥ परि नव्हेसी जाण नीच कृतघ्नमूर्ति रे ॥ अरे जीवा प्राणपति ॥ ५ ॥

तुझेनि देहें अभिमानें ज्ञाता जालों मूर्ख ॥ कृमी आणि श्वान विष्ठा कुत्सित मसनीचि राख ॥ मी मी ऐसें तया म्हणे भूलोनियां आत्मविवेकें ॥ जेही म्हणति तुज माझी तेंहि जोडिलें दुःख गे ॥ सर सर वेडिये मूढे ॥ ६ ॥

आपुलें आपणा मुख न दिसे दर्पणेंवीण ॥ तैसें रे आत्मत्व तुझें तुजला प्रगटीजे ज्ञान ॥ तयाचि मी जन्मभूमि म्हणउनि क्षेत्र तूं क्षेत्रज्ञ ॥ परि माझिया उपकाराचें असो तुझे माथां रिण रे ॥ अरे जीवा प्राणपति ॥ ७ ॥

लोधोनि† विषयस्वार्था स्वइच्छा आचरसि कर्मा ॥ न विचारीसि पापपुण्य संग काढवीसि भ्रमा ॥ लुलु करिसी विषयालागीं जैसि दर्दुरि कर्दमा ॥ सेखीं तया पाप भोगे मजचि देतेसि यमा ॥ सर सर वेडिये मूढे ॥ ८ ॥

अज्ञान मूढ प्रेततां ( ? ) मज देउनियां बळ ॥ लोटूनि संसारकर्मीं विचित्र

---

† लुब्ध होऊन. पहा—**मुखीं लावूनि शर्कराकणी । शब्दस्वादा लोधवी** ॥ —मुक्ते० आदि० १६-११८; **लक्षितां लोधलें तनमनु** ॥ —आदि० २२-११८.

खेळविसि खेळ ॥ सेखीं तया पापभोगें मजचि लाविसि मळ ॥ आत्मा मी निर्दोष साक्षी म्हणतां न लाजसि खळा ॥ अरे जीवा प्राणपति ॥ ९ ॥

सरलिये अभाग्यवेळ राजा प्रवेश पदी ॥ तुटकीया वाहाना मावे (मागे ?) तया कवणे शिधी [ सिद्धी ] ॥ ऐसा जो पावला खुणें आत्मयाचा (चां–च्या) आनंदीं ॥ तो मग नाठवी देहें सुखदुःखाचे संमंधी ॥ सर सर वेडिये मूढे ॥ १० ॥

भोळी मी रे बहुत प्राणया नेणें तुझीये मती ॥ म्हणत होतें तूंचि माझा भ्रमें मोहाचे भ्रांती । सेखीं तूं निर्गुण पापी कैसा परदाररती ॥ तुज-मागें मी पतिव्रता लाहे निघाले सति ॥ अरे जीवा प्राणपति ॥ ११ ॥

तूं तंव काळाचें खाजें माझी म्हणती मंदमति ॥ निर्जीव चर्माचा भाता हातीं धरूनि खाती* ॥ जों चाले हारकाम तोंवरी विछा (विषया) फुंकिती ॥ मजलागि गेलियावरी तुज ऐशीचि गति गे ॥ सर सर वेडिये मूढे ॥ १२ ॥

येकीया अन्नाचे जैसे प्रकार कीजेति भिन्न ॥ तैसे रे इंद्रियद्वारें आमरसाचें भोजन ॥ जेविलासि ज्या ताटीं तें लातें हाणोन ॥ नेलासि [गेलासि?] न पाहातां माघे [ मागे ? ] तुझे उचित कोण रे ॥ अरे जीवा प्राणपति ॥ १३ ॥

नेणतां म्यां येकवेळा करूनि पहिला संग ॥ तुझेनि संगभोगें लागे क्षय जन्मरोग ॥ घालुनियां दृष्टिबन्द माझा निजरूपीं रंग ॥ लोपोनि दुर्णाम दिल्हें मिथ्या जीवित्व आणि लाग ॥ सर सर वेडिये मूढे ॥ १४ ॥

होतासि तों तुझेनि हावें नुपरे [ नपुरे ] ब्रह्मांडगोळ ॥ जातोसि अवचिता सूर्यकांती आनळे [ अनळ ? ] ॥ चोरूनि सर्वांचे डोळे गेलासि नलगतां पळ ॥ जे केली राहाटी तुंवा अवघा स्वप्नींचा खेळ ॥ अरे जीवा प्राणपति ॥ १५ ॥

गगनींचा चन्द्र जैसा रिघे घटाभीतरी ॥ घटाचेनि नाशकाळीं न मिळे

*लोहार. पहा–बोलती शस्त्र खातियें केलें ॥–मुक्ते० आदि० १६–२००.

बिंब्रामाझारी । घटभंगिं अभंगी येक तैसा आत्मा निर्धारीं ॥ आला होता आणि गेला म्हणती भ्रांतीचे विकारी ॥ सर सर वेडिये मूढे ॥ १६ ॥

ये खुणे खुंटला वाद नसतां संदेहे देहो ॥ देहीच विदेह आत्मा ऐसा कळला ज्या भावो ॥ तयातें देहान्तकाळीं कैंचें बाधाया मोहो ॥ **मुक्तेश्वरा** याच देहीं निज मुक्तीचा उपावो ॥ १७ ॥

ऐका जो सज्जन साधु मी तंव तुमचें तान्हुलें ॥ बोलिलों बोबडिय बोलीं क्षमा पाहिजे केलें ॥ जरी व्हाल अभिमानशून्यें ॥ तुमचें तुह्मीं भोगाल ॥ ऐका जी सज्जन साधु ॥ १८ ॥

★

## [ विष्णुदास नामाकृत ]

कुडी म्हणे आत्म्याला ॥ नक्का टाकुन जाऊं स्वामी मजला ॥ धृ० ॥ तुझी माझी बाळपणाची बहु प्रीत ॥ बसून दोघें पिंजऱ्यांत ॥ आतां कसें केलें चंचळ चित्त ॥ ओढवलें संचित ॥ आत्म्या तुझा कळेना मज अंत ॥ जातोस वैकुंठांत ॥ कधीं पडशील रे, पडशील माझ्या डोळां ॥ कुडी० ॥ १ ॥

आत्मा म्हणे वचन ऐक कुडी ॥ तझी न माझी जोडी ॥ अंतर पडलें नाहीं अर्धघडी ॥ पुढें गेले गडी ॥ आह्मां जाणें आहे तांतडी ॥ तुटली मायेची बेडी ॥ आग लागो रे लागो या संचिताला ॥ कुडी० ॥ २ ॥

कुडी म्हणे तूं माझा मनमोहन ॥ जातोस पिंजऱ्यांतून ॥ आतां मला नाहीं कोण ॥ वस्ता भाव भोगिले हौसेन ॥ सोन्याचें कंकण ॥ मजवर तुटून पडलें गगन ॥ कडाडलें अस्मान ॥ आतां भेटूं रे, भेटूं गळयाशि लावूनि गळा ॥ कुडी० ॥ ३ ॥

कुडीला कोठें दिला हो जानिवसा ॥ मसणपूर गांव खासा ॥ तेथें भाव महार आहे खासा ॥ त्रैलोक्यामध्यें ठसा ॥ आत्मा पहातो कुडीचा तमाशा ॥ हिंडतो दाही दिशा ॥ जैसा गळ वोढून घेतो मासा ॥ होतो कासाविसा ॥ जेथून आला रे आला तेथें गेला ॥ कुडी० ॥ ४

मैना कां रुसलीस तूं मजवर ॥ मी परदेशी नर ॥ हात जोडूनि तुझ्या-समोर ॥ नको होऊं दिलगीर ॥ तुजला भाऊबंध अवघे सार ॥ साहाय्य करतील फार ॥ तूं मृत्युलोकिंची राहाणार ॥ मला जाणे आहे दूर ॥ एकवीस स्वर्गांवरती माझें घर ॥ अवध्याला महशूर ॥ **विणुष्दास नामा** ॥ पामर संताचा किंकर ॥ सोडूं नको गुरुच्या चरणाला ॥ कुडी० ॥ ५ ॥

★

# नवनीताची शताब्दी

परशुराम बल्लाळ गोडबोले यांनीं बरोबर शंभर वर्षांमागें म्हणजे १८५४ सालीं सुप्रसिद्ध ' नवनीत ' हा ग्रंथ मराठी वाचकांना सादर केला. जुन्या मराठी वाङ्मया-कडे युरोपियन विद्वानांचें यापूर्वीच लक्ष वेधलें होतें, व त्याची थोरवीही त्यांना पटलेली होती. डॉ. जे. स्टिव्हन्सन रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ( मुंबई शाखा ) जर्नलच्या १८४१ सालीं जुलै महिन्यांत प्रसिद्ध झालेल्या पहिल्याच अंकांत मराठी वाङ्मयासंबंधीं लिहितांना म्हणतात—

" I should wish to see the attention of learned natives directed to a selection of some of the best of the pieces above-mentioned, for the purpose of having two or three volumes accurately printed, with an index of difficult words for the sake of beginners. The study of these authors would improve the style of Maratha composition, which is in danger at present from an almost exclusive attention to foreign literature. To a learned native the English is needful to open to him a storehouse of ideas; but the Pracrit must be studied in order that he may be able to diffuse beneficially among his contrymen the knowledge he has acquired. "

असें जरी असलें तरी नवनीत जें प्रसिद्ध झालें तें या स्टिव्हन्सनच्या सूचनेमुळें नव्हे. नवनीताची प्रत्यक्ष कल्पना थोरल्या चिपळुणकरांची. पुना कॉलेजमधील वरिष्ठ वर्गाच्या विद्यार्थ्यांकरितां म्हणून मराठी वेंच्याचा एक संग्रह प्रसिद्ध व्हावा, अशी कृष्णशास्त्र्यांची इच्छा होती. मेजर कँडी पूना कॉलेजच्या १८५२ सालच्या रिपोर्टांत लिहितात,

" With regard to Krisna Shastri's suggestion that some

poetry should be read in this Department, I beg to mention that some time ago I requested my personal Pandit to compile a volume of "Elegant Extracts" from Marathi poets which I hope to be able soon to present to the Board."

नवनीतामुळेंच आपणास जुन्या वाङ्मयाची गोडी लागली व जुन्या सारस्वताचा अभिमान वाटूं लागला अशी साक्ष अनेकांनीं दिलेली आहे. या ग्रंथाच्या आतांपर्यंत सतरा आवृत्त्या निघाल्या व त्यामध्यें अनेक बदल होत गेले. पहिली आवृत्ति शिळेवर छापिली होती. १८५७ सालच्या दुसऱ्या आवृत्तींत श्री. भास्कर दामोदर पाळंदे यांनीं लिहिलेले 'पद्यरचना' व 'कवींचें वर्णन' असे दोन निबंध आरंभीं जोडले गेले, व कठिण शब्दांचा कोशही या आवृत्तीपासून शेवटीं सांपडतो. पुढें पांचव्या आवृत्तीपासून पाळंदे यांचे हे निबंध अजिबात गाळले गेले.

१८७४ सालीं परशुरामपंत गोडबोले निधन पावल्यावर नववी नवीन आवृत्ति तयार करण्याचें काम विद्याखात्याचे डायरेक्टर चाटफिल्ड यांनीं मेजर कँडीमार्फत श्रीकृष्णशास्त्री तळेकर व रावजीशास्त्री गोडबोले यांच्याकडे सोपविलें. पहिल्या आवृत्तींतील कठिण वेंचे सर्व काढून त्या ठिकाणीं सुलभ वेंचे घालावे आणि सर्वांस समजण्यास सुलभ पडेल अशी या पुस्तकाची आवृत्ति काढावी, असा त्यांना वरिष्ठांकडून आदेश मिळाला होता. त्याला अनुसरून जे कांहीं फेरफार करण्यांत आले, त्यांत मुकुंदराज व ज्ञानेश्वर ह्यांच्या कवितांत सर्व वेदांत असल्यामुळें त्यांचा अर्थ समजण्यास कठिण पडतो म्हणून त्यांच्या कविता नव्या आवृत्तींतून अजिबात गाळून टाकण्यांत आल्या. ही आवृत्ति १८७८ सालीं निघाली. महाराष्ट्र आद्यकवींना अशाप्रकारें अर्धचंद्र दिल्याबद्दल 'केसरी' व 'निबंधमाला' यांतून अधिकाऱ्यांवर टीकेची झोड उडविण्यांत आली. पण १८८२ च्या दहाव्या आवृत्तींत त्यांच्यावरील बहिष्कार उठलेला दिसत नाहीं.

पुढे या टीकांमुळें असो किंवा "कित्येक एज्युकेशनल इन्स्पेक्टर ह्यांचें मत" पडल्यावरून असो, १८८६ च्या आवृत्तीमध्यें ज्ञानेश्वरींतील वेंचे परत घेण्यांत आले. मात्र मुक्तेश्वराचें दुष्यंतशकुंतलाख्यान व आणि मोरोपंतांचें दुष्यंतशकुंतलाख्यान व ययातिआख्यान हीं ग्राम्यधर्मसूचक पद्यें म्हणून वरिष्ठांच्या हुकूमान्वयें या आवृत्तींत गाळून टाकण्यांत आलीं.

आज आपल्यापुढ असलेल्या नवनीताच्या स्वरूपाला परशुरामतात्यांबरोबर श्रीकृष्णशास्त्री तळेकर व विशेषतः रावजीशास्त्री गोडबोले हे मुख्य भागीदार आहेत. पुढील आवृत्त्या पुणे ट्रेनिंग कॉलेजांचे व्हाइसप्रिन्सिपॉल यांच्या देखरेखीखालीं निघाल्या. पण त्यांत किरकोळ फेरफारांखेरीज विशेष उलथापालट झालेली दिसत नाहीं. शेवटची नवनीताची आवृत्ति १९२३ सालीं प्रसिद्ध झाली, परंतु कित्येक वर्षांपासून

बाजारांत तिच्या प्रती विकत मिळेनाशा झाल्या आहेत. असें कळतें कीं नव्या आवृत्तीच्या छपाईस सुरुवात झाली असून ही अठरावी सुधारून वाढविलेली शत-सांवत्सरिक आवृत्ति चालू सालींच वाचकांच्या हातांत पडेल, अशी आशा वाटते. नवनीताच्या अलिकडील प्रतींमध्यें त्याच्या १८७८ आवृत्तीपासूनच्या सूचना म्हणजे प्रस्तावना प्रसिद्ध केल्या जातात, परंतु १८५४ सालच्या नवनीताच्या पहिल्या आवृत्तींतील परशुरामतात्यांची प्रस्तावना त्यांत मुळींच दिलेली नसते. म्हणून या शतसांवत्सरिक वर्षानिमित्त ती व पुस्तकाच्या शेवटची ‘ रसिक जनांस प्रार्थना ’ खालीं पुनर्मुद्रित करण्यांत येत आहेत :—

## प्रस्तावना

बहुतकरून कोणत्याही भाषेंत कविता नाहीं असें नाहीं. ह्या हिंदुस्थानांत अनेक भाषा चालू आहेत, तितक्याही भाषांत विद्वानांनीं कविता केल्या आहेत. कोणत्याही भाषेचा उत्तम परिणाम म्हटला म्हणजे कविता होय. ज्याला भाषाज्ञान चांगलें असतें तोच कविता करूं शकतो आणि त्याचीच कविता सरस व लोकमान्य होते. भाषा सुधारण्यास व मनाची शक्ति वाढविण्यास कविता हें एक मोठें साधन आहे. सांप्रत सर्व विद्या शिकविण्याचे प्रयत्न चालले आहेत, त्यांत कविता शिकविण्याचें साधन कमी आहे तें अवश्य असलें पाहिजे असें बहुतांचें मत आहे. तोच उद्देश हें पुस्तक रचण्याचा आहे.

सांप्रत ह्या महाराष्ट्रदेशांत महाराष्ट्र ( मराठी ) भाषा चालत आहे. ह्या मराठी भाषेस प्राकृत भाषा म्हणतात. ह्या प्राकृत भाषेंत कविता करणारे कवि मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन पंडित, रामदास, तुकाराम, श्रीधर, मोरोपंत, अमृतराय, इत्यादिक बहुत होऊन गेले. ह्यांनीं पुष्कळ प्रकारच्या कविता केल्या आहेत. ज्यांला मराठी भाषेचें ज्ञान चांगलें असावें अशी इच्छा असेल त्यांनीं प्राचीन व अर्वाचीन कवींचे प्राकृत ग्रंथ वाचावे हें आवश्यक आहे. ज्याला ज्या भाषेचें पूर्ण-ज्ञान असतें त्याला त्या भाषेच्या कवितांतील नाना प्रकारचे चमत्कार व रस पाहून किती आनंद वाटतो! साधारणपणें लिहिलेल्या विषयापेक्षां कवितेंत वर्णिलेला विषय वाचणाऱ्यांस गोड लागतो. कारण कीं कवितेंत भक्त्यादिभाव व करुणा श्रृंगारादि रस असतात, तसेच उपमादिक अनेक अर्थालंकार व अनुप्रास यमकादिक शब्दालंकार असतात, ह्यामुळें वाचणाऱ्याचें मनोरंजन फार होतें. मराठी भाषेंतील गद्य कवितेपेक्षां पद्य कविता लोकांस फार आवडते. कविताग्रंथ वाचून त्यांचा अर्थ लावणें हें एक मोठें आनंदाचें कृत्य आहे.

मराठी भाषेंत कविताग्रंथ पुष्कळ व मोठाले आहेत, त्यांत छंद व चालीहि अनेक प्रकारच्या आहेत. त्यांची गोडी लागून तिकडे तरुणांच्या मनाची प्रवृत्ति व्हावी

ह्याकरितां मराठी भाषेंतल्या बहुतेक कवितांतील थोडथोडे वेंचे घेऊन हें एक लहानसें पुस्तक केलें आहे. हें मन लावून वाचलें असतां कवितांचे प्रकार व रीती व त्यांतील चमत्कार व रस हीं सर्व थोडक्यांत समजतील. ह्या लहान पुस्तकाचा अभ्यास चांगला झाला असतां मोठाले ग्रंथ पाहाण्यास मार्ग सुलभ होईल. किंबहुना कविता करण्याची शक्तिही प्राप्त होईल. काव्याचीं लक्षणें व काव्य करण्याची पद्धति ह्याविषयीं दुसरे ग्रंथ आहेत, म्हणून एथें लिहिण्याची गरज नाहीं.

ह्या पुस्तकांत लिहिण्याचा क्रम म्हटला तर कवींच्या काळावरून किंवा कवितांच्या योग्यतेवरून धरला असें नाहीं, तर, जसा संग्रह होत गेला तसा क्रम धरिला आहे. तो असा, प्रथम अभंग, त्यापुढें ओंव्या, त्याच्यापुढें वामनी श्लोक, मग मोरोपंती आर्या वगैरे, त्यानंतर कितीएक कवींनीं केलेलीं आख्यानें, कठिबंध, पदें वगैरे लिहिलीं आहेत. त्या त्या ठिकाणीं कितीएक कवींचे माहीत होते तितके थोडथोडे वृत्तांतही लिहिले आहेत.

असें पुस्तक करण्याचा हा प्रथमच प्रसंग आहे म्हणून सुज्ञपुरुष दोषदृष्टि न करितां गुणलेश घेऊन अधिक उत्तेजन देतील अशी आशा आहे.

## रसिक जनांस प्रार्थना

काव्यामृताचा नवनीतभेला । हा गोड लागो तुमच्या जिभेला ।
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी । तरी सुखाची मिळवाल जोडी ॥

नाना काव्यतरुव्रजीं हुडकितां जीं जीं बरीं भावलीं ।
तीं तीं वेंचुनि घेतलीं सुकुसुमें पात्रांत जीं मावलीं ।
त्यांची गुंफुनि रम्य माळ विबुधा अत्यादरें अर्पिली ।
ती कंठीं विलसो तिणें कविसभा होवो सदा तर्पिली ॥

हे वेंचे बहुयत्नें मेळविले परशुरामतात्यानें ।
ज्यानें अवलोकावे पावावी शीघ्र रसिकता त्यानें ॥

आनंद अब्दीं सत्राशें शेहत्तर शकीं भला ॥
मार्ग कृष्ण तृतीयेला ग्रंथ संपूर्ण जाहला ॥

★

# किताब गाइच्या देवीची उत्पत्ती व गुण त्याचा तपसील

(लंडन येथील इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयामध्यें असलेल्या देवनागरी लिपींतील मराठी हस्तलिखितावरून खालील मजकूर छापण्यांत येत आहे. त्याचा लेखनकाल इ. स. १८१२ आहे. अर्वाचीन मराठी गद्याच्या निर्मितीला पद्धतशीर सुरुवात होण्यापूर्वीच्या मराठी गद्याचा नमुना म्हणून तो वाचकांना आकर्षक वाटेल. देवी टोंचण्याच्या पद्धतीचा आरंभींचा इतिहास म्हणून विषयाच्या दृष्टीनेंहि त्याला महत्त्व आहे. त्या काळीं मराठींत विरामचिन्हें देण्याची पद्धति नव्हती. वाचकांच्या सोयीकरितां म्हणून तीं आम्हीं घातलीं आहेत. —संपादक)

**प्रथम अंगाच्या देवीच्या उपद्रवाची हकीकत :** देवी सगळे पृथ्वीवर आहेत. सर्व रोगांपेक्षा देवीचा रोग परम कठीण. मनुष्यें फार मरतात. कलम १. इंग्रेजी मुलकांत कोणते रोगाने किती मनुष्यें मरतात याचे चौकसीची चाल आहे. तेव्हां देवीचे रोगाने किती मनुष्यें मरतात याची चौकसी केली तों साहा मनुष्यांत एक मनुष्य खचीत मृत्य पावतें. कलम २. या मुलकांत कोणते रोगाने किती मनुष्यें मरतात याचे चौकसिची चाल नाही. परंतु हा देश उष्ण, आमचे देशापेक्षां अधीक मरत असतील. कलम ३. यांत देवीचे उपद्रवेंकरून जे वांचतात त्यांत कोणाचे पाय जातात व कोणाचे हात जातात. कोण्ही आंधळे होतात व कोणास गुरु होतात व कोणास वण बहूत पडतात. असे नाना प्रकारचे उपद्रव होउन रूपाचे विरूप होते. कलम ४. देवी जेव्हां मुलास येतात तेव्हां तीर्थरूप मातुश्रीस जें दुःख होतें तें सांगता येत नाही. कलम ५. इंग्रेजी मुलकांत वैद्यानी देवीकरता बहूत औषधें पथ्यपाणी करवीलीं. परंतु उपाय लागु होऊन गुण आला नाही. कलम ६. याजवर दुसरा उपाय करून पाहिला जे ज्यांस आपले आपण देवी निघाल्या त्याची लस काढून दुसऱ्यास लाविली तेणेंकडुन देवी हलक्या जाउ लागल्या. परंतु येखादे समइ फार येऊन मनुष्य मरू लागले. कलम ७. व याचे वासाने दुसऱ्यास देवी चौकडे येऊन उपद्रव होऊं लागला म्हणून तो उपाय सोडून दिल्हा. कलम ८. या देश्यांत पहिल्यापासून तैश्याच देवी काढतात. परंतु गुण यथास्थित येत नाही व सांगीतल्याप्रमाणे होतें. कलम ९. ह्या देश्यांतील **भावना** जे देवीला कोणे गोष्टीचा उपाय चालत नाही. कलम १०. आणीक दुसरे प्रांतात चाल जे देवी निघाल्या मनुश्यास गांवांबाहेर त्याची आस्था साडून टाकितात. त्याचे दैवेंकरून जैसे होईल तैसे हो. कलम ११. हा उपद्रव अंगाचा देवीचा ईश्वराने

पाहून कृपाळु होऊन गाइच्या देवी दाखविल्या जे येणेकरून देवींचा उपद्रव व्हावयाचा नाही. कलम १२.

**दुसऱ्या गाइच्या देवीची हकिकत :** इंग्रेजी देशांत कोणी येके प्रांतांत कोणे येक वेळेस गाइस उपद्रव होत असतो त्याचें नांव गौळ्यानी गाइच्या देवी म्हणून ठेविलें. तेव्हां गाइची प्रकृत कैसी होते जे ती वैरण खात नाही व ताप येतो व तीचे कासेस व थानास नीळे फोड येतात आणि फोडांत पाण्याप्रमाणे लस होते. त्यावेळेस ज्यास देवी निघाल्या नसतील त्याचे हाताचे कातडें व कोठें कापलेलें नूतन असलें तेथे ही लस लागल्यास त्या जाग्यावर फोड येतात आणि मुलास थोडा ताप येतो आणि कांखेत अवधानाचा गोळा येतो. परंतु थोडे दिवसांत बरे होते. त्याजला देवी जन्मांत येत नाहीत. ऐसा चमत्कार गरीब गौळ्यांला मात्र समजला होता. परंतु ही कळा प्रख्यात नव्हती. कलम १३ मग जेनरसाहेब माहान वैद्य पुण्यशीळ आणि बुध्दिवंत आहेत त्यांचें घर गौळ्याचे सेजारी होतें. तों एक दिवसी ईश्वरकृपेकरून अकस्मात हा मार्ग समजला आणि चितांत उद्भवलें जे ज्यास देवी निघाल्या नसतील त्यास गौळ्याचे घरी घेऊन जावें आणि गाईची लस लावावी. मुलास आणि मुलांची लस दुसऱ्यास लावावी म्हणजे येणेकरून देवीचा उपद्रव पृथ्वीत व्हावयाचा नाही. मग कल्पनेकरून माहे मे चंद्र १४ सन १७९६ इंग्रेजी माराष्ट शके १७१८ त्या दिवसीं जेनारसाहेबानी येक मुल देवी न निघालें याला बोलाऊन आणिलें. त्याचें नांव उलीम समरस होतें. उम्रर वर्षे ५ पांच होती. त्याजला ज्या गाईस देवी निघाल्या होत्या तीजपासी घेऊन गेले आणि लाहान शस्त्राने गाईचा कासेवरील फोड फोडुन पाण्याप्रमाणे लस काढून मुलाचे डावे दंडावर लाविली. त्या जाग्यावर तिसरे दिवसीं बारीक फोड आले आणि आठवे दिवसीं थोडासा ताप आला. तेच दिवसीं फोडाभवताली सूज ठाकली व कांखेंत गोळा आवधान्याचा आला. फोड नव दिवसपर्यंत वाढत होते. वाटाण्याप्रमाणें थोर दिसों लागले. दाहावे दिवसापासुन उतार खाऊन अठरावे दिवसीं खपल्या पडल्या. वण मात्र राहिले. मुलास दुःख थोडें जालें. येक दिवस देखिल मुल निजून राहिलें नाही व आंगावर एक फुटकुळी आली नाही. कलम १४. नंतर परिक्षेसाठीं आपले आपण देवी ज्या मुलास आल्या होत्या त्याचे वाड्यांत देवी काढविल्या. मुलास दोन महिने ठेऊन व त्याचे आंगाची लस काढून याजला लाविली परंतु आंगावर देवी किंवा एक फोड आला नाहीं. हें जेनारसाहेबानी पाहून संतोष जाहाला. कलम १५. मग दुसरे मुलास ज्याला देवी निघाल्या नव्हत्या त्याला गाइपासी नेऊन त्याला गाईची लस लाविली. मग आठवे रोजीं चांगल्या फुगल्या मग त्याची लस दुसऱ्यास लाउन मग सर्वत्र वैद्यानी इंग्रेजी मुलकांत व फरासीसचे मुलकांत देवी काढूं लागले. विलाइतींत सर्वांस माहीत जालें. कलम १६. मग इंग्रेजी पादशाहानी ही गोष्ट ऐकून त्याचें वैद्यानी व दुसरे महान माहान

वैद्य बोलाऊन त्यांस आज्ञा केली जे या गोष्टीची चौकसी करून सत्य कीं असत्य हें आह्मांस समजवावें. मग अवघे वैद्यानी साधून पाहिलें तों सत्यच आहे. हें पादशास समजाविलें. यावर पादशानी जेनारसाहेबांस बोलाऊन दोन लक्ष रुपये इनाम दिल्हा आणि ते दिवसापासून कृपा फार करूं लागले. मग पादशाहा बोलिले कि तुमचें पुण्य उत्कृष्ट ह्मणून देवीचा उपद्रव तुह्मांपासून दूर जाला आणि आमची प्रजा सुख पावली. कलम १७. मग जेनारसाहेबांचे गुणावरून दुसरे विलाइतीचे पादशाहानी स्तुतीवादाचीं पत्रें व बहुमान व इनाम देऊन पाठऊन दिल्हें. जेनारसाहेब आजपर्यंत सुखरूप आहेत. कलम १८. हालीं विलाईतींत पादशा व मोटे मोटे सर्दार व प्रजालोक व मुलें उपजून महिन्या दों महिन्यांचीं झालीं ह्मणजे त्याजला गाईच्या देवी काढवितात जे याजला पुढें देवी निघावयाच्या नाही तवं दुःख प्राप्त व्हावयाचें नाही. कलम १९.

**तिसरी गाईच्या देवी या मुलकांत कैश्या आल्या त्यांची हकीकत**---------इंग्रेजाकडील थोर थोर सर्दार या मुलकांत होते त्याणी जेनारसाहेबांची कीर्ति ऐकून त्याचे चित्तांत आलें की या मुलकांत देवीचा उपद्रव बहूत होतो याजकरितां हा उपाय उत्पन्न करावा मग प्रथम इकडील गोळ्याला विचारलें जे या देशांत गाइस देवी एतात कीं नाहीं. मग ते बोलले जे आह्मांस याची माहीतगारी नाही. परंतु कोणी येका देशांत गाइस देवी येतात ह्मणून ऐकिलें आहे. मग इलाइतितून भिंगावर लस घाल्लून व दोरे लसीत भिजऊन या देशांत जाहाजावरून आणिली. मुलास देवी काढविल्या. परंतु देवी फुगेनाश्या झाल्या. असें दोन च्यारवेळां केलें. परंतु लस चांगली यथास्थीत येऊन कार्य होइना सारिखें झालें. पल्ला लांबचा फार दूर याकरितां लस नासून देवी फुगेनाशा झाल्या. कलम २०. यावरून मनांत संशय आला जे इतकें लांबून लस आणिली परंतु कार्य होतां दिसत नाही. मग हें वर्तमान डंकिनसाहेब ममईचे थोर सरदार याणी ऐकोन लसीची चौकसी केली तो रुमचे पादशाचे मुलकात गाइच्या देवी आल्या. मुंबईपासून रुम हजार कोस आहे. मग डंकिनसाहेबानी लार्ड येलगीसाहेब ईंग्रजाकडील वकीलीं रुमचे पादशाजवळ होते त्यांस पत्र लिहून पाठविलें जे आम्हांस गाईची लस पाठऊन द्यावी. मग त्याणी कृपा करून भिंगारावर लस घालून बागदादशेहर रुमचे आलीकडे पंचवीस मजल आहे तेथें इंग्रजाकडील वकील होता त्याजपासी लस पाठऊन दिल्ही. मग त्याचे वैद्यानी दोन च्यार मुलांस देवी काढून पाहिल्या तो लसे नवी देवी चांगल्या फुगल्या. मग तेथून बसेरेस इंग्रेजाकडील वकील होते त्याजकडे लस पाठऊन दिल्ही, मग बसेरेसही देवी काढून पाहिल्या तों चांगल्या निघाल्या. बगदादपासून बसेरेसजवळ होती तेथेही चांगल्या फुगल्या. मग आठवे रोजीं लस भिंगारावर घाल्लून मुंबईस रवाना केली. सन १८०२ माहे जून तेरील १४ चौदाबीस लस घेऊन मुंबईत दाखल झाली. इंग्रेजी मराष्ट शके १७२४. कलम २१.

तेचक्षणी मुबइचे वैद्यानी भींगावरील लस घेऊन पांचा मुलास देवी काढील्या. त्यामधीं एका मुलाच्या देवी चांगल्या फुगल्या त्याचें नांव आणादष्टिल. या मुलापासून प्रथम या मुलकांत गाइच्या देवी आल्या. कलम २२.

मग त्या मुलाची लस लाहनथोरास लाऊन मुबइंत देवी काढूं लागले. त्या दिवसापासून मद्रास व बंगाला वगैरे मुख्य मुख्य स्थानीं लस पाठऊन देवी लाखोलाख काढल्या व अद्यापही बारामाही कादितात. येणेकद्वन जनाच्या उपद्रव दूर होऊन आनंदातें पावतात. कलम २३.

**चौथी पुण्यांत गाइच्या देवी प्रगट व्हावयाची हकीकत :** ईग्रजाकडील माहान माहान सरदार याचे मनांत आलें जे मुंबईत गाईच्या देवी येऊन पोंहचल्या आणि पुण्यामधीं वस्ती फार व देवीचे उपद्रवेंकरून मनुष्यें बंहूत हैराण होतात. याज-करितां तिकडे हा उपाय पाठवावा म्हणून ईंग्रेजी वैद्यास सरदार यानी आज्ञा केली. नंतर वैद्यानी येका ब्राह्मणास हा अभ्यास करऊन व त्याचे बरोबर देवी काढले मूल देऊन पुण्यास रवाना करून दिल्हा. सन् १८०२ माहे आगटोबर ईंग्रेजी मराष्ट शके १७२४. कलम २४. मग त्या ब्राह्मणाने थोड्याश्या मुलांस देवी काढल्या. परंतु लसीचे संरक्षण केलें नाही. दोनतीन वेळां लस आणविली. परंतु ही सांभाळावयास कोण्ही ईंग्रेजी वैद्य नव्हते. याकरता लस हमेशा उडत गेली. कलम २५. यानंतर कोटससाहेबानी ममईहून गाईची लस आणिली. सन १८०६ माहे सपटेंबर ईंग्रजी मराष्ट शके १७२८. नंतर कार्नेल क्लोजसाहेब याचे आज्ञेवरून संगमावर दर आठा दिवसा आदीतवारी मुलास देवी काढुं लागले. यावर शेहरांतील ब्राह्मणांची व आवंतर जातींचीं मुलें एऊन दर आठवडा देवी काढऊन जाऊं लागलीं. कलम २६. नंतर हें वर्त्तमान श्रीमंत माहाराज बाबासाहेब यानीं ही गोष्ट ऐकोन कर्णेल क्लोससाहेब यांस विचारलें की गाइच्या देवीचा चमत्कार ऐकिला आहे. तर खूद आमचे स्त्रीस देवी काढवावयाच्या आहेत याचें कैसें काय तें सांगावें. मग कार्नेलसाहेबांनीं महाराजांची खातरजमा केली. मग बाइसाहेबास कर्णलसाहेबांचे हुजूर आणून देवी कोटससाहेबांनी काढिल्या. चंद्र २२ माहे डिजेंबर सन् ईंग्रेजी मराष्ट शके १७२८. कलम २७. बाइसाहेबांचे दंडावर उत्तम प्रकारच्या फुगल्या. श्रम झाले नाहींत. नंतर कोटससाहेबाला माहाराजानी फार नावाजले. कलम २८. नंतर त्या दिवसापासून शहरांत व भोंवर गांवी कोटससाहेब देवी काढुं लागले. त्याची सुमारी १७०५६ ब्राम्हण व शुद्र वगैरे मीळोन ता॥ माहे आप्रेल चंद्र १४ सन १८१२ इंग्रेजी मराष्ट शके १७३४ वैशाख अधीक शु ३ मंगळवारपर्यंत सतरा हजार व छप्पन्न देवी झाल्या. कलम २९. याचे आगोधर मलबार वगैरे देशांत कोटससाहेबानी देवी काढल्या सुमारी १३००० तेरा हजार व पुण्यातील सत्तरा हजार व छपन्न येकून तीस हजार छपन्न देवी काढल्या. परंतु त्यांत एकही मनुष्य मेले नाही व काही येक देवी समंधी उपद्रव जाला नाही व ज्या देवी आपल्या आपण आल्या त्याजपासी देवी काढविले मुलास

नेऊन ठेविलें व लस लावली. परंतु त्या मुलांस देवी पुन्हा आल्या नाहीत. कलम २०. ऐसा कोटस्‌साहेबांचा पराक्रम कर्नेल क्लोससाहेब व रसलसाहेब व एलफीष्टणसाहेब याणी पाहून कलकत्यास लॉर्ड मीले (मिंटों?)साहेब सर्वांत श्रेष्ठ मोटे सरदार या देशांत सर्वत्र ईग्रजांस आज्ञा करणार त्यास हमेशा लिहून पाठवों लागले. हें वर्त्तमान लॉर्ड मीले (मिंटों?) साहेबानी ऐकोन बहूत संतोष जाला. कलम ३१. नंतर श्रीमंतांची दयासंपादनार्थ व ब्राह्मण व शुद्र वगैरे आदीकरून यांस देवीचा उपद्रव न व्हावा व औषधें धर्मार्थ द्यावी या कारणास्तव लॉर्ड मिंटोसाहेब याणी कोटससाहेबांस आज्ञा दिल्ही जे आवांतर कामें सोडुन पुण्यामधें राहावें. कलम ३२. या कार्यावर नेमणूक उत्तम प्रकारची कोटससाहेब करून दिल्ही. त्यावरून हाली दर आठा दिवसा आदितवारी वेताळपेठेंत श्रीमंतानी बंगला दिल्हा आहे तेथे या कामावर जात असतात व आठा दिवस आंत येक दोन दिवस पुण्याचे भवताले भवरगांवीही जात असतात व घरि व शहरांतील व बंगल्यांत हर कोणी आलें असतां त्याला धर्मपरायण औषध देतात. कलम ३३.

**गाइच्या देवी कशा काढतात त्याची हकीकत पांचवी :** गाइच्या देवी काढविल्यावांचुन निघत नाहीत. काढविल्या दिवसापासून आठवे रोजींची लस दुसऱ्याचे उपयोगी पडती. सातवे दिवसी फुगतात. परंतु लस थोडी असते. नवे दिवसी लसीचा कमजोर असतो. यास्तव आठवां रोज प्रसिध्ध धरला आहे. दाहावे दिवसी लस नासती व त्यामध्यें पू होतो. दाहावे दिवसीच्या लसीने देवी कदापी काढू नयेत. कलम ३४. आठवे दिवसीच्या देवी ज्या मुलाच्या फुगल्या असतात त्या मुलाजवळ आवांतर मुलें आणून नाजूक शस्त्र घेऊन फोडाचे भवताले जागाजागां टोचावें. जेथें टोंचावें त्याचे जागावर दैवराप्रमाणे लस येते. मग शस्त्राचा शेंडा दोंहीकडे भिजउन डावे दंडावर मध्यभागीं च्यार पांच जागा किंचित फासण्या टाकाव्या. त्या जागावर थोडेसें रक्त येतें. तें रक्त पुसू नये व खाजऊ नये व चोळु नये व नव दिवसपर्यंत मुलास स्नान घालू नये. तान्हे मूल असलें तर त्याची टाळु मात्र भरावी. कोठें जाण्याविसिं किंवा विटाळ किंवा मुलाचे मातोश्रीस न्हाण्याधुण्यास कोणे गोष्टीचा प्रतिबंध नाही. जेथें आपल्या आपण देवी निघाल्या असतील तेथे आठ दहा दिवस जाऊं नये, गाइच्या देवी फुगल्यावर जावे. मधीं गेल्यास दुसऱ्या देवी आंगावर येउन फुगतील व काढविल्या ह्याही फुगतील. कलम ३५.

**गाइच्या देवी कश्या फुगतात याची भावना व फोडाचें चिन्हाचा तपसील हकीकत साहावी :** देवी काढविल्या दिवसापासून तिसरे दिवसिं जेथे लस लाविली ती जागा लाल होते व वारीक मोहर येतो. गोरें शरीर असलें तर तेच दिवसीं समजतें की ह्या फुगतील कीवा नाही. काळें शरीर असलें तर चारपाच दिवसी समजावयाचें नाही व साहावे दिवसी कलाली अधीक होइल व फोडही मोठे दिसोन येतील व पाणीही थोडेसे होइल. कलम ३६. आठवे दिवसी

तेचक्षणी मुंबइचे वैद्यानी भींगावरील लस घेऊन पांचा मुलास देवी काढील्या. त्यामधीं एका मुलाच्या देवी चांगल्या फुगल्या त्याचें नांव आणादष्टिल. या मुलापासून प्रथम या मुलकांत गाइच्या देवी आल्या. कलम २२.

मग त्या मुलाची लस लाहनथोरास लाऊन मुबइंत देवी काढूं लागले. त्या दिवसापासून मद्रास व बंगाला वगैरे मुख्य मुख्य स्थानीं लस पाठऊन देवी लाखोलाख काढल्या व अद्यापही बारामाही काढितात. येणेकडून जनाच्या उपद्रव दूर होऊन आनंदातें पावतात. कलम २३.

**चौथी पुण्यांत गाइच्या देवी प्रगट व्हावयाची हकीकत :** ईंग्रजाकडील माहान माहान सरदार याचे मनांत आलें जे मुंबईत गाईच्या देवी येऊन पोंहचल्या आणि पुण्यामधीं वस्ती फार व देवीचे उपद्रवेंकरून मनुष्यें बहूत हैराण होतात. याज-करितां तिकडे हा उपाय पाठवावा म्हणून ईंग्रेजी वैद्यास सरदार यानी आज्ञा केली. नंतर वैद्यानी येका ब्राह्मणास हा अभ्यास करऊन व त्याचे बरोबर देवी काढले मूल देऊन पुण्यास रवाना करून दिल्हा. सन् १८०२ माहे आगटोबर ईंग्रेजी मराष्ट शके १७२४. कलम २४. मग त्या ब्राह्मणाने थोड्याश्या मुलांस देवी काढल्या. परंतु लसीचे संरक्षण केलें नाही. दोनतीन वेळां लस आणविली. परंतु ही सांभाळावयास कोण्ही ईंग्रेजी वैद्य नव्हते. याकरता लस हमेशा उडत गेली. कलम २५. यानंतर कोटससाहेबानी ममईहून गाईची लस आणिली. सन १८०६ माहे सपटेंबर ईंग्रजी मराष्ट शके १७२८. नंतर कार्नेल क्लोजसाहेब याचे आज्ञेवरून संगमावर दर आठा दिवसा आदीतवारी मुलास देवी काढुं लागले. यावर शेहरांतील ब्राह्मणांची व आवंतर जातींचीं मुलें एऊन दर आठवडा देवी काढऊन जाऊं लागलीं. कलम २६. नंतर हें वर्त्तमान श्रीमंत माहाराज बाबासाहेब यानीं ही गोष्ट ऐकोन कर्नेल क्लोससाहेब यांस विचारलें की गाइच्या देवीचा चमत्कार ऐकिला आहे. तर खूद आमचे स्त्रीस देवी काढवावयाच्या आहेत याचें कैसें काय तें सांगावें. मग कार्नेलसाहेबांनीं महाराजांची खातरजमा केली. मग बाइसाहेबास कर्नलसाहेबांचे हुजूर आणून देवी कोटससाहेबांनी काढिल्या. चंद्र २२ माहे डिजेंबर सन् ईंग्रेजी मराष्ट शके १७२८. कलम २७. बाइसाहेबांचे दंडावर उत्तम प्रकारच्या फुगल्या. श्रम झाले नाहींत. नंतर कोटससाहेबाला माहाराजानी फार नावाजले. कलम २८. नंतर त्या दिवसापासून शहरांत व भोंवर गांवी कोटससाहेब देवी काढुं लागले. त्याची सुमारी १७०५६ ब्राम्हण व शुद्र वगैरे मीळोन ता॥ माहे आप्रिल चंद्र १४ सन १८१२ ईंग्रेजी मराष्ट शके १७३४ वैशाख अधीक शु ३ मंगळवारपर्यंत सतरा हजार व छप्पन्न देवी झाल्या. कलम २९. याचे आगोधर मलबार वगैरे देशांत कोटससाहेबानी देवी काढल्या सुमारी १३००० तेरा हजार व पुण्यातील सत्तरा हजार व छपन्न येकून तीस हजार छपन्न देवी काढल्या. परंतु त्यांत एकही मनुष्य मेले नाही व काही येक देवी समंधी उपद्रव जाला नाही व ज्या देवी आपल्या आपण आल्या त्याजपासी देवी काढविले मुलास

नेऊन ठेविलें व लस लावली. परंतु त्या मुलांस देवी पुन्हा आल्या नाहीत. कलम ३०. ऐसा कोटस्‌साहेबांचा पराक्रम कर्नेल क्लोससाहेब व रसलसाहेब व एलफीष्टणसाहेब याणी पाहून कलकत्यास लॉर्ड मीले (मिंटों?)साहेब सर्वांत श्रेष्ठ मोटे सरदार या देशांत सर्वत्र ईग्रजांस आज्ञा करणार त्यास हमेशा लिहून पाठवों लागले. हें वर्त्तमान लॉर्ड मीले (मिंटों?) साहेबानी ऐकोन बहूत संतोष जाला. कलम ३१. नंतर श्रीमंतांची दयासंपादनार्थ व ब्राह्मण व शुद्र वगैरे आदीकरून यांस देवीचा उपद्रव न व्हावा व औषधें धर्मार्थ द्यावी या कारणास्तव लॉर्ड मिंटोसाहेब याणी कोटससाहेबांस आज्ञा दिल्ही जे आवांतर कामें सोडुन पुण्यामधें राहावें. कलम ३२. या कार्यावर नेमणूक उत्तम प्रकारची कोटससाहेब करून दिल्ही. त्यावरून हाली दर आठा दिवसा आदितवारी वेताळपेठेंत श्रीमंतानी बंगला दिल्हा आहे तेथे या कामावर जात असतात व आठा दिवस आंत येक दोन दिवस पुण्याचे भवताले भवरगांवीही जात असतात व घरि व शहरांतील व बंगल्यांत हर कोणी आलें असतां त्याला धर्मपरायण औषध देतात. कलम ३३.

**गाइच्या देवी कशा काढतात त्याची हकीकत पांचवी :** गाइच्या देवी काढविल्यावांचुन निघत नाहीत. काढविल्या दिवसापासून आठवे रोजींची लस दुसऱ्याचे उपयोगी पडती. सातवे दिवसी फुगतात. परंतु लस थोडी असते. नवे दिवसी लसीचा कमजोर असतो. यास्तव आठवां रोज प्रसिध्ध धरला आहे. दाहावे दिवसी लस नासती व त्यामध्यें पू होतो. दाहावे दिवसीच्या लसीने देवी कदापी काढू नयेत. कलम ३४. आठवे दिवसीच्या देवी ज्या मुलाच्या फुगल्या असतात त्या मुलाजवळ आवांतर मुलें आणून नाजूक शस्त्र घेऊन फोडाचे भवताले जागाजागां टोचावें. जेथें टोंचावें त्याचे जागावर दैवराप्रमाणे लस येते. मग शस्त्राचा शेंडा दोंहीकडे भिजउन डावे दंडावर मध्यभागीं च्यार पांच जागा किंचित फासण्या टाकाव्या. त्या जागावर थोडेसें रक्त येतें. तें रक्त पुसू नये व खाजऊ नये व चोळुं नये व नव दिवसपर्यंत मुलास स्नान घालू नये. तान्हे मूल असलें तर त्याची टाळु मात्र भरावी. कोठें जाण्याविसिं किंवा विटाळ किंवा मुलाचे मातोश्रीस न्हाण्याधुण्यास कोणे गोष्टीचा प्रतिबंध नाही. जेथें आपल्या आपण देवी निघाल्या असतील तेथे आठ दहा दिवस जाऊं नये, गाइच्या देवी फुगल्यावर जावे. मधीं गेल्यास दुसऱ्या देवी आंगावर येउन फुगतील व काढविल्या ह्याही फुगतील. कलम ३५.

**गाइच्या देवी कश्या फुगतात याची भावना व फोडाचें चिन्हाचा तपसील हकीकत साहावी :** देवी काढविल्या दिवसापासून तिसरे दिवसिं जेथे लस लाविली ती जागा लाल होते व बारीक मोहर येतो. गोरें शरीर असलें तर तेच दिवसीं समजतें की ह्या फुगतील कीवा नाही. काळें शरीर असलें तर चारपाच दिवसी समजावयाचें नाही व साहावे दिवसी कलाली अधीक होइल व फोडही मोठे दिसोन येतील व पाणीही थोडेसे होइल. कलम ३६. आठवे दिवसी

थोर वाटाण्याच्या सुमाराच्या दृष्टीस पडतील. कलम ३७. कातड्यावर वाटोळे फोड येतात परंतु फोडाचा माथा सपाट व मधी खोलगट असतो. फोडाची कड नळनळीत दिसती आणि फोडाचे आंत पुढें सभोंवती लसीने भरलेली असतात. मध्यभागी शस्त्र लागलें असतें तेथे पू असतो. दर फोडाचे भवताली गहूं गहूं कलाली होती व कांखेत गोळा आवधानाचा येतो. कलम ३८. नवे दिवसीं फोडाची वाढ बंद होते. फोडाभवताली काळी तसूभर होती व कातडे निब्बर होतें व अवधानाचा गोळा मोठा होऊन अमाळसा अधीक दुखतो. याप्र॥ पांच गोष्टी नवे दिवसी अधीक होतात. कलम ३९. दाहावें दिवसापासून सांगीतल्या भावना उतारास लागतात व तेरावे चौदावे रोजीं खपल्या धरून विसावे रोजीच्या सुमारास पडतील. जर खाजविलें असलें अथवा चोळलें असलें तर दिवस अधीक लागतील. वण जन्मपर्यंत राहातील. कलम ४०. फोडाची भावना सांगीतली त्यांत ताप सर्वत्रांस येतो. कोणांस पांचवे साहावे दिवसी येतो. परंतु सातवे आठवे दिवसीं बहुतांस ताप येतो. थोरास आधीक दिसतो. तान्हे मुलास कमी असतो. कलम ४१. दंडावरले फोडाशिवाइ दुसरे ठिकाणी नखाने लस लागली तर फोड येतात. कलम ४२.

**फोड फुगत नाही त्याची हकीकत सातवी :** ज्या शस्त्रेंकरून येक दोन दिवस देवी काढल्या तें शस्त्र न पूसतां लशीने भरलेलें तसेंच ठेविलें आणि त्या शस्त्रेंकरून जर आणीक देवी काढल्या तर फोड चांगले येणार नाहीत. पू होइल. लस चांगली असली तरी त्या शस्त्रानें लसही नासून जाइल. कारण १. कलम ४३. फोडाचे कडेची लस पाण्याप्र॥ असली तर देवी काढाव्या. मध्यभागी पू असतो. त्याणे कदापी काढू नयेत. कारण २. कलम ४४. कडेस लस नासून पू जाला असला तर त्याणेही देवी काढूं नयेत. काढल्या असता फोड येऊन पू होइल. परंतु गुणास येणार नाहीत. कारण ३. कलम ४५. जर आंगावर खरूज अथवा फोड असले आणि देवी काढल्या तर यथास्थीत फुगणार नाहींत. कारणें ४. ह्या चौं कारणाने फोड फुगत नाहीत. कलम ४६. जर आंगावर खरूज असली तर जेथे शरीर निर्मळ खरजेविरहीत असेल तेथे काढाव्या. कलम ४७. कोणते वेळेस देवी काढले वेळेस मनुश्य खाजवीतो अथवा पुसून टाकितो. याकरतां देवी काढणारानें सातवे दिवसी अथवा आठवे दिवसी अगर नवे दिवसी तीहीं दिवसांतून एक दिवस जाऊन फुगतील किंवा न फुगतील याची परीक्षा करावी. कलम ४८. कोटससाहेबांची चाल जे ज्याच्या देवी काढल्यास आठ दिवस जाले असतील त्याचे समाचारास जाऊन देवीची परीक्षा करून उत्तम प्रकारच्या देवी असल्या तर त्याजला आपले हातची चीठी द्यावी जे या मुलास देवी फिरून जन्मांत येणार नाहींत व ज्याचा जसा विधी मार्ग देवीचा असेल तैसा करावा म्हणून हुकुम देतात. कलम ४९. देवी कोटससाहेबांचे परीक्षेस न उतरल्या तर फिरून उजवे दंडावर काढतात. कलम ५०.

**गाईच्या देवीच्या गुणांचा तपसील हकीकत सातवी :** गाईच्या देवी उत्पन्न होऊन सोळा वर्षे जालीं. त्या दिवसापासून देशोदेशांत लाखोलाख मुलांस व थोरांस देवी काढल्या याजवरून महान माहान वैद्यानी बुध्धीवंतानी सरी सर्वत्रानी एकच नीश्चय केला जे या देवीचे साहा गूण आहेत. कोणते ऐकावे. प्रथम ज्यावर भावना सांगीतल्याप्र॥ जाल्यास देवी पुन्हा येणार नाहीत. गुण १. कल्स ५१. गाईच्या देवीपासून कोण्ही एक मृत्य पावत नाही व मरणाचा काडीमात्र संशय नाही. गुण २. कल्म ५२. डोळे जात नाही व गुरु होत नाहीत. हात पाय वांकडे होत नाहीत. जसं रूप असेल तसेंच असतें. गुण ३. कलम ५३. आठा दिवसांचे मुलास व गरोदर स्त्रीस व अशक्तास देवी काढविल्या असतां कोणे गोष्टीचें भय नाही. गुण ४. कलम ५४. अशक्ता मुलास देवी काढविल्या असता कोणे वेळेस येखाद्यास पुष्टताही येते. गुण ५. कलम ५५. आपले आपण देवी येतात त्याचे वासाने दुसऱ्यास येतात तैश्या गाईच्या देवी वासाने येत नाहीत. गुण ६. हे साहा गुण देवीच्या गाईमध्यें आहेत. कलम ५६.

**कोणी येक जे ह्मणतात देवी काढुं नयेत त्याचें उत्तर हकीकत आठवी:** कोणी एक ह्मणतात की देवी काढऊं नयेत यद्यपी काढविल्यावर देवी रागे येऊन मुलास उपद्रव होतो. परंतु ह्या देवी काढवील्या असतां काही येक उपद्रव होत नाही. मृत्यलोकी मनुष्यास देवीची पीडा बहूत होती. ह्मणून ईश्वराने कृपा करून गाईच्या देवी निर्माण केल्या. ज्यास ही माहीतगारी असून त्याणे देवी न काढविल्या तर देवीचे उपद्रवाचा दोष त्याचे माथां बसेल. कलम ५७. गाईच्या देवी काढविल्यावर बोलण्याचा विधी जसा ज्याचा असेल तसा त्याणे करावा. कलम ५८. कोणी म्हणतात जे देवीपासून उपद्रव लागल्यास मनुष्याचे स्वाधीन काय आहे. परंतु त्याची चाल जनाविरहीत पडते. दुसरा काही येक रोग लागला तर त्याचे औषधाचा प्रेत्न करतो अथवा व्याघ्राची गांठ पडली तर तेव्हां पळून जाऊन जीवाचें रक्षण करतात. अगर कोणी महा अरण्यांत व वणव्यांत सांपडला असतां ते दृष्टीस पडतांच त्याजला ओढून काढतात. ते वेळेस कोण्ही ईश्वरावर टाकून जात नाही. तैसा हा उपाय ईश्वराने गाईचा खरा दाखविला आहे. याजकरता अनमान न करता हा उपाय करावा. कलम ५९. ही किताब कोटसुसाहेबानी केली जे शेहर पुण्याला व पुण्याचे भोवरगांवांस माहीत होवे जे हा उपाय सर्व काळ जवळ आहे. कलम ६०. आणि जितके मुलूक मराष्ट आहेत त्याणी समजून घ्यावें. कलम ६१. याप्रमाणें गाईच्या देवीची उत्पत्ती व देवी कांढावयाची व फोड फुगावयाची कलमें सांगीतलीं आहेत. त्याजवरुन सर्वा नीवेदन होइल. ज्याला अभ्यास करावयाचा असेल त्याणी कोटसुसाहेबाजवळ महीना दोन महिने राहून विद्या सिकून घ्यावी. ही किताब केली माहे आप्रेल चंद्र १४ सन १८१२ ईंग्रेजी मराष्ट मिती अधीक वैशाख शुध्ध ३ मंगळवार शके १७३४ अंगिरा नाम संवत्सरे. हस्ताक्षर तुको गोपाळ.

---

# शिमगा शब्दाची व्युत्पत्ति

डॉ. कमलाबाई देशपांडे यांनीं 'प्रतिष्ठान' मासिकाच्या गेल्या मार्च महिन्याच्या अंकामध्यें 'देशी नाममालेंत उल्लेखिलेलीं कांहीं व्रतें व उत्सव' या मथाळ्याखालीं एक माहितीपूर्ण लेख लिहिला आहे. त्याचें एक प्रतिमुद्रित त्यांनीं आमच्याकडे अवलोकनार्थ पाठविलें, याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहों.

या लेखांत 'सुगिम्हअम्' या व्रतासंबंधीं त्यांनी पुढील मजकूर लिहिलेला आहे:—

"१) सुगिम्हअम् ।

२) अत्र **सुगिम्हओ** फाल्गुनोत्सव इति सुग्रीष्मक शब्दभवः। दृश्यते च अत्रं संस्कृते । यद्धामहः । सुग्रीष्मके न दृष्ट इति ॥

३) 'सुगिम्हअम्' हा शब्द इतर कोशकारांचे मतें देशी आहे. परंतु हेमचंद्राचे [मतें] तो तद्भव आहे व म्हणून त्यानें त्याचा अंतर्भाव या देशी नाममालेंत केला नाहीं. परंतु टीकेमध्यें त्यानें सांगितलें आहें कीं 'सुगिम्हअम्' हा शब्द संस्कृत 'सुग्रीष्मक' शब्दापासून बनला आहे. सुग्रीष्मक हा फाल्गुन महिन्यांतील एक उत्सव आहे."

आमच्या मतें मराठी सिमगा किंवा शिमगा शब्दाचा उगम 'सुग्रीष्मक' हाच असावा. 'सिमगा' या शब्दाबद्दल गोमंतकी बोलींत **सिगमो** असा शब्द रूढ आहे. त्याचाच पुढें वर्णविपर्यय होऊन सिमगा झाला असावा. संस्कृत–'सुग्रीष्मक' प्राकृत–सुगिम्हअम्, गोमंतकी–सिगमो, व चालू मराठी–सिमगा किंवा शिमगा. रा. दात्यांच्या मराठी शब्द-कोशांमध्यें शिमगा शब्दाची व्युत्पत्ति [सं. शृंगार] अशी दिली आहे. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनीं आपल्या मराठी व्युत्पत्तिकोशामध्यें तीच देऊन [सं. शृंगार?] अशी तिच्यासंबंधीं शंका व्यक्त केली आहे.

हेमचंद्राचा देशीनाममाला हा ग्रंथ आमच्या वाचनांत अनेकदा आला तरी आमचे या शब्दाकडे लक्ष गेलें नव्हतें. वरील व्युत्पत्ति सर्वमान्य झाल्यास तिचें श्रेय श्रीमती कमलाबाई यांना दिलें पाहिजे.

# मराठी वाङ्मयांतील इस्लाम

आजचा विषय जाणत्यांना नवा वाटणारा नाहीं. आठव्या शतकाच्या प्रारंभीं अरबस्तानांतून मुसलमानांनीं भारताच्या पश्चिम सीमेवरील सिंध प्रांतामध्यें आक्रमण केलें. त्यानंतर तीनशें वर्षांनीं तुर्की मुसलमानांच्या धाडी गझनी येथील महमुदाच्या नेतृत्वाखालीं अखंड पंचवीस वर्षे चालू होत्या. या वेळीं सिंधप्रमाणें पंजाबाचा कांहीं भाग मुसलमानी अमलांत गेला. पुनः सुमारें दीडशें वर्षांनीं महम्मद घोरीच्या स्वाऱ्या सुरू होऊन तेराव्या शतकाच्या प्रारंभीं दिल्लीस इस्लामी राज्यस्थापना घडली. येथून पुढें सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत सर्व देशांत त्याचेंच राज्य गाजत होतें. चौदाव्या शतकांत दिल्लीच्या सुलतानांचे हस्तक दक्षिणेस स्थूलमानानें रामेश्वरापर्यंत जाऊन भिडले आणि देवळांची नासधूस व लोकांची लुटालूट करून उत्तरेस परतले. याच शतकांत त्यांचें दक्षिणेंत राज्यहि स्थिरावलें. महाराष्ट्राचा सर्व भाग-वऱ्हाड-खानदेश यासह – त्यांच्या सत्तेखालीं जाऊन तो, शिवाजी महाराजांनीं जिंकलेला कांहीं प्रदेश थोड्याशा कालावधीपुरता सोडल्यास, अठराव्या शतकाच्या आरंभापर्यंत मुसलमानांच्या तावडींत राहिला, हें सर्वांना माहीत आहेच. पुढें मुसलमानांचें वर्चस्व संपलें असें म्हणतां येत नाहीं. कारण वऱ्हाड आणि मराठवाडा या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश निजामशाहीच्या म्हणजे कालपरवांपर्यंतच्या मुस्लिम राज्यांत होता, हें मुद्दाम सांगायला नको.

देशभर मुस्लिम वर्चस्वाचा त्या त्या प्रदेशांतील मूळच्या हिंदु भाषेवर जो परिणाम झाला, तोच महाराष्ट्राच्या भाषेवर व्हावा हें सरळच आहे. या संबंधांतील एक ग्रह असा दिसतो कीं, हा परिणाम लोकांच्या बाह्य व्यवहारापुरताच मर्यादित होता. जनतेच्या समाधानाचें जें पारमार्थिक वाङ्मय त्यामध्यें अरबी-फार्सी शब्द शिरले नाहींत. तें वाङ्मय अगदीं शुद्ध राहिलें. दुसरा ग्रह असा आहे कीं, मुसलमानांच्या वर्चस्वामुळें त्यापूर्वींच्या स्थानिक भाषांचें स्वरूप पालटलें. हा वर्चस्वविषयक ग्रह अंशतः खरा आहे. परंतु एखाद्या भाषेंत नवे शब्द शिरणें, जुने शब्द लोपणें किंवा जुन्यानव्या शब्दांचीं रूपें बदलणें हा प्रकार कोणी कोणावर हुकमत गाजविण्याचा प्रसंग नसतांहि सदैव चालू असतो, हें लक्षांत ठेवणें बरें. हें लक्षांत येण्याकरितां इ. सनापूर्वींच्या दोन हजार वर्षांपलीकडे संचार केल्यास जो अनुभव येतो, त्याची ओळख करून घेण्याला हरकत नाहीं.

खाल्डिया, अकेडिया, असीरिया हे आशिया खंडांतील प्राचीन देश सुमारें शंभर वर्षें इतिहासाच्या परिचयाचे झालेले आहेत. या देशांचें वाङ्मय सुदैवानें उपलब्ध असून त्याच्या योगानें आमच्या वेदवाङ्मयांतील कांहीं शब्दांचीं कोडीं उलगडतात, असा विद्वानांचा विश्वास दृष्टीस पडतो. १९१६ सालीं प. वा. डॉ.

रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या सन्मानार्थ प्रसिद्ध झालेल्या निबंधसंग्रहांत कै. लो. टिळकांचा 'खाल्डियन आणि भारतीय वेद' या नांवाचा एक लेख आहे. त्यामध्यें त्यांनीं ऋग्वेदांत आणि अथर्ववेदांत येणाऱ्या कांहीं चमत्कारिक शब्दांचा संबंध खाल्डियन वाङ्मयाशीं पोंचतो, असें निदर्शनास आणलें आहे मराठींत व कानडींत मण (४० शेरांचा) हा शब्द रूढ आहे. हा शब्द खाल्डियांतून आलेला. तेथील उच्चार 'मना' असा आहे. खाल्डियांत भारतांतून अतिशय मऊ तलम कापड जात असे. त्याला तिकडे सिंधु म्हणत. कापडाबरोबरच त्याच्या नांवाचा भारतीय शब्द जसाच्या तसा खाल्डियन लोकांनीं स्वीकारला. इ. स. पूर्व १४०० वर्षांच्या सुमारास हिटाइट व मिटानी या दोन जमातींमध्यें एक तह झाला. तहनाम्यांत दोन्ही पक्षांनीं आपापल्या देवतांचीं नांवें नोंदलीं आहेत. मिटानीच्या देवतांमध्यें मित्र, वरुण, इंद्र, नासत्य ( अश्विनीकुमार ) यांचा उल्लेख सांपडतो.

अथर्ववेदाच्या कांहीं मंत्रांतून तैमात, अपोदक, आलिगी, बिलिगी, ताबुवं, ताबुवेन, उरुगल, किंदिम, अप्सु, सिनोवाली, तुर्फरितु असे शब्द असून यांतले कांहीं ऋग्वेदांतहि आढळतात. टिळकांनीं म्हटलें आहे कीं, या शब्दांचा परकेपणा ते डोळ्यावर अथवा कानावर येतांच सुचणारा आहे. ज्या मंत्रांत आलिगी, बिलिगी ताबुवं, उरेगल इत्यादि शब्द आहेत, त्याचा उपयोग सापाचें विष उतरण्यासाठीं करीत असत. खाल्डियन लोक भूताखेतांचे उपासक व जादूटोण्याचे भक्त होते. यामुळें अंगारे-धुपारे, विषाचे उतारे यांची विद्या खाल्डियन लोकांच्या संसर्गानें वैदिकांनीं घेतली असण्याचा संभव नाकारतां येत नाहीं. खाल्डियन वाङ्मयांत तिआमत, अब्झू, उरुगल हे शब्द सांपडतात. बिल-बिलगी या नांवाची त्यांच्या वाङ्मयांत एक देवता आहे. अथर्ववेदांतील आलिगि बिलिगि यांचें जनकत्व बिल-बिलगी यांकडे देतां येईल. एकिम्मु व दिम्मे या दोन खाल्डियन शब्दांपासून भुतांचा वाचक किंदिम हा शब्द वेदांत घुसला असावा, असाहि टिळकांचा एक तर्क त्यांच्या लेखांत दाखल आहे. तिआमत, अब्झु हे शब्द ज्या कथानकांत योजले आहेत तें कथानक वेदांतील इंद्र-वृत्रांच्या युद्धाशीं जुळणारे असून त्या अनुरोधानें वैदिक तैमात, अप्सु, अपोदक इत्यादि शब्दांचा खुलासा होऊं शकतो, असेंहि टिळकांनीं दाखविलें आहे. याच क्रमांत त्यांनीं 'उर्वशी' या अप्सरेच्या नांवाचें निराळें स्पष्टीकरण केलें आहे.

अलीकडे 'इंडियन हिस्टॉरिकल कार्टर्ली'च्या एका अंकांत (सप्टेंबर १९५३) 'जैन वाङ्मयांतील परदेशी अंश' अशा अर्थाचा एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यांत शतपथ ब्राह्मण आणि व्याकरणाचें पातंजल महाभाष्य यांत असुरांच्या 'हेलयो हेलयो' शब्दांचा विचार केलेला आहे. युद्धांत 'हेलयो हेलयो' हा शब्द असुर उच्चारतात, या विधानाच्या लेखकानें केलेल्या स्पष्टीकरणांत तो असीरियांतील देववाचक 'इलु' शब्दाचा दर्शक असावा, असें मत सादर केलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ९५२०४ वि: ...
क्रमांक १९२० नों दि: ...

आहे. 'हेलय'चें 'हैलो' हें रूप जैनांच्या मंत्रतंत्रांत शिरलें असा लेखकाचा आणखी एक दावा आहे. टिळकांनीं आपल्या लेखांत हिब्रूंच्या जुहोवा (देव) याच्याशीं उच्चारांत व अर्थांत साम्य असलेले खाल्डियांतील 'यव्हे' आणि ऋग्वेदांतील यहु, यह्व, यह्वत हे शब्द नमूद केले आहेत. य चा ज होतो, त्याप्रमाणें य चें ज हें हिब्रू रूपांतर समजावें.

वैदिक मंत्रांसारख्या अतिपवित्र वाङ्मयांत परदेशी शब्द असल्याचें ज्ञान आपल्या पूर्वजांना होतें. अथर्ववेदाबद्दलचा दुजा भाव हा त्याचा पुरावा असून दुसरा पुरावा जैमिनीच्या मीमांसासूत्रांचा आहे. अथर्ववेदाला जें गौणत्व आलें, तें त्यांतील जादूटोणा आणि त्यासाठीं परदेशी शब्दांचा अंगीकार यामुळें आलें असावें, असें टिळकांनीं सुचविलें आहे. परंतु परदेशी शब्दांचा स्वीकार हा एकट्या अथर्ववेदाचा दोष नसून ऋग्वेदादि इतर वेदहि त्या दोषापासून मुक्त नाहींत, तरी त्यांतील मंत्रांचा उपयोग करण्याचा प्रत्यहीं प्रसंग येतो. यावर जैमिनीच्या 'म्लेच्छप्रसिद्धार्थ-प्रामाण्याधिकरण' सूत्रांत असे शब्द त्याज्य मानूं नयेत, ही तोड सांगितली आहे. तामरस, पिक असे कांहीं शब्द तेथें दाखविले आहेत. 'पदरीं पडलें पवित्र झालें' या न्यायाची जैमिनीची तोड आहे.

दोन भाषा शेजारी असल्या कीं, त्या आपसांत शब्दांची देवघेव करतात, हा प्रकार साहजिक आहे. या देवघेवीमागें बलात्कार नसतो हें गळीं उतरण्यासाठीं येथवर प्रस्तावना केली. हा प्रकार सर्वत्र निरंतर चाललेला आहे. वेदकाळानंतर तो थांबला, असें समजूं नये. मुसलमानांचें राजकीय वर्चस्व अस्तित्वांत येण्यापूर्वीं या देवाणघेवाणीला खंड नव्हता, असें सिद्ध करणें कठिण नाहीं. परंतु तूर्त आपल्याला मराठी वाङ्मयांतील इस्लामचें प्रभुत्व पहावयाचें असल्यानें त्यापूर्वींचें शब्दांचें आदान-प्रदान सोडून देणें अवश्य आहे. तथापि एका ऐतिहासिक घटनेकडे लक्ष वेधण्या-खेरीज गत्यंतर नाहीं. भारतावर पहिलें आक्रमण जें झालें तें इस्लामी धर्माच्या लोकांचें, त्यापूर्वीं परक्यांच्या वर्चस्वाचा या भूमीला मुळींच स्पर्श झाला नव्हता, ही कल्पना भ्रामक आहे. ग्रीक, हूण, शक यांचे आपल्या देशावर हल्ले होऊन त्यांचें कित्येक शतकें उत्तर भारताच्या कांहीं भागावर राज्य राहिलें, याचें ज्ञान लोकांच्या बुद्धीमध्यें विशेष जागृत नसल्यानें मुसलमानांचें आक्रमण पहिलें, असें सामान्यतः मनांत येतें. भारतीयांनीं परदेशांत राजकीय प्रभुत्व गाजविल्याचा इतिहास नाहीं. पण परदेशांकडे त्यांचें लक्षच नव्हतें, या समजुतीच्या विरुद्ध पूर्वदिशेच्या भूभागांतील भारतीय अवशेष हल्लीं उपलब्ध आहेत. पूर्वप्रमाणें उत्तर-पश्चिम दिशांकडे भारतीयांचें जाणें-येणें असल्याचे पुरावे सांपडले आहेत. चिनी तर्कीस्तानांत एक युरोपिन संशोधक गेला असतां त्याला तेथें लाकूड, कापड व कागद यांवर खरोष्ट्री लिपींतील शेंकडों लेख सांपडले. या लेखांची भाषा भ्रष्ट संस्कृत आहे. इ. सनाचें दुसरें ते चौथें शतक एवढ्या कालावधींतील हे लेख आहेत. त्यांवरून

स्त्रिया, दास ( गुलाम ) यांच्या संबंधाचा व्यवहार कसा होता, याविषयीं पुष्कळच मनोरंजक माहिती काढतां येते. मौजेखातर त्या भाषेंतील कित्येक शब्दांचे आणि वाक्यांचे मासले सादर केल्यास योग्य होईल.

स्त्रीबद्दल त्या खरोष्ठी लेखांत स्त्रि हाच शब्द आहे. वेसि स्त्रि म्ह० वेश्या. खखोर्निस्त्रि याचें संस्कृत काखोर्द शब्दाशीं साम्य असून त्याचा अर्थ 'चेटकीण' असा होतो. कुडि-डी=मुलगी हा शब्द पंजाबी भाषेंत अद्यापि रूढ आहे. भर्य = भार्या, स्वसु=स्वसृ=बहीण, मतु = मातृ. महुलि = महिला-मातुली, दज्झि=दासी. स्वामित्वा-दाखल एश्वर्य हा शब्द आढळतो. ईश म्ह० स्वामी यापासून ऐश्वर्य शब्द निष्पन्न होतो. चिनी तर्कीस्तानांत 'एश्वर्य' असें त्याचें रूप होतें. दत्तक घेतलेल्या मुली-निमित्त विकणें, गहाण ठेवणें, किंवा नव्या घरांतून परत नेणें या कृत्यांना प्रतिबंध होता; त्याचें वाक्य-'स कुडि न विक्रीनदवो न बवोथविदवो नेवि गोठदे दुर निखिलदवो नेवि गोठमि उपेड कर्तवो.' स्त्रियांच्या खानेसुमारीचें वाक्य असेंच उद्बोधक आहे, 'संवत्सरे २३ मसे षोधंम दिवसे ६ पेन अवनिचिय स्त्रियन पचेय.' बायकांच्या कांचोळीदाखल 'कंचुलि' हा शब्द तेथें दृष्टीस पडतो.

दास शब्दाचा उच्चार दस किंवा दज्झ. दासजन= दज्झ जमन, मालक–भटारग, सं० भट्टारक. वेतन घेऊन काम करणारासाठीं 'परिक्रय'. अन्नवस्त्रांवर काम करणारे=भत चोलग, पाठीवर ओझें वहाणारे 'पृष्ठभारिगे'. पृष्ठभारकाः असें संस्कृता-मध्यें म्हणतां येईल. दासांना मरेपर्यंत चोपण्याला सवलत होती-'तेन तडितगेन से मनुश कचन अठम दिवस मृद'. (ताडन पावलेला कोणी एक मनुष्य आठव्या दिवशीं मेला. असा अर्थ या वाक्याचे शब्द सुचवितात.)

चिनी तर्कीस्तानांत संस्कृत भाषेचा तोंडावळा असलेल्या दुसऱ्या ते चौथ्या इ. सनांतील भाषेवरून आणखी पश्चिमेकडे वळल्यास इतिहास असें सांगतो कीं, भारतीय भिक्षु किंवा संन्यासी योगी आठव्या-नवव्या शतकांत बगदादपर्यंत जात असत, तिकडे राहत असत. तिकडील विद्वानांशीं ज्ञानाची चर्चा करीत असत. होरा व राशी आम्हीं ग्रीकांकडून घेतल्या; कालगणनेंतील 'शक' शब्द मुळांत आमचा नसून परक्यांचा आहे. हीं उदाहरणें भाषेच्या प्राचीन देवघेवीचीं सूचक आहेत. जी फार्सी भाषा आपण आज मुसलमानांची समजतों, ती इराणला इस्लामची दीक्षा मिळण्यापूर्वीं प्रौढावस्थेला पोंचलेली होती. त्या भाषेंत आपल्या इकडील पारशी झेंदावेस्ता ग्रंथाच्या भाषेंत आणि संस्कृत भाषेंत सादृश्य असल्याची गोष्ट परिचयाची आहे. फार्सी भाषेचें पहिलें नांव पेहलवी होतें. इस्लामच्या दीक्षेनंतर त्या भाषेंत अरबी, हिब्रू शब्द घुसले. लिपींतहि अंतर पडलें. परंतु आजच्या फार्सी भाषेचें व संस्कृताचें जें साम्य मनांत भरतें तें अगदींच किरकोळ नाहीं. एका मुसलमान विद्वानाचें तर असें मत आहे कीं, मनूनें ज्यांना पह्लव ही संज्ञा लावून भ्रष्ट क्षत्रियांत ढकललें, जे व्रात्य क्षत्रिय किंवा वृषल, ते प्राकृत भाषांचे पुरस्कर्ते होते. भारतामधून

इराणांत गेल्यावर त्यांची भाषा आजच्या फार्सीचें प्रौढ स्थित्यंतर पावली. हा वृत्तान्त कितपत खरा, याची चौकशी न करतां केवळ दोन्ही भाषांतील कांहीं शब्दांचीं दर्शनी रूपें ताडून पाहिल्यास आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. पितृ पितर–फार्सी पिदर, मातृ मातर्–मादर, भ्रातृ भ्रातर्–बिरादर, दुहितृ दुहितर–दुख्तर या सादृश्यांची वाच्यता पुष्कळदां झालेली आहे किंवा होत असते. परंतु गोमूध–गलुम, बाहु–बाजू, क्षपा–शब, घर्म ( उकाडा किंवा उष्णता )–गर्म, चक्र–चर्क, चत्वार–चहार, नव–नौ, दश–दह, सप्त–हप्त, पंच–पंज, हर्म्य ( अंतःपुर )–हरम, शत–सद, अश्व–अस्प, जामातृ–दामाद, गो–गाव, अभ्र–अब्र, पृष्ठ–पुश्त, आपत्–आफत, आप–आब, शृगाल–शगाल, जलौका–जलूक, मेघ–मेग, वर्षार्तु–बरसात, क्षीर–शीर, शर्करा–शकर, म० साखर ( हा शब्द रशियांतहि पोंचला आहे ). सायं–शाम या शब्दांनीं सादृश्य जास्त स्पष्ट होतें. नामवाचकाप्रमाणेंच कित्येक क्रियावाचक शब्दांचें साम्य पहायला सांपडतें. उदा०–गदति–गोयद, करोति–कुर्द, क्रीत–खरीद, शृणोमि–शुनवद, शृणोति–शिनुद, मर्दति–मलद. एवढे शब्द पुरेसे आहेत. चिनी तर्कीस्तानांतील संस्कृत इराणकडे गेल्याचा तर्क मान्य होऊं शकल्यास प्राचीन भारतीय भाषेचे फार्सीवरील उपकार कबूल करावे लागतील. इराणी लोकांची मूळची लिपि अरबी लिपीसारखीच असल्यानें थोड्या फरकानें ती लिपि ज्याप्रमाणें इराणी लोकांनीं आपलीशी केली, त्याप्रमाणें भारतांत मुसलमानांमुळें फार्सी भाषेचा राज्यकर्त्यांची भाषा या नात्यानें प्रादुर्भाव झाल्यानंतर इकडील जनतेला पुष्कळसे शब्द आपलेच किंवा अगदीं जवळचे असेंहि वाटलें असेल.

परक्यांच्या राज्याबरोबर त्यांची भाषा प्रचारांत येणें अत्यंत स्वाभाविक आहे. मुसलमान राज्यकर्त्यांनीं येथील हिंदु जनतेला आपली भाषा इंग्रजांप्रमाणें शिकविण्याची व्यवस्था अमलांत आणली नव्हती. पण राज्याच्या निरनिराळ्या व्यवहाराशीं दर दिवशीं सारखा संबंध आल्यानें हिंदु प्रजेमध्यें मुसलमानांच्या राज्यकाळीं शेंकडों शब्दांचा वापर होऊं लागला. कोणत्या व्यवहाराचे शब्द हिंदूंनीं घेतले, याचा विचार केल्यास प्रामुख्यानें सुलतानांचा दरबार, लष्कर, न्याय आणि शेतकी या चार बाबतींत हिंदूंना अरबी-फार्सी शब्द पत्करणें भाग पडलें असें दिसून येईल. हे व्यवहार लोकांच्या जीवनांत घट्ट गुंतलेले होते. मुसलमानी राज्याच्या सुरुवातीपासून थोड्याफार प्रमाणांत हिंदूंवर शिपाईगिरीचा प्रसंग आला. शेतकी हें तर त्यांच्या निर्वाहाचें मुख्य साधन होतें. शेतसारावसुलीचें काम त्यांच्याकडेच राहिलें. शिपाईगिरीच्या निमित्तानें हिंदूंना मुसलमानी दरबारांतील मानकऱ्यांचेंहि स्थान मिळत गेलें. परिणामीं या कामगिरीचे बहुतेक सारे शब्द हिंदूंनीं उचलले. घरीं-दारीं ह्या शब्दांचा उपयोग चालतां चालतां घराच्या, देवळाच्या किंवा मठाच्या एकान्तामध्यें रचल्या जाणाऱ्या धर्मपर वाङ्मयांत त्या शब्दांना स्थान मिळालें. शुद्ध परमार्थाचे विचार लोकांना समजावून देतांना योजले जाणारे दृष्टान्त चिरपरिचित व्यवहारांतले

असल्यानें ते सांगतांना मुसलमानी शब्द टाळणें अशक्य व्हावें, यांत नवल नाहीं. प्रस्तुत विवेचनाचा इत्यर्थ हा कीं, परमार्थाचें वाङ्मय वाटतें तसें मुसलमानी भाषेच्या प्रभावापासून अलिप्त राहिलें नाहीं आणि यासाठींच या विषयाला 'मराठी वाङ्मयांतील इस्लाम' असें नांव दिलें आहे. या नांवांत दोन दुरुस्त्या केल्या कीं विषय जास्त स्पष्ट होईल. प्रारंभीं 'जुन्या' हा शब्द व 'मराठी'पुढें 'पारमार्थिक' हा शब्द घातल्यानें विषयाच्या कल्पनेंत संदिग्धपणा राहत नाहीं.

महाराष्ट्राला मुसलमानांची ओळख अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीपूर्वीं कितीतरी शतकांपासून झालेली होती. जे अरब एकदां व्यापाराकरितां भारताच्या पश्चिम समुद्रतीराच्या प्रदेशांत वसाहती करून राहत होते किंवा अरबस्तान ते हिंदुस्तान आवजाव करीत होते, तेच मुसलमान या नांवानें सातव्या शतकांत ओळखले जाऊं लागले. जोंवर नव्या महमदी धर्माची दीक्षा व त्या धर्माच्या प्रसाराची दुर्दम्य स्फूर्ति त्यांना मिळालेली नव्हती तोंवर त्यांनीं धर्माभिमानाचा उपद्रव माजविला नाहीं. ६३७ मध्यें त्यांनीं ठाण्याच्या समुद्रांतून पहिली धाड घातली. ती फोल ठरल्यावर आठव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत त्यांचा मोर्चा इकडे वळला नाहीं. तेव्हां त्याच्या स्वारीची विजयी लाट सिंधमध्यें येऊन धडकली व तेव्हांपासून त्यांच्या झटापटी चालू झाल्या. महाराष्ट्रीयांना त्यांचा सामना करावा लागल्याचीं ऐतिहासिक प्रमाणें आहेत. सामान्यतः त्यांच्या राजकीय दृष्टया कटकटी महाराष्ट्राच्या अंतरंगांत तेराव्या शतकापर्यंत उत्पन्न झाल्या नाहींत म्हणून मुसलमान लोक तोंवर आम्हांला माहीत नव्हते, हा समज खरा नाहीं. त्यांचें राज्य येथें उदयास आल्यावर त्यांच्या भाषेचा येथील भाषांवर पगडा बसला आणि क्रमानें तो वाढत गेला, ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. पण त्यापूर्वीं मराठी भाषा निर्मळ नव्हती. तिच्यांत कानडी भाषेचे शब्द भर टाकीत होते. शेजार व एकमेकांवर राजकीय वर्चस्वासाठीं कुरघोडी करण्याचा कित्येक शतकें चाललेला प्रयत्न ही कानडी शब्दांच्या भरण्याचीं कारणें आहेत. मराठी भाषा मुसलमानांच्या राजकीय वर्चस्वापूर्वींसुद्धां इतर भाषांच्या संसर्गाबाहेर नव्हती, हें यावरून ध्यानांत येईल.

ज्ञानेश्वरींत कांहीं शब्द फार्सीच्या ढंगाचे आहेत. त्यांच्या नांवावरील एका अभंगांत 'बाजार' हा शब्द दृष्टीस पडतो. तो प्रक्षिप्त मानल्यास नामदेवाच्या नांवानें खपणाऱ्या वाङ्मयांत फार्सीचा संपर्क जास्त आढळतो. नामदेवांच्या देहावसानापूर्वीं महाराष्ट्र-कर्नाटक भागांत इस्लामी राज्यानें मूळ धरलें होतें. नामदेवांच्या नांवावर हिंदी कविता सांपडते. मराठी संतांनीं व पुष्कळशा कवींनीं हिंदी भाषेचा आपल्या शिकवणीच्या फैलावासाठीं आदर केला, ही गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवण्याजोगी आहे. आमच्यावर चालू काळांत हिंदी लादूं पहाणारांसाठीं हा उल्लेख केला आहे. महाराष्ट्राची हिंदी ही 'अवधी' किंवा 'व्रज' नसून अरबी-फार्सीच्या मिश्रणाची आहे. ज्या भाषेनें पुढें उर्दू हें नांव धारण केलें, त्या भाषेचा उगम

दक्षिणेंत झाल्याचें वृत्त जाणत्यांना सांगायला नको. महाराष्ट्रानें संतांच्या व कवींच्या द्वारें तिला हातभार लावला. जे हिंदीमध्यें काव्य रचीत त्यांच्या मराठींत फार्सी शब्द दिसावे, याचें आश्चर्य वाटायला नको. नामदेवामागें तीनशें वर्षें ग्रामधुर्मींत गेलीं व नंतर एकनाथांनीं मराठीला सावरून उचललें. एकनाथांच्या भाषेंत फार्सी-अरबी शब्द जास्त प्रमाणामध्यें सांपडतात. एकनाथ सोळाव्या शतकांतले. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य स्थापलें. परदेशी शब्द राज्य-व्यवहारांतून हाकलण्याकरितां राज्यव्यवहार-कोश निर्माण केला. या कोशाचें अधिक संशोधन करण्याची आवश्यकता आहे. ह्या कोशाचा कर्ता ज्यांना परदेशी समजतो, त्यांतले कांहीं शब्द हेमचंद्राच्या 'देशी नाममाला' कोशाप्रमाणें देशी आहेत. हेमचंद्राचे कांहीं देशी शब्द अर्वाचीन संशोधकांनीं परदेशी ठरविले आहेत. राज्यव्यहारकोशाच्या संदर्भात देशी नाममालेचा निर्देश केला. शिवछत्रपतींचा कोशाचा संदर्भ, ज्या काळांतील पारमार्थिक वाङ्मयाची पहाणी करावयाची आहे त्या काळाच्या बोधासाठीं आणला.

इ. स. १६५० नंतरचा शिवकाल समजला जातो. त्या काळांत रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर, वामन, श्रीधर, रघुनाथ पंडित, नागेश, विठ्ठल, अमृतराय इत्यादि संत व कवि होऊन गेले. यांच्या वाङ्मयांत कुठें कुठें किती प्रमाणामध्यें फार्सी-अरबी भाषेचा प्रभाव दृष्टीस पडतो, इकडे वळण्यापूर्वीं चौदाव्या शतकांतील सेना (न्हावी), चोखा आणि सांवता यांनीं आपल्या वाङ्मयरचनेंत व्यवसायपरत्वें फार्सी-अरबी शब्दांचा वापर केला आहे, हें सांगणें अवश्य आहे. सेनानें बारीक हजामतीचें जें परमार्थिक रूपक लिहिलें त्यांत हजामत, बारीक, आयना (आरसा), बगला हे शब्द घेतले आहेत. संत चोखोबांनीं एका अभंगांत करार, फकीर हे शब्द स्वीकारून वस्तूचें बहिरंग नीट नाहीं म्हणून अंतरंग वाईट लेखूं नये, अशा अर्थाच्या अभंगांत धनुष्यबाणाऐवजीं तीरकमान या शब्दांचा उपयोग केला आहे. कमान-धनुष्य वांकडें असतें पण तीर सरळ असतो, असें त्यांनीं म्हटलें आहे. सांवता माळी दैवाची अस्थिरता स्पष्ट करतांना एके ठिकाणीं म्हणतात—

"कोणे दिवशीं पालखी **सुभेदार** । कोणे दिवशीं पायाचा **चाकर** ॥"

यांत, सुभेदार व चाकर हे दोन्ही शब्द परदेशी आहेत. चाकर हा शब्द हल्लीं इतका अंगवळणीं पडला आहे कीं, तो परदेशी आहे, हें मुद्दाम सांगितल्याशिवाय कळणार नाहीं.

शहर, बाजार, दुकान, खावंद, मालक, कौल, जकात, माल, हमाल, नादान, फजीती, फजीतखोर, हरामखोर, दगा, धोका, शरम, बेशरम, इनाम, मिरास, मजूर, मजूरी, मुशारा, शिक्का, रोखा, हजार, जुलूम, मुलामा, बाकी, दावा, दावेदार, गुलाम, हवाला, तलब, जाब, हिंमत, कसाब, सिले (हत्यार), तराजू, हुशार,

अर्जदास्त, जमाखर्च, गुमान, तोरा, ग्वाही, हुद्देदार, कागद, मदार ( ठेवणें, भार टाकणें ), मजालस, दिवाळखोर, पहिलवान ( मल्ल ), गनीम ( शत्रु ), बंद, बेबंद, ताबा, खबर्दार ( सावध ), गफलत, खासा, नाजूक, गरज, हिशेब, कितेब, न्याहाल ( गादी व कृपा ), तगादा, मुलूख, जिन्नस ; जर ( सोनें ), गर्द ( धूळ ), मेवा ( नजराणा किंवा फळें ), जव्हेरी, तमाशा, सुस्त, वगैरे किती तरी शब्द तुकाराम-रामदासांच्या वाङ्मयांत आलेले आहेत. रामदासांच्या रामायणांतून व स्फुट प्रकरणांतून यांतले बरेच शब्द निवडले आहेत. रामदासांच्या लघुकाव्यांत उजेडाच्या तऱ्हा सांगतांना मोम्बत्त्या ( मेणबत्त्या ), हिलाल, खंदील हीं उजेडाचीं साधनें नोंदलीं आहेत. यांतील प्रत्येक शब्द परदेशी आहे. कंदिलाचा एक प्रकार जो फाणस तोहि भारतीय नव्हे. वाद्यांत नगारे, दमामे, सारंगा, रबाब यांचा उल्लेख रामदास करतात. हीं वाद्यें परक्यांचीं. वाद्यांतलें अलगुज हें देखील परकेंच. एका महंताची आत्मश्लाघा रामदासांनीं पुढीलप्रमाणें वर्णिली आहेः—

माझा होता आजा गुरु। **करामती** पुरुष थोरु
म्हणे माझा **साहेब** थोर। तसेच साहेबाचा परिवार देखील थोर.

यांतले करामत व साहेब हे दोन्ही शब्द मुसलमानांचे. पोर्तुगीजांच्या संसर्गामुळें तंबाकू, साबण हे शब्द आम्हीं घेतले. हे शब्द रामदास-तुकारामांच्या वाङ्मयांत आहेत.

भाषा ही माणसांच्या आचारविचारांची अर्थात् संस्कृतीची दर्शक असल्यानें मागें जे शब्द सादर केले, ते सतराव्या शतकांत महाराष्ट्रीयांच्या ठिकाणीं कसें अंतर्बाह्य परिवर्तन झालें होतें, याची कल्पना आणून देतात. शुद्ध परमार्थ असो, त्याची जोपासना करणाऱ्या देवादिकांच्या कथा-प्रार्थना असोत किंवा सुभाषितप्राय म्हणी असोत; बायकांचीं गाणीं असोत – या परिवर्तनाच्या छटा या वाङ्मयाच्या कोन्याकोपऱ्यांत उमटलेल्या दिसतात. रुक्मिणीहरणाची पहिली कथा नरेंद्रानें रचली; त्या रचनेचा काळ शके १२१० – सन १२८८ – मानल्यास त्या वेळीं मुसलमानांचा परिचय त्या कथेंत घुसल्याचा अनुभव येतो. रुक्मिणीच्या प्राप्तीसाठीं धडपडणाऱ्या उमेदवारांत म्लेंछ-तुर्कांचा निर्देश पाहिला कीं, हिंदूंच्या मनःस्थितीबद्दल काय म्हणावें हेंच समजत नाहीं. पण याचें आश्चर्य वाटायला नको. या काळांतील संस्कृत भाषेचे लेखक हिंदूंच्या देव-देवतांचा विध्वंस करणाऱ्या मुसलमान सुलतानांना जर सुरत्राण ( देवांचा रक्षक ) या शब्दानें गौरवीत होते, तर रुक्मिणीसाठीं आसावलेल्या नवरदेवांत म्लेंछ-तुर्कांची वरणी नरेंद्रानें लावल्यास त्यांत चमत्कार नाहीं. १२८८ नंतर महाराष्ट्रांत लवकरच इस्लामचें प्राबल्य झाल्यामुळें सतराव्या शतकामध्यें पुष्कळशा बाबतींत इकडील हिंदु मुसलमान बनले. या शतकांत विठ्ठल बीडकर आणि नागेश या दोघांनीं सीता-स्वयंवरावर आपलें कवित्व चालविलें. नागेशानें नगारे, दमामे,

दरवाजे, नौबती, बाजूबंद, सिरताज, वांकदार समशेर या वस्तु आणि बादाम, मेवा, खिसमिस, खर्बूज, तर्बूज, अंजीर हीं फळें नमूद केलीं आहेत.

रामाघरच्या घोड्याबद्दल नागेश म्हणतो—

अरब्बी बदक्षान ताजी तुरकी
रुमी पर्वती घुट्ट कच्छी इराकी
फिरंगी तथा येंबियें दक्ष माहा
असे राघवाचे घरीं अश्व पाहा.

यांतले पर्वती घुट्ट कच्छी यांखेरीज बाकीचे सारे परदेशी आहेत. नागेशानें एका ठिकाणीं इस्लामी पुराणांतील हुमा नांवाच्या पक्ष्यांहून रामाच्या घोड्याचा वेग अधिक होता, अशीहि प्रशंसा गाइली आहे.

विठ्ठलाच्या सीतास्वयंवरांत ताम्रमुख, शाम, हबशी, फिरंगी, खुरासानी (राजे), म्लेंच्छ, पठाण याप्रमाणें जमलेल्या राजांचा उल्लेख असून घोड्याच्या यादींत नागेशाचे घोडे सांपडतात. विठ्ठलानें आपल्या घोड्यांच्या पाठीवर 'मुक्तेमांडित पाखरा मखमली' घातल्या असून **शिरताज**हि चढविला आहे. घोडयाच्या तोंडीं रत्नाचे रत्न खलीन याप्रमाणें संस्कृत शब्दांचे (लगाम) पदार्थ देणारा विठ्ठल दुसऱ्याच क्षणीं (**जीन** वरुते दोहीकडे **तंगले**) त्या घोडयांची शोभा फ़ार्सी शब्दांनीं वाढवितो, हें कौतुक नजरेआड करण्यासारखें नाहीं. मग त्यानें 'हस्ती **मस्त**, **दुरस्त** डुल्लत उभे' असें वर्णन करावें हें क्रमप्राप्तच आहे.

या कवीच्या रुक्मिणीस्वयंवरांत सराफ, फौज, लगाम, दुकान असले शब्द वापरून दारूच्या उपयोगाची विशेष मौज केली आहे. एक दारू भुईनळे-चंद्रज्योतींची व दुसरी तोफा-बंदुकांची. पहिली दारू निरुपद्रवी म्हणून तिचे गुण विठ्ठल बिनचूक सांगूं शकला. दुसऱ्या प्रकारच्या दारूची त्याला माहिती असावी, पण प्रत्यक्ष लढाईच्या प्रसंगाचा अनुभव नसल्यानें तो अस्त्रांच्या धडाक्यांत मध्येंच कुठेंतरी तोफांचा भडिमार झाल्याचा उल्लेख आणतोः—

झालासे भडिमार उद्भट बृहद्यंत्राग्निधूमें दशा
बृहद्यंत्रीं **दारू**भरण भरिजो सावधपणें
शस्त्रास्त्रें बाण **दारू** लखलखीत

या विधानांचा परिणाम त्याला सांगतां आला नाहीं. तोफांचा खूप मोठा आवाज असतो, त्यांतून खूपसा धूर बाहेर पडतो, एवढेंच जर ऐकून ठाऊक असेल तर त्याचा इलाज काय? पण तोफांवांचून कृष्णानें प्रतिपक्षांशीं केलेल्या लढाईची सांगता नाहीं, हें जाणून त्यानें तोफांऐवजीं बृहद्यंत्रें उभीं केलीं, दारूभरण साधलें व 'यंत्राचे भडिमार होति समरीं' या मोघम वाक्यानें त्या युद्धांत उणीव न राहूं

देण्याचा यत्न शेवटास केला. लढाईची दारू व हत्यारें तेव्हां परिचित होतीं. या ज्ञानाचा लाभ त्यानें आपल्याला दिला हे त्याचे खरे उपकार आहेत. समर्थांनीं लग्नें व यात्रा हीं कार्यें '**दारूनें** शोभतीं' असें दासबोधांत म्हटलें आहे व दारूकामाचें जास्त वर्णन एका यात्राविषयक पदांत केलें आहे. एकनाथांनीं रामकृष्णाच्या विवाहप्रसंगांत आपल्या आतषबाजीच्या ज्ञानाचा उपयोग केला आहे. मुसलमानांच्या संगतीनें हिंदूंच्या धार्मिक व्यवहारांत दारूचा खेळ नव्यानें शिरून अंगवळणीं पडल्याचें हें उदाहरण आहे.

विठ्ठलकवीच्या महाबळभटाख्यानांत त्या भटाचें गोकुळांत प्रस्थ वाढलें यासाठीं '**तोरा**', त्याच्या बढाईनें इतर ब्राह्मणांना जो अभिमान उत्पन्न झाला त्याकरितां '**गुमान**', त्याच्या लेखनसाहित्यानिमित्त '**जुगदान**' याप्रमाणें शब्द आले आहेत. कृष्णानें भटाचें कपट ओळखून त्याला निर्जीव पदार्थांच्या द्वारें चोपायला सुरुवात केली. त्या वेळीं भटजीनें 'अजि सुकुमारा नंदकुमारा, मारा **मना** करावा जी' अशी प्रार्थना आरंभली व 'नारायण मारा त्यासी **मना** करी' हें प्रार्थनेचें फळ भटाला मिळालें.

सदर कवीच्या सीतास्वयंवरांतील उमेदवार राजे दंग झाले होते, त्यांची माहिती सीतेला सांगतांना तिची सखी ज्याच्या हातांत '**बारीक दुतारी दस्तर**' आहे तो राजा पसंत आहे का, असा प्रश्न विचारते. सीता नापसंती दर्शविते. या माहितीमधील बारीक, दुतारी व दस्तर हे तिन्ही शब्द फार्सी आहेत. श्रीकृष्णाच्या गोरसक्रीडेंत

दधी**रातिबे** बाळका वेध लावी<br>
चुके दाम गौळी प्रभूच्या **करारा**

असे चरण आहेत. यांतील रातिब=रतीब आणि करार हे शब्द भारतीय नव्हत, हें जाणत्यांना सांगायला नको.

आनंदतनयानें 'शिबी' राजाचें आख्यान लिहिलें आहे. शिबीच्या आश्रयाला एक कबूतर आलें. त्याच्या पाठीस ससाणा लागला होता. कबूतरानें 'दीन **गरिबाचें** काज। करील कोण तुजविना' असें विनवलें. इतक्यांत **दारू** यंत्राचा बाण जसा वेगानें येतो तसा ससाणा आला. राजाशीं संवादांत 'मंद तूंच कीं **फंद** भासतो' असें एक वाक्य आहे. निराश होऊन ससाणा उठला. कवि म्हणतो— 'पुनः उठला तो **बाज**'. आणि बोलला—'आतां पाहूं दे ग्राम। करीन सकळा **आराम**'–गांवीं जातो व सर्वांना 'आराम' देतों–शिबीनें ससाण्याला कबूतराच्या मोबदल्यांत आपलें मांस देऊं केलें, हा कथाभाग प्रसिद्ध आहे. 'अर्पित घडि घडि निज मांसा। पाहती सकळ लोक **तमासा**।' ससाण्याच्या वागणुकीबद्दल 'नभीं देव मुनी म्हणती तो **मस्त**'–असें वर्णन आहे. आनंदतनयाच्या 'सुदामचरित्रां'त

कृष्णाच्या बालपणींच्या आठवणी घातल्या आहेत. त्यांमध्यें 'कुस्ती'चा उल्लेख आहे. क्षेमकुशलाची विचारपूस संपल्यावर कृष्णानें सुदाम्याला विचारलें —

'आम्हा भेटी आणिला काय **मेवा**'

नलराजा '**राजी** शिपाई जया'-'**राजी** तो नळभूप' याप्रमाणें असल्याचें रघुनाथ पंडित सांगतो. राजा जर 'गाजी' (महापराक्रमी) होता तर त्यानें **विजार** घालावी यांत नवल कसलें? तो देवाचा **हेजीब** झाला, त्याला देवांनीं **रवाना** केलें, त्याला देवाच्या दर्शनरूप **मेव्याचा** लाभ घडला. 'आलों महीवर **फिराद** (फिर्याद) अशी कराया'; 'स्त्री स्वभावें बहु आणि शील**बाजी**'; दमयंतीच्या वरनिश्चयाला देव 'सुरस **मस्त** असें वदले स्वयें'-याप्रमाणें भाषा-प्रयोगाची रघुनाथ पंडितानें दिक्कत बाळगली नाहीं.

आख्यानें सोडून पारमार्थिक उपदेशाच्या कवनांत याहून निराळी तऱ्हा सांपडत नाहीं. 'जो नर नटका, हरि वदनीं नयेचि घटका' या पालुपदाच्या पदांत आनंदतनय लिहितो—

**नीमाजामा** फिरकी पगडीमाजी मध्यें पटका
**मखमालि पैजार** पायिं चालतां मोठा वाजे चटका ।

निमाजामा, मखमालि, पैजार हे शब्द फार्सी आहेत.

अमृतरायाच्या जीवदशेच्या कटावांत वैभवाचीं चिन्हें दाखविलीं आहेत तीं अशीं-'भला थाटला, संसार अपार, हत्ती घोडे सैन्य शिबीका...**मनसोब्याचा** करी निवाडा...वाडा रंगीत रंग**महाल**, सोनेरी बैठका, **जरी भर्जरी, तमाम ऐने, काम मुलायम, फिरंगाणि बिल्लोरि फाणसे, मिनगारि किनखाफी पडदे**, खणोखणीं **रेशमी गालिचे, बागबगीचे**...'

हें वैभव चोरांनीं, आगीनें व राजानें नाहींसें केलें, गुन्ह्याचा आळ येऊन कैदेंत पडावें लागलें. मग 'मारामारी, **जेरबंद** कडाकड सोटे मारी, **कमच्या** पाठीं उडती भारी, खोडाबेडी पायिं रोकडी, प्राप्त देहुडी' असे हाल सोसूनसुद्धां-'तरि येईना **कबूल** कवडी.' तथापि कवीचा अभिप्राय आहे: 'ईश्वर त्याची **मस्ती** मोडी ।'

अनंतफंदी हा पेशवाईतला कवि असून त्याच्या 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपटमार्गा सोडुं नको' या उपदेशपर पदांत साधारणपणें प्रत्येक चरणांत एकदोन फार्सी शब्द आले आहेत—

चल सालसपण धरुनि **निखालस** बोला खोट्या बोलुं नको
वर्म काढुनी **शरमायाला** उणें कुणाला बोलुं नको.
**हिमायतीच्या** बळें **गरिबगुरिबाला** तूं गुरकावुं नको
बहुत **कर्जबाजारी** होउन बोज आपला दवडुं नको

स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु **जामिन** कोणा होउं नको
विडा पैजेचा उचलुं नको । उणी **तराजू** तोलुं नको ।
बरी **खुषामत** शहाण्याचीहि मूर्खाची ती मैत्रि नको
सकीर्ति-**नौबतीचा** डंका गाजे मग शंकाच नको.

तुकोबांच्या वेळीं ‘ संता नाहीं मान । देव मानी मुसलमान ’ किंवा ‘ तुर्कांच्या दासीचा लेक होय ’ अशी लोकस्थिति असल्यामुळें तुकोबांच्या भाषेंत फार्सी शब्दांना आश्रय मिळणें स्वाभाविक होतें. त्यांनीं वापरलेले थोडेसे शब्द मागें वाचलेल्या यादींत आले आहेत. पुष्कळदां रूपकांत त्यांनीं फार्सीचा उपयोग गेला आहे.

इंद्रियाच्या पेठे भला **कौल** देती । मर्यादा **जकाती माफ** केली ।

नवा बाजार वसवावयाचा झाल्यास जकातमाफीचा कौल जाहीर केला जात असे. इंद्रियांना अमर्याद मोकळीक दिली म्हणजे स्वैराचाराला आळा उरत नाहीं, ही कल्पना या चरणांतून आहे. इंद्रियाच्या पेठेंत संयमाची–मर्यादेची–जकात माफ केल्याचा कौल दिला, असा चरणांचा अर्थ आहे. चरणांच्या नऊ शब्दांत तीन शब्द – कौल, जकाती व माफ हे – परदेशी आहेत. ‘ **बदराह** ’ म्हणजे दुर्मार्ग. ‘ बदराहीच्या पाडूं दाढा ’ येथें दुर्वर्तनाला प्रतिबंध करूं हा अर्थ आहे. ‘ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ’ किंवा ‘आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः ’ हें तत्त्व ‘ मन मित्र **दावेदार** ’ या तीन शब्दांत तुकोबांनीं भरलें. माणसाचें मन मित्र किंवा शत्रु दावेदार असतें. येथें दावेदार हा फार्सी शब्द सहज वापरला आहे. या शब्द-प्रयोगावरून शिवकालांत केवळ बाहेरच्या नव्हे तर अंतरंगाच्या घटकांचीं–भाव-भावना, आशा-आकांक्षादिकांचीं फार्सी नांवें आमच्या पूर्वजांनीं स्वीकारलीं होतीं, याबद्दल संशय राहत नाहीं. हिंमत, गुमान, तोरा, इमान, शरम वगैरे संज्ञा अंत-रंगाच्या घटकांच्या आहेत. तेव्हांचा मनुष्य कोणत्या शब्दांनीं आपल्या अंतरंगाचे विकार व्यक्त करीत होता, याची अटकळ ‘ उदंड खस्तीचीं कामें । **मर्द** मारुनि जातसे । **नामर्द** काय तो **लंडी** । सदा दुश्चित लालची ’ या समर्थोक्तींनें होऊं शकेल. मर्द ऐवजीं पुरुष, शूर, वीर, कर्ता असे शब्द असतांना मर्द हा शब्द वापरावा, याचा अर्थ हाच कीं, ‘ मर्द ’ शब्दांत असामान्य कर्तृत्वाचा ध्वनि असून तो दुसऱ्या कोणत्याहि शब्दानें पटला नसता. हें जाणून जेव्हां प्रसंगपरत्वें हृदयांत आवेश संचरला तेव्हां ‘ उदंड खस्तीचीं कामें । मर्द मारुनि जातसे ’ असा उद्गार बाहेर पडला. ‘ नामर्द काय तो लंडी ’ या वाक्यांत नामर्द व लंडी हे शब्द फार्सी आहेत. लंडी म्हणजे नास्तिक, देवाधर्माबद्दल अविश्वास बाळगणारा-संशयात्मा. नामर्द इसम अनिश्चित मताचा, शिवाय लालची ; तो काय दिवे लावणार, हा दुसऱ्या चरणाचा भावार्थ आहे. ‘ **फितव्यानें** बुडती राज्यें । **खबर्दारी** असेचिना ’-फितवा व खबरदारी यांच्या अर्थाची विशेष मीमांसा करायला नको. फितवा–फितूर हा द्रोहाचा विशिष्ट

प्रकार आहे. खबरदारी म्ह० सावधपणा-चौकसपणा. परंतु खबरदारांतली छटा सावध, चौकस या शब्दांत नाहीं. '**बेदादी बेकैद** सेना **बंद बेबंद** जाणावे । **ताबे तावे** परोपरी ' या वाक्यांतील बेदाद, बेकैद, बेबंद, ताबे यांचा सूक्ष्म विचार केल्यास यांचा नेमका अर्थ सुचवितील असे दुसरे शब्द सांपडणें कठीण आहे. दासबोधाच्या अकराव्या दशकाच्या दहाव्या समासांत ' अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें । आपला **मगज** राखणें । कांहीं तरी ॥ ' २३- ही ओवी आहे. एखाद्याचा अधिकार-योग्यता-पाहून त्याला काम सांगावें; उद्योगानुसार विश्वास धरावा. पण आपलें म्हणून इतर कुणालाहि उमगणार नाहीं, असें निराळें कांहीं तरी राखून ठेवावें, याकरितां ' मगज ' शब्द योजला आहे. त्याला प्रतिशब्द शोधून सांपडलेच अशी खात्री नाहीं.

या विचारांत लावण्या, पोवाडे आणि ऐतिहासिक बखरी व पत्रें हें साहित्य वगळलें आहे. परंतु म्हणी, बायकामुलींचीं व बहुजनसमाजांतील गाणीं घेतलीं आहेत. एका मुलीला माहेरचें निमंत्रण आलें. तिनें सासू, सासरा, नणंद, दीर या सर्वांना विचारलें. शेवटीं नवऱ्यानें तिला मोठया लगबगीनें तयारी करून माहेरीं पाठविलें. या आशयाच्या गाण्यांत दीर चांदीची दौत घेऊन लिहीत होता व नवरा भर्जरी गाद्या-गिर्द्यांवर लोळत होता वगैरे वृत्तान्तांत दौत व गिर्दी हे शब्द परदेशी आहेत. ' रुप्याच्या ताटांत **मखमालीचीं** फुलें । हार **तुरे** गजरे करूं विठोबाला '- यांत **मखमल** हा शब्द आहे. पहिली माझी ओवी इत्यादि ओव्यांत अंबाबाईच्या **जरतारी** साड्या आहेत; **मैदानी** पालख्या देवाजीच्या; अशा गोष्टी आहेत. ' माझ्या ग दारावरून ' या गाण्यांतील '**हजारांत** घोडा **बाजारांत** वसे ...... त्याला पत्नासाची झूल, **गुलाबाचें** फूल ' या चरणांतून फार्सी शब्द आहेत. फुगडीच्या गाण्यांत ' फुगडी फुल्लेदार-भाई शिलेदार ' दोन शब्द अशापैकीं आहेत.

सीताहरणाच्या एका खेडवळ गाण्याला ' रामलंकेची कथा सांगतो **पाया मजबूत** ' असें आश्वासन देऊन म्हटलें आहे —

रावणाचा मामा मिरग । पाहा या अप्रीत-मारुन या मिरगा
चोळी शिवावी तरुत रामलंकेची कथा
**हुकमाचा** सारथी घातला धनुष्याला हात
कपटी भाव ते दैत्य कळेना तेची **हिकमत**
झाला लंकेचा जोगी झोळी पतंबा **बगलेंत**

म्हणी घेतल्या तर हाच अनुभव ठेवलेला—बुट्टी घोडी **लाल लगाम, बीबी** आये **उमरी** तो **मीया** चले **कबरीं, मिया बीबी राजी** तो काय करी **काजी,** यांसारख्या मुसलमानी वळणाच्या म्हणी सोडल्या तरी-खिशांत नाहीं पै मनांत

**गमजा** लई, ज्याला नाहीं **अक्कल** त्याची घरोघरीं **नक्कल**, अंथरायला **गरम** पांघरायला **नरम**–मग निजणाराला का वाटावी **शरम**, या नमुन्याच्या शेकडों म्हणींतून फार्सी शब्दांचा वापर दिसतो.

मुसलमानांच्या राहणीचा परिचय होऊन ती अंगवळणीं पडल्यावर, तिच्याविषयींचा दुजाभाव नाहींसा झाल्यावर, त्या राहणीचें वळण हिंदु राहणीला लागलें. दरबार, लष्कर, न्याय आणि शेतकी यांमागून मुसलमानांचा संसर्ग वाढतां वाढतां त्यांचे अवालिया व पीर हिंदु पुजूं लागले. बाटलेल्या हिंदूंची वस्ती इतर हिंदूंशेजारीं असल्यानें त्यांच्या राहणींतले बरेवाईट विशेष हिंदूंनीं उचलले. ज्या हिंदूंनीं दरबारी मानकऱ्याचे आचार-विचार स्वीकारले, त्यांचें अनुकरण त्यांच्या आश्रितांनीं चालविलें; आश्रितांच्या विद्यमानें ते आचार-विचार आणखी फैलावले. प्रथम बहिरंग मुसलमानांनीं व्यापलें. नंतर अंतरंगांत त्यांचा प्रवेश झाला. या फेरफारांची छाननी करूं लागलों तर हिंदूंमध्यें केव्हां कोणत्या गोष्टींचा आदर झाला, याचा ठोकळ मानानें छडा लावतां येतो. शिवकालीन वाङ्मयांत सामान्यतः अत्तर-गुलाबाचा निर्देश नाहीं, परंतु आतषबाजीचा आहे. रामदासांनीं मात्र अत्र-अत्तर हा पदार्थ सुगंधी द्रव्यांत नोंदला आहे. रामदासांखेरीज इतरांना मेणबत्त्या आठवल्या नाहींत; यावरून हें प्रकाशाचें साधन सामान्य लोकांना—ज्यांतून वाङ्मयकार अवतरले—विशेष माहीत नव्हते असेंच म्हणावें लागेल. अंजीर, टरबूज, खरबूज, बदाम, खिसमीस, तुते यांचा परिचय भरपूर झाला होता. कपड्यांतील विजार नळवर्णनांत रघुनाथ पंडितानें व रामाच्या वर्णनांत आनंदतनयानें आणली आहे. रामानें अरण्यांत जातांना **किनखापी विजार** टाकली आणि वल्कलें धारण केलीं, असें तो म्हणतो. वाङ्मयनिर्मात्याला आपला काळ विसरणें शक्य नसतें. तो आपल्या काळांतील जीवनाचा रंग प्राचीन जीवनसरणीवर चढवितो. अगदीं सहज पाहिलें तर आम्हां सर्व प्राण्यांना मुख्य आधार असलेल्या पायाखालच्या भूमीला आम्ही जमीन म्हणूं लागलों. प्राण्यांच्या आधाराला - वायूला – 'हवा' म्हणूं लागलों. आकाशाचें अस्मान झालें. प्रासाद-मंदिरें जाऊन हवेली, महाल, इमारती आल्या. गालिचे, रुजामे, सतरंजी यांचा बैठकीसाठीं उपयोग सुरू झाला. उजेडासाठीं दिवट्यांची जागा मशाली, हिलाल, फाणस-कंदील यांना घेतली. भांड्यांत जांब, तस्तें, तबकें वगैरेंची गर्दी उडाली. पोळ्या भाजण्याचें उपकरण जो तवा त्याचें मूळ परदेशी आहे. पूजे-अर्चेंतील धूप मागें पडून **उदबत्ती** पुढें सरसावली. ऊद अरबी आहे. **अबीर** हा पदार्थ उदासारखाच आहे. मिठाईतील बर्फी प्रसिद्ध आहे. बर्फापासून हा शब्द निघाला. हिमालयावरील बर्फ एका जुन्या कवीच्या लेखनांत सांपडतो. बर्फाच्या वडीच्या आकाराची जी मिठाई ती बर्फी मुसलमानांच्या वापरांत होती. कीर्तन-पुराणाच्या शेवटीं वांटला जाणारा प्रसाद–त्याचा **खिरापत** हा रूढ पर्याय फार्सी आहे. खिरापत वाटतों, खातों पण

त्या शब्दाच्या परकेपणाची ओळख आतां उरलेली नाहीं. रामदासांनीं एका पदांत 'क्षिरापत' या फरकानें तो शब्द घेतला आहे.

वरून दिसायला हा शब्दसंग्रहाचा इतिहास वाटला तरी हा शब्दसंग्रह आपल्या संस्कृतीच्या फेरफाराचा दर्शक आहे. इ. सनाच्या पूर्वी आम्ही कोणाचे सोबती होतो. इ. सनानंतर आम्हीं कुणाशीं साहचर्य साधलें, देशांतल्या देशांत आम्ही कुणाशीं शब्दांची देवाणघेवाण करीत होतों, चौदाव्या शतकापासून घडलेलें मराठी भाषेचें स्थित्यंतर मुसलमानांचा प्रभाव किती दूरवर पोंचला होता याची कल्पना कशी आणून देतें, हें गळीं उतरून भाषा आणि इतिहास यांचा निकट संबंध ध्यानांत यावा आणि इतिहासाच्या अभ्यासांत भाषेची जी उपेक्षा होत असते, तिची हानिकारकता कळावी, हा या साऱ्या ऊहापोहाचा उद्देश आहे. या उद्देशाचा रोख मराठेशाहीच्या इतिहासाकडे जास्त असल्याचेंहि केलेल्या विवेचनावरून ध्यानांत आलें असेल.

इतिहासज्ञानाच्या अभावीं वाङ्मयांतील पुष्कळसे भाग नीट उलगडत नाहींत व वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज सांगोपांग इतिहास जुळवितां येत नाहीं. वाङ्मयामध्यें त्या त्या काळांतील लोकांच्या आचारविचारांचें प्रतिबिंब प्रतिपाद्य विषयानुसार उमटलेलें असतें आणि इतिहास त्यांची विचारपूस करतोच असा नियम नाहीं. राजवंश, राजे त्यांच्या उलाढाली यांची दखल प्रामुख्यानें इतिहास घेतो. अशा उलाढालींचे जनतेवर होणारे परिणाम पहाण्याचें काम आजपर्यंत इतिहासकार करीत नव्हते. अलीकडे कांहीं वर्षें युरोपियन इतिहासकारांना आपल्या कालखंडांतील जनतेच्या स्थितीची शहानिशा करावीशी वाटूं लागली असली तरी आपले इतिहासकार अजून युरोपियनांइतके या बाबतींत जागृत झालेले नाहींत. तथापि पुढें जेव्हां तसे इतिहास लिहिण्याची वेळ येईल तेव्हां भारतीय इतिहास लेखकांना वाङ्मयाची कास धरावी लागेल.

मुक्तेश्वराच्या भारतांत इस्लामच्या प्रभावाप्रमाणें पोर्तुगीजांच्या साहचर्याचीं चिन्हें दृष्टीस पडतात. द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगांतील वस्त्रें याची साक्ष देऊं शकतील. द्रोणाचार्यांनीं आपल्या शिष्यांच्या शस्त्रविद्यानैपुण्याची परीक्षा घेतली त्या परीक्षेच्या माहितींमध्यें मराठे, कर्नाटकी आणि फिरंगी यांच्या युद्धाचे विशेष आलेले आहेत. एखाद्याशीं जरासें बिनसलें कीं त्यांच्याशीं द्वंद्वयुद्धाला आरंभ करायचा ही मराठ्यांची खोड त्यानें सांगितली आहे. मराठ्यांच्या या विशेषाविरुद्ध अहमदनगरच्या एका निजामशहानें एक फर्मान जारी केल्याचा संदर्भ त्या शाहींच्या इतिहासांत पाहिला कीं, मुक्तेश्वराचे द्वंद्वप्रिय मराठे काल्पनिक नाहींत याबद्दल खात्री पटते. मुक्तेश्वरानें फिरंग्यांच्या घोर नौकायुद्धाचा उल्लेख केला आहे. कौरवपांडवांच्या युद्धविद्येची परीक्षा हस्तिनापुरास म्हणजे आजच्या दिल्लीच्या

आसपास झाली. त्या प्रदेशांत नौकायुद्धांचा लवमात्र संभव नसतांहि त्या नौकायुद्धाचा व त्यांतहि फिरंग्यांच्या नौकायुद्धाचा चमत्कार मुक्तेश्वरानें घडवून आणलेला आहे. हा केवळ कालविपर्यासाचाच नव्हे तर स्थलविपर्यासाचाहि दोष आहे, पण मुक्तेश्वरकालीं महाराष्ट्राच्या दर्याकिनारीं फिरंगी होता व तो भयंकर नौकायुद्धें करणारा होता, हें लक्षांत घेतलें कीं वर जो चमत्कार म्हटला त्याची विस्मयकारकता मावळते. मराठी वाङ्मयांतील इस्लामी प्रभाव सांगतां सांगतां येथें पोर्तुगीज प्रभावाचें उदाहरण सादर केलें. त्या प्रभावाचे दाखले निदर्शनास आणणें सोपें व उपयुक्त असलें तरी त्याचा मोह आवरणें अवश्य आहे.

येथें चर्चिलेल्या परदेशी शब्दांचा मूळ संदर्भ ध्यानीं घेतल्यास जनतेच्या कोणत्या व्यवहारांत त्यांचा आदर चालू होता याचा बोध घडून त्या योगानें आज रूढ असलेल्या कांहीं जहाल गैरसमजुतींचा निरास शक्य आहे. परके शब्द स्वीकारल्यानें धर्माचा, संस्कृतीचा पर्यायानें स्वत्वाभिमानाचा घात होतो म्हणून त्यांचा आपल्या जिव्हेला वा लेखणीला स्पर्शहि होऊं देतां कामा नये अशी एक विलक्षण गैरसमजूत सांप्रत फैलावली आहे. आमची संस्कृति तारण्याकरितांच ज्यांचा अवतार त्या साधुसंतांनीं ज्या अर्थी परक्या शब्दांचा आपल्या उपदेशांत विटाळ मानला नाहीं त्या अर्थी परके शब्द स्वत्वाभिमानाला मारक असतात हा दावा फोल असल्याचें सहज पटेल. 'माझ्या **बरोबर**' यांतल्या '**बरोबर**'ला फाटा देऊन कित्येक जण त्याऐवजीं 'सांगाती' हा शब्द वापरतांना भेटतात. 'संगे, सांगाती' हे शब्द एकदां उपयोगांत होते, पण आतां ते इतके मागासले आहेत कीं, त्यांचा प्रयोग सकृत्‌दर्शनीं किंवा सकृच्छ्रवणीं चटकन् गळीं उतरत नाहीं. जुने शब्द परके म्हणून उपटून टाकण्याचा व त्यांची जागा नव्या संस्कृत शब्दांनीं भरून काढण्याचा जो अट्टाहास कित्येकांनीं आरंभिला आहे तो व्यवहाराच्या नव्हे तर शास्त्राच्या दृष्टीनें देखील अयुक्तिक आहे. एकनाथ, रामदास, तुकाराम प्रभृती थोर व्यक्तींवर कोणी बलात्कार केला म्हणून त्यांनीं परके शब्द स्वीकारलेले नाहींत. ते शब्द सामान्य जनतेच्या समजुतीमधले हें लक्षांत येऊन ते सहजगत्या एकनाथ रामदासांच्या उपदेशांत येऊन गेले. त्या उपदेशांतून त्या शब्दांची हकालपट्टी कुणालाहि करतां येणार नाहीं, शिवाय त्या उपदेशाचा पाठ निरंतर चालू रहाणार हें निश्चित आहे. सगळीकडे जवळच्या भाषांची आपसांत अशीच देवघेव चालू असते. या देवघेवीचा अभ्यास किती प्रकारें उपकारक होऊं शकतो, याचें अनुमान जिज्ञासूंना करतां आल्यास हा लहानसा प्रयत्न सार्थकीं लागलासें होईल.

---

* मराठी संशोधनमंडळापुढें प्रा. न. र. फाटक यांनीं दि. ३०-३-१९५६ रोजीं वाचलेला निबंध.

# द्राविड भाषासंघ व मराठी भाषा

(डॉ. म. अ. करंदीकर)

## द्राविड संघ भिन्न

द्राविड भाषा या इंडो-युरोपियन, इंडो-आर्यन, संस्कृत किंवा इतर आर्यभाषा यांजपासून भिन्न आहेत, असा सिद्धान्त डॉ. काल्ड्वेलनें आपल्या द्राविड भाषांच्या तौलनिक व्याकरणांत मांडला; एवढेंच नव्हे तर त्या सिथियन भाषांशीं संबद्ध आहेत, असें मत त्यानें प्रतिपादिलें. डॉ. काल्ड्वेल हा इंग्रज, राजनीतीनें त्यांना अनुकूल व उपकारक अशीं मतें प्रतिपादीत असावा अशी प्रस्तुत लेखकाची शंका अजूनहि नाहींशी झालेली नाहीं. पण एक गोष्ट मात्र डॉ. काल्ड्वेलला नाकारितां येणेंच शक्य नव्हतें. ती गोष्ट ही कीं, या द्राविड भाषिकांचा व आर्यभाषिकांचा सांस्कृतिक दृष्टया घनिष्ट संपर्क होता; कारण द्राविड भाषिकांची भूमिका तद्विरुद्ध मुळांतच नव्हती. त्याच्या मतानें या द्राविड भाषांचें महत्त्व इतकें होतें कीं, या भाषांच्या अभ्यासानें त्या काळीं माहीत झालेल्या इतिहासाच्या, देवताशास्त्राच्या, इतकेंच नव्हे तर पौर्वात्य व पाश्चिमात्य इंडो-युरोपियन भाषा विभक्त होण्याच्या पूर्वीच्या इतिहासाचें ज्ञान कांहींसें अधिक स्पष्ट व्हावें. ग्रियर्सनला व इतर लोकांना हें मत मान्य नव्हतें. (**लिंग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया,** व्हॉल्यूम ४, पृ. २६२; **इंपिरियल गॅझेटियर,** व्हॉल्यूम १, पृ. ३७८). ग्रियर्सन या मताच्या विरोधी होता, असेंहि स्पष्ट दिसतें. त्याच्या मतानें द्राविड भाषासंघ स्वतंत्र आहे; परंतु त्याचा संबंध हिंदुस्थानाबाहेरील भाषांशीं किंवा एखाद्या दुसऱ्या भाषासंघाशीं लावणें त्याला मान्य होण्यासारखें नव्हतें. तेलुगु भाषेच्या व्याकरणकारांना तर तेलुगु ही संस्कृतची विकृति वाटत असे (**आंध्रभाषाचिंतामणि**). चेंचय्या व भुजंगराव हे आपल्या तेलुगु वाङ्मयाच्या इतिहासांत म्हणतात कीं, आजची तेलुगु वांशिक दृष्टया द्राविड असली तरी बाह्यरूपांत ती संस्कृतोत्पन्न आहे. अर्थातच हेंहि मत आज पुष्कळांना पटत नाहीं.

## द्राविड भाषांचा आर्यभाषांवर परिणाम

आर्य लोकांचा संघ हिंदुस्थानांत आल्यावर द्रविडांची व त्यांची गांठ पडली असावी. मोहेंजो दारो येथील मूर्ति शंकराचीच आहे, असें ठामपणें म्हणणें अजून शक्य झालेलें नाहीं, असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे; बलुचिस्तानांत आढळलेल्या 'ब्राहुई' भाषेचें द्राविड भाषासंघाशीं साम्य आहे; तरी पण आर्य व द्रविड यांचा संबंध आर्यावर्तातच घडला असावा व द्राविड संपर्कानें आर्यभाषा, देववाणी संस्कृत, अपभ्रष्ट झाली, व त्यांतूनच प्राकृत भाषा उद्भवल्या, असें कांहींकांचें मत आहे. द्राविडांना देववाणीचे उच्चार संस्कृत पद्धतीनें न करतां आल्यानें त्यांनीं

आपल्या विशिष्ट पद्धतीप्रमाणें या भाषेचेहि उच्चार केले असतील. तसें वळण व स्वरूप दिल्यानें आर्यभाषा अपभ्रष्ट झाली. डॉ. भांडारकर यांच्या मताप्रमाणें पाली भाषेंतील ऱ्हस्व **ए** व **ओ** व दंत्यांचें मूर्धन्यीकरण हे दोन विशेष परिणाम, इतर परिणामकारक कारणांच्या अभावीं हा द्राविड संबंध स्पष्ट करतात. डॉ. भांडारकर म्हणतात: "If the original Pali speakers belonged to the same race as the Dravidians of South India of the present day, we have reason to believe that their native tongue contained ए, ओ, इ; for they exist in the Dravidian languages and are very characteristic of them." (*Wilson Philological Lectures*, p. 293). अशा तऱ्हांनीं ही आर्यभाषा अपभ्रष्ट होऊन प्राकृत भाषा उत्पन्न झाल्या.

डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांच्या मताप्रमाणें हा परिणाम येथेंच थांबला नाहीं. प्रत्ययविभाक्तियुक्त व अति संकीर्ण अशी भाषा बोलणारे आर्य लोक आणि त्या मानानें नियत संश्लिष्ट (ॲग्ल्यूटिनेटिव) अशी भाषा बोलणारे द्रविड वा कोळ यांचा संसर्ग झाला, त्या वेळेपासून पुढेंहि हा परिणाम होतच होता; म्हणजे प्राकृतोद्भव भाषांतहि हा परिणाम पुढें चालू झाला. द्राविड भाषांच्या साधेपणाच्या अनुकरणानें याहि भाषांतून अधिकाधिक साधेपणा येत चालला. [त्यांच्या मतें द्राविड पूजाविशेषांचा परिणामहि आर्यांवर झाला. इतकेंच नव्हे तर पुनर्जन्माचा सिद्धान्तहि आर्यांनीं या मंडळींकडून घेतला. (आमच्या मतें हा प्रश्न विवाद्य आहे.)] संस्कृत भाषेंतील कृदंतांचा उपयोग हा या परिणाचा एक भाग आहे. (*Origin and Development of the Bengali Language*, p. 42.)

## मराठी भाषेवरचा परिणाम

द्राविड भाषाशास्त्रज्ञांच्या मतें मराठीवर पुढील परिणाम घडून आला:

(१) मराठींत तालव्यांचें उच्चारण द्वित्त होऊं लागलें.

(२) **च**चें **स**मध्यें व **स**चें **ह**मध्यें रूपांतर होऊं लागलें.

(३) मराठींत (व बिहारींत) सामान्यरूपापुढील चरम प्रत्यय या परिणामाचे निदर्शक आहेत. (पहा R. Narasinhacharya, *History of Kannada Language*, 1934, p. 26).

(४) द्वितीयेचीं दोन रूपें: द्वितीया विभक्तींत सचेतन प्राणिवाचक नामांपुढें चरम प्रत्यय वापरतात, व इतर नामांपुढें वापरीत नाहींत. याचें समर्थन आर्यभाषेवरून होत नाहीं.

(५) प्रथम पुरुषाच्या बहुवचनीं व्यापक व अव्यापक अशीं दिसणारीं सर्वनांचीं रूपेंहि हा परिणाम व्यक्त करतात.

( ६ ) आख्यातांच्या स्थळीं प्राकृतोद्भव भाषांतहि कृदन्तांचा उपयोग होतो. ( पहा आल्फ्रेड मास्टर, *BB RAS*, N. S. Vol. VIII, 1932 )

परंतु या सर्व बाबी शब्दसंग्रहाच्या मीमांसेंत येत नसल्यानें प्रस्तुत स्थळीं त्यांची मी चर्चा करीत नाहीं.

द्राविड भाषांत तामिळ, तेलुगु व कन्नड या भाषा पुढारलेल्या आहेत. तुळु, कोडगु, तोडा, कोत व बडग या कानडीच्या उपभाषा समजल्या जातात. मराठीस निकट कानडी आहे; परंतु तेलुगु व तामिळ या भाषांचाहि परिणाम मराठीवर शब्दसंग्रहाच्या बाबतींत थोडासा झालेला असल्यानें प्रामुख्यानें या तीन भाषांच्याच परिणामाचा विचार मुख्यतः महाराष्ट्र शब्दकोश व मोल्स्वर्थची मराठी-इंग्रजी डिक्शनरी यांवर आधारलेला आहे.

## १. कन्नड व मराठी

कन्नड व मराठी भाषा या पंचद्राविड भाषांपैकीं आहेत, व गुजराती व मराठी या कन्नड भाषेचींच निराळीं स्वरूपें होत, असा ग्रह अद्यापि कांहीं मंडळींचा आहे. वाक्यरचना, शब्दसंग्रह, उच्चार व वंशभेद या तत्त्वांवर या प्रश्नांची चर्चा केल्यावरच हा प्रश्न संपूर्ण सत्य स्वरूपांत निर्णीत होईल. वंशभेदाविषयींचा निर्णय अनिश्चित आहे. डॉ. इरावती कर्वे यांच्या म्हणण्याप्रमाणें मराठी मंडळी मिश्र वंशांची होत. वाक्यरचनेचा, शब्दसंग्रहाचा व उच्चारावरून निघणारा, हे निष्कर्ष इतके आनिश्चित नाहींत. यांपैकीं केवळ शब्दसंग्रहाचाच विचार येथें प्रस्तुत आहे. मराठी शब्दसंख्या मोल्स्वर्थ यांच्या कोशांत ६०,००० दिसते. वा. गो. आपटे यांनीं एकंदर मराठी शब्दसंग्रह हा ' सुमारें ७५ हजार ' आहे, असें ' शब्दरत्नाकरा 'च्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. महाराष्ट्र शब्दकोशांत छापलेल्या शब्दांची संख्या १,१२,१२८ अशी दिली आहे. अर्थात ही गणना संपूर्ण नाहीं, कारण सर्व शब्द अजूनहि कोशांत नाहींत (आणि कांहींचे केवळ स्वरूपभेद निराळे म्हणूनहि मोजलेले आहेत) आणि अर्थभेदावरून होणाऱ्या समानोच्चार शब्दांचा भेद पूर्ण नाहीं. या विचारांत प्रामुख्यानें मोल्स्वर्थ (**मराठी-इंग्लिश कोश**, १८५७) व **महाराष्ट्र-शब्दकोश** (मशको, १९३२-३८) या कोशांतील शब्दसंग्रहावर विसंबूनच निष्कर्ष काढलेले आहेत. मराठी शब्दसंग्रह हा मूलतः कानडी आहे व कानडी भाषा मराठी भाषेचें मूल होय अशी समजूत पुष्कळच दिवस प्रसृत असल्याचें दिसून येतें. पुढील विवेचनानें योग्य तो निष्कर्ष काढण्यास आपोआपच साहाय्य होणार असल्यानें तो निष्कर्ष या प्रकरणाअंतीं दाखवूं.

मराठींतील श्रवणबेळगोळा येथील शिलालेख अजूनहि सर्वांत जुना मराठीचा शिलालेखीय उल्लेख म्हणून आपण मानतों. निदान तेथपासून आजपर्यंत तरी मराठी व कन्नड या भाषांची देवघेव आहे, असें म्हणणें योग्य होईल. येथें

मराठी प्रदेशाच्या व्याप्तीची मला चर्चा करावयाची नाहीं म्हणून त्या विवेचनांत शिरत नाहीं. पण दुसऱ्या पुलकेशीच्या वेळेस ( म्हणजे इ. स. ६०९-६४२ ) या शिलालेखांतील श्रवणबेळगोळ्याच्या शिलालेखीय उल्लेखापूर्वींच या प्रदेशाच्या व्याप्तीविषयीं कांहीं ऐतिहासिक उल्लेख आहेत, एवढेंच सध्यां लिहितों.

या श्रवणबेळगोळा येथील मराठी शिलालेखांत ( Bloch-A. D. 1118 ) 'सुत्तालें' हा कन्नड शब्द येतो. त्याचा अर्थ 'देवळाभोंवतालची भिंत' असा आहे (सुत्त म्हणजे भोंवतीं आणि आले किंवा अले हा प्रत्यय). किटेलनें अलचा आलय असा संस्कृत मूल शब्द मान्य केला आहे. पण आल्फ्रेड मास्टरला तें मान्य नाहीं.

येथें एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती ही कीं, ऋणशब्द ठरवितांना त्या शब्दाचें मूळ भाषेंतील स्वरूपच येथें आम्ही ध्यानांत घेणार आहोंत. केवळ संपूर्ण तत्सम, तद्भव किंवा अर्धतत्सम शब्द हे त्या मूळ भाषेंतील मानूं नयेत असा दण्डक पत्करणें आमच्या मतें योग्य होईल. उदाहरणार्थ सहोदर हा शब्द संस्कृत होय, तत्सम होय; म्हणून तो आम्ही कन्नड न समजतां संस्कृत समजूं; किंवा टका ( सं. *टंक-क ) हा शब्द कानडी न समजतां तद्भव समजूं इ. आतां 'सुत्तालें' हा शब्द मराठींत प्रचलित होता कीं काय हा प्रश्न स्वतंत्र आहे. कदाचित् ज्या प्रांतांत हा शिलालेख कोरला गेला तेथील प्रचलित शब्द म्हणून हा शब्द शिलालेखांत आला असेल, असेंहि अनुमान शक्य आहे. पाटण शिलालेखांतील सुंक हा शब्द संस्कृत शुल्कचें अपभ्रष्ट रूप होय. पंढरपूरच्या शिलालेखांत कानडी शब्द नाहीं. 'आय'-कुली या शब्दांत येणारा 'आय' शब्द संस्कृत होय, याविषयीं कांहींच शंका नसावी. आतां दुसऱ्या एका प्रश्नाकडे वळून नंतर शब्दांकडे पुन्हा येतों.

## मराठी व कानडी यांचा राजकीय संबंध

या दोन्ही भाषांचा संबंध पुष्कळच जुना आहे. पूर्वीं कर्नाटकांतील व नंतर महाराष्ट्रांतील राजांनीं या दोन्ही भाषिकांच्या भूमीवर आपली सत्ता चालविली आहे.

चालुक्य हे कानडी कीं मराठी हा वाद अजून अनिर्णीत वाटतो. तसेंच राष्ट्रकूट घराणें आम्ही मराठी मानतों, तर डॉ. आळतेकरांचा तर्क तें कानडी असावें असा आहे; परंतु डॉ. आळतेकरांचीं कारणें प्रत्ययोत्पादक वाटत नाहींत. वाकाटक घराणें महाराष्ट्रीय असेल काय ?

मराठी भाषेंत अगदीं प्रथमपासून कानडी शब्द दिसत असले तरी संत-वाङ्मयांतहि या शब्दांचें प्रमाण एकंदर शब्दसंग्रहांत फार अल्प दिसतें. ज्ञानेश्वरींत खूप शोधाअंतीं हे शब्द श्री. पटवर्धन यांच्या मतें २१ आहेत. ( हे सर्व शब्द कानडी नाहींत, हें पुढें दाखवितों. ) 'शिशुपालवध' या ग्रंथांत श्री. चिं. नी. जोशी

यांच्या यादींत ( प्राच्यपरिषद इतिवृत्त, बडोदें, १९३५, पृ. ९४१-४२ ) सहासष्ट शब्द कानडी म्हणून दाखविलेले आहेत, परंतु अनाग्रही पंडितांस त्यांतील कांहीं तत्सम व तद्भव म्हणून सोडावेच लागतील. संतवाङ्मय या दृष्टीनें तपासल्यासहि हें प्रमाण अत्यल्प आहे. पुढील वाङ्मयांत तर हे शब्द आणखीहि कमी होतात. आज मराठींत सर्रास उपयोगांत असणारे कानडी शब्द शंभराच्याहि आंत आहेत. येथें ही गोष्ट स्पष्ट सांगणें आवश्यक आहे कीं, सीमेवरच्या प्रांतांतील शब्दसंग्रहांत रोज येणाऱ्या शब्दांचेंहि प्रमाण मूळ भाषेच्या मध्यवर्ती भागांत आढळणार नसल्यानें त्या अपवादाचाच नियम करणें योग्य होणार नाहीं; आणि त्याचा उल्लेख प्रादेशिक वापर म्हणून शब्दकोशांतून ज्या पद्धतीनें केलेला असतो, तीच पद्धत प्रमाण धरण्यास प्रत्यवाय नसावा. श्री. पटवर्धन ( **ज्ञानेश्वरदर्शन**, पृ. १७८-१७९ ) यांनीं केवळ २१ शब्दांचीच यादी दिली आहे. या लेखकांची यादी विश्वासार्ह वाटत नाहीं. उदाहरणार्थ, "सहोदर हा शब्द कानडींत विशेष उपयोगितात", असें म्हटल्यानें तो कानडी ठरत नाहीं ? विसाटे हा शब्द 'कानडीसारखा दिसतो'! 'बेंबळ' या शब्दाचा त्यांचा मूलार्थ मान्य करण्यासारखाच नाहीं. यादींतील इतर शब्द पुढें येणाऱ्या भागांत येणार असल्यानें तिकडेच आतां वळतों.

## 'कानडा'

मराठी भाषेंत या शब्दाचीं दोन भिन्न रूपें धरणें आवश्यक आहे. एक भाषादर्शक व दुसरें देवतादर्शक. इंग्रजींत जसें "Greek and Latin" म्हणजे दुर्ज्ञेय, त्याचप्रमाणें मराठी भाषेंत या शब्दाचा 'दुर्बोध' असा अर्थ होतो. 'हे परिसतां जरी कानडे' ( **ज्ञानेश्वरी** ६.१२० ) येथें हा अर्थ आहे. दुसरा लबाड हा अर्थहि ( **तुकारामाची गाथा** १४० ) तसा कांहीं अनुभव अथवा कांहीं पूर्वग्रह यांचा द्योतक असावा. तिसरा अर्थ हा निराळ्या परंतु सरूप अशा शब्दाचाच आहे. कृष्ण-कण्ह-कान्हा ( कान्हुडा-कानडा ) असा हा निराळाच शब्द होय. अधिक खोलांत येथें जायचें कारण दिसत नाहीं.

आणखी एक तत्त्व या अनुषंगानें परीक्षणांत वापरणें अवश्य ठरतें. किटेलच्या कोशाचा आधारच मुख्यतः कन्नड-अकन्नड ठरवितांना आम्ही घेणार आहोंत. किटेलनें अकन्नड शब्द निराळ्या प्रकारानें व निराळ्या अक्षरांनीं मुद्रित केले आहेत. किटेलनें अकन्नड ठरविलेले शब्द तसें विशेष विरोधी कारण नसतांना अकन्नड समजण्यास प्रत्यवाय नसावा. अर्थात् किटेलच्या मूळ कन्नड शब्दांविषयीं शंका असल्यास तसें म्हणण्यास व रास्त कारण अथवा अनुमान असल्यास ते ते शब्द संशयित असें सांगून आमचें मत देण्यास हरकत नाहीं. किटेलच्या शब्दपरीक्षेंत आमच्या मतें सदोषता अशा ठिकाणीं उत्पन्न होते कीं, ज्या ठिकाणीं संस्कृतपासून उत्पन्न झालेल्या तद्भवाचा तो मूळ कानडी शब्द म्हणून विचार करतो. किटेलनें

कन्नडमधून संस्कृतमध्यें गेलेल्या अशा ४२० शब्दांची एक यादी दिली आहे. सध्यांचा आमचा विचार ती यादी तपासण्याचा नाहीं.

जोशांच्या यादींतील आटोप, भीड, बिकें, मुद्दल, वोवरी, पवाडे, राप, पदर, पौळी, पैकीं, बोचरिया, लंच, पाळें, काडी, उपवडे, साटी ( विनिमय ) व राडि हे शब्द किटेलनेंच कन्नडेतर म्हणून दिले आहेत. किडाळ, सोस, कैवार, टकें हे शब्द किटेल देतच नाहीं. परी, चोखाळणें, बोगरा, ओगरा, चवी, पोट, दाटी, वेडें, नाड, तूक इत्यादि शब्द, भावनावश न होतां, तद्भव आहेत काय, हें ठरविलें पाहिजे. ' पल्लासिलें ' यांतील सकारावरून तर तो उघड √प्रन्यस् पासून निघण्याचा भाषाशास्त्रीय विचार आग्रहानें आपण टाळूं शकणार नाहीं, व टाळूं नये. कड ( कट ), गुंड ( कुंड ), वोडवी (ओढवी–मराठी ), सरी ( सदृश–क्ष ), मातु ( वार्ता ) इत्यादि शब्द संस्कृतोद्भव म्हणतांना अनमान कां करावे ? या प्रश्नाशीं व्युत्पत्तिशास्त्रज्ञांनीं टक्कर दिली पाहिजे. जोशांच्या उपरिनिर्दिष्ट यादींत कांहीं देश्य शब्दहि आहेत. (उदा. पोट व पिलूं). यापुढें शब्दांची चर्चा कांहीं गट करून करणें सोयीचें वाटल्यानें तसें केलें आहे.

## धार्मिक

तिमया, बसव, बसवण्णा, यल्लम्मा व विरण्णा हे द्राविडी शब्द आहेत; जरी तिमया ( त्रिमल- ), बसव-ण्णा ( वसु- ), व विरण्णा ( वीर- ) असे ते शब्द मुळांत तद्भवच असतील तरी मराठींत ते कन्नड ऋण मानले जावेत, हेंच योग्य आहे. खंडोबा हा शब्द किटेलनें अकन्नड म्हटला आहे व हेमचंद्र ' स्कंद 'चा ' खंड ' असा अपभ्रंश आपल्या ' हरखंडा ' या रूपांत तद्भव म्हणून मानतांना दिसतो. जेजुरी हें ग्रामनाम ' उरी ' या अंत्य रूपामुळें कानडी मानितांना कांहीं लोक आढळतात; परंतु सबंध हिंदुस्थानभर अशीं ग्रामनामें आढळतात. वाघ्या व मुरळी या शब्दांतील पहिल्या शब्दाचें कानडी मूळ वग्गे असें जें दिलें आहे तें किटेलनें दिलें नाहीं व कानडींत मुरळ्या पण दिसत नाहींत. कानडी मरुळी किंवा मरळी यांचा संबंध येथें नाहीं. बाजारबसवी यांतील उत्तरार्धाचा कानडीशीं संबंध नाहीं. भंडारा हा शब्द तद्भव आहे.

उरगुडें ( देऊळ ), काणुक, कानगी व घुळी हे शब्द कानडी आहेत.

परंतु टका, मुकटा हे शब्द कानडी नाहींत. मुकटा किटेलनें कन्नडेतर दिला आहे. पेड, कोचाळें ( कचोळें ) हे शब्द तद्भव आहेत.

## सृष्टिविषयक

उसबू ( वाळू ), कोलन ( खड्डा ), तग्ग, तगवड ( प्रादेशिक ), वागु ( मार्ग ), हरळ ( दगड ) व हेंडा ( मोठें ढेकूळ ) हे शब्द कानडी आहेत. परंतु उक ( झळ ),

ओरळी (बांध), कऱ्हा (नरम दगड), कार (काळा दगड), कोल्हार, कोळ, गोटा (दगड), राड (रेंदा) हे शब्द कानडी नव्हेत. नाडर (डबकें) व वत्त (पूर) हे कानडी आहेत.

## भौगोलिक

अनागोंदी, गोंड, अनिकट व चल्मा (वाळूंत खोदलेला खड्डा) हे शब्द कानडी होत. कोंकण शब्द संशयित वाटतो.

## शेतकीविषयक

अइलिया, आटा, ओरंबा, करळ, कैंड, कोलें-ल्हें, कुणगा (वाफा), कोंगळी, गद्दी, गादा (हे दोन शब्द जुन्या कानडींत नाहींत), गुदें, गुड, गुडार-ल, गुढें, गुरुळ, गोरबू, तिमाणे-म्मण्णा, तुंबा (कुदळीचा माथा), मडखूळ, मरड (वाळू), मसार, मस्तुती, यरकाल, याता, हिंडीरे, हिंगारी व मुंगारी हे शब्द सीमाप्रांतांत (प्रादेशिक म्हणून) वापरले जातात, ते कन्नड आहेत. कोळपें, नारु (नारु-कारु) व मुडा (भाताचें माप) हे शब्द इतरत्रहि प्रचलित आहेत.

आढी, ओग्गु, कवू (ऊंस), कानी, कोरोळा, गुणी, गेणी, जत्तिगि व मुगदाण हे सर्व शब्द कन्नड आहेत. वाला–वाल हे दोन शब्द अपभ्रष्ट व तद्भव आहेत.

## वनस्पति व तत्संबद्ध

इरडा, उव्वळा, ऊळ (कांदा), कनाक, कानगी, कैंडशी, क्यंच (लांकडाचा नार), गंजनी (किटेल गंजळी असें मराठी रूप देतो), गळू (बांबू), गुंज (लांकडावरील टेंगूळ), गुदया, गोरवी कटगी (मशालीचें लांकूड), चुट्टा (तंबाखूची वळकटी), टंगशी, दिंडा व मेकी हे शब्द कानडी होत. अटवी, किटेलनें मूळ कन्नड मानला असला तरी आम्हीं तो तत्सम समजतों. उतराणी किटेलच्या मतानें कानडी आहे. औंडा (लांकडाचा खूप मोठा तुकडा) याचा देशी "उड्डुणो (**देनामा** १.१२३) दीर्घः" या शब्दाशीं संबंध आहे.

ओटी शब्दाविषयीं इतरत्र लिहिल्याप्रमाणें ओटा हा शब्द तद्भव होय. गड्डा–ड्डी तद्भव आहे. गेचकळ हा बेचकळ, बेळकें इत्यादींसारखा शब्द मुळाचें कन्नड रूपांतर आहे. कर्नाटकाकडे दगडबिगडच्या स्थळीं जसें दगडगिगड म्हणतात त्याप्रमाणें हा उच्चारभेद आहे. चरटी किटेल देत नाहीं. करट (shell of cocoanut) तो कन्नडेतर मानतो. चिवा (बांबू) हा कानडा होय. परंतु परडी हा तद्भव होय. परटें हा शब्द (enclosure around a house) किटेलनेंहि मराठी मानला आहे. बाठ हा तद्भव होय. हिंदी शब्दसागरांत बाटी तद्भव मानला आहे.

## फळें

आटक, अक्शा, उतोति, उरले गड्डे, उल, उळपात, कचिकाइ, कायि, कांगाळा, कोवि ( पोखरलेला नारळ ) व तार हे कानडी आहेत. कैरी शब्दाची व्युत्पत्ति समजत नाहीं; तो कानडी नव्हे. कुंकवाच्या कोयरी ( कुयरी ) चा आकार आंब्यासारखा असतो. हा शब्द गुजरातेंत व उत्तरेकडे अधिक वापरतात.

## प्राणी

इजट ( गूळ खाणारें मांजर ), उळउळी ( पिसवा ), कडस ( लहान गाय ), कुरी ( मेंढी ), कोरबी ( मासा ), जिरळें व झुरळ, आणि तगर ( टगर, मेंढा ) हे प्राणिविषयक शब्द; आणि काउल ( कुरण ) व कणबार ( रेड्याच्या कातड्याची वादी ) हे प्राणिसंबद्ध शब्द कानडी म्हणून दिलेले आहेत. इजट हा शब्द किटेल देत नाहीं. ‘ कोरबी ’चा ‘ कोलंबी ’शीं संबंध आहे काय ? गवळण ( **देनामा** गोअल्ला, प्रा. गोवालिणी ) ( कानडी गवुळी ) हा शब्द संस्कृतोद्भव दिसतो. किटेलनें गोधा शब्दाकडे निर्देश केला आहे ! गुरबी ( चित्रणी ), जाडबुडी ( कोळी ) व नोरज ( डांस ) हे शब्द प्रादेशिक आहेत. वल्ला ( सांपळा ) व गिन्न ( दुधाचा चीक ) हे शब्द कानडी आहेत. कंठाळ या शब्दाची राजवाड्यांची व्युत्पत्ति मान्य करावी असें वाटतें व मग तो शब्द तद्भव म्हणणें प्राप्त होईल.

## नातें

अक्का, अण्णा, अम्मा, अव्वा, आके ( नणंद ) व काकी हे शब्द नात्यांच्या शब्दांत दिसतात. यांतील अक्का पाणिनीयच आहे; अम्बा तर ऋग्वेदकालीन आहे. ( **ग्रासमन**, पृ. ९६ ; **पाणिनी** ७-३-१०७. ) द्राविडी भाषाशास्त्रज्ञ ( **History of the Kannada Language,** p. 75 ) म्हणतात कीं, हे शब्द आर्यांनीं द्राविडसंघांतून घेतले. अण्णा व काकी हेहि तद्भव दिसतात. निकट संबंधदर्शक शब्द त्या मूळ भाषेंतीलच मानावे असें आमचें मत आहे. घोवगाडा ( घोव + गंडा ) हा अर्धवट कानडी शब्द आहे. आदगी ( अत्तिगे, मूळ सं. अत्ति ) हा तद्भव न समजतां कानडी समजावा, असें किटेलवरून म्हणतां येणार नाहीं. चिल्लीपिल्ली यांतील पिल्लूं हें कानडी कीं तेलुगु ? **देनामा** ( ६. ४६ ) मध्यें पिल्ह हा शब्द येतो.

## शरीरावयवांसंबंधींचे शब्द

कोंगा-खोंगा हे शब्द कानडी कोंक-ग ( वांकडेतिकडे ) या शब्दापासून व्युत्पादिले आहेत. ( केसांचा ) खोंगा, कोंगळी ( वांकडी चिंच ) हे शब्दहि असेच कानडी आहेत. गवी ( गुहा ) हा अर्थ **मशाको**कार कानडी देतात. वैदिक गभ = भेग, खोल भाग असा जुना शब्द आहे, आणि गभीर, गंभीर असे विशेषणाचे

शब्द आढळतात; त्यावरून हा शब्द संशयित दिसतो. गुरु (गोवर) हा शब्द असाच संशयित वाटतो. तो कानडींत तद्भव म्हणून आला असल्यास न कळे. **मशको**कारांची व्युत्पत्ति नेहमीं वापरल्या जाणाऱ्या नियमांत (का. गुरुळ) बसेल काय, हें व्युत्पत्तिशास्त्रज्ञांनीं सांगावयाचें आहे. गोड-ग्वड्डु (वांझ) व जड्डु (आजार), जोळ्ळ हे शब्द कन्नड आहेत व प्रादेशिक वापरांत आहेत. डबरा (गुबारा) या अर्थी कानडी डब्बीपासून व्युत्पादिलेला आहे! प्रो. ब्लोक यांच्या मतें डब्बा प्राच्य भाषांतून आलेला आहे (**मराठी भाषेचा विकास,** पृ. १९३). मराठींत डबऱ्या जोडीला डाव आहेच. तेव्हां हा शब्द कन्नड न समजतां तद्भव मानणें योग्य ठरेल. किटेलनें पण डब्बी शब्द निराळ्या तऱ्हेनें मुद्रित करून तो मूळ कन्नड नव्हे, असें दाखविलें आहे.

तरटी-टें या शब्दाबद्दल **मशको**कारांची निश्चिति नाहीं. एका स्थळीं तो फारसीहि दाखविला आहे. त्यावरून तो संशयितच समजावा. सालवळ (वंशावळ) हा प्रादेशिक वापरण्यांत आहे.

मुरकुंडी कानडी मुरु (वळणें) या शब्दापासून व्युत्पादिला आहे. मुरड, मुरगळणें, मुदडणें, दुमडणें, मुरदाड या शब्दांविषयीं असाच प्रश्न उपस्थित होईल. राजवाड्यांच्या व्युत्पत्त्या कठिण आहेत! मुरकुंडी शब्द कानडी 'मुरुकु' या विशेषणाशीं जोडला पाहिजे. फोकली (स्त्रियांचें जननेंद्रिय) हा शब्द कन्नड 'पुकळी'पासूनच आला असेल असें नाहीं. मराठींतील दुसरे फकारादि तदर्थक शब्दहि संस्कृतोत्पन्न आहेत. (त्या शब्दांची व्युत्पत्तिकोशांतील व्युत्पत्ति मान्य होणें कठिण आहे). प्राकृत 'फुग'कडे बोट दाखविणें अधिक सयुक्तिक ठरेल. 'बगडा' कन्नड नसून तद्भव समजणें जास्त न्याय्य वाटतें. कन्नड वगरु-ओरखडणें ही व्युत्पत्ति ग्राह्य वाटत नाहीं; एवढेंच नव्हे तर कानडी वग्गु-वांकणें हाच तद्भव असावा अशी शंका येते. पण तो प्रश्न कन्नड भाषाशास्त्रज्ञांचा आहे. जरी बकारादि शब्दांचें मूळ वकारादि संस्कृतोत्पन्न शब्दांपासून मानण्याचा अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांचा संप्रदाय दिसत नाहीं, तरी अशी व्युत्पत्ति अशक्य नाहीं. हाट (स्त्रियांचा रजःस्राव) हा शब्द कन्नडमूल हाट्ठ असा असून तो प्रादेशिक आहे. ओटी हा 'उपस्थ-'चा मराठींतीलच तद्भव आहे, तो द्राविडी कुळांतील नव्हे. कुरल (केस) हा शब्द संस्कृतप्राकृत परंपरेनें तद्भव म्हणून येतो. (**देनामा** २-६३ पण पाहावी.) इळक शब्द 'लचक' या अर्थी कन्नड प्रादेशिक आहे. किटेलनें त्याची नोंद केलेली नाहीं. कुरूप (गळूं, कानडी कुरुवे-वु) हा शब्द प्रांतविशिष्टच आहे तसेंच गोसटी (गोंवें, मान; कानडी शब्द गोमाळे नसून गोम्याळि पाहिजे) व नंज शब्दांचें होय. नडगी शब्द संस्कृत नड (तुलनार्थ पाहा नाडी-नालि) पासून स्पष्टपणें संभवतो. कानडी नडगे याचा अर्थ केवळ चालणें असा आहे. 'बोच-थ-रखिड्या' यांतील बोचर या कानडी शब्दापासून आला असें **मशको**कार म्हणतात; पण किटेलनें तो

बारीक लिपींत छापून कन्नडेतर गणला आहे. बोचरा म्हणजे केवळ दंतविहीन नव्हे तर दांतांत फटी असलेला; म्हणून कन्नड व्युत्पत्ति संशयित वाटते. मुसंडी या शब्दाच्या दाखविलेल्या कानडी मूलांचा–मुसंडी, मुसुंडी यांचा–अर्थ निराळा आहे; मुसुड्ड याचा अर्थ जनावराचें मुसकट असा आहे. ह्या शब्दाची चिकित्सा होणें आवश्यक आहे.

## वस्त्रें व अलंकार

वस्त्रविषयक शब्दांत ओंटा ( धोतराचा घोळ, का. उडि ), गिंट ( कर्नाटक, दुहेरी सुताचें वीण असलेलें भक्कम लुगडें ), गोट ( वस्त्राच्या बाजूला घातलेली मुरड किंवा किनार वा फीत ), चड्डी ( कुस्ती, तालीम इ. वेळीं वापरावयाची अर्धी वा तत्सम विजार ), चोगा ( पायघोळ अंगरखा ), चोळणा ( का. चल्लण ), तडव ( का. तडपु, झोऱ्या ) व तडवा ( चांदवा ), धवला ( का. दप्प, जाडेंभरडें व भक्कम वस्त्र, कापड ), पागोटें ( का. पागु, शिरोवस्त्र ) व सोगा ( वस्त्राचा लोंबता भाग ) हे शब्द **महाराष्ट्र शब्दकोशांत** कानडी म्हणून दिले आहेत. ओंटा हा शब्द प्रादेशिक वापरांत आहे. त्याच्या स्वरूपावरून तो तद्भव ( *उपस्थक ) असा असावा अशी शंका येते. त्याच्यावरील अनुस्वार हा उच्चारांत नसावा असेंहि वाटतें. गिंट हा प्रादेशिक आहे; तो कानडी असण्याचीच शक्यता वाटते. गोट हा शब्द हिंदी शब्दकोशांतून संस्कृत गोष्ठपासून तद्भव म्हणून मानलेला आहे. चड्डी हा शब्द किटेलनेंहि कानडी म्हटला आहे. हेमचंद्राचा ( ४-२०६ ) चड् = आरुह् या धातूशीं किंवा मराठी चढणें–चढविणें याशीं या शब्दाचा संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आम्हीं पाहिला आहे. फार तर चडिअ या प्राकृत रूपाशीं त्याचें साम्य दाखवितां येईल. कानडींत तो शब्द किती जुना आहे, हें तपासण्यानेंहि त्या शब्दावर अधिक प्रकाश पडेल. त्याचें मूळ संस्कृत छद्–मध्यें सांपडेल काय? आज इतकेंच म्हणतां येईल. चोगा हा शब्द तुर्की आहे. तो हिंदींतहि त्याच अर्थी आहे. तडव व तडवा यांशीं जवळ असलेला सुतडा शब्द आहे. परंतु तो निराळा आहे. धवळा याचें मूळ म्हणून दिलेल्या कानडी द-ध-प्प शब्दाचा जाडेंभरडें वस्त्र असा अर्थ कानडींत नाहीं. धवला व धाबळ-ळी या शब्दांची कांहींशी तुलना करतां येईल. पगडी हा शब्द इतर आर्यभाषांतूनहि निरनिराळ्या स्वरूपांत आढळतो. पागोटें व हा शब्द मूळ शब्दांत एकमूल असावेत असें वाटतें. पागडी या गुजराथी शब्दाचा रूढ अर्थ निराळा असला तरी तो शब्द या पगडी शब्दापासूनच व्युत्पन्न झाला आहे. पटक्यासारखें वस्त्र राजस्थानी लोक वापरतात. हिंदींतील पगडी शब्द पटकपासून व्युत्पादिला आहे. हिंदींतहि पाग असा मराठीसारखा शब्द आहे. त्याचाहि शिरोवस्त्रांतच अंतर्भाव होतो. परंतु हा शब्द पटकपासून व्युत्पादितां येईल असें वाटत नाहीं. प्रग्रथ्– पासून कदाचित् शक्य होईल. आज हा शब्द तद्भव आहे व तो कानडी वाटत नाहीं, एवढेंच सांगता येईल. पगडी ही मराठीच असावी याचें

दुसरें गमक असें सांगतां येईल कीं, कर्नाटकांतील कांहीं भाषांध मंडळींनीं पगडी घालणाऱ्या हरिदासांचीं कीर्तनें उधळून लावल्याचें कांहीं मंडळींनीं सांगितल्याचें स्मरतें. गुजराती मंडळी पगडी शब्द मराठी मानतात असें समजतें.

अलंकारांत कट्ट ( अंगठी ), कणा ( अंगठीस वाटोळा आकार द्यावयाचें हत्यार ), कंदुरी, कंदोरी ( कडदोरा ), काप ( कर्णभूषण, का. कोप्पु ), केंपु ( लाल माणिक ), खोपा ( बुचडा, का. कोप्पु ), गेणा ( पायाच्या बोटांतील चांदीचा अलंकार ), टोपण ( बाळ्यांचा प्रकार ), तट्ली ( बायकांचा जोडा ), तोंगल ( मोत्यांचा घोंस, झुपका ), मुडें ( डोक्यांतील मोत्यांचा अलंकार ), मफौरा ( तीन पिळांचा गळ्यांतील अलंकार, का. मप्पुरि ) व मुरकी ( कानांतील डूल ) हे शब्द कानडी म्हणून दिले आहेत. महाराष्ट्रशब्दकोशकारांनीं कंदुरी-दोरी हा शब्द संशयित धरला आहे, तें योग्य असून तो तद्भवच आहे. खोपा हा शब्द महाप्राणयुक्तव्यंजनादि असल्यानें तो बहुधा द्राविडवर्गीय नसावा. अंबाडा, बुचडा, खोंपा हे शब्द केश-रचनेला अनुलक्षून वापरले जातात. खोपडा-डी हे शब्द हिंदींतहि केशरचनेला अनुलक्षून आहेत. संस्कृत क-खर्पर-खप्पर ( हे. १.१८१ ) वरून ते हिंदी शब्द-कोशांतून व्युत्पादिले असले तरी खोपा-मधल्या ओ ची नीट व्यवस्था केल्यावांचून ही व्युत्पत्ति मान्य करणें कठिण होईल. द्राविड शब्द मूळ संस्कृतांतून आला असल्यास ठाऊक नाहीं. टोपण हा शब्द व टोप, टोपी हे संस्कृतोद्भव आहेत. प्राकृत कोश टोपिआ शब्द वा टोप्पर हा शब्द देतात. ते देशी म्हणून दिलेले आहेत. मराठींतील मूर्धन्यांचें – विशेषतः आद्य मूर्धन्यांचें – स्पष्टीकरण कित्येक स्थळीं फार कठिण असतें, हें लक्षांत ठेवणें फार महत्त्वाचें आहे. मुडें शब्द कानडींतील मुडी = अनलंकृत एकवेणी या शब्दापासून व्युत्पन्न करितांना त्याचा अर्थ एक अलंकार असा होईपर्यंत दाखविणें कठिण आहे, असें आम्हांस वाटतें.

कोरनाड हा शब्द एका पेठेच्या साड्या या अर्थीं तंजावरी ( प्रादेशिक ) आहे. रकटें, रगटें कानडी रट्टु पासून व्युत्पादिलेलें आहे. परंतु कचा किंवा गचा शोध त्यांत नाहीं. मराठींतील अंगरखा शब्द पाहिल्यास ( हा शब्द अंगरक्षक असा राजतरंगिणींत येतो ), तर त्यांतील अंत्य पदावरून या शब्दाच्या व्युत्पत्तीचा माग लागेल असें प्रस्तुत लेखकास वाटतें. बतना ( पगडीच्या आंत घालावयाची छोटी पगडी या अर्थीं ) हा शब्द हिंदी असेल काय ? तो अपभ्रष्ट दिसतो.

## गृह्य

घरासंबंधीं शब्दांत कट्टा हा शब्द कानडी आहे. कोंप ( खोंपट ), कोंपट हे शब्द संस्कृत क्षौपक-क्षौम्पकपासून आले असले पाहिजेत. क्षुप-क्षुम्प = झुड्प यांपासून ते बहुधा व्युत्पन्न झालेले असावेत. देशी खुंपा शब्द असाच आहे. चांदई हा शब्द किटेल अकन्नड समजतो व मराठीकडेच बोट दाखवितो. तुळई व तुळी

हे शब्द संस्कृत (तुल्-) पासून उत्पन्न झालेले स्पष्टच आहे. पौळी (प्रावृति) व व पागर (प्राकार-पागार) संस्कृतोद्भवच होत. बेळकें (दुबेळकें) हा किटेल कानडी रूपांत देत नाहीं व पहिल्या या अंगावरून तो द्वि-पासून आला आहे हें स्पष्ट होतें. मोरी शब्दासंबंधीं फार मौज आहे. **महाराष्ट्र शब्दकोश** तो कानडी म्हणतो. किटेल मराठीकडे बोट दाखवितो, तर डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन तो शब्द आपल्या फारसी शब्दकोशांत परकीय मानतात. तो संस्कृत मुख-पासून येणेंच योग्य दिसतें. समोर, मोहरा, मोहोरी (तोंडास घालण्याची) हे शब्द तुलनेसाठीं पाहावेत. दिंडी (लहान दार) हा शब्द किटेल अकन्नड समजतो.

भांड्यांमध्यें अडणी (का. अड्डुणिगे), कलपरटें (दगडी भांडें), कैपंजी (हातांतील पणती), कोळगें (भांडें) व गिंडी हे शब्द कानडी दिसतात. कंच हा कांस्यचा तद्भव असला तरच संस्कृतोद्भव असेल. खलबत्ता हा शब्द किटेलनें अकन्नड दिला आहे. संस्कृतमधील खल (उलूखलहि) व प्रा. बत्ता (*वर्त्तक) यांचेवरून मराठी शब्द आलेला असावा. चम्बू हा ताम्रचा अपभ्रंश असूनहि कानडीच होय. डबी (डबराविषयीं पूर्वीं लिहिलें तें येथें आठवेल; पहा **बीम्स व्याकरण** भाग १, पृ. २२५), टवळी (टवळें = पितळी पंती ? देनामा) व सोऱ्या हे शब्द कानडी नाहींत. टकारादि वर्गांतील शब्दांविषयीं निर्वाळा देतां येत नाहीं. (मूर्धन्यांची खरी व्युत्पत्ति दुर्बोध आहे—**मराठी भाषेचा विकास**, पृ. १४८).

इतर उपकरणांत अडकित्ता, कडीत व बुट्टी हे कानडी समजले जातात. बुट्टी हा कानडींत तद्भव असणें शक्य आहे. झाल (ऐरणी झाल) हा शब्द कानडी आहे. लग्नांतील केळवण-गडगनेर इत्यादींप्रमाणें डोक्यावर झाल धरण्याचा संप्रदाय मराठी दिसत नाहीं. गावडी, गुडदी व तोटी हे कन्नडेतर समजणें योग्य ठरेल. तट्टू = शेवट, बाजू असा एक किटेलचा शब्द आहे.

ओकळी (तांबडा रंग, चुना-हळदीचें रंगीत पाणी), केमण (का. केंपु + मण); चवड (का. सिवडी), तट्टया, तटकी (का. तट्टु) व पन्नीर हे किटेलच्या मतें कानडी आहेत. ओरट (मिरच्यांचा वास–हा इंद्रियांतरित अनुभवाचा शब्द–Synaeasthetic), गोणपट (सं. गोण–गोणी), तोण्डका (का. टोण्णे, किटेलच्या मतें अकन्नड) व बेगड (हाहि अकन्नड) हे शब्द कानडी नव्हत. बेगड हा **व्युत्पत्तिकोशांत** कानडी धरला आहे! आधार दिलेला नाहीं. तट्टी, तटकी, तडकी, चटई, तट्टया हे शब्द हिंदींतहि आहेत, गुजरातींत पण आहेत. म्हणून किटेलचीं मतें येथें तपासून घेणें अगत्याचें आहे.

## धान्य व खाद्य पदार्थ

अवलकि (पोहे), आरोगण (भोजन), उप्पिट (उप्पु + हिट्टु), एसर, ओगर-वोगर, ओघरणें-वोघरणें, कटवणी (पुरणाची आमटी), कडबू (कर्नाटकीयांचे कडबू

आपल्यापेक्षां फार मोठाले असतात.), कायरस (काइ + रस), गिन्ना (प्रादेशिक, खर्वस), तांबीट, पचडी (बारीक बारीक तुकडे करणें असा अर्थ असलेल्या धातूपासून), बेळेंपोळें (गूळभात), बोनें (भात), येडे व हुग्गी (खिचडी, गव्हाची खीर), हे शब्द कानडी आहेत. कडबू, कटवणी, कायरस व पचडी हे खूप वापरांत आहेत. पचडी शब्द तर मराठींत गेल्या २७-२८ वर्षांइतकाच जुना असावा. राजवाड्यांच्या ओगर व ओघरणें यांच्या स्वतंत्र व्युत्पत्तीस वगारी-बगारी या उत्तरेस हिंदींत (फोडणी या) समान अर्थीं प्रचलित असलेल्या शब्दानें बळकटी येईल.

उंडी, उसळ, कोचकाई, कोशिंबीर, खोबरें (यांतील महाप्राणावरून तो कन्नडेतर असावा असा संशय येतो, असें प्रो. बसवनाळ यांचें मत होतें), गोंज, तुरी, तूप व मूद हे शब्द कानडी नसणें शक्य दिसतें. उसळ हा शब्द किटेलनें कन्नडेतर दिला आहे. तसेंच त्याचें मत कोसंबरी व तुवरि किंवा तोगरि या शब्दांबद्दल आहे. मूद हा संस्कृत मुद्रय् धातूपासून एक बन्धन-विशेष या अर्थीं (किंवा मुद्रक-आच्छादन इ.) आला असावा. बारीक सारीक अर्थछटांचा उपयोग व्युत्पत्ति करतांना लक्षांत घेतल्यास व्युत्पत्ति व शब्दमूलें शोधून काढणें अधिक सुकर होईल. मूद म्हणजे वाटोळा गोळा नसून एका विशिष्ट आकाराचा दाबून एक बाजू चपटी केलेला भाताचा गोळा, रचनाविशेष होय. कोचकाई यांतील काई हा उत्तरार्ध स्वरूपतः कानडी दिसतो. परंतु कोचकाई या अर्थानें हा शब्द कानडींत वापरला जात नाहीं. काई हा काय = राशि अशा अर्थाचा संस्कृतोद्भव शब्द असावा. तूप हा शब्द डॉ. कत्रे यांनीं (**भांडारकर इन्स्टिटयूट जर्नल**, १९३८–३९ तृप्त) दाखविल्याप्रमाणें संस्कृत तृप् धातूपासून निर्माण झालेला असल्यानें तो संकृतोद्भव आहे आणि जुन्या कानडी भाषेंत तो शब्द नाहीं असें समजतें.

धान्यविषयक शब्दांत अकि, अवरा (हा तामिळ असेल काय?) ग्वळ्ळी (टरफल), गुदग-साल, अळसांदे-हळसांदे, बडदी, बणगी, बाळदिंड (तंजावरी), वगर (तुरट, उदा. सुपारी) व सजगुरा हे शब्द कानडी आहेत.

## सामाजिक

केळवण, गडगनेर व मंगळसूत्र यांतील पहिले दोन शब्द कानडीच आहेत. मंगळसूत्र हें श्री. भास्करराव जाधव यांच्या मताप्रमाणें द्राविडी चालीरीतींपासून आल्यानें पद्धतीनें द्राविडी आहे. शब्द मात्र संस्कृतोत्पन्न आहे. मंगल हा शब्द विवाह-सूत्रबन्धन या अर्थीं 'स्वप्नवासवदत्तम्' या नाटकांत (**त्रिवेंद्रम् संस्कृत सीरीज**, पृ. ४९) येतो. मंगळसूत्र या स्थळीं मङ्गलप्रतिसर हा शब्द **मालतीमाधवांतहि** येतो. (अंत्रैः कल्पितमंगलप्रतिसराः ५. १८; **वेणीसंहार** 'सितांशुका मंगलमात्रभूषणा।' ३.१२ पण पहा). पण मंगलप्रतिसर म्हणजे मंगलकंकण दिसतें; कारण

**किरातार्जुनीयांत** ‘सस्तोरगप्रतिसरेण करेण पाणिः’ ( ५-३३ ) असा स्पष्ट उल्लेख आहे. विवाहकौतुक म्हणून कालिदास जो शब्द वापरतो ( उदाहणार्थ, “करोयमा-मुक्तविवाहकौतुकः” ) त्यावरूनहि तें हस्तभूषण असावें. आपट्यांच्या शब्दकोशांत मङ्गलप्रतिसर व मंगलसूत्र हे शब्द एकत्र देऊन गळ्यांतील मंगळसूत्र दर्शविलें आहे. पण पडिसर याचा प्राकृतमध्येंहि हस्तसूत्र, कंकण असाच अर्थ दिसतो. एकंदरींत जाधवांचें मत बहुधा बरोबर असावें व मंगलसूत्र म्हणजे गळ्यांतील मंगळसूत्र या अर्थी ही चाल द्राविडी असल्यानें हा शब्द भाषांतरऋण म्हणून समजला जावा. परंतु तो ज्या अर्थी संस्कृतोत्पन्न आहे. त्या अर्थी ती चाल द्राविडी आणि तो शब्द संस्कृतोत्पन्न समजणें प्राप्त आहे. गुढीपाडवा यांतील गुढी हा शब्द कानडी समजला जातो. किटेलनें तो अकन्नड दिला आहे व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, चैत्र पाडव्याला गुढी उभारण्याची चाल कर्नाटकांत नाहीं. ही पद्धति ( गुढी उभारण्याची ) पुष्कळ जुनी आहे व त्याचा इंद्राशीं संबंध जोडल्याचें सुपरिचित आहे. कानडी मूल म्हणूनच संशयित वाटतें. बोळवण ( पाठवणूक ), बिऱ्हाड हे दोन शब्द कानडी नसावेत. परंतु बिढार हा शब्द किटेल कानडी समजतो. संस्कृत विष्टरकपासून हा शब्द कदाचित् उत्पन्न झाला असेल तर न कळे. मिरवणूक व मिरवणें हे शब्द कन्नडमूल दिसतात. राजवाड्यांची ‘मर्व् गतौ’ ही व्युत्पत्ति संभाव्य वाटत नाहीं. घुंबड व टोमणी हे प्रादेशिक वापरांत असून संशयित वाटतात.

### खेळ

अटकचटक, आटकमाटक व अडगुलेंमडगुलें ( **चित्रमयजगत्** १९१६, १९३२ डिसेंबर पहा ) हे शब्द कानडी आहेत. अळोंच्यो मळोंच्यो संशयित वाटतो. कट, कडत, कण, केड करणें, गिच्ची ( भोंवऱ्याच्या खेळांतील शब्द ), गिडमंग्या, चिणी-नी व वड्डी हे शब्द कानडी आहेत. भुताटकी संशयित वाटतो.

## वृत्ति, जाति इत्यादींचे वाचक

उंडेकार, कट्टिमणी, कुरबुर, कोरबू, गुरव, चिगलेबिगले, जेड, तराळ, तिरमल्ली, परैया, बलुतें, बालबसव, बेरड, बोगार, मडवळ, मडिग, मेदार, वडार व सूळी ( वेश्या ) हे शब्द मराठींत प्रादेशिक म्हणून वापरण्यांत असून ते कन्नड आहेत. बिडवई व भोपी मला संशयित वाटतात. बिडवई हें आडनांव मीं इंदूर-देवासकडेहि ऐकिलें आहे. ज्ञानकोशाप्रमाणें कोलकार व कोलाटी-टीण हे कानडी ठरत नाहींत. कोळावें व गुंजावा ( सुताचा गुंडा ) आणि नखोदा व नाखवा हेहि संस्कृत तद्भव आहेत. गौडा-गावडा संस्कृतोद्भव आहे. ( पहा ब्लोक, **मराठी भाषेचा विकास**, पृ. ३९१ ).

आडंगी, उ–ओ–वरकल, उंकी, उडंत्री, उलिंगवाडी, अंगडी, कुट्टुळतें, कुडता, कुरळी, गुतका, गुत्ता ( दारूचा ), गुडार, टाणकोल, मळगी, मुद्दी, सारगी व होरी यांतील गुत्ता हा शब्द सोडला तर इतर प्रादेशिक म्हणूनच वापरतात.

अंची, उगराणी, कट (सैन्यव्यूह), कडाणी, काणी, घालणी, चिल्लर, तरास ( तराजू ), मांकण, सारी व हुडा यांतील उगराणी, काणी तरास व मांकण हे शब्द किटेलनेंहि अकन्नड व तद्भव म्हणूनच मानले आहेत. इतर शब्द योग्य रीतीनें शोधणें आवश्यक आहे. अंव्या व अंबवणी हे शब्द अशाच वर्गात येतात. दिल्लीच्या गेल्या प्राच्यविद्यापीरषदेच्या अधिवेशनांत द्राविड ऋणाविषयीं दिसून येणारी दृष्टि या लेखकानें १९३९ मध्येंच सुचविली होती.

## संख्या, वजनें-मापें

संख्येमध्यें विटीदांडूचे शब्द येतात. त्यांची चर्चा तेलुगु भाषा व मराठी या विभागांत केली आहे. येळकोट या शब्दाची चर्चा खंडोबाबरोबर मागें केली आहे. चकडी ( आठ वस्त्रांचा समूह, का. चेक्कु–गट्ठा ) यावरून येतो, असें **महाराष्ट्र-शब्दकोश**कार म्हणतात. चक्कु हा शब्द म्हैसूरमध्यें वापरण्यांत येतो. तो ( a kind of checkered cotton cloth ) किटेलनें परकीय म्हटला आहे.

खंडी ( माप ) हा शब्द **मशाको**कारांच्या मतें द्रा. कंडि, का. कंडुग असा आहे. कंडि हा द्राविडेतर असावा, असें किटेलचें मत दिसतें. कंडुग शब्दाचा अर्थ २०–२८ मण असा त्यानें दिला आहे. मराठी खण ( वस्त्रविभाग, कोष्ठविभाग, खोलीचा खण ) हा शब्द सं. खण्डपासून स्पष्ट आलेला दिसतो. शेर ( = सेर ) शब्द लीलावतींत आहे. ( पादोनगथा नकतुल्यटंकैर्द्विसप्ततुल्यैः कथितोऽत्र सेरः । ) टांक, छटाक, अदपाव, पाव, अच्छेर, पायली, अधोली इत्यादि मापवाचक शब्द संस्कृतोद्भव आहेत. तेव्हां हा बहुधा संस्कृतोत्पन्न शब्द असावा. गुंठा हा अंतरदर्शक शब्द किटेलनें परकीय लेखिला आहे, म्हणजे कन्नडेतर मानला आहे. व्हिट्वर्थ तो मराठी समजतो. **हॉब्सन-जॉब्सन** इंग्रजी म्हणतात. चिटकें, पड ( = दोन शेर ) व पाड ( = बरोबरी, योग्यता ) हे शब्द कानडी मानतात. परंतु पडि ( प्रति ) म्हणजे तुल्यता किंवा सादृश्य हे प्राकृतांत संस्कृतमधून आलेलें रूप पाहतां मूळ कानडी शब्दहि असाच तद्भव असण्याचा संभव बळावतो, हें स्पष्ट आहे. तूक ( वजन ) व तुकाई ( त्यापासून झालेलें ताद्धित ) हे शब्द कन्नडमूल आहेत.

## वाङ्मयीन

दिण्डी हें वृत्त राजवाड्यांच्या मतें (मराठी छंद, शके १८४४, पृ. ४ ) ‘ डिंडिम ’ शब्दाचा परिचय उत्पन्न करणारें आहे. किटेलहि ‘ दिड्डु ’ छंदनाम म्हणून देत नाहीं. कटबंध हाहि मराठीच आहे. **महाराष्ट्रशब्दकोश**कारांच्या व्युत्पत्त्या मानतां येण्यासासारख्या नाहींत.

## भाववाचकें

उलि ( ळि ) ग (=सेवा ), कुरु ( चिन्ह ), घासी, जोळ्ळ, तोंड, दटावणी, पडवा–वें, बिडगी, बिडती, यड्डु व हाळ हे शब्द **महाराष्ट्रशब्दकोश**कार कन्नड म्हणून देतात. तोड (सं. तोल ) व दटावणें ( राजवाडे–दरापय्, भिवाविणें ) हे संस्कृत तद्भवच आहेत. उरक ( वैदिक उरुष्य ), गट व गट्टी ( सं. घट, ग्रन्थि–गट्टी ), ओरंडी ( हिंदी ओर =बाजू, सं. अवार ), टंगळमंगळ ( सं. *तंगनमङ्गनम् ), टूक ( तुड्ड ) ( हिंदी तुकडा, टुकडा पहा ; मराठी तुकडा ), तुळवट (=जिकिरीचें काम ), व नेडें ( आधार ; सं. नीड, हा शब्द अथर्ववेदाइतका जुना आहे. ) हे शब्द कन्नडेतर मानणेंच योग्य ठरेल. डुबर (= वाटोळा ), कारोट व हाळ ( नाश ) हे शब्द अनिश्चित वाटतात.

'उब'– या अवयवानें आरंभ होणारे बरेच शब्द **महाराष्ट्रशब्दकोश**कारांनीं कानडी मानलेले आहेत. ते तद्भव असण्याचा संभव आहे. ( उदा. उबटाण–ठाण–साण, उबस–घाण वास इ. ; उबवण. राजवाडे–उष्म. )

## विशेषणें

अगरगंड, इल्ला, उच्च ( का. हुच्च ), उंडगा, केट्टगा, कोक, कोंगल्ल, कोंगी, कोंगे, कोल, खोंगळा-ळी, गतकेडी, गुचकुला ( ध्वन्यर्थक ), गुन-घून, गोड्डु, ग्वड्डु, घटसान, घम्मनमेट, चिकर, चिटकुला ( ध्वन्यर्थक ? ), चिणकुला, चिणोरा, चिनकागा, चिनकु-( गु ) ला-चिनुकला, चिनमुला, चिनाटी, चिंनीमारी, चिनुला, चिनोरा, चिलवाण, चुंगडी ( तंजावर, गुजराथी ? ), जिगटा-जिगी, बिरुस, बिळगा, बेंगरूळ, वोळें, मटगा, यबड, वट व सपक हीं विशेषणें प्रादेशिक रीत्या वापरलीं जातात. यांतील चकारादि शब्द विचारार्ह आहेत. °कुला, °कुरा, °गुला, ओरा, वाण, इत्यादि प्रत्यय इतरत्रहि दिसतात. त्यांतील मूळ शब्द चिन्न-चिण्ण हा संस्कृत चीर्ण ( बारीक तुकडा ) असा असणें शक्य आहे. ज्याप्रमाणें चुरा, चुना ( चूर्ण ) त्याप्रमाणेंच चीर, चिन्न इत्यादि रूपें दिसतात. चिन्न म्हणजे कानडींत सोनें होय !

ओज, किरटा, कुरटा-ठा, कावराबावरा ( सं. कातर– ), कोडगा ( मोरोपंती काव्यांतील 'स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी **कोटिगा**' केकावलि १७, ही व्युत्पत्ति कल्पित असणेंच शक्य आहे ), गुंड-डा, गुड्डु, गिड्डा, बुटका, गोजिरा, गोरामोरा (गौर–), घंटीचोर, टोणा ( किटेलनें हा अकन्नड म्हणून दिला आहे.), ठळक, ठाऊक ( ठाव, स्थान ), ढड्ढ-धड्ढ ( दड्डु ), धोबड, रोड, फोल, भकास, भोगोळ ( भोंगळ ), यडपट, हेंगडा हीं विशेषणें व्युत्पत्तिदृष्ट्या कन्नड नसणेंच अधिक शक्य आहे. व्युत्पत्ति दाखविणें हा या निबंधाचा मूळ हेतु नाहीं; परंतु असे शब्द नमूद करणें महत्त्वाचें आहे.

उमा ( चुंबन ), ओरंगळ, कटवणी ( पाथरवटाचें हत्यार ), करड ( वाळलेलें गवत ), काकुलती, खाट ( मिरच्यांचा तिखटाचा खकाणा ), गिचागिंदा ( एकत्र कालवलेला ), गिचमिट-ड, गिचगोळा, गुड्डप, गुद्दा, चिळकांडी, डम, तिरिमिरि, धबदुल, धबाली, पलपलाट व बोकणा हे शब्द **महाराष्ट्रशब्दकोशां**त कानडी म्हणून दिले आहेत. यांतील कांहीं शब्द स्पष्टपणें उच्चारांचें अनुकरण दर्शविणारे आहेत. त्याचप्रमाणें कांहीं शब्दांचें ऐंद्रिय अनुभवांतर करून ( एका इंद्रियाचा अनुभव दुसऱ्या इंद्रियामार्फत व्यक्तविणें ) सिद्ध झालेले आहेत. काकुलती याची व्युत्पत्ति सं. काकलि, कन्नड कक्कुलाते अशी अनिश्चयाचीच दिलेली आहे. आधार-आधेय यांची उलटापालट कानडी व्युत्पत्तींत होतें असें वाटतें, कारण कानडींत अनुकंपा ( दुसऱ्याची ) असा अर्थ आहे. गुड्डप व तत्समानार्थी गुरुप भिन्नभाषिक दाखविले आहेत; एक कन्नडमूलक तर एक अरबी! चिडमीड व गिचमीड, धबदूल व गबदूल धबाली व ढमाली, बोकणा-भोकणा इत्यादि शब्दांचा संबंध सूक्ष्म विचारांतीं ठरवून व्युत्पत्ति देणें अवश्य वाटतें.

## न्यूनार्थ–अधिकार्थ

उंडारणें, उंडगा हे शब्द कन्नड उंडिग ( भोजनभाऊ ) पासून येतीलहि. किटेलनें त्याचा अर्थ—A single solitary male, who has neither parents nor relations—असा दिला आहे; त्यावरूनच हे शब्द येतील काय, असा विचार मनांत येतो. मराठी शब्दाचा अर्थ थोडा निराळाच आहे. दुड्ढा–दुड्ढाचार्य यांतील प्रथमायवय कानडीच आहे. कोंगाडी ( सोंगाड्या ) हा कन्नड शब्द म्हणून **महाराष्ट्रशब्दकोश**कार देतात. गुंज, टकोरें ( डोकें ), पापुद्रा–पापोडा, टगेगिरी-टग्या ( सं. स्थग, ठग, ठक ? ), टोणपा–पेश्वर, ( आग ) डोंब, ढपळं ( पाणी ), खूळ, चहाड–चाडी ( चुगली ), टवाळ, टोमणा व हेंगल यांतील कांहीं शब्दांचीं मूलें कन्नडेतर आहेत; पण कांहीं अनिश्चितच आहेत. त्यांच्या व्युत्पत्तीचा शोध होणें अवश्य आहे.

## क्रियाविशेषणें

इशी (इश्श), इकड, उगा (=गप), उत्काडे, कड्डन व हिंग हे शब्द **महाराष्ट्रशब्दकोश** कानडी समजतो. हिकडे–इकडेच्या जोडीस तिकडे पण विचारार्थ घेतलें पाहिजे. संस्कृतमधील इतः व ततः शब्द विचारार्थ सुचतात. हिकडे ( **कम्पॅरेटिव्ह ग्रामर**, भाग ३, १८७९. पृ. २६१ ) बीम्स द्राविड समजतो !

इथपर्यंत आपण मराठी शब्दसंग्रहांतील कानडी शब्दांची चर्चा केला. यापूर्वी मराठी शब्दसंग्रह हा मूलतः कानडी आहे. ( वैद्य, **निबंध व भाषणें**, पृ. ६) व मराठी भाषेचें मूल कानडी आहे ( वि. रा. शिंदे, **केसरी**, इ. स. १९२३ )

अशी समजूत पुष्कळच दिवस प्रसृत असल्याचें दिसून आलेलें आहे. कानडी भाषा मराठीपेक्षां जुनी असेल, कदाचित् एका आग्रही मताप्रमाणें कन्नड लोकांचें अपसारण करून त्या ठिकाणीं मराठी भाषा स्थानापन्न झाली या चुकीच्या मतांतहि अल्प सत्य असेल, मराठी शब्दसंग्रहांत आजच्या वापरांत सामान्यपणें १०० च्या आंत मध्यवर्ती भाषेंत कानडी ऋणशब्द वापरलेहि जात असतील; परंतु मराठी भाषेचें मूल कानडी भाषा होय, हा अपसमज यापुढें शब्दसंग्रहावरून तरी पूर्णपणें अयथार्थ आहे हें वरील चर्चेवरून दिसून येईल. मराठींत आढळणाऱ्या या थोड्या कानडी शब्दांतहि देशी म्हणून येणारे व कदाचित् मूलतः संस्कृतोद्भव असणारेहि शब्द आहेत, हीहि गोष्ट आपण विसरतां कामा नये. वैदिक संस्कृत, अभिजात संस्कृत व पुढें माहाराष्ट्री प्राकृत या भाषांतील शब्दसंग्रह हाच मराठी शब्दसंग्रहाचा गाभा होय, ही गोष्ट अनाग्रही पंडितांनीं मान्य केली पाहिजे. बीम्स म्हणतो, (**व्याकरण,** भाग ३ पृ २६१, भाग १ पृ. १०–१९) "दोन्ही भाषांत तोच शब्द आढळला तर तो मूलतः द्राविडीच होय, हा समज आग्रहाचा ठरतो व त्यापासून सत्य निष्पन्न होत नाहीं."

मराठी व्याकरण व कानडी व्याकरण यांतहि मूलतः भेद आहेत हें विसरतां येणार नाहीं जोंपर्यंत मराठी व्याकरणाची बैठकहि स्वतंत्र आहे तोंपर्यंतहि हा पूर्वीचा निष्कर्ष यथार्थ ठरणार नाहीं. तो सध्यांचा विषय नसल्यानें शब्दसंग्रहापुरताच निष्कर्ष येथें काढला आहे.

## २. तेलुगु व मराठी

तामिळ भाषेच्या खालोखाल संस्कृति व शब्दसंग्रह या दृष्टींनीं महत्त्वाची भाषा तेलुगुच होय (काल्ड्वेल, **कम्पॅरेटिव्ह ग्रामर,** १९१३, पृ. २७). आंध्र प्रदेश हा ऐतरेय ब्राह्मणकालापासून संस्कृत वाङ्मयांतहि निर्दिष्ट आहे. आंध्र प्रांत शातवाहन किंवा शालिवाहन राजांच्या आधिपत्याखालीं होता. हे शालिवाहन चिं. वि. वैद्य यांच्या मतें (**मध्ययुगीन भारत,** भाग १, पृ. १६९-१७०) नागवंशीय होते व सातव्या शतकांतहि मराठे लोकांत नागवंश होता. आन्ध्रप्रान्तीय नाण्यांचाहि संबंध उत्तरेकडील नाण्यांशीं स्पष्ट दिसतो. (पहा, व्हि. स्मिथ EHI; **इंडियन ॲंटिक्वेरी,** पुस्तक ४२, श्रीनिवास आयंगार यांचा लेख); एवढेंच नव्हे तर प्राकृत शब्दहि या नाण्यांवर आढळतात. यावरून आपणांस असें म्हणतां येईल कीं, खिस्तपूर्व इ. स. तिसऱ्या शतकापासून मराठी व आंध्र लोक यांचा संबंध ऐतिहासिक दृष्ट्या आला. सतरावा आंध्र राजा हाल हा इ. स. ६८ च्या जवळपास होऊन गेला व तो माहाराष्ट्री भाषेंतील '**सप्तशती**' काव्याचा कर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु तेलुगु वाङ्मय इ. स. आठव्या वा नवव्या शतकांपूर्वीं थोडेंच, फारच थोडें आहे, ही विवाद्य गोष्ट नाहीं. (**प्राच्यविद्या परिषद इतिवृत्त,** म्हैसूर).

तेलुगु भाषेंत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ आहे. प्राकृत भाषाकारांनीं आंध्र भाषा ही उत्तरेकडील प्राकृत भाषा असें म्हटलेलें जरी दिसतें (रामकृष्णय्या, **स्टडीज् इन् द्रविडियन फायलॉलॉजी,** १९३५, पृ. १८) व केतन हा तेलुगु वैयाकरण जरी "ताळि संस्कृतंबे येल्ल भाषालकुनु" असें आपल्या **आंध्रभाषा-भूषणम्** मध्यें म्हणाला असला तरी तेलुगु ही द्रविड कुलांतील भाषा आहे, याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

तेलुगु व मराठी भाषा यांचा मुख्य संबंध पूर्वीच्या हैदराबाद राज्यांत आलेला आहे. आपल्या इकडे खेडोपाडींहि येणारे कैकाडी किंवा वडार यांची भाषा तेलुगुच होय. मराठींतील 'बुरगुंडा' हा शब्द या लोकांच्या व आपल्या संबंधाची साक्षच आहे.

## तेलुगु शब्दऋण

तेंलुगु भाषेचे शब्द मराठी भाषेंत फार आलेले नाहींत.

मराठीमधील विटीदांडूच्या खेळांतील संख्यामापनाचे शब्द तेलुगु आहेत असें आम्ही नेहमीं समजत आलों असून हा खेळहि तेलुगु आहे, असें अनैतिहासिक विधान **व्यायामकोशां**त आलेलें आहे. परंतु येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, ती ही कीं हे शब्द कानडी भाषेंतून घेतले गेले असण्याचाहि तेवढाच संभव आहे. वकट, रेंड-लेंड, मुंड हे शब्द दोन्हीकडून आले असण्याचाहि संभव आहे. रेंड-लेंड **मोल्स्वर्थ** कोशांत दिसत नाहींत. मुंड **मोल्स्वर्थ** व **मशाको** तेलुगु म्हणून देतात. यापुढील शब्द मात्र तेलुगु म्हणून दिलेले आढळत नाहींत! जो 'नाल' शब्द अरबी म्हणून मोल्स्वर्थ देतो तो संख्यावाचक नसून 'घोड्याचा नाल' या अर्थी पाहिजे. **मशाकोनें** तो कानडी म्हणून दिला आहे. ऐद (पांच) हा शब्द **मोल्स्वर्थ** किंवा **महाराष्ट्रशब्दकोश**कार देत नाहींत. आर हा शब्द मोल्स्वर्थ व्युत्पादीत नाहीं; **मशाको** कानडी म्हणून देतो. **मशाको**मध्यें वैद (सहा हा कानडी कीं तेलुगु अशी प्रश्नचिन्हांकित नोंद आहे. हे सर्व संख्यावाचक शब्द संस्कृतोत्पन्न आहेत असें म्हणणारी मंडळी आहेतच. पण आपणांस त्या मताशीं येथें तरी कर्तव्य नाहीं. त्याची चर्चा काल्ड्वेलनें केलेली आहे. आमच्याकडे जीं रूपें आहेत, तीं द्राविड असल्यानें या द्राविड भाषाशास्त्रांत शिरण्याची आम्हांस आवश्यकता वाटत नाहीं.

आतां केवळ यावरून विटीदांडू हा खेळ द्राविडीच आहे असेंहि निःपक्षपातानें म्हणतां येणार नाहीं. इतर आर्यभाषांत असणारे या खेळाचे निदर्शक शब्द आपल्यास तपासतां येतील. गुजराती शब्दकोशांत विटीदांडूचा पर्याय 'गिलीदंडा' असा दिलेला आढळेल. संस्कृतमध्यें असलेल्या वीटिका शब्दापासून 'विटी' हा शब्द येतो.

आपट्यांच्या संस्कृत शब्दकोशांत 'वीटा' शब्द या अर्थी येतो (पृ. १००३, १८९० प्रत) महाभारत (१.१३१) येथें हा शब्द येतो. शब्दमहार्णवांत हा पर्याय किंवा शब्द आढळत नाहीं. गिरि म्हणजे विटी, गिरीयक म्हणजे 'चेंडू' असे शब्दहि संस्कृत कोशांत आढळतात. हिंदी कोशांतहि (हिंदी शब्दार्थपारिजात, पृ. २०३) "गिल्लीदंडा" हें रूप हिंदी म्हणून दिलेलें आढळतें. त्यांतील गिल्ली या शब्दाचा 'गुल्ली' असाहि पर्याय संक्षिप्त हिंदी शब्दसागरांत आढळतो. तो गुलिकापासून किंवा गुटिकापासून व्युत्पादणें शक्य आहे. असें तर नसेल ना कीं, प्रथम कांहीं चेंडूसारखा पदार्थ, नंतर लहान लहान गोट्या किंवा त्याहि पुढें लांकडी विट्या वापरल्या गेल्यानें गुल्ली–गिल्ली–दंडा हा शब्द प्रचारांत आला असावा ! मराठींत चेंडूदांडू म्हणण्याची किंवा चेंडूफळी म्हणण्याचीहि अशीच पद्धति आहे. असो. आर्योद्भव भाषांतून हे शब्द किती जुने आहेत हें मला येथें दाखवणें शक्य नाहीं. मराठीमध्यें एकनाथांच्या भजनांत (**भजनी बोधपर पदसंग्रह**, पृ. ११३) "ओकटलेंडमुंडनाला पुढें आणिलें कां भक्तिबळें खेळ खेळू जनार्दनीं" असा उल्लेख येतो तेव्हां तत्पूर्वींच हा खेळ व ही मापनपद्धति मराठींत आलेली होती हें स्पष्ट दिसतें. वर दिलेल्या महाभारतसंदर्भात द्रोणानें विहिरींतून विटी बाहेर काढल्याचा उल्लेख आलेला आहे. त्यामुळें तो खेळ पुष्कळ जुना आहे हें निर्विवाद होय. मराठींत या द्राविडी शब्दांच्या जोडीस 'एक, दोन ...झक्कू' अशीहि मापनपद्धति आहे. श्री. भावे यांच्या महाराष्ट्र सारस्वतांत (पृ. २१५–१६) हा खेळ दुष्काळांत मराठी माणसें परागंदा होऊन महाराष्ट्रांत परत आलीं त्या वेळेस आला व त्या खेळांतील शब्द तेव्हां आले असें अनुमान आहे. महाभारतांतील संदर्भावरून अशी कल्पना करण्यास आतां वाव उरत नाहीं !

येळकोट हा कानडी शब्दहि पुष्कळ जुना असला पाहिजे. खंडोबासंबंधींहि तें दैवत द्राविडी असल्याचा संशय आहेच. तुकारामबुवा हा शब्द वापरतात. ('आधीं होता वाघ्या' हा अभंग पाहा). तेव्हां कांहीं द्राविडी संख्यावाचक शब्दपर्याय मराठींत जुन्या काळापासून–एकनाथपूर्वकालापासूनहि असावेत, असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नाहीं.

अनरसा हा शब्द तेलुगु (अकि कानडी = आरसे तेलगू) म्हणतां येईल कीं काय, याचा संशय वाटतो. आमच्या माहितीप्रमाणें तेलुगु लोकांत हें पक्वान्न नाहीं. मोल्स्वर्थनें हा शब्द हिंदी दिला आहे. तो बहुधा अन (नञर्थी) + रसा (*रस्यक) असा असावा. 'चावम्याव' या शब्दांतील चाऊ हें पूर्वपद तेलगू 'चेवी' होय. बंडी (गाडी या अर्थी) हा शब्द तेलुगु कीं कानडी हा निश्चय होत नाहीं. देशी भण्डिआ–भण्डी हा शब्द गाडी या अर्थी आढळतो, त्याचा व संस्कृत भाण्ड (*भाण्डिका) यांचाहि संबंध आहे. 'बुरगुंडा' हा तेलंगी शब्द म्हणून मोल्स्वर्थ व

इतर कोशकार देतात. तो स्पष्टपणें अपभ्रष्ट आहे. चमकुरा (अळूचीं पानें) हा वऱ्हाडांत असलेला शब्द चाम + कुरा असा असला पाहिजे. 'कप्पी' शब्द तेलुगु म्हणून दिलेला आहे.

अडसण हा शब्द बहुधा ध्वन्यनुकारी असल्यानें त्याची तेलुगु म्हणून दिलेली **मशकों**तील व्युत्पत्ति बरोबर वाटत नाहीं. ती व्युत्पत्ति द्राविडी प्राणायामाइतकीच सोपी व सुकर वाटते! इतकें करूनहि मूळ मराठी शब्द तेलुगु कीं कानडी याविषयीं निश्चय होत नाहीं. अरवार, अरवाळ, अरुवार हे शब्द सारखेच आहेत. त्यांचा अर्थ 'मृदु' असा आहे. करडा (=कडक) हा शब्द संस्कृत खर- असा असला पाहिजे. मराठींत खरड, करडणें इत्यादि शब्द एतन्मूलकच आहेत. या शब्दाची व्युत्पत्ति **मशको** तेलुगु 'करडूं' अशी देतो! राजवाडे यांच्या करडणें या शब्दाच्या व्युत्पत्त्या मान्य होण्याजोग्या नाहींत. 'कांचका' (सागरगोटा, गजगा) हा शब्द महाराष्ट्रशब्दकोशकार तेलुगु 'कवचकाह'पासून व्युत्पादितात. गुजराथी शब्दकोश 'कंटकरंज' (संस्कृत) हें मूल असावें या मताचे आहेत! गजगा, गजरगोटी, गजरी ह्यांपैकीं शेवटचे दोन मोल्स्वर्थनें दिलेले आहेत. मराठी सागरगोटा हा शब्द व या खेळांत आढळणारे हातग्या, सुपल्या, पांचखाच, नऊखऊ सातभात, अकराबकरा, बोरखडा व हंडी हे शब्द स्पष्टपणें मराठी आहेत.

कामत हा शब्द तेलुगुच दिला आहे. तो कानडीहि असेल. कामाठी हा जातिवाचक शब्द अनिर्णीत दिसतो. कोडी (वीस) हा शब्द ऑस्ट्रिक समजला जातो. (Bagchi *Pre-Aryan and Pre-Dravidian;* Grierson, *BSOS* I P. 71 and 73) तेलुगु कोडिग हा शब्द या ऑस्ट्रिक शब्दाशीं संबद्ध असेल काय? चक हा शब्द तेलुगु 'चेकु' असा दिला असला तरी तो संस्कृत चक्रशीं संबद्ध दिसते. 'चेकु' चा 'चक' होणेंच आधिक कठिण आहे. 'जाकळणें' हा शब्द मशको तेलुगु किंवा कन्नड म्हणजे संशायित मानतो. झाक, झांकळ या मराठी शब्दांशीं तो संबद्ध आहे. म्हणून तो तेलुगु असेलच, असा भरंवसा देतां नाहीं. जाड हा संस्कृत जाल (any woven tetxure) असाहि असूं शकेल. हा ज्ञानेश्वरींत (७·८५) येतो. टाळा व टाळी (कुलूप या अर्थी) हे शब्द **मशको**-मध्यें तेलुगु-मूलक मानलेले आहेत (तेलुगु टाळमु). संस्कृतमध्येंहि ताल व तालयंत्र हे शब्द येतात. (आपटे, पृ. ५३६ ताल. A lock or bolt; तालयंत्र a lock, lock and key. **लघुगीर्वाणकोश** पृ. २२४ कुलूप. २२५ कुलूप-किली; तसेंच तालिका = किल्ली पृ. २२३). **प्राकृतशब्दमहार्णवांतहि** (पृ. ५६३) ताल (ताला, द्वार बन्द करनेकी कल) असा शब्द आहे. किल्ली सुद्धां पुष्कळ जुनी आहे. या अर्थी कुञ्चिका हा शब्दहि हर्षचरित (उच्छ्वास ५) व भर्तृहरी शृंगारशतक (६३) येथें येतो. प्राकृत कुंचिगा किंवा कोंचिगा हा शब्द या अर्थी प्राकृत शब्दकोशहि देतात.

यावरून असें वाटते कीं, टाळा हा शब्द संस्कृत *तालक असला पाहिजे. किल्ली शब्दाचें ब्लोक यांचें निर्वचनहि येथें लक्षांत घेतलें पाहिजे. येथें दुसरी गोष्टहि ध्यानांत घेतां येईल. मराठी कुलूप हा शब्द अरबी कुफ्लपासून व्युत्पादिला जातो; तो संस्कृत कुडुप (=फांसा, दागिन्याचा) यापासून आला असावा. कुडुक, कुडकी हें शब्दहि याच मूळाचे दिसतात. असो, हें विषयांतर झालें ! पंचांगी हा शब्द पुरोहित या अर्थी तंजावरांतहि आहे. त्याचा पंचांग या संस्कृत [ तिथि, वार, नक्षत्र, योग व करण हीं पांच अंगें देणारा ग्रंथ (तिथिर्वारश्च नक्षत्रं योगः करणमेव च ।)] शब्दांशीं उघड संबंध आहे हें स्पष्ट आहे. पण मराठींत तो तेलुगु वा तामिळ तद्भव समजणेंच योग्य ठरेल. बरड हा शब्द (माळभूमि या अर्थी मशकोकार तेलुगु म्हणून देतात. बरडी हा शब्द असाच **भरडी** (सुपारी) या अर्थी वापरतात. हें केवळ सादृश्य म्हणूनच लिहिलें आहे. मिडकणें हा शब्द मोल्स्वर्थच्या आधारावरच बहुतेक **मशको**कार तेलुगु म्हणून देतात. के. रामकृष्णय्या (**स्टडीज् इन द्राविडियन फिलॉलॉजी**, पोलिसिलॅबिक रूट्स्, पृ. १६५) तेलुगु मडियु धातूचा अर्थ मरणें असा देतात. मोल्स्वर्थ- From Teloogoo, to long and pet after. असा अर्थ दिला आहे (पृ. ६५२). राजवाडे ( **मराठी धातुकोश**, पृ. २२३ ), मिद् (स्नेहने) + अकच् असें निर्वचन करतात. या बाबतींत तेलुगु पंडितांचें साहाय्य पाहिजे. ज्ञानेश्वरींत हें क्रियापद येतें. शिकेकाई हा शब्द तेलुगु शिगा (सं. शिखा) + काई = शेंग असा महाराष्ट्रशब्दकोशांत आहे. प्रो. बसवनाळ यांच्या मतें सिगे-सीगे या कानडी शब्दाचाहि अर्थ शिकेकाईचें झाड असाच आहे.

लुकण तेलुगु अलुकूपासूनच व्युत्पादणें कदाचित् शक्य असलें तरी मराठी लिकणें, लिटकणें, चिकटणें, डिकणें, डकणें इत्यादि रूपांशीं तो कांहींसा समान आहे. श्लिष् धातूपासून तो नसेलच असें सांगणें शक्य नाहीं. चिक्खल, चिक्की, चिकचिक्, चिक्कण इत्यादि रूपेंहि कदाचित् अशींच स्पष्ट होतील. केवळ पाश्चात्य पंडितांनीं मान्य केलेल्या सिद्धान्तानुरूपच निर्वचन करणें अवश्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मोल्स्वर्थनें लुकण हिंदी म्हटला आहे तें योग्य वाटत नाहीं (पहा, **बीम्स**, Vol. II, पृ. ६२).

एकंदरींत तेलुगु भाषेंतून आलेले शब्द आज मराठींत फारच थोडे आहेत. संस्कृतिदर्शक असा परिणाम या भाषेनें मराठी शब्दसंग्रहावर केलेला नाहीं हें अनुमान यावरून स्पष्ट होतें. मराठीचा श्रेष्ठ तेलुगु संस्कृतीशीं यावरून फारच थोडा संबंध आला हेंहि अनुमान योग्य ठरेल; किंवा मराठी भाषेच्या मूळ शब्दसंग्रहांतच एवढें धन अगोदर होतें कीं, अशा शब्दऋणाची फार गरज मराठी भाषेस वाटली नाहीं. नाहींतर कानडी भाषेच्या शब्दांइतके तरी तेलुगु शब्द मराठी भाषेंत आढळले असते. असो.

## ३. तामिळ व मराठी

तामिळ व तेलुगू या भाषांच्या गोडीमुळें त्यांना "पूर्वेकडील इटॅलियन भाषा" असे या भाषांचे तज्ज्ञ म्हणतात. जुन्या द्राविड व्याकरणकारांच्या मताप्रमाणें तामिळ व तेलुगु या भाषा संस्कृतोत्पन्न आहेत. तरीहि 'नंजुल'चा कर्ता तामिळ भाषेचा व्याकरणकार, हा संस्कृतोद्भव शब्दांविषयीं कांहीं नियम देतो. डॉ. गुंडेर्ट व काल्डवेल यांनीं या भाषा स्वतंत्रच आहेत असें मत दिलें असून ब्रिटिश आमदानींत याच मताचा पाठपुरावा आमच्या दाक्षिणात्य बंधूंनीं केलेला आढळतो. तामिळमध्यें संस्कृत शब्दांचें मिश्रण चाळीस टक्के असून तत्त्वज्ञान, धर्म व कलाविषयक आणि इतर पारिभाषिक शब्द हे सर्व संस्कृतच दिसतात. द्रविड हें नांव देखील संस्कृतमूल असून द्रविड-द्रमिड-द्रमिल-तमिळ या परंपरेनें तमिळ हाहि शब्द निघाला असें ग्राऊल, काल्ड्वेल व गुंडेर्ट इ. विद्वानांचें मत आहे. मराठी व तामिळ यांचा संबंध मराठी लोकांनीं दक्षिणेंत व विशेषतः तंजावरला राज्यस्थापना केल्यावरचा आहे. (इ. स. १६६४). हें मराठी राज्य १८५५ इ. स. मध्यें डलहौसीच्या वरवंट्यांत खालसा झालें.

आज मराठींत जे तामिळ म्हणून शब्द **मशाको**मध्यें दिलेले आहेत ते विशेषतः तंजावरकडचेच असून प्रादेशिक वापरांत मुख्यतः आढळतात. मांजर-मादर-पाट, मलय, सार (चिंचेचें), चाटी, तामिळ हे सर्वश्रुत शब्दच मुख्यतः मराठींत आढळतात. चाटी हा शब्द जुन्या मराठींत असावा. परंतु त्याची नोंद किती जुनी आहे, हें सांगतां येत नाहीं. मोल्स्वर्थनें दिलेलें उद्धरण बहुधा मुक्तेश्वरी असावें. विसोबा खेचराला चाटी म्हणत असत. सार हा शब्दहि संस्कृत आहे. तामिळ लोक 'रसम्' हा शब्द वापरतात.

मलय हा शब्द आम्ही संस्कृतमधूनच घेतला आहे. काल्ड्वेलनें तो शब्द संस्कृत भाषेनें द्राविड भाषांतून घेतला असें म्हटलें आहे.

In any case, however, a Sanskrit origin has erroneously been attributed to a Dravidian word of this class. मलय a mountain or mountainous range in S. India is represented as being derived from मल् (10) San. to hold or contain (Sandalwood). The real origin is Dravidian Mal-a, Mal-ai, a hill or a mountain, and also a hilly and mountainous country, and the range of mountains referred to under the name of मलय is doubtless of the Southern Ghat or the Malayalam Country. which is called Male by the later Greek and early Arabian Geographers (3rd Ed. p. 575).

देशीनाममालेंत मलओ या स्वरूपांत तो आढळतो. महाभारत व मुद्राराक्षसांतहि या पर्वताचा उल्लेख आहे. तो एक कुलपर्वत आहे. डॉ. बर्जेसच्या मताप्रमाणें मलयभूमि ( *Indian Antiquary, XI* ) नांवाचा जिल्हा गंडकी व राप्ती या नद्यांच्या वरच्या बाजूस नेपाळांत आहे. असो.

चाटी हा श्रेष्ठिन् चा अपभ्रंश आह. त्या शब्दाचे इतर अपभ्रंश चेट्टी, चेट्टियार या स्वरूपांत द्राविडी भागांत आढळतात. पंचतंत्र व मुद्राराक्षस यांत श्रेष्ठिन् हा शब्द व श्रेष्ठिचत्वर हाहि शब्द आढळतो. मराठींत येणारा चाटी हा शब्द हा द्रविड भागांतूनच आलेला समजावा; कारण संस्कृत शकाराचा चकार मराठींत झालेलीं उदाहरणें अत्यल्प आहेत.

मांजरपाट व मादरपाट हे दोन्ही शब्द मोल्स्वर्थ देतो. मोल्स्वर्थ तो शब्द तामिळ समजत नाहीं. त्यानें मादरपाट a kind of cloth from Madrepollam व मांजरपाट ( or मादरपाट ) a cloth or stuff made at Madrepollam असा दिला आहे. कोणी कोणी याचा अर्थ मँचेस्टरपाट असाहि करितात ( **केसरींतील निवडक निबंध**, पहिलें पुस्तक पृ. १३७ ). मलय हा शब्द आम्ही तत्सम मानतों.

सामान्यपणें मराठींत २५ शब्द तामिळमधून येतात, असें महाराष्ट्रशब्दकोशावरून दिसतें. यांतील बहुतेक शब्द तंजावरकडे प्रादेशिक वापरांतच आहेत. कांजी हा शब्द आम्ही संस्कृतोद्भवच समजूं. ' सार ' निराळें व रसम् निराळें; त्यामुळें ' सार ' हा शब्द संस्कृतोद्भव समजणेंच योग्य ठरेल. ' भंडी ' हा शब्द तेलगूमध्यें व कानडीमध्यें पण आहे; परंतु तंजावरकडेच हा शब्द मराठी लोकांच्या वापरण्यांत येत असल्यानें तो तामिळच समजावा.

एळव, ओंडप, कोट्टा, कोत्त, जाडी, टेंगूळ (चकली), तोंडी, मट्टा, पडतोरा व भंडी हे सर्व प्रादेशिक आहेत. इतर शब्द महत्त्वाचे तर नाहींतच; परंतु ते कानडी व तेलुगु असण्याचाहि संभव आहे.

---

# ज्ञानदेवांचें शंकास्पद वाङ्मय

## द्रोणपर्व

ज्ञानदेवांच्या वाङ्मयाचा ज्यावेळीं आम्हीं अभ्यास करतों, त्या वेळीं चिकित्सक विद्यार्थ्याला त्याचे तीन प्रकार पाडावे लागतात : अस्सल, संदिग्ध आणि बनावट किंवा अन्य ज्ञानदेवांनीं लिहिलेलें. ज्ञानेश्वरांच्या नांवावर आज अनेक ग्रंथ आहेत व अद्यापि सांपडत आहेत. त्यांची वर्गवारी केली पाहिजे. इंग्रजी भाषेमध्यें बायबलला जें स्थान आहे तेंच महत्त्व मराठी भाषेमध्यें ज्ञानदेवांच्या लिखाणाला आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. बायबल याचा अर्थ ज्यांत ईश्वरी प्रकटीकरणाची नोंद आहे असा लिखितसंग्रह ( The collection of writings which contains the records of Divine Revelation ). *Biblia* हा ग्रीक भाषेंतील शब्द असून त्याचा मूळ अर्थ अनेकवचनी ग्रंथ ( " The books " ) असाच आहे. बायबलच्या अभ्यासकांनींही या ग्रंथांपैकीं कांहीं भाग शास्त्रप्रमाण ( canonical ) आणि बाकीचा संदिग्धप्रमाण किंवा शंकास्पद ( apocryphal ) मानलेला आहे. ज्यू किंवा खिस्ती यांचें प्राचीन वाङ्मय एके काळीं दैवी प्रेरित असें मानलें जात होतें; परंतु कोणत्याही कारणानें कां होईना, ज्याला पुढें canonical म्हणून सर्वमान्यता मिळाली नाहीं अशा लिखाणाला " apocrypha " असें नांव व्यापक रीतीनें आज लावण्यांत येत आहे. जुन्या करारांतील ज्या लिखाणाचा ज्यू लोकांनीं त्याग केला, परंतु खिस्ती लोकांनीं ज्याचें कसेंतरी संरक्षण करून ठेवलें, असे ग्रंथ बहुतेक apocryphal म्हणून ओळखले जातात. हे मूळ ग्रंथ बहुतेक आरामाइक किंवा हिब्रू भाषेमध्यें होते. ग्रीक भाषिक ज्यूंकरितां त्यांचीं ग्रीक भाषेमध्यें भाषांतरें करण्यांत आलीं आणि त्यांचा जेंटाइल लोकांमध्येंदेखील प्रसार होता. आरामाइक व हिब्रू भाषेंतील हे मूळ सेमिटिक ग्रंथ आज नष्ट झाले आहेत. मुद्दाम तसा हुकूम काढून त्यांचा अनिष्ट म्हणून नाश करण्यांत आला असेंही म्हणतात. ग्रीक भाषांतरें मात्र कांहीं शिल्लक राहिलीं आहेत व अलीकडे सांपडलीं आहेत. उदाहरणार्थ, the Assumption of Moses, the Testament of Job, the Book of Adam आणि the Odes of Soloman हे एकोणिसाव्या शतकापर्यंत केवळ नांवापलिकडे ठाऊक नसलेले ग्रंथ आजच्या अभ्यासकांना छापून उपलब्ध झाले आहेत. कांहीं ग्रंथांना canonical म्हणून पवित्र शास्त्राचा दर्जा कां द्यावा व बाकीच्या ग्रंथावर apocryphal असा शिक्का मारून निराळ्या पंक्तीला कां बसवावें, यासंबंधीं पुष्कळ भवति न भवति होऊन कांहीं ग्रंथांना बायबलांत apocrypha म्हणून स्थान मिळालें आहे; पण त्यांना 'पवित्र शास्त्र' ( Holy Scripture ) म्हणून मान्यता नाहीं. जुना करार व नवा करार यांच्यामध्यें त्यांना

एक निराळी वसाहत करून देण्यांत आली आहे, असें आपणांस १६११ सालच्या The King James Bible वरून दिसून येतें. सेंट जेरोम यानें apocrypha पैकीं Judith, Tobit, Maccabees, Sirach, Wisdom अशांसारखीं कांहीं उपयुक्त पुस्तकें आपलें परमार्थज्ञान वाढविण्याकरितां वाचावीं; परंतु धर्माचे सिद्धांत स्थापन करण्याकरितां त्यांचा उपयोग करूं नये असें म्हटलें आहे. ( They may be read for edification, but not to support Church dogmas. ) लूथरचा प्रतिस्पर्धी जर्मन विद्वान् Karlstadt अशा निवडक पुस्तकांना "libri agiographi" असें नांव देतो व बाकीचीं खिस्ती लोकांच्या उपयोगाच्या दृष्टीनें टाकाऊ ठरवितो. अशा प्रकारें apocryphal वाङ्मय हा युरोपांत अभ्यासकांचा एक महत्त्वाचा विषय ठरलेला आहे व त्यासंबंधीं अनेक ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत. Apocrypha ह्या शब्दाचा मूळ अर्थ प्रच्छन्न (concealed, hidden) असा असून आतां त्याला अज्ञात ग्रंथकर्तृक किंवा अज्ञात प्रामाण्य (a writing of doubtful authorship or authenticity), बनावट (spurious), काल्पनिक (mythical) असे अनेक अर्थ प्राप्त झाले आहेत. असेच, खऱ्या कर्त्यांच्या ऐवजीं भलत्याच माणसावर लादलेल्या ग्रंथांना Pseudepigrapha (म्हणजे writings ascribed to another than the true author) किंवा Pseudograph (म्हणजे a literary work purporting to be by another than the real author) असेही शब्द अस्तित्वांत आहेत; परंतु apocrypha हाच शब्द जास्त रूढ आहे.

पुढील अस्सल किंवा शंकास्पद (apocryphal) ग्रंथ ज्ञानदेवांच्या नांवावर उपलब्ध असलेले दिसतात :—

**मुद्रित**

१. **ज्ञानेश्वरी** — (हा ग्रंथ अनेकांनीं प्रसिद्ध केला आहे).
२. **अमृतानुभव** — ( ,, ,, ,, ,, ,, ).
३. **चांगदेवपासष्टी** — ( ,, ,, ,, ,, ,, ).
४. **अभंग** — ( ,, ,, ,, ,, ,, ).
५. **हरिपाठ** — ( ,, ,, ,, ,, ,, ).
६. **योगवासिष्ठ**—( सं. गो. का. चांदोरकर, धुळें १९१४ )
७. **उत्तरगीता**—( प्र. रा. श्री गोंधळेकर; ३ री आ. पुणें. १९०७ )
८. **पंचीकरण**—( काव्यसंग्रह ).
९. **शुकाष्टकटीका**—( काव्यसंग्रह ).
१०. **स्वात्मानुभव**—( काव्यसंग्रह ).
११. **भक्तिराज**—( काव्यसंग्रह ).
१२. **पदें**—( काव्यसंग्रह ).

**१३. उत्तर पंचविंशी**—हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्याचें चांदोरकर आपल्या 'महाराष्ट्रीय संत-कवि-काव्य-सूचीं'त लिहितात; परंतु तो आमच्या पाहाण्यांत आलेला नाहीं. याच्या दोन हस्तलिखित प्रती तंजावरला सरस्वतीमहाल लायब्ररींत आहेत. (८७-८८)

**१४. गायित्रीरहस्य**—हाही ग्रंथ चांदोरकर छापील म्हणून लिहितात. याचीं हस्तलिखितें मराठी संशोधनमंडळ व श्रीसमर्थवाग्देवतामंदिर (धुळें, १७०६) या संस्थांच्या संग्रहीं आहेत.

## हस्तलिखित

१. **नमनस्तोत्र** (५४७), **नमनस्तुति** (६६२), **नमन** (९०६) अशीं तीन हस्तलिखितें श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत (धुळें) आहेत. तीं एकच असावींत. "**दिव्यनमन**" म्हणून एकशें आठ ओव्यांची एक विष्णुनामावळी यानें केली आहे. या ग्रंथास कोणी प्राकृत विष्णुसहस्रनाम म्हणतात. परंतु विष्णूच्या हजार नांवांची यांत भरती होईल कीं नाहीं याची शंका आहे," असें भारद्वाज आपल्या 'ज्ञानदेव व ज्ञानेश्वर' या लेखमालेंत लिहितात. हा ग्रंथ छापलेला असल्यास मीं पाहिलेला नाहीं. तंजावर येथेंही याचें एक हस्तलिखित आहे (१६१).

२. **कल्याणपत्रिका**—लेखणी किंवा लेखन याहि नांवानें हा ग्रंथ प्रसिद्ध असल्याचें धुळ्याच्या कॅटलागवरून दिसतें (१०८६). या ग्रंथाची ५१ वी ओवी अशी आहे:—

> गर्जोनि निवृत्तिज्ञाननाथ। ऐसें अबोलणें वाचित।
> हें पत्र पैठणीं येकनाथ। वाचील वो माय॥

या एकनाथाच्या नामनिर्देशावरून हा ग्रंथ आद्य ज्ञानदेवाचा नाहीं हें उघड ठरतें. **लखणी** हस्तलिखित तंजावर येथेंही आहे (३५२).

३. **अर्जुनगीता**—याचें हस्तलिखित धुळ्याला (१७०६) आहे. "या ग्रंथाच्या ज्या दोन हस्तलिखित प्रती मिळाल्या आहेत, त्यांपैकीं एकीवर 'भगवद्गीता' व दुसरीवर 'अर्जुनगीता' अशीं नांवें आहेत", असें भारद्वाज लिहितात. या ग्रंथाची ८ वी ओवी पुढीलप्रमाणें आहे: 'त्या उपकारास्तव नमस्कारू। नमिला श्री ज्ञानेश्वरू। आतां नमूं श्री गुरु। जेणें अज्ञानांधकारू। फेडिला॥ या ओवींत ज्ञानदेवानें ज्ञानेश्वरास नमन केलें आहे, त्यामुळे हा ग्रंथ आद्य ज्ञानेश्वराचा नाहीं, हें उघड आहे. धुळ्याच्या 'भगवद्गीतेवरील टीका' या त्रुटित हस्तलिखितांतही (८८) अशीच ओवी आहे.

४ **गीतासार**—या ग्रंथाचीं हस्तलिखितें धुळें व तंजावर येथें आहेत. धुळ्याच्या (४४४) हस्तलिखितांतील ओवीसंख्या ३५४ असून या ग्रंथांतदेखील

" त्या उपकारास्तव नमस्कारू । नमिला तो ज्ञानेश्वरू । आतां नमूं श्रीगुरु उदारू । जेणे अंधकारु फेडिला ॥ " असें ज्ञानेश्वरास नमन असल्यामुळें हा ग्रंथ आद्य ज्ञानदेवाचा नाहीं हें स्पष्ट दिसतें.

५. **तत्त्वमसि**—या ग्रंथाचें हस्तलिखित धुळ्याला आहे ( ११०२ ). ' प्रकरण अप्रकाशित वाटतें, प्रकाशित व्हावें, ' असें शंकरराव देव लिहितात.

६. **पंचमुद्रा**—या ग्रंथाचें हस्तलिखित धुळ्याला ( १३५९ ) व तंजावरलाही ( १८० ) आहे.

७. **मुद्राक्रम**—या ग्रंथाचेंही हस्तलिखित धुळ्याला ( १५१० ) आहे. हा व वरील ' पंचमुद्रा ' हे दोन ग्रंथ एकच आहेत कीं काय हें पाहिलें पाहिजे.

८. **महावाक्यनिरूपण**—धुळ्याला ( १६०३ ) आहे. **पंचीकरण महावाक्य** असाही एक ग्रंथ धुळ्याला आहे. ( ३१६ ). हे दोनही ग्रंथ एकच आहेत कीं काय कळत नाहीं.

९. **अद्वैत-निरूपण**—तंजावर येथें आहे ( ३ ).

१०. **धर्मगीता**—तंजावर येथें आहे ( १६० ).

११. **प्राणसांखळी**—तंजावर ( २४३ ) येथें आहे.

१२. **गुह्यपंचक**—धुळें ( २५२ ). समाधीचे पांच अभंग.

१३. **जोशी, जोहार**—धुळें ( १७४ ). पदें.

१४. **सप्तपदी**—धुळें ( १५३७ ). कांहीं अभंगांना हें नांव दिलें असावें.

१५. **हस्तामलक**—धुळें ( १२०० ). एकनाथांचा हस्तामलक प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनींही लिहिला आहे असें वरील हस्तलिखितावरून कळतें.

वर धुळ्याचे म्हणून ज्या ग्रंथांचा निर्देश आहे ते श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील व तंजावरचे म्हणून उल्लेखिलेले सरस्वतीमहाल लायब्ररीमधील आंकडे हस्तलिखितांचे अनुक्रमांक समजावे.

## निर्दिष्ट

याशिवाय चांदोरकरांच्या ' महाराष्ट्रीय संत-कवि-काव्य सूची 'मध्यें पुढील ग्रंथ ज्ञानदेवांचे म्हणून निर्दिष्ट आहेत. परंतु ते सध्यां कोठें आहेत कळत नाहीं.

( १ ) योगिनी, ( २ ) अमृतसंजीवनी, ( ३ ) अन्वयव्यतिरेक, ( ४ ) उत्तरपत्रिका, ( ५ ) गुह्यसप्तक, ( ६ ) गुरुपट, ( ७ ) मुद्राप्रकाश, ( ८ ) स्वात्मपत्र, ( ९ ) स्वात्मबोध ( स्वात्मानुभव व हा ग्रंथ एकच असावा ).

ज्ञानदेवांच्या नांवावर असलेल्या ग्रंथांची साधारण कल्पना येण्याकरितां वरील यादी दिली आहे. हस्तलिखित म्हणून दिलेल्यांपैकीं एकादा दुसरा प्रसिद्ध झालाही असेल. एकाच नांवाखालीं दोन ग्रंथ असतील. गुह्यपंचक, गुह्यसप्तक हीं

निवडक अभंगांचीं नांवें असतील. ह्या ग्रंथांच्या नकला मिळवून ते प्रत्यक्ष एकमेकांशीं ताडून पाहिल्याखेरीज निश्चित कांहींच सांगणें कठीण आहे. अमृतानुभव हा ग्रंथ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवाचा नाहीं, असें कोणी प्रतिपादन केलेलें मला माहीत नाहीं. अभंग, चांगदेवपासष्टी या ग्रंथांसंबंधींदेखील शंका घेण्यांत आलेली आहे.

ही जी ज्ञानदेवांच्या खऱ्या किंवा शकास्पद (apocryphal) ग्रंथांची यादी दिली आहे, तिच्यामध्यें भर घालणारा एक नवा ग्रंथ अलीकडे उपलब्ध झाला आहे, तो म्हणजे ज्ञानदेवविरचित "द्रोणपर्व" हा होय. महाभारताचे मराठी अनुवाद पूर्ण किंवा कांहीं पर्वांचे अनेक कवींनीं केलेले आहेत. विष्णुदासनामा, गोपाळ, माधव, अमृत, चंद्रात्मज, नरहरि मोरेश्वर, नवरसनारायण, शुभानंद, मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत अशीं किती तरी नांवें सांगतां येतील; परंतु निवृत्तिप्रसादें ज्ञानदेवें श्रोतेयां महाभारताचें एकादेंच पर्व कां होईना सांगितलें आहे, हें कुणाला माहीत आहे?

गोवासरकारच्या ऐतिहासिक दप्तराचे प्रमुख सर पांडुरंग पिसुर्लेंकर यांनीं आपल्या संग्रहीं विष्णुदासनाम्याच्या महाभारताचें एक बाड असल्याचें मला कळविलें होतें. विष्णुदासनाम्यावर प्रबंध लिहीत असलेल्या एका विद्यार्थिनीच्या उपयोगाकरितां म्हणून तें मीं तिकडून मागवून आणलें. हें बाड त्रुटित असून अरण्याचा कांहीं भाग, वैराट, उद्योग, भीष्म, द्रोण व शल्य (त्रुटित) अशीं यांत कांहीं पर्वें आहेत; परंतु यांपैकीं द्रोणपर्व विष्णुदासनाम्याचें नसून ज्ञानदेवाचें आहे असें माझ्या नजरेस आणण्यांत आलें. या पर्वाचें एकूण प्रसंग पांच आहेत. पहिल्या प्रसंगाची ओवीसंख्या ३८, दुसऱ्याची ६११ तिसऱ्याची ३५२, चवथ्याची ३१६ व पांचव्याची ३०९ म्हणजे या ग्रंथाच्या एकंदर १६२६ ओव्या आहेत.

ग्रंथकर्तृत्वासंबंधीं या ग्रंथांत निर्देश आढळतात ते पुढीलप्रमाणें:—

**प्रसंग १**

ह्मणोनि साष्टांगीं प्रणिपातु । दासचरणा लागतु ।
ऐसा स्वामि **निवृत्तिदासु** । धरिला जिवि ॥ २३ ॥
आतां **निवृत्तिदासाचेनि** प्रसादें । कथा बोलैन आनंदें ।
तुह्मिसिद्धिच्याने विनोदें । मुनेश्वरि ॥ २४ ॥

× × ×

द्रणपार्वंची कथा बोलतां । **निवृत्ति**प्रसादें आइकतां ।
जैसि प्रेमयाचि सरीता । बहुत वानु ॥ ३६ ॥
ऐसें सोम ॐसाचें सांखडें वैलें । **ज्ञानदेव** बोलिले ।
ह्मणोनि सरतें केलें । **निवृत्ति**प्रसादें ॥ ३८ ॥

**प्रसंग २**

ऐसा अवेस्वरू आइकतां । फिटे महापातकांचा खता ।
**ज्ञानदेवो** विनविता । **निवृत्ति**प्रसादें ॥ ६११ ॥

**प्रसंग ३**

हा अवेस्वरू आइकतां । फिटे महापातकांचा खता ।
**ज्ञानदेवो** विनविता । **निवृत्ति**प्रसादें ॥ ३५२ ॥

**प्रसंग ४**

ऐसि महापर्विचि कथा । **ज्ञानदेवो** श्रोतेयां सांगता ।
येकलक्ष आइकिजे आतां । **निवृत्ति**प्रसादें ॥ ३१६ ॥

**प्रसंग ५**

महापर्वकथा आइकोन । संतोषला कवि आपण ।
**निवृत्तिदेवो** संतोषोन । मस्तकिं हातु ठेविला ॥ ३०४ ॥
**ज्ञानदेवो भानुदेवो । निवृत्ति** याचा सखा हो ।
यस्वदापरिसदेवो । स्नान करूं गेले ॥ ३०५ ॥
अवघे स्नान करोनि । संध्या अनुष्टान सारोनि ।
**ज्ञानदेवार्थें** येवोनि । बोलति पैं ॥ ३०६ ॥
ऐसि द्दणपर्विचि कथा । म्यां निरोपिली संतां ।
**ज्ञानदेवो** निरोपिता । **निवृत्ति**प्रसादें ॥ ३०९ ॥

## ग्रंथाचा आशय

मूळ संस्कृत द्रोणपर्वाचे **२०२** अध्याय असून त्यामध्यें अनेक उपकथा आहेत; परंतु प्रस्तुत द्रोणपर्वांत उपकथा गाळण्यांत आल्या असून मुख्य कथासूत्रच हातीं घेण्यांत आलें आहे. पहिला अध्याय प्रास्ताविक, दुसऱ्यामध्यें अभिमन्युवध, तिसऱ्यामध्यें जयद्रथवध, चवथ्यामध्यें द्रोण पांडवास जिंकण्याची प्रतिज्ञा करतो व दुर्योधनास वरदान घेण्याकरितां बोलावितो. आणि पांचव्या अध्यायांत द्रोणाचा वध, असें थोडक्यांत या पर्वाचें सार आहे. तें सुपरिचित असल्यामुळें विस्तारानें या ठिकाणीं सांगण्याचें कारण नाहीं.

## भाषेचे कांहीं नमुन :

( १ ) मंगलाचरण—

स्वस्ति श्रीजयकारणा । जया सेंधुराभरणा ।
साटिसहस्रा गणा । नमस्कारु ॥ १ ॥
जया अर्धांगिं नरकुंजरा । वासुगि लंबोदरा ।
नमन गा सुंधरा । विकटसोंडा ॥ २ ॥
प्रथम वंदिला गणेशु । सकळ विद्येचा प्रकाशु ।
आज्ञानार्थें मतिप्रकाशु । स्मरणमात्रें ॥ ३ ॥

तुं सर्वभूतिं सदोदितु । त्र्यलोकिं तुजा पुरुषार्थु ।
काय वर्णु अर्थु । संसारवेथा ॥ ४ ॥
तुजि कृपा जरी घडे । तरि मूढ होती सरते गाढे ।
देवां ऋषेश्वरांपुढें । तुज वांदितातिं ॥ ५ ॥

× × ×

तेथोनि वंदिली शूळेश्वरी । सारजा वागेश्वरी ।
तुझेनि प्रसादें कथा थोरी । बोलेन आतां ॥ ११ ॥

(२) अभिमन्यु युद्धाला जाण्याचा हट्ट घेऊन बसला त्यावेळचें वर्णनः—
धर्माचे चरण नमस्कारोन । नारायणासि नमस्कार घालोन ।
काय बोलिला अभिमान्यु । आवधेयाथें ॥ ११२ ॥
सावधान हो समस्त । माजि विनति आइकजत ।
एयिन ह्मणोनि बोलत । तुह्मासवें ॥ ११३ ॥
म्या रण नाहीं देखिलें । धनुशबाण घेवोन येइन वैले ।
कौतुक पाहीन भलें । आपुलां डोळां ॥ ११४ ॥
धर्मु बोले लेंकुरवासि । येउं नको बारे रणासि ।
काय होयिल तेथेंसि । तुज राखेल कवणु ॥ ११५ ॥
तेथें तुंबळ युध्यीं झुंजति । लाहानथोर न पाहाती ।
अभिमान्या तुज येउंसि स्तिति । न्हवे योग्य ॥ ११६ ॥
तुंवां घरिं राहावें ह्मणोनु । धर्मगळ्या लागोनु ।
ते वेळां अभिमान्यु । काय बोलता जाला ॥ ११७ ॥
स्वामि इतुका दळभारु आसतां । काय मजवरि पडता ।
पर युध्य देखावयाचि आस्था । मनि माजे ॥ ११८ ॥
मि येथिन सव्हें ह्मणत । ह्मणोनि कास परिकर घालित ।
धनुशबाण करिं घेवोनि येत । त्वरें जाणा ॥ ११९ ॥
माथां मुकूट शोभत । गळां एकावळि मिरवत ।
दिव्यांग वस्त्रें पैरत । तेया वेळा ॥ १२० ॥
हस्तकडगें बाहुकडकें । कर्णि आंबुले सुरंगें ।
कंठिं पदक शोभे चांगें । तेज आगळें फांकतसे ॥ १२१ ॥
आंगि चंदनाचि उटि । टिळक बावनाचा लल्लाटिं ।
त्यासि कवणु दृष्टि । सांवरुं सके ॥ १२२ ॥
बारां वरषांचा पुतळा । आंगि दिसे सावळा ।
सर्व सृंगार केला । नेणो किति ॥ १२३ ॥
तेया वेळां सुभद्रा सुंधरि । धावोनि आलि बाहेरि ।
उचलोनि कडियेवरि । घेतला तेया ॥ १२४ ॥

मुखा मुख सुधलें । निडळा निडळ मेळविलें ।
कनीक प्रयेळिं वोवाळिलें । अभिमान्यासि ॥ १२५ ॥
तंवं द्रुपदि आलि तेथेंसि । कवणें चाळविलें लेकरवासि ।
बुद्धि नाहिं बुद्धिवंतांसि । आतां काय ह्मणों ॥ १२६ ॥
तंवं सुभद्रा ह्मणत । पुत्रा भातुकें देइन रे यथ ।
भूक बहुत लागत । मग करिसिल काय ॥ १२७ ॥
तंव ह्मणे गे माते । हे महाविरजाते ।
मज कैंचि भूक तेथें । युध्य देखिलेया ॥ १२८ ॥
घरिं होतों खेळत । भूक बहु लागत ।
आतां झुंज पाहावेया जात । रणभुमिसि ॥ १२९ ॥
येरि दोघी विनविति । करिं धरोनि खेळाविती ।
कांहिं न वचे त्याचां चिर्ति । आतां काय करावें ॥ १३० ॥
अवघे बोलति तेयांथें । आजिचा दिवसु स्थिर करि मठि येथें ।
ऐसें बोलतां तेयाथें । येरु ह्मणे ऐसें बोलू नको ॥ १३१ ॥
तंवं ह्मणति रथ नाहिं वैले । होते ते अवघेयासि दिधले ।
तंवं अभिमान्यानें बोलिलें । चरणचालि येयिन ॥ १३२ ॥
मज लाहाना लेंकुरवासि । रथावरि बैसों नेणे तेथेंसि ।
पांयिं चालैन रणभुमिसि । नाहिं तरि अश्वु देइजे ॥ १३३ ॥
ह्मणति पंचकल्याण तेजि पाठविले । ते आदींचि रणा गेले ।
परंतु न येति मागारिं वैले । आणि आणु न येति ॥ १३४ ॥
तरि पायिं चालैन ह्मणत । ह्मणोनि पुढां चालत ।
अर्जुन उचलित । आपुलेया पुत्रासि ॥ १३५ ॥
मुखा मुख लावोनु । काय बोलिला फाल्गुनु ।
बा रे माजेयावरि बैसोनु । येयिं बापा ॥ १३६ ॥

× × ×

धर्मु माव करोन बोलतो । आह्मि अवघे युध्यासि जातों ।
पुढां राज्य सांभाळितो । तें कवणु जाणैल ॥ १३९ ॥
आतां ऐसें करावें । बा रे तुंवा यथ राहावें ।
राज्य अवघें सांभाळावें । बुद्धिकरोनि ॥ १४० ॥
पनास लक्ष सैन्यसहित । तुंवा दारिवठां बैसावें ह्मणत ।
कांहिं एक होयिल जुगांत । तरि तुंवां त्वरित एयिजे ॥ १४१ ॥
ऐसा नानापरि संबोखुन । पन्नास लक्ष सैन्य देऊन ।
तेथें बैसविला अभिमान्य । बुजावोनीयां ॥ १४२ ॥
आह्मां कांहिं एक होयिल रणासि । तरिं पावें गा रक्षणेसि ।
ऐसा भरवंसा धरोनि मानसिं । रथु दिधला ॥ १४३ ॥

(३) श्रीशंकरानें पांडवांना जिंकण्याचें वरदान द्रोणाचार्यांना दिल्याची हकीकत श्रीकृष्ण पांडवांना येऊन निवेदन करतो त्या वेळचें वर्णन चवथ्या अध्यायांत पुढीलप्रमाणें आहेः—

आगा त्या हस्तनापुरीं । पैजा बोलिला द्रणाचारि ।
फाइच्या दिवसा माजारि । काय होईल नेणो ॥
ज्याणें गिरिजापति आणिला पुजेसि । वरु दिधला तेयासि ।
जिणावेया कृष्ण पांडवांसि । ह्मणोनिया ॥
सहजें द्रणु बळवंतु । आणि (शंकरें) मस्तकीं ठेविला हातु ।
तेणें त्रिभुवन जीणवतु । वेगवत्तरी ॥
पाताळहोओनि शस्त्रदेवता आली । तियेनें येकविस चक्रें दिधलीं ।
ह्मणोनि माजि बोलि । आखोडलि वाचा ॥
आतां काय करावें । कवणिये परि निस्तरावें ।
फाइच्या दिवसा पांडवां राखावें । कवणिये परि ॥
गेलें हातिंचें निधान ह्मणत । पांडवां ऐसे भक्त ।
कवणेपरि उरति जिवंत । ऐसा प्रबंधु करावा ॥
ह्मणोनि डळमळित अश्रुपात आले । देव मनिं गैवरले ।
धर्मा मस्तकिं पडले । वो ( घ ) गंगेचे ॥
किं सप्तसागर उचंबळले । तेपरि देव बहुत वोळले ।
देखोनि अर्जुनें बोलिलें । श्रीकृष्णापासिं ॥
देवा कां गा रुदन करिसि । आह्मा पांचाचे संगतिसि ।
आह्मांकारणें कष्टवलासि । बहुतांपरि ॥
आजि चौदा दिवस जाले । द्वारका सांडोनि राहिले ।
आह्मां राखावया वैले । रात्रिदिवसु ॥
येव्रु कोपलेया तृणासि । किं व्याघ्र कोपलेया गो चरांसि ।
सागरु लोटलेया नगरासि । जिणें कैचें ॥
सिंह कोपलेया गजाथें । विरभद्रु कोपलेया दक्षाथें ।
इश्वरु कोपलेया मदनाथें । उरि कैंचि ॥
तैसा द्रणु कोपलेयावरि । पांडव केविं उरति संसारिं ।
हें मनामाजारि । दिसेचि ना ॥
द्रणें बाळपणिं वाढविलें । मूढ होते सरते केले ।
धनुर्वाडे जाले । तेयाचेनि धर्मे ॥
पिता कोपलेया बाळकाथें । केविं उरों सके संसाराथें ।

तैसें मज अर्जुनाथें । जालें देखा ॥
माते स्थनि विश संचरे । धाया वाढवी काय करे ।
देवा हिं कल्पनेचि उत्तरें । बोलुं नयेति ॥
जें लल्हाटिं लिहिलें । तें सर्वाभूतिं न चुके वैलें ।
माजें म्यां भोगावें लागलें । होणियार तें ॥
देवा तुंवा अैसें किजे । या चौगांथें द्वारके नेइजे ।
बंधुरायासि प्रतिपाळिजे । श्रीकृष्णनाथा ॥
ऐसें बोलोनि अर्जुनु उठिला । काकुळति वचनें बोलिला ।
तें आइकोनि गळेयासि झोंबिनला । इधिष्टिरु ॥
पांडव आले काकुळति । आइकोनि द्दपदि आली धावति ।
विनति कमळापतिसि करिति । करसपुष्ट जोडोनि ॥
देवा आइकैं वचन माजें । भोजनासि आरोगिति काळाचें खाजें ।
जें स्वीकारितां मरिजे । हें नवल काय ॥
देवा पतंगु दिव्याचे जोति । तेणे आपणेयाचि निवृत्ति ।
तैसि पांडवांचि गति । वैर केलेया ॥
देवा धरोनि तुजें बळ । दुर्योधनासवें केलें सळ ।
जंवंळिं उभे हाति काळ । नेणति हे ॥
ज्यांचे वोळगे किति । इछामरणि विर आसति ।
त्यां सवें वैर जे करिति । ते मूढ जाणा ॥
देवा समर्थासवें वैर किजे । त्यांहिं संसारिं केविं उरिजे ।
क्रोधभुंजगु हातिं धरिजे । विश न लगे ह्मणोनि ॥
पण गारोडि आसतां बुद्धिवंतु । तेयासि न्हवेचि घातु ।
जिणविसि बहुतु । निर्विश करोनि ॥
ऐसा तुं गा श्रीपति । हे करिति वायांचि काकुळति ।
तुं जिणविसि ऐसा भरवंसा मजप्रति । आहे बापा ॥
देवा शिळाधारिं वरुषलें । तेवेळां गोकुळ तुवां रक्षिलें ।
द्दणु ह्मणजे काय वैलें । तुजपुडां ॥

या तीन उताऱ्यांवरून या द्रोणपर्वाच्या भाषेची साधारण कल्पना होण्यासारखी आहे. ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवाचा हा अस्सल ग्रंथ असेल असें मला वाटत नाहीं. ज्ञानदेवाच्या aporyphal वाङ्मयांत त्याचा समावेश करावा लागेल. तरीपण ज्ञानेश्वरींत आढळणारे कांहीं खुणेचे शब्द या ग्रंथांत आढळतात. उदाहरणार्थ :—

१ **खता** ( लेप ) – फिटे महापातकाचा खता ॥
मग निःशेष **खता** फिटे । मानसींचा ॥ ज्ञा. ४–२०८.

२ **फाइ** ( उद्यां )- फाइच्या दिवसासि । सावरावें अर्जुनासि ॥
**पाहेचा** पेणा वाटवधा ॥ ज्ञा. १३–५४८.

३ **फालें** ( पहांट ) – इतुक्या **फालें** जालें ॥
देखैं भूतजात निदैलें । तेथोंचि जया **पाहलें** ॥ ज्ञा. २–५५

४ **संवळी** (प्रातःकाल) – **संवळीं**च्या दिवसाथें । जरि न धरि हनुमंताथें ॥
विश्वाचें आयुष्य जेणें उजळे ।
तो सूर्यू उदयो देखौनि **सवळे** ।
पापिया फुटती डोळे ।
डुडुळोच ॥ ज्ञा. १६–२३९.

५ **सरतें** ( मान्य ) – त्यासि आपुल्या **सरतें** केलें ।
तरी न्यून तें पुरतें । अधिक तें **सरतें** । ज्ञा. १–८०.

६ **आंकणा** ( ताबेदार ) – कळिकाळु केला **आंकणा** ।
जेणें शंकर रणीं जीतिला । कृतांतु **आंकणा** घातला ॥
( राजवाडे ) ज्ञा. १–२००.

७ **आंगवण** ( सामर्थ्य ) – केवडि तुजि आंगवण ।
ऐसें जीवाचिये **आंगवणे** ॥ ज्ञा. ७–९६.

८ **सळ** ( वैर, स्पर्धा ) दूर्योधनासवें केलें **सळ** ।
का वैद्यातें करी **सळा** । वस्तु साडी पायखोळां ।
तो रोगिया जिया विव्हळा । सवता होय ॥ ज्ञा. १७–१०१.

प्रस्तुत द्रोणपर्वाचें अस्तित्व किती काळ मागें नेतां येतें याचा विचार करण्याआधीं दुसऱ्या एका अज्ञाच ग्रंथाची थोडीशी माहिती देणें अवश्य आहे. तो ग्रंथ म्हणजे ज्ञानदेवाच्या नांवावर असलेलें ‘ योगवासिष्ठ ’ होय.

१९४० सालीं गोमंतकांत हस्तलिखिताचा शोध करीत फिरत असतां पाळी नांवाच्या एका खेड्यात एका आप्ताच्या सग्रहीं मला ज्ञानदेवांच्या नांवावर असलेल्या ‘ योगवासिष्ठा ’ चें एक जुनें हस्तलिखित सापडलें. त्यापूर्वीं कांहीं वर्षें कै. चांदोरकरांनीं ज्ञानेश्वरमहाराजाचें म्हणून एक योगवासिष्ठ प्रसिद्ध केलें होतें; परंतु तो ग्रंथ ज्ञानेश्वरांचा नाहीं, असें कानावर आल्यावरून तो ग्रथ मिळवून वाचण्याचा मीं प्रयत्न केला नाहीं. आतां मला मिळालेलें योगवासिष्ठ व चांदोरकरांनीं प्रसिद्ध केलेलें योगवासिष्ठ एकच आहे कीं काय, हें पाहण्याकरितां मी फारक उत्सुक झालों आणि ताबडतोब मुंबईला परतलों. दोनही ग्रंथ ताडून पाहतां पाठभेद सोडले तर ते एकच आहेत, असें आढळून आलें. चांदोरकराचें योगवासिष्ठ १९१४ सालीं धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेमार्फत प्रसिद्ध झालें. त्यावेळीं

मुमुक्षु, केसरी, विविधज्ञानविस्तार वगैरे नियतकालिकांत त्याच्या अस्सलपणाबद्दल बरीच चर्चा झाली. ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचें हें योगवासिष्ठ नाहीं, असें पांगारकर, विष्णुबुवा जोग, गुलाबरावमहाराज यांचें मत; तर बा. ग. परांजपे, प. गो. चिंचाळकर, अनंत नारायण पंडित यांचें तें ज्ञानेश्वराचें असावें असें मत. पांगारकरांच्या मतें, "या ग्रंथांत ज्ञानोबाराय कोठें दिसत नाहींत." गुलाबरावमहाराज म्हणतात, "हा ग्रंथ मानभावांचा आहे. त्यांचा नसून तातांचा (श्रीज्ञानेश्वरांचा) असला तरी आमच्या (वेदांती अथवा वारकरी) करितां केलेला नाहीं" विष्णुबुवा जोग लिहितात, "हा ग्रंथ महाराजांचाच असावा असा बनावट पुरावा केला आहे."

महानुभाव वाङ्मयाचे प्रसिद्ध संशोधक श्री. यशवंत खुशाल देशपांडे यांनीं या सर्व वादाचा आढावा घेऊन ज्ञानेश्वरदर्शनांत एक अभ्यासपूर्ण लेख लिहिला असून हा योगवासिष्ठ ग्रंथ ज्ञानेश्वरांचा असावा, असा आपला अभिप्राय प्रकट केला आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यांना हें मत मान्य नाहीं. ज्ञानेश्वरीच्या ओव्यापेक्षां या योगवासिष्ठाची भाषा व रचना निराळी असून ती रामदासकालीन व रामदासी थाटाची आहे, असेंही मत त्यांनीं आपल्या 'ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' या ग्रंथांत मांडलें होतें. परंतु हा ग्रंथ रामदासांपूर्वीं कितीतरी आधीं प्रसिद्ध होता याला भरपूर पुरावा आहे. १६१४ सालीं समाप्त केलेल्या फादर तोमास स्टिफन्स यांच्या क्रिस्तपुराणाच्या पहिल्या अवस्वरांत जी मराठी भाषेची प्रशस्ति केलेली आहे त्याला याच योगवासिष्ठाचा आधार आहे. पहाः—

### स्टिफन्सचें क्रिस्तपुराण

जैसी हरळां माजि रत्नकिळा । कि रत्नांमाजि हिरा निळा
तैसी भासां माजि चोखाळ । भासा मराठी.
जैसी पुस्पां माजि पुस्प मोगरी । कि परिमळां माजि कस्तुरि
तैसी भासां माजि साजिरि । मराठिया.
पखिआं मधें मयोरु । व्रुखिआं मधें कल्पतरु
भासां मधें मानु थोरु । मराठियेसि.
तारां मधें बारा रासी । सप्त वारां माजि रवी ससी
यां दिपिचेआं भासां मधें तैसी । बोली मराठिया.

—अवस्वरु १, १२२-५

### योगवासिष्ठ (हस्तलिखित)

जैसी दिपांमाजि दिवटी । कीं तिर्थीमाजि पौर्णिमा गोमटी ।
तैसी भाषा मऱ्हाटी । सर्वोत्तम ॥
जैसी सरितांमाजि गोदावरी । कीं पर्वतांमध्यें रत्नगिरी ।
तैसी भाषामाजि साजिरी । मऱ्हाष्टि पैं ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२०५
संदर्भ शाखा

हरळांमध्ये रत्नकिळ । कीं पुष्पांमध्यें कमळ ।
तैसी भाषांमध्ये सोज्वळ । बोली मऱ्हाटी शोभिवंत ।
जैसी दूर्गांवरी शोभे चरी । कीं मुक्ता शोभते लहरी ।
तैसी शोभे भाषांमाजारीं । मऱ्हाष्टी पैं ।
तीर्थांमध्यें काशी । कीं व्रतांमाजि एकादशी ।
भाषांमध्यें तैसी । मऱ्हाष्टी पैं ॥
परिमळामध्यें कस्तुरी । कीं गोडियेमध्यें साकरेची थोरी ।
तैसी मऱ्हाटी बैसवी मंदिरीं । अज्ञाना ज्ञानाच्या । अ. १.

यावरून फादर स्टिफन्सनें हें ' योगवासिष्ठ ' अभ्यासिलें असलें पाहिजे हें उघड दिसून येईल. १५४१ सालीं गोव्यामध्यें धार्मिक जुलूम सुरू होऊन पोर्तुगीजांनीं हिंदूंचीं देवळें मोडिलीं, देव फोडले, धर्मग्रंथ जाळून टाकले. १५६० सालीं गोव्यांत इंक्विझिशन स्थापन झालें, आणि त्याच्या नियमांप्रमाणें असे ग्रंथ जवळ बाळगणें हा भयंकर गुन्हा ठरे. यावरून हा ग्रंथ बनावट म्हटला तरी त्याची निर्मिति १५४१ च्या अगोदर असली पाहिजे. तो रामदास-कालीन मुळींच म्हणतां येणार नाहीं. शिवाय स्टिफन्सच्या पुराणाचा हा निर्णायक कालनिदर्शक पुरावा नसता तरीदेखील या ' योगवासिष्ठा ' ची भाषा जुन्या ग्रंथांसारखी उघड दिसून येते. अशा परिस्थितींत वारकरी सांप्रदायिक लोक हा ग्रंथ ज्ञानेश्वरांचा नाहीं म्हणतात म्हणून तो कचऱ्यामध्यें फेकून देण्यांत येऊं नये व सांप्रदायिक पूर्वग्रहाशिवाय या ग्रंथाचा फेरविचार व्हावा, अशी मी महाराष्ट्र साहित्यपत्रिकेमध्यें ' श्रीज्ञानेश्वरांचा एक प्रगूढ ग्रंथ ' या मथळ्याखालीं लेख लिहून अभ्यासकांना जाहीर विनंति केला. हा ग्रंथ ज्ञानेश्वरांचाच आहे असें आग्रहाचें माझें मत मुळींच मांडलें नव्हतें हेंही येथें सांगितलें पाहिजे.

योगवासिष्ठाचें हस्तलिखित मला गोव्यास मिळालें याचा निर्देश वर आलाच आहे.

चांदोरकरांनीं प्रसिद्ध केलेल्या ' योगवासिष्ठा 'चें हस्तलिखित त्यांना सासवडच्या सोपानदेवांच्या मठांत सांपडलें होतें असें म्हणतात. परंतु या ग्रंथाचें तिसरें एक हस्तलिखित कै. बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांच्या संग्रहांत मला पहावयास मिळालें, तेंही कै. राजवाडे यांनीं गोव्यांतूनच मिळविलेलें होतें, असें त्यावरून दिसतें. पोर्तुगालमध्येंहि ब्रागच्या सार्वजनिक ग्रंथालयांत या ग्रंथाचें रोमन लिपींतील हस्तलिखित आहे, असें लिस्बन युनिव्हर्सिटीचे संस्कृत भाषेचे सेवानिवृत्त प्रोफेसर डॉ. मारियानु द सालदान्ज यांनीं मला कांहीं वर्षांपूर्वीं सांगितलें होतें. गोवा सरकारच्या ऐतिहासिक दप्तराचे प्रमुख श्री. पांडुरंग पिसुर्लेंकर यांनीं अलीकडेच लिहिलेल्या एका पोर्तुगीज लेखांत, हें हस्तलिखित मूळ फादर स्टिफन्स जेथें पूर्वी डिरेक्टर होते त्या राशोलच्या (गोवा) जेजुइट कॉलेजच्या संग्रहांतील, असें नमूद केलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५५९८५ दि. ......
क्र. १२२०

फादर स्टिफन्स यानें आपल्या पुराणाच्या आरंभीं मराठी भाषेची जी स्तुति केली आहे ती या 'योगवासिष्ठा'वरूनच होय, हें नुकतेंच आपण पाहिलें; परंतु स्टिफन्सनंतर एतियेन द ला क्रुवा नांवाचा जो फ्रेंच पाद्री गोव्यांत होऊन गेला त्यानें आपल्या सेंट पीटरवरील मराठी पुराणांत या 'योगवासिष्ठा'चा स्पष्टच नामनिर्देश केलेला आढळतो. ह्या पुराणाच्या मुखपृष्ठावर १६२९ असा प्रकाशनकाल नमूद आहे आणि त्याच्या सुमारें पंधरा हजार ओव्या आहेत. केवळ 'योगवासिष्ठा'चाच नव्हे तर प्रस्तुत 'द्रोणपर्वा'चाही त्यांत नामनिर्देश आढळतो. या द्रोणपर्वाला तो 'द्रोणपुराण' असें नांव देतो.

(१) फ्रेंच पाद्री क्रुवा हा आपल्या पीटर-पुराणांत लिहितो—

इतुकें न बोलिलों व्यर्थीं । लिहिलें आहे वसिस्ट ग्रंथीं ।
तें पाहे पां कवणे रीती । दतचित देउनी ॥
म्हणे इतुकी वसिस्टरुसिची बोली । मियां संस्कृताचि मराठी केली ।
उधरावेया केवळी । बहुतां लोकार्थें ॥

—पुराण २ रें, कांड ५, अवस्वर २.

चांदोरकरांच्या 'योगवासिष्ठा'च्या प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणें आढळते :—

इतुकी वासिष्ट रुषीची बोली । म्यां संस्कृताची मराठी केली ।
उधरावेया केवळी : बहुतां लोकां ॥

—अध्याय १, २९३.

(२) "विष्णु ठकु असत्यवादि आणि विविधा गुणीं नस्ट देखोनि देव नव्हे", असें सिद्ध करितांना हा फ्रेंच पाद्री लिहितो,

वसिस्ठ रुसीचा ग्रंथु । बोलिल्याचि आहे साखी देंतु ।
तुमि आइका तेआचि मातु । कर्ण उगते करोनि ॥
ह्मणे देवों आधरिलें इछाभोजन । तेथ उठविलें ऐसें विघ्न ।
बळीं करूं आधरिलें दान । तो पाडिला पाताळीं ॥

चांदोरकरांच्या प्रतींत पुढील ओवी आढळते :—

देॐ आदरिलें दान । तेथ उठिलेंचि असे विघ्न ।
बळिं करुं आदरिलें दान । तो पाडिला पाताळीं ॥

—अध्याय ६, २३.

(३) वसिष्ठ ऋषीची साक्ष दिल्यावर तो '**द्रोणपुराणा**'ची म्हणजे प्रस्तुत 'द्रोणपर्वा'ची देतो ती अशी—

दुजी साखी **द्रोणपुराण** । लिहित तेआचें सावधान ।
आइका अद्भुत खोटेपण । विवेकोनि विस्णुचें ॥ ५३ ॥

म्हणे लहानु ब्राह्मणु जाला । भिख्या मागावेआ आला ।
बळि पाताळीं घातला । कपट करोनि ।। ५४ ।।
ऐसें बोले **द्रोणपुराण** । हरिकथा तेणेचि गुणा ।
याची देती साखी खुण । ती तरि परियेसा ।। ५५ ।।

प्रस्तुत द्रोणपर्वाच्या तिसऱ्या प्रसंगांत ही ओवी अशी आहे:—

लाहानु ब्राह्मणु जाहाला । भिक्षा मागावेया गेला ।
बळि पाताळिं घातला । कपट करोनि ।। ७ ।।

यावरून या द्रोणपर्वाची रचना १६२९ च्या पूर्वी झाली होती, हें उघड दिसून येणारें आहे. हाही ग्रंथ 'योगवासिष्ठा 'प्रमाणें १५४१ पूर्वी गोव्यांत अस्तित्वांत असला पाहिजे.

ज्ञानदेवाच्या नांवावर असलेलें 'योगवासिष्ठ' व प्रस्तुत द्रोणपर्व हीं एकाच माणसाच्या हातचीं असावीं, असें या दोन्हा ग्रंथांची एकंदर शब्दयोजना व भाषाशैली यांवरून दिसावयास लागतें

निवृत्तिनाथांचा नामनिर्देश प्रस्तुत द्रोणपर्वांत निवृत्ति किंवा 'निवृत्तिदास' असाही सांपडतो. योगवासिष्ठामध्यें हा निवृत्तिनाथ असा तर आहेच. परंतु.

आता **निवृत्तिदासु** ह्मणे । हें वसिष्ठरुषीचें बोलणें ।
यासी उपमा कवणें । कैं द्यावी ।। अ. ६,१२६

असाहीपण करण्यात आलेला आहे

योगवासिष्ठ हें ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवाचें नाहीं, याबद्दल जीं प्रमाणें आतांपर्यंत पुढें करण्यांत आलीं. त्यामुळें हा ग्रंथ ज्ञानदेवांचा असावा, ही माझी शंका नष्ट झाली नव्हती; परंतु हें द्रोणपर्व हातीं आल्यापासून त्या शंकेस धक्का बसलेला आहे. ज्ञानदेवांच्या नांवावर काव्यें करण्याचा गोमातकांत कोणी कारखानाच तर उघडला नव्हता ना, अशी नवी शंका येऊं लागली आहे !

आपोक्रिफल वाङ्मय निर्माण होतें त्याला बनाव किंवा कपटच कारण असतें असें मात्र नाहीं. एकाच नांवाचे अनेक कवि वेळोवेळीं होऊन गेलेले असतात आणि त्या सर्वांची कविता कांहीं काळानें पुढील पिढ्यांचे लोक त्यांमध्यें विशेष प्रख्यात असलेल्या पुरुषाच्या नांवावर दडपून देतात नामदेवाच्या बाबतींत असा प्रकार फार झालेला आहे. नामदेवाच्या गाथेंत आज दोन हजारांवर जे अभंग आहेत त्यांमध्यें आद्य नामदेवाचे पांच-सातशें तरी असतील कीं काय, याबद्दल शंकाच आहे. इतर मराठी कवींच्या बाबतींत देखील असा प्रकार कमीजास्त प्रमाणानें झालेला दिसून येतो; अमक्याचा मुलगा किंवा अमक्या आडनांवाचा म्हटल्यावर व्यक्ति जशी निश्चित होते तसा अमक्याचा शिष्य म्हटल्यावर देखील होते. 'निवृत्तिप्रसादें ज्ञानदेवो म्हणे' असा निर्देश आढळला म्हणजे तें काव्य ज्ञानेश्वरीकर्त्या आद्य

ज्ञानदेवांचें म्हणावें काय? याला असें एक उत्तर देण्यांत येतें कीं, निवृत्तिनाथ व ज्ञानदेव अशी गुरुशिष्यांची जोडी जशी तेराव्या शतकांत होऊन गेली, तशी ती पुढच्या काळांतदेखील होऊन गेली असावी.

असा प्रकार प्रस्तुत द्रोणपर्वाच्या बाबतींत झाला असें कदाचित् म्हणतां येईल; परंतु 'योगवासिष्ठा'च्या बाबतींत झाला असणें शक्य दिसत नाहीं. कारण समान शब्द, समान कल्पना व सारखे चरण 'ज्ञानेश्वरी' व 'योगवासिष्ठ' या दोन ग्रंथांमध्यें आहेत. इतकेंच नव्हे तर 'मऱ्हाटी गीता' आधीं केल्याचा उल्लेख देखील 'योगवासिष्ठा'मध्यें आहे. यावरून एक तर तो ग्रंथ ज्ञानेश्वरांचा असावा किंवा विष्णुबोवा जोग म्हणतात त्याप्रमाणें, "हा ग्रंथ (ज्ञानेश्वर) महाराजांचाच असावा, असा बनावट पुरावा केला आहे," पण आपण ग्रंथ रचून तो ज्ञानदेवाच्या नांवावर घालण्याचा या कवीचा हेतु काय? जुन्या काळीं राजे लोक आश्रयाला असलेल्या पंडिताकडून ग्रंथ लिहून घेत व ते आपल्या नांवावर खपवीत. रामदेवराव यादवानें नरेंद्राच्या रुक्मिणीस्वैंवराची अशी मागणी केल्यांची गोष्ट प्रसिद्धच आहे ती अशीः—

नरेंद्र कवि : साल कवि : नृसिंह कवि हे तिघे भाऊ : नृसिंह कविन नलोपाख्यान केलें : साल कविन रामायण केलें : तें आपुलालें रामदेवरायापुढां म्हणितलें : तेथ नरेंद्र कवि बैसले होते : तयांसि भटोबासापासौनि श्रवण होतें : तवं तेहीं म्हणितलें : तुम्ही एक कवीत्व करा : मां तुमचि युक्ति पाहों : मग नरेंद्रबासीं तेणें सळें अठरा सतें रुक्मिणीस्वैंवर ग्रंथु केला : करूनि तयां देखतां रायापुढां म्हणितला : रायें म्हणितलें : या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा : मी जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके आणि चौथरीया आसु वोवाळणि घालीन : नरेंद्रबासीं म्हणितलें : ना राजे हो आमचेआ कवीकुळा बोलु लागैल ॥

ज्ञानेश्वरीच्या शेवटीं, 'तेथ यदुवंशविलास । जो सकळकलानिवास । न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्रु ॥' अशी ज्याची ज्ञानदेवानें स्तुति केली आहे तोच हा राजा रामदेवराय.

स्वतः काव्य लिहून तें अभंगीं रामदेवरायाच्या नांवावर घातल्यास त्या काळीं "जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके" ओवाळणी मिळण्याचा संभव होता; परंतु ज्ञानदेवासारख्या दरिद्री संन्याशाच्या मुलाच्या नांवावर तें घातल्यास एकादा फुटका आसु तरी मिळाला असता काय?

किंवा कालिदासानें 'शाकुंतल' नाटकाच्या पांचव्या अंकांत,

स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु ।
संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः ।
प्रागन्तरिक्षगमनात् स्वमपत्यजात-
मन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ॥

असा दुष्यंत राजाच्या तोंडीं श्लोक घालून अखिल स्त्रीजातीला जो दोष दिला आहे त्या दोषापासून पुरुषजातही अलिप्त नसेल! म्हणूनच कोंकणांतील कोणा तरी पर-भृतानें योगवासिष्ठ व द्रोणपर्व या आपल्या काव्यांचें पोषण करण्याचें काम ज्ञानदेवा-सारख्या द्विजाच्या नांवावर सोंपविलें असावें! 'योगवासिष्ठ' हा ग्रंथ महानुभावांचा आहे, असें गुलाबरावमहाराजांचें मत असल्याचें वर सांगितलेंच आहे. महानु-भावांमध्येंही ज्ञानदेव या नांवाचे ग्रंथकार होऊन गेले, असें भारद्वाजांचें म्हणणें आहे, परंतु 'मानभावांत ज्ञानदेव नाहीं' असें प्रतिपादन करतांना श्रीपतिबुवा भिंगारकर 'श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व चरित्र' (१९००) या निबंधांत लिहितात, "पुणें येथें हल्लीं पुलाचे वाडीजवळ पट्टाधिष्ठित महंत विद्वांस महानुभाव हे सुमारें ३०० मानभावांच्या मेळ्यासहवर्तमान उतरले आहेत. त्यांची मीं स्वतां गांठ घेऊन मानभाव ज्ञानदेवाची हकीगत त्यांस विचारली, व भारद्वाजानें जी अभंगांतील शब्दांची खूण सांगितली ते शब्द तुमच्या धर्मपुस्तकांत वापरतात किंवा नाहीं असा त्यांना प्रश्न केला. त्यांनीं असें सागितलें कीं, आमच्या धर्माचा उगम होऊन ६०० वर्षें झालीं. महानुभाव धर्माचा संस्थापक नागदेव भट्ट हा १२ व्या शतकीं होता. याची सविस्तर माहिती आम्हीं २१ नोव्हेंबर १८९९ च्या केसरी पत्रांत दिली आहे. त्या दिवसापासून हा कालपर्यंत आम्हांमध्यें ज्ञानदेव नांवाचा कोणीच ग्रंथकार किंवा कवि झाला नाहीं." महानुभाव वाङ्मयाचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ. य. खु. देशपांडे यांनाही ज्ञानदेव महानुभवांत असलेले माहीत नाहीं.

महानुभाव लोकांनीं ज्ञानदेवांच्या नांवावर हे बनावट ग्रंथ रचले असें म्हणणारेही कांहीं गृहस्थ आहेत; परंतु असें करण्यांत त्यांचा हेतु काय? महानुभाव पंथाची विशिष्ट तत्त्वें या ग्रंथांमध्यें घुसडून ज्ञानदेवांच्या नांवावर त्यांचा प्रसार केला असें म्हणावें तर आपल्यापुढें असलेल्या ग्रंथांवरून तसें दिसत नाहीं. उलट गोमंतकी बोलीच्या पद्धतीच्या कांहीं वाक्यरचनेवरून हा ग्रंथ गोमंतकांतच तयार झाला अशा शंकेस जागा आहे.

एखाद्या कवीचा ग्रंथ 'आपोक्रिफल' ठरवितांना अनेक गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत पांचसातशें वर्षांपूर्वीचा ग्रंथ शुद्ध स्वरूपांत आपल्या पुढें असतोच असें नाहीं. त्यामध्यें पुष्कळ तोड व जोड झाली असणें शक्य आहे. एकाच कवीचे सगळे ग्रंथ सारखेच रसाळ असतील असें नाहीं. ज्ञानेश्वरीचा रसाळपणा अस्सल म्हटलेल्या अमृतानुभवांत नाही. अमृतातेंही पैजा जिंकण्याची प्रतिज्ञा करून ऐन उमेदींत गीतेच्या सातशें श्लोकांवर सुमारें नऊ हजार ओव्यांची टीका ज्ञानेश्वरांनीं लिहिली तिचा गोडवा त्यांच्या इतर अनुवादपर लघुकाव्यांमध्यें असलाच पाहिजे असें मानणें चुकीचें आहे.एकच कवि निरनिराळ्या प्रकारची रचना करूं शकतो. वासिष्ठगोत्री वामन व शांडिल्यगोत्री वामन निराळे हें मला मान्य; परंतु ओवीबद्ध रचना करणारा वामन, शृंगारप्रिय वामन, यमक्या वामन असे

केवळ विषय किंवा रचना यांच्यावरून भेद पाडण्यांत अर्थ नाहीं. त्याला इतरही कारणें शोधिलीं पाहिजेत. वामनाच्या नांवावर आज प्रसिद्ध असलेल्या ग्रंथांत आपोक्रिफा पुष्कळच आहे. उदाहरणार्थ, वामनाच्या नांवावर असलेलीं सुप्रसिद्ध मराठी शतकत्रयें त्याचीं नसून हरिकवीचीं आहेत. ' आपोक्रिफा ' म्हणून कोणतेंही वाङ्मय नष्ट करूं नये. अभ्यासाच्या कामां त्याचाही उपयोग असतो. ' योगवासिष्ठ ' व प्रस्तुत ' द्रोणपुराण ' हे आपोक्रिफा असले तरी जेजुइटांच्या मराठी ग्रंथांच्या अभ्यासकांना त्यांचा फार उपयोग आहे. जेजुईट पुराणांतील कितीतरी शब्द व व्याकरणाचीं रूपें यांचा उलगडा या ग्रंथांवरून होतो. शिवाय संशोधनांत अखेरचें असें कांहींच नाहीं. एका इंग्रज लेखकानें म्हटल्याप्रमाणें " Though History is always pronouncing judgments on men and movements, no final verdict is ever reached; there is always court of appeal –the historians of the next generation."

वाङ्मयाच्या इतिहासालाही हे शब्द तितकेच लागू आहेत. ज्ञानदेवांच्या नांवावर जे जे म्हणून मराठी हस्तलिखित ग्रंथ महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्राबाहेरील ग्रंथालयांत असतील त्या सर्वांच्या नकला मिळवून शक्य तर ' ज्ञानदेवांचें आपोक्रिफल वाङ्मय ' म्हणून हे ग्रंथ प्रसिद्ध केले पाहिजेत. म्हणजे यांपैकीं ज्ञानेश्वरांचे अस्सल कोणते, संशयास्पद कोणते आणि निश्चित ज्ञानेश्वरांचे नाहींत असे ग्रंथ कोणते हें अभ्यासकांना ठरवितां येईल.

जुन्या मराठीचे अनेक इतिहास व ज्ञानदेवांवरील अनेक चरित्रात्मक ग्रंथ किंवा निबंध आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत; परंतु ज्ञानदेवांच्या नांवावर उपलब्ध असलेला एकूण एक ग्रंथ मिळवून त्यांपैकीं ' साच ' कोणता व ' लटिका ' ( apocryphal ) कोणता, हें ठरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न कोणी केलेला माझ्या पाहण्यांत नाहीं. तसा उद्योग यापुढें झाला पाहिजे. स्वतः ज्ञानेश्वरच,

**साच लटिकें ओळखावें । हिताचिलागि ॥**

असें ज्ञानेश्वरीमध्यें एकीकडे म्हणतात. मराठी संशोधनमंडळाच्या बोधचिन्हांत हें वचन आढळेल. †

---

† मराठी संशोधनमंडळांत दि. १०-९-५८ रोजीं श्री. अ. का. प्रियोळकर यांनी वाचलेला निबंध.

टांचणें :

## १. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण

(रचणार, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री घगवे. संपादक—अनंत काकबा प्रियोळकर, संचालक, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई २. किं. ४ रु.)

प्रस्तुत व्याकरण कै. सर गो. दी. माडगांवकर यांच्या विश्वस्तांकडून मराठी संशोधनमंडळाच्या स्वाधीन करण्यांत आलेल्या रकमेच्या व्याजांतून माडगांवकर स्मारकग्रंथ म्हणून प्रसिद्ध झालें आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर आजवर मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार दादोबा पांडुरंग अशी जी समजूत होती ती गैरसमजूत होती असें म्हणणें हें आतां ओघानेंच प्राप्त होतें.

कोणतीहि भाषा पद्धतशीर शिकावयाची झाल्यास "काव्यम्, कोशश्च कौमुदी"[1] या वचनाला अनुसरून त्या भाषेंतील काव्यग्रंथ, कोशग्रंथ आणि कौमुदी म्हणजे भट्टोजीदीक्षितांनीं लिहिलेला एक व्याकरणग्रंथ या तीन ग्रंथांचा परिचय भाषाभ्यासकानें प्रथम करून घ्यावयास पाहिजे. कोणत्याहि जन्मभाषेहून अन्य अशा भाषेचा स्थूल परिचय जरी आपणांस करून घ्यावयाचा झाला तरी त्या भाषेंतील काव्यवाङ्मयाचा आपणांस अभ्यास करणें प्राप्त असतें. वाङ्मयाच्या द्वारा भाषेचें सामान्य स्वरूप ध्यानीं आलें म्हणजे त्या भाषेंतील कठीण शब्दांच्या अर्थज्ञानासाठीं कोशग्रंथाची मदत आपणांस घ्यावी लागते. काव्याभ्यास आणि कोशाचें साह्य यायोगें वाङ्मयामध्यें जरी आपला प्रवेश झाला, तथापि त्या भाषेंतील शब्दप्रयोगांची सोपपत्तिक चर्चा ही व्याकरणग्रंथांचा आश्रय घेतल्यावांचून कोणासहि करतां येणार नाहीं.

**"यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् ।**
**स्वजनः[2] श्वजनो माभूत् सकलं शकलं सकृत् शकृत् ॥"**

या एका प्राचीन सुभाषितामध्यें व्याकरणाचा अभ्यास न करतां केवळ भाषाव्यवहार करणाऱ्यास कोणत्या अनर्थांत पडावें लागतें हें फार चांगल्या रीतीनें दाखविलें आहे. सुभाषितकार असें बजावितात कीं, मुला! तुला इतर कोणत्याहि शास्त्राचा अभ्यास करावयाचा नसेल तर करूं नकोस, पण व्याकरणाचा अभ्यास मात्र अवश्य कर. व्याकरणाचा अभ्यास करण्यास जर तुझा आळस होईल तर

---

१. हें वाक्य संस्कृतभाषेंतील असल्यानें त्या भाषेला अनुलक्षून वैय्याकरणसिद्धांतकौमुदीचा उल्लेख येथें केला. तो उपलक्षणार्थी मानून येथें कौमुदी म्हणजे व्याकरणग्रंथ असें समजावयाचें आहे.

२. व्याकरणाचा जर अभ्यास केला नाहीं तर वर्णांचे शुद्ध उच्चार कोणते हें समजणार ाहीं. स या दन्त्यवर्णाचा श असा तालव्य उच्चार जर झाला तर सकल या शब्दाचें शकल ्याशिवाय राहणार नाहीं. सकृत् म्हणजे एकवार. या शब्दाचा शकृत् असा उच्चार जर तर शकृत् म्हणजे विष्ठा, असा हा अमंगल पदार्थच स्वीकारण्याची पाळी येईल.

तुझे स्वजनच श्वजन होतील आणि सकल म्हणजे संपूर्ण वस्तु प्राप्त व्हावयाचे ऐवजीं शकल म्हणजे तुकडाच पदरांत पडण्याची वेळ येईल. तसेंच सकृत्‌चें शकृत् होऊन भलताच प्रसंग ओढवेल. व्याकरणमहाभाष्याच्या आरंभींच पतंजलिमुनींनीं "किमर्थमध्येयं व्याकरणम्"–व्याकरणाचा अभ्यास कशासाठीं करावा–असा प्रश्न करून, या प्रश्नाचीं अनेकप्रकारानें उत्तरें देऊन; व्याकरणाध्ययनाची आवश्यकता सिद्ध केली आहे. "एकः शब्दः सम्यक् ज्ञातः, सुष्ठु प्रयुक्तः, स्वर्गे लोके च कामधुक् भवति" या वचनामध्यें वर्णिल्याप्रमाणें भाषेंतील एकाहि शब्दाचें ज्ञान सोपपत्तिक होऊन त्याचा प्रयोग जर चांगल्या रीतीनें करतां आला, तर तो सुप्रयुक्त शब्द परलोकीं आणि इहलोकीं प्रयोगकर्त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करणारा होतो. या वचनांतील पारलौकिक अदृष्टफलाच्या प्राप्तीविषयींचें विधान जरी आपण अर्थ-वादात्मक मानिलें तरी इहलोकच्या व्यवहारांत शुद्ध शब्दांचे प्रयोग करणाऱ्या विद्वानास सर्वत्र प्रतिष्ठा प्राप्त होत असल्याचें आपण नित्य अनुभवित असतोंच. व्याकरण न शिकतां खेडवळाचे व्यवहार कोठें अडून बसले आहेत? त्यांचे सर्व भाषाव्यवहार चाललेच आहेत कीं नाहींत? हें जरी खरें असलें, तरी व्यवहार कसा तरी चालणें आणि तो उत्तमरीतीनें चालणें यांमध्यें कांहीं फरक आहे कीं नाहीं? झाड-पाला खाऊनहि रानावनांतील वन्य मानवप्राणी आपलें जीवन चालवितील, पण, सुग्रणीनें आपल्या पाक-कौशल्यानें बनविलेल्या षड्रसात्मक सुग्रास अन्नाच्या सेवनानें तुष्ट व पुष्ट झालेल्या नागरिकाच्या जीवनाची सर त्या रानटी मानवाच्या जीवनाला कशी प्राप्त होईल? तात्पर्य, निसर्गतः होणाऱ्या भाषाव्यवहारापेक्षां शास्त्रपूत झालेल्या भाषाव्यवहारालाच लोकमान्यता प्राप्त होते. हें भाषेचें शास्त्र म्हणजेच व्याकरणशास्त्र होय. "शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानेंच समजतें." हें मराठी भाषेच्या प्रसिद्ध वैय्याकरणीचें वाक्य आपल्या सर्वांच्या परिचयाचेंच आहे.

व्याकरणग्रंथांचा कोणत्याहि भाषेच्या अभ्यासाला उपयोग काय हें जरी आतांपर्यंत केलेल्या विवेचनानें ध्यानीं आलें, तरी मराठी भाषेच्या अभ्यासाला उपयोगी पडण्यासारखें जुन्यांत जुनें व्याकरण कोणीं लिहिलें हा प्रश्न येथें उपस्थित झाल्याशिवाय राहात नाहीं. पुष्कळ विद्वानांनीं ज्यांना मराठी भाषेचे पाणिनि म्हणून गौरविलें, असे व्याकरणकार दादोबा पांडुरंग हे आपल्या दृष्टीपुढें असतां, मराठी भाषेमध्यें इंग्रजांच्या कारकीर्दींत जुनें व पहिलें व्याकरण कोणी लिहिलें असा प्रश्न तरी कसा उत्पन्न होतो, असें कोणाला वाटण्याचा संभव आहे. पण त्याचें उत्तर असें आहे कीं, दादोबांनीं जें व्याकरण लिहिलें, तें केवळ मराठी जनतेकरितां नसून येथें आलेल्या इंग्रजांनाहि त्याचा उपयोग व्हावा अशा दुहेरी अर्थानें तें लिहिलें आहे. दादोबांचा व्याकरण लिहिण्यामध्यें उद्देश कांहींहि असो; पण लिहिलेलें याकरण हें मराठीभाषेच्या अभ्यासकांना उपयोगी पडत आहे. ही गोष्ट कांहीं

नाकारतां येत नाहीं. मग तो मराठी भाषेचा अभ्यास करणारा एतद्देशीय असो कीं, महाराष्ट्रीय असो कीं कोणी एखादा परदेशस्थ इंग्रज असो. वर वर विचार करणाऱ्यास हें उत्तर बरेंच समर्पक वाटेल; पण जरा या बाबतींत सूक्ष्म विचार करावयास पाहिजे. तो सूक्ष्म विचार असा कीं, ज्या भाषेचें व्याकरण लिहावयाचें, ती भाषा आत्यंतिक स्वतंत्र आहे कीं, तिला कांहीं पूर्वपरंपरा असल्यानें त्या परपरेच्या अधीन ती आहे. जर ती स्वतंत्र असेल तर तदनुसार तिचें व्याकरणहि स्वतंत्र असावयास पाहिजे. ती परतंत्र असेल तर ज्या अन्य भाषेच्या अधीन ती असेल त्या भाषेच्या व्याकरणाला अनुसरून तिचें व्याकरण तयार व्हावयाला पाहिजे. मराठी भाषा ही एक स्वतंत्र भाषा नसून ती संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेली असल्यानें संस्कृत भाषेच्या व्याकरणाला अनुसरूनच मराठी भाषेचें व्याकरण लिहावयाला पाहिजे. दादोबांच्या व्याकरणाचा साकल्यानें जर विचार केला तर तें संस्कृतभाषेचें व्याकरण दृष्टीपुढें ठेवून लिहिलें असावें असें वाटत नाहीं. इंग्रजी भाषेच्या व्याकरणाची छाया दादोबांच्या व्याकरणावर पडली असल्याचें पुष्कळ ठिकाणीं दिसून येतें. या विषयासंबंधीं तुलनात्मक चर्चा थोरले चिपळूणकरशास्त्री यांनीं लिहिलेला 'मराठी व्याकरणावरील निबंध' यामध्यें किंवा दामले यांनीं लिहिलेल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या ग्रंथामध्यें सविस्तर मिळेल. आम्हांला येथें फक्त इतकेंच सुचवावयाचें आहे कीं, दादोबांचें व्याकरण हें मराठी भाषेच्या अभ्यासकांना उपयुक्त झालें खरें, पण त्यामध्यें तें परभाषेच्या स्वभावाला अनुसरून पुष्कळ अंशीं लिहिलें असल्यानें, कांहीं विघातक व कांहीं अनावश्यक अशा गोष्टींचेंहि मिश्रण त्यामध्यें झालें आहे आम्हांला मराठी भाषेचें यथार्थ दर्शन करून देणारें व्याकरण पाहिजे आहे. मराठी भाषा ही ज्या कुळामध्यें जन्माला आली; त्या कुळांतील संप्रदायाचा विचार करावयाचा म्हणजे संस्कृतभाषेच्या व्याकरणाचाच विचार करणें हें प्राप्त आहे. दादोबांनीं ही दृष्टि ठेविली नसल्यानें त्यांच्या व्याकरणाचा विचार आम्हांला येथें करणें महत्त्वाचें वाटत नाहीं. दादोबांना कोणी मराठीचे पाणिनि म्हणून संबोधिलें असेल, पण तें अर्थवादात्मक समजून मराठी भाषेच्या पूर्व संप्रदायाला धरून जुन्यांत जुनें व्याकरण कोणतें, याचा ज्या वेळीं आपण माग काढूं लागलों; त्या वेळीं आमच्यापुढें प्रस्तुत समालोचनाकरितां घेतलेलें "महाराष्ट्र भाषेचें व्याकरण" हेंच एक प्रमुखत्वानें पुढें आलें.

या व्याकरणाची रचना करणारे पं. जगन्नाथशास्त्री क्रमवंत, पं. गंगाधरशास्त्री फडके आणि पं. बाळशास्त्री घगवे असे तीन नामांकित शास्त्री होते. या व्याकरणाची मूळ हस्तलिखित प्रत, १८२५ सालीं तयार झाली असून ती इंडिया ऑफिसच्या मराठी हस्तलिखित संग्रहालयांतून उपलब्ध झाली. मायक्रोफिल्म करून ही प्रत आणविली असल्यानें मूळप्रतीचें लेखन वगैरे सर्व यथावत् असें आज येथें आपणांस पहावयास मिळत आहे. हें व्याकरण अव्वल इंग्रजीच्या काळांत तयार

झालेलें असून निव्वळ शास्त्रिवर्गानें हें लिहिलें असल्यानें इंग्रजी व्याकरणाचा दुष्परिणाम याजवर बिलकूल झालेला नाहीं. या व्याकरणाचा आरंभच या शास्त्रिमंडळानें पुढीलप्रमाणें प्रतिज्ञा करून केला आहे. ती प्रतिज्ञा अशी—" अविछिन्न परंपरागत बालबोध लिपि शिक्षा लोकव्यवहार कांहीं कांहीं शास्त्रीय कल्पना आणि युक्ति यांतें अवलंबून सुखबोधार्थ महाराष्ट्रभाषेचें व्याकरण लिहितो. "

ही आरंभींची शास्त्रिमहाशयांची प्रतिज्ञा प्रस्तुत व्याकरण ग्रंथ साद्यंत अवलोकन केला असतां सर्वांशानें यथार्थ आहे असें दिसून येतें. संस्कृतभाषेचा सर्वत्र प्रचलित असा जो प्रधान व्याकरणग्रंथ " वैय्याकरणसिद्धान्तकौमुदी " या ग्रंथाचेंच अनुकरण या व्याकरणामध्यें सर्वत्र केलेलें दिसून येतें कोणताहि व्याकरणग्रंथ घेतला, तरी त्यामध्यें प्रथम वर्णविचार, नंतर शब्दविचार आणि शेवटीं वाक्यविचार अशीं तीन प्रकरणें प्रामुख्यानें असतात. सिद्धान्तकौमुदींतला हाच क्रम प्रस्तुत व्याकरणामध्यें स्वीकारला असल्यानें यांतील पहिलीं सात प्रकरणें स्वरव्यंजनात्मक वर्णांची उत्पत्ति कशी व कोणत्या स्थानापासून झाली, याचें निरूपण करण्याचे कामीं खर्ची पडलीं आहेत. पुढें आठव्या प्रकरणापासून शब्दविचाराला सुरुवात होते. ती सुरुवात करतांनाच प्रथम भाषाव्यवहारकालीं वाक्यप्रयोगामध्यें जे अनेक प्रकारचे शब्दांचे प्रयोग केलेले दिसून येतात, त्यांची वर्गवारी करून नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद असे शब्दांचे भिन्न प्रकार दाखविले आहेत. येथें या प्रकारांना इंग्रजींत कोणते शब्द उपयोजिले जातात ते दाखविले आहेत. वास्तविक ते शब्द येथें दाखविण्याची कांहीं आवश्यकता नव्हती. प्रस्तुत व्याकरणाच्या संपादकांनीं हे इंग्रजी शब्द मागाहून कोणी तरी येथें लिहिले असावेत, अशी शंका व्यक्त केली आहे. आम्हांस ती बरोबर वाटते.

शब्दांचे जे चार प्रकार सांगितले, त्यांतील क्रियापद सोडून नामादि जे शब्दप्रकार, त्या प्रकारांचीं लिंगभेद आणि अकारादि अंत्यस्वरभेद यांना अनुलक्षून विभक्तिप्रत्यय जोडल्यानंतरचीं भिन्न भिन्न रूपें कशीं होतात, यांचें सोदाहरण विवेचन चवदाव्या प्रकरणापर्यंत केलें आहे. पुढें पंधराव्या प्रकरणामध्यें विभक्त्यर्थविचार केला आहे. या विभक्त्यर्थांचा विचार करणाऱ्या पंधराव्या प्रकरणांतच समास, तद्धित व द्वित्व यांचा समावेश केला असल्याचें दिसून येतें. वास्तविक हीं तीनहि प्रकरणें निरनिराळीं अशींच दाखवावयास पाहिजे होतीं. अठराव्या प्रकरणांत सर्व क्रियापदांचीं काळ व अर्थ यांना अनुसरून होणारीं भिन्न भिन्न रूपें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. एकोणिसावें प्रकरण वाक्यांतील कर्तरि आदि प्रयोगांची व्यवस्था लावते, तर विसाव्या प्रकरणांत क्रियानामें म्हणजे कृदंत किंवा धातुसाधितें यांचा विचार आहे. व शेवटीं एकवीस व बावीस या दोन प्रकरणांत पूर्वीं आठव्या प्रकरणांत सांगितलेल्या अव्ययांच्या व्याख्या सोदाहरण देऊन या व्याकरणग्रंथाची परिसमाप्ति केली आहे.

एकंदर बावीस प्रकरणांत विभागलेल्या या व्याकरणग्रंथाची सर्व रचना भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धान्तकौमुदीला पुढें ठेवूनच केलेली असावी, असें पुष्कळ अंशानें स्पष्ट दिसून येतें. मात्र, अव्ययप्रकरण शेवटीं कां घातलें हें समजून येत नाहीं. अव्यय हा जो शब्दाचा प्रकार आहे तो संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीनें नामसंज्ञक शब्दांच्या प्रकारांतच समाविष्ट होतो. अव्ययांनाहि नामाप्रमाणें विभक्तिप्रत्यय लागतात. फक्त फरक इतकाच कीं, विभक्तिप्रत्ययांच्या योगानें नामामध्यें व्यय म्हणजे रूपामध्यें कांहीं बदल होतो आणि अव्ययामध्यें तसा बदल होत नाहीं. शिवाय अव्ययावरून होणाऱ्या विभक्तिप्रत्ययांचा लोप होऊनच तीं अव्ययें वाक्यामध्यें उपयोजिलीं जातात. अर्थात् अव्ययें हीं नामाप्रमाणें विभक्त्यंत रूपेंच असल्यानें तीं नामाच्या प्रकरणाच्या पुढेंच स्वतंत्र प्रकरणामध्यें विवेचिलीं जाणें हें शास्त्रीय दृष्ट्या सयुक्तिक झालें असतें. इंग्रजी भाषेचें व्याकरण दृष्टीपुढें ठेवून पुढें जीं अनेक व्याकरणें निर्माण झालीं, त्यांमध्यें अव्ययांना विभक्तिप्रत्यय लागतच नाहींत असें विधान केलें आहे. पण तें विधान मराठी भाषेची पूर्वपरंपरा ध्यानीं घेतली असतां, मराठी भाषेच्या व्याकरणांत बिलकूल निर्दोष असें समजलें जाणार नाहीं. मराठी भाषा ही संस्कृत भाषेपासून उत्पन्न झाली असल्यानें संस्कृत भाषेच्या व्याकरणाचे सर्व नियम मराठी भाषेच्या व्याकरणांत प्रमाण मानून चालावयास पाहिजे. संस्कृत भाषेंतील व्याकरणाचा असा एक नियम आहे कीं, "अपदं न प्रयुञ्जीत" ज्या शब्दाला पदसंज्ञा नाहीं, त्या शब्दाचा वाक्यांत प्रयोग करूं नये. शब्दाला जी पदसंज्ञा येते, ती त्या शब्दास प्रत्यय जोडल्यानंतरच येते. अव्ययाला जर कोणताहि प्रत्यय जोडलाच नाहीं; तर त्यास पदसंज्ञा येणार नाहीं. आणि अव्यय जर पद नाहीं, तर त्याचा वाक्यांत प्रयोग होणार नाहीं. तात्पर्य, अव्ययेंहीं विभक्त्यंतच आहेत. आतां प्रत्यक्ष त्या अव्ययाच्या शेवटीं प्रत्यय लुप्त झाल्यामुळें तो दिसत नसला तथापि "प्रत्ययलोपे प्रत्ययलक्षणम्" या पाणिनि-सूत्रानुसार लोप पावणारा प्रत्यय, आपला संस्कार ठेवूनच लोप पावतो. यामुळें प्रत्यय हा अव्ययाच्या शेवटीं जरी दिसत नसला, तरी तें तें अव्ययाचें रूप प्रत्ययांत मानावयास पाहिजे. कोणत्याहि प्रत्ययान्त रूपालाच पदसंज्ञा असून अशा पदसंज्ञक शब्दांचाच प्रयोग वाक्यांत करतां येतो, असा संस्कृत व्याकरणाचा दंडक आहे. इंग्रजी भाषेंतील व्याकरणकारांनीं प्रत्ययशून्य अशा अव्ययसंज्ञक शब्दांचा वाक्यामध्यें प्रयोग करण्याविषयीं काय नियम केला आहे, त्याचा आम्हांला विचार करण्याचें येथें कांहींच प्रयोजन नाहीं. आम्हांला शेवटीं येथें इतकेंच सूचित करावयाचें आहे कीं, अव्ययांना नामाच्या विभक्तींचेच प्रत्यय लागत असल्यानें त्या अव्ययाचें प्रकरण, नामप्रकरणाच्या लगतच यावयास पाहिजे होतें. प्रस्तुत व्याकरणकारांनीं तें शेवटीं कां घातलें तें समजत नाहीं.

इंग्रज लोक येथें येऊन त्यांनीं आपल्या भाषेचा प्रचार केल्यानंतर इकडील

मराठी भाषेला पुढें जें एक नवें वळण लागलें त्यापूर्वींच या व्याकरणाची रचना झाली असल्यानें, या व्याकरणाची भाषा आजच्या वाचकांना पुष्कळशी जुन्या वळणाची वाटेल; तथापि ती व्याकरणशास्त्र पढलेल्या बुद्धिमान शास्त्रि-पंडितांची असल्यानें तिच्यामध्यें सर्वत्र भारदस्तपणा भरून राहिलेला दिसतो. फक्त कांहीं कांहीं ठिकाणीं नवीन संज्ञाशब्दांचे केलेले प्रयोग मात्र वाचकांना अर्थबोधाच्या कामीं जरा अडथळा उत्पन्न करतील, असें आम्हांस वाटतें. प्रकरण अकरामध्यें "निवर्त्तक" अशी एक नवीनच संज्ञा प्रस्तुत व्याकरणकारांनीं उपयोगांत आणली आहे. हा निवर्त्तक शब्द संस्कृत भाषेतील व्याकरणकारांनीं कोठेंहि उपयोगांत आणला नसल्यानें प्रस्तुत व्याकरणकारांनाच या निवर्त्तक शब्दाची व्याख्या लागलीच पुढें "निवर्त्तक म्हणजे त्यास घालवून त्याचे स्थळीं येतो तो होय. जसा शत्रु" याप्रमाणें द्यावी लागली. वास्तविक या ठिकाणीं हा नवीन शब्द उपयोजण्याचेंच कांहीं कारण नव्हतें. संस्कृतांतील पूर्व व्याकरणाचार्योंनीं याच अर्थी "आदेश" म्हणून जो शब्द उपयोगांत आणला आहे, त्या शब्दाचाच येथें या व्याकरणकर्त्यांना उपयोग करण्यास कांहींच हरकत नव्हती. पाणिनीच्या व्याकरणांत सुद्धां "प्राचां संज्ञाभिः इहैव व्यवहारः" पूर्वसूरींनीं उपयोजिलेल्या संज्ञांनींच या ठिकाणीं आम्ही व्यवहार करतों, असें म्हणून जुन्या रूढ झालेल्या संज्ञांचाच उपयोग सर्वत्र केलेला दिसतो. अशी व्याकरणांतील संज्ञाशब्दाची परिस्थिति असतां "आदेश" शब्द बाजूला ठेवून "निवर्त्तक" हा नवा संज्ञाशब्द उपयोगांत आणण्याचें कांहीं कारण नव्हतें.

प्रस्तुतग्रंथ हा व्याकरणशास्त्राचा असल्यानें यामध्यें प्रसंगविशेषीं ज्या व्याख्या करावयाच्या त्या अत्यंत सूक्ष्म विचारानें, आणि फार कांटेतोल अशा करावयास पाहिजेत. कोणतेंहि लक्षण बांधावयाचें म्हणजे अव्याप्ति, अतिव्याप्ति आणि असंभव या त्रिदोषानें तें व्यापलेलें असतां कामा नये. मधून मधून एखाद्या शब्दाची व्याख्या लिहितांना निर्दिष्ट त्रिदोषानें ती व्याप्त होऊं नये; याकडे अनवधान झाल्यासारखें दिसतें. उदाहरणार्थ पृष्ठ १४ वर "नाम म्हणजे अर्थयुक्त शब्द" अशी नामाची व्याख्या केली आहे. पण ती फारच शिथिल आहे. धातु हेहि अर्थयुक्तच शब्द आहेत; पण त्यास नाम म्हणतां येणार नाहीं. आम्हास येथें असें वाटतें कीं, नामाची व्याख्या लिहितांना ग्रंथकारापुढें "अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्" हें पाणिनीच्या अष्टाध्यायींतील सूत्र असलें पाहिजे. अर्थात् या सूत्राचें मराठी भाषांतर जरी नुसतें केलें, तरी नामाची निर्दोष व्याख्या त्यापासून तयार झाली असती. ग्रंथकारांनीं ती तशीच निर्दोष व्याख्या केलीहि असेल. पण छपाईच्या वेळीं "अर्थयुक्त" या शब्दापुढील निर्दोष व्याख्येला आवश्यक असलेले इतर शब्द मुद्रकाच्या अनवधानानें राहून गेले असावेत.* व पुढें ते मुद्रितें तपासणाऱ्यांच्या

* मजकूर मूळ हस्तलिखिताबरहुकूम असून ही छपाईची चूक नाहीं. —संपादक.

नजरेंतूनहि सुटले असावेत. नामाच्या व्याख्येंतील दोषासंबंधीं अशी कांहीं तरी कल्पना केल्याशिवाय पंडितग्रंथकाराच्या हातून इतकी ढोबळ चूक कशी झाली या प्रश्नाला येथें आम्हांला दुसरें कांहीं उत्तर दिसत नाहीं. प्रकरण दोन वर्णविचार, यामध्येंहि असाच थोडा दुर्लक्ष्य झाल्यासारखा प्रकार दिसतो. पृष्ठ दोनवर "स्वर मुख्य ५ ते – अ. इ. उ. ऋ. ऌ हे ऱ्हस्व. यांस दीर्घ केला असतां आ, ई, ऊ. ॠ. ॡ हे पांच. एकूण १० या पांचास दीर्घ स्वर म्हणतात." अशीं ऱ्हस्व आणि दीर्घ स्वरांचीं रूपें येथें दाखविलीं आहेत. या स्वरांपैकीं पहिले चार स्वर ऱ्हस्व आणि दीर्घ असे दोनहि प्रकारचे होतात हें ठीक आहे; पण "ऌ" या स्वराला दीर्घत्व नाहीं. संस्कृत व्याकरणकारांनीं "ऌ" या स्वराला दीर्घत्व येत नाहीं, असें स्पष्ट सांगितलें आहे. अर्थात् "ऌ" हा स्वर दीर्घ होतो हेंहि विधान प्रवाहपतित होऊन दुर्लक्ष्यानेंच झालें असावें असें आम्हांस वाटतें. कदाचित् कोणी येथें असें म्हणेल कीं, संस्कृत भाषेमध्यें दीर्घ ऌ चा प्रयोग नाहीं, म्हणून वर्णविचारांत त्याचा उल्लेख केला नाहीं; परंतु मराठी भाषेमध्यें तो प्रयुक्त असल्यानें वर्णविचारांत त्याला स्थान द्यावें लागलें. हें म्हणणें ठीक दिसतें. पण तसा एखादा दीर्घ ऌ चा शब्दांत झालेला प्रयोग येथें दाखविला असता म्हणजे बरें झालें असतें.

या परिच्छेदाच्या आरंभीं शास्त्रीय ग्रंथांत असें शिथिलपण असूं नये असें आम्हीं म्हटलें आहे. या आमच्या विधानाला परिपोषक अशीं आणखी एकदोन उदाहरणें येथें आम्ही उद्धृत करणार आहों. पृष्ठ तीसवर "स्त्रीप्रत्यय" असें शीर्षक देऊन एका प्रकरणाला सुरुवात केली आहे. या प्रकरणाच्या आरंभीं स्त्रीत्व किंवा पुंस्त्व वगैरे जे जीवधर्म, त्या जीवधर्माला अनुसरून भाषेंतील शब्दांचीं लिंगें ठरवावयाचीं का, या मराठी भाषेंतील शब्दांचीं लिंगें ठरवितांना कांहीं व्याकरणकारांची येथें स्वतंत्र योजना आहे; याचा ऊहापोह या प्रकरणाच्या आरंभीं करावयास पाहिजे होता. संस्कृत भाषेच्या व्याकरणामध्यें यासंबंधीं केलेल्या विवेचनाचा गोषवारा येथें वाचकांच्या समजुतीसाठीं आम्ही देणार आहों.

सर्वत्र व्यवहारांत जीवसृष्टीमध्यें त्या त्या जीवांच्या आकारभेदावरून तो जीव स्त्री आहे कीं पुरुष आहे, हें आबालवृद्धांस ओळखतां येतें. जीवांचें स्त्रीत्व किंवा पुंस्त्व हे जे दोन धर्म, ते ज्या जीवाचे ठिकाणीं दिसून येत नाहींत; तो जीव नपुंसक आहे असें म्हणतात. याप्रमाणें प्राणिमात्राचे ठिकाणीं असणारे हे लिंगभेद व्याकरणशास्त्रामध्यें काहींहि उपयोगी पडत नाहींत. व्याकरण-शास्त्र हें शब्दशास्त्र असल्यानें शब्दाच्या लिंगाचा या शास्त्राला विचार कर्तव्य आहे. त्या शब्दापासून प्रतीत होणाऱ्या अर्थाचा त्याला विचार करण्याचें कांहींच कारण नाहीं. लिंगभेद हा शब्दाच्या अर्थावर जर आपण ठरवूं लागलों तर अचेतन जे भिंत, खांब, फळ वगैरेसारखे शब्द यांना कोणतेंच लिंग नाहीं, असें म्हणण्याची पाळी येईल. आणि पत्नी या अर्थाचा जो कुटुंब हा शब्द तो स्त्रीलिंगी

आहे असें म्हणावें लागेल. तात्पर्य, शब्दाचा वाच्यार्थ चेतन पदार्थ असो वा अचेतन पदार्थ असो, त्या वाच्य अर्थाचा लिंगभेदाशीं कांहीं संबंध नाहीं. मग व्याकरणशास्त्रानें तरी शब्दाचें लिंग हें कोणत्या तत्त्वावर निश्चित केलें? या प्रश्नाचें उत्तर व्याकरणशास्त्रानें असें दिलें आहे कीं—

या प्रत्यक्षगोचर चराचरसृष्टीचें आदिकारण जी त्रिगुणात्मक प्रकृति, तिच्यापासून या सर्व सृष्टीची निर्मिति झाली आहे. सृष्टीचें मूळ कारण अशा या प्रकृतीमध्यें सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचें ज्या वेळीं साम्य असतें त्यावेळीं सर्व सृष्टीचा प्रलय होतो. आणि ज्या वेळीं या मूळ प्रकृतीमध्यें क्षोभ होऊन गुणांमध्यें वैषम्य उत्पन्न होतें; त्या वेळीं या सृष्टीची उत्पत्ति होते. त्रिगुणात्मक प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सर्व पदार्थ हे "कारणगुणाः कार्यगुणान् आरभन्ते" या न्यायानें त्रिगुणात्मच आहेत असें मानावयास पाहिजे. प्रकृतीच्या ठिकाणीं असलेल्या या गुणांच्या वैषम्यामुळें ही सर्व सृष्टि उत्पन्न होत असल्यानें या सृष्टीमध्यें गुणांचें मिश्रण हें विषमच झालेलें असतें. भाषेंतील शब्द हाही सृष्ट पदार्थच असल्यानें; ज्या शब्दामध्यें सत्त्वगुणाचा उत्कर्ष झालेला असतो, तो शब्द पुल्लिंगी समजावा. ज्यामध्यें रजोगुणाचा उत्कर्ष होतो तो शब्द स्त्रीलिंगी आणि ज्यामध्यें तमोगुणाचा उत्कर्ष झाला असेल, तो शब्द नपुंसकलिंगी–अशी ही संस्कृत व्याकरणकारांची शब्दांच्या लिंगासंबंधींची प्रक्रिया आहे. पदार्थ, व्यक्ति आणि वस्तु या तीन शब्दांचा वाच्यार्थ हा जरी एकच आहे; तथापि, या तीन शब्दांच्या घटकामध्यें गुणतारतम्य असल्यानें पदार्थ हा शब्द पुल्लिंगी समजला जातो. व्यक्ति हा शब्द स्त्रीलिंगी समजला जातो आणि वस्तु या शब्दाच्या वाटेला नपुंसकलिंग आलें.

संस्कृत भाषेंतील शब्दांच्या लिंगभेदासंबंधीं संस्कृत व्याकरणकारांची ही विचारसरणी ध्यानीं घेऊन मराठी भाषेच्या व्याकरणकारांनींहि लिंगविचारनामक प्रकरणाच्या आरंभीं, हाच विचार संक्षेपानें कां होईना पण मांडणें अवश्य होतें. प्रस्तुत व्याकरणकारांनीं "स्त्रीप्रत्यय" या प्रकरणाच्या आरंभीं आम्ही वर विवेचिल्याप्रमाणें मराठीभाषेमध्यें लिंगभेद हा शब्दावर अवलंबून आहे का अर्थावर अवलंबून आहे या संबंधीं एक अवाक्षरहि न काढल्यामुळें लिंगज्ञाना-विषयीं जिज्ञासु विद्यार्थी साशंक झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

स्त्रीप्रत्ययप्रकरणांतील हा अपुरेपणा पाहिल्यानंतर आपण थोडें समासप्रकरण चाळून पाहूं. अठ्ठेचाळीस पृष्ठावर या समासप्रकरणाचा विचार सुरू झाला आहे. प्रकरणाच्या आरंभीं समासाचें लक्षण सांगितलें; हें ठीक झालें. पण पुढें त्या समासाचे प्रकार सांगतांना बरीच गडबड झाली आहे. समस्तशब्द हा एक साधित शब्द आहे. या शब्दाची सिद्धि करतांना कमींत कमी दोन शब्द तरी त्यामध्यें असणें जरूर असतें. या समस्तशब्दामध्यें असलेल्या दोन शब्दांच्या गुणप्रधान भावावर समासाच्या प्रकारांची उभारणी होत असते. सामासिक शब्दांतलि दोन शब्दांपैकीं

पहिला शब्द जर मुख्य असेल तर त्या समासास अव्ययीभाव म्हणतात. दुसरा मुख्य असेल तर त्यास तत्पुरुष असें म्हणतात. दोनहि शब्द मुख्य असतील तर त्यास द्वंद्व म्हणतात आणि दोनहि शब्द मुख्य नसून तिसराच शब्द मुख्य असेल तर त्यास बहुव्रीहि म्हणतात. अशा रीतीनें समासाचे मुख्यतः चार प्रकार संभवत असतां प्रस्तुत व्याकरणकार "त्या समासाचे प्रकार सहा आहेत" असें विधान करतात. आणि पुढें त्या प्रकारांचीं नांवें सांगतांना तत्पुरुषाच्याच पोटभेदांची (द्विगु, मध्यमपदलोपी आणि कर्मधारय हे प्रकार तत्पुरुषाचे पोटभेद) स्वतंत्र प्रकार म्हणून गणना करतात. समासाच्या मुख्य प्रकारांपैकीं प्रथमस्थानीं असणारा जो अव्ययीभाव त्याचा मुळीं या प्रकारांत उल्लेखच नाहीं. तसेंच तत्पुरुषाचीं उदाहरणें देतांना द्वितीयातत्पुरुषापासून क्रमानें तीं न देतां एक-दोन उदाहरणें देऊनच हा विषय पुरा केला आहे. कर्मधारयाचेहि विशेषणपूर्वपद, विशेषणोत्तरपद, विशेषणोभयपद, उपमानपूर्वपद, उपमानोत्तरपद वगैरेसारखे जे अनेक पोटभेद भाषेमध्यें रूढ आहेत, त्यांचाहि विचार या ठिकाणीं करणें अवश्य असतां, तो केलेला दिसत नाहीं. तथापि हा प्रयत्न प्रथमच असल्यानें अशा किरकोळ गोष्टींकडे अभ्यासकांनीं जरा दुर्लक्ष्यच करावयास पाहिजे.

या व्याकरणाची छपाई मूळ हस्तलिखितांतील लेखनशैलीला धरून केलेली असल्यानें लेखकाच्या विशिष्ट दृष्टीला ध्यानीं घेऊनच वाचकांनीं या पुस्तकाच्या मुद्रणाकडे पहावयास पाहिजे. चवर्गाचे तालव्य आणि दंततालव्य असे जे दोन उच्चारामध्यें भेद होतात, ते भेद लेखनामध्येंहि विशिष्टरीतीनें दाखविण्याचा या पुस्तकामध्यें प्रयत्न केला आहे. वास्तविक हा फार उपयुक्त होता. पण पुढील लेखकांनीं तो प्रकार कां प्रचारांत ठेवला नाहीं हें आम्हांस समजत नाहीं. टाइप उडाल्याचे वगैरे किरकोळ जे मुद्रणदोष या पुस्तकामध्यें मधून मधून दिसून येतात ते सहज ध्यानांत येण्यासारखें असल्यानें त्याचा येथें अधिक विचार करावयास नको.

मराठी भाषेचें व्याकरण लिहितांना लेखकानें प्रमुखतः कोणती दृष्टि ठेवावी या गोष्टीचें मार्गदर्शन करण्यास "महाराष्ट्र भाषेचें व्याकरण" या ग्रंथाचा अतिशय उपयोग होईल. शास्त्रीय व्याकरणाचा हा एक आदर्श आहे. अशा तऱ्हेचें नमुनेदार पुस्तक प्रसिद्ध करून मराठी संशोधनमंडळाचे संचालक व प्रस्तुत पुस्तकाचे संपादक प्रा. प्रियोळकर यांनीं मराठी जनतेवर मोठे उपकार केले आहेत. यासाठीं त्यांना या प्रयत्नाबद्दल धन्यवाद देऊन हें लांबलेलें समालोचन आम्ही येथें पुरें करितों.

—बा. मा. खुपेरकर

---

## २. अक्षी शिलालेख

**थोडी दुरुस्ती** : 'मराठी संशोधनपत्रिके' च्या सहाव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत अक्षी येथील शके ९३४ (इ. स. १०१२) मधील एक शिलालेख सटीप प्रसिद्ध केला आहे. त्याच्या वाचनांत एक-दोन ठिकाणीं दुरुस्ती करणें अवश्य वाटल्यावरून येथें त्याप्रमाणें करीत आहें. मूळ लेखांत पहिल्या दोन ओळींचें वाचन पुढीलप्रमाणें दिलेलें आहे—

(१) स्वस्ति प्रसंश करीजे । यसीम स –

(२) मप्रधायती । स्त्रीकोंकणा चेला –

(३) वती । स्त्रीकेसवुदेवराय

वरीलपैकीं अधोरेखित शब्द बरोबर वाचले न गेल्यानें त्यांचा अर्थ लावण्यांत थोडी ओढाताण झाली आहे. या अधोरेखित मजकुराचें पुनर्वाचन पुढीलप्रमाणें होईल :—

(१) स्वस्ति प्रसंश करीजे । **पसीमस** —

(२) **मुद्र (द्रा) धीपती । स्त्रीकोंकणा (ण ?) चक्र** —

(३) **वर्ती । स्त्रीकेसिदेवराय**

वरील दुरुस्त वाचनाचा पहिला भाग (म्ह. 'पसीमसमुद्रधीपती') सागर विद्यापीठांतील डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं पत्रद्वारें सुचविला व त्यासाठीं मी त्यांचा आभारी आहें. या दुरुस्त वाचनाचा अर्थ आतां 'पश्चिमसमुद्राधिपति व श्री कोंकण-चक्रवर्ति' असा होऊन हीं दोन पदें म्हणजे केशिदेव शिलाहाराचीं बिरुदें ठरतात. उत्तर कोंकणच्या शिलाहार राजांच्या इतर लेखांतून त्यांचीं जीं बिरुदें आढळतात त्यांच्याशीं प्रस्तुत लेखांतील वरील दोन बिरुदें जुळतीं आहेत. या नवीन वाचनामुळें साहजिकच 'पत्रिकें' तील मूळ लेखामधील पृ. १६ वरील क्र. ३, ४ व ६ या पादटीपा खोडाव्या लागतील. तसेंच, या दोन ओळींपुरता शिलालेखाचा अर्थहि बदलून घ्यावा लागेल, व पृ. ११ वरील 'चेलावती' संबंधींचें विवेचन प्रस्तुत लेखापुरतें तरी रद्द समजावें लागेल.

अक्षी शिलालेखावरील 'पत्रिकें' तील निबंध वाचून लंडन येथील इंडिया ऑफिसच्या लायब्ररींतून नुकतेच सेवानिवृत्त झालेले व सध्यां प्राचीन मराठी

कोरीव लेखांचा भाषादृष्ट्या अभ्यास करीत असलेले श्री. आल्फ्रेड मास्टर हे ॲस्कॉट येथून प्रस्तुत लेखकास लिहिलेल्या पत्रांत म्हणतात—

" . . . Today your Pahilā Marathi Silālekha reached me in offprint form and I am very grateful for it. I think, Hultzsch is right in dating the S'ravana-Belgola inscription c. A. D. 1118 and the Akṣi inscription is therefore the earliest dated inscription known for Marathi . . .

My remarks can only be very perfunctory. I am not happy about the meaning *dīdha = tithi*, and *baulu = bahula* is out of place. *Vāhāṇa*: the connection with *ājnā* is weak and the sense not too good. One would prefer a word meaning, " a gift or grant. " But at the moment I can't suggest any alternative and as you say, the inscription has suffered from abrasion... " ( ॲस्कॉट, ता. २६ ऑक्टोबर १९५८ )

श्री. मास्टर यांची ' वाहाण ' या शब्दाविषयींची शंका अकारण आहे. हा शब्द सं. आज्ञा या शब्दापासून सिद्ध होणें नियमास धरून आहे : पहाः टर्नरकृत नेपाळी कोश, पृ. ६४७; ब्लोककृत मराठीची घडण, पृ. २९१. ' दीध ' आणि ' बौलु ' या दोन शब्दांबाबत मला स्वतःलाहि शंका आहेच. ' आधीकु दीध सुक्रे बौलु ' हा उल्लेख कालविषयकच आहे; परंतु त्यांतील वरील दोन शब्दांचें वाचन व त्यांचा अर्थ याविषयीं संशय वाटतो हें मान्य केलें पाहिजे. तसेंच प्रस्तुत लेखांतील कालविषयक निर्देशहि रूढ पद्धतीस सोडून आहे असें वाटतें. असो.

अक्षी शिलालेखावरील मूळ निबंधाच्या प्रती अनेक मराठी विद्वानांकडे पाठविल्या होत्या. त्यांपैकीं सागरचे डॉ. दीक्षित व इंग्लंडमधील श्री. आल्फ्रेड मास्टर या दोघांकडूनच कांहीं विधायक सूचना आल्या. त्या वरील विवेचनांत समाविष्ट केल्या आहेत.

— शं. गो. तुळपुळे

# ३. ‘योगराजटिळक’ आणि अमृतानंद

**अमृतानन्द, अमृत आणि अमृतराय :**

प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं १९५६ मध्यें अमृतानंद नामक कवीचा ‘योगराज-टिळक’ हा ३३० ओव्यांचा 'दत्तसाम्प्रदायिक ग्रंथ' संपादित करून मराठी संशोधनमंडळातर्फे प्रकाशित केला आहे. त्यांच्या मतें अमृतानंद हा एकनाथपूर्वकालीन आहे. (पुरस्कारलेखक डॉ. रा. द. रानडे यांच्या मतें या ग्रंथावर ‘दासबोध’ व ‘तुकाराम-गाथा’ यांचा परिणाम दिसत असल्यानें तो उत्तरकालीन असावा.) चांदोरकरांच्या ‘कविकाव्यसूचीं’त अमृतानंदाच्या नांवावर ‘स्वरूपनिर्णय’ व ‘योगराजटिळक’ असे दोन ग्रंथ दिले आहेत. प्रियोळकरांच्या मतें या दोन ग्रंथांचे लेखक वेगवेगळे असून त्यांची परंपरा व नांवें एकच आहेत. पैकीं ‘स्वरूपनिर्णयकार’ अमृत हा उत्तरकालीन असावा. ‘स्वरूपनिर्णया’ची ओवीसंख्या केवळ ९५ आहे. त्यांत नोंदविलेली गुरुपरंपरा अशी :

“उमापति–विष्णु–प्रजापति–वशिष्ट–पराशर–व्यास–शुकदेव-गौडपाद–शंकराचार्य–विश्वाचार्य–बोधघनाचार्य–ज्ञानघन–ज्ञानोत्तम–ज्ञानगिरि–सिंहगिरि–ईश्वरतीर्थ–नृसिंहतीर्थ–विद्यातीर्थसरस्वती–मलयानंदसरस्वती–कृष्णसरस्वती–नृसिंहसरस्वती–माधवेंद्र–**अमृतानंद**–गगनेंद्र–माधवसरस्वती–विठ्ठलसरस्वती–अंबिका सरस्वती–**अमृत**.” (श्रीरामदासी संशोधन, खं. २, पृ. २३२–२३३)

या परंपरेंतील अखेरचा अमृत हा ‘स्वरूपनिर्णया’चा कर्ता आणि अमृतानंद हा ‘योगराजटिळका’चा कर्ता होय, असें प्रा. प्रियोळकरांचें मत आहे.

‘काव्यसंग्रहां’तील २६ वें पुष्प ‘अमृतरायकृत कविता-संग्रह’ हें आहे. या संग्रहाचें प्रकाशन १८९६ मध्यें झालें आहे. अमृतराय हा महाराष्ट्राचा विख्यात प्राचीन पदकार. या संग्रहांत ‘अविनाशसंदेहहरण’ या नांवाचें ८६ ओव्यांचें एक प्रकरण पुरवणी भागांत (पृ. ४०-४४) छापलेलें आहे. या प्रकरणाच्या शेवटीं दिलेली गुरुपरंपरा वरील गुरुपरंपरेशीं जुळती आहे :

आतां असो हा अनुभव प्रकार। परंपरा सांगों जी निर्धार।
शृंगेरीमठ साचार। तेथें अधिष्ठान सरस्वती॥
तोचि सांप्रदाय माधवसरस्वती। वास गोदातीर नाभीतीर्थी
असतां अनुग्रह प्राप्ती। विठ्ठलसरस्वतीसी॥
मग तयाचा उपदेश। प्राप्त अंबिकासरस्वतीस।
तयाचा अभयकर अमृतास। असे सत्य॥
श्रोता करील अनुमान। म्हणेल पिढ्या सात नसेल पूर्ण।
तरी साक्षेप केलें कथन। क्षमा संतीं मज कीजे॥

तरी पुन्हां सांगों साचार। जे परंपरा असे पूर्वापार।
तेचि सांगू जी गंभीर। ऐकतां कर्णीं मन निवे॥
आदिगुरु श्रीउमापती। तेथून विष्णु उत्पत्ति।
त्या प्रजापती। शिष्य होय॥
यापासोन वशिष्ठमुनीश्वर। तेथूनियां पाराशर।
याचा अभयकर। श्रीव्यासदेवासी॥
व्यासापासून शुकदेव। तेथून गौडपादा उगव।
मग शंकराचार्य वैभव। प्रगटले॥

— ओव्या : ७९-८६

वरील उताऱ्यांत दिलेली परंपरा त्रुटित आहे. प्रारंभींचीं उमापति – विष्णु – प्रजापति – वसिष्ठ – पाराशर – व्यास – शुकदेव – गौडपाद – शंकराचार्य हीं नांवें 'स्वरूप-निर्णया'नुसार मिळालेल्या परंपरेशीं तंतोतंत जुळणारीं आहेत. माधव-सरस्वती – विठ्ठलसरस्वती – अंबिकासरस्वती – अमृत हीं अखेरचीं चार नांवेंहि जुळतीं आहेतच. फक्त शंकराचार्योनंतरचीं १५ नांवें यांत दिलेलीं नाहींत. अर्थात् आपण समग्र परंपरा दिलेली नाहीं, असें वरील उताऱ्यांत ग्रंथकारानें सूचित केलें आहेच. परंतु पुनः ग्रंथकार परंपरा सांगू लागलेला आहे, तो शंकराचार्यांपाशींच थांबला नसता. यावरून असें वाटतें कीं, या ग्रंथाच्या अखेरच्या कांहीं ओव्या गहाळ झाल्या असाव्या.

यावरून हें स्पष्ट होईल कीं, 'आविनाशसंदेहहरणकार' आणि 'स्वरूप-निर्णयकार' अमृत एकच आहे. एक शंका अशी उपस्थित होते कीं, 'अविनाश-संदेहहरण' हें प्रकरण अमृतरायकृत कवितासंग्रहांत चुकून, नामसादृश्यामुळें अमृतरायाच्या नांवावर संग्रहित झालें असावें. एवढ्या मोठ्या पदसंभारांत जर वरील गुरुपरंपरेला कुठें दुजोरा मिळाला तरच अमृत आणि अमृतराय यांचें ऐकात्म्य सिद्ध होईल. कारण रूढ मतानुसार मध्वमुनीश्वरांनीं आपले गुरु अद्वैतानंद यांच्या करवीं अमृतरायाला अनुग्रह दिला होता. अमृतरायाच्या अन्य कवितांत अंबिकासरस्वती हे आपले गुरु असल्याबद्दलचें संदिग्ध सूचन दोन ठिकाणीं मिळतें —

१. माता उमा परम शंकर तात झाला
**अंबाजिता** अमृत पावन नाम ज्याला
तेणें यथामति कथा कथिली ध्रुवाची
घे भुक्ति मुक्ति निज जो नर नित्य वाची

—ध्रुवचरित्र, श्लो. २० (पृ. १४)

२. अमृतमनोरथ फळला, **अंबा फळला**, निंबाहुनि कडु भवतरु कळला
या हो सकळ विलंबा सांडुनि दैवत हें अवलंबा !
—पद १० वें (पृ. १०१)

—'अंबा फळल्या'मुळें 'निंबाहुनि कडु भवतरु कळला' हें अमृतरायाचें श्लेषगर्भ निवेदन त्याचें गुरुनाम सूचित करणारें आहे, असें मानलें जातें.

अमृतरायाचा काळ श. १६२०-१६७५ असा समजला जातो. अमृत व अमृतराय एकच असेल तर अमृतानंदाचा जन्मकाळ श० १४७० च्या सुमारास असावा, असें वाटतें. म्हणजेच डॉ. रानडे यांचा 'रामदास – तुकाराम परिणामा'-चा अंदाज टिकणार नाहीं, असें वाटतें. अमृतानंदाला सतराव्या शतकांत खेचतां येणार नाहीं. सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध (कदाचित् त्याहिपूर्वी) हा अमृतानंदाचा काळ योग्य वाटतो.

या परंपरेंतील अमृतानंदाचे परमगुरु नृसिंहसरस्वती (म्हणजे दत्तसंप्रदायाचे पुनरुद्धारक प्रसिद्ध नृसिंहसरस्वती) यांच्या काळावरून अमृतानंदाचा काळ निश्चित करण्याचा प्रयत्न प्रा. प्रियोळकरांनीं केला आहे. नृसिंहसरस्वतींचा रूढ निर्याणशक श. १३८० हा मानला जातो. त्यावरूनहि कीं, सोळाव्या शतकाचा मध्य हाच अमृतानंदाचा काळ ठरतो. नृसिंहसरस्वतींचें निर्याण आणि अमृतरायाचा जन्म यांमध्यें सुमारें २४० वर्षांचा कालावधि लोटला आहे. या २४० वर्षांत या परंपरेंतील सहा पिढ्या होऊन गेल्या. म्हणजे प्रत्येक पिढीचा काळ सरासरीं ४० वर्षांचा ठरतो. यावरून अमृतराय आणि अमृतानंद यांच्यामधील काळ १६० वर्षांहून अधिक नसावा, असें वाटतें. म्हणजे सोळाव्या शतकाचा उत्तरार्ध (इ. स. १५४०-१६००) हा अमृतानंदाचा जीवनकाळ मानावयास हरकत नसावी. (नाथांचा काळ इ. स. १५३२-१५९९ असा आहे.)

**नृसिंहसरस्वती** (श. १३००-१३८०) यांचे प्रमुख संन्यस्त शिष्य सात होते : (गुरुचरित्र, अ. १३) :

(१) बालसरस्वती
(२) कृष्णसरस्वती
(३) उपेंद्रसरस्वती
(४) माधवसरस्वती (प्रयाग)
(५) सदानंदसरस्वती
(६) ज्ञानज्योतिसरस्वती
(७) सिद्धसरस्वती

—अमृतकवीच्या गुरुपरंपरेंत नृसिंहसरस्वतींच्या शिष्याचें नांव माधवसरस्वती नसून माधवेंद्र असें आहे. त्या परंपरेंत माधवसरस्वती नृसिंहसरस्वतींपासून पांचवा आहे. परंतु हा नामभेद उपेक्षणीय आहे. गुरुचरित्रांत नोंदविलेली नृसिंहसरस्वतींची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें आहे :

शंकर-विष्णु-चतुर्वक्त्र-वसिष्ठ-**शक्ति**-पराशर-व्यास-शुक -गौडपादाचार्य -गोविंद-शंकराचार्य-विश्वरूपाचार्य-ज्ञानबोधीगिरि-सिंहगिरि-ईश्वरतीर्थ - नृसिंह तीर्थ-विद्यातीर्थ-( शिवतीर्थ- ) भारतीतीर्थ - विद्यारण्य - विद्यातीर्थ - मळियानंद- देवतीर्थ सरस्वती - यादवेंद्र सरस्वती - कृष्णसरस्वती ( काशी ) - नृसिंहसरस्वती ( गुरुचरित्र १२. १०९-११६ ). कालान्तरामुळें परंपरेच्या माहितींत आलेला उणेपणा सोडून दिला तर अमृतकवीनें नोंदविलेली गुरुपरंपरा आणि गुरुचरित्रांतील गुरुपरंपरा एकच आहे, हें सहज ध्यानीं येईल.

माधवसरस्वती ( वा माधवेंद्र ) हा नृसिंहसरस्वतींचा पहिला ( प्रयाग येथें मिळालेला ) आणि मुख्य शिष्य. अमृतकवीच्या माहितीप्रमाणें या माधवसरस्वतीच्याच परंपरेंतील (त्याच नांवाच्या) चौथ्या पुरुषानें विठ्ठलसरस्वतीला ' गोदातटीं नाभीतीर्थीं वास असतां ' दीक्षा दिली. हा दुसरा माधवसरस्वती नाभीतीर्थात ( गोदातीरावर ) राहत असे, असें वरील ' अविनाशसंदेहहरणां 'तील उताऱ्यांत व अमृतकृत ' स्वरूपनिर्णयां 'त उल्लेखिलें आहे.नाभीतीर्थ म्हणजे गोदाकांठचें प्रसिद्ध नांदेड. नांदेड येथें सिद्धनाथपुरी नांवाच्या ब्राह्मणवस्तीच्या भागांत शृंगेरी पीठांच्या परंपरेंतील एक मठ होता; तो या माधवसरस्वतीचाच असावा, असे पुरावे नांदेडच्या विख्यात शेष घराण्याच्या दप्तरांत उपलब्ध झाले आहेत. ( ' नांदेडचें शेष घराणें ' : वि. अं. कानोले-' म. म. पोतदार गौरवग्रंथ,' पृ. ५६-७३. )

## अमृतरायाची संदिग्ध गुरुपरंपरा :

अमृतरायाची ' अविनाशसंदेहहरणां ' तील गुरुपरंपराहि संशयातीत म्हणतां येणार नाहीं. आज इतकेंच म्हणतां येईल कीं, ' स्वरूपनिर्णय ' व ' अविनाशसंदेहहरण ' हीं दोन्ही प्रकरणें एकाचींच आहेत. त्याचें नांव अमृत. हा अमृतच पदकार अमृतराय, हें निश्चित सांगतां येत नाहीं. कारण पदकार अमृतरायाचा शिष्य सिद्धेश्वर आणि त्याचा शिष्य राजारामप्रसादी ( भक्तमंजरीमालाकार ) यांनीं अमृतरायाची गुरुपरंपरा आनंदसंप्रदायी दिलेली आहे :

आदिनारायणमहाविष्णु-चतुरानन ( हंस )-सनक-नारद-व्यास-शुकाचार्य-पूर्णानंद ज्ञानानंद-अमृतराय-सिद्धेश्वर-राजारामप्रसादी. ( भ. मं. मा., ५६.७१-७५ )

सारांश, अमृतानंद -अमृत-अमृतराय हें एक गूढच राहतें.

## आणखी एक अमृतानंद :

' योगराजटिळक ' या ग्रंथांत गुरुपरंपरेचा किंवा गुरुनामाचा कुठेंच निर्देश नाहीं. रामदासी-संशोधनाच्या द्वितीय खंडांत ११७८ क्रमांकाच्या बाडाचें (चंद्रात्मजकविकृत उद्योगपर्व) जें विवरण दिलें आहे, त्यांतील चंद्रात्मजाची गुरुपरंपराहि आपल्या अमृतानंदासाठीं चिंतनीय आहे :

**दत्तात्रय**-अद्वैतानंद-परमात्मानंद-योगेश्वरानंद-हंसानंद-**अमृतानंद** - ब्रह्मानंद-विमळानंद-चिदानंद-प्रसन्नानंद-रामानंद-व्यंकटेश-**चंद्रात्मज.**

अमृतकवीच्या परंपरेंत दत्ताला स्वतंत्र स्थान नाहीं—ती दत्तोद्‌भव परंपरा नव्हे. नृसिंहसरस्वती हे दत्तावतार समजले जात, म्हणून दत्ताशीं संबंध; परंतु चंद्रात्मजाच्या परंपरेचा आदिगुरु दत्तात्रेय आहे. शिवाय या बाडाचा लेखनकाल श० १६८७ असल्यामुळें अमृतानंदाचा काळहि प्रा. प्रियोळकरांच्या मताशीं जुळेल, असें वाटतें. अर्थात् या बाबतींत निर्णायक मत आतांच देतां येणार नाहीं.

**' योगराजटिळक ' आणि ' अमृतानुभव ' :**

**योग० :** यक देखणे दों द्रिष्टि। अथवा दों स्रवणि यकाचि गोष्टि।
दों आधराचे संपुष्टि। शब्द यकची ॥
की उभय संपुष्टी यक नादु। शीव शक्ति मीळे बींदु।
घ्राणयुगुळि वेवादु। परिमळ जैसा ॥
यक चालणे दों पाइं। येक पोहणे दों बाहिं।
तैसे यकची दीसे दों ठाइं। मुढां जनासि ॥
सिव शक्ति हे बोली। द्वैतगुणे वीस्तारलि।
अैक्यवादा वेगळी। गोष्टि असे ॥ (२२४-२२७)

**अमृत० :** दो दांडीं एकी श्रुति। दोहों फुलीं एकी द्दति।
दोहों दिवीं दीति। येकीचि जेवीं ॥
दो ओठीं येकी गोठी। दो डोळां येकी दिठी।
तेवीं दोघीं जिहीं सृष्टीं। येकीच जेवीं ॥ (१. १८-१९)

ये दोन्ही उतारे शिव-शक्ति-समावेशनाचेच आहेत, हें पाहण्यासारखें आहे. ग्रंथाचें ' योगराजटिळक ' हें नांव आणि शिवशक्तिसमावेशन व पिंडब्रह्मांडसमरसीकरण विवरणारें ग्रंथाचें अंतरंग पाहिल्यावर असें वाटतें कीं, हा ग्रंथ नाथ-संप्रदायाच्या पठडींतला असावा. या ग्रंथांतील विवेचनाची सर्व परिभाषा नाथ-संप्रदायाची आहे. साधें गणेशस्तवन करतांना ' सुन्यबीज ', ' सुनसंकेताचा बांधा ', ' शिवशक्तीचा सहज सिध सांधा ' अशी परिभाषा ग्रंथकारानें वापरली आहे. ' ब्रह्मकुमरी ' शारदेचें वर्णन हें तर कुंडलिनी शक्तीचेंच स्तवन आहे किंबहुना अथपासून इतिपर्यंत ग्रंथाचें स्वरूप नाथपरंपरेंतील साधनापरिभाषेनें व्यापलेलें दिसेल. अमृतकवीच्या गुरुपरंपरेंतील अमृतानन्द (नृसिंहसरस्वतींचा प्रशिष्य) म्हणजेच योगराजटिळक-कार अमृतानन्द, असें ठरविण्यास आज तरी नाम-साद्दश्यापलीकडे अन्य प्रमाण नाहीं.

**—रामचंद्र चिंतामण ढेरे**

टांचणें :

## १. गोव्यांतील भाषेसंबंधीं कांहीं विचार *

श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं परिश्रमपूर्वक माहिती गोळा करून इंग्रजींत लिहून प्रसिद्ध केलेलें 'धि प्रिंटिंग प्रेस इन् इंडिया' हें पुस्तक वाचल्यानंतर मनांत आलें कीं, गोव्याच्या भाषेवरील संशोधनासंबंधीं माझे विचार प्रगट करावे. पुस्तक-परीक्षण या अर्थीं नव्हे; पुस्तक वाचनीय व संग्राह्य आहे म्हणून लेखकाचें अभिनंदन करणें मला कर्तव्य वाटत असलें, तरी त्या कर्तव्यपूर्तीसाठींहि नव्हे; तर जे विषय माझ्या मनश्चक्षूंसमोर आहेत त्यांवर विशिष्ट दिशेनें आणखी संशोधनाची आवश्यकता आहे व तें संशोधन श्री. प्रियोळकर व अन्य संशोधक यांनीं करावें, म्हणून त्यांना आवाहन करण्यासाठीं.

माझीं मतेंहि मी सांगणार आहें. उतारे देऊन त्या मतांची परिपुष्टि करणें या लेखांत शक्य नाहीं. त्यामुळें त्याचा विस्तार फार वाढेल; तरीपण दिग्दर्शना-प्रीत्यर्थ दाखल्यांचा निर्देश करणार आहें. त्यामुळें या लेखाचें स्वरूप एका टांचणा-सारखें होईल. माझा हेतुहि संशोधनमंडळासमोर एक टांचण ठेवण्याचाच असल्यानें त्याकडे त्यांचें लक्ष वेधलें तर माझे परिश्रम सार्थकीं पडल्याचें समाधान पावेन.

गोमंतकीयांच्या भाषेच्या प्रश्नावर आज पुढील निर्णय चांगले प्रतिष्ठापित झाले आहेत :—

( १ ) पुर्तुगाली राजवटीपूर्वीं गोमंतकीयांमध्यें ग्रंथरचना झालेली होती व त्यांतलि विचारांचा जनतेंत प्रचार होत होता.

( २ ) कातोलिक पंथश्रेष्ठींनीं शक्य त्या प्रमाणांत ग्रंथ गोळा करून जाळून टाकिले.

( ३ ) कातोलिक पंथप्रचारकांनीं ( Missionaries ) जनतेसाठीं म्हणून जीं महत्त्वाचीं पुराणें लिहून ( किंवा लिहवून ) प्रसिद्ध केलीं तीं मराठींत होतीं व त्यांनीं अभ्यासिलेले ग्रंथहि मराठी होते.

( ४ ) लोकबोलींत जीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं त्यांतील भाषेला 'कोंकणी' हें अभिधान त्यांनीं योजिलें नाहीं.

---

* वरील टांचणाचे लेखक रा. ल. व्यं. प्रभु भेंब्रे हे गोव्यांतील एक वकील असून राजकीय कैदी म्हणून त्यांना पोर्तुगालला पाठविण्यांत आलें व त्यांची आतां मुक्तता झाली असली तरी ते अद्याप हिंदुस्थानांत परत आलेले नाहींत. पोर्तुगालांतील आपल्या वास्तव्यांत ते तिकडील हिंदुस्थानाविषयक ऐतिहासिक व भाषिक साधनांचा अभ्यास करीत आहेत. त्यांनीं उपस्थित केलेले कांहीं महत्त्वाचे मुद्दे किंवा शंका यांना खुलाशादाखल ( उत्तर म्हणून नव्हे ) पुढें तळटीपांत चार शब्द लिहिले आहेत. त्यांचा त्यांनीं विचार करावा. —कार्यकारी संपादक.

(५) त्यांनीं जीं व्याकरणें यूरोपी भाषेंत तयार केलीं, तीं जनतेच्या उपयोगासाठीं नसून यूरोपी पंथप्रचारकांसाठीं होतीं.

(६) पंथप्रचारकांचें मन लोकभाषा शिकण्यावर नव्हतें, हें गोमंतकीयांच्या भाषेच्या निर्मूलनाचें एक प्रमुख कारण होतें.

(७) रिव्हारनें पुराणांच्या भाषेला 'कोंकणी' हें अभिधान पहिल्याप्रथम चिकटविलें.

वरील निर्णय स्थापित झाले आहेत असें गृहीत धरून त्यांच्याशीं संबंधित असलेल्या विषयांच्या स्पष्टीकरणार्थ यापुढें संशोधन व्हावयास हवें. माझ्या मतें ते विषय असे :

**निर्णय १ शीं संबंधित**—जे ग्रंथ पुर्तुगाली राजवटीपूर्वीं गोव्यांत प्रचलित होते ते कोणते? त्यांचे कर्ते कोण? शोध केल्यास आज ते ग्रंथ मिळूं शकतील काय? जे ग्रंथ पूर्णतः किंवा अंशतः सांपडतात ते लोकनिदर्शनास आणून देणें.

वर दिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें माझ्यापुरतीं देऊं शकतों तीं हीं :—

(अ) श्री. पिसुर्लेकर यांनीं कांहीं ग्रंथांचीं नांवें व त्यांचे लेखक यांविषयीं पुढील माहिती दिली आहे :—

| | | |
|---|---|---|
| (१) | अमृतानंदकृत | योगराजतिलक. |
| (२) | मुकुंदराजकृत | विवेकसिंधु. |
| (३) | ज्ञानदेवकृत | ज्ञानेश्वरी. |
| (४) | विष्णुदास नामाकृत | काव्य (अभंग ?). |
| (५) | ,, ,, | प्रल्हाद-चरित्र. |
| (६) | ,, ,, | हरिश्चंद्र-पुराण (वा कथा). |
| (७) | सिंपी नामाकृत | बालक्रीडा. |
| (८) | निवृत्तिदेवकृत | भगवद्गीतेची टीका. |
| (९) | विष्णुदास नामाकृत | सुखदेव-चरित्र (कथा). |
| (१०) | ,, ,, | धर्माचा अश्वमेध. |
| (११) | ,, ,, | कर्णपर्व. |
| (१२) | शिवदास नामाकृत | गरुडकथा. |
| (१३) | अज्ञात लेखक | अनादि-पुराण.[१] |

१. अनादिपुराणाचा कर्ता नामदेव (विष्णुदास नामा) असल्याचें रामहून फादर विकी यांनीं पाठविलेल्या पोर्तुगीज जुन्या कागदपत्रांच्या उताऱ्यावरून कळतें. (MS Goa, 46 I ff. 348–94.) या लेखांत निर्दिष्ट केलेल्या इतर ग्रंथांसंबंधीं व त्यांच्या कवींविषयीं पुढें यथावकाश विचार करण्यांत येईल. दौऱ्यावर जातां जातां हा मजकूर प्रेसकडे पाठवीत असल्यामुळें जास्त लिहिणें शक्य नाहीं.

(१४) अज्ञात लेखक हरणीची कथा.
(१५) ,, ,, राजनीतीच्या वोंव्या.
(१६) ,, ,, रामाश्वमेध.
(१७) ,, ,, गुरुशिष्यसंवाद.
(१८) ,, ,, मदालसा.
(१९) ,, ,, रुक्मिणीस्वयंवर.
(२०) ,, ,, सीताहरण.
(२१) ,, ,, कृष्णार्जुनसंवाद.
(२२) ,, ,, मृगराजाची कथा.

वरील ग्रंथांशिवाय क्रुआच्या पुराणांत उल्लेखिलेल्या कांहीं ग्रंथांची यादी त्यांनीं दिलेली आहे; पण ती अपूर्ण आहे. [ **बोलेतीं दु ईंश्तितूतु व्हाश्कु द गाम**, क्र. ७३–१९५६ पाहा. ]

(आ) येतिया द ला क्रुआ याच्या पुराणांत पुढील हिंदु पुराण-ग्रंथांचा (मराठी) उल्लेख आहे :—

(१) कृष्णपुराण; (२) रामायण; (३) कल्पतरु; (४) हरिकथा; (५) अश्वमेध; (६) अहिल्या-स्वयंवर; (७) भागवत; (८) ऐळकथा; (९) प्रल्हाद-चरित्र; (१०) आदिपर्व; (११) द्रोणपर्व; (१२) हरिश्चंद्र ग्रंथ; (१३) रुक्मिणी-स्वयंवर; (१४) अनुभवानंद ग्रंथ; (१५) वसिष्ठ-योग; (१६) सीता-शुद्धि; (१७) चेंडुफळीगीत; (१८) जालंधर ग्रंथ; (१९) जीवाचा मोक्ष; (२०) आरती-ग्रंथ; (२१) भविष्योत्तर पुराण; (२२) अभिमन्यु-गीता; (२३) पितृसंवाद; (२४) भारत; (२५) भल्लूक Srit (?) व (२६) Ari P. (?) [ हरिपुराण, हरिवंश ? सं. ]

वरील ग्रंथ मीं वाचिलेल्या प्रतींतील आहेत. पिसुर्लेकरांनीं दिलेलीं **काली-पुराण** व **कल्पपुराण** हीं दोन नांवें त्या प्रतींत नाहींत, त्या प्रतींत कांहीं पृष्ठें नाहींत; यावरून निश्चित विधान करणें शक्य नसलें, तरी ‘ कल्पतरु ’ या ग्रंथाचा संक्षेप ‘ काली ’ व ‘ कल्प ’ असा त्यांनीं घेतला असावा, असें मला वाटतें. म्हणून त्यांचा निराळा उल्लेख करीत नाहीं.

क्रुवानें पुस्तककर्त्यांचा उल्लेख केलेला नाहीं. वरील ग्रंथांबाहेर कांहीं सुट्या गीतांचा उल्लेख त्यानें केला आहे व त्यांपैकीं एकांत **सोंसुदास कवीचें** नांव आलें आहे. कृष्णपुराण, अश्वमेध व भागवत हे ग्रंथ गोमंतकीय कवि कृष्णदास साम-राजानें शके १४४८ च्या सुमारास लिहिले, हें आज निश्चित झालें आहे. वसिष्ठ-योग ज्ञानदेवाचा आहे. ( पुढें पाहा. ) अनुभवानंद ग्रंथ व अमृतानुभव यांचा कांहीं संबंध आहे कीं काय, हें पाहावयाचें काम संशोधकांचें आहे. महाभारतांतील आख्यानें विष्णुदास नामाकृत आहेत, असें पिसुर्लेकर म्हणतात; पण तेतेंस कोणत्या

आधारावर म्हणतात, तें त्यांनीं स्पष्ट करावयास हवें. विष्णुदास नामा याचें ' कुडी-आत्म्याचें भांडण ' प्रियोळकरांनीं प्रसिद्ध केलें आहे. ( मराठी संशोधनपत्रिका, वर्ष १, अं. २ पाहा ). परंतु त्या पुस्तकाचा कर्ता व भारताख्यानांचा कर्ता एकच असावा, असें वाटत नाहीं. ' कुडी-आत्म्याचें भांडण ' यांत ' अस्मान ' व ' दिलगीर ' हे इस्लामद्वारा आलेले शब्द आढळतात. भारताख्यानांत इस्लामी संस्कृतीचा मागमूसहि नाहीं. विष्णुदास नामा व उपरिनिर्दिष्ट आख्यानें यांविषयीं अधिक माहितीची आवश्यकता आहे.

( इ ) वरील ग्रंथांशिवाय **रत्नकलाचरित्र** नांवाचें एक लहानसें संस्कृत-मराठी शृंगाररसात्मक काव्य मला सांपडलें आहे. " गोमंतमध्ये स्थितेन भट हरिकंठेन सा विष्णुदासस्य पठनार्थे लिषितं, " असें वाक्य शेवटीं आहे, व संवत् १६८० पौष्य वद्य १२ बुधवार ' हा कालनिर्देश त्यांत आहे.

( ई ) पुर्तुगाल व रोम येथें कांहीं ग्रंथ-लिप्यन्तरित का असेनात-मिळाले आहेत. ईशान्य व यूरोपच्या अन्य भागांतहि शोध व्हावयास हवा. कर्नाटक प्रदेशांत पुष्कळ विद्वान गोमंतकीय कुटुंबांनीं सोळाव्या, सतराव्या व अठराव्या शतकांत स्थानांतर केलें. अन्य भारतीय प्रदेशांतहि कांहीं कुटुंबें गेलीं. त्यांनीं आपल्याबरोबर आपले ग्रंथ निश्चितपणें नेले होते. ताडपत्रांवर किंवा अल्पजीवी कागदांवर ते लिहिलेले असल्याकारणानें घालमेलीच्या वातावरणांत ते नष्ट होणें साहजिक आहे. तथापि शोध केल्यास कांहीं ग्रंथ किंवा त्यांचे अवशेष अजून सांपडूं शकतील.

( उ ) विष्णुदास नाम्याचीं आदि, सभा, वन व विराट हीं पर्वें तंजावर व औंध येथील हस्तलिखित संग्रहांत आहेत असें कळतें.[२] ( चांदोरकर; प्रियोळकर-संपादित मुक्तेश्वरकृत **महाभारत-आदिपर्व**, पृ. ७ पाहा ); निवृत्तिदेवाची भगवद्गीतेची टीका पिसुर्लेकरांना मिळाली; ब्रागच्या ग्रंथालयांत असलेल्या कृष्णदास शामाच्या कृष्णचरित्राचे छायालेख पिसुर्लेकरांपाशीं व:सूक्ष्मपट प्रियोळकरांकडे आहेत असें कळतें. उपरोल्लेखित ' रत्नकलाचरित्र ' मीं उतरून घेतलें आहे व क्रुआच्या पुराणांत उल्लेखिलेल्या ग्रंथांतील कांहीं भागहि मीं गोळा केले आहेत. सवडीनुसार त्यांची ओळख मराठी वाचकांस करून देण्याचें माझ्या मनांत आहे.

**निर्णय २ शीं संबंधित**:—पुस्तकें जाळून टाकणाऱ्या पंथश्रेष्ठींचीं नांवें, दहनस्थळें व काल आपणांस हवीं आहेत. ग्रंथनाश करण्याचा विचार पहिल्या प्रथम गोव्यांत हावियेर ( त्याच्या जन्मभाषेप्रमाणें उच्चार; पुर्तु० शाव्हियेर; इं० झेव्हियर ) नें १५४५ त राजा जुवांवपुढें मांडला. लुसेनकृत [ '**इश्तोरिय द व्हीद द फ्रां. शाव्हियेर**'-द्वितीयावृत्ति, पृ. २४९, भाग १ पाहा. ] व राजानें त्यास

२. इतर पर्वें मराठी संशोधनमंडळांत आहेत.

संमति देऊन राजाज्ञा काढली (इ. स. १५४६). त्यानंतर १५४८ त गोव्याचा बिशप भ्राता (फ्रै) जुवांव द आल्बुकेर्कि यानें नष्ट करण्याच्या उद्देशानें हिंदूंकडून व इतरत्र ग्रंथ गोळा करण्यास आरंभ केला; [रिव्हार-'**येंसाय्यु इ. द लींग्व कोंकानी**', पृ. ५०] व १५६७ च्या प्रादेशिक प्रथम पंथपरिषदेनें (कोंसिलियु प्रोव्हिंसिआल) अधिकृतरीत्या ग्रंथ-विनाशास प्रेरणा दिली. [**कुलेसांव द सींकु कोंसीलियुश गोआनुश्**-हस्तलिखित, बि. ना. द लिज्बोअ, क. २, ठराव ९] आणि त्याच वर्षाच्या डिसेंबरांत सेबाश्तियांव राजानें त्या ठरावास राजाज्ञेत स्थान देऊन कायद्यांत त्याचा संमावेश केला. [वरील हस्तलिखितांत "लेय द सेबाश्तियांव" पाहा]. यापुढची माहिती हवी आहे.

**निर्णय ३ शीं संबंधित :**—स्टीफन्सच्या पुराणांतील प्रस्तावनेंत तथा पुस्तकांतील विषयविवेचनांत असलेले 'मराठी' भाषानामाविषयींचे उल्लेख प्रियोळकरांनीं आपल्या 'प्रिंटिंग प्रेस'मध्यें दिलेल्या उताऱ्यांत अंतर्भूत केले आहेत. क्रुआच्या प्रस्तावनेंतील 'मराठी' भाषाभिधान असलेला उताराहि त्यांनीं दिला आहे. पण त्या पुराणाच्या अंतर्गत भागांतल्या विषयविवेचनांतहि 'मराठी'चा स्पष्ट उल्लेख तीनदां आला आहे, तो त्यांनीं दिलेला नाहीं.[३] तो येथें उद्धृत करतों :—

आपल्या ग्रंथांमधील द्वितीय पुराणांतल्या पंचम कांडाच्या बत्तिसाव्या अवस्वरांत क्रुआ म्हणतो :—

> शास्त्रां, वेदांचीं पुराणें । कवीं उपार्जिलीं ग्रंथु म्हणे ॥
> तरि केविं अंतरणें । वेदां, शास्त्रां, पुराणां ॥ २९ ॥
> म्हणिपे प्राकुत उतरीं । सिळोक घडित मागारीं ॥
> जें कवीं लिहिलें परोंपरीं । वेद शास्त्रां नांवाडोनि ॥ ३० ॥
> येतुक्याचें वोविया घडित । **मरास्ट** शेब्दें लिहित ॥
> तेंही उपार्जिलें नवनित । पुराणें वर्तोंनु ॥ ३१ ॥
> येतुकें न बोलतों वेर्थीं । लिहिलें आहे वचिस्ट ग्रंथीं ॥
> तें पाहापां कवणे रिती । दत्तचित्त देउनि ॥ ३२ ॥
> म्हणे येतुकी वचिस्ट रुसीची बोली। मियां संउसुकुताची **मराठी** केली॥
> उधरावेया केवळि । बहुता लोकार्थें ॥ ३३ ॥
> ऐसी वेदां, शास्त्रांची स्तिति । जी मागां होती संउसुकुतीं ॥
> मग ती कवीं केली **मराठी** । पुराणां रचोनि ॥ ३४ ॥

३. सदर पुस्तकांत गद्यपद्य भाषेचे नमुने म्हणून उतारे दिले आहेत. मराठीविषयक प्रत्येक उल्लेख देण्याचा हेतु नव्हता. पहिलीं पंचवीस पृष्ठें व शेवटचीं बरींच पृष्ठें नसलेला हा ग्रंथ गोव्याच्या सरकारी ग्रंथालयांत आढळला. तो सबंध वाचून तीस वर्षांमागें आम्हीं त्याचा कर्ता कोण असावा, हें निश्चित केलें व त्यानंतर पोर्तुगाल येथें सांपडलेल्या त्या ग्रंथाच्या प्रतविरून आमचा शोध खरा ठरला आहे. पोर्तुगालमधील प्रतीची मायक्रोफिल्महि आम्हीं आणविली आहे

**निर्णय ४ शीं संबंधितः**—गोमंतकी बोलीला ' कोंकणी ' हें नांव कातोलिक पंथश्रेष्ठींनीं कां योजिलें नाहीं, त्याचा अधिक विचार होणें अगत्याचें आहे. ' कोंकण ' ही भौगोलिक संज्ञा त्यांना ठाऊक होती. गोमंतकी बोली ही १०-१२ सन्मान्य कोंकणी बोलींपैकीं एक आहे, हेंहि त्यांना ठाऊक असावयास हवें. [ रिव्हारनें प्रसिद्ध केलेलीं व्याकरणें पाहा ]. त्याच अर्थानें " **सूम ओरियेंताल क त्रात दु मार रोशु आते उश शींश्** " या हस्तलिखितामध्यें ( पृ. ६७ पहा ) ' कोंकणी (cumcuni) हा शब्द आढळतो. [ पिसुर्लेंकर ह्या पुस्तकाचा काल १५१४ व लेखक तोमे पीरिश आहे, असें सांगतात. ( वरील **बो. ई. व्हाश्कु द गाम**, क. ७३ - १९५६ ), पण मला त्या हस्तलिखितांत काल व लेखकनाम आढळलें नाहीं ] मग पंथश्रेष्ठींनीं तें नांव कां टाळलें ? या बाबतींत माझ्या मनांत प्रश्न उपस्थित होतात ते हे:—

( अ ) ' पागांव ' वा ' जैंतीयु ' ( पंथहीन ) या हीनत्वदर्शक शब्दांच्या अर्थीं ' कोंकणा ' हा शब्द पंथप्रचारक वापरीत होते. ( क्रुआचें व इतर पुराणें पाहा ). म्हणून खिस्ती गोमंतकीयांमध्यें लिहिलेल्या गोमंतकी बोलीच्या बाबतींत तो शब्द त्यांनीं टाळला असेल ?

( आ ) ' कोंकणी ' ही संज्ञा कोंकणपट्टींतील साऱ्या बोलींना लागू होणारी आहे, म्हणून ती त्यांस संमत झाली नसेल ?

( इ ) गोमंतकीय महाजनवर्गाला आपल्या गोमंतकी बोलीला कोंकणी या नांवानें संबोधणें अभिप्रेत झालें नसेल ?

कातोलिक पंथप्रचारकांनीं गोमंतकी बोलीला ' लोकबोली ' ( लींग्व व्हुल्गार ), ' ब्राह्मणाची बोली ' वा ' ब्राह्मणाची सामान्य बोली ' हीं दिलेलीं नांवें आपणांस पटतात; परंतु त्यांनीं वापरलेलें ' कानारीं ' हें नांव मात्र आपणांस पटत नाहीं. ' किनारा ' या फारशी शब्दावरून तो शब्द आला, असें प्रियोळकर म्हणतात. [ मराठी संशोधनपत्रिका, व. २, अं. १ ] व तेंच मत त्यांनीं ' प्रिंटिंग प्रेस ' मधील टीपेंत ( पृ. १५२ ) दिलें आहे; परंतु हें मत निराधार आहे. व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या ' किनाऱ्या 'चें ' कानारी ' बनणें सोपी गोष्ट नाहीं व त्या अर्थानें कुणीतरी तो शब्द उपयोगिला आहे, असा दाखला पुढें आल्याशिवाय तें मत स्वीकारतां येत नाहीं.[४]

---

४ किनाऱ्याचें कानारा झाला नसून दोनही रूपें फारसी भाषेमध्यें प्रचालित आहेत. पहा:—

" کنار Kanār, Kinār, A shore " ( A *Comprehensive Persian-English Dictionary*. by F. Steingass, Ph. D., London, Second impression, 1930 ).

कानडी बोलीलाही canarim असा शब्द रूढ असला तरी गोव्याचे लोक कानडी नाहींत हें त्यांना माहीत होतें. ही गोष्ट गोव्याची बोली कानडीहून भिन्न आहे या त्यांच्या विधानावरून स्पष्ट दिसून येईल.

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत (किंबहुना सबंध १५ व्या शतकांत) व सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांत गोमंतक व कर्नाटक यांचा घनिष्ठ संबंध होता; पुर्तुगाल्यांचे कानडी राजांशीं संबंधहि सलोख्याचे होते. त्यामुळें गोमंतकीयांची बोली कानडी आहे, असें पुर्तुगाल्यांस वाटणें शक्य आहे. वर सांगितलेल्या 'सूम ओरियेंताल' मध्यें गोव्याच्या वर्णनानंतर लगेच कानडी प्रदेशांचें (प्रोव्हींसिय इ रैनु दु कानारी) वर्णन आहे. (पृ. ७०) व त्यांत a lingoagem daqui he canarim e deferente da do Reino de daque e da de Goa. (येथील बोली कानडी आहे व ती 'दक्खन' राज्याच्या व गोव्याच्या बोलींहून भिन्न आहे) असें वाक्य आहे. यावरून 'कानारी' हा शब्द कानडी या शब्दाचा अपभ्रंश आहे हें स्पष्ट होतें. आल्बुकर्कशीं संबंध ठेवणारा तिमय्या कानडी भाषाभाषी होता, त्याची माहितीहि लेखकानें त्याच प्रकरणांत दिली आहे.

आणखी एका कारणपरत्वें यूरोपी पंथश्रेष्ठींना 'कानारीं' या संज्ञेची गरज भासली असेल. हिंदूंना संबोधण्यास 'कोंकणा' हा शब्द रूढ झाल्यानंतर भारतीय (विशेषतः गोमंतकीय व मलबारी) खिस्त्यांना संबोधण्यासाठीं कोणत्या तरी विशेषनामाची (वा सामूहिक नामाची) जरूरी त्यांस भासूं लागली असणें साहजिक आहे. त्या अर्थीं 'कानारी' हा शब्द पुष्कळ ठिकाणीं उपयोजिलेला आढळतो. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मार्केश द पोंबालनें कायद्यानें त्या शब्दाला व त्या शब्दासुळें उत्पन्न झालेल्या भेदभावांना बंदी केली. तरी सुद्धां हेटाळणी दर्शविण्याकरितां तो शब्द किंवा त्याचें तुच्छता-द्योतक रूप 'कानेक' आजसुद्धां पुर्तुगाल्यांच्या तोंडून क्वचित् प्रसंगीं कानीं पडतें.

'कानारीं' शब्दाचा हा वापर लक्षांत घेतला तर 'ब्राह्मणी बोली' वा 'लोकबोली' या शब्दांपेक्षां 'कानारीं' हा शब्द पंथश्रेष्ठींना अधिक पसंत पडला, याचा अर्थ लागतो.

**निर्णय ५ शीं संबंधित** :—स्टीफननें आपलें व्याकरण छापून प्रासिद्ध कां केलें नाहीं? त्याच्या मृत्यूनंतर २५ वर्षें लोटल्यावर दियोगु रिबैरूनें तें छापून घेण्यास काय कारणें झालीं? त्या कामीं रिबैरूला साहाय्य करणारे चौघे जेसूईत पादरी कोण? रिव्हारनें छापून प्रसिद्ध केलेल्या '**ग्रामातिक द लींग्व कोंकानीं नु दियालेक्तु दु नोर्ति**' (उत्तरेकडील बोलींत असलेल्या कोंकणी भाषेचें व्याकरण) या पुस्तकाचें खरें नांव कोणतें? तें पुस्तक खरोखरीच रिव्हारनें प्रसिद्ध केल्याप्रमाणें एका पुर्तुगाली पंथप्रचारकानें लिहिलें होतें काय? कीं तें स्टीफननेंच लिहिलें होतें? हे प्रश्न उलगडण्याची आवश्यकता आहे.

वरील दुसऱ्या व्याकरणाविषयीं माहिती पुढीलप्रमाणें मिळते :—

(अ) त्या पुस्तकाचें मूळ नांव Gramatica da lingua Canarim do Norte असें होतें. (ग्रंथकर्त्याची प्रस्तावना पहा).

(आ) लेखक इंग्रज असावा. प्रस्तावनेंतील पुढील वाक्य पाहा :— A letra *x* tem de algum modo a pronunciação do *nosso sh*. पुर्तुगालींत श चा उच्चार sh नें लिहिण्याची चाल कधींहि नव्हती. इंग्रजांमध्यें आजसुद्धां तो तसा लिहितात; तसेंच pronunciação हा शब्द इंग्रजी Pronunciation चें रूप आहे. पुर्तुगालींत त्याऐवजीं pronuncia हा शब्द येतो.

(इ) तें व्याकरण स्टीफन्सनेंच[५] लिहिलेलें असावें. पुढील वाक्यें पाहा :—

" Mas estes nesta lingua do Norte são poucos; por isso *não faço particular terminacão, como na Arte Canarina de Goa*. (पृ. ४) Nesta lingua este segundo adjectivo thŏrâ não tem differença no nominativo do singular *como na Arte de Goa*."

(ई) रिव्हारला ग्रंथकर्त्यासंबंधीं कांहीं निश्चित माहिती नव्हती. तो आपल्या प्रस्तावनेंत लिहितोः—" Quem fosse o seu autor não nos foi dado ate agora descobrir ". असें जर होतें, तर ' पुर्तुगाली पंथप्रचारकानें ' तें लिहिलें असें म्हणावयास रिव्हारला काय आधार मिळाला? स्टीफनचें ' आर्ति द

५ उत्तर कानारीचें हें व्याकरण आम्हीं वाचलें आहे, परंतु रा. भेंब्रे लिहितात त्याप्रमाणें तें स्टिफन्सनें लिहिलें असावें असें आम्हांला वाटलें नाहीं. या व्याकरणाच्या कर्त्यानें स्टिफन्सचें दाक्षिण कानारीचें व्याकरण पुढें ठेवूनच आपल्या उत्तर कानारीचें व्याकरण रचिलें हें मात्र त्या दोहोंमधील साम्यावरून स्पष्ट दिसून येतें. फादर स्टिफन्स वसई येथें मराठी भाषेचे शिक्षक म्हणून १६११–१२ या काळांत होते. [ *The Month*, Vol. CXCIX No. 1052, April 1955 ( London ), p. 204 पाहा. ] ही गोष्ट रा. भेंब्रे यांच्या तर्काला पोषक अशी आहे; परंतु स्वतः रा. भेंब्रे यांनीं उदाहरणादाखल दिलेल्या या व्याकरणांतील " sevagy bolate " ( शिवाजी बोलतो ) या निर्देशावरून त्यांचा तर्क टिकत नाहीं. स्टिफन्स १६१९ सालीं वारला व शिवाजी जुन्या मताप्रमाणें १६२७ सालीं व नव्या मताप्रमाणें १६३० सालीं जन्मला. मग पुढें सुमारें वीस वर्षांनीं जन्मास येणाऱ्या व्यक्तीचा स्टिफन्स आधीं उल्लेख करील कसा? ज्याचा आपल्या ग्रंथात निर्देश उदाहरणादाखल करावासा वाटेल, असा एकादा शिवाजी नांवाचा पुरुष १६१९ पूर्वीं झाला असल्यास आम्हांस तरी माहीत नाहीं. समकालीन किंवा मागें होऊन गेलेल्या एकाद्या महत्त्वाच्या व्यक्तींचा उदाहरणामध्यें उल्लेख करण्याचा या पोर्तुगीज मिशनऱ्यांचा परिपाठ होता, असें म्हणतां येतें. १७७८ सालीं रोममध्यें मुद्रित झालेलें *Gramatica Marastta* ह्या व्याकरणाची भाषा वरील व्याकरणाप्रमाणेंच उत्तरकोंकणी आहे. त्यांत एके ठिकाणीं पुल्लिंगी विशेष नामांचीं उदाहरणें देतांना " संभाजी मराठ्यांचा एक राजा " ( Sambajy hum rei dos Maratas ) असा निर्देश आहे. जिज्ञासूंनीं या व्याकरणाचें आम्हीं केलेलें इंग्रजी भाषांतर पहावें. *Journal of the University of Bombay*, Volume XXIII, Part 2, September 1954, p. 148 ) यावरून पहिल्या व्याकरणांत ज्यांचा निर्देश आहे तो शिवाजी ' मराठ्यांचा एक राजा ' होता, असें म्हणणें चुकीचें होईल, असें वाटत नाहीं.

लींग्व कानारी ' व हें ' आर्ति कानारीन द लींग्व दु नोर्ति ' वा ' ग्रामातिक द लींग्व द कानारीन दु नोर्ति ' या दोन पुस्तकांची योजना व मांडणी ( plano e systema ) समान आहेत, हेंहि रिव्हारच्या दृष्टीस पडलें होतें. ( रिव्हारची प्रस्तावना पाहा ).

या उत्तर कोंकणांतील भाषेच्या व्याकरणांत असलेल्या दोन उदाहरणांकडे मी वाचकांचें व संशोधकांचें लक्ष वेधतों :—

( अ ) Sevagy bolate ( शिवाजी बोलतो ). लेखकानें दिलेला अर्थ— Sivagy falla.

( आ ) dogŏ guru hendu boly mala sicovitatŏ ( दोघे गुरु हिंदु बोली मला शिकवितात ). लेखकानें दिलेला अर्थ— dois mestres ensinarao a lingua canarim. ( पृ. १५० ) येथें ' हिंदु बोली ' या शब्दप्रयोगाच्या समानार्थीं ' लींग्व कानारी ' हे शब्द स्वतः ग्रंथकर्त्यानें उपयोजिले आहेत.

**निर्णय ६ शीं संबंधित :**—गोमंतकीयांच्या भाषेचें ( व बोलीचें ) निर्मूलन करण्याच्या प्रयत्नांमागें आणखी कोणतें तरी कारण असूं शकेल काय ? हा प्रश्न मी संशोधकांपुढें ठेवितों. या बाबतींत माझें निश्चित मत असें आहे कीं, आणखी कारण आहे; इतकेंच नव्हे, तर तें कारण अधिक महत्त्वाचें आहे व म्हणून त्याचा अधिक खोल विचार व्हावयास हवा.

लोकभाषा शिकण्याच्या कामीं पंथश्रेष्ठी उडवाउडव करीत होते ही गोष्ट खरी; परंतु कातोलिक पंथसत्तेची लोकभाषा शिकण्याविषयीं आज्ञा सुस्पष्ट असल्याकारणानें, लोकांची भाषा नष्ट करण्याचे विचार त्यांच्या मनांत सहजासहजीं येण्यासारखे नव्हते. याचसाठीं पंथपरिषदांचे ठराव, राजांचे कायदे व महत्त्वाकांक्षी देशी पादरींच्या तक्रारी यांना कसेंबसें तोंड देत ते राहिले होते.

राजसत्तेला लोकभाषा-निर्मूलनाची जरुरी भासली तेव्हां त्यांना हायसें वाटून व जीं कारणें राजसत्तेला प्रेरित करीत होतीं तींच कारणें त्यांनाहि प्रेरणा देत असल्यानें, शक्य तितका पाठिंबा त्यांनीं राजसत्तेला दिला.

राजसत्तेला लोकभाषेशीं वैर करण्याचें कारण गोव्याभोंवतीं मराठ्यांच्या सत्तेचा वाढता प्रभाव हें होय. शिवरायानें बारदेशावर हल्ले करून मराठ्यांशीं आदरानें वागावयास पुर्तुगाल्यांना भाग पाडिलें होतें. तिसवाडींतील सप्तकोटीश्वराची पिंडी डिचोलीस मराठी राज्यांत पुन्हा प्रतिष्ठापित झाली होती. दक्षिणेकडे सिंहेश्वर महालांतील सदाशिवगड व कारवार १६७५ त मराठ्यांच्या स्वाधीन झाले होते.

१६८१–८२ मध्यें संभाजी राजानें बार्देश महालांतील कोलवाळ, थिवी इ. गांवें हस्तगत केलीं. [ रिव्हारनें 'येंसाय्यु' सोबत जोडलेल्या दाखल्यांतील ( दोकुमेंतुश ) लीव्रु द मोंसोंइश ११६, फो. २०२; लीव्रु मों. ५१, फो. ७५ व रिव्हारच्या

४११,४१३ व ४१४ पृष्ठांवरील टीपा पहा ). त्या प्रसंगा पुर्तुगाली सैनिकांची कमतरता व गोव्यांतील जनतेचा मराठ्यांकडे असलेला ओढा राज्याधिकाऱ्यांच्या अनुभवास आला. पुर्तुगालधार्जिणी मिश्र संतति निर्माण करण्यासाठीं गोवेकरांच्या विधवा स्त्रियांना पुर्तुगाल्यांशीं विवाह करण्यास भाग पाडणें आणि गोवेकरांना स्वभाषेचा त्याग करावयास लावून त्यांच्यावर पुर्तुगाली भाषा लादणें हे दोन उपाय त्यांना सुचले. [ ली. मों. ४९, फो. २९० चा दाखला पाहा. ]

पुर्तुगालहून राजाची संमति येईपर्यंत १६८४ वर्ष उजाडलें. अंत्रूज महालांत संभाजीनें पुर्तुगालचा भयंकर पराभव केला होता आणि नदी ओलांडून खुद्द गोवें शहरावर हल्ला करण्याचें त्याच्या मनांत असल्याची वदंता उठली होती. संभाजीला औरंगजेबाला तोंड देण्याकरितां मागें फिरावें लागलें; पण उपराय ( वाइसराय ) कोंदि द आल्वोर यांच्या मनांतली धडकी कमी झाली नाहीं.

२७ जून १६८४ रोजीं निघालेल्या हुकुमामागील परिस्थिति ही अशी होती. गोवेकर विधवा स्त्रियांनीं पुर्तुगाल्यांशीं पुनर्विवाह लावावे व गोव्यांतील साऱ्या जनतेनें तीन वर्षांच्या आंत आपल्या एकंदर व्यवहारांत व व्यापारांत ( त्रातुश व कोंत्रातुश ) एकमेव पुर्तुगाली भाषा वापरावी या दोन गोष्टी त्या हुकुमांत आज्ञापिल्या होत्या. दोन्ही विषयांत राजकीय कारणें स्पष्ट शब्दांत पुढें मांडलीं होतीं. पंथाचीं मूलतत्त्वें सुद्धां पुर्तुगालींत शिकवावयाची आज्ञा होती. ( ली. मों. ४९, फो. २९० चा दाखला व ली. मों. ५१, फो. ७५ चा दाखला पाहा. )

१६८७ च्या मार्च महिन्यांत राजा पंचम जुवांवची मान्यता वरील हुकुमास मिळाली ( ली. मों. ५२, फो. ८६ चा दाखला पाहा ). राजसत्तेच्या उघड वा प्रच्छन्न पुरस्कारानें गोवेकरांना कळसूत्री बाहुल्या बनविण्यासाठीं पुर्तुगाल्यांनीं आतां कंबर कसली. ( ली. मों. ९४, फो. ९३, रिव्हारची ( a ) टीप : व ली. मों. ९४, फो. ११७, १२१ व १२४ पाहा ).

पुष्कळ हिंदु व्यापारी गोवें सोडून गेले. व्यापारास मृतकळा आली. हिंदु व्यापाऱ्यांस चुचकारल्यावांचून गत्यंतर नाहीं, हें राज्यकर्त्यांच्या अनुभवास आलें. ( ली. मों. ९४, फो. ११६; ली. मों. ९८, फो. ७ व ली. मों. १०१, फो. ५६९ पाहा. ) संभाजी पडला होता तरी मराठ्यांचें प्रस्थ वाढतच होतें, तरीदेखील उपरोल्लिखित हुकुमाची अंमलबजावणी हिंदूंपुरती बरीच शिथिल झाली. ( ली. मों. ९४, फो. ९४ व ली. मों. १०१, फो. १६० पाहा. )

ख्रिस्ती जनतेवर पंथप्रचारकांची पकड असल्यानें व त्यांचा राज्यकर्त्यांच्या धोरणास पाठिंबा असल्यानें ख्रिस्त्यांच्या भाषेवर व संस्कृतीवर फार मोठा दुष्परिणाम झाला. त्यांच्यामध्यें अजून मराठी भाषेचा व्यासंग चालू होता. ( 'येंसाय्यु'

पृ. १५५, पृ. २२६, पृ. २२१, पृ. २२८ पाहा.) व हिंदूंशीं समान अशा सामाजिक चालीरीति-त्यांतच ओव्या गाण्याची चाल-अजून चालू राहिल्या होत्या.

१७३५ च्या सुमारास मराठ्यांनीं उत्तरेकडील पुर्तुगाली प्रदेश हस्तगत केले होते. कुकळ्ळीवर मराठ्यांच्या धडका होत होत्या. त्यांतून मोकळें होण्यासाठीं पुर्तुगाल्यांना चौल सोडून द्यावें लागलें होतें. त्या समयीं खिस्ती जनता तरी आपल्या संपूर्ण ताब्यांत राहावी-ती त्यासमयीं गोव्यांत बहुसंख्य होती-म्हणून प्रयत्न चालले.

१८ एप्रिल १७३६ दिनीं पंथश्रेष्ठींनीं जो संस्कृतिविघातक जाहीरनामा काढला (ली. मों. १०६, फो. ११७ पाहा) त्याला उपराय कोंदि द सांदोमीलचा पाठिंबा होता. पण राजसत्तेकडून तो जाहीरनामा पुकारण्यांत आला तर भोंवतालच्या राज्यांत त्याचे पडसाद उठतील अशी भीति त्याला वाटत होती. पंथश्रेष्ठींकडून तो अमलांत आणावयास त्यानें हार्दिक संमति दिली. (ली. मों. १०६, फो. ११७ चा आरंभींचा भाग पाहा.)

पंथश्रेष्ठींवर भाषानिर्मूलनाचा जो आरोप अतिरिक्त प्रमाणांत करण्यांत येतो तो बरोबर नाहीं, व खरा अपराध राजसत्तेचा आहे, हें मत मांडण्याकरितां वरील विस्तार करणें भाग झालें.

**निर्णय ७ शीं संबंधित**:—रिव्हारच्या प्रयत्नाच्या बाबतींत आतां पुढील प्रश्नाकडे लक्ष पुरवावयास हवें.

(अ) रिव्हारचा प्रयत्न केवळ संशोधनात्मक होता काय? कीं त्याच्यामागें राजकारण होतें?

(आ) मराठी ग्रंथांना त्यानें 'कोंकणी' ग्रंथ म्हटलें तें त्याची तशी समजूत झाली म्हणून म्हणजे सुबुद्धीनें (de Boa Fe') कीं त्यानें मुद्दाम सूडबुद्धीनें (de Ma' Fe') खोटा तर्कवाद केला?

याहि बाबतींत माझें निश्चित मत असें कीं, रिव्हारच्या प्रयत्नामागें राजकारण होतें.[६] व त्यानें जाणूनबुजून खोटा तर्कवाद केला. याविषयीं पुढील गोष्टी विवेकी संशोधकांपुढें व वाचकांपुढें ठेवितों:—

---

६. या बाबतींत आम्हीं रा. भेंब्रे यांच्याशीं सहमत होऊं शकत नाहीं. आम्हीं कुञ्ज रिव्हार यांचे बहुतेक सर्व ग्रंथ व लेख वीसपंचवीस वर्षांपूर्वी वाचले आहेत, परंतु त्यांच्या लिहिण्यांत राजकीय डाव असतो अशी शंकाहि कधीं आम्हांला आली नाहीं. त्यांचा 'कोंकणी भाषासंबंधीं ऐतिहासिक निबंध' इंग्रजींत भाषांतर होऊन लोकांपुढें आहे. (*The Printing Press in India*, part II पहा). स्टिफन्सच्या क्रिस्तपुराणासारख्या मराठी ग्रंथांना तो कोंकणी म्हणतो व ही कोंकणी मराठीहून स्वतंत्र व भिन्न मानतो ही गोष्ट खरी आहे. परंतु यांत त्यांचा कोणताही राजकीय हेतु होता असें आम्हांस वाटत नाहीं. स्थानिक देशी भाषेचें अज्ञान व त्याहीपेक्षां एकप्रकारचा आपण कांहींतरी नवी गोष्ट जगापुढें आणीत आहों अशा प्रकारचा अभिनिवेश त्यांच्यामध्यें होता असें आम्हांला वाटतें.

( अ ) रिव्हार चांगला शिकलासवरलेला, अभ्यासू व संशोधनप्रेमी गृहस्थ होता. दाखले निवडणें, त्यांचें वजन व मोजमाप करणें, व त्यांचा संबंध जोडणें या बाबतींत त्याच्या हातून सहजासहजीं चूक होणें स्वाभाविक नव्हतें.

( आ ) तो ज्या काळीं ( १८५५ ) गोव्याला आला त्या काळीं इंग्रजांनीं देशी भाषांत प्राथमिक शिक्षण देण्याचें धोरण पूर्णपणें स्वीकारलें होतें.

( इ ) १८२० पासून आरब्ध झालेलें पुर्तुगाली भाषेच्या शाळांच्या द्वारें शिक्षण देण्याचें धोरण पूर्णपणें निष्फल ठरलें होतें ( गोव्यांत ).

( ई ) इंग्रजांचें धोरण अंशतः स्वीकारून पुर्तुगाली भाषा शिकावयास मदत म्हणून लोकभाषेचा वापर करावयास हवा होता. लोकभाषेचें महत्त्व वाढविण्याचा राज्यकर्त्यांचा हेतु नव्हता. ( मिगेल व्हि. आब्रेवकृत **ब्रेव्हि नोतीसिय द क्रियासांव इ येझेर्सीसियु द आवल** इ., पृ. ३९ दाखला क्र. १३ मधील राज्यपाल व्हिस्कोंदि द तोर्रिश नोव्हशचें पत्र ( ओफीसियु ) पहा. ]

( उ ) नव्या काबिजादी पुर्तुगालच्या स्वाधीन झाल्या होत्या व तेथील हिंदु जनतेला आश्वासनें दिल्याप्रमाणें मराठीचें शिक्षण हिंदु घेत होते. १८५४ वर्षी देवनागरी लिपींत व मराठी भाषेंत सरकारी प्रकाशनें सुरू झालीं होतीं. हिंदूंची भाषा मराठी आहे हें सर्वांस संमत होतें.

( ऊ ) मरे मिचेल, क्लोगेन, मर्फी यांसारखे विद्वान् भाषाभ्यासक कोंकणी ही मराठीची बोली आहे या मताचे होते; तर अन्य कांहीं त्यांहून कमी महत्त्वाची यूरोपी मंडळी कोंकणी ही स्वतंत्र भाषा आहे या मताची होती.

( ए ) गोमंतकीय खिस्त्यांमध्यें मराठी शिक्षण अजून जीव धरून होतें [ पादरी सांतान द पाशेकुचें मडगांवहून ९-८-१८७२ दिनीं लिहिलेलें पत्र पाहा. बोलेती दु. ई. व्हा. द. गाम क्र. ७१-१९५३ ] व पीरिशसारखी मंडळी मराठीची अभिमानी होती. याउलट ' कोंकणी ' चे अभिमानी खिस्त्यांमध्यें नव्हते.

( ऐ ) सूर्याजी आनंदराव त्या काळीं ' लींग्व दु इश्तादु ' ( दुभाषी ) होते. ते मराठीचे अभिमानी असून त्यांनीं कोंकण हा महाराष्ट्राचा एक भाग आहे व महाराष्ट्रांत अनेक बोली आहेत हें भीत भीत रिव्हारच्या निदर्शनास आणून दिलें होतें. [ येंसाय्यु, आदितामेंतु १ ला, पृ. २३४ पाहा. ]

( ओ ) गोव्यांतल्या हिंदु व खिस्त्यांचा आनुवंशिक संबंध रिव्हारला माहीत नसणें शक्य नाहीं.

( औ ) रिव्हारला भारतीय भाषांचें, मराठीचें वा कोंकणीचें ज्ञान नव्हतें. ( त्यानें निरनिराळ्या ठिकाणीं तें कबूल केलें आहे. )

असें असून

(क) रिव्हारनें खुद्द गोमंतकीयांच्या व कांहीं यूरोपीयांच्या मताला जुमानलें नाहीं.

(ख) गोमंतकीयांना स्वभाषेचें प्रेम नाहीं, असें एका बाजूनें सांगत असतां गोमंतकीयांनीं लिहिलेल्या व्याकरणांना त्यानें प्रसिद्धि दिली नाहीं. (बो. ई. व्हाश्कु द गाम, क्र. ७१-१९५३ मधील रिव्हारचें १-१२-१८५८ चें पत्र व बोलेती ओफिसियाल क्र. ८४ दि. २८-१०-१८५९ मधील रिव्हारचा प्राथमिक शिक्षकांस केलेला उपदेश पाहा.) फारीय नामक भारतीय व्याकरणकर्त्याला दिलेल्या उत्तरांत रिव्हारची राजनैतिक भावना उत्कटतेनें प्रतीत होते. (वरील क्र. ७१-१९५३ पाहा.)

(ग) पुराणकर्त्या पंथप्रचारकांनीं तयार केलेले शब्दकोश ते अभिजात भाषेंत आहेत म्हणून त्यांचा त्याग करून रिव्हारनें कोश प्रसिद्ध केला तो कर्नाटकांत काम करणाऱ्या इतालीय पादरीचा. [त्या कोशाची प्रस्तावना पाहा.]

(घ) आपल्या 'येंसाय्यु इश्तोरिकु' मध्यें राजसत्तेवरील भाषानिर्मूलनाची जबाबदारी शक्य तितकी कमी करण्याकरितां त्यानें फ्रांसिश्की पादरींवर सारा दोष ढकलण्याचा प्रयत्न केला आहे. [मागील विवेचनांत उल्लेखिलेले दाखले पाहा.] रिव्हारचा कालीं पंथश्रेष्ठींवर दोष ढकलणें म्हणजे मृतसर्पाला बडविण्यासारखें होतें. त्याचा फायदा त्यानें घेतला आहे.

(ङ) त्याचप्रमाणें स्वभाषेच्या अज्ञानाचा सारा दोष गोमंतकीय खिस्त्यांच्या निष्क्रियतेवर ढकलण्याचा प्रयत्न त्यानें केला आहे. (वरील २८-१०-१८५९ चा बोलेती ओफिसियालचा अंक पाहा.)

(च) स्टीफन्सच्या व उत्तरेकडील बोलीच्या व्याकरणांचीं नांवें त्यानें बुद्धिपुरस्सर बदललीं.

(छ) अज्ञात लेखकाला त्यानें स्वतःच्या जबाबदारीवर 'मिसियोनारियु पुर्तुगेज' (पुर्तुगाली पंथप्रचारक) बनविलें.

(ज) हिंदूंमध्यें परंपरागत रीतीनें चालत आलेल्या मराठीकडे त्यानें सर्वथैव दुर्लक्ष केलें. त्यांचा उल्लेखसुद्धां त्याच्या 'येंसाय्यु' मध्यें नाहीं.

या साऱ्या भूमिका रिव्हारमध्यें संशोधकाचा समतोलपणा दर्शवितात काय? रिव्हारचा व पुर्तुगाली राज्यकर्त्यांचा हेतु खिस्त्यांना हिंदूंपासून निराळें करण्याचा नसेल? पुर्तुगाली भाषेच्या प्रसारासाठीं त्यांच्या भाषाप्रेमाला व स्वाभिमानाला निराळी वाट काढून देण्याचा नसेल? हिंदी समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें तो हेतु सुबुद्धीचा म्हणतां येईल काय?

वरील प्रश्न संशोधकांनीं सोडवायचे आहेत व त्यांबाहेर आपण जमविलेल्या पुस्तकांची व वाङ्मयाची रिव्हारनें काय वासलात लावली, त्याचाहि शोध करावयाचा आहे.

शेवटीं 'प्रिंटिंग प्रेस' मध्यें दिलेल्या रिव्हारच्य चरित्रांत गोमंतकीयांच्या दृष्टीनें महत्त्वाचें असलेल्या एका पुस्तकाचा उल्लेख नाहीं, ही गोष्ट मी वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस आणतों. 'A conjuracao de 1787 em Goa' हें १८७५ त नवा गोवा येथें 'इंप्रेस नासियोनाल'मध्यें छापलेलें तें पुस्तक आहे. लिस्बनच्या 'बिब्लियोतेक नासियोनाल' मध्यें त्या पुस्तकाच्या अनेक प्रती आहेत व यादींत नामपत्रिकाहि अनेक आहेत. 'येंसिक्लोपेदिय'साठीं रिव्हारविषयक लेख लिहिणाऱ्या लेखकानें तो उल्लेख बुद्धिपुरस्सर टाळला आहे, असें म्हणणें भाग आहे. तसें नसतें तर चूक सुधारण्यांत आली असती. 'येंसिक्लोपेदिय' सध्यांच्या राजवटींत तयार झाली असल्यानें व तें पुस्तक सद्यःस्थितींत पुर्तुगाली धोरणास प्रतिकूल असल्यानें तसें होणें अशक्य नाहीं.

—लक्ष्मीकांत व्यंकटेश प्रभु भेंब्रे

---

## २. ज्ञानदेवांचें शंकास्पद वाङ्मय

'मराठी संशोधन-पत्रिके'च्या सहाव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत 'ज्ञानदेवांचें शंकास्पद वाङ्मय–द्रोणपर्व' हा प्रा. अ. का. प्रियोळकर यांचा लेख आलेला आहे. या लेखांत, ज्ञानेश्वरांच्या नांवावर मोडणाऱ्या 'द्रोणपर्वा'ची चर्चा करण्याच्या निमित्तानें, प्रा. प्रियोळकरांनीं ज्ञानेश्वरांच्या शंकास्पद वाङ्मयाची–मुद्रित व हस्तलिखित–नोंद केली आहे आणि "ज्ञानदेवांच्या नांवावर उपलब्ध असलेला एकूणएक ग्रंथ मिळवून त्यांपैकीं 'साच' कोणता व 'लटिका' कोणता" हें ठरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्याची निकड प्रतिपादिली आहे. त्यांच्या या प्रयत्नाला समग्रता येण्यासाठीं अभ्यासकांनीं आपल्या माहितींतील ज्ञानेश्वरांच्या नांवावर मोडणाऱ्या ग्रंथांची व स्फुटांची माहिती कळवीत राहिल्यास उपकारक ठरेल. खालीं माझ्या माहितींतील कांहीं ग्रंथांचा परिचय देत आहें.

### मुद्रित :

१. उपरिनिर्दिष्ट लेखांत '**उत्तरगीते**'च्या गोंधळेकर-प्रकाशित (१९०७) प्रतीची नोंद आहे. अलीकडे प्रा. श्रीधर कुलकर्णी यांनीं 'उत्तरगीता' संपादिली असून ती मराठवाडा साहित्यपरिषदेनें जुलै १९५७ मध्यें प्रकाशित केली आहे. प्रा. कुलकर्णी यांनीं आपल्या प्रदीर्घ (३२ पृष्ठें) प्रस्तावनेंत 'अंतर्गत पुराव्यावरून हा ग्रंथ श्रीज्ञानेश्वरकृतच ठरतो,' असें मत मांडलें आहे.

२. '**भक्तराज**' (कीं भक्तिराज ?) हा ग्रंथ 'काव्यसंग्रहां'त प्रसिद्ध झाल्याची नोंद प्रा. प्रियोळकरांनीं केली आहेच. बेळगांवच्या श्रीरामतत्त्व प्रकाशनानेंहि हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. या ग्रंथांत (एकूण ओव्या ३०२) "गीता ज्ञानदेवी टीका। संस्कृताची आइका। कृष्णें अर्जुनासि देखा। हेंचि निरोपिलें ॥" (ओ. ३००) असा ग्रंथकारानें 'ज्ञानदेवी'चा उल्लेख केला आहे. ग्रंथकारानें गुरुनामोल्लेख केलेला नाहीं.

३. मुद्रितांच्या सूचींत न नोंदविलेलें एक प्रकरण —'**ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास लाखोटा**–' भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त श. १८३७ यांत प्रसिद्ध झालें आहे. हें एक अभंग-सप्तक आहे. समर्थ वाग्देवता मंदिरांतील 'सप्तपदी' (बाड क्र. १५३७) आणि हा 'लाखोटा' एकच आहे कीं काय, याचा शोध घेतला पाहिजे.

४. '**ज्ञानप्रकाश**' अथवा '**चतुर्विधामुक्तिलक्षण**' हा ग्रंथ बेळगांवच्या रामतत्त्व प्रकाशनानेंच छापला आहे. या ग्रंथाच्या एकूण चार 'मुक्ति' (अध्याय) असून ओवीसंख्या (२७ + ३४ + ३५ + १३१ =) २२७ आहे.

या ग्रंथाचा कर्ता ज्ञानदेव हा निवृत्तिनाथशिष्य ज्ञानदेव नसून कुणी शक्त्युपासक अन्य ज्ञानदेव असावा, असें कांहीं ओव्यांवरून वाटतें :

प्रसन्न होऊनियां **शक्ति** । निरूपीन चतुर्विधा मुक्ति ।
तिया सांगे श्रोतयां प्रति । ज्ञानदेवो ॥ १. १ ॥
तंव म्हणे **भवानीमाता** । ज्ञानदेवा पुरे रे आतां
तूं बोलिलासि आत्मकथा । हेंचि सत्य ॥ ४. १२२ ॥
ऐसें वचन **अंबिका** । दीधलें ज्ञानदेवासि आइका ।
म्हणे रे रे ग्रंथटीका । ज्ञान संपूर्ण जाहलें ॥ ३. १२९ ॥
**भवानीचिया** बोला । ज्ञानदेवो संतोषला ।
मग भियोनि मौन्येंसि केला । नमस्कारु सद्गुरूसी ॥ ४. १३१ ॥

याहि ग्रंथांत गुरूचा नामनिर्देश नाहीं.

५. '**नमनस्तोत्र**' हें प्रकरण तेहतीस वर्षांपूर्वींच (श. १८४७) चित्रशाळा-प्रकाशित नामदेव-गाथ्यांत (पृ. ९०–९४) छापलेलें आहे. नामदेवानें लिहिलेल्या (?) 'ज्ञानेश्वर-समाधि' या प्रकरणाच्या ५४ व्या अभंगांत या 'नमना'चा उल्लेख आहे. ज्ञानेश्वरांनीं समाधीच्या वेळीं हें 'नमनस्तोत्र' गायिलें, असें तेथें म्हटलें आहे. या उल्लेखाच्या अनुरोधानेंच हें स्तोत्र नामदेवगाथ्यांत अवतरिलें गेलें असावें, असें वाटतें.

## हस्तलिखित :

पुणें येथील गंगानाथ मठाच्या संग्रहांत '**पवनविजय**' या नांवाचें एक हस्तलिखित आहे. या हस्तलिखिताचीं ३६ पृष्ठें असून ओवीसंख्या ४२९ आहे. प्रास्ताविक ११ ओव्यांनंतर "अथ **पवनविजय** प्रारंभ ॥" असे शब्द असून समाप्तिमुद्रा "**श्रीपवनविजय** ग्रंथ समाप्तः ॥ शके १७८२ रौद्रनाम संवत्सरे वसंत ऋतु वैशाखमासे कृष्णपक्षे ६ तिथौ भृगुवासरे तद्दिने ग्रंथ रामचंद्र भट्टेन लिखितं ॥ अथ ग्रंथसंख्या च्यारसे पंनास ४५० ॥" अशी आहे. मुखपृष्ठावर मात्र "अथ **पवनबीज** ग्रंथ प्रारंभः श्रीरामः ॥" असें नांव आहे.

चतुर्वेदाचें सत्व काढिले । जे उपनिषधाचे सार घेतले ।
**निवृतिकृपे ज्ञानदेव** बोले । पवनविजये मथन करूनिया ॥ १२ ॥

असा कर्त्याचा निर्देश आहे. या ग्रंथांत यौगिक आणि वामाचारसंबद्ध लैंगिक क्रिया-प्रक्रियांचें विवरण आहे.

—**रामचंद्र चिंतामण ढेरे**

## ३. ‘ रंभामंजरीं ’तील मराठी पद्य

जुन्या मराठीच्या अभ्यासाच्या दृष्टीनें जुन्या मराठींतील ग्रंथ, इत्यादि लेखनप्रकारांचा विशेष विचार केला जातो, हें स्वाभाविक व योग्य आहे. पण त्याच्याच जोडीला इतर भाषांतील नाटक, वगैरे लोकप्रिय व लोकाभिमुख जुन्या वाङ्मयांत जर मराठींतील कांहीं लेखन आढळत असेल, तर त्याचाहि परामर्श घेणें, हें खरोखर उचित तसेंच आवश्यक आहे. या दृष्टीनें प्रस्तुत लेखांत ‘ रंभामंजरी ’ नांवाच्या सट्टकांत[१] आढळणाऱ्या कांहीं मराठी पद्यांचा विचार केला आहे.

‘ रंभामंजरी ’ हें नयचंद्रलिखित सट्टक आहे. या नयचंद्राविषयीं जी त्रोटक माहिती उपलब्ध आहे, ती अशी : कृष्णगच्छांतील जयसिंहसूरीचा शिष्य जो प्रसन्नचंद्र त्याचा नयचंद्र हा शिष्य होय. या गुरुपरंपरेनें सूचित केल्याप्रमाणें नयचंद्र हा एक जैन साधु होता. नयचंद्राचा काल जरी अगदीं कांटेकोरपणें ठरवितां येत नाहीं, तरी सर्वसाधारणपणें त्याच्या कालाविषयीं पुढीलप्रमाणें अनुमान करतां येतें :

जयसिंहसूरिकृत ‘ कुमारपालचरित ’ या ग्रंथाचा काल इ. स. १३६५ आहे. नयचंद्रलिखित ‘ रंभामंजरी ’ची एक हस्तलिखित प्रत सन १४७८ ची आहे. तेव्हां या दोन सनांमधील काल नयचंद्राचा होय, हें उघड आहे.

नयचंद्राच्या कालाकडे याहून अधिक जवळ जायचें झाल्यास आणखी एका गोष्टीचा विचार करावयास हवा. नयचंद्र हा तोमर वीरम या राजाचा समकालीन मानला जातो. ग्वालेरच्या तोमर राजांच्या यादींत वीरम नांवाचा एक राजा आढळतो. त्याच्या नातवाचा–डुंगरेंद्रदेवाचा–काल इ. स. १४४०–१४५३ असा आढळतो. तेव्हां त्याच्या पूर्वींच्या दोन पिढ्यांस अदमासें पन्नास वर्षें दिलीं तर तोमर वीरमाचा काल सुमारें इ. स. १४०० येतो[२], असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां हाच नयचंद्राचाहि काल मानण्यास हरकत नाहीं. यावरून त्या काळांत प्रचलित असलेल्या मराठीचा नमुना ‘ रंभामंजरीं ’त पहावयास मिळतो, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

इ. स. १८८९ मध्यें ‘ रंभामंजरी ’ निर्णयसागरानें प्रसिद्ध केली आहे. या सट्टकाचा नायक जो जैनचंद्र राजा त्याच्या स्तुतिपर असणारें मराठी पद्य भाटाच्या तोंडीं घातलेलें आहे. निर्णयसागरमुद्रित प्रतींत पृष्ठ ११ वर हीं पद्यें जशीं आढळतात, तशींच तीं खालीं उद्धृत केलीं आहेत :

---

१. संस्कृतमधील रूपक वा उपरूपक यांचा ‘ सट्टक ’ हा एक प्रकारभेद मानला जातो. सट्टक हें प्रायः ‘ नाटिका ’ या प्रकाराप्रमाणें असतें. साहित्यदर्पणाच्या मतें सट्टक हें पूर्णपणें प्राकृत भाषेंत असतें.

२. डॉ. उपाध्येसंपादित ‘ चंदलेहा ’, प्रस्तावना, पृ. २५–२६.

(अ) जरि पेखिला मस्तकावरी केशकलापु ।
तरी परिस्खता मयूरांचे पिच्छप्रतापु ।
जरि नयनविषयू केला वेणी दंडु ।
तरि साक्षाज्जाला भ्रमरश्रेणीदंडु ।
जरि दृग्गोचरी आला विसाल भालु ।
तरि अर्द्धचंद मंडलु भइला ऊर्णायु जालु ।
भ्रुजुगलजाणुं द्वैधीकृतकंदर्प चापु ।
नयननिज्जित तुजाला खंजनु निःप्रतापु ।
मुखमंडलु जाणु शशांकदेवताचे मंडलु ।
सर्वांगसुंदरता मूर्तिमंतु कामु ।
कल्पद्रुम जैसे सर्व लोक आशा विश्रामु ।

'रंभामंजरी'च्या पुणें-हस्तलिखित प्रतींत डॉ. उपाध्ये यांना आढळलेल्या याच पद्यपंक्ति पुढीलप्रमाणें आहेत:—

(ब) जरि पेखिला मस्तकावरी केशकलापु ।
तरि परिस्खलिला मयूरांचे पिच्छप्रतापु ॥
जरि नयनविषयु केला वेणीदंडु ।
तरि साक्षाज्जाला भ्रमरश्रेणीदंडु ॥
जरि दृग्गोचरी आला विसाल भालु ।
तरि अर्धचंद्रमंडलु भइला उर्णायुजालु ॥
भ्रूजुगलु जाणु । द्वैधीकृतकंदर्प्यचापु ।
नयननिर्ज्जितु जाला षंजनु निःप्रतापु ॥
मुखमंडलु जाणु शशांकदेवताचे मंडलु ॥
सर्व्वांगसुंदरतामूर्तिमंतु कामु ।
कल्पद्रुम जैसे सर्व्वलोकआशाविश्रामु ॥

[वर दिलेले (अ) व (ब) वाचतांनाच पाठभेद, शब्द जोडून वा तोडून लिहिण्याचा प्रकार-भेद, तसेंच ऱ्हस्व-दीर्घ लिहिण्यांतील भेद, हे ताबडतोब कळून येतात. तसेंच, (अ) मधील 'परिस्खता' हा शब्द मुद्रित प्रतींतील शेवटीं दिलेल्या शब्दानुक्रमणींत दिलेला नसून, तेथें 'परिक्खिता' हा शब्द आढळतो, हेंहि येथें सांगणें जरूर आहे.]

वरील पद्यपंक्तींत दोन दोन ओळींनीं एकेक पद्य होत आहे आणि या दोनहि चरणांच्या अंतीं यमक आढळतें. त्या दृष्टीनें पाहतां नवव्या ओळीशीं–'मुखमंडलु... मंडलु'–यमक साधणारा चरण गहाळ झाला असावा, असें दिसतें.

वृत्तविचाराच्या दृष्टीनें पाहतां वरील पंक्ति उघड उघड कोणत्या तरी मात्रा-वृत्तांत आहेत, अक्षरवृत्तांत नाहींत. कारण प्रत्येक चरणांतील अक्षरसंख्या-पहिल्या दोन ओळी सोडून; तेथें दोन्ही चरणांत १५ च अक्षरें आहेत–१४, १३, १३, १७, १५, १६, १७, १३, १५ या प्रकारें भिन्न आहे. मात्रांच्या दृष्टीनें पाहतां-पहिल्या दोन चरणांत प्रत्येकीं २२ मात्रा आहेत ( येथें दुसऱ्या चरणांतील ‘ तरी ’ हा (ब) तील ‘ तरि ’प्रमाणें असावा, असें गृहीत धरलें आहे; (अ) मधील ‘ तरी ’ घेतल्यास दुसऱ्या चरणांत २३ मात्रा होतात ); तिसऱ्या व चौथ्या पंक्तींत प्रत्येकीं २० मात्रा आहेत; पांचव्या व सहाव्या ओळींत अनुक्रमें २० आणि २४ मात्रा आहेत; सातव्या आणि आठव्या चरणांत प्रत्येकीं २२ मात्रा आहेत. ( येथेंहि सातव्या चरणांतील ‘भ्रु॑ ’ हा (ब) तील ‘ भ्रू॑ ’प्रमाणें दीर्घ मानला आहे. ); नववी पंक्ति २४ मात्रांची आहे; दहाव्या आणि अकराव्या पंक्तींत अनुक्रमें २० व २३ मात्रा आहेत. हीं जुनीं मात्रावृत्तें कोणतीं याचा तज्ज्ञांनीं विचार करणें आवश्यक आहे.

या पद्यपंक्तींत येणाऱ्या शब्दसंग्रहाचा विचार केला तर एक गोष्ट चटदिशीं जाणवते; ती म्हणजे संस्कृतमधून वर्णविकारानें येणाऱ्या प्राकृत शब्दांचा वापर फारच कमी प्रमाणांत असून मूळ संस्कृत शब्दांचाच उपयोग अधिक प्रमाणांत आढळतोः येथील तत्सम शब्द ( पिच्छ, वेणी, दंड, भाल, मंडल, जाल, काम ) सोडून दिल्यास मूळचे संस्कृत शब्दच ( मस्तक, केश, कलाप, मयूर, प्रताप, नयन, विषय, भ्रमर, श्रेणी, दृग्गोचर, अर्ध, ऊर्णायु, द्वैधीकृत, कंदर्प, चाप, खंजन, निःप्रताप, मुख, शशांक, देवता, सर्वांग, सुंदरता, मूर्ति, कल्पद्रुम, लोक, आशा, विश्राम ) तद्भव शब्दांपेक्षां ( °मंत, पेखिला, विसाल, जुगल) फार मोठ्या प्रमाणांत आढळतात. या पद्यपंक्तींतील कांहीं शब्दांबद्दल थोडें अधिक सांगणें जरूर आहे.

( १ ) मुद्रित प्रतींत ‘ जाणुं ’ व ‘ जाणु ’ असे प्रयोग आहेत. उलट पुणें-हस्तलिखित प्रतींत मात्र ‘ जाणु ’च आहे. सध्यांच्या मराठींत ‘ जणुं ’ वापरलें जातें. हेमचंद्रानें म्हटल्याप्रमाणें, अपभ्रंश भाषेंत ‘ इव ’ याअर्थीं ‘ जणु ’ (हेम. ४·४४४) वापरलें जातें. तसेंच अपभ्रंशांत ‘ जाण ’ या धातूचें वर्तमान. प्र. पु. ए. व. ‘जाणुं’ असें होतें. नयचंद्रानें ‘ जाणुं ’ वा ‘ जाणु ’ चा प्रयोग केला आहे. तेव्हां सद्यःकालीन मराठींतील ‘ जणुं ’ या शब्दाची व्युत्पत्ति संस्कृत अपभ्रंशपर्यंत (जाणे–जाणुं) भिडवितां येईल. ( २ ) तसेंच, अपभ्रंशांतच ‘ यादृश ’ या संस्कृत शब्दाचें वर्णान्तरित रूप ‘ जइस ’ होतें ( हेम. ४·४०३ ) यावरूनच मराठींतील जैसा, जैसे, इत्यादि शब्द.

याच पद्यपंक्तीवरून व्याकरणविषयक पुढील माहिति उपलब्ध होते : ( १ ) अकारान्त शब्दांचीं प्रथमा व द्वितीया ए. व. चीं रूपें ( अपभ्रंशप्रमाणेंच ) उकारान्त वापरलेलीं आहेत. उदा० कलापु, प्रतापु, दंडु, भालु, मंडलु, जालु, चापु, खंजनु, निःप्रतापु, मूर्तिमंतु, कामु, विश्रामु. ( २ ) षष्ठी ए. व. आणि अ. व. यांचा ‘ चे ’

हा प्रत्यय आहेः देवताचे ; मयूरांचे. येथें 'देवताचे' हें रूप लक्षांत घेण्याजोगें आहे. चालू मराठींत 'देवते' असें रूप प्रत्ययापूर्वी होऊन मग 'चे' प्रत्यय लागेल. येथें मात्र मूळ 'देवता' शब्दालाच 'चे' प्रत्यय जोडलेला आहे. (३) सप्तमी दर्शविण्यास प्रत्यक्ष प्रत्ययाऐवजीं 'वरी' चा उपयोग करून सप्तमीचा अर्थ दाखविला आहे. उदा० मस्तकावरी. (४) 'ल' नें अन्त पावणारीं भूतकाळाचीं रूपें येथें आहेतच. उदा० पेखिला, केला, जाला, आला, भइला. येथें दोन रूपां-विषयीं अधिक सांगणें जरूर आहे : (अ) येथें 'जाला' या रूपाचा वापर आहे. चालू मराठींत 'ज' त महाप्रणागम होऊन सिद्ध झालेलें 'झाला' रूप वापरलें जातें. (आ) संस्कृतमधील 'भू' धातु मराठींत 'हो' झालेला आहे. पण येथें मूळ धातु 'भव' (वा भय) मानून 'भइला' हा भूतकाळ साधलेला दिसतो. अशीं रूपें उपलब्ध जुन्या मराठींत आढळत नाहींत, 'भूतली' असें भूत-काळाचें एक रूप आढळतें, हेंहि येथें सांगणें जरूर आहे (भास्करकृत 'शिशुपाल-वध' १७१, कोल्ते-प्रत, पृ. ३४). हीं भूतकाळाचीं रूपें कर्त्याच्या लिंगवचनाशीं संवादी आहेत. (५) विशेषणें वाक्यांत कधीं प्रत्ययरहित तर कधीं प्रत्ययसहित वापरलेलीं आढळतात. उदा० विसाल भालु ; खंजनु निःप्रतापु ; ॰ मूर्तिमंतु कामु.

—के. वा. आपटे

---

# मराठींतील सुलभीकरण

लेखक : प्रा. के. वा. आपटे

संस्कृत ही मराठीची आजी व प्राकृत ही आई मानली जाते. साहजिकच, प्राकृतचे–आईचे–गुणधर्म मराठींत–मुलींत–उतरले असतील, यांत फारसें नवल नाहीं. प्राकृतमधील ‘ सुलभीकरणा ’चा ( वा ‘ एककीकरणा ’चा ) भाग मराठींत कसा व कोणत्या रीतीनें आला आहे, व त्यांत मराठीचें स्वतःचें असें काय आहे, याचा प्रस्तुत लेखांत विचार केला आहे.

संस्कृतमधील बहुसंख्य संयुक्त[१] व्यंजनांचें ( महाराष्ट्री ) प्राकृतांत येतांना ‘ समानीकरण ’[२] ( Assimilation ) होतें, हें सर्वश्रुत आहे. आतां समानीकरण झालें तरी शब्दांतील जोडाक्षर निराळ्या रूपांत कां होईना रहातेंच; तें फक्त उच्चारास सुलभ होतें इतकेंच. याच्या पुढची पायरी म्हणजे समानीकरणानें झालेल्या संयुक्त व्यंजनांतील पहिल्या अवयवाचा[३] लोप करून संयुक्त व्यंजनच काढून टाकणें; संयुक्त व्यंजन नाहींसें करण्याच्या या पद्धतीला सुलभीकरण ( वा एककीकरण ) ( Simplification ) म्हटलें आहे.

जेव्हां सुलभीकरण होतें, तेव्हां प्रायः पुढें सांगितल्याप्रमाणें दोन घटना घडून येतात :

( १ ) समानीकरणानें आलेल्या संयुक्त व्यंजनांतील पहिल्या[४] अवयवाचा लोप होतो. ( २ ) त्याचवेळीं मूळ शब्दांत संयुक्त व्यंजनामागील स्वर जर ऱ्हस्व असेल तर तो दीर्घ[५] होतो, ( पण मागील स्वर जर मुळांतच दीर्घ असेल तर तो तसाच राहतो. ) हें सुलभीकरणाचें अगदीं सामान्य स्वरूप होय.

---

१ मध्यें वा अन्तीं स्वर नसतां अनेक व्यंजनांचा जो संयोग असतो, त्याला संयुक्त व्यंजन म्हणतात; त्यांत अन्तीं स्वर मिळाला कीं, संयुक्ताक्षर वा जोडाक्षर होतें.

२ समानीकरण होतांना ( १ ) दोन समबली अवयवांच्या संयुक्त व्यंजनांत पहिल्या अवयवाचा लोप होऊन दुसऱ्याचें द्वित्व होतें व ( २ ) दोन असमबली अवयवांच्या संयुक्त व्यंजनांत कमी बलवान् अवयवाचा लोप होऊन अधिक बली अवयवाचें द्वित्व होतें.

३ उच्चारक्रमानुसार संयुक्त व्यंजनांत पहिला, दुसरा, असे अवयव ठरतात.

४ प्राकृतमध्यें कधीं समानीकरणाच्या संयुक्त व्यंजनांतील पहिल्या अवयवाचा लोप होऊन तेथें अनुस्वारागम होतो.

५ शब्दांतील मात्रा कायम ठेवण्याचें तत्त्व येथें पाळलें जातें.

मराठींतील सुलभीकरणांत दोन प्रकार आढळतात :

( १ ) कित्येकदां हें सुलभीकरण प्राकृतमध्यें होणाऱ्या सुलभीकरणाच्या वरील नियमानुसार होतें. ( २ ) तर पुष्कळदां फार निराळ्या तऱ्हेनें सुलभीकरण झालेलें आढळतें.

आतां, प्रथम प्राकृतप्रमाणें होणाऱ्या सुलभीकरणाचीं उदाहरणें स्पष्टीकरणासह दिलीं आहेत. नंतर मराठींतील वैशिष्ट्यपूर्ण सुलभीकरणाचा परामर्श घेतला आहे :—

(अ) संस्कृत शब्दांतील अनुस्वाराचा लोप होतो; हा अनुस्वार ऱ्हस्व स्वरावर असल्यास तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो. उदा :—

विंशति – वीस. दंष्ट्रा – दाढा.

(आ) मूळ संस्कृत शब्दांतील संयुक्त[६] व्यंजनांत अनुस्वार नसून, त्याचें समानीकरण[७] झाल्यावर त्यांतील पहिल्या अवयवाचा लोप होतो व मागील स्वर ऱ्हस्व असल्यास तो दीर्घ होतो.

( १ ) स्पर्श[८] + स्पर्श :—

(क) शब्द – ( सद्द ) – साद. सप्तन् – ( सत्त ) – सात.
सक्तु – ( सत्तु ) – सातु. वृद्धि – ( वड्ढि ) – वाढ.
शुद्धि-(सुद्धि)-सू (शू) ध. मुद्ग – ( मुग्ग ) – मूग.
दुग्ध – ( दुद्ध ) – दूध. प्रज्वल् – ( पज्जल )–पाजळ(णें).

(ख) कज्जल–काजळ. रज्जु–राजु.
लज्जा-लाज. हट्ट–हाट ( गी. ल. को. ).

(ख) (देशी शब्दांत ) :—
हड्ड – हाड. बप्प – बाप. गड्डी – गाडी.
खट्टिक्क – खाटिक. अग्घाड – आघाडा.

( २ ) स्पर्श + उष्म[९] :—
वृक्ष–( रुक्ख ) – रूख. बुभुक्षा – ( बुभुक्खा ) – भूक.

( ३ ) उष्म + स्पर्श :—
पृष्ठ – ( पट्ठ ) – पाठ. अष्टन् – ( अट्ठ ) – आठ. षष्टि–( सट्ठि )–साठ.

---

६ संस्कृतमध्यें संयुक्त व्यंजनांतील व्यंजनांचे संयोग भिन्न प्रकारचे असूं शकतात. उदाहरणें देतांना हे विविध संयोग मुद्दाम दिले आहेत.

७ कंसांत जरूर तैथें प्राकृतमधील समानीकरणाचें रूप दिलें आहे.

८ प्रत्येक वर्गांतील पहिल्या चार व्यंजनांना स्पर्श म्हणतात.

९ श् ष् स् हे उष्मवर्ण होत.

(४) स्पर्श + अंतस्थ[१०] :—

चक्र – ( चक्क ) – चाक. सत्य – ( सच्च ) – साच.

तक्र – ( तक्क ) – ताक. अद्य – ( अज्ज ) – आज.

पत्र – ( पत्त ) पात. खट्वा – ( खट्टा ) – खाट.

पुत्र – ( पुत्त ) – पूत. निद्रा – ( निद्दा ) – नीद.

(५) अंतस्थ + स्पर्श :—

कर्तरी – ( कत्तरी ) – कातरी. सर्प – ( सप्प ) – साप.

मर्कट – ( मक्कड ) – माकड. गर्भ – ( गब्भ ) – गाभ.

शर्करा – ( सक्करा ) – साखर. कर्पूर – ( कप्पूर ) – कापूर.

(६) स्पर्श + अनुनासिक[११] :—

अग्नि – ( अग्गि ) – आग.

(७) उष्म + अनुनासिक :—

कृष्ण – ( कण्ह ) – कान्हा.

(८) अंतस्थ + अनुनासिक :—

घर्म – ( घम्म ) – घाम. कर्मन् – ( कम्म ) – काम.

धर्म – ( धम्म ) – ( काम ) धाम.

(९) अंतस्थ + अंतस्थ :—

चुल्ली – चूल. पल्लव – पालवी. चर्व – ( चव्व ) – चाव(णें).

(१०) उष्म + अंतस्थ :—

मनुष्य – ( मणुस्स ) – माणूस. अश्रु – ( अस्सु ) – आसु.

पुष्य – ( पुस्स ) – पूस. श्वश्रू – ( सस्सू ) – सासू.

(११) ह् + व् :— जिह्वा – ( जिब्भा ) – जीभ.

(१२) तीन अवयवी संयुक्त व्यंजनांचें सुलभीकरण :—

वर्त्मन् – ( वट्ट ) – वाट. मत्स्य – ( मच्छ ) – मासा.

कांहीं विशिष्ट संयुक्त व्यंजनाचें सुलभीकरण खालीं सांगितल्याप्रमाणें होतें :—

( १ ) क्ष :– प्राकृतमध्यें क्ख, च्छ तर कधीं ज्झ असें क्ष चें समानीकरण होतें. याला अनुलक्षून होणारीं सुलभीकरणें अशीं :—

( अ ) प्रक्षर् – ( पज्झर ) – पाझर(णें).

( आ ) लक्ष – ( लक्ख ) – लाख. रक्ष् – ( रक्ख ) – राख(णें).

यक्ष – ( जक्ख ) – जाख. यक्षिणी – ( जक्खिणी ) – जाखीण.

---

१० य् र् ल् व् हे अंतस्थ वर्ण होत.

११ प्रत्येक वर्गातील शेवटच्या व्यंजनाला अनुनासिक म्हणतात.

( इ ) समानीकरणानें येणाऱ्या 'च्छ' पासून तसेंच मुळांतील च्छ पासून सुलभीकरण झाल्यावर मराठींत 'छ' चा 'स' होतो. ( क्वचित् 'श' होतो. )

( १ ) पिच्छ – पीस. गुच्छ – घोस. कच्छप – कासव.
देशी :— पडच्छी – पाडशी.

( २ ) तक्ष् – ( तच्छ ) – तास(णें). ऋक्ष – ( रिच्छ ) – रीस.
कुक्षि – ( कुच्छि ) – कूस. इक्षु – ( उच्छु – ऊस.
मक्षिका – ( मच्छिआ ) – माशी(सी).

( २ ) स्त व ष्ट चें प्राकृतमध्येंच होणारें समानीकरण अनुक्रमें कधीं त्त वा त्थ आणि ट्ट वा ट्ठ असें असतें. साहजिकच मराठींतील सुलभीकरणांत कधीं त वा थ आणि ट वा ठ राहिलेला आढळतो. ( तथापि प्राकृतमध्यें जेथें त्त वा ट्ट होतें, तेथें मराठींत सुलभीकरणानें त वा ट्ट येईलच असें निश्चित सांगतां येत नाहीं ).

( अ ) स्त :—

( १ ) हस्त[१२] – हात. भस्त्रा[१२] – भाता.
( २ ) मस्तक – ( मत्थक ) – माथा. प्रस्थर – ( पत्थर ) – पाथर.
अस्ति – ( अत्थि ) – आथि. पुस्तक – ( पोत्थक ) – पोथी.

( अ ) ष्ट :—

( १ ) इष्टिका – ( इट्टिआ ) – वीट. धृष्ट[१२] – धीट.
( २ ) विष्टि – ( विट्ठि ) – वेठ. मुष्टि – ( मुट्ठि ) – मूठ.
षष्टि – ( सट्ठि ) – साठ. अष्टन् – ( अट्ठ ) –आठ.

मागें म्हटल्याप्रमाणें संयुक्त व्यंजनामागील स्वर जर दीर्घ असेल; तर सुलभीकरण झाल्यावर तो तसाच राहतो. उदाहरणार्थ :—

लाक्षा – ( लक्खा ) – लाख. कार्य – ( कज्ज ) – काज.
व्याघ्र – ( वाग्घ ) – वाघ. बाष्प – ( वप्फ ) – वाफ.
अपररात्र – ( अवरत्त ) – अपरात. मार्ग – ( मग्ग ) – माग.
सूत्र – ( सुत्त ) – सूत. शूर्प – ( सुप्प ) – सूप.
क्षेत्र – ( खे-छेत्त ) – खे(शे)त. गोत्र – ( गोत्त ) – गोत.
कोष्टक – ( कोट्ठक ) – कोठा. ओष्ठ – ( ओट्ठ ) – ओठ.

देशी शब्दांत :—

पोट्ट – पोट. कोट्ट – कोट. चोप्पड – चोपड(णें).

मराठींतील वैशिष्ट्यपूर्ण सुलभीकरणांचा आतां विचार केला आहे.

---

१२ येथें हत्त, भत्ता व धिट्ट असें समानीकरण मानावें लागतें.

पुष्कळदां, समानीकरणानें आलेल्या संयुक्त व्यंजनांतील दुसऱ्या अवयवाचा लोप होऊन पहिला अवयव रहातो. उदाहरणार्थ :—

(अ) उष्ण – (उण्ह) – ऊन.

(आ) संध्या – (संज्झा-झा) – सांज.

(इ) महर्घ – (मह्ग्घ) – महाग. द्विकार्ध – (दियड्ढ) – दीड.
भिक्षा – (भिक्खा) – भीक. बुभुक्षा – (बुभुक्खा) – भूक.
युद्ध – (जुज्झ) – झूज. सार्ध – (सड्ढ) – साडे.
मध्य – (मज्झ) – माज(घर). गुह्य – (गुज्झ) – गूज.

या ठिकाणीं दोन स्पष्टीकरणें संभवतात :—

(अ) वर म्हटल्याप्रमाणें दुसऱ्या अवयवाचा लोप होऊन पहिला अवयव उरतो अथवा (आ) या संयुक्त व्यंजनाच्या समानीकरणानें आलेल्या संयुक्त व्यंजनाचा उच्चार पहिल्या अवयवाला प्राधान्य देऊन होत असला पाहिजे. त्यामुळें सुलभीकरणांत पहिला अवयव रहातो.

२) संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर सुलभीकरणानंतर दीर्घ न होतां ऱ्हस्वच राहतो, विविध परिस्थितींत हा स्वर ऱ्हस्व राहिलेला आढळतो ह्या परिस्थिति व संभवनीय स्पष्टीकरण पुढें दिलें आहे :—

(अ) (१) निश्चल – निचळ, निश्चित – निचिंत, निश्चेष्ट – निचेष्ट,
उत्स्था – (उठ्ठा) – उठ(णें), उच्छ्वास – उसासा, उत्तान – उताणा,
उत्पट् – उपड(णें), उज्ज्वल – उजळ.

(२) पादत्राण – पायताण.

पुष्कळदां प्राकृतांतच, संयुक्त व्यंजनांत व्यंजनान्त उपसर्गाचें अन्त्य व्यंजन पहिला अवयव असतां, त्या अन्त्य व्यंजनाचा लोप होऊन संयुक्त व्यंजनच होत नाहीं. यानें (१) चें स्पष्टीकरण होतें. तसेंच समासांत द्वितीय पदांतील आद्य वर्ण हा कधीं आद्य, तर कधीं मध्य मानला[13] जातो. तो आद्य असतांना द्वित्वांतील पहिल्या अवयवाचा लोपच होतो. यानें (२) चें स्पष्टीकरण होतें :—

(१) (अ) सदृक्ष – (सरिक्ख) – सारिखा. शुष्क – (सुक्क) – सुका.
रिक्त – (रित्त) – रिता. कुब्ज – (खुज्ज) – खुजा.
भद्र – (भल्ल) – भला. ऊर्ध्व – (उब्भ) – उभा.

(२) एकल्ल – एकला, तुज्झ – तुझा.

या परिस्थितींत दोन स्पष्टीकरणें संभवतात :

१३ हेमचंद्र.

(१) मूळ शब्दापुढें स्वार्थे 'क' मानला म्हणजे वर्णान्तरानें उरणारा जो 'अ' तो मागील स्वरांत मिसळतो व तो स्वर दीर्घ होतो. त्यामुळें मात्रा कायम ठेवण्यासाठीं संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ करण्याची जरुरी उरत नाहीं. अथवा (२) संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व, दीर्घ करण्याऐवजीं सुलभीकरणानें राहिलेल्या व्यंजनाशीं संयुक्त असणारा ऱ्हस्व स्वरच दीर्घ करून शब्दांतील मात्रा कायम ठेवल्या जातात.

(इ) षष्ठी – (सट्ठी) – सटवी. पिक्व – (पिक्क) – पिक(ला).

येथें मराठी शब्दांत अधिक वर्ण येत असल्यानें संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ करण्याची जरूरी वाटली नसावी.

(ई) द्वितीय – (दुइज्ज) – दुजा. कपर्दिका – (कवड्डिआ) – कवडी.
अष्टादश – (अट्ठादस) – अठरा. अष्टत्रिंशत् – (अट्ठत्तीस) – अडतीस.
उपाध्याय – (उवज्झाय) – वझे. अमावास्या – (अमावस्सा) – आवस.

या ठिकाणीं शब्दांतील एक वा अनेक वर्णांचा लोप झाला आहे. साहजिकच मात्रांची मूळ संख्या सुटलीच. त्यामुळें सुलभीकरण झाल्यावर संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ करण्याची जरूरीच[१४] राहिली नाहीं.

(उ) (१) चतुरस्र – (चउरस्स) – चौरस. चतुर्थ – (चउत्थ) – चौथा.
(२) चुल्लतात – (चुल्लताअ) – चुलता.

येथें वर्णान्तर होऊन उरलेल्या स्वरांचा संधि होऊन दीर्घ स्वरच निर्माण होत आहे. त्यामुळें संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ झाला नसावा.

(ऊ) वरील (अ) ते (उ) मध्यें संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर सुलभीकरणानंतर ऱ्हस्वच कां राहिला, याचीं संभवनीय स्पष्टीकरणें देतां येतात. पण आतां पुढें जीं उदाहरणें दिलीं आहेत तेथें असें कोणतेंच संभवनीय स्पष्टीकरण[१५] सांपडत नाहीं. त्यामुळें मागील ऱ्हस्व स्वर तसाच राहणें, तें वैशिष्ट्य या उदाहरणांत पुरेपूर आढळतें.

सपत्नी – (सवत्ती) – सवंत. खर्जूर – (खज्जूर) – खजूंर.
दृष्टि – (दिट्ठी) – दिठि, करपत्र – (करवत्त) – करवंत.
शिक्ष् – (सिक्ख) – शिक(णें) हरिद्रा – (हलद्दा) – हळद.

---

१४ मागील ऱ्हस्व स्वर दीर्घ करण्याचें कारण मात्रासंख्या कायम ठेवणें. त्या तत्त्वाचा येथें वापरच होत नाहीं.

१५ कांहीं शब्दांच्या बाबतींत त्यांतील कांहीं वर्णांवर जोर देऊन उच्चार होतो; त्यामुळें मागील ऱ्हस्व स्वर दीर्घ होत नाहीं, असें एक स्पष्टीकरण संभवतें. पण तें सर्वच शब्दांच्या बाबतींत लागू पडत नाहीं.

देशी शब्द :—

गवत्त–गवत. ठिग्गळ–ठिगळ. फुक्का–फुका.
कोलित्त–कोलित. चुक्क–चुक(णें).
निप्पट–निपट.

( ३ ) सुलभीकरण झाल्यावर संयुक्त व्यंजनामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ न होतां शब्दांतील दुसराच एखादा स्वर दीर्घ झालेला मराठींत आढळतो. उदाहरणार्थ :

परीक्ष – ( परिक्ख ) – पारखणें. परीक्षा – ( परिक्खा ) – पारख.

( ४ ) मागें सांगितलें कीं, सुलभीकरण झाल्यावर संयुक्त व्यंजनामागील स्वर दीर्घ असल्यास तो दीर्घच राहतो. पण मराठींत कधीं याच्या विरुद्धच प्रकार आढळून येतो. म्हणजे मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदाहरणार्थ :

शून्य – ( सुन्न ) – सुना(णा). प्रदीप्त – ( पलित्त ) – पलिता.

येथें कुणी असें म्हणूं शकेल : प्राकृतमध्यें ( या दीर्घ स्वरापुढें समानीकरणानें आलेलें संयुक्त व्यंजन असल्यानें[१६] ) मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व झालेला असतो. तो मराठींत तसाच येतो. या म्हणण्यांत मुख्य अडचण अशी :—प्राकृतमध्येंहि सुलभीकरण झाल्यावर हा ऱ्हस्व स्वर दीर्घच झाला असता. त्यामुळें वरील म्हणणें मान्य करण्यांत ' अर्धजरतीयन्याय ' पत्करावा लागतो.

या उलट, मराठींत वैशिष्टयपूर्ण सुलभीकरणें आहेत, हें मान्य केल्यावर, वर सांगितलेलें हें मराठींतील सुलभीकरणाचें वैशिष्टय आहे, असें मानण्यांत कांहीं चूक नाहीं.

( ५ ) संस्कृत शब्दांत वर्गीय व्यंजनाशीं संयुक्त असणाऱ्या अनुनासिकाचा— जेथें अनुनासिक हें प्रथम अवयव आहे, तेथें—अनुस्वार होऊन, मागील स्वर दीर्घ होतो :

सन्दंश–( संडास )–सांडस ( ०शी ). सन्धि–सांद ( ०दी ).
तन्दुल–तांदुळ. स्कन्ध–खांदा. जङ्घा–जांघ.
चन्द्र–चांद. वन्ध्या–वांझ. सन्ध्या–सांज.
देशी शब्दांत :—रञ्जण–रांजण.

( ६ ) संस्कृतमधील संयुक्त व्यंजनांत अनुस्वार वा अनुनासिक असतां, त्याचा उच्चार सानुनासिक[१७] होतो; ज्या ऱ्हस्व स्वराशीं हें अनुनासिक संबंधित आहे, तो

---

१६ हेमचंद्र.

१७ हा सानुनासिक उच्चार दर्शविण्यास त्या अक्षरावर ँ हें चिन्ह ठेवलें आहे.

दीर्घ होतो. तसेंच, कित्येकदां समानीकरणानें आलेल्या संयुक्त व्यंजनांतील पहिल्या अवयवाचा लोप होऊन त्याचा अनुस्वार[१८] होतो; त्या अनुस्वाराचा उच्चार सानुनासिक होतो; साहजिकच मागील ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो.

(अ) दंश–डॉंस.

(आ) वक्र–(वंक)–वॉंक(डा), बॉंक. पक्ष–पॉंख. क्रान्ति–कॉंत. कक्ष–कॉंख. अक्ष–ऑंख.

इ) सङ्कट–(संकड)–सॉंकडें. चम्पक–चॉंपा-फा.
ग्रन्थि–(गंठि)–गॉंठ. कङ्कण–कॉंकण.
कम्प–कॉंप. शृङ्खला–सॉंखळी. मञ्च–मॉंच.
कण्ठ–कॉंठ. घण्टा–घॉंट. दन्त–दॉंत. पञ्चन्–पॉंच.
कण्टक–(कंटअ)–कॉंटा. तन्तु-तॉंतु.

(७) प्राकृतमध्यें समानीकरणानें जेथें ण्ण व न्न येतो, त्याचें सुलभीकरण मराठींत अनुक्रमें ण व न आणि 'न' व 'ण' असें झालेलें आढळतें :

(अ) (१) चूर्णक–(चुण्णअ)–चुना. पर्ण–(पण्ण)–पान.
अरण्य–(रण्ण)–रान. जीर्ण–(जुण्ण)–जुना.
कर्ण–(कण्ण)–कान. पूर्णिमा–(पुण्णिमा)–पुनव.
(२) वर्ण–(वण्ण)–वाण, वान.

(आ) (१) अन्य–(अन्न)–आन. मन्य(ते)–(मन्नइ)–मान(णें).
(२) शून्य–(सुन्न)-सुणा, सुना.

वरील सुलभीकरणाच्या उदाहरणांवरून निष्कर्ष असा निघतो : प्राकृतमधील सुलभीकरणाचीं वैशिष्ट्यें मराठीनें घेतलेलीं आहेतच; पण त्याचवेळीं सुलभीकरणांत स्वतःचीं अशीं कांहीं वैशिष्ट्येंहि निर्माण केलीं आहेत.

---

१८ नुसता अनुस्वार आलेलीं उदाहरणें अशीं:—वृश्चिक–विंचू, युद्ध–झुंज, भित्ति–भिंत, पिप्पल–पिंपळ, पक्ष–पंख, उष्ट्र–उंट, इ.

१९ महाराष्ट्रींत प्रायः सर्वच ण्ण होतो; अर्धमागधींत कधीं ण्ण तर कधीं न्न असें समानीकरण होतें.

# जुन्या मराठी ग्रंथांचीं पोर्तुगीज भाषांतरें

( टांचण )

सतराव्या शतकामध्यें मराठी भाषेचा अभ्यास करून या भाषेंत ज्यांनीं ओवीबद्ध ग्रंथरचना केली, असे कांहीं विदेशी जेजुइट पाद्री प्रसिद्ध आहेत. यांपैकीं तोमास स्टिफन्स, एतियेन द ला क्रुवा, आंतोनियु सालदान्ज या विदेशी मराठी कवींचा परिचय 'पत्रिके'च्या वाचकांना यापूर्वीं झालेलाच आहे; पण ज्यांनीं मराठी भाषेंत ग्रंथरचना केली नाहीं, परंतु मराठी भाषेचा अभ्यास करून ज्यांनीं मराठी ग्रंथांचीं पोर्तुगीजींत भाषांतरें किंवा संक्षेप करून मराठी ग्रंथांचा आपल्या धर्मबांधवांना परिचय करून दिला, असेही कांहीं विदेशी पाद्री होऊन गेले. अशांपैकीं दों फ्रांसिस्कु गार्सिय या जेजुइटाची कामगिरी नुकतीच आपल्यापुढें ग्रंथस्वरूपानें आली आहे *

सुमारें पांच वर्षांपूर्वीं सेंट झेवियरचे चरित्रसंशोधक रोम येथील जोझे विकी या विद्वान् जेजुइटानें अमृतानंदविरचित 'योगराज-टिळक' या मराठी ग्रंथासंबंधीं आमच्याकडे विचारणा केली. कारण, या ग्रंथाचें पोर्तुगीज भाषांतर त्यांना सांपडलें होतें. 'योगराज-टिळक' हा ग्रंथ छापून प्रसिद्ध तर झाला नव्हताच; परंतु, त्याचें अस्तित्वदेखील पिताजी विकी यांनीं आमच्याकडे माहिती विचारीपर्यंत आम्हांला ठाऊक नव्हतें. पुढें या ग्रंथाचा शोध करतां, तीन हस्तलिखित प्रती आम्हांला उपलब्ध झाल्या आणि हा ग्रंथ पाठभेदांसह 'पत्रिके'मध्यें क्रमशः आम्हीं प्रसिद्ध केला. पुढें कांहीं दिवसांनीं पिताजी विकी यांनीं आमच्याकडे मराठीच्या पोर्तुगीज भाषांतरांचीं सुमारें तीन-चारशें टंकलिखित पृष्ठें पाठविलीं. त्यांना या भाषातरांतील कांहीं दुर्बोध स्थळांचें स्पष्टीकरण हवें होतें. आम्हीं त्याप्रमाणें त्यांना शक्य ती माहिती पुरविली. या भाषांतरांपैकीं दों फ्रांसिस्क गार्सिय यानें केलेल्या भाषांतराचा भाग पिताजी विकी यांनीं विस्तृत प्रस्तावना व टीपा यांसह तयार केला असून, पोर्तुगीज सरकारच्या वसाहतखात्यामार्फत वर लिहिल्याप्रमाणें प्रसिद्ध झाला आहे.

दों फ्रांसिस्क गार्सिय ( Dom Francisco Garcia ) याचा जन्म पोर्तालेग्रि ( पोर्तुगाल ) येथें १५८० त झाला. त्याच्या बापाचें नांव जुवांव गार्सिय व आईचें नांव

---

* *O Homem das trinta e duas perfeicoes e outras Historias*, Dom Francisco Garcia, S. J. यांकडून भारतीय वाङ्मयावरून भाषांतरित व Jose Wicki, S. J. यांकडून सटीप संपादित (प्रकाशक— Agencia Geral do Ultramar), Lisboa, 1958, पृष्ठें २५ + ३४२. किंमत नमूद नाहीं.

कातारिन गॉमिस असें होतें. ता. १२ जून १५९८ सालीं तो जेजुइट पंथामध्यें शिरला व दुसऱ्या साठ जेजुइटांच्या तुकडीबरोबर १६०२ सालीं हिंदुस्थानांत आला. क्रिस्ती धर्मशास्त्राचा त्याचा अभ्यास चालूच होता. १६०५ मध्यें तो गोवें येथें मुख्य धर्मोपदेशक ( sacerdote ) म्हणून काम करूं लागला. १६०६ सालीं त्याची दक्षिणेंत पुनिकाल येथें बदली झाली. १६०९ सालीं कोचीन येथें तत्त्वज्ञानाचा अध्यापक म्हणून तो काम करीत होता. पुढें १६१० मध्यें तो गोव्यांत परत आला. प्रथम दोन वर्षें खुद्द गोव्यामध्यें तो धर्मशास्त्राचें अध्यापन करीत असे. नंतर १६१२ सालीं त्यांनीं सासष्ट ( गोवा ) येथील जेजुइट कॉलेजांतही काम केलें. १६१३–१४ या दोन वर्षांत तो वांद्रें व ठाणें या भागांत मुख्य धर्माधिकारी म्हणून होता. पुढें १६१६ सालीं तो गोव्याला परतला व पुनः धर्मशास्त्राचें अध्यापन करूं लागला. १६१८ सालीं तो मडगांव येथें क्रिस्तीधर्ममंदिराचा मुख्य ( vigario ) म्हणून काम पाहूं लागला व १६२० सालीं त्याची रायतूर ( Rachol ) येथें चर्चाधिकारी म्हणून नेमणूक झाली. १६२३ सालीं तो कोलोंबोला गेल्याचा निर्देश आढळतो. १६२७ च्या जानेवारीमध्यें स्वतःसंबंधीं लिहितांना, ‘ रायतूर येथें आपण काम करीत असून तीन वर्षें तत्त्वज्ञान व पांच वर्षें धर्मशास्त्र हे विषय शिकवीत आहें ’, असें तो नमूद करतो. पुढें त्यानें वसई व गोवा येथील कॉलेजांत काम केलें. १६३३ सालीं तो दक्षिणेकडे गेलेला दिसतो १६३७ सालीं क्रांगानोर येथील आर्चबिशपचे मदतनीस होऊन पुढें १६४१ सालीं आर्चबिशपच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. या जागीं तो ता. ३ सप्टेंबर १६५९ पर्यंत म्हणजे त्याच्या अंतापर्यंत होता

या पुस्तकांत जीं पोर्तुगीज भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत तीं म्हणजे ( १ ) राजा हरिश्चंद्राची कथा, ( २ ) सिंहासन बत्तिसी व ( ३ ) ब्राह्मणांच्या ग्रंथांतील निवडलेल्या विविध कथा हीं होत. याशिवाय हिंदुधर्मासंबंधीं माहिती देणारा लॅटिन भाषेंतील मजकूरही या ग्रंथाच्या शेवटीं जोडलेला आहे.

हा सर्व मजकूर ज्याच्यावरून घेतला आहे तें मूळ हस्तलिखित रोम येथें जेजुइट मंडळीच्या दप्तरखान्यांत संगृहीत आहे. अलीकडे हें हस्तलिखित कोणीतरी बांधून घेतलें असून त्यावर “ P. FR. GARCIA/HISTORIAS/GENTILICAS/NA/INDIA ” असा मजकूर आहे. हें हस्तलिखित कोणातरी लेखकाकडून नकलून घेतलें असून स्वतः भाषांतरकारानें त्यांत दुरुस्त्या केल्या आहेत, असें पि. विकी लिहितात.

हीं भाषांतरें ग्रासियस यानें केव्हां केलीं हें निश्चित सांगणें कठीण आहे, असें पि. विकी प्रस्तावनेंत म्हणतात. पण या कामाला त्यानें १६१० पूर्वीं सुरुवात केली नव्हती व १६३३ मध्यें दक्षिणेंत गेल्यानंतर त्यानें हें काम पुरें केलें असावें असें त्यांचें म्हणणें आहे.

वर जी या भाषांतरकाराच्या वास्तव्यासंबंधीं तपशीलवार माहिती दिली आहे, तिच्यावरून १६०२ सालीं हिंदुस्थानांत आल्याबरोबरच त्यानें स्थानिक भाषेचा अभ्यास सुरू केलेला दिसतो. पुढें १६०६ सालीं दक्षिण हिंदुस्थानांत गेल्यावर जरी मराठीच्या अभ्यासांत कांहींकाळ खंड पडला असला, तरी पुनः १६१० सालीं गोव्यांत परत आल्यावर त्यानें हा अभ्यास जोरानें चालविला असावा; कारण या काळांत स्टिफन्स, कुवा हे सुप्रसिद्ध मराठी पुराणकार आपली ग्रंथरचना करण्यांत गुंतले होते. सासष्टी हें त्यावेळीं मराठी भाषेच्या अभ्यासाचें एक केंद्र बनलें होतें. १६१६ सालीं स्टिफन्सचें क्रिस्तपुराण प्रसिद्ध झालें व १६१८ सालीं ग्रासियस याची सासष्टींतील मडगांवच्या चर्चाचा मुख्य म्हणून नेमणूक झाली, याचा निर्देश वर आलाच आहे. स्टिफन्स यावेळीं न्हावेलीं नांवाच्या मडगांवजवळच्या गांवांत राहात असे. येथें या दोघांही मराठीच्या भक्तांची गांठ पडत असावी. स्टिफन्स १६१९ सालीं वारला व ज्या ठिकाणीं स्टिफन्सनें आपलें पुराण मुद्रित केलें त्या रायतूर-मध्यें ग्रासियसची चर्चाधिकारी ( Vigario ) म्हणून १६२० सालीं नेमणूक झाली. हा सर्व भाग क्रिस्ती ब्राह्मण लोकांनीं गजबजलेला होता व या ठिकाणीं मराठी वाङ्मयाचा अभ्यास ग्रासियसनें केलेला दिसतो. कांगानोर येथें आर्चबिशप असतांना १६५७ च्या सुमारास त्यानें इंक्विझिशनला पाठविलेलें एक पत्र उपलब्ध आहे, त्यांत त्यानें आपल्या भाषिक अभ्यासाची माहिती दिली आहे. पांड्य म्हणजे तामीळ भाषा आपणास कळते व मलबार-( म्हणजे मल्याळी )-पोर्तुगीज व पोर्तु-गीज-मलबारी कोशही आपण रचिले असून स्वतःच्या हातांनीं लिहून काढले आहेत; परंतु त्या भागांत पुरेसीं पुस्तकें मिळत नसल्यामुळें त्यांना पूर्णता आली नाहीं, असें तो लिहितो. गोव्यामध्यें स्थानिक भाषेचे पुष्कळ ग्रंथ आहेत व त्या भाषेचें आपल्याला फारच चांगलें ज्ञान आहे; याविषयीं ज्या ठिकाणीं आपण अकरा वर्षें चर्चाधिकारी होतों त्या विशेषतः मडगांव व लोटली गांवच्या ब्राह्मण लोकांकडून माहिती मिळू शकली; या ठिकाणीं तीन लिप्या चालतात व त्या तीनही आपल्याला वाचतां येतात. असेंही तो नमूद करतो. यांपैकीं पहिलीला 'चालंत्र' ( chalantra ) असें तो नांव देतो. ती 'चालू' व्यवहाराची मोडी लिपी असावी. दुसरी म्हणजे ज्या लिपींत लोक स्वतःच्या धर्मशास्त्राचे व इति-हासाचे ग्रंथ लिहितात ती. ही जुनी कानडी लिपि असावी; कारण या लिपींत लिहिलेले एकनाथी भागवत वगैरे गोव्यांतील कांहीं जुनें मराठी लिखाण प्रस्तुत लेखकाच्या संग्रहीं आहे. गोव्यांतील कांहीं जुन्या ग्रामसंस्थांचें दप्तरही याच लिपींत लिहिलेलें आढळतें. याच लिपींत लिहिलेला 'कथाकल्पतरू' हा मराठी ग्रंथ कोचीन येथें एका वाण्याकडे नुकताच सांपडल्याचें बॉबे क्रॉनिकल पत्राचे माजी संपादक श्री. आर. के. प्रभु हे मंगळूरहून कळवितात. ही कानडी लिपि आजच्या कानडी लोकांना वाचतां येत नाहीं. तिसऱ्या लिपीचें नांव "पहिली ( जुनी )

नागरी" ( Palea nagara ) असून ती वाचतां येणारे लोक कमी आहेत, असें तो म्हणतो. त्या काळीं विशेषतः संस्कृत भाषा तेवढी गोव्यांमध्यें देवनागरींत लिहिली जाई, असें ग्रासियस याच्या निवेदनावरून वाटूं लागतें.

पिताजी विकी यांनीं या ग्रंथांत हरिश्चंद्राच्या कथेचें पोर्तुगीज भाषांतर ज्यावरून छापलें आहे तो मूळ मराठी ग्रंथ विष्णुदास नाम्याचा आहे. याचे एकंदर दहा अध्याय आहेत. विष्णुदास नाम्याचा हरिश्चंद्राख्यान हा मूळ ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं. पि. विकीकडून या ग्रंथाचें टंकलिखित भाषांतर आमच्याकडे आल्यावर मूळ काव्याचा आम्हीं शोध केला आणि त्याचें एक हस्तलिखित धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत असल्याचें कळलें. त्याची नक्कल, विष्णुदास नामा या कवीचें संशोधन करणाऱ्या मराठी संशोधनमंडळांतील पीएच्. डी.च्या एक विद्यार्थिनी सौ. सरोजिनी शेंडे यांनीं धुळ्याला जाऊन करून आणिली. त्याबरोबर आम्हीं हें पोर्तुगीज भाषांतर ताडून पाहिलें व मूळ ग्रंथाचें शब्दशः भाषांतर करण्याचा पि. ग्रासियस यानें प्रयत्न केलेला आढळला. श्रीधर कवीनें आपल्या पांडवप्रताप ग्रंथांत हरिश्चंद्राख्यान कथन केलें आहे. मुक्तेश्वराच्या वनपर्वाच्या काव्यसंग्रहप्रतीमध्येंही तें अंतर्भूत आहे. यावरून पुष्कळांचा समज हें आख्यान मूळ संस्कृत महाभारतांतील, असा झाला आहे; परंतु तो खोटा आहे. मूळ महाभारतांत हें कथानक नाहीं. विष्णुदासनाम्याच्या मराठी महाभारतांत तें सांपडत नाहीं. इतकेंच नव्हे तर काव्येतिहाससंग्रहाच्या मुक्तेश्वरी वनपर्वामध्येंही तें दिलेलें नाहीं. मागाहून कुणीतरी तें काव्यसंग्रहाच्या वनपर्वामध्यें घुसडलेलें दिसतें. विष्णुदासनाम्यानें तें प्रथम स्वतंत्र प्रकरण म्हणून लिहिलें होतें. सौ. शेंडे या प्रश्नाचा विचार करीत असल्यामुळें या ठिकाणीं जास्त खोलांत आम्ही शिरूं इच्छित नाहीं.

या हरिश्चंद्राच्या भाषांतराचीं प्रस्तुत मुद्रित ग्रंथांत ६२ पृष्ठें असून विक्रमादित्याचें आख्यान किंवा सिंहासनबत्तिसी या प्रकरणानें पुढील ६३ ते १६० पृष्ठें व्यापिलीं आहेत. हें भाषांतर मराठी ग्रंथावरून केलें असावें. त्याचें मूळ शोधून काढण्याचा आम्हीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्यांत आम्हांला यश आलें नाहीं. सिंहासनबत्तिसी श्रीरामपूर प्रेस (१८१४), क्युरियर प्रेस (१८२४) वगैरे पुष्कळांनीं प्रसिद्ध केली आहे. परंतु त्यांचें मूळ व या भाषांतराचें मूळ एक असलेलें आम्हांला दिसलें नाहीं. पुढील १६१ ते ३०६ पृष्ठें 'ब्राह्मणांच्या ग्रंथांतून निवडलेल्या विविध कथा' या प्रकरणाला वाहिलेलीं आहेत. या कथा एकंदर पंचेचाळीस आहेत. पंचतंत्र, हितोपदेश, सिंहासनबत्तिसी, विष्णुपुराण, महाभारत, रामायण वगैरे ग्रंथांतून त्या निवडलेल्या दिसतात. कांहीं गोष्टींचें मूळ सांपडलें नाहीं. कांहीं कथांमध्यें व आज आपणांपुढें असलेल्या कथांमध्यें थोडा फरक आहे. उदाहरणार्थ चोविसावी कथा "सात वर्षांचा बालक जनार्जुन ( Zanarzunu ) याचें चरित्र"

ही आहे. हा जनार्दनु म्हणजे आपणास परिचित असलेला ध्रुवच होय. उत्तानपाद राजाला या कथेंत हुतानचरणु ( Hutanacharanu ) असें नांव दिलें आहे. पाद म्हणजे चरण, हें उघड आहे; परंतु अशीं नावें मूळ कोणत्या मराठी किंवा संस्कृत ग्रंथांमध्यें आढळतात त्याचा शोध करण्यासारखा आहे. सवडीप्रमाणें यांपैकीं अपरिचित कथांचा परिचय व त्यांच्या उगमाच्या शोध स्वतंत्रपणेंच करावा लागेल. पिताजी विकी यांनीं उपलब्ध साधनांवरून भरपूर तळटीपा देऊन शक्य तितकी वाचकांची सोय केली आहे, याबद्दल ते गौरवास पात्र आहेत.

दों फ्रांसिस्क गार्सियप्रमाणें फ्रांसिस रोइज (Francisco Roiz) या पाद्रीनेंही हिंदुधर्मग्रंथांचीं पोर्तुगीज भाषांतरें केल्याचा, लुइस फ्रोइस नांवाच्या पाद्रीच्या ता. ८–१२–१५६० च्या पत्रांत निर्देश आढळतो, असें प्रो. पिसुर्लेकर कळवितात. योगराज-टिळक, ज्ञानेश्वरीचा १३ वा अध्याय, नामदेवाचें अनादिपुराण ( या ग्रंथाचा कर्ता विष्णुदास नामा दिसतो. या मूळ ग्रंथाचा शोध मला अद्यापि लागलेला नाहीं. ) वगैरे आणखी कांहीं मराठी ग्रंथांचीं पोर्तुगीज भाषांतरें किंवा तर्जुमे यांच्याही टंकलिखित नकला आमच्याकडे पि. विकी यांच्याकडून आल्या होत्या. याचेंही प्रकाशन झालें असतें तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग झाला असता; परंतु या ग्रंथाचें सटीप जर्मन भाषांतर जर्मनींतील Bonn युनिव्हर्सिटींतील प्राच्य भाषांचे प्राध्यापक Dr. Paul Hacker करीत आहेत असें त्यांच्याकडून माहितीकरितां आलेल्या पत्रावरून कळतें.

'योगराज-टिळक' या ग्रंथाचें पोर्तुगीज भाषांतर मानुएल ओलिवैर यानें केलें असल्याचें पि. विकी कळवितात. हा बाटलेला ब्राह्मण होता.

फ्रान्समध्येंही मराठीच्या संशोधनाला उपयुक्त अशीं साधनें असल्याचें तेथें जाऊन आलेले प्रो. पिसुर्लेकर कळवितात. रोम, पोर्तुगाल, इंग्लंड येथेंही अशीं विपुल साधनें आहेत. त्यांचा शोध व अभ्यास करण्याकरितां कोणीतरी मराठी संशोधकानें युरोपांत जाऊन वर्ष दोन वर्षें तेथें राहाणें अवश्य आहे.

—अ. का. प्रियोळकर

# केकावलींतील एक शंकास्थळ.

एक वाचक लिहितात:

मोरोपंतांचें सुप्रसिद्ध ‘ केकावली ’ हें मराठी काव्य अत्यंत मधुर व लोकप्रिय आहे; परंतु त्याची खरी रुचि त्याचा नीट अर्थ कळणाऱ्यासच चाखतां येते. हें काव्य समजण्यास कठीण असल्यामुळें अनेक विद्वानांनीं त्याचा अर्थ उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. १८६५ सालीं प्रथम रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं ‘ यशोदापांडुरंगी ’ ही टीका लिहिली. हिच्या प्रस्तावनेंत ते लिहितात :

“ आतां केकावलि हें प्राकृत काव्य असून या वर आणखी प्राकृत टीका करण्याचें प्रयोजन काय म्हणून इतरांच्या तर नाहीं; परंतु कदाचित् पंडितजनांच्या मनांत प्रथमतः आशंका उत्पन्न होईल. त्यांस हें प्राकृत काव्य खरें, परंतु वामन, मोरोपंत यांसारख्या पंडितांचें काव्य जरी प्राकृत आहे तरी तें पंडितांसच समजायास शक्य असें प्राकृत काव्य आहे, त्यांत केकावलीसारखा ग्रंथ तर विशेषेंकरून; या माझ्या म्हणण्यास तेही रुकार देतील...पंताच्या काव्यांत निष्णात म्हणून वाखाणिलेल्या पुरुषांमध्येंही बहुतेकांस केकावलि हा ग्रंथ साद्यंत लागत नाहीं असाही बोभाट माझ्या ऐकण्यांत होताच. या सर्व कारणांवरून मोरोपंतांच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढिला. ”

दादोबांनंतर १८६७ सालीं परशुरामतात्या गोडबोले यांनीं ‘ केकादर्श ’ ही ‘ केकावली ’वर लहानशी नवी टीका लिहिली. तिच्या आरंभीं या ग्रंथाच्या दुर्बोधत्वासंबंधीं ते म्हणतात :

“ हा ग्रंथ जरी प्राकृत भाषेंत केला आहे तरी कवीनें यांत संस्कृत शब्द फार घातले आहेत आणि कोठें संक्षेपानें, कोठें संकेतानें, कोठें अन्योक्तीनें वर्णन केलें आहे. यामुळें याचा भावार्थ प्राकृत जनांच्या तर काय, पण पंडित जनांच्याही मनांत विचार केल्याशिवाय लवकर यावयाचा नाहीं. तो सर्वांस सुगम व्हावा या हेतूनें मी परशुराम या ग्रंथावर टीका लिहावयास आरंभ करतों......कवीचें हृदय तर समजणें कठीणच आहे, तथापि ईश्वरानें दिलेल्या बुद्धीच्या बळानें आणि विद्वज्जनांच्या साह्यानें जितका अर्थ उघड करवेल तितका थोडक्यांत करावा, अशी वांछा धरली आहे. इतकें असून जर कोठें काठिण्य किंवा दोष राहतील तर त्यांची क्षमा सज्जनांनीं करावी. ”

दादोबा किंवा परशुरामतात्या या दोघांच्याही प्रस्तावना वाचल्या म्हणजे आपण लावलेला अर्थ मूळ कवीला अभिप्रेत आहेच, याबद्दल त्यांना खात्री वाटत होती असें दिसत नाहीं. पुढील लोकांनीं आणखी प्रयत्न करून कविला खरोखर काय सांगावयाचें होतें, त्याचा शोध करावा, असाच या दोघांचाही हेतु असणार हें उघड आहे. पुढें या काव्यावर वामन दाजी ओक ( काव्यसंग्रह, १८९६ ), रामचंद्र भिकाजी

जोशी (१८९९), विष्णु श्रीधर परांजपे (१९२५), बाळकृष्ण अनंत भिडे (१९२६), वगैरे अनेक विद्वानांनीं टीका लिहिल्या व अनेकांनीं अर्थविवरणात्मक टीपाही प्रसिद्ध केल्या. पण माझ्या पाहण्यांत आलेल्या अशा ग्रंथांवरून बहुतेकांनीं दादोबा व तात्या यांचेच बहुतेक अर्थ उचललेले आहेत, असें दिसून आलें. कवीचें हृद्गत काय असेल हें जाणून घेण्याचा कोणीं स्वतंत्र रीतीनें प्रयत्न केलेला माझ्या पाहण्यांत नाहीं. उदाहरणाकरितां केकावलींतील पाहिलाच श्लोक घेऊं :—

सदाश्रितपदा सदाशिवमनोविनोदास्पदा
स्वदासवशमानसा कलिमलांतका कामदा ।
वदान्यजनसद्गुरो प्रशमितामितासन्मदा
**गदारिदरनंदकांबुजधरा** नमस्ते सदा ॥ १ ॥

यांतील चवथ्या चरणांतील 'गदारिदरनंदकांबुजधरा' या संबोधनानें पुष्कळांना गोंधळांत पाडलेलें आहे. 'यशोदापांडुरंगी' व 'केकादर्श' हीं पुस्तकें सहसा सामान्य वाचकांना उपलब्ध होण्यासारखीं नसल्यामुळें त्यांतील अर्थ या ठिकाणीं मी उद्धृत करतों.

वरील संबोधनांत श्रीविष्णूचें चतुर्भुज ध्यान अभिप्रेत आहे, हें सांगण्याचें कारण नाहीं. प्रत्येक हातांत कांहींतरी आयुध आहे, हेंही कवीला नमूद करावयाचें आहे.

**दादोबाः**—" हे गदारिदरनंदकांबुजधरा. **गदा**–प्रसिद्ध अथवा शुद्ध मराठी पर्याय म्हटला म्हणजे सोटगा, **अरि**–चक्र, **दर**–शंख आणि **नंदक**–आनंद करणारें असें जें अंबुज–कमल, यांतें **धरा**–धारण करणारा असा तूं त्याचें संबोधन. विष्णूच्या खड्गाचें नांवही **नंदक** असें आहे, त्यातें धारण करणारा, अशा अर्थाची ही प्रसिद्धी असेल, परंतु तसा अर्थ केला असतां प्रसिद्ध जी शंखचक्रगदापद्मधारी चतुर्भुजात्मक विष्णुमूर्ति तिच्या हस्तसंख्येहून ही आयुधसंख्या एकाधिक होऊन त्या अवशिष्ट राहिलेल्या आयुधास निराधारत्व येऊं पाहतें. म्हणून एथें **नंदक** हें पुढच्या **अंबुज** शब्दाचें विशेषण मानावें म्हणजे या आशंकेचें निवारण होईल असें मला वाटतें...अथवा सद्धर्म संस्थापण्याकरितां जेव्हां जेव्हां हीं पंचायुधें धरण्याचा त्यास प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां पांच हात प्रकट करून त्यांनीं तीं धारण करणार नाहीं, असेंही संभवत नाहीं; अशी कल्पना केल्यावर मग नंदक हें विशेषण न करतां त्याचा अर्थ खड्ग सुखानें मानावा...अथवा एथें कमलाचें अधिष्ठान हस्त न मानितां जर विष्णूची नाभि मानिली, तर मग पूर्वोक्त आशंकेस अवकाश न राहतां विष्णूचें चतुर्हस्तांनीं नंदकादि चतुरायुधांचें धारकत्वही अबाधित राहतें; आणि असें मानण्यास विष्णूचें पद्मनाभ म्हणून जें प्रसिद्ध नाम आहे तेंच प्रमाण."

परशुरामतात्यांना दादोबांचा हा अर्थ मान्य दिसत नाहीं. ते अर्थ देतात तो असाः—" गदा–कौमोदकी नामक गदा, अरि–सुदर्शननामक चक्र, दर–पांचजन्य-नामक शंख, नंदक–या नांवाचा खड्ग, आणि अंबुज–लीलार्थ घ्यावयाचें कमलपुष्प याचें धारण करणाऱ्या अशा...विष्णूचे हात चार आणि आयुधें वर्णिलीं पांच, म्हणून खड्ग कमरेस योजावा किंवा खड्ग, गदा, चक्र, धनुष्य, हीं आयुधें पर्यायें-करून त्या त्या प्रसंगीं घ्यावयाचीं आहेत, अशी कल्पना करावी." रामभाऊ जोशी व भिडे यांनीं पांच आयुधें आपल्या चार हातांत श्रीविष्णु कशीं धारण करील याची काळजीच केली नाहीं. या प्रश्नाला त्यांनीं बगल दिली आहे. परांजपे यांनीं परशुरामतात्यांच्या खड्ग कमरेस लटकावण्याच्या मताचा निर्देश केला आहे. आणि अखेरीस "ज्याचा महिमा अतर्क्य त्याच्या रूपशस्त्रधारणाची विशेष मीमांसा करणें हेंच चमत्कारिक दिसतें," असा शेरा मारून ते मोकळे झाले आहेत.

मला वाटतें कीं, 'गदारिदरनंदकांबुजधरा' या संबोधनाचा अर्थ पुढील-प्रमाणें कवीला अभिप्रेत असावाः--

(१) गदा = कौमोदकी नामक आयुध, +(२) अरिदर = शत्रूला विदारण करणारें (दॄ धातूपासून दर; उदा० पुरंदर), लक्षणेनें सुदर्शन चक्र. अरि (न्) म्हणजे चक्र, असाही शब्द सांपडतो; तोच पाहिजे असल्यास 'अरि च तत् दरं च' असा विग्रह करावा; एकुण अंतिम अर्थ पूर्वींप्रमाणेंच, म्हणजे सुदर्शन चक्र, +(३) नंदक = या नांवाची तरवार, +(४) अंबुज = शंख, + धर = धारण करणाऱ्या.

असा अर्थ केल्यास विष्णूला पांचवें आयुध धारण करण्याला आणखी नवा हात आणावा लागत नाहीं, किंवा खड्ग कमरेला लटकवण्याची गरजही पडत नाहीं, आणि कमळाला आयुध म्हणण्याची जरूरी नाहीं. अंबुज याचा शंख असा अर्थ पुढील ठिकाणीं सांपडेलः--

(१) पाञ्चजन्यं महाशङ्खं प्रदध्मौ पुरुषोत्तमः ।
सोऽम्बुजो हरिणाऽऽध्मातः सर्वप्राणेन शङ्खराट् ॥
ररास भीमनिर्ह्रादः त्रैलोक्यं व्यथयन्निव ॥–रामायण, उत्तर० ७।९-१०.

(२) कर्णस्तु सुमहातेजाः सिंहनादाविमिश्रितम् ।
धनुःशब्दं महच्चक्रे दध्मौ तारेण चाम्बुजम् ॥
—महाभारत, द्रोण० १७३,९.

# केकावलींतील एक शंकास्थळ

[ 'पत्रिके'च्या गेल्या जानेवारी १९६० च्या अंकांत वरील मथळ्याखालीं एक टांचण प्रसिद्ध झालें आहे. त्यांत 'गदारिदरनंदकांबुजधरा' या समासाचा 'एक वाचक' यांनीं जो अर्थ लावला आहे, त्यासंबंधीं कांहीं विद्वानांचीं मतें आम्हीं मागविलीं होती. त्यांपैकीं आमच्या हातांत जीं पांच आलीं, तीं लेखकांच्या नांवांच्या वर्णानुक्रमानें खालीं प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. शिवाय, या मतांविषयीं 'एक वाचक' यांचें म्हणणेंही शेवटीं देण्यांत आलें आहे. संशोधनामध्यें अखेरचें असें कांहीं नसतें. जुने विचार, समजुती किंवा अर्थ यांचा फेरविचार करून व पडताळून इष्ट वाटेल तर स्वीकारावे लागतात. या दृष्टीनें 'एक वाचक' यांचा हा प्रयत्न आम्हांला अभिनंदनीय वाटतो. —संपादक ]

## क्रमांक १

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा ! ।
वदान्यजनसद्‌गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
**गदारिदरनंदकांबुजधरा !** नमस्ते सदा ॥ १ ॥

प्रसिद्ध आर्यापति कविवर्य मोरोपंत यांनीं आपल्या पूर्ववयांत "आर्या-केकावली" या नांवाचें जसें एक स्फुट काव्य लिहिलें, तसेंच उत्तरवयांत "श्लोक-केकावली" या नांवाचें एक स्फुट काव्य पृथ्वीवृत्तांत लिहिलें. प्रस्तुत काव्य हें मोरोपंतांनीं आपल्या परिणतप्रज्ञ अवस्थेंत लिहिलें असल्यानें या काव्यामध्यें व्यंग्यार्थांची खूप रेलचेल झाली आहे. या व्यंग्यार्थांचा बोध होण्यास वाचकांसहि काव्यज्ञपंडितांच्या सहवासांत पुष्कळ शिक्षण घेऊन चांगलें बहुश्रुत व्हावें लागतें. आजवर या केकावलीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं मराठी भाषेंतील प्रख्यात पंडितांनीं पुष्कळ प्रयत्न केला आहे. दादोबा पांडुरंग, परशुरामतात्या गोडबोले आदि रसिक पंडितांच्या केकावलीवरील लहानमोठ्या टीका पाहिल्यानंतर या केकावलीसंबंधीं कांहीं शंकास्थळ राहील असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि, "केकावलींतील एक शंकास्थळ" या मथळ्याखालीं एका वाचकानें केकावलीच्या पहिल्याच श्लोकांतील एका चरणाच्या अर्थाविषयीं शंका उपस्थित करून स्वतःच त्या शंकेचें निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे. पण प्रस्तुत प्रयत्न अनाठायीं असल्यानें "तुषकंडनवत्" निष्फल आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रस्तुत श्लोक हा मंगलाचरणाचा असल्यानें पंतांनीं आपल्या इष्टदेवतेस येथें नमस्कार केला आहे. या इष्टदेवतेचा साक्षान्नामोल्लेख जरी या श्लोकामध्यें केलेला नाहीं, तथापि या श्लोकांतील कांहीं विशेषणांच्या अर्थाकडे लक्ष दिलें असतां

ती देवता विष्णुस्वरूपी असावी असें दिसून येतें. विष्णु या देवतेचें वर्णन क्वचित् द्विभुज जसें आहे, तसें चतुर्भुज किंवा अष्टभुज असेंहि आहे. प्रस्तुत शंकाविषयक श्लोकामध्यें गदा, अरि = चक्र, दर = शंख, नंदक = खड्ग आणि अंबुज म्हणजे कमल यांना धारण करणाऱ्या अशा तुला नमस्कार असो, असें वर्णन केलें आहे. या वर्णनामध्यें धारण केलीं जाणारीं आयुधें पांच असल्यानें चतुर्भुजात्मक विष्णु-मूर्तीनें **हीं पांच आयुधें** कशीं धारण केलीं असावींत, असा शंकाकार वाचकाला येथें प्रश्न पडला आहे. पण असा प्रश्न शंकाकारांना कां उत्पन्न व्हावा, हें आम्हांस समजत नाहीं. कारण, या श्लोकाच्या चतुर्थचरणामध्यें गदादि आयुधें धारण करणारा असें मोघमच वर्णन आहे. तीं आयुधें **हातांनीं** धारण करणारा असें वर्णन येथें नाहीं. चार हातांनीं चार आयुधें धारण केलीं आणि नंदक नांवाचा खड्ग कमरेला लटकावला. अशा रीतीनें गदादि पांचहि आयुधें धारण करणारा हें भगवान विष्णूचें वर्णन सुसंगत होतें. या वर्णनामध्यें कोणत्याहि प्रकारची शंका घेण्यास अवकाशच राहत नाहीं. बहुतेक सर्वत्र चतुर्भुज विष्णूच्याच मूर्ति फार दिसत असल्यानें चार भुजांनीं पांच आयुधें कशीं धारण करावींत असा गैरसमज शंकाकार वाचकाचा झाला असावा असें वाटतें. कदाचित् शंकाकार येथें असें म्हणतील कीं, शंख, चक्र, गदा, पद्म अशीं चार आयुधें धारण करणाऱ्या विष्णूचें वर्णन सर्वत्र उपलब्ध होतें व विष्णूनें खड्ग धारण केल्याचें फारसें कोठें दिसून येत नाहीं. म्हणून या ठिकाणीं शंका उत्पन्न झाली हें बरोबरच आहे. तर याविषयीं शंकाकारांना येथें आम्ही असें सुचवितों कीं, चतुर्भुज विष्णूचीच मूर्ति जरी सर्वत्र प्रचारांत आहे, तरी त्यावरून अधिक भुजांची विष्णूची मूर्ति अन्यत्र कोठें नाहींच, असें समजण्याचें कारण नाहीं. श्रीमद्भागवताच्या सहाव्या स्कंधांतील आठव्या अध्यायांतील नारायणवर्मांतील

"हरिर्विदध्यान्मम सवरक्षां न्यस्तांघ्रिपद्मः पतगेंद्रपृष्ठे ।
**दरारिचर्मासिगदेषुचापपाशान्** दधानोऽष्टगुणोऽष्टबाहुः ॥ १२ ॥"

या श्लोकामध्यें खड्ग धारण करणाऱ्या अष्टभुजात्मक विष्णूचें वर्णन केल्याचें स्पष्टपणें दिसून येत आहे.

धारण केलीं जाणारीं आयुध्यें हातांमध्येंच धारण केलीं पाहिजेत असा आग्रह धरणें हा दुराग्रह होईल. वर उद्धृत केलेल्या भागवतांतील श्लोकामध्यें अष्टबाहु विष्णूचें वर्णन असल्यानें खड्ग हातामध्यें धारण केला आहे असें म्हणणें जरी संभवत असलें तरी तें सर्वत्र संभवेलच असें नाहीं. खड्ग कमरेला लटकावलेला आहे, बाण भात्यांत पाठीवर आहेत आणि धनुष्य खांद्यावर घेतलें आहे, असेंहि विष्णूचें ध्यान करण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत घेण्याचें कारण नाहीं.

तात्पर्य, विष्णूला चारच हात आहेत, असा समज करून घेऊन पांच आयुधांची व्यवस्था लागत नाहीं म्हणून अरिदर असा एक सामासिक शब्द

कल्पून अंबुज म्हणजे शंख असा लोकरूढीला सोडून चार आयुधांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करणें आम्हांस प्रशस्त वाटत नाहीं.

—बाळाचार्य खुपेरकर

## क्रमांक २

पहिल्या केकावलीवर ' वाचकां 'नीं जें भाष्य केलें आहे, त्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटत नाहीं. त्यापरीस दादोबा पांडुरंग यांनीं केलेलाच अर्थ मला ग्राह्य वाटतो.

पुष्कळ वेळां स्वतः कवीलाच आपला आशय काय आहे, हें समजत नाहीं. तेव्हां कवीच्या मनांत काय होतें हें पाहण्याचा प्रयत्न यशस्वी होईल, असा नियम नाहीं. आणि या फंदांत कोणीं पडूंहि नये. सयुक्तिक अर्थ काय होतो एवढेंच आपलें काम.

विष्णु हा चतुर्भुज आहे व तो शंखचक्रगदापद्मधारी आहे हें मान्य करून कवितेचा अर्थ करणें युक्त होईल. अरि म्हणजे चक्र व दर म्हणजे शंख; तेव्हां गदारिदर हे ' शंखचक्रगदा 'वाचक शब्द आहेत. विष्णूच्या चौथ्या हातांत कमल आहे म्हणून अंबुज शब्दाचा अर्थ कमल करणें भाग आहे. हें कमल आयुध म्हणून मानलें जात असेलहि. परंतु त्याची शंका राहील. यास्तव नंदक म्हणजे आनंदविणारें असा अर्थ करणेंच बरोबर आहे. अगर नंदक ( खड्ग ) म्हणजेच अंबुज असें तरी कां म्हणूं नये ? विष्णूच्या खड्गाला नंदक हें नांव आहे. परंतु हें खड्ग त्याच्या हातांत दाखविलेलें नसतें. खड्गाप्रमाणें विष्णूचें धनुष्य असल्याचेंहि सांगतात. या धनुष्याला शार्ङ्ग हें नांव असून त्यावरून विष्णूला शार्ङ्गधर हें नांव पडलें आहे.

तात्पर्य, तुमच्या ' वाचका 'नें केलेला अर्थ पसंत करण्यास कोणतेंहि विशेष कारण मला दिसत नाहीं.

— ना. गो. चापेकर

## क्रमांक ३

आपलें कालचें पत्र व सोबतचा लेख दोन्ही पोचलीं. लेख मीं वाचला. त्यांतील ' गदारिदरनंदकांबुजधरा ' याचा नवीन अर्थ मला पटला नाहीं.

या सामासिक शब्दाच्या अर्थाविषयीं आतांपर्यंत अनेकांनीं चर्चा केली आहे व सुचविलेल्या अनेक अर्थांमध्यें कांहीं ना कांहीं व्यंग असल्यामुळें येथें ' विद्याविरुद्धत्व ' दोष मानावा, असेंहि कित्येकांनीं सुचविलें आहे.

वस्तुतः मोरोपंतांनीं ' गदा, अरि ( चक्र ), दर ( शंख ), नंदक ( या नांवाचें खड्ग ), अंबुज ( कमल ) धारण करणाऱ्या ' एवढेंच येथें म्हटलें आहे. त्या हातांनीं

धारण केल्या आहेत असें म्हटलें असतें, तर चार हातांत पांच वस्तु कशा, ही शंका असती. खड्ग कमरेला लटकावलेलें असतें हें प्रसिद्ध आहे. तसेंच हीं आयुधें आहेत असेंहि म्हटलेलें नाहीं, तेव्हां अंबुज हें आयुध नाहीं ही शंकाहि येण्याचें कारण नाहीं, आणि तिसरी **गृहीत** गोष्ट अशी कीं, या पांचहि वस्तु **सदैव** धारण केलेल्या असतात. पण हें वस्तुगत्याच अशक्य आहे. लढण्याशिवाय हातांचा इतर उपयोगहि असतो. म्हणून **लढण्याच्या वेळीं पर्यायानें** चार आयुधांचा उपयोग आणि इतर वेळीं केव्हां कमल आणि केव्हां इतर पदार्थ यांचें हस्तांनीं ग्रहण, असाच अर्थ केला पाहिजे.

—शं. दा. पेंडसे

## क्रमांक ४

आपल्या 'संशोधनपत्रिके'चा जानेवारी १९६० चा अंक पाठवून त्यांतील 'केकावलींतील एक शंकास्थळ' या टिपणाकडे लक्ष वेधलें याबद्दल मी आपला आभारी आहें. मीं श्लोककेकावलीची एक सटीप आवृत्ति काढली आहे. प्रस्तुत टिपण लिहिणारे 'एक वाचक' यांच्या नजरेस ती आली आहे कीं नाहीं, हें समजत नाहीं.

केकावलीच्या पहिल्या श्लोकांतील 'गदारिदरनंदकांबुजधरा' या विशेषणानें टीकाकारांना बुचकळ्यांत टाकलें आहे, यांत शंका नाहीं. श्रीविष्णूचें पुराणांतरीं वर्णिलेलें सर्वप्रसिद्ध ध्यान चतुर्भुज असून शंख, चक्र, गदा आणि पद्म या चार वस्तु चार हातांत धारण करणारें, असें आहे. केकावलीच्या प्रस्तुत श्लोकांत चार हातांचा कोठें उल्लेख नाहीं. प्रसिद्धत्वास्तव तो अध्याहृत घ्यायचा आहे.

खरी अडचण 'गदारि०' याबाबत आहे. गदा + अरि ( चक्र ) + दर ( शंख ) + नंदक ( या नांवाचा खड्ग ) + अंबुज ( कमल ), याप्रमाणें सर्व शब्दांचे प्रचलित अर्थ घेतल्यास एकंदर पांच वस्तु होतात. हात चार आणि वस्तु पांच असा हा पेंच उत्पन्न होतो. तो सोडविण्याकरितां दादोबा, गोडबोले, परांजपे यांनीं निरनिराळ्या कल्पना सुचविल्या आहेत व 'एक वाचक' ह्यांनींहि आपली कल्पना मांडली आहे.

विष्णूचें ध्यान अगदीं क्वचित् अष्टभुज वर्णिलें असून धारण केलेल्या वस्तूहि क्वचित् आठ सांगितल्या असल्या ( श्रीमद्भागवत, ४-७-२०, ३२ ), तरी बहुतकरून सर्वत्र शंख, चक्र, गदा, पद्म हीं चार धारण करणारी चतुर्भुज मूर्तीच वर्णिलेली आढळते.

( १ ) शंखचक्रगदापद्मैरभिव्यक्तचतुर्भुजम् ।—भागवत ४-८-४७.
( २ ) शंखचक्रगदापद्ममालामण्युत्तमर्द्धिमत् ।—भागवत ४-२४-४८.
( ३ ) शंखचक्रगदापद्मश्रिया जुष्टं चतुर्भुजम् ।—भागवत १०-३-३०.

अशीं आणखीहि कितीतरी स्थळें दाखवितां येतील. जिथें चारांपेक्षां अधिक वस्तु वर्णिल्या आहेत, तिथेंदेखील शंख, चक्र, गदा, पद्म या चार आहेतच ( भा. ४-७-२० ). तेव्हां विष्णूच्या हातांतील वस्तूंचें वर्णन कर्तव्य असतां शंख, चक्र, गदा, पद्म या चार त्यांत असल्याच पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं.

' एक वाचक ' यांनीं सुचविलेल्या अर्थांत या चार वस्तु येत नाहींत. हा त्याचा मोठा दोष मला वाटतो. अंबुज याचा अर्थ शंख असा होऊं शकेल; पण तसा अर्थ केल्यानें पद्म किंवा कमल या अर्थाचा शब्द नाहींसा होतो; आणि शंख, चक्र, गदा, पद्म या चारांची परिपूर्ति होत नाहीं. शिवाय, अरिदर म्हणजे शत्रूला विदारण करणारें असा अर्थ करून मग लक्षणेनें त्याचा चक्र असा अर्थ घ्यायचा हें फार ओढाताणीचें वाटतें. अरिदर याचा अर्थ शत्रूला विदारण करणारा असा घेतल्यास तें नंदक याचें विशेषण होऊं पाहील. तेव्हां त्या लक्षणेला जरूर असलेला मुख्यार्थ-बाध येथें नसल्यामुळें लक्षणा सिद्ध होणार नाहीं. ' अरि ( चक्रं ) च तत् दरं च ' असा विग्रह करण्याचा जो निराळा पर्याय त्यांनीं सुचविला आहे, तो अधिकच चमत्कारिक आहे. संस्कृत व्याकरणास अनुसरून असा समास होऊं शकेल असें वाटत नाहीं.

तेव्हां ' एक वाचक ' यांनीं सुचविलेला अर्थ योग्य आहे असें वाटत नाहीं.

एकंदर विचार करतां गदा, अरि ( चक्र ), दर ( शंख ), नंदक ( या नांवाची तलवार ), अंबुज ( कमल ) या पांच वस्तु धारण करणारा असा या पदाचा अर्थ, पूर्वींच्या मान्यवर टीकाकारांनीं केला आहे त्याप्रमाणें, करावा हें योग्य. सर्व वस्तु **हातांत** धारण केल्या आहेत, असा श्लोकांत कोठेंहि उल्लेख नाहीं. तेव्हां शंख, चक्र, गदा, पद्म या चार हातांमध्यें आणि नंदक हा खड्ग वेळ पडल्यास उपयोगांत आणण्याकरितां जवळ ठेवलेला ( कमरेला अडकवलेला ) अशी व्यवस्था मानावी.

—**श्री. ना. बनहट्टी**

## क्रमांक ५

' केकावलींतील एक शंकास्थळ ' या लेखांत उपस्थित केलेला मुद्दा व स्वतः लेखकानें दिलेला अर्थ यांत विशेष महत्त्वाचें असें कांहीं नाहीं. विष्णूच्या खड्गाचें नांव नंदक असेल, तरी पण या विवक्षित स्थळीं " नंदक " याचा अर्थ विष्णूचें खड्ग असा हट्ट कां ? येथें सरळ सुसंगत अर्थ घ्यावयाचा तर नंदक हें अंबुजाचें विशेषण—आनंद देणारें कमल. दादोबांनीं प्रथम हाच अर्थ मान्य केला.

मला या निरर्थक वादांत पडावेंसें वाटत नाहीं. तीनचार शब्दांचा एक लांबच लांब समास केला म्हणजे तो निरनिराळ्या तऱ्हांनीं सोडवितां येतो. तथापि

अंबुज म्हणजे शंख असा अर्थ कोशांत दिला असला तरी, त्याच्या या अर्थानें जेथें उपयोग केला आहे, अशीं फारशीं स्थळें मला आढळलीं नाहींत.

केकावलींत अनेक श्लोक असे आहेत कीं, त्यांचा पूर्णपणें समाधानकारक असा अर्थ कोणीहि टीकाकार लावूं शकला नाहीं. दादोबांनीं तसेंच परशुरामपंतांनीं हें मान्य केलें आहे. The secret died with the author असें म्हणावें, दुसरें काय ?

—रा. कृ. लागू

## ( वरील उत्तरांस अनुलक्षून ' एक वाचक ' यांचें निवेदन )

वरील उत्तरें मीं लक्ष्यपूर्वक वाचलीं. एक गोष्ट सकृद्दर्शनींच स्पष्ट आहे कीं, या पांच व्यासंगी विद्वानांपैकीं कोणासहि ' गदारिदरनंदकांबुजधरा ' या पदाचा मीं दिलेला अर्थ मान्य नाहीं. या सर्व उत्तरांचा साकल्यानें विचार केला असतां असें दिसतें कीं, माझा अर्थ न पटण्याचीं मुख्य कारणें दोन आहेत :—

( १ ) श्रीविष्णूच्या चतुर्भुज मूर्तीचें शंख-चक्र-गदा-पद्म अशा चार वस्तु चार हातांत धारण करणारें जें सर्वमान्य ध्यान आहे, तें सोडून देण्यास कोणीहि तयार नाहीं. त्या ध्यानाव्यतिरिक्त दुसरें ध्यान संभवेल हेंच कित्येकांस कबूल नाहीं. ( " विष्णूच्या हातांतील वस्तूंचें वर्णन कर्तव्य असतां शंख-चक्र-गदा-पद्म या चार त्यांत **असल्याच पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं.** "—लेखक, क्रमांक ४ ).

( २ ) ' अंबुज ' शब्दाचा ' शंख ' हा अर्थ मान्य करण्यास कोणीहि तयार नाहीं. कारण, तसें केल्यास पद्म अंतर्धान पावतें; व त्यांच्या मताप्रमाणें पद्माचा अंतर्भाव चार वस्तूंत झालाच पाहिजे. या अनुषंगानें लेखक क्र. १ अंबुज = शंख या अर्थाला लोकरूढीविरुद्ध म्हणतात; ले. क्र. २ व ३ त्या अर्थाचा उल्लेखहि करीत नाहींत; आणि ले. क्र. ४ व ५ यांच्या मतें शंख हा अर्थ शक्य असला तरी ग्राह्य नाहीं.

वरील दोन कारणांचें जर साधार निराकरण झालें तर नवीन अर्थ पटण्यास अडचण पडूं नये. तस्मात् तसें निराकरण करण्याचा प्रयत्न करतों.

( १ ) शंख-चक्र-गदा-पद्मधारी असें श्रीविष्णूचें ध्यान सर्वत्र प्रचलित आहे, हें मला पूर्णपणें मान्य आहे. माझें म्हणणें असें कीं, तें ध्यान **या स्थळीं कवीला अभिप्रेत नाहीं.** ' प्रशमितामितासन्मदा ' म्हणून आळविल्यावर साहजिकच कवीच्या मनश्चक्षूंपुढें दुष्टांचें निर्दलन करण्यास सिद्ध झालेली चतुर्भुज व चार **आयुधें** धारण करणारी विष्णुमूर्ति उभी राहते; आणि अशा मूर्तीचेंच ध्यान ' गदारि०धरा ' यांत अंतर्भूत आहे. प्रचलित शंख-चक्र-गदा-पद्म या ध्यानाबद्दल अनेक आधार पत्र-

लेखकांनीं दिले आहेत; परंतु त्या ध्यानाबद्दल वादच नाहीं. खुद्द मोरोपंतांनींच इतरत्र तशा मूर्तीचा स्पष्टपणें उल्लेख केलेला मीं पाहिला आहे. पण तें ध्यान ' गदारि० ' येथें नाहीं; चतुर्भुज मूर्तीनें चार हातांत **चार आयुधें** धारण करावींत. हेंच उचित आहे; आणि **पद्म हें आयुध नाहीं.**

चमत्कार असा कीं बहुतेक सर्व मुख्य टीकाकारांनीं पद्माची–कमळाची–गणना आयुधांत अगदीं स्पष्टपणें केली आहे, परंतु पद्म हें आयुध कसें याचा मात्र कोणींहि यत्किंचितहि खुलासा केलेला नाहीं ! " हीं पंचायुधें " ( दादोबा ); " आयुधें वर्णिलीं पांच " ( परशुरामतात्या ); " हीं पांच आयुधें " ( लेखक क्र. १ ). उलट तेथेंच परशुरामतात्या " **लीलार्थ** घ्यावयाचें कमलपुष्प " असें विवरण करतात ! परांजप्यांनीं " निजकमळें सदा **निजभक्त पूजी** " हें एकनाथांचें अवतरण देऊन पद्माचा उपयोग दाखविला आहे. अनायुध असें जें पद्म त्याला आयुध म्हणणें म्हणजे प्रकाश आणि अंधकार यांची गल्लत करणें आहे. हा प्रमाद ओळखून कांहीं चाणाक्ष संपादकांनीं, आयुध शब्द टाळून " वस्तु " शब्द वापरला आहे !—एवंच, पद्म हें आयुध होऊं शकत नाहीं; आणि चार आयुधें जर मान्य असतील तर पद्माला बाजूस ठेवल्याविना गत्यंतर नाहीं. याला खुद्द भागवताचाच आधार पहा. ( ले. क्र. १ यांनींच दिलेला श्लोक, भागवत–६-८-१२ ). त्या श्लोकांत शंख-चक्र-खड्ग-गदा हीं मुख्य चार व आणखी चार अशीं एकंदर आठ आयुधें ( अष्टबाहु मूर्तीचीं ) दिलीं आहेत. त्यांत पद्म नाहीं. भागवत–१०.५९.४. ५ येथें गदा, बाण, चक्र, खड्ग, शंख अशीं पांच आयुधें देऊन त्यांचा वेगवेगळा उपयोगहि वर्णिला आहे. तेथें पद्माचा अंतर्भाव नाहीं. मुख्य चार आयुधें विष्णुपुराण १-४-३१ (" प्रभो गदाशंखधरासिचक्रधृक् ") येथें वर्णिलीं आहेत. **त्यांत पद्माचा पत्ता नाहीं.** सारांश, भगवंताचें ध्यान निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या स्वरूपांत करणें युक्त आहे, आणि त्यांत पद्माचा समावेश झालाच पाहिजे असें म्हणणें व्यर्थ आहे. लक्ष्मीशीं नर्मविनोद करतांना श्रीविष्णु ज्या " वस्तु " हातांत धरतील, त्याच वस्तु नारदाचें गायन ऐकतांना, त्याच सुदाम्याच्या भेटीच्या प्रसंगीं, आणि त्याच असुरांचें उन्मूलन करतांना धरतील, असा आग्रह सामान्य भक्तांना पटण्यासारखा नाहीं. तस्मात्, दुष्टदंडनार्थ समरासाठीं सिद्ध झालेल्या विष्णुमूर्तीचें ध्यान करतांना पद्माची आवश्यकता नाहीं, चार हातांत चार आयुधें धारण करणारी मूर्तीच इष्ट आहे, आणि असें ध्यानच औचित्यपूर्ण आहे. आणि असें ध्यान कोणी करूं लागल्यास पद्म आपली जागा खुषीनें खड्गाला देईल, आणि भगवान् विष्णु भोळ्या भक्तजनांवर रुष्ट होणार नाहींत, तुष्टच होतील !— कोणी म्हणतील, " चार आयुधेंच कशाला पाहिजेत ? तीन आयुधें व पद्म अशा चार वस्तु नाहीं कां चालणार ? " चालतील; तीनच आयुधें काय, पण एकट्या चक्रावरहि भागेल; इतकेंच नव्हे तर, एकहि आयुध न घेतां

केवळ आपल्या योगमायेच्या सामर्थ्यानेंहि श्रीभगवान् शत्रुनाश करूं शकतील ! पण यांतील कोणताहि पक्ष **चार आयुधें** धारण करण्यांतलें औचित्य हिरावून घेऊं शकत नाहीं.

( २ ) चार हातांत चार आयुधें धारण करणाऱ्या दुष्टदलनोद्यत मूर्तींचें ध्यान मान्य झाल्यावर पद्म तर बाजूला झालेंच, पण 'गदारि०' यांतील 'अंबुज' शब्दाचें काय ? तर अंबुज म्हणजे 'शंख'. 'अंबुज' म्हणजे कमळ ( पद्म ) हा अर्थ सर्वपरिचित असल्यामुळें 'शंख' या अर्थाबद्दल थोडेंसें जास्त विवरण करणें इष्ट आहे. शंख हा अर्थ अपरिचित असल्यास तो दोष काव्य वाचणाऱ्याचा आहे, रचणाऱ्याचा नाहीं. संस्कृत भाषेंतील नैपुण्यामुळें, शेंकडों अपरिचित वाटणारे शब्द सहज लीलेनें पेलणें व पेरणें म्हणजे मोरोपंतांच्या तळहातचा मळ आहे. अंबुज शब्द शंख या अर्थीं महाभारत व रामायण या ग्रंथांतून आलेला आहे. पंत हे निष्णात पुराणिक व ग्रंथकार; भारत, रामायण हे ग्रंथ त्यांच्या नित्य वाचनांतले व त्यांचीं त्यांनीं अनेक पारायणें केलेलीं. तेव्हां शंखार्थीं अंबुज शब्द आधुनिक वाचकांना जरी अपरिचित वाटला तरी तो पंतांस पूर्णपणें परिचित होता. तो त्यांनीं 'गदारिदरनंदकांबुजधरा' यांत वापरला; इतकेंच नव्हे तर खुद्द 'केकावलीं'तच पुढें एका ठिकाणीं दोनहि अर्थीं ( म्हणजे शंख व कमळ या दोनहि अर्थीं ) मोठ्या कौशल्यानें वापरून सुंदर श्लेष साधला आहे. ६२ वी केका पहा :—

ध्रुव स्तवनिं आवडी धरि, म्हणोनि अत्यादरें
तुम्हीं करुनि दाविली, **शिवुनि गल्ल**, सत्या, **दरें**;
**तसें मज करा, करांबुज धरा शिरीं**. मावरा !
वराभयपरा ! पराक्रमपटो ! मना आंवरा ! " ६२

येथें अंबुज म्हणजे शंख हा अर्थ प्रथमतः परशुरामतात्यांनीं ओळखला असावा असें वाटतें, परंतु त्यांची शब्दयोजना तितकीशी स्पष्ट नसल्यामुळें निश्चित सांगतां येत नाहीं. परांजप्यांनीं मात्र **करांबुज** म्हणजे ( १ ) हातांतील शंख, व ( २ ) कमळाप्रमाणें शोभणारा हात, असा श्लेष स्पष्ट ओळखून त्याचें विवरण केलें आहे. तें वाचकांनीं मूळांतच वाचण्यासारखें आहे. येथें त्यांतील जरूरीपुरता उतारा देतों :—" माझ्या गालाला तुम्ही [ करांबुज = ] **हातांतील शंख** न लावतां माझ्या डोक्यावर तुम्हीं नुसतें आपलें [ करांबुज = ] **करकमल**—कमलाप्रमाणें शोभणारा हस्त—वरदहस्त—ठेवा म्हणजे तेवढ्यानेंच मी कृतार्थ होईन..." तस्मात्, मोरोपंतांस शंखार्थीं अंबुज शब्द सुपरिचित होता. केकावलीच्या जिज्ञासु वाचकांनीं त्यास बिचकून मागें सरण्याचें कांहीं कारण नाहीं. आणि केकावलीपुरतेंच पहावयाचें तर, 'मंतु' (१८), 'कीलाल' (१९), 'आतर' ( २२ ), 'सामर'

# केकावलींतील एक शंकास्थळ

[ 'पत्रिके'च्या गेल्या जानेवारी १९६० च्या अंकांत वरील मथळ्याखालीं एक टांचण प्रसिद्ध झालें आहे. त्यांत 'गदारिदरनंदकांबुजधरा' या समासाचा 'एक वाचक' यांनीं जो अर्थ लावला आहे, त्यासंबंधीं कांहीं विद्वानांचीं मतें आम्हीं मागविलीं होती. त्यांपैकीं आमच्या हातांत जीं पांच आलीं, तीं लेखकांच्या नांवांच्या वर्णानुक्रमानें खालीं प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. शिवाय, या मतांविषयीं 'एक वाचक' यांचें म्हणणेंही शेवटीं देण्यांत आलें आहे. संशोधनामध्यें अखेरचें असें कांहीं नसतें. जुने विचार, समजुती किंवा अर्थ यांचा फेरविचार करून व पडताळून इष्ट वाटेल तर स्वीकारावे लागतात. या दृष्टीनें 'एक वाचक' यांचा हा प्रयत्न आम्हांला अभिनंदनीय वाटतो. —**संपादक** ]

## क्रमांक १

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा ! ।
वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
**गदारिदरनंदकांबुजधरा** ! नमस्ते सदा ॥ १ ॥

प्रसिद्ध आर्यापति कविवर्य मोरोपंत यांनीं आपल्या पूर्ववयांत "आर्या-केकावली" या नांवाचें जसें एक स्फुट काव्य लिहिलें, तसेंच उत्तरवयांत "श्लोक-केकावली" या नांवाचें एक स्फुट काव्य पृथ्वीवृत्तांत लिहिलें. प्रस्तुत काव्य हें मोरोपंतांनीं आपल्या परिणतप्रज्ञ अवस्थेंत लिहिलें असल्यानें या काव्यामध्यें व्यंग्यार्थाची खूप रेलचेल झाली आहे. या व्यंग्यार्थाचा बोध होण्यास वाचकांसहि काव्यज्ञपंडितांच्या सहवासांत पुष्कळ शिक्षण घेऊन चांगलें बहुश्रुत व्हावें लागतें. आजवर या केकावलीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं मराठी भाषेंतील प्रख्यात पंडितांनीं पुष्कळ प्रयत्न केला आहे. दादोबा पांडुरंग, परशुरामतात्या गोडबोले आदि रसिक पंडितांच्या केकावलीवरील लहानमोठ्या टीका पाहिल्यानंतर या केकावलीसंबंधीं कांहीं शंकास्थळ राहील असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि, "केकावलींतील एक शंकास्थळ" या मथळ्याखालीं एका वाचकानें केकावलीच्या पहिल्याच श्लोकांतील एका चरणाच्या अर्थाविषयीं शंका उपस्थित करून स्वतःच त्या शंकेचें निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे. पण प्रस्तुत प्रयत्न अनाठायीं असल्यानें "तुषकंडनवत्" निष्फल आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रस्तुत श्लोक हा मंगलाचरणाचा असल्यानें पंतांनीं आपल्या इष्टदेवतेस येथें नमस्कार केला आहे. या इष्टदेवतेचा साक्षान्नामोल्लेख जरी या श्लोकामध्यें केलेला नाहीं, तथापि या श्लोकांतील कांहीं विशेषणांच्या अर्थाकडे लक्ष दिलें असतां

ती देवता विष्णुस्वरूपी असावी असें दिसून येतें. विष्णु या देवतेचें वर्णन क्वचित् द्विभुज जसें आहे, तसें चतुर्भुज किंवा अष्टभुज असेंहि आहे. प्रस्तुत शंकाविषयक श्लोकामध्यें गदा, अरि = चक्र, दर = शंख, नंदक = खड्ग आणि अंबुज म्हणजे कमल यांना धारण करणाऱ्या अशा तुला नमस्कार असो, असें वर्णन केलें आहे. या वर्णनामध्यें धारण केलीं जाणारीं आयुधें पांच असल्यानें चतुर्भुजात्मक विष्णु-मूर्तीनें **हीं पांच आयुधें** कशीं धारण केलीं असावींत, असा शंकाकार वाचकाला येथें प्रश्न पडला आहे. पण असा प्रश्न शंकाकारांना कां उत्पन्न व्हावा, हें आम्हांस समजत नाहीं. कारण, या श्लोकाच्या चतुर्थचरणामध्यें गदादि आयुधें धारण करणारा असें मोघमच वर्णन आहे. तीं आयुधें **हातांनीं** धारण करणारा असें वर्णन येथें नाहीं. चार हातांनीं चार आयुधें धारण केलीं आणि नंदक नांवाचा खड्ग कमरेला लटकावला. अशा रीतीनें गदादि पांचहि आयुधें धारण करणारा हें भगवान विष्णूचें वर्णन सुसंगत होतें. या वर्णनामध्यें कोणत्याहि प्रकारची शंका घेण्यास अवकाशच राहत नाहीं. बहुतेक सर्वत्र चतुर्भुज विष्णूच्याच मूर्ति फार दिसत असल्यानें चार भुजांनीं पांच आयुधें कशीं धारण करावींत असा गैरसमज शंकाकार वाचकाचा झाला असावा असें वाटतें. कदाचित् शंकाकार येथें असें म्हणतील कीं, शंख, चक्र, गदा, पद्म अशीं चार आयुधें धारण करणाऱ्या विष्णूचें वर्णन सर्वत्र उपलब्ध होतें व विष्णूनें खड्ग धारण केल्याचें फारसें कोठें दिसून येत नाहीं. म्हणून या ठिकाणीं शंका उत्पन्न झाली हें बरोबरच आहे. तर याविषयीं शंकाकारांना येथें आम्ही असें सुचवितों कीं, चतुर्भुज विष्णूचीच मूर्ति जरी सर्वत्र प्रचारांत आहे, तरी त्यावरून अधिक भुजांची विष्णूची मूर्ति अन्यत्र कोठें नाहींच, असें समजण्याचें कारण नाहीं. श्रीमद्भागवताच्या सहाव्या स्कंधांतील आठव्या अध्यायांतील नारायणवर्मांतील

"हरिर्विदध्यान्मम सर्वरक्षां न्यस्तांघ्रिपद्मः पतगेंद्रपृष्ठे ।
**दरारिचर्मासिगदेषुचापपाशान्** दधानोऽष्टगुणोऽष्टबाहुः ॥ १२ ॥"

या श्लोकामध्यें खड्ग धारण करणाऱ्या अष्टभुजात्मक विष्णूचें वर्णन केल्याचें स्पष्टपणें दिसून येत आहे.

धारण केलीं जाणारीं आयुध्यें हातांमध्येंच धारण केलीं पाहिजेत असा आग्रह धरणें हा दुराग्रह होईल. वर उद्धृत केलेल्या भागवतांतील श्लोकामध्यें अष्टबाहु विष्णूचें वर्णन असल्यानें खड्ग हातामध्यें धारण केला आहे असें म्हणणें जरी संभवत असलें तरी तें सर्वत्र संभवेलच असें नाहीं. खड्ग कमरेला लटकावलेला आहे, बाण भात्यांत पाठीवर आहेत आणि धनुष्य खांद्यावर घेतलें आहे, असेंहि विष्णूचें ध्यान करण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत घेण्याचें कारण नाहीं.

तात्पर्य, विष्णूला चारच हात आहेत, असा समज करून घेऊन पांच आयुधांची व्यवस्था लागत नाहीं म्हणून अरिदर असा एक सामासिक शब्द

कल्पून अंबुज म्हणजे शंख असा लोकरूढीला सोडून चार आयुधांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करणें आम्हांस प्रशस्त वाटत नाहीं.

—बाळाचार्य खुपेरकर

## क्रमांक २

पहिल्या केकावलीवर 'वाचकां'नीं जें भाष्य केलें आहे, त्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटत नाहीं. त्यापरीस दादोबा पांडुरंग यांनीं केलेलाच अर्थ मला ग्राह्य वाटतो.

पुष्कळ वेळां स्वतः कवीलाच आपला आशय काय आहे, हें समजत नाहीं. तेव्हां कवीच्या मनांत काय होतें हें पाहण्याचा प्रयत्न यशस्वी होईल, असा नियम नाहीं. आणि या फंदांत कोणीं पडूंहि नये. सयुक्तिक अर्थ काय होतो एवढेंच आपलें काम.

विष्णु हा चतुर्भुज आहे व तो शंखचक्रगदापद्मधारी आहे हें मान्य करून कवितेचा अर्थ करणें युक्त होईल. अरि म्हणजे चक्र व दर म्हणजे शंख; तेव्हां गदारिदर हे 'शंखचक्रगदा'वाचक शब्द आहेत. विष्णूच्या चौथ्या हातांत कमल आहे म्हणून अंबुज शब्दाचा अर्थ कमल करणें भाग आहे. हें कमल आयुध म्हणून मानलें जात असेलहि. परंतु त्याची शंका राहील. यास्तव नंदक म्हणजे आनंदविणारें असा अर्थ करणेंच बरोबर आहे. अगर नंदक ( खड्ग ) म्हणजेच अंबुज असें तरी कां म्हणूं नये ? विष्णूच्या खड्गाला नंदक हें नांव आहे. परंतु हें खड्ग त्याच्या हातांत दाखविलेलें नसतें. खड्गाप्रमाणें विष्णूचें धनुष्य असल्याचेंहि सांगतात. या धनुष्याला शार्ङ्ग हें नांव असून त्यावरून विष्णूला शार्ङ्गधर हें नांव पडलें आहे.

तात्पर्य, तुमच्या 'वाचका'नें केलेला अर्थ पसंत करण्यास कोणतेंहि विशेष कारण मला दिसत नाहीं.

— ना. गो. चापेकर

## क्रमांक ३

आपलें कालचें पत्र व सोबतचा लेख दोन्ही पोचलीं. लेख मीं वाचला. त्यांतील 'गदारिदरनंदकांबुजधरा' याचा नवीन अर्थ मला पटला नाहीं.

या सामासिक शब्दाच्या अर्थाविषयीं आतांपर्यंत अनेकांनीं चर्चा केली आहे व सुचविलेल्या अनेक अर्थांमध्यें कांहीं ना कांहीं व्यंग असल्यामुळें येथें 'विद्याविरुद्धत्व' दोष मानावा, असेंहि कित्येकांनीं सुचविलें आहे.

वस्तुतः मोरोपंतांनीं 'गदा, अरि ( चक्र ), दर ( शंख ), नंदक ( या नांवाचें खड्ग ), अंबुज ( कमल ) धारण करणाऱ्या' एवढेंच येथें म्हटलें आहे. त्या हातांनीं

धारण केल्या आहेत असें म्हटलें असतें, तर चार हातांत पांच वस्तु कशा, ही शंका असती. खड्ग कमरेला लटकावलेलें असतें हें प्रसिद्ध आहे. तसेंच हीं आयुधें आहेत असेंहि म्हटलेलें नाहीं, तेव्हां अंबुज हें आयुध नाहीं ही शंकाहि येण्याचें कारण नाहीं, आणि तिसरी **गृहीत** गोष्ट अशी कीं, या पांचहि वस्तु **सदैव** धारण केलेल्या असतात. पण हें वस्तुगत्याच अशक्य आहे. लढण्याशिवाय हातांचा इतर उपयोगहि असतो. म्हणून **लढण्याच्या वेळीं पर्यायानें** चार आयुधांचा उपयोग आणि इतर वेळीं केव्हां कमल आणि केव्हां इतर पदार्थ यांचें हस्तांनीं ग्रहण, असाच अर्थ केला पाहिजे.

—शं. दा. पेंडसे

## क्रमांक ४

आपल्या 'संशोधनपत्रिके' चा जानेवारी १९६० चा अंक पाठवून त्यांतील 'केकावलींतील एक शंकास्थळ' या टिपणाकडे लक्ष वेधलें याबद्दल मी आपला आभारी आहें. मीं श्लोककेकावलीची एक सटीप आवृत्ति काढली आहे. प्रस्तुत टिपण लिहिणारे 'एक वाचक' यांच्या नजरेस ती आली आहे कीं नाहीं, हें समजत नाहीं.

केकावलीच्या पहिल्या श्लोकांतील 'गदारिदरनंदकांबुजधरा' या विशेषणानें टीकाकारांना बुचकळ्यांत टाकलें आहे, यांत शंका नाहीं. श्रीविष्णूचें पुराणांतरीं वर्णिलेलें सर्वप्रसिद्ध ध्यान चतुर्भुज असून शंख, चक्र, गदा आणि पद्म या चार वस्तु चार हातांत धारण करणारें, असें आहे. केकावलीच्या प्रस्तुत श्लोकांत चार हातांचा कोठें उल्लेख नाहीं. प्रसिद्धत्वास्तव तो अध्याहृत घ्यायचा आहे.

खरी अडचण 'गदारि०' याबाबत आहे. गदा + अरि ( चक्र ) + दर ( शंख ) + नंदक ( या नांवाचा खड्ग ) + अंबुज ( कमल ), याप्रमाणें सर्व शब्दांचे प्रचलित अर्थ घेतल्यास एकंदर पांच वस्तु होतात. हात चार आणि वस्तु पांच असा हा पेंच उत्पन्न होतो. तो सोडविण्याकरितां दादोबा, गोडबोले, परांजपे यांनीं निरनिराळ्या कल्पना सुचविल्या आहेत व 'एक वाचक' ह्यांनींहि आपली कल्पना मांडली आहे.

विष्णूचें ध्यान अगदीं क्वचित् अष्टभुज वर्णिलें असून धारण केलेल्या वस्तूहि क्वचित् आठ सांगितल्या असल्या ( श्रीमद्भागवत, ४-७-२०, ३२ ), तरी बहुतकरून सर्वत्र शंख, चक्र, गदा, पद्म हीं चार धारण करणारी चतुर्भुज मूर्तीच वर्णिलेली आढळते.

( १ ) शंखचक्रगदापद्मैरभिव्यक्तचतुर्भुजम् ।—भागवत ४-८-४७.
( २ ) शंखचक्रगदापद्ममालामण्युत्तमर्द्धिमत् ।—भागवत ४-२४-४८.
( ३ ) शंखचक्रगदापद्मश्रिया जुष्टं चतुर्भुजम् ।—भागवत १०-३-३०.

अशीं आणखीहि कितीतरी स्थळें दाखवितां येतील. जिथें चारांपेक्षां अधिक वस्तु वर्णिल्या आहेत, तिथेंदेखील शंख, चक्र, गदा, पद्म या चार आहेतच (भा. ४-७-२०). तेव्हां विष्णूच्या हातांतील वस्तूंचें वर्णन कर्तव्य असतां शंख, चक्र, गदा, पद्म या चार त्यांत असल्याच पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं.

'एक वाचक' यांनीं सुचविलेल्या अर्थांत या चार वस्तु येत नाहींत. हा त्याचा मोठा दोष मला वाटतो. अंबुज याचा अर्थ शंख असा होऊं शकेल; पण तसा अर्थ केल्यानें पद्म किंवा कमल या अर्थाचा शब्द नाहींसा होतो; आणि शंख, चक्र, गदा, पद्म या चारांची परिपूर्ति होत नाहीं. शिवाय, अरिदर म्हणजे शत्रूला विदारण करणारें असा अर्थ करून मग लक्षणेनें त्याचा चक्र असा अर्थ घ्यायचा हें फार ओढाताणीचें वाटतें. अरिदर याचा अर्थ शत्रूला विदारण करणारा असा घेतल्यास तें नंदक याचें विशेषण होऊं पाहील. तेव्हां त्या लक्षणेला जरूर असलेला मुख्यार्थ-बाध येथें नसल्यामुळें लक्षणा सिद्ध होणार नाहीं. 'अरि (चक्रं) च तत् दरं च' असा विग्रह करण्याचा जो निराळा पर्याय त्यांनीं सुचविला आहे, तो अधिकच चमत्कारिक आहे. संस्कृत व्याकरणास अनुसरून असा समास होऊं शकेल असें वाटत नाहीं.

तेव्हां 'एक वाचक' यांनीं सुचविलेला अर्थ योग्य आहे असें वाटत नाहीं.

एकंदर विचार करतां गदा, अरि (चक्र), दर (शंख), नंदक (या नांवाची तलवार), अंबुज (कमल) या पांच वस्तु धारण करणारा असा या पदाचा अर्थ, पूर्वींच्या मान्यवर टीकाकारांनीं केला आहे त्याप्रमाणें, करावा हें योग्य. सर्व वस्तु **हातांत** धारण केल्या आहेत, असा श्लोकांत कोठेंहि उल्लेख नाहीं. तेव्हां शंख, चक्र, गदा, पद्म या चार हातांमध्यें आणि नंदक हा खड्ग वेळ पडल्यास उपयोगांत आणण्याकरितां जवळ ठेवलेला (कमरेला अडकवलेला) अशी व्यवस्था मानावी.

—श्री. ना. बनहट्टी

## क्रमांक ५

'केकावलींतील एक शंकास्थळ' या लेखांत उपस्थित केलेला मुद्दा व स्वतः लेखकानें दिलेला अर्थ यांत विशेष महत्त्वाचें असें कांहीं नाहीं. विष्णूच्या खड्गाचें नांव नंदक असेल, तरी पण या विवक्षित स्थळीं "नंदक" याचा अर्थ विष्णूचें खड्ग असा हट्ट कां ? येथें सरळ सुसंगत अर्थ घ्यावयाचा तर नंदक हें अंबुजाचें विशेषण—आनंद देणारें कमल. दादोबांनीं प्रथम हाच अर्थ मान्य केला.

मला या निरर्थक वादांत पडावेंसें वाटत नाहीं. तीनचार शब्दांचा एक लांबच लांब समास केला म्हणजे तो निरनिराळ्या तऱ्हांनीं सोडवितां येतो. तथापि

अंबुज म्हणजे शंख असा अर्थ कोशांत दिला असला तरी, त्याचा या अर्थानें जेथें उपयोग केला आहे, अशीं फारशीं स्थळें मला आढळलीं नाहींत.

केकावलींत अनेक श्लोक असे आहेत कीं, त्यांचा पूर्णपणें समाधानकारक असा अर्थ कोणीहि टीकाकार लावूं शकला नाहीं. दादोबांनीं तसेंच परशुराम-पंतांनीं हें मान्य केलें आहे. The secret died with the author असें म्हणावें, दुसरें काय ?

—रा. कृ. लागू

## ( वरील उत्तरांस अनुलक्षून ' एक वाचक ' यांचें निवेदन )

वरील उत्तरें मीं लक्ष्यपूर्वक वाचलीं. एक गोष्ट सकृद्दर्शनींच स्पष्ट आहे कीं, या पांच व्यासंगी विद्वानांपैकीं कोणासहि ' गदारिदरनंदकांबुजधरा ' या पदाचा मीं दिलेला अर्थ मान्य नाहीं. या सर्व उत्तरांचा साकल्यानें विचार केला असतां असें दिसतें कीं, माझा अर्थ न पटण्याचीं मुख्य कारणें दोन आहेत :—

( १ ) श्रीविष्णूच्या चतुर्भुज मूर्तीचें शंख-चक्र-गदा-पद्म अशा चार वस्तु चार हातांत धारण करणारें जें सर्वमान्य ध्यान आहे, तें सोडून देण्यास कोणीहि तयार नाहीं. त्या ध्यानाव्यतिरिक्त दुसरें ध्यान संभवेल हेंच कित्येकांस कबूल नाहीं. ( " विष्णूच्या हातांतील वस्तूंचें वर्णन कर्तव्य असतां शंख-चक्र-गदा-पद्म या चार त्यांत **असल्याच पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं.** "—लेखक, क्रमांक ४ ).

( २ ) ' अंबुज ' शब्दाचा ' शंख ' हा अर्थ मान्य करण्यास कोणीहि तयार नाहीं. कारण, तसें केल्यास पद्म अंतर्धान पावतें; व त्यांच्या मताप्रमाणें पद्माचा अंतर्भाव चार वस्तूंत झालाच पाहिजे. या अनुषंगानें लेखक क्र. १ अंबुज = शंख या अर्थाला लोकरूढीविरुद्ध म्हणतात; ले. क्र. २ व ३ त्या अर्थाचा उल्लेखहि करीत नाहींत; आणि ले. क्र. ४ व ५ यांच्या मतें शंख हा अर्थ शक्य असला तरी ग्राह्य नाहीं.

वरील दोन कारणांचें जर साधार निराकरण झालें तर नवीन अर्थ पटण्यास अडचण पडूं नये. तस्मात् तसें निराकरण करण्याचा प्रयत्न करतों.

( १ ) शंख-चक्र-गदा-पद्मधारी असें श्रीविष्णूचें ध्यान सर्वत्र प्रचलित आहे, हें मला पूर्णपणें मान्य आहे. माझें म्हणणें असें कीं, तें ध्यान **या स्थळीं कवीला अभिप्रेत नाहीं.** ' प्रशमितामितासन्मदा ' म्हणून आळविल्यावर साहजिकच कवीच्या मनश्चक्षूंपुढें दुष्टांचें निर्दलन करण्यास सिद्ध झालेली चतुर्भुज व चार **आयुधें** धारण करणारी विष्णुमूर्ति उभी राहते; आणि अशा मूर्तीचेंच ध्यान ' गदारि०धरा ' यांत अंतर्भूत आहे. प्रचलित शंख-चक्र-गदा-पद्म या ध्यानाबद्दल अनेक आधार पत्र-

लेखकांनीं दिले आहेत; परंतु त्या ध्यानाबद्दल वादच नाहीं. खुद्द मोरोपंतांनींच इतरत्र तशा मूर्तीचा स्पष्टपणें उल्लेख केलेला मीं पाहिला आहे. पण तें ध्यान ' गदारि० ' येथें नाहीं; चतुर्भुज मूर्तीनें चार हातांत **चार आयुधें** धारण करावींत हेंच उचित आहे; आणि **पद्म हें आयुध नाहीं.**

चमत्कार असा कीं बहुतेक सर्व मुख्य टीकाकारांनीं पद्माची–कमळाची–गणना आयुधांत अगदीं स्पष्टपणें केली आहे, परंतु पद्म हें आयुध कसें याचा मात्र कोणींहि यत्किंचितहि खुलासा केलेला नाहीं ! " हीं पंचायुधें " (दादोबा); " आयुधें वर्णिलीं पांच " (परशुरामतात्या); " हीं पांच आयुधें " (लेखक क्र. १). उलट तेथेंच परशुरामतात्या " **लीलार्थ** घ्यावयाचें कमलपुष्प " असें विवरण करतात! परांजप्यांनीं " निजकमळें सदा **निजभक्त पूजी** " हें एकनाथांचें अवतरण देऊन पद्माचा उपयोग दाखविला आहे. अनायुध असें जें पद्म त्याला आयुध म्हणणें म्हणजे प्रकाश आणि अंधकार यांची गल्लत करणें आहे. हा प्रमाद ओळखून कांहीं चाणाक्ष संपादकांनीं, आयुध शब्द टाळून " वस्तु " शब्द वापरला आहे !—एवंच, पद्म हें आयुध होऊं शकत नाहीं; आणि चार आयुधें जर मान्य असतील तर पद्माला बाजूस ठेवल्याविना गत्यंतर नाहीं. याला खुद्द भागवताचाच आधार पहा. (ले. क्र. १ यांनींच दिलेला श्लोक, भागवत–६-८-१२). त्या श्लोकांत शंख-चक्र-खड्ग-गदा हीं मुख्य चार व आणखी चार अशीं एकंदर आठ आयुधें (अष्टबाहु मूर्तीचीं) दिलीं आहेत. त्यांत पद्म नाहीं. भागवत–१०.५९.४. ५ येथें गदा, बाण, चक्र, खड्ग, शंख अशीं पांच आयुधें देऊन त्यांचा वेगवेगळा उपयोगहि वर्णिला आहे. तेथें पद्माचा अंतर्भाव नाहीं. मुख्य चार आयुधें विष्णुपुराण १-४-३१ (" प्रभो गदाशंखधरासिचक्रधृक् ") येथें वर्णिलीं आहेत. **त्यांत पद्माचा पत्ता नाहीं.** सारांश, भगवंताचें ध्यान निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या स्वरूपांत करणें युक्त आहे, आणि त्यांत पद्माचा समावेश झालाच पाहिजे असें म्हणणें व्यर्थ आहे. लक्ष्मीशीं नर्मविनोद करतांना श्रीविष्णु ज्या " वस्तु " हातांत धरतील, त्याच वस्तु नारदाचें गायन ऐकतांना, त्याच सुदाम्याच्या भेटीच्या प्रसंगीं, आणि त्याच असुरांचें उन्मूलन करतांना धरतील, असा आग्रह सामान्य भक्तांना पटण्यासारखा नाहीं. तस्मात्, दुष्टदंडनार्थ समरासाठीं सिद्ध झालेल्या विष्णुमूर्तीचें ध्यान करतांना पद्माची आवश्यकता नाहीं, चार हातांत चार आयुधें धारण करणारी मूर्तीच इष्ट आहे, आणि असें ध्यानच औचित्यपूर्ण आहे. आणि असें ध्यान कोणी करूं लागल्यास पद्म आपली जागा खुषीनें खड्गाला देईल, आणि भगवान् विष्णु भोळ्या भक्तजनांवर रुष्ट होणार नाहींत, तुष्टच होतील !— कोणी म्हणतील, " चार आयुधेंच कशाला पाहिजेत ? तीन आयुधें व पद्म अशा चार वस्तु नाहीं कां चालणार ? " चालतील; तीनच आयुधें काय, पण एकट्या चक्रावरहि भागेल; इतकेंच नव्हे तर, एकहि आयुध न घेतां

केवळ आपल्या योगमायेच्या सामर्थ्यानेंहि श्रीभगवान् शत्रुनाश करूं शकतील ! पण यांतील कोणताहि पक्ष **चार आयुधें** धारण करण्यांतलें औचित्य हिरावून घेऊं शकत नाहीं.

( २ ) चार हातांत चार आयुधें धारण करणाऱ्या दुष्टदलनोद्यत मूर्तीचें ध्यान मान्य झाल्यावर पद्म तर बाजूला झालेंच, पण ' गदारि० ' यांतील ' अंबुज ' शब्दाचें काय ? तर अंबुज म्हणजे ' शंख '. ' अंबुज ' म्हणजे कमळ ( पद्म ) हा अर्थ सर्वपरिचित असल्यामुळें ' शंख ' या अर्थाबद्दल थोडेंसें जास्त विवरण करणें इष्ट आहे. शंख हा अर्थ अपरिचित असल्यास तो दोष काव्य वाचणाऱ्याचा आहे, रचणाऱ्याचा नाहीं. संस्कृत भाषेंतील नैपुण्यामुळें, शेंकडों अपरिचित वाटणारे शब्द सहज लीलेनें पेलणें व पेरणें म्हणजे मोरोपंतांच्या तळहातचा मळ आहे. अंबुज शब्द शंख या अर्थीं महाभारत व रामायण या ग्रंथांतून आलेला आहे. पंत हे निष्णात पुराणिक व ग्रंथकार; भारत, रामायण हे ग्रंथ त्यांच्या नित्य वाचनांतले व त्यांचीं त्यांनीं अनेक पारायणें केलेलीं. तेव्हां शंखार्थीं अंबुज शब्द आधुनिक वाचकांना जरी अपरिचित वाटला तरी तो पंतांस पूर्णपणें परिचित होता. तो त्यांनीं ' गदारिदरनंदकांबुजधरा ' यांत वापरला; इतकेंच नव्हे तर खुद्द ' केकावलीं 'तच पुढें एका ठिकाणीं दोनहि अर्थीं ( म्हणजे शंख व कमळ या दोनहि अर्थीं ) मोठ्या कौशल्यानें वापरून सुंदर श्लेष साधला आहे. ६२ वी केका पहा :—

> ध्रुव स्तवनिं आवडी धरि, म्हणोनि अत्यादरें
> तुम्हीं करुनि दाविली, **शिवुनि गल्ल, सत्या, दरें;**
> **तसें मज करा, करांबुज धरा शिरीं.** मावरा !
> वराभयपरा ! पराक्रमपटो ! मना आंवरा ! " ६२

येथें अंबुज म्हणजे शंख हा अर्थ प्रथमतः परशुरामतात्यांनीं ओळखला असावा असें वाटतें, परंतु त्यांची शब्दयोजना तितकीशी स्पष्ट नसल्यामुळें निश्चित सांगतां येत नाहीं. परांजप्यांनीं मात्र **करांबुज** म्हणजे ( १ ) हातांतील शंख, व ( २ ) कमळाप्रमाणें शोभणारा हात, असा श्लेष स्पष्ट ओळखून त्याचें विवरण केलें आहे. तें वाचकांनीं मूळांतच वाचण्यासारखें आहे. येथें त्यांतील जरूरीपुरता उतारा देतों :—" माझ्या गालाला तुम्ही [ करांबुज = ] **हातांतील शंख** न लावतां माझ्या डोक्यावर तुम्हीं नुसतें आपलें [ करांबुज = ] **करकमल**—कमलाप्रमाणें शोभणारा हस्त—वरदहस्त—ठेवा म्हणजे तेवढ्यानेंच मी कृतार्थ होईन..." तस्मात् , मोरोपंतांस शंखार्थीं अंबुज शब्द सुपरिचित होता. केकावलीच्या जिज्ञासु वाचकांनीं त्यास बिचकून मागें सरण्याचें कांहीं कारण नाहीं. आणि केकावलीपुरतेंच पहावयाचें तर, ' मंतु ' (१८), ' कीलाल ' (१९), ' आतर ' ( २२ ), ' सामर '

( ६३ ), 'कायाधव' ( ७४ ), अशांसारख्या अपरिचित शब्दांशीं परिचय झालेल्या वाचकांनीं अंबुजाचें स्वागत करण्यास कांहींच अडचण नाहीं. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, परांजप्यांची आवृत्ति वापरणाऱ्या नंतरच्या संपादकांनीं, परांजप्यांनीं स्पष्ट शब्दांत व अनेक वाक्यांत विशद करून सांगितलेल्या या श्लेषात्मक अर्थाचा ओझरतासुद्धां उल्लेख केलेला नाहीं ! हें कसें घडलें कोण जाणे. असो. आतां वाचकांचा अंबुजाशीं पुरा परिचय झाला असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हां, 'गदारि०' येथें चतुरायुधात्मक मूर्तीचें ध्यान कसें सुसंगत आहे, आणि पांच "वस्तूं" मुळें निर्माण होणाऱ्या जंजाळांतून कशी सरळ सुटका होते, याचें, पूर्वग्रह दूर सारून पुनर्निरीक्षण करावें, इतकीच श्रीरामनंदनमयूरातर्फें विचारशील वाचकांस विनंति आहे.

वर आरंभीं छापलेल्या पत्रपंचकांत अनेक विवाद्य विधानें आलेलीं आहेत. त्यांचा थोडक्यांत परामर्श घेणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, लेखक क्र. १ म्हणतात कीं, सर्व संभाव्य शंकांचें निरसन अगोदरच झालेलें आहे तेव्हां आतां नवीन शंकाच मुळीं "अनाठायीं" आहे! ले. क्र. २ म्हणतात—"**पुष्कळ वेळां स्वतः कवीलाच आपला आशय काय आहे, हें समजत नाहीं.**" तेव्हां तो वाचकांस कसा समजणार? ले. क्र. ३ यांनीं "पांचहि वस्तु **सदैव** धारण केलेल्या असतात," असें शंकाकारांनीं न केलेलें विधान शंकाकारांच्या माथीं मारून त्याचें उत्तर देण्याचा उपक्रम केला आहे! ले. क्र. ४ म्हणतात—"विष्णूच्या हातांतील वस्तूंचें वर्णन कर्तव्य असतां शंख–चक्र–गदा–पद्म या चार त्यांत **असल्याच पाहिजेत.**" म्हणजे इतर कोणतीहि वस्तु हातांत घेतलेल्या विष्णूचें वर्णन त्यांच्या मतें निषिद्ध आहे. वनमाला किंवा वेणुवाद्य सुद्धां चालणार नाहीं! ले. क्र. ५ यांना तर हा वादच मुळीं "निरर्थक" वाटतो! सुदैवानें इतरांस तो तसा वाटत नाहीं. केकावली राहूं द्या, पण केकावलीपेक्षां अनेक पटींनीं दुर्बोध असे जे ऋग्वेदादि ग्रंथ त्यांचा अर्थ लावण्यासाठीं भारतांतीलच नाहीं, तर युरोप-अमेरिकेंतीलहि बहुसंख्य विद्वान् अहमहमिकेनें वर्षानुवर्षें प्रयत्न करीत राहिले आहेत. ले. क्र. ५ यांचें मत मान्य झाल्यास ही सर्व मंडळी कालाचा अपव्यय करीत आहेत असें होईल!

# थोडें यदुमाणिकाविषयीं

' मराठी संशोधन-पत्रिके 'च्या सातव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत ' एक अज्ञात मराठी गाणपत्य ग्रंथ ' या शीर्षकाखालीं प्रा. प्रियोळकर यांनीं यदुमाणिक-कृत ' संजीविनी ' टीकेचा परिचय करून दिला आहे आणि त्या अंकापासून क्रमशः ' संजीविनी ' टीकेची संहिता देण्यास प्रारंभ केला आहे. आपल्या प्रास्ताविक लेखांत प्रा. प्रियोळकरांनीं गाणपत्य परंपरेंतील मराठी वाङ्मयाचा आढावा घेऊन यदुमाणिक आणि त्याचा प्रस्तुत ग्रंथ यांविषयींची कांहीं माहिती दिली आहे. त्या माहितीच्या अनुषंगानें माझें म्हणणें पुढें मांडीत आहें.

( १ ) यदुमाणिक आपल्या नांवापुढें माणिक, माणिकेश, माणिकेश्वर यांपैकीं एखादें पद जोडतो. या पदाचा विचार करतांना " तो माणिकेशाचा शिष्य किंवा पुत्र असावा....कदाचित् माणिकेश्वर ही त्याची कुलदेवता किंवा ग्रामदेवता असावी, " असें अनुमान प्रा. प्रियोळकरांनीं काढलें आहे. परंतु चांदोरकरांनीं दिलेली त्याची वंशावळ व गुरुपरंपरा यांत माणिकेशाला स्थान नसल्यामुळें माणिकेश हा यदुमाणिकाचा पिता वा गुरु असणें शक्य नाहीं. प्रा. प्रियोळकरांच्या दुसऱ्या अनुमानानुसार ती त्याची कुलदेवता असणेंच जास्त शक्य आहे. गेल्या दोन अंकांत ' संजीविनी ' टीकेच्या संहितेचा जेवढा भाग छापला आहे, त्यांतील प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं " ॥ श्रीमहागणपतिमहालयामाणिकेश्वरचरणारविंदेभ्यो नमः ॥ " असें नमन आहे. या नमनांतील तीन वंदनीय देवतांपैकीं ' श्रीमहागणपति ' हा तर त्याच्या ग्रंथाचा वर्ण्य विषयच आहे. **' महालया ' म्हणजे मोहिनी.** यदुमाणिक हा मूळचा नेवाशाचा. **नेवाशाची मोहिनी ही त्याची कुलदेवता होती,** असें त्यानेंच स्पष्टपणें नोंदविलें आहे :

" देखोनि त्वत्कृपाकटाक्षासी ।  
हर्ष जाला कुलदेवतेसी ।  
ते मोहिनीनें आश्वासनासी ।  
दिल्हें त्वद्गुणासी बोलावया ॥ " १·२४.

आतां उरला माणिकेश्वर. **हा माणिकेश्वर म्हणजे वेरूळच्या कैलास लेण्यांतला शिव.** यदुमाणिकानें आपल्या ग्रंथांत वर्णिलेलें सिंदूरवाडें, त्यानें ज्या ठिकाणीं तप केलें तें गणेशस्थान, त्याच्या ग्रंथाचें लेखनस्थळ हीं सर्व स्थानें वेरूळच्या परिसरांतच आहेत. वेरूळच्या माणिकेश्वराचा स्पष्ट उल्लेख ' लीळाचरित्र ' आणि ' स्थानपोथी ' या महानुभावीय ग्रंथांत आलेला आहे. चक्रधर त्या ठिकाणीं राहिले-वावरले होते. ( ' लीळाचरित्र ' पूर्वार्ध-खंड १, पृ० २७ आणि ' स्थानपोथी ', पृ. २७. ) एका स्थानिक दंतकथेनुसार, वेरूळच्या घृष्णे-

श्वराला व माणिकेश्वराला हीं नांवें राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याच्या दोन राण्यांच्या नांवांवरून पडलीं आहेत. घृष्णावती व माणिकावती अशीं त्या दोन राण्यांचीं नांवें होतीं. ज्या व्यक्ति शिव-मंदिरें उभारीत, त्या व्यक्तींच्या नांवानें तीं शिवस्थानें प्रसिद्ध होत, याविषयींचे पुरावे इतिहासांत अनेक मिळतात. 'वैजाए' राणीनें करविलेल्या 'वैजनाथ'-मंदिराचा उल्लेख 'लीळाचरित्रां'त (पूर्वार्ध-खंड १, पृ. ७) आलेला आहे.

**यदुमाणिकाच्या काळांत कैलास लेण्यांतील माणिकेश्वराची उपासना रूढ होती असें दिसतें.**

(२) प्रा. प्रियोळकर यांनीं श्री. चांदोरकरांच्या लिखाणावरून यदु-माणिकाची जी गुरुपरंपरा दिलेली आहे, तींत एकनाथानंतर एकदम बाळकृष्णाचें (यदुमाणिकाच्या खापरपणतूचें) नांव आलें आहे. त्यामुळें नाथांच्या शिष्यपरंपरेंत यदुमाणिकाचें नेमकें स्थान कोठें आहे, तें कळत नाहीं. मधलीं नांवें चुकून गळलेलीं दिसतात.

(३) **यदुमाणिकाला ग्रंथलेखनाची प्रेरणा मध्वमुनीश्वरांचा शिष्य त्र्यंबक याजकडून मिळालेली दिसते.** आपल्या ग्रंथाच्या उपसंहारांत तो म्हणतो —

" मध्वाचार्यांचिया छात्रवरें ।
त्र्यंबकाचार्यें सुमनोहरें ।
मज क्षेत्रमहात्म्य आदरें ।
वदविलें बरें बोधुनी ॥ "—उपसंहार १०.

या उल्लेखांतील मध्वाचार्य म्हणजे मध्वमुनीश्वरच. मध्वमुनीश्वरांचा निवास शेंदूर-वाड्यास असे. त्यांचा मठहि तेथेंच आहे. ते गणेशाचे उपासक. त्यांचें मूळ नांव त्र्यंबक आणि त्यांच्या शिष्याचेंहि नांव त्र्यंबकच. या त्र्यंबकाचा 'प्रल्हादचरित्र' या नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध असल्याची नोंद श्री. भावे यांनीं केली आहे. याचा निवास नाशकास असे. ('महाराष्ट्र-सारस्वत', पृ. ६०४–६०५.) यदुमाणिक आपल्या प्रस्तुत टीकेचा उल्लेख 'सिंधूरवाडक्षेत्रमाहात्म्यतात्पर्यटीका' असा करतो, इतकें शेंदूरवाड्याचें स्थलमाहात्म्य त्याच्या मनावर ठसलें होतें. मध्व-मुनीश्वरांचा समाधिशक श. १६५३ किंवा श. १६५६ असा मानला जातो. प्रस्तुत 'संजीविनी' टीका श. १६४७ मध्यें लिहिली गेली. म्हणजे यदुमाणिकाला प्रत्यक्ष मध्वमुनीश्वरांचाहि सहवास लाभला असणार.

**—रामचंद्र चिंतामण ढेरे**

# थोडें यदुमाणिकाविषयीं

' मराठी संशोधन-पत्रिके 'च्या सातव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत ' एक अज्ञात मराठी गाणपत्य ग्रंथ ' या शीर्षकाखालीं प्रा. प्रियोळकर यांनीं यदुमाणिक-कृत ' संजीविनी ' टीकेचा परिचय करून दिला आहे आणि त्या अंकापासून क्रमशः ' संजीविनी ' टीकेची संहिता देण्यास प्रारंभ केला आहे. आपल्या प्रास्ताविक लेखांत प्रा. प्रियोळकरांनीं गाणपत्य परंपरेंतील मराठी वाङ्मयाचा आढावा घेऊन यदुमाणिक आणि त्याचा प्रस्तुत ग्रंथ यांविषयींची कांहीं माहिती दिली आहे. त्या माहितीच्या अनुषंगानें माझें म्हणणें पुढें मांडीत आहें.

( १ ) यदुमाणिक आपल्या नांवापुढें माणिक, माणिकेश, माणिकेश्वर यांपैकीं एखादें पद जोडतो. या पदाचा विचार करतांना " तो माणिकेशाचा शिष्य किंवा पुत्र असावा....कदाचित् माणिकेश्वर ही त्याची कुलदेवता किंवा ग्रामदेवता असावी, " असें अनुमान प्रा. प्रियोळकरांनीं काढलें आहे. परंतु चांदोरकरांनीं दिलेली त्याची वंशावळ व गुरुपरंपरा यांत माणिकेशाला स्थान नसल्यामुळें माणिकेश हा यदुमाणिकाचा पिता वा गुरु असणें शक्य नाहीं. प्रा. प्रियोळकरांच्या दुसऱ्या अनुमानानुसार ती त्याची कुलदेवता असणेंच जास्त शक्य आहे. गेल्या दोन अंकांत ' संजीविनी ' टीकेच्या संहितेचा जेवढा भाग छापला आहे, त्यांतील प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं " ॥ श्रीमहागणपतिमहालयामाणिकेश्वर-चरणारविंदेभ्यो नमः ॥ " असें नमन आहे. या नमनांतील तीन वंदनीय देवतांपैकीं ' श्रीमहागणपति ' हा तर त्याच्या ग्रंथाचा वर्ण्य विषयच आहे. **' महालया ' म्हणजे मोहिनी.** यदुमाणिक हा मूळचा नेवाशाचा. **नेवाशाची मोहिनी ही त्याची कुलदेवता होती,** असें त्यानेंच स्पष्टपणें नोंदविलें आहे :

" देखोनि त्वत्कृपाकटाक्षासी ।
हर्ष जाला कुलदेवतेसी ।
ते मोहिनीनें आश्वासनासी ।
दिलें त्वद्‌गुणासी बोलावया ॥ " १·२४.

आतां उरला माणिकेश्वर. **हा माणिकेश्वर म्हणजे वेरूळच्या कैलास लेण्यांतला शिव.** यदुमाणिकानें आपल्या ग्रंथांत वर्णिलेलें सिंदूरवाडें, त्यानें ज्या ठिकाणीं तप केलें तें गणेशस्थान, त्याच्या ग्रंथाचें लेखनस्थळ हीं सर्व स्थानें वेरूळच्या परिसरांतच आहेत. वेरूळच्या माणिकेश्वराचा स्पष्ट उल्लेख ' लीळाचरित्र ' आणि ' स्थानपोथी ' या महानुभावीय ग्रंथांत आलेला आहे. चक्रधर त्या ठिकाणीं राहिले-वावरले होते. ( ' लीळाचरित्र ' पूर्वार्ध-खंड १, पृ० २७ आणि ' स्थानपोथी ', पृ. २७. ) एका स्थानिक दंतकथेनुसार, वेरूळच्या घृष्णे-

श्वराला व माणिकेश्वराला हीं नांवें राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याच्या दोन राण्यांच्या नांवांवरून पडलीं आहेत. घृष्णावती व माणिकावती अशीं त्या दोन राण्यांचीं नांवें होतीं. ज्या व्यक्ति शिव-मंदिरें उभारीत, त्या व्यक्तींच्या नांवानें तीं शिवस्थानें प्रसिद्ध होत, याविषयींचे पुरावे इतिहासांत अनेक मिळतात. 'वैजाए' राणीनें करविलेल्या 'वैजनाथ'-मंदिराचा उल्लेख 'लीळाचरित्रां'त (पूर्वार्ध-खंड १, पृ. ७) आलेला आहे.

**यदुमाणिकाच्या काळांत कैलास लेण्यांतील माणिकेश्वराची उपासना रूढ होती असें दिसतें.**

(२) प्रा. प्रियोळकर यांनीं श्री. चांदोरकरांच्या लिखाणावरून यदुमाणिकाची जी गुरुपरंपरा दिलेली आहे, तींत एकनाथानंतर एकदम बाळकृष्णाचें (यदुमाणिकाच्या खापरपणतूचें) नांव आलें आहे. त्यामुळें नाथांच्या शिष्यपरंपरेंत यदुमाणिकाचें नेमकें स्थान कोठें आहे, तें कळत नाहीं. मधलीं नांवें चुकून गळलेलीं दिसतात.

(३) **यदुमाणिकाला ग्रंथलेखनाची प्रेरणा मध्वमुनीश्वरांचा शिष्य त्र्यंबक याजकडून मिळालेली दिसते.** आपल्या ग्रंथाच्या उपसंहारांत तो म्हणतो —

" मध्वाचार्यांचिया छात्रवरें ।
त्र्यंबकाचार्यें सुमनोहरें ।
मज क्षेत्रमहात्म्य आदरें ।
वदविलें बरें बोधुनी ॥ "—उपसंहार १०.

या उल्लेखांतील मध्वाचार्य म्हणजे मध्वमुनीश्वरच. मध्वमुनीश्वरांचा निवास शेंदूरवाड्यास असे. त्यांचा मठहि तेथेंच आहे. ते गणेशाचे उपासक. त्यांचें मूळ नांव त्र्यंबक आणि त्यांच्या शिष्याचेंहि नांव त्र्यंबकच. या त्र्यंबकाचा 'प्रल्हादचरित्र' या नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध असल्याची नोंद श्री. भावे यांनीं केली आहे. याचा निवास नाशकास असे. ('महाराष्ट्र-सारस्वत', पृ. ६०४–६०५.) यदुमाणिक आपल्या प्रस्तुत टीकेचा उल्लेख 'सिंधूरवाडकक्षेत्रमाहात्म्यतात्पर्यटीका' असा करतो, इतकें शेंदूरवाड्याचें स्थलमाहात्म्य त्याच्या मनावर ठसलें होतें. मध्वमुनीश्वरांचा समाधिशक श. १६५३ किंवा श. १६५६ असा मानला जातो. प्रस्तुत 'संजीविनी' टीका श. १६४७ मध्यें लिहिली गेली. म्हणजे यदुमाणिकाला प्रत्यक्ष मध्वमुनीश्वरांचाहि सहवास लाभला असणार.

**—रामचंद्र चिंतामण ढेरे**

# ' पद्मावता 'त राघव चैतन्य

राघव चैतन्य हे संत तुकारामाच्या गुरुपरंपरेंतील ऐतिहासिक व्यक्तींत आद्य पुरुष होत. कृष्णदासाच्या ' चैतन्यलीलें 'त त्यांच्याविषयींची पुढील माहिती मिळते : " ते गिरनार पर्वताच्या परिसरांत एका शौर्यकुलांत जन्मास आले. त्यांची कुलवृत्ति देशलेखकाची होती. त्यांचे वडील यवनांच्या सेवेंत होते. परंतु राघवांनीं ( ऊर्फ रघुनाथांनीं ) पित्याच्या आज्ञेनुसार गिरनार पर्वतावर दत्ताची उपासना केली. बरेच दिवस अनुष्ठान करूनहि दत्तदर्शन होईना म्हणून त्यांनीं कड्यावरून उडी घेऊन देहत्याग करण्याचें ठरविलें. खालीं उडी घेणार तोंच दत्तात्रेयानें प्रकट होऊन त्यांना सांवरलें आणि योगसाधना आचरण्यासाठीं जुन्नरजवळील ओतूरच्या डोंगरांत जाण्यास आज्ञापिलें. "

महाराष्ट्रांत ज्ञात असलेलें त्यांचें पूर्वचरित्र एवढेंच आहे. यांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते मूळचे महाराष्ट्रांतील नसून गिरनारकडचे होत. प्रख्यात हिंदी महाकवि मलिक मुहम्मद जायसी ( इ.स.१४९२-१५४२ ) याच्या 'पद्मावत' या महाकाव्यांत ' राघव चेतन ' या नांवाचें एक पात्र आहे. जायसीनें त्याचें चित्रण खलपुरुषाच्या स्वरूपांत केलें आहे. जायसीचा राघव चेतन बुद्धिमान्, व्यासासारखा कवि, सहदेवासारखा पंडित, वररुचीसारखा वेदज्ञ, भूतप्रेतयक्षिणीपूजक, वृत्तीनें उग्र, हिंसक, अविवेकी, कृतघ्न, कामुक, निर्लज्ज, नीच, अहंकारी असा आहे. कामरूपांतील लोना नामक तांत्रिक स्त्रीकडून त्यानें तंत्रविद्या प्राप्त केली होती. ' पद्मावता 'चा नायक रत्नसिंह याचा रोष झाल्यावर हा अल्लाउद्दिनाकडे गेला आणि त्यानें अल्लाउद्दिनाच्या मनांत पद्मिनीविषयीं कामाभिलाषा निर्माण करून त्यास चितोडवर स्वारी करण्यांत साहाय्य केलें.

जैन साधनांतहि राघव चेतनाविषयींचे उल्लेख मिळतात. ' जैन सिद्धान्त-भास्कर ' ( भा. ५ पृ. १३८; भा. १ पृ. ९ ) आणि श्री. अगरचंद नाहटा-लिखित ' जिनप्रभसूरिका संक्षिप्त जीवनचरित ' ( पृ. १२ ) यांत अनुक्रमें अल्लाउद्दीन आणि महंमद तुघलक यांच्याशीं त्याचा संबंध दाखविला असून तो जैनविरोधक असल्याचें सांगितलें आहे. त्याची तंत्रशिक्षिका लोना हिच्या-विषयींच्या कथा क्रुकच्या ' पॉप्युलर रिलिजन ' मध्यें (पृ. ३७६) दिलेल्या आहेत.

माझ्या मतें, आपले राघव चैतन्य आणि हा राघव चेतन एकच होत. केवळ सांप्रदायिक द्वेषामुळें त्यांचें विकृत चित्रण झालें असावें. संशोधकांनीं वरील संदर्भांच्या दिशेनें अधिक शोध घेतल्यास मराठी भक्तिपरंपरेंतील एका महत्त्वाच्या दुव्यावर विशेष प्रकाश टाकतां येईल.

— रामचंद्र चिंतामण ढेरे

# फ्रांसिस्की पंथीयांचा मराठीचा अभ्यास

( लेखकः—वि. बा. प्रभुदेसाई, M. A. )

पोर्तुगीजांनीं गोवा जिंकून घेतल्यानंतर युरोपखंडांतून निरनिराळ्या धार्मिक पंथांचे कार्यकर्ते हिंदुस्थानांत आले व त्यांनीं आपापल्या कुवतीप्रमाणें ख्रिस्ती धर्माचा प्रसार सुरू केला हें सर्वश्रुतच आहे. या धर्मप्रसाराच्या कार्यांत मुख्य अडचण होती ती भाषेची. ज्या प्रदेशांत आपल्या कार्याचा विस्तार करावयाचा आहे, त्या प्रदेशांतल्या लोकांची भाषा आत्मसात् केल्याशिवाय आपल्याला त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश मिळणार नाहीं, ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवानें या धर्मप्रसारकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. मात्र देशी भाषांच्या अभ्यासाच्या बाबतींत जेजुइत पंथाच्या कार्यकर्त्यांनीं जितका उत्साह दाखविला, तितका अर्थातच इतरांचा दिसून येत नाहीं. तरीपण, जेजुइतांच्याहि आधीं हिंदुस्थानांत आलेल्या फ्रांसिस्की पंथीयांनीं मराठी व तिची गोमंतकी बोली यांची काय सेवा केली, याची थोडक्यांत माहिती करून घेणें उद्बोधक ठरेल.

भाषाभ्यासाचा विचार करण्यापूर्वीं फ्रांसिस्की पंथासंबंधीं थोडी माहिती देऊं. St. Francis Of Assisi यानें इ. स. १२०९ मध्यें किंवा कांहीं इतिहासकारांच्या मताप्रमाणें १२१० सालीं फ्रांसिस्की संप्रदायाची स्थापना केली. या पंथाला Ordem dos Menores असेंहि नांव आहे. Encyclopaedia Britannica मध्यें या पंथाविषयीं पुढील माहिती आढळते :

" Franciscans ( otherwise called Friars Minor, or Minorities, also the Seraphic Order; and in England Grey Friars, from the colour of the habit, which, however, is now brown rather than grey ), a religious order founded by St. Francis of Assisi............Francis and his associates were first known as " Penitents of Assisi, " and then Francis chose the title of " Minors." (1)

फ्रांसिस्की पंथ १२१६ मध्यें पोर्तुगालमध्यें आला व तेथेंच दृढमूल झाला. या पंथाचे लोक आधीं हिंदुस्थानांत आले कीं दोमिनिकी पंथाचे, याविषयीं मात्र इतिहासकारामध्यें मतभेद आहेत.

---

(1) The **Encyclopaedia Britannica,** Vol, XI, Cambridge 1910, ( 11th Edition ), p. 1.

गोवा सरकारचे शंभर वर्षांमागील चीफ सेक्रेटरी कुन्ज रिव्हार हे पोर्तुगीजांच्या हिंदुस्थानांतील सुरुवातीच्या अमदानींतल्या इतिहासाचे एक अधिकारी मानले जातात. त्यांनीं तत्कालीन ऐतिहासिक साधनांच्या आधारें कोंकणी भाषेविषयींचा एक निबंध लिहिला आहे. या निबंधांत मिशनऱ्यांविषयीं माहिती देतांना रिव्हार लिहितात कीं, फ्रांसिस्की पंथीय भ्राते हे १५१० सालीं आल्बुकेर्कसोबतच पहिल्यांदां गोव्याला आले. ( २ )

रिव्हाराचें हें मत दुसरे इतिहासकार J. N. da Fonseca यांना मान्य नाहीं असें दिसतें. ते म्हणतातः—

" The first missionaries sent to India after the discovery of the new route, were some Dominican friars, who came out as chaplains of the fleet brought by Albuquerque. They landed at Goa immediately after its second capture by that great captain in 1510. These friars, however, made scarcely any conversions at that time. The glory of sowing the first seeds of Christianity in Goa belongs to the Franciscans, who arrived in 1517." (३).

या बाबतींत जाल कार्पेंटियर, फादर हॅस्टेन वगैरे विद्वानांनीं आपापल्या ग्रंथांतून निरनिराळीं मतें मांडिलीं आहेत. या सर्व मतांचा ऊहापोह न करतां अलिकडे उपलब्ध झालेल्या मिशनऱ्यांविषयींच्या अस्सल साधनांच्या आधारें या वादाचा निश्चित निर्णय लावणें शक्य आहे.

या नवीन माहितीप्रमाणें, पोर्तुगीज सरदार व्हास्कु द गाम याचे पाय कालिकतच्या किनाऱ्याला लागण्याच्या आधींच, जवळजवळ एकशें सत्याहत्तर वर्षांपूर्वीं, दोमिनिकी पंथाचे मिशनरी हिंदुस्थानांत आले होते. त्यांच्यासोबतच फ्रांसिस्की पंथाचे चार भ्रातेहि ( friars ) होते. ही माहिती विश्वसनीय ठरल्यास दोमिनिकी व फ्रांसिस्की या दोन्ही पंथांचे मिशनरी एकाच वेळीं व सोबतीनेंच हिंदुस्थानांत आले हें सिद्ध होतें. जेजुइत पंथाचे मिशनरी पहिल्यांदा १५४२ सालीं गोव्याला आले, याविषयीं मात्र कोणताच वाद नाहीं. आतां आपण दोमिनिकी पंथीयांसोबत हिंदुस्थानांत आलेल्या फ्रांसिस्की भ्रात्यांच्या कामगिरीचा विचार करूं.

---

(2) J. H. da Cunha Rivara, **Ensaio Historico da Lingua Concanim,** Goa **1858,** p. 20.

(3) J. *N.* da Fonseca, **An Historical and Archaeological Sketch of the City of Goa,** Bombay 1878, p. 63.

दोमिनिकी पंथीय फ्रेंच पाद्री Jordanus हा १३२० सालीं, म्हणजे व्हास्कु द गामानें हिंदुस्थानांत येण्याच्या समुद्रमार्गाचा शोध लावण्याआधींच आपल्या देशांत आला होता. या जॉर्दानूसोबतच फ्रांसिस्की पंथीय चार friars हिंदुस्थानांत आले होते, अशी माहिती आढळते. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें होतीं :—

"Frey Thomas de Tolentino & Frey Jacome de Padua, sacerdotes; Frey Pedro & Frey Demetrio, irmaos leigos." (4) त्यावेळीं पश्चिम किनाऱ्यावर ठाणें हें एक अतिशय भरभराटीला आलेलें बंदर म्हणून प्रसिद्ध होतें. या फ्रांसिस्की पंथीयांच्या चार जोग्यानीं ठाणें शहरांत खिस्ती धर्माचा प्रचार करायला सुरुवात केली. पण हें अकालीं केलेलें धाडस त्यांना इतकें महागांत पडलें कीं, तेथील मुसलमानांनीं चिडून जाऊन या चारहि भ्रात्यांचा प्राण घेतला. अशा रीतीनें फ्रांसिस्की पंथीयांचा धर्मप्रसाराचा हा पहिला प्रयत्न लवकरच संपुष्टांत आला.

यानंतर इ. स. १५०० सालीं पेद्रु आल्व्हारिश् काब्रालच्या आरमारासोबत फ्रांसिस्की पंथाचे आठ लोक हिंदुस्थानांत आले होते, असा उल्लेख सांपडतो.

या आठ भ्रात्यांपैकीं Pe. Frei Henrrique de Coimbra हा वरिष्ठ धर्माधिकारी ("Prellado") म्हणून आला होता. हे सगळेजण कालिकतला आले व नंतर त्यांनीं धर्मप्रसाराला सुरुवात केली. फ्रांसिस्की (S. Thome) पंथाची शाखा हिंदुस्थानांत स्थापन करण्याचें श्रेय या पाद्री एंरिकिलाच द्यावें लागेल. त्याला मदत करण्यासाठीं आलेल्या सात भ्रात्यांपैकीं Frei Gaspar, Frei Francisco da Cruz, Frei Simao de Guimaraes व Frei Luis do Salvador यांनीं धार्मिक ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला असल्यामुळें धर्मप्रसारक ("Pregadores & excelentes letrados") म्हणून काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविलेली होती. उरलेल्या तिघांपैकीं Frei Masseu हा संगीतज्ञ होता, आणि Frei Pedro Neto व Frei Joao da Victoria यांच्याकडे बाकीची किरकोळ कामगिरी सोंपविण्यांत आली होती.

या आठहि धर्मप्रसारकांनीं कालिकत हें आपलें मुख्य केंद्र ठेवून आजूबाजूच्या प्रदेशांत जोराचा धर्मप्रसार सुरू केला. हिंदु धर्माचे संरक्षक असे शास्त्री-पुराणिक व भटभिक्षुक यांच्यावर त्यांचा विशेष रोख होता. वेदाविद्या व कथापुराणें यांत पारंगत झालेल्या एका योग्याला फूस लावून खिस्ती धर्मांत ओढून आणण्याच्या

---

(4) A. da Silva Rego, **Documentacao para a historia das missoes do Padroado Portugues do Oriente**, Vol. VII, Lisboa, 1952, p. 368.

कामींहि त्यांनीं यश संपादन केलें होतें. या योग्याचें धर्मांतरानंतर Miguel de Santa Maria असें नामकरण करण्यांत आलें.

क्षात्रवृत्तीच्या नायर जातीच्या लोकांप्रमाणेंच मुसलमानांकडेहि या फ्रांसिस्की मिशनरींनीं आपली कृपादृष्टि वळविली होती; पण मुसलमान लोक हे धर्माच्या बाबतींत अतिशय कडवे असल्यामुळें त्यांना या परधर्मीयांच्या कारवाया मुळींच सहन झाल्या नाहींत. शिवाय, कित्येक वर्षांपासून आपल्या हातांत असलेला किनाऱ्यावरचा व्यापार एकाएकीं हे लोक हिसकावून घ्यायला पुढें सरसावल्याचें पाहून कालिकतवासी मुसलमानांच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला! रागाच्या भरांतच ते झुंडीझुंडीनें मिशनऱ्यांच्या निवासांत घुसले व आठांपैकीं तिघां भ्रात्यांना त्यांनीं तात्काळ मृत्यूचा मार्ग दाखवला. या चकमकींत वरिष्ठ धर्माधिकारी पाद्री एंरिकि द कोइंब्र हाहि चांगलाच चेंचून निघाला. यानंतर जिवंत उरलेल्या तिघां पाद्रींना घेऊन एंरिकीनें हिंदुस्थानच्या पूर्वेकडील भागांत व उत्तरेकडे गंगानदीच्या खोऱ्यापर्यंतच्या टापूंत धर्मप्रसार केला अशी माहिती आढळते. ( ५ )

धर्मप्रसाराच्या कामीं त्या त्या राज्यांतल्या राजाची परवानगी मिळविण्यासाठीं हे मिशनरी निरनिराळे दैवी चमत्कारहि करून दाखवीत. पाद्री फ्रै लुइश् दु साल्व्हादोर यानें विजयनगरचा राजा नृसिंहराय याच्यासमोर एक अग्निदिव्याचा चमत्कार करून दाखवून तिथें जमलेल्या ब्राह्मणांना तोंडांत बोटें घालायला लावलें, अशी हकीगत नमूद आहे. याचा परिणाम असा झाला कीं, फ्रै लुइश्ला विजयानगरच्या राज्यांत धर्मप्रसाराच्या बाबतींत भरपूर सवलती मिळाल्या व विरोधकांपासून सरकारी संरक्षणहि लाभलें.

पाद्री फ्रै आंतोनियु दु पोर्तु हा उत्तर कोंकणांतल्या ठाणें, वसई वगैरे भागांत धर्मप्रसार करीत होता. त्यानें वसईला पोरक्या मुलांना धार्मिक शिकवण देण्याच्या उद्देशानें एक कॉलेज काढलें होतें. या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना लिहिणें, वाचणें व हिशेब यांचें मूलभूत शिक्षण दिल्यावरच दौत्रिनीचें ज्ञान दिलें जाई. या कॉलेजमधल्या पहिल्या तुकडींत ४० मुलें होतीं. पुढें या मुलांनीं धर्मप्रसाराचें कार्य अतिशय हिरीरीनें केलें व अशा रीतीनें गुरूचे पांग फेडले, असें फ्रै आंतोनियूनें लिहून ठेविलें आहे.

वसई शहरांत मिळालेल्या अपूर्व यशानें उत्तेजित होऊन हा फ्रांसिस्की पाद्री सासष्टी बेटांत प्रवेश करता झाला. त्यावेळींहि आकाशांतील बापानें आपल्या दैवी सामर्थ्यानें सासष्टी बेटांतल्या झाडून सगळ्या हिंदु देवळांचें खिस्ती धर्ममंदिरांत रूपांतर केलें, असा अद्‌भुत चमत्कार नमूद करून ठेवलेला आढळतो. त्याचवेळीं हिंदूंच्या एका प्रसिद्ध देवालयांत वास्तव्य करणाऱ्या १५० वर्षें वयाच्या एका

( 5 ) Ibid., Vol. V, Lisboa 1951, pp. 395–97.

योग्याला पाद्री आंतोनियूनें खिस्ती धर्माची दीक्षा दिली. हा योगी पुढें आणखी ४५ वर्षें जिवंत होता. त्याच्या पावलावर पाऊल ठेवून मंडपेश्वराच्या देवालयांतील ५० योग्यांनींहि खिस्ती धर्माची दीक्षा घेतली व लगेच या प्रसिद्ध देवालयाचें खिस्ती धर्ममंदिरांत रूपांतर करण्यांत आलें.

या सर्व फ्रांसिस्की पाद्रींमध्यें पाद्री फ्रै फ्रांसिस्कु दु ओरिएंति याची कामगिरी विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. इ. स. १६०० मध्यें त्यानें केलेल्या धर्म-प्रसाराच्या कार्याची माहिती उपलब्ध झालेली आहे. त्याच्या बाबतींतली मुद्दाम निर्दिष्ट करण्यासारखी गोष्ट म्हणजे, त्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषा अवगत करून घेतल्या होत्या. त्याचें कार्यक्षेत्र कुठल्या प्रदेशांत होतें, याची निश्चित माहिती मिळत नसली तरी तो उत्तर कोंकणांत कांहीं दिवस तरी राहिला होता, असा उल्लेख आढळतो. यावरून इतर भाषांबरोबरच त्यानें मराठी भाषेचाहि अभ्यास केला असला पाहिजे, असा तर्क करायला हरकत नाहीं.

भाषांच्या अभ्यासाबरोबरच हिंदु लोकांच्या धार्मिक चालीरीती आचार-विचार, शकुन-अपशकुन, वगैरे गोष्टींचें पुष्कळच ज्ञान त्यानें करून घेतलें होतें. स्वतः त्याची राहणीहि एखाद्या योग्याला साजेशीच नेमनियमांनीं बद्ध होती. हिंदु धर्मापेक्षां खिस्ती धर्म कसा श्रेष्ठ आहे, हें पटवून देतांना तो नेमक्या वर्मावर बोट ठेवी व लोकांच्या भाषेंतच अस्खलितपणें बोले. (६) त्यामुळें त्याच्या वक्तृत्वाचा श्रोतृसमुदायावर इष्ट तोच परिणाम होत असे. अशा रीतीनें बरेचसे ब्राह्मण व जोगी यांना बाटविण्यांत तो यशस्वी झाला. शेवटीं ७०० बायकांचा जनाना बाळगणारा एक राजाहि त्याच्या भजनीं लागला होता, असें समजतें.

वसईप्रमाणेंच ठाणें, एलिफंटा, करंजा व मुंबई या बेटांतहि फ्रांसिस्की पंथी-यांनीं धर्मप्रसाराचें कार्य केलें व ठिकठिकाणीं प्रार्थनामंदिरें आणि धार्मिक शिक्षणाच्या शाळा उघडल्या. या शाळांतून देशी भाषेच्या अभ्यासाची सोय करण्यांत आलेली नसली, तरीं धार्मिक शिक्षणापुरतें देशी भाषांचें ज्ञान अवगत करून घेण्या-साठीं मात्र या पाद्रींचा सतत प्रयत्न चाललेला असे. या कामीं ते आपल्या देशी विद्यार्थ्यांची मदत घेत असत.

आल्बुकेर्कनें १५१० सालीं गोवा काबीज केल्यावर त्याच्या ताब्यांत जी एक मुसलमानांची मशीद आली, ती त्यानें फ्रांसिस्की पंथाच्या स्वाधीन केली होती. या मशिदीचें पुढें १५२१ सालीं Convento de Sao Francisco मध्यें रूपांतर करण्यांत आलें. या कॉन्व्हेन्टमध्यें धार्मिक शिक्षण घेणारे ६० विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांना धर्मशास्त्र व लॅटिन भाषा यांच्याबरोबरच गरज लागेल तेव्हां देशी

(6) Ibid., p. 400.

भाषा शिकविण्यासाठीं एका खास शिक्षकाची नेमणूक केली होती, हें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे.(७)

यानंतरच्या काळांत सुर्ले, हळदोणें, म्हापशें, कोलवाळ, कळंगूट, नेरूल वगैरे गांवच्या चर्चमधूनहि देशी भाषेंतून प्रार्थना सांगण्याची सोय करण्यांत आल्याचें नमूद आहे.

वरील माहितीवरून फ्रांसिस्की पंथीयांचें देशी भाषांकडे पाहण्याचें धोरण अतिशय उदार होतें असा ग्रह होण्याचा संभव आहे. पण इतिहासाची साक्ष मात्र याच्या नेमकी उलट आढळते. देशी भाषेच्या अभ्यासाला सर्वांत अधिक विरोध कुणाचा झाला असेल तर तो फ्रांसिस्की पंथीयांचाच, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

१५६७ सालीं गोव्याला भरलेल्या पहिल्या धर्माधिकाऱ्यांच्या सभेनें (Provincial Council) १५ पेक्षां जास्त वयाच्या प्रत्येक हिंदूनें धार्मिक प्रवचनाला हजर असलेंच पाहिजे, असा आदेश दिला होता. तसेंच हीं प्रवचनें ज्यांच्यासाठीं आहेत, त्यांची भाषा जाणणारीं माणसें प्रत्येक वरिष्ठ धर्माधिकाऱ्यानें (Prelate) आपल्या पदरीं ठेवावींत अशीहि स्पष्ट सूचना करण्यांत आली होती. याच्या पुढची पायरी म्हणून १५८५ मध्यें भरलेल्या तिसऱ्या सभेनें पोर्तुगीज भाषेंत क्रिस्ती धर्माची माहिती देणारी एक दौत्रीन ( Compendio da doutrina Christaa ) तयार करून तिचें निरनिराळ्या देशी भाषांमध्यें भाषांतर करावें असा ठराव पास केला.(८) देशी भाषांतील या धर्मग्रंथांचा खिस्तीकरणासाठीं पुष्कळच उपयोग होऊं शकेल, असा त्यांचा विश्वास होता.

यानंतर १६०६ सालीं भरलेल्या बिशपांच्या ५ व्या प्रांतिक परिषदेनें तर, सगळ्या धर्माधिकाऱ्यांनीं सहा महिन्यांच्या मुदतींत देशी भाषा शिकली पाहिजे, असा आदेश दिला. या आदेशाप्रमाणें ठरविलेल्या कालावधींत जे देशी भाषेचें ज्ञान मिळविणार नाहींत, त्यांना आपोआपच अधिकारावरून कमी केल्याचें समजण्यांत येईल, अशीहि सक्त ताकीद होती.

१५४४ सालीं सासष्टी व बार्देश हे प्रांत पोर्तुगीजांच्या ताब्यांत आल्यावर त्यांची धर्मप्रसारासाठीं वांटणी करण्यांत आली. या वांटणींत सबंध बार्देश प्रांत फ्रांसिस्की पंथाला मिळाला व बाकीचे प्रांत जेजुइत व दोमिनिकी पंथीयांना देण्यांत आले. १५५५ सालीं फ्रांसिस्की पंथीयांनीं Collegio dos Reis Magos ची

---

(7) Ibid., 498-99.

(8) J. H. da Cunha Rivara, **Archivo Portugues Oriental. IV**, Goa 1862, p. 139.

स्थापना करून बार्देशमध्यें धर्मप्रसाराच्या कार्याला प्रारंभ केला. आतां त्यांना देशी भाषेच्या अभ्यासाची पुष्कळच आवश्यकता होती. शिवाय, धर्मसभेचा तसा स्पष्ट आदेशहि होता. पण अशा परिस्थितींतहि या धर्मप्रसारकांनीं देशी भाषा शिकण्याकडे जाणून बुजून सतत दुर्लक्ष केलें, अशीच इतिहासाची साक्ष आहे.

वरिष्ठांचा आदेश धाब्यावर बसविल्यामुळें आर्चबिशप व फ्रांसिस्की प्राद्री यांच्यांत वारंवार खटके उडूं लागले. त्यामुळें बार्देश प्रांतांतल्या धर्ममंदिरांच्या कारभाराबद्दल पोर्तुगालच्या राजापर्यंत कागाळी जाऊन पोंचली. फ्रांसिस्की पंथीयांनीं देशी भाषा शिकण्याच्या कामांत हेळसांड केल्यामुळें ते आपलीं प्रवचनें एतद्देशीयांच्या मदतीनेंच कशीबशीं उरकून घेतात, ही गोष्टहि उघडकीला आली. या परिस्थितीवर तोडगा म्हणून त्यांना देशी भाषा शिकविण्यासाठीं खास शिक्षकांची योजना करण्यांत आली व देशी भाषेंत उत्तीर्ण झाल्याचें प्रमाणपत्र दाखविल्याशिवाय त्यांना नेमून दिलेला भत्ता देऊं नये, असाहि दंडक घालण्यांत आला.(९) पण याहि निर्बंधांना फ्रांसिस्की पंथीयांनीं फारसें जुमानलें नाहीं. कोणती ना कोणती सबब पुढें करून ते भाषाभ्यासाच्या बाबतींत एकसारखी चालढकल करीत होते व तसाच बांका प्रसंग आल्यास राजाकडे विशेष सवलती देण्याची याचना करून वेळ निभावून नेत असत. त्यामुळें आर्चबिशप किंवा इंक्विझिटर यांपैकीं कोणाचीहि ते पर्वा करीनासे झाले.

फ्रांसिस्की पंथीय भ्राते हे पोर्तुगीज सरकारचे विशेष लाडके असल्यामुळें त्यांना चुचकारूनच आपलें कार्य साधणें शहाणपणाचें आहे, असें गोव्याच्या व्हाइसरॉयला वाटलें. त्यानें फ्रांसिस्की पंथाच्या प्रॉव्हिंसियालला धर्मग्रंथांतील आधार देऊन लिहिलेल्या पत्रांतील पुढील मजकूर या दृष्टीनें महत्त्वाचा आहे :—

" It is good to reflect on the words of St. John, Chapter X Et proprias etc. : which means they follow the pastor because he knows their language. Hence it seems very clear that Your Reverence conforming with the commands of His Majesty which are based on the Gospel, should observe them by appointing shepherds who make themselves understood by, and whom the flock understand...By the way, I assure Your Reverence that I have been trying to learn the local language from the time I arrived here, in order to fully under-

---

(9) J. H. da Cunha Rivara, **Ensaio Historico** etc. *op. cit.*, p. 27.

stand and appreciate the complaints of my subjects." (10) (Tr. Fr. T. Lobo)

पण व्हाइसरॉयच्या या कळकळीच्या उपदेशाकडेहि फ्रांसिस्की भ्रात्यांनीं साफ काणाडोळा केला. त्यांनीं बार्देश प्रांतांतील नवख्रिस्त्यांची बोली अवगत करून घेण्याचे परिश्रम न घेतल्यामुळें धर्मप्रसाराच्या कार्याला त्याची चांगलीच झळ पोंचली. ही बेदिली नाहींशी करण्यासाठीं धर्ममंदिरांतून फ्रांसिस्की पाद्रींची उचल-बांगडी करून त्यांच्या जागीं देशी भाषेचा अभ्यास केलेल्या जेजुइत पाद्रींना नेमावें अशी सूचनाहि व्हाइसरॉयनें केली होती. गोमंतकांतील मराठीच्या प्रचलित बोलीचें ज्ञान संपादन करणें व धर्मप्रसारकाचें आदर्श जीवन जगणें, याबाबतींत फ्रांसिस्की भ्रात्यांपेक्षां जेजुइत पाद्री पुष्कळच सरस आहेत, असें त्याचें मत होतें.

यानंतर १६८४ सालीं व्हाइसरॉय फ्रान्सिस द ताव्होर यानें खास हुकुमान्वयें देशी भाषेच्या व्यवहारावर संपूर्णपणें बंदी घालून तीन वर्षांच्या आंत प्रत्येकानें पोर्तुगीज भाषेचें ज्ञान संपादन करावें असा दंडक घातला. देशी भाषेच्या वाढीवर घातलेला हा फार मोठा घाला होता. विशेष म्हणजे, हा कायदा फ्रांसिस्की पंथीय धर्माधिकाऱ्यांच्या खास विनंतीवरूनच करण्यांत आला होता, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

सहा महिन्यांच्या आंत देशी भाषेचा अभ्यास केला पाहिजे, हा आदेश जसा फ्रांसिस्की पंथीयांनीं धुडकावून लावला, त्याचप्रमाणें ३ वर्षांच्या आंत सगळ्या लोकांनीं पोर्तुगीज भाषा शिकली पाहिजे, या कायद्याची अंमलबजावणी कांटेकोरपणें होऊं शकली नाहीं. या भाषाभ्यासाच्या चळवळीच्या इतिहासाचा अधिक विस्तार न करतां समारोपादाखल कुन्ज रिव्हाराचें या बाबतचें मत तेवढें उद्धृत करतों:—

"In conclusion we may assert that the influence of Franciscans of the Province of St. Thome was harmful to the language of the country acknowledging at the same time, that a few of them, more illustrious and more pious than most of their confreres, worked for the grammatical and literary culture of the language. But the work printed by them is rare probably due to the Superior's lack of interest. Their writings were very soon forgotten, and thus the laudable

(10) Ibid., p. 30; also A. K. Priolkar, **The Printing Press in India**, Bombay 1958, p. 178.

desire of the authors to propagate the language was in vain." (11) (Tr. Fr. T. Lobo).

आतां फांसिस्की पंथीयांनीं देशी भाषांचा अभ्यास करून मराठी आणि तिची गोमंतकी बोली यांत कोणते ग्रंथ लिहिले त्याची माहिती करून घेऊं.

**(1) Frei Amador da Santa Anna.**

**(2) Frei Joao da Saǔ Mathias**

या दोन पाद्रींनीं मिळून खिस्ताच्या जीवनावर ( Doutrina Christaa किंवा Vida de Crishto ) व Symbolo da Fe ( Symbol of Faith ) या विषयावर दोन हजार ओव्यांचें काव्य केलें होतें. कार्दिनाल बालार्मीनच्या मूळ काव्याचें हें भाषांतर असून सहज गातां व पाठ करतां यावें अशी त्याची रचना होती, असा बिब्लियॉतिक लुझितानचा अभिप्राय आहे.

खिस्ताच्या जीवनावरील काव्य ब्राह्मणाच्या भाषेंत ( lingua Bramana ) लिहिलें होतें व त्याला ' पुराण ' असें नांव दिलें होतें.

पाद्रि मातियश् हा जन्मानें मूळचा पोर्तुगालचा होता अशी माहिती आढळते.

पाद्रि सांत आनच्या नांवावर Flos Sanctorum या नांवाचाहि एक ग्रंथ असल्याचें नमूद आहे. Vergel de Plantas & Flores चा लेखक पाद्रि जासिंतु द देउश आपल्या पुस्तकांत लिहितो कीं, पूर्वेकडील लोकांच्या मातृभाषेच्या सौष्ठवाला साजेसेंच हें भाषांतर सरस उतरलें आहे.

**(3) Frei Manoel Banha**

हा फ्रांसिस्की पाद्री, सांव तॉमॅ संघटनेचा कार्यकर्ता असून त्यानें एतद्देशियांच्या भाषेमध्यें ( lingua dos natu:aes ) एक जाडजूड शब्दसंग्रह ( Vocabulario ) तयार केला होता.

**(4) Frei Manoel Bauptista**

हाहि उपरोल्लेखित संघटनेचाच कार्यकर्ता होता. गोव्यांतल्या बार्देश प्रांतांत कोलवाळ आणि रेवडा येथें रेक्टरच्या हुद्यावर तो होता. पाद्रि इस्तेव्हांच्या खिस्त पुराणाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या आरंभीं तें छापण्याची जी परवानगी आहे, तींत या पाद्रीचें नांव आढळतें. त्यावरून १६५४ सालीं हा जिवंत होता, हें सिद्ध होतें.

यानें देशी भाषेंत एक बरीच मोठी प्रश्नोत्तरावली ( Cathecismo ) तयार केली होती.

---

(11) **Ibid.**, p. 63; also A. K. Priolkar, **op. cit.**, p. 206.

### ( 5 ) Frei Manoel do Lado

हा १६६१ आणि १६६२ मध्यें प्रांतिक धर्माधिकारी ( Provincial ) म्हणून काम करीत होता. यानें नवखिस्त्यांच्याँ उपयोगासाठीं एक छोटी प्रश्नोत्तरावली तयार केली होती.

### ( 6 ) Frei Domingos de Sao Bernardino

याचा जन्म हिंदुस्थानांतच झाला असून हा बार्देश प्रांतांत Comissario do Santo Officio म्हणून काम करीत होता. देशी भाषेवर याचें प्रभुत्व असून ती शिकवण्याचें कामहि तो करीत असे.

यानें 'धर्ममार्ग' व 'खिस्तनिष्ठा' यांचें स्पष्टीकरण करणारीं ( Explicacao do Credo e Artigos da Fee ) पुस्तकें स्थानिक लोकांच्या भाषेंत लिहिलीं, अशी माहिती उपलब्ध आहे.

### ( 7 ) Frey Christovao de Jesus

यानें कोंकणीचें व्याकरण ( Arte Grammatical da Lingua Canarina ) लिहिलें होतें.

याशिवाय जन्मानें पोर्तुगीज असलेल्या Frey Manoel da Graca व Frey Belchior dos Reis या दोन फ्रांसिस्की पाद्रींनीं निरनिराळ्या स्वरूपाची ग्रंथरचना केल्याची माहिती आढळते; पण त्यांचे ग्रंथ कोणत्या भाषेंत लिहिलेले होते हें मात्र नमूद केलेलें नाहीं. फ्रै आंतोनियु द ग्रास यानें लिहिलेल्या 'नैतिक सदाचारांच्या शिकवणुकीच्या' ( Relacoens Moraes) ग्रंथाचें ठिकठिकाणीं भाषांतर केलें असून नवखिस्त्यांसाठीं या भाषांतरांचा उपयोग केला जात असे, अशी माहिती आढळते. गोमांतकी बोलींतहि हें भाषांतर झालें असावें.

हिंदुस्थानांत जन्माला आलेल्या Frey Francisco da Santa Roza, Frey Paulo da Trindade, Frey Francisco de Negrao, आणि Pe. Manoel Frei Miguel da Purificacao या फ्रांसिस्की पाद्रींनींहि निरनिराळ्या प्रकारचीं पुस्तकें लिहिलीं होतीं; पण तीं कोणत्या भाषेंत होतीं याची माहिती उपलब्ध नाहीं. फ्रै नेग्रांवचा ऐतिहासिक स्वरूपाचा ग्रंथ छापण्यांत आला होता. तसेंच फ्रै मिगेल द पुरिफिकासांवनेंहि आपला Vida Evangelica dos Frades Menores ( फ्रांसिस्की पंथीयांचें धार्मिक जीवन ) हा ग्रंथ पोर्तुगालचा राजा दॉं जुवांव चौथा याला अर्पण करून छापवून घेण्यांत यश मिळविलें होतें.[12]

---

( 12 ) A. Silva Rego, **Documentacao etc.**, op. cit., Vol. V. pp. 495-6.

( ८ ) Frei Gaspar de S. Miguel

देशी भाषेंतून ग्रंथनिर्मिति करण्याच्या बाबतींत याला सर्व फ्रांसिस्की पाद्रीं-मध्यें अग्रगण्य गणला पाहिजे. शिवाय, याचे ग्रंथ त्यावेळीं छापण्यांत आले होते, हें विशेष महत्त्वाचें होय.

१७ व्या शतकाच्या मध्यास हा जिवंत होता. Bibliotheca Lusitana च्या माहितीप्रमाणें त्यानें आपले सगळे ग्रंथ राजा फिलीप चौथा याला अर्पण केले होते.

Das Estacoes, etc. (On Instructions) पाद्रींनीं आपल्या भक्तगणाला करायच्या असलेल्या उपदेशासंबंधींची माहिती ( Mysteries of Holy Faith, Seven Sacraments, God's Commandments ) व मार्गदर्शन या ग्रंथांत केलेलें होतें.

हा ग्रंथ काव्यबद्ध असून तो छापण्यांत आला होता व एतद्देशीयांना तो एक मोलाचा खजिनाच वाटत असे, अशी माहिती आढळते.[13]

C. R. Boxer ( London ) यांनीं आपल्या " **A tentative check=list of Indo=Portuguese Imprints, 1556=1674** " ( Boletim do Instituto Vasco da Gama, No. 73-1956 ). या लेखांत वरील मुद्रित ग्रंथाचा उल्लेख केलेला नाहीं. यावरून फ्रांसिस्की पाद्रीचा हा ग्रंथ मुद्रित झाला असल्याची ही माहिती सर्वस्वी नवीनच आहे, असें म्हणावें लागतें.

वरील ग्रंथांतच Quatro Novissimos ( Four last Ends ) संबंधींहि विवेचन करण्यांत आलें होतें, अशी माहिती सिल्व्ह रेगोच्या उपरोक्त ग्रंथांत एका ठिकाणीं आढळते; तर हे दोन्ही निरनिराळे ग्रंथ होते व Quatro Novissimos तेवढा काव्यबद्ध होता असें अन्यत्र नमूद आहे.[14]

याशिवाय पुढील ग्रंथहि फ्रै मिगेलच्या नांवावर आढळतात :—

कोंकणीचें व्याकरण ( Arte da Lingua Canarina )—Ms.

Diccionario da Lingua Canarina & Portuguesa— Ms. ( कोंकणी व पोर्तुगीज कोश. )

Sermoes do tempo, & dos Santos —4 Tom. ( वर्षांतील एकंदर ऋतु व साधुसंतांविषयींच्या धर्मोपदेशाचे चार खंड ).

Baculo Pastoral ( Pastoral Staff ).

---

( 13 ) **Ibid.**, p. 495.

( 14 ) Ibid., pp. 406-7.

Fr. Luiz de Granada कृत Symbolo de Fe' (Symbol of Faith). हें मूळ ग्रंथाचें भाषांतर असावें.

Symbolo do Cardeal Bellarmino. हेंहि भाषांतर वा रूपांतर असावें.

Manual para os Parocos & Reitores. (पॅरिशचे पाद्री व रेक्टरांसाठीं सारसंग्रह).

Paixao de Christo (खिस्ताचें वधस्तंभारोहण किंवा अखेरच्या यातना), हें तीन हजार ओव्यांचें काव्य होतें.

Explicacao do Credo, (धर्मसूत्रसंग्रहाचें स्पष्टीकरण) Vida dos Apostolos (प्रेषितांचें जीवन) वगैरे. याच ग्रंथांत निरनिराळे पुरावे देऊन (हिंदूंच्या) मूर्तिपूजेचें, भोळ्या समजुतींचें व धार्मिक आचारविचारांचें खंडन करण्यांत आलें होतें.

Das miserias humanas (मानवांच्या आपत्तीसंबंधीं), gravidade do peccado (पाप माहात्म्य), quatro Novissimos (चार अंतिम उद्दिष्टें), & dos Beneficios de Deos (देवामुळें होणारे फायदे).

बिब्लिऑतॅक लुझितानच्या माहितीप्रमाणें हे शेवटचे दोन ग्रंथ सहा हजार ओव्यांचे असून त्यांना 'विवेकमाला' असें नांव दिलेलें होतें. या ग्रंथांत जेंतिवांचे (हिंदूंचे) अपराध व देवदेवता यांसंबंधीं विद्वत्तापूर्ण विवेचन केलेलें होतें, अशी माहिती आहे.

या व्यतिरिक्त फ्रै मिगेलनें फादर स्टिफन्सची स्तुति करण्यासाठीं एक १४ ओव्यांचें कवन (Poesia) केलें होतें, तें स्टिफन्सच्या खिस्तपुराणाच्या आरंभीं छापलेलें आहे. फ्रांसिस्की पंथीयांचें आज घटकेला उपलब्ध असें मराठी भाषेंतील एवढेंच वाङ्मय शिल्लक असल्यामुळें त्या १४ ओव्या मी J. L. Saldanha यांनीं १९०७ सालीं मंगलोर येथें संपादून प्रसिद्ध केलेल्या खिस्तपुराणाच्या ४ थ्या आवृत्तींतून उद्‌धृत करीत आहें :—

साधु चतुराग्रु पाद्री। हेआ पुराणाचा अदिकारी ॥
थोमास इस्तेव्हं कवित्वसुंधारीं। मिरवला चांगु ॥ १ ॥

तेआचे उतम सत्त्वगुण। पर उपेगी आचरण ॥
देव सेवेसि उताविळ मन। जाणवे पुराण कर्तवें ॥ २ ॥

तेआ आणी नामा जोति पडे। हें तेआ ठायिं घडे ॥
ऐसें आपुलेनि कैवाडें। जगजिवनें केलें ॥ ३ ॥

थोमास(१) म्हणिपे पाताळ। तेआचें सत्त्व ग्न्यान अठाव अकळ ॥
पर पुराण वाखे निर्मळ। सब्द खोल गंभेर ॥ ४ ॥

इश्तेव्हं(२) नामाचा विवरु। जैत मुकुटाचा वरु ॥
ता सिरिं सोभे परिकरु। तेआ ठाईं ॥ ५ ॥

तेआचेनि बतिस लखेणें। मकुटा जाहालें घडणें ॥
सत्त्व पुण्याचेनि रत्नें। मिरवला हिंदुस्थानीं ॥ ६ ॥

आबेल आदांव सुतु मागें। निमोनि गेल्या लोटलिं युगें ॥
पर अनदिन जगीं। बोलतसे ॥ ७ ॥

निमाला बोलतो म्हणतां। अभिनव वाटे ऐकतां ॥
पर महंत ते जिवंत। बोलिलें पूर्वचार्यें ॥ ८ ॥

पाहा कवण ते महंत। बोलती जैसे जिवंत ॥
ते पुण्यसीळ नितिवंत। निमाले जे ॥ ९ ॥

धर्म नितिचा करोनि उद्भावो। पुण्य सत्त्वाचा पैरावो ॥
सत्त्वा अवगुणाचा वेगळावो। दाविती जे ॥ १० ॥

हें थोमासें सकळ। जन लोकासि दाविलें निर्मळ ॥
तेआस्तंव ता सदां काळ। बोलतो जगीं ॥ ११ ॥

जरीइ ता निमाला। तरीइ जिंतुचि उरला ॥
आबेला सरी नित्यकाल। बोलतसे ॥ १२ ॥

ऐसा हा साधु महंतु। महंतु ता जिवंतु ॥
प्रसिध पुराणीं जिंतां आंतु। बोलतो देखोनि ॥ १३ ॥

तेआसि सकळांचा नमस्कारु। अवघेयांसि केला उपेगु थोरु ॥
तेणें अर्गदानाचा मेरु। अर्पिती देवा ॥ १४ ॥

---

1. Probably from the Sanskrit तामसं ( tamasam ), darkness; hence, by a figure of speech, the unfathomable regions of darkness.

( J. L. Saldanha, संपादकाची तळटीप )

2. ( Greek ), Stephen, a crown.

( J. L. Saldanha, संपादकाची तळटीप )

# मुरलीचें चरित्र

कवि – शिवराम

(जन्म श. १५५४, मृत्यु श. १६११)

(१) आयका हो चरित्र। भक्तिचें पवित्र॥ सांगेन विचित्र। तुह्मांलागीं॥१॥ श्रोते वक्ते तुह्मीं। सावध मनोधर्मीं॥ प्रार्थितों निष्कामी। श्रवण करा॥२॥ पूर्विंचें कथन। जीर्ण पुरातन॥ नसे मिथ्या ज्ञान! सत्य होय॥ ३॥ कोणे येके दीनीं। आले नारदमुनी॥ ह्मणति रुक्मिणी। अैकें मात॥४॥ पाहुनि रुक्मिणी। नारदासि तेव्हां॥ सिंव्हासनिं पाहा। बैसवीलें॥५॥ आदर-उपचार। करुनि सर्वही॥ नव प्रष्ण तेही। पुसतसे॥६॥ कोठोनि गमन। जालें मुनिराजा॥ पुसतसे भाजा। श्रीकृष्णाची॥७॥ मुनिराज ह्मणे। सांगतों मी तूज॥ चित्तिं धरीं आज। विसरूं नको॥८॥ तुझा अधिकार। श्रीकृष्णपायासी। किती गर्वें जासी। सखे बाई॥९॥ पाहें पां हें भाग्य। मुरलिचें कैसें॥ अधरिं ते वसे। कृष्णाचीया॥१०॥ बहुत प्रियकर। ऐसि कैसि जाली॥ तुला हे कळ्ली। नाहीं मात॥११॥ उंचनीच गोष्टी। मुनि बोलतसे॥ सिवराम संतोषे। मनामाजी॥१२॥

(२) आइक मुरलीचें। पूर्ववर्तमान॥ येकनिष्ट श्रवण। करीं आता॥१॥ पृथ्वीवरि पुरी। वसती ब्राह्मणांची॥ नासिक त्रिंबकाची। प्रतिमा ते॥२॥ पवित्र तें स्थान। पुण्यभूमि जाण॥ तेथें एक ब्राह्मण। अधिकारी॥३॥ सर्व ब्राह्मणांत। तोचि अग्रगणी॥ शागीर्द-सनमानी। येक असे॥४॥ शागीर्द-मुलांनीं। रात्रिं संथा घ्यावी॥ मनिं विचारावी। आपुलीया॥५॥ गीर्वाण व्याकरण। गीताभागवत॥ ब्रह्मकर्म-विख्यात। पूर्ण जाला॥६॥ गुरुगृहिं कोण्ही। अश्वशाळेवरी॥ अनामिक द्वारीं। तिष्टत असे॥७॥ दाणा पाणी चारा। करावा तयानें॥ रात्रिं जागरणें। नित्य सेवा॥८॥ माडींत बैसोनी। शागीर्द पढत॥ अंत्यज ह्मणत। संथा तैसी॥९॥ सर्वविद्याप्रवीण। जाला अनामिक॥ वेदाचें कृत्य। सर्व कळ्लें॥१०॥ करमेना तयासी। मनिं जाला उदास॥ टाकोनिया देश। निघता जाला॥११॥ कुडी अंत्यजाची। बुद्धि शास्त्रज्ञाची॥ ह्मणोनि स्त्रीपुत्राची। गोडी न लगे॥१२॥ गृहकृत्य केलें। पुढें काय जालें॥ शिवराम बोले। तेंचि आतां॥१३॥

(३) टिळा टोपी माळा। वेश ब्राह्मणाचा॥ विद्यासंपत्तीचा। आंगीं भर॥१॥ दक्षिण दिशेचा। मारग धरीला॥ गंगातीरीं आला। पैठणासी॥२॥ वस्तीसि राहिला। कर्मनिष्ठ जाला॥ स्नानसंध्यानेमाला। शुद्ध चाले॥३॥ सन्मान प्रतिष्ठा। नगरीं बहुत जाली॥ कृपा हरिनें केली। तयावरी॥४॥ पढाया ब्राह्मण। बहुतचि आले॥ पारंगत जाले। विद्याविषयीं॥५॥ शास्त्रज्ञ ब्राह्मण। त्या नगरिं विख्यात॥ वेद पुसे गोत्र। प्रवर त्यासी॥६॥ त्यानें यथातथ्य। सर्व निवेदीलें॥ कन्येतें अर्पिलें। आपुल्या हो॥७॥ यथाविधि

लग्न। केलें च्यारी दिवस ।। पाहोनिया संतोष। जामातासी ॥ ८॥ जामातासि घरीं। ठेविलें तयानें ॥ नारदमुनि सांगे। रुक्मिणीसी ॥ ९ ॥ कोणे येके दिवसीं। स्त्री ह्मणे भ्रतारा ॥ चलावें माहेरा। आपुलीया ॥ १० ॥ फार दिवस जाले। भेटी मज नाहीं ॥ ह्मणोनियां पाहीं। विनवीतें ॥ ११ ॥ विनवणी करीतां। तयेसि आनंद ॥ सिवरामा खेद। बहुत वाटे ॥ १२ ॥

( ४ ) निकें म्हणोनियां। निश्चयासि आला ॥ उभयतांला केला नमस्कार ॥१॥ सासूसासऱ्याला। पुसोनियां जातां ॥ मातातात भ्राता। भेटीलागीं ॥ २ ॥ सर्वांसि आनंद। जाला परमानंद ॥ आवडिचा छंद। म्हणोनियां ॥ ३ ॥ बापें आनंदोनी। बोळविलें तीला ॥ मनिं दचकला। अंत्यज तो ॥ ४ ॥ माझें घरदार। महारवाडा सर्व ॥ काय दाउं बरव। ईजलागीं ॥ ५ ॥ अस्तीचे पर्वत। मांसाचि ते खाणी ॥ पाहातां हे मनीं। कंटाळेल ॥ ६ ॥ ऐसें विचारोनि। पाप उद्भवलें ॥ स्त्रियेसि तो बोले। ऐका काये ॥ ७ ॥ म्हणे प्रियकरे। जीवन पाजणें ॥ आपुल्या हातानें। जाण आतां ॥ ८ ॥ पतिव्रता सती। घेउनि तांबयादोर। सत्वर काढी नीर। त्या विहिरीसी ॥ ९ ॥ पाणी काढायासी। पत्नी दोर घाली ॥ मागुनी लोटियेली भ्रतारानें ॥ १० ॥ चांडाळें लोटीलें। कुपिं लगबगा। तेथुनि चालीला अती वेगें ॥ ११ ॥ मनिं संतोषला। म्हणे नीट जालें ॥ सर्वस्व राहीलें। नांव माझें ॥ १२ ॥ ऐसा देसिं गेला। सर्वांसि भेटला ॥ आप्तवर्ग त्याला। कीर्ती सांगे ॥ १३ ॥ केलें वर्तमान। न सांगे कोण्हासी ॥ स्त्रीहत्या तयासी। आठवींना ॥ १४ ॥ पूर्व सवंस्कार। लाधला तयासी। कवि सिवरामासी। काये बोले ॥ १५ ॥

( ५ ) मायेबाप त्यासी। सख्यासोयेऱ्यांसी ॥ भेटी जाली सर्वांसी। दैवयोगें ॥ १ ॥ तया आश्रमाची। वर्तणूक देखोनी। त्रासला तो मनीं। सर्वज्ञ हो ॥ २ ॥ आतां जावें म्हणे। श्वशुरगृहासी। सांगावें तयासी। वर्तमान ॥३॥ दोष शेनीपात*। जाहाला स्त्रियेसी ॥ तेणें निधनासी। पावलीसे ॥ ४ ॥ ऐसा नाना विचार। करि निरंतर ॥ चालीला सत्वर। वाटचाली ॥ ५ ॥ इकडे वर्तमान। मागील परीसा ॥ वर्तली जे कथा। कुपामाजी ॥ ६ ॥ लोटितां तयानें। पडली उदकीं ॥ सांपडली निकी। मुळी तेव्हां ॥ ७ ॥ धरोनि बसतां। मुशाफेर आला ॥ काढियेलें तीला। तेची वेळे ॥ ८ ॥ तेथुनिया आली पित्याचे सदना। माता पुसे जाणा। संसारासी ॥ ९ ॥ बाई लवकरी। कां वो सखे आली ॥ भ्रताराचि केली। नाहीं सेवा ॥ १० ॥ भ्रताराचें गृह। टांकिलें त्वां काये ॥ माझे पोटीं माये। उपजली ॥ ११ ॥ ऐसा हा प्रस्तावा। परस्परें व्हावा। तितुकियांत तेव्हां। आला पति ॥१२॥ पुढें जें वर्तलें। त्याचि आतां कीर्ति। सांगे रुक्मिणीप्रती। नारद तो ॥१३॥

* [ सन्निपात ] त्रिदोष.

तोचि देशी भाषे । सिवराम सांगे ॥ श्रोते दीजे आंगें । अवधान ॥ १४ ॥ ( ६ ) पतिसि देखतां । पतिव्रता गेली ॥ गृहांत बैसली जाऊनीयां ॥ १ ॥ निद्रेकाळीं तेव्हां । शेजे बाजेवरी ॥ पतिव्रता जाली । सादर ते ॥ २ ॥ येकांत पाहोनी । करि विनवणी ॥ जोडोनियां पाणी प्राणनाथा ॥ ३ ॥ काय म्यां अन्याय । केला होता स्वामी ॥ उदकांत तुम्हीं । लोटीयेलें ॥ ४ ॥ अन्याय नसतां । लोटियेलें मज ॥ तेव्हां ब्रह्मबीज । सत्य नोहे ॥ ५ ॥ प्राण घ्याल आतां तरि दासी तुमची ॥ बोलावी मनींची सत्य मात ॥ ६ ॥ कोणता तो वेद । गोत्र तें कोणतें ॥ प्रवर ते मातें । केव्हां द्यावे ॥ ७ ॥ सांगा तुमचा देश । नांव तुमचें काय ॥ जेणें होय सोय परमार्थाची ॥ ८ ॥ ऐसि ऐकोनीया । कांतेचि विनवणी ॥ कळवळला मनीं । अंत्यज तो ॥ ९ ॥ म्हणे जें होणार । तेंचि जालें पाहीं ॥ आतां खेद नाहीं । या कर्माचा ॥ १० ॥ जाती अनामिक । तुज भ्रष्टविलें ॥ काय सांगूं बोलें । कीं आतां ॥ ११ ॥ वेद तो कोणता । गोत्र आतां कोण ॥ पुसुं नका जाण । विचार हा ॥ १२ ॥ तेव्हां पतिव्रता । लगबगा उठली ॥ मौन्येंचि आली पितयाजवळीं ॥ १३ ॥ पित्यासि बोलत । तेचि ऐका मात ॥ सिवराम सांगत । श्रोतीयांसी ॥ १४ ॥ ( ७ ) ह्मणे आजि तात । माझी ऐका मात ॥ निःशंक बोलत । तुह्मांलागीं ॥ १ ॥ शास्त्रवेत्ते तुह्मीं । पुसतें तुम्हांसी ॥ स्पर्शिलिया पात्रासी । काय कीजे ॥ २ ॥ ब्राह्मणाचें पात्र । स्पर्शिला अपवित्र ॥ तयासि पवित्र । कैसें कीजे ॥ ३ ॥ तेव्हां स्वाभाविक । पिता बोलतसे ॥ वचन परीसें । सांगतों मीं ॥ ४ ॥ भांड्या नीचयाति । जरी स्पर्श जाला ॥ अग्निस्पर्श केला ह्मणिजे शुद्ध ॥ ५ ॥ या परता उपाय । नाहीं आणिक दूजा ॥ परतलि भाजा । जामाताची ॥ ६ ॥ केला अग्नि सिद्ध । कुंड हें प्रसिद्ध ॥ स्नानसंध्या शुद्ध । जाली तेव्हां ॥ ७ ॥ रामकृष्ण ह्मणोनी । देह अर्पियेला ॥ मागें पति आला । तैसाची तो ॥ ८ ॥ पश्चात्तापेंकरूनी । टाकियेली उडी ॥ दोघांची राखोंडी । जाली तेथें ॥ ९ ॥ शांत होतां कुंड । वंश ते निघाले ॥ दोन त्याचे जाले । विभाग ते ॥ १० ॥ वंश म्हणजे वेळु । वृक्ष जाले दोन्ही ॥ सांगे नारदमुनी । रुक्मिणीसी ॥ ११ ॥ येकाचा तो वेळु । येकाची मुरली ॥ चित्तवृत्ति वेधली । गोपीकांची ॥ १२ ॥ ऐसिया मुरलीसी । प्रीति भगवंतासी ॥ सांगे रुक्मिणीसी । नारद तो ॥ १३ ॥ वाजवितो मुरली । वेणुनादीं पाहा ॥ कारण हें जेव्हां । ऐसें जालें ॥ १४ ॥ या दोघांसि कष्ट । बहु जाले भारी ॥ ह्मणोनि अधरीं । धरिली कृष्णें ॥ १५ ॥ तेंचि वर्तमान । पूर्णानंदें कवी ॥ संक्षेपें पदवी । वाखाणीली ॥ १६ ॥ त्याचा हा विस्तार । सिवरामें केला ॥ जगद्रूप जाला । आपणची ॥ १७ ॥

# भागवताचा एकनाथी दशम स्कंध !

रामायण, महाभारत व भागवत हे हिंदु लोकांचे आवडते ग्रंथ आहेत; आणि ते मराठींत आणण्याचे आतांपर्यंत अनेक प्रयत्न झालेले आहेत. भागवतावर जे मराठी ग्रंथ आहेत, त्यांत एकनाथांच्या एकादशस्कंधावरील टीकेला फार मोठें महत्त्व, मान्यता व लोकप्रियता लाभलेली आहे. चतुःश्लोकी भागवत व एकादश स्कंध असे भागवतावरील एकनाथांचे दोनच ग्रंथ प्रसिद्ध आहेत; परंतु अलीकडे ज्ञानेश्वरीच्या जुन्या हस्तलिखितांच्या शोधार्थ पंडित बाळाचार्य खुपेरकर यांच्या समवेत दौऱ्यावर गेलों असतां, बीड येथें ज्या पाटांगण मठांत राजवाड्यांना, त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या ज्ञानेश्वरीचें मूळ हस्तलिखित सांपडलें, त्याच मठांत एकनाथांच्या नांवावर असलेली दशम स्कंधावरील टीका आढळली व हा अपूर्व ग्रंथ पाहून मोठें आश्चर्य वाटलें आणि आनंद झाला.

या ग्रंथाचा विशेष परिचय करून देण्यापूर्वीं या निमित्तानें मराठींत झालेल्या भागवतावरील ग्रंथांचा थोडक्यांत आढावा घेतों.

( १ ) एकनाथांनीं प्रथम चतुःश्लोकी भागवत लिहिलें. तें लिहिण्यास काय कारण झालें हें त्या ग्रंथांतच त्यांनीं नमूद केलें आहे :—

गोदावरी उत्तम तीरीं । चौ योजनाचा चंद्रगिरी ।
श्रीजनार्दन तेथवेरी । स्वभावें गेला ॥
तो अति दीर्घ चंद्रगिरी । तळीं चंद्रावती नगरी ।
तेथ चंद्रनामा द्विजवरीं । वस्ती त्या घरीं स्वभावें घडली ॥
तेणें चतुश्लोकी भागवत । वाखाणिलें यथार्थ युक्त ।
तेणें श्रीजनार्दन अत्यंत । जाला उत्सवयुक्त अद्भुत स्वानंदें ॥
तेथ स्वानंदें गर्जोन । श्रीमुखें श्रीजनार्दन ।
बोलिला अति सुखावोन । हे गुप्त ज्ञान देशभाषा वर्णीं ॥
तैं मज प्रथमावस्था । जेणें संस्कृत पदपदार्था ।
परि बापु आज्ञेची सामर्थ्यता । वचनें ग्रंथा प्रबोध जाला ॥

चतुःश्लोकी भागवतावरील एकनाथांची ही टीका पाहून जनार्दनस्वामींस मोठा संतोष झाला व त्यांनीं श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावर व्याख्यान करण्यास आपल्या शिष्यास आदेश दिला, असें कै. भावे लिहितात. हा ग्रंथ एकनाथांनीं पैठण येथें आरंभिला व पांच अध्याय त्या ठिकाणीं पुरे केले. बाकीच्या सव्वीस अध्यायांचें काम त्यांनीं काशी येथें श्रीमणिकर्णिकेच्या तीरावर चालू करून तें शके १४९५ मध्यें शेवटास नेलें.

( २ ) "श्रीमद्भागवत एकादश स्कंध" या नांवाचा ग्रंथ भास्कर महानुभाव पुणेकर यांनीं इ. स. १९११ सालीं प्रसिद्ध केला. याची पाठभेदासह आवृत्ति

डॉ. वि. भि. कोलते यांनीं इ. स. १९३५ सालीं छापिली. याचा कर्ता भास्करभट्ट बोरीकर हा महानुभाव आहे. हा कवि एकनाथपूर्व होय. भागवतावरील मराठींतील सर्वांत आधींचा हा ग्रंथ दिसतो.

( ३ ) एकनाथांच्या एकादश स्कंधापूर्वीं रचण्यांत आलेली भागवताच्या दशम स्कंधावरील टीका कृष्णदास सामा किंवा सामराज याची होय. हा गोमंतकस्थ कवि असून हा ग्रंथ त्यानें श. १४४८ सालीं पुरा केला. याची रोमन लिपींत लिहिलेली हस्तलिखित प्रत अलीकडे पोर्तुगालमध्यें सांपडली आहे. ती सुप्रसिद्ध क्रिस्तपुराणकर्ता फादर स्टिफन्स याच्या हस्ताक्षरांत असावी. हा ग्रंथ अप्रकाशित आहे.

( ४ ) एकनाथपूर्व तिसरा ग्रंथ बहिरा, जातवेद याची दशम स्कंधावरील भैरवी टीका होय. याचें एक हस्तलिखित आम्हांला अहमदनगर येथें कांहीं वर्षांपूर्वीं पाहावयास मिळालें. तें अलीकडे तिकडील मिशनरी कॉलेजनें मिळविलें असून त्या कॉलेजचे संस्कृतचे प्राध्यापक डॉ. द. गं. कोपरकर हे तें संपादित आहेत. या टीकेचा एक अध्याय मराठी संशोधनपत्रिकेच्या वर्ष २ ( जाने. १९५५ ) मध्यें नमुना म्हणून प्रसिद्ध झाला आहे.

( ५ ) दशम स्कंधावरील तिसरी टीका कृष्ण दयार्णव यांची होय. ही शके १८१३ सालीं बाबाजी तेंडूलकर यांनीं प्रसिद्ध केली. हल्लीं तिचें पुनर्मुद्रण चालू आहे.

( ६ ) दशम स्कंधावरील चौथी टीका शिवकल्याणाची. ती शके १८२६ मध्यें गणेश बळवंत मोडक यांनीं संपादून प्रसिद्ध केली.

( ७ ) कृष्ण याज्ञवल्कि यांनीं आपल्या कथाकल्पतरूमध्यें दशम स्कंध आणलेला आहे.

( ८ ) श्रीधराचा हरिविजय ग्रंथ हाही भागवताचा दशम स्कंध होय. चांदोकरांच्या महाराष्ट्रीय संतकवि काव्यसूचीमध्यें भागवत ( दशमस्कंध ) हा हरिविजयापेक्षां निराळा ग्रंथ दाखविला आहे; ती त्यांची भूल असावी.

( ९ ) माधवसुत ( माधवात्मज वा माधवनंदन ) नांवाच्या कवीची सुंदर अक्षरांत लिहिलेली दशम स्कंधावरील टीका त्रिवेंद्रम् येथें त्रावणकोर विद्यापीठामध्यें मला पाहावयास सांपडली. हिच्या प्रती तंजावरच्या सरस्वतीमहालामध्येंही आहेत. अध्याय ( ९१ ). या कवीची भागवताच्या प्रथम स्कंधावरीलही टीका तंजावरास मीं पाहिली. (अध्याय १९.)

( १० ) रघुनाथ शेष नांवाच्या कवीनें लिहिलेली दशम स्कंधावरील टीका औंध येथील पंतप्रातिनिधिसंग्रहांत आहे.

( ११ ) स्वयंज्योति याचीही दशमस्कंधावरील टीका औंधच्या याच संग्रहांत आहे.

( १२ ) शिवराम पूर्णानंद याच्या एकादशस्कंधाची एक श्लोकबद्ध टीका धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत आहे. हें हस्तलिखित पूर्ण नसावें.

तंजावरच्या सरस्वतीमहालांत आणखी कांहीं कवींच्या भागवतांचीं हस्तलिखितें पाहावयास सांपडलीं. तीं अशीं :—

( १३ ) अवधूत–चतुर्थस्कंध, अध्याय ३१.

( १४ ) वासुदेव व अंबाजी पंडित–अष्टम स्कंधाचे १–६ अध्याय वासुदेवाचे व ७ ते २४ अंबाजी पंडिताचे. वासुदेव–नवम स्कंध, अध्याय २४.

( १५ ) गंगाधर— द्वितीय स्कंध, अ० १०; तृतीय अ० ३३; पंचम, अ० २६; षष्ठ, अ० १९; सप्तम, अ० १५; नवम, अ० २४; दशम, अ० ९०; द्वादश अ० १३. पहिला, चवथा, आठवा व अकरावा हे स्कंध यानें रचिले होते कीं काय माहीत नाहीं.

( १६ ) नरसिंहदास— दशम स्कंध, अ० २६.

( १७ ) पंडित— दशम स्कंध, अ० ३० ( श्लोकबद्ध ).

( १८ ) मोरोपंतांचे कृष्णविजय, मंत्र भागवत व मंत्रमय भागवत हे ग्रंथ प्रसिद्धच आहेत.

( १९ ) जनपंडित नांवाच्या एका कवीनें विविध वृत्तांत लिहिलेलीं दशमस्कंधावरील काव्यांचीं हस्तलिखितें आहेत. उस्मानिया विद्यापीठामधील हस्तलिखितांचा शोध करतांना मला त्यांचें एक अपूर्ण हस्तलिखित आढळलें व तें प्रसिद्ध करण्यासारखें असल्याचें तिकडील मराठीच्या प्राध्यापकांस मीं सांगितलें. त्याची दुसरी एक त्रुटित प्रत हैद्राबादच्या मराठी साहित्यपरिषदेमध्यें आढळली. या ग्रंथाचें नांव लीलाभागवत असें आहे. हा ग्रंथ प्रतिष्ठान मासिकांत क्रमशः प्रसिद्ध होत होता. ( वर्ष ३, मार्च १९५६ ).

तंजावरच्या सरस्वतीमहालांत असलेलें पंडितविरचित भागवत व वरील लीलाभागवत एकच तर नाहींना, अशी एक शंका आली. याशिवाय भागवताच्या दशम स्कंधावर जयरामस्वामींनीं रचना केली असून हा ग्रंथ काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाल्याचें चांदोरकर लिहितात; परंतु तो शोध करूनही आम्हांस पाहावयास मिळाला नाहीं. या दशम-स्कंधाची ओवीसंख्या ९९५९ आहे, असें महाराष्ट्र सारस्वतांत भावे लिहितात. तसेंच रत्नाकर, रामानंद, लोलिंबराज ( दशम ), शामाराध्य यांनींही ग्रंथ लिहिले असल्याचें चांदोरकरांच्या सूचींत नमूद आहे. पण त्यांच्या हस्तलिखितांचा आम्हांला थांग लागलेला नाहीं. शामाराध्याच्या स्कंध २ व १० वरील टीका उपलब्ध असल्याचें 'मयूरकाव्य-विवेचन' या ग्रंथांत प्रा. श्री. ना. बनहट्टी लिहितात; परंतु हें त्यांचें विधान 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या आधारें केलेलें असावें. चतुःश्लोकी भागवतावर एकनाथांशिवाय वामन, शिवकल्याण, कृष्णदास

बैरागी यांनींही रचना केली आहे. भागवताच्या आख्यानांवर तर वामनादि पुष्कळ कवींनीं काव्यें लिहिलीं आहेत. त्यांची गणतीच नाहीं.

एकनाथांच्या नांवावरील दशम स्कंधाचें प्रस्तुत हस्तलिखित पाहिल्याबरोबर त्याचीं अस्ताव्यस्त असलेलीं पानें नीट लावून हा ग्रंथ पूर्ण आहे याची प्रथम आम्हीं खात्री करून घेतली. रात्रीचे १०॥–११ वाजले होते. त्यामुळें व इतर बाडें व गळाठा तपासावयाचा असल्यामुळें त्यावेळीं या हस्तलिखिताचें जास्त काळजीपूर्वक निरीक्षण करणें शक्य नव्हतें. याचीं पानें २५३, प्रसंग म्हणजे अध्याय ३७ व एकंदर ओव्या ३३९७ आहेत, एवढी माहिती मीं टिपून घेतली.

मुक्कामाला येऊन अंथरुणावर पडल्यावर हें हस्तलिखित कसें हस्तगत करावें हा विचार करूं लागलों. कोणतेंही पुस्तक मिळवावयाचे तीन मार्ग प्रसिद्ध आहेत. Buy, borrow आणि steal. यांपैकीं पहिले दोनच आम्हांला मान्य होते. हस्तलिखित विकत द्या, म्हणणें त्याच्या मालकाला अपमानकारक वाटण्यासारखें होतें. उसनवट मागण्यास आम्हांला धैर्यच नव्हतें; कारण पांचसहा दिवस हस्तलिखितांच्या शोधार्थ ज्या ज्या लोकांकडे गेलों, ते ते राजवाडे, पांगारकर वगैरे ( विद्यमान व्यक्तींचीं नांवें देत नाहीं ) लोकांनीं हस्तलिखितें उसनवट नेलीं तीं अनेकदां मागूनही कधीं परत आलीं नाहींत म्हणून एकंदर संशोधकांच्या नांवानें सारखे खडे फोडीत होते ! तेव्हां पहिल्या मार्गाचा पर्याय म्हणजे त्या हस्तलिखिताच्या बदली आमचीं प्रकाशनें किंवा त्यांना हवीं असलेलीं अन्य मुद्रित पुस्तकें देणें, किंवा दुसऱ्या मार्गाचा पर्याय, हस्तलिखित परत करीन याबद्दल करारपत्र लिहून देऊन कांहीं ठराविक रक्कम त्यांच्याकडे अनामत ठेवणें व पुस्तक छापल्यास त्यांना कांहीं प्रती देणें; या सूचना आम्हीं त्यांच्यापुढें भीतभीतच ठेविल्या. त्यांचा विचार करतों, असें ते म्हणाले. बीडहून निघण्याच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं पं. खुपेरकर व मी एका सभेंत बोलणार होतों. सभेच्या पूर्वीं पंधरा मिनिटें एका गृहस्थांबरोबर त्यांच्याकडे मठांत जाऊन हस्तलिखित देण्यासंबंधींचा त्यांचा विचार काय ठरला, हें त्यांना विचारलें. त्यांनीं माझी दुसरी सूचना मान्य केली व त्याप्रमाणें कांहीं रक्कम त्यांच्याजवळ ठेवण्याचें कबूल करून त्याप्रमाणें करारपत्र लिहून दिलेंही : पण करारपत्र वाचतां वाचतां त्यांचा विचार एकाएकीं बदलला. अनामत ठेवू केलेल्या पैशांच्या चौपट रक्कम द्या, व हस्तलिखित कायमचें घेऊन जा; या पैशांतून आम्हांस हवीं असलेलीं पुस्तकें विकत घेऊन संग्रहीत करूं, असें ते म्हणाले. स्वतः एकनाथांचाच स्वरचित हा दशम स्कंध हें निश्चित असतें तर त्यांनीं मागितलेली रक्कम फार नव्हती. याबद्दल माझी पूर्ण खात्री असती तर त्याच्याही चौपट रक्कम मीं दिली असती: परंतु हा ग्रंथ मुळींच न वाचतां एवढी रक्कम देणें निव्वळ सट्टेबाजी होती. बरोबर आलेल्या गृहस्थांमार्फत ' तुम्हीं सभेंत एकटेच बोला, मी येऊं शकत नाहीं, ' असा पंडित खुपेरकरांना मीं निरोप पाठविला, व

तें हस्तलिखित वाचूं लागलों. कांहीं ओव्या वाचल्या नाहींत तोंच त्याच्या बनावटपणाबद्दल शंका आली, आणि थोड्याच वेळांत ती निश्चित झाली. जास्त खात्री करून घेण्याकरितां मठांत असलेलें नाथांच्या एकादश स्कंधाचें हस्तलिखित व रुक्मिणीस्वयंवर मागवून ते ग्रंथ मीं चाळले व त्या ग्रंथांतील भाषेचें, रचनेचें किंवा विचारांचें तेज या दशम स्कंधांत मला मुळींच आढळलें नाहीं.

एकनाथांनीं दशम स्कंध लिहिलेला आहे, असें कोठेंतरी नमूद आहे असें पं. खुपेरकर म्हणाले व मलाही तसें वाचल्याचें स्मरत होतें. मुंबईला आल्यावर डॉ. म. अ. करंदीकर यांनीं, प्रा. बनहट्टींनीं आपल्या मयूरकाव्यविवेचनांत तसें विधान केल्याचें सांगितलें. त्यांना विचारतां तसें आपण कोठें तरी वाचलें आहे, पण कोठें तें आतां आठवत नाहीं, असें त्यांनीं उत्तर दिलें.

बीड येथें तास-दीड तासाच्या अवधींत मीं या दशमस्कंधाची कांहीं टिपणें व उतारे घेतले व तेथील एक पदवीधर शिक्षक श्री. भगवान वाघमारे यांनीं कृपा करून पहिल्या व पांचव्या अध्यायाची नक्कल करून पाठविली. पहिल्या अध्यायाच्या सुरुवातीच्या कांहीं ओव्या, पांचवा सबंध अध्याय व शेवटच्या सदतिसाव्या अध्यायाच्या समाप्तीच्या कांहीं ओव्या येथें उद्धृत करतों; म्हणजे वाचकांना आपलें स्वतःचें मत बनवितां येईल, व नाथांनीं दशम स्कंध लिहिला आहे या प्रवादाचा एकदाचा कायमचा निकाल लागेल.

# "दशम स्कंद टीका—प्राकृत"

## अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्री अन्तयै नमः ॥
श्रीमज्जनार्दनगुरवे नमः ॥

ॐ नमो जी वक्रतुंडा। कृपानिधी तुं प्रचंडा ॥ परि पूर्णत्वें उदंडा। परि वेगळाचि ॥ १ ॥ ॐ नमो जी भारती। वेदमाता सरस्वति । तुझेनि ब्रह्मरूपाची प्राप्ति। ऐसी किर्ति तुझी पांग ॥ २ ॥ नमुं कुळीची कुळदेवता। जे विश्वव्यापक जनिता ॥ मूळ प्रकृति मूळ माता। आदि अव्यक्ता सहज-रूपे ॥ ३॥ सहजगुरु जनार्दन। जें का ब्रम्ह परिपूर्ण ॥ सहज स्थिति करितां अवलोकन। होये प्राप्ति ज्ञानाची ॥ ४ ॥ जो पूर्णानंद प्रकाशला। हृदयाचळिं उदयो जाला ॥ तेणें परमानंद हेलावला। कृष्णालिला वर्णावया ॥ ५ ॥ हे इतर कथा नव्हे बापुडी। नित्यानंद नित्य गोडी ॥ सेऊं जाणति जे परवडी। तेचि गुढी वैकुंठीं उभारिली ॥ ६ ॥ पय आणि पाणियासि। निवडुनि घेइजे राजहंसी ॥ कृष्णकथेची गोडी नीज भक्तासि। नींदकासि काय होय ॥ ७ ॥

येथुनी भागवताचा महापुरु। शुकवदनीं निघे वेगवत्तरु॥ जनार्दन कृपेनें येका साचारु। कृष्णरसे लाधला पै॥९॥ येथुनी श्रीकृष्णचरित्र। श्रवणीं जग होये पवित्र॥ संत म्हणति आमचे श्रोत्र। श्रवणार्थि भुकेले॥१०॥

..........................................................................................

..........................................................................................

आतां पुढील अनुसंधान। शुकदेवें केलें पाहिजे निरोपण॥ येका जनार्दन कृपेनें। श्री भागवत वदत असे॥७८॥

## प्रसंग पांचवा

श्रीजनार्दनाय नमः॥

विश्वात्मा तो पाहे। गर्भी येतुसे कृष्णमाये॥ देवकिचे चीन्ह पालटताहे। परिससंगे लोह जैसें॥१॥ गर्भी भरलें पांच मासासि। डोहळीयाचा उद्गार होये देवकिसी॥ बोलति जाली वसुदेवासि। डोहळे पुर्ण करावें॥२॥ येरु म्हणे कार्यी इच्छित। वांछित आसे तुझें चित्त। तें सांग मज निश्चित। तदनुसार उत्तर देईन॥३॥ मज वाटतसे जी प्राणनाथा। कंस वधावा जि आतां॥ राजीस्था पावे उग्रसेननाथा। ऐसी इच्छा डोहळीयाचि॥४॥ कोठे आहे ते नीज शक्ति। ते भेटवी गा प्राणनाथा मुर्ति॥ करूं काय त्या चैद्याचि शांती। भार फेडुं धरणीचा॥५॥ जेणें वधीले साहि बाळा। त्यासि आपटु काय ये वेळां॥ सत्वर दाखविं त्या गोपाळा। जे गोकुळी वाढताती॥६॥ गरुडातें आणी वेगेसी। वधावया जाईन जरासंधासी॥ किं मथुरा मोडुनी द्वारकेसी। वसउं आजि पां॥७॥ येरु म्हणे वो स्थिर स्थिर। तुज काय जाला वो संचार॥ विपरीत बोलसी सुंदरे। ऐकेल कंस जाण पां॥८॥ विपरीत सांगसील गे भावना॥ नाहीं ते भेटवि म्हणसी जाणा॥ काय म्हणावे प्राचिना। संचरलें तुज भुत पां॥९॥ येरि म्हणे मी महद्भुताचा पिता। सर्व भूतातें मी चेष्टविता॥ भ्रम कां पडला रे तुझ्या चित्ता। कैसा जालासी रे मुढमति॥१०॥ म्यां जळिं पाषाण तारिले। वानरांकरीं राक्षेस मारिवीले॥ माझ्या काये जाणसी आवळिले। विचित्र माया माझी पां॥११॥ म्हणसी देवकिस संचार जाला। नेणसी गर्भी कोण आला॥ कोण बोलतें रे या बोला। तें तुं कैसें नेणसी॥१२॥ तुज कैसा रे भ्रम जाला। रावण कोणे तो वधीयेला॥ जन्मांतर नेणसी वहिला। काये तुज उपदेशावें॥१३॥ हें काय रे देवकीचे

चीन्ह । नेणसी कैसा तुं खुण ॥ बिभिषणासी राज्य कोणें । दीधलें जाण तुं नेणसी ॥ १४ ॥ देखिलासी तुं अपार मुर्ख । कंस तें बापुडें काय मशक ॥ त्याचा घेतला इतुका धाक । आरे आरे वसुदेवा ॥ १५ ॥ ऐसे गर्भसंभुतीसी । अष्टम मास दीनत्रयासि ॥ पुर्णत्व आलें गर्भासि । मग कैसें वर्तलें पां ॥१६॥ येरीकडे तो कंस असुरु । गणीत करी दीवसाचा पामरु ॥ नवमास देवकिस साचारु । मग विचारु करि पां ॥ १७ ॥ म्हणे जो सांगीतला अष्टमासी । त्याच्या जाले पूर्ण दीवसासि ॥ रक्षण ठेवावें बंदीशाळेसी । बळिवंत विरु पां ॥ १८ ॥ मग चाणूर केशीय पाचारिला । तैसाचि शंखासुर आळवीला ॥ आघासुर तोहि आला । मीळाले सभेसी ॥ १९ ॥ रावो त्यातें नीवेदन करीत । अष्टमाचा संपुर्ण वृत्तांत ॥ दिवस जाले जाणा गणीत । जावें आतां बंदिशाळेसी ॥ २० ॥ घेऊनी अपार सैन्यासी । तैस्याचि कुंजरांच्या थाडियेसी ॥ लोह आगळा वसउनि हातेसी । बरवें रक्षण करावें ॥ २१ ॥ मग ते आले बंदिशाळे जाण । बैसले रक्षणा लागुन ॥ तव गर्भासी जाले परीपूर्ण । नव मासासि पाहें पां ॥ २२ ॥ श्रावण मास कृष्णपक्षासि । दीवस म्हणाल तरी अष्टमीसी ॥ माध्यान्ह होतां निसीसि । कृष्णनाथ प्रगटले पां ॥ २३ ॥ आश्चर्य करी समर्थु । केली सर्व नीद्राभुत । महावंतांचे अंकुश पडत । विरांचीं गळती शस्त्रें पां ॥ २४ ॥ जैसें चीत्रीचें जी लेखन । ऐसे नीचेष्टित केले जन ॥ का गा सुरमुखीं पावा जाण । जगन्नायकें घातला ॥ २५ ॥ गर्धवासुरामुखीं मोहरी । आणि पांचजन्यु शंखासुरी ॥ लीलाकौतुक तो श्रीहरी । नटनाट्य खेळतसे ॥ २६ ॥ देवकि आणी वसुदेवासी । नीद्रा घातली त्यांसि ॥ वेण न येतां परीयेसी । कृष्णमाउलि प्रगटली ॥ २७ ॥ किं कोटि भानु उगवला । तैसा प्रकाश झळाळिला ॥ मेखळेचा चमत्कारु जाला । जैसी वीजु झळकतसे ॥ २८ ॥ उजीयेड पडिला बंदिशाळेसी । सावधत्व आलें वसुदेवासी ॥ उठविता जाला देवकिसी । प्रकाश कासयाचा दिसे पां ॥२९॥ देवकी गजबजुनि उठीलि । हात नेवो पाहे उदराजवळिं ॥ तव गर्भ न देखोनि ते काळिं । अक्रंदों लागलि तये वेळा ॥ ३० ॥ वसुदेव म्हणे कायसें । रुदन कां आले यो जालें कैसें ॥ येरी म्हणे जी ऐसें । गर्भ उदरीं नसे पां ॥ ३१ ॥ आयीकोन वसुदेव लल्हाट पीटित । कैसे आमचें पाप संचित ॥ कोठुनी होयील ये अष्टम प्राप्त । आह्मा आभाग्यांसी ॥ ३२ ॥ कंस चांडाल दुराचारी । तयानें कापट्य केलें असेल अवधारिं ॥ अष्टम गर्भिचा त्याचा वैरी । नेला असेल कोठुनिया ॥ ३३ ॥ तव हास्य आलें यदुनंदना । आणी वसुदेव ह्मणे देवकितें जाणा ॥ नेला असेल गे काढुनीया खुणा । रुधीरश्राव जाला असेल ॥ ३४ ॥ येरी ह्मणे जी प्राणनाथा । रुधीर न देखों तत्वता ॥ वसत म्हणावें जरी भीजता । तेंहि नीर्मळता असें पां

॥ ३५ ॥ दोघे अहा कटकटा करीति । हास्य करोनि बोले श्रीपति ॥ कां रे भ्रम जाला तुमच्या चितिं । मज जन्मकर्म कैचें पा ॥ ३६ ॥ मी आयोनिसंभव नारायण । दाखविला गर्भाचा भास जाण ॥ तोचि मी रे अष्टपूर्ण । व्हावें सावधान तुम्ही पै ॥ ३७ ॥ अवलोका रे माझिया रुपासी । मिं विश्वात्मा रुषीकेशी ॥ मीं व्यालों तुम्हा दोघांसी । आणी व्यालों तें विश्व पां ॥ ३८ ॥ तव दोघे करीति अवलोकन । चतुर्भुज पीतांबरधारि जाण ॥ कौस्तुभ कीरिटी नारायण । श्रीवत्सलांछन झळकलें ॥ ३९ ॥ गदा आणि सुदर्शन । पांचजन्य चक्र जाण ॥ कासे पीतांबर झमके पुर्ण । ऐसा तो जि देखियेला ॥ ४० ॥ चरणी तोडर गर्जत । अरीमर्दन जगन्नाथ ॥ वामांगीं समुद्र नदिया दिसत । धन्य भाग्य देवकीवसुदेवाचें ॥ ४१ ॥ जैसा स्वप्नी भास दिसत । तैसा त्यातें दाखउनि कृष्णनाथ ॥ बाळपणें त्यांसि बोलत । मज न्यारे तुम्ही गोकुळासी ॥ ४२ ॥ आता न करावा उसीरु । आयीकेल तो दुष्ट कंस विरु ॥ हें आइकोनि आश्चर्य करीती साचारू । उपजताचि बोले बाळक पां ॥ ४३ ॥ ऐसा विस्मय होता दोघासि । पुनरपि कृष्ण बोले देवकिसि ॥ सीकविं गे आपल्या भ्रतारासि । नेयी ऐसें म्हणउनियां ॥ ४४ ॥ देवकि म्हणे जी आयका । सत्वर न्या जि या बाळका ॥ येरु म्हणे लोह-आगळा देखा । कपाटें दुर्घट लागलिं ॥ ४५ ॥ मार्ग न फुटे पीपीलीकेसी । ऐसे रक्षण द्वारेंसीं ॥ काय इच्छीतसे माझ्या मरणासी । काये कृष्णाचें घेउं पा ॥ ४६ ॥ कृष्ण म्हणे तुम्हासी भ्रमु जाला । पाहा पै आपल्या शृंखळकेला ॥ त्या मुक्त कैस्या बंदजाला । पाहा आपुल्या चरणांबुजा ॥४७॥ पाहति जव ते चरणासि । तव शृंखला नाहित त्यासि ॥ त्या कोणें केल्या मुक्तत्वासी । ऐसीयासि तुम्ही कां रे नेणा ॥ ४८ ॥ जेणें तुमतें केले विमोचन । तोचि मि रे आदिनारायण ॥ लोहआगळीं लावा माझा चरण । सहज मुक्तता त्यासी ॥ ४९ ॥ वीर ठेविले म्हणसी रक्षणार्थ । ते म्या केले नीद्रासुत ॥ मी आरीष्टाचा निरशनार्थ । होये कर्ता जगदिश मीं ॥ ५० ॥ सकळां निर्दळण करावयासि । अवतार घेइं मी रुषीकेसी ॥ तुमच्या पुर्वसंचित तपरासी । म्हणौनि कुळीं जन्मलों ॥ ५१ ॥ मग वसुदेवें उचलुनि घेतला । बंदिशाळाद्वारासी आला ॥ लोहआगळिं चरण लाविला । जालिं मुक्त कपाटें ॥ ५२ ॥ मदोन्मत्त द्वारीं होते कुंजर । महाविरुं ते निद्रिस्त विर ॥ श्रीहरी देखोनि निर्धार । गज म्हणति कृतार्थ जालों ॥ ५३ ॥ ज्यासि तपीं सीणति योगी पाहें । त्यासी अप्राप्ती हा होये ॥ धन्य आमुचे भाग्य आहे । जालें कृष्णदर्शन ॥ ५४ ॥ शुंडेने चरणांबुज वंदिती । म्हणति जालांसी आम्हा प्राप्ती ॥ मागुति काय देउनी दैत्याहातिं । जातोसी कृष्णनाथा ॥ ५५ ॥ नेत्रीहुनी जळ पडत । गज तेजी अक्रंदत ॥ म्हणताती

कृष्णसंग प्राप्त । कोठुनी आम्हांसी ॥ ५६ ॥ कृष्ण म्हणे रे पुनरपि आगमन। येणें घडेल कंस वधावया लागुन ॥ देवकिचा करावया बंदिविमोचन। तै दर्शन पुनरपि पां ॥ ५७ ॥ मग आला नगरद्वारासी । वसुदेव पाहे कपाटासी ॥ कृष्णदर्शनी मुक्तता त्यासि । जालि सहजस्थिति पां ॥ ५८ ॥ मग उलंघन केलें नगरद्वार । पावला यमुनेचें तिर ॥ मेघ वर्षती पै तुषार। आगाध करणी कृष्णाची ॥ ५९ ॥ आधीच पै कृष्ण पक्षासी । त्यावरी मेघीं आच्छादिलें आकाशासी ॥ तेणे अंधकारू अधिकेसी । मार्ग न दिसे वसुदेवा ॥ ६० ॥ मग केलें देवें अद्भुत । वीजेमार्गें वीज झमकत ॥ तेणे प्रकाशें वसुदेव पाहात । तव यमुना जळें भरीत देखीली ॥ ६१ ॥ मग चिंता परम वसु-देवासी । काय विचार करावा यासी ॥ आलिया मागें जाणवलें असेल कंसासी । पाठवील दुत धरावया ॥ ६२ ॥ आतां आले यथार्थ मरण। कैचें पहावया देवकीचें वदन ॥ आमचे मुळ छेदावया हा कृष्ण । बरा पोटासि आला पां ॥ ६३ ॥ मग हास्य करोनि देवें बोलिलें त्यासि । नींद्य उत्तर बोलतां दोष आह्मासी ॥ परी देखीला ऐसा मुर्ख दृष्टीसी । ज्ञानहिना वसुदेवा ॥ ६४ ॥ हे यमुना सुर्यकन्यका । कालिंदी नाम इस देखा ॥ हे आचरलि मज यदुनायका । कारणें मग मी जालों प्रसन्न ॥ ६५ ॥ अष्टम अवतार मथुरेसी । घेउनी येतां गोकुळासी ॥ प्रणीन तुज गे निश्चयेसी। ऐसा वरु दिधला पां ॥ ६६ ॥ आतां माझें रे करी स्मरण । अष्टम आला कृष्ण ह्मणोन ॥ ते वंदावया धांवेल चरण । मार्ग तुतें देयील पां ॥ ६७ ॥ तव येरु करी कृष्णस्मरण । वंदु धावे ते श्रीचरण ॥ ह्मणे आजी जाला सुदीन जाण । जालें दर्शन देवाचें ॥ ६८ ॥ ह्मणे काय अज्ञा हो समर्थ । येरु ह्मणे गोकुळासी जावया जगन्नाथ ॥ मार्ग तुतें मी मागत । येरी ह्मणे मी दासी त्याचि ॥ ६९ ॥ मग जाली दोनि भागासी । वसुदेव आला गोकुळासी ॥ निद्रा घातली असे त्या जनासी । ऐसी करणी याचि पां ॥ ७० ॥ नंद तोहि पै नीद्रिस्त । यशोदा तेहि निद्राभुत ॥ अयोनिसंभव जी जन्मता । आदि-माया महाकाळि ॥ ७१ ॥ मग प्रवेशला नीज सदना । तव देखीलि आदि-माया चिद्घना ॥ कृष्ण ह्मणे इस मथुरेसी जाणा । कंसासी जाणवावया ॥ ७२ ॥ मग कृष्णासी यशोदेपुढे घालित । शक्ति उचलोनि घे त्वरित ॥ उलंघन करूनी गोकुळपंथ । आला मथुरेसी तो पै ॥ ७३ ॥ जनार्दन कृपे येका वदत । हा भागवतीचा मथीतार्थ ॥ गोकुळा आला श्रीकृष्णनाथ । श्रोतेजनी परीसीजे ॥ ७४ ॥

इति श्रीमहाभागवते दशमस्कंदे कृष्ण–आदिमायाप्रभवो नाम
पंचमोध्यायः ॥ श्रीजनार्दनार्पणमस्तु ॥

## शेवटचा ( ३७ वा ) प्रसंग ( शेवटच्या ओव्या )

आह्मासी तुझा स्वाद लागला । आणीक रुची नाठवे गोपाळा ॥ काय करावी तुझी द्वारका दयाळा । तुंची नीज पुरी आमची ॥ ७१ ॥ आह्मासी तुं रे पुज्य पाहे । आणीक दैवत असे काय ॥ आह्मी दृढ धरीले तुझे पाये । आणीक भक्ति नावडे ॥ ७२ ॥ तुझे भक्ति हे परतें । वीट घेतला असे चीत्तें ॥ आणीक नावडे आमुतें । तुजवेगळें श्रीकृष्णा ॥ ७३ ॥ काय करीसील मीथ्या माइक । शाश्वत तुझे नीजपद देख ॥ तें टाकुनी परम नीज सुख । इतर सुखें काय दावीसी ॥ ७४ ॥ तेणें कृष्ण संतोशला । धन्य धन्य रे भक्ता भुपाळा ॥ उद्धव ह्मणे न सोडुं पदकमळा । पदपंकज्यालागी पैं ॥ ७५ ॥ हे माया मीथ्या नगर । हे वोडंबरी विद्या निर्धार । आह्मीं शाश्वत पदिचे साचार । हा विचार न सांगीजे ॥ ७६ ॥ मीथ्यासि भ्रमीततेची मुर्ख । हें मायाडंबर आवघें आइक ॥ कासया सांगसी हे आलोकिक ॥ मीथ्या आह्मासी न बोलें ॥ ७७ ॥ कृष्ण म्हणे तुझी मातलेति भक्ति । सर्वांगालागि तुछाकार स्थीति ॥ व्यवहारधर्म हे बुडति । राहो दे स्थीति ज्ञान पै ॥७८॥ कृष्णा तुज सोंगसंपादणी । बहुरुपी खेळसी सारंगपाणी ॥ आह्मी लाते हाणतों सोंगालागुनी । नको दाऊं सोंग पां ॥ ७९ ॥ उद्धव ह्मणे त्यागीतों तुझे पुरीसी । लाते हाणीतों त्या मोक्षासि ॥ नाथीलें दाखविसी या जनासी । आह्मासी नाथीलें न सोसे पां ॥ ८० ॥ मग त्यागीता जाला पुरी द्वारका । मग धावोनि धरी यदुनायक सखा ॥ नको नको रे भक्त पुण्यश्लोका । त्याग आमचा करूं पां ॥८१॥ कृष्ण हनुवटीतें धरीत । नानापरी उद्धवासि बुझावित ॥ तुह्मांवांचुनी मी न शोभत । कां परदेसी करीतां पै ॥ ८२ ॥ तुह्मांवांचुनी मज पुसेल कवण । आतां मी घेतों संन्यासग्रहण ॥ त्यागीतों कांता आणी वैकुंठभुवन ॥ दृढ धरीन चरण तुझे पै ॥ ८३ ॥ पीतांबरातें फेडुनी टाकितु । कीरीटातें टाकुनी देतु ॥ मग बळराम येउनी कृष्णातें बुझावितु । काय करिसी छंद पां ॥ ८४ ॥ ऐसा उद्धव काय आहे । आम्हीं काय नसो यादवराये ॥ कृष्ण ह्मणे रे तुह्मीं मीथ्यामये । देहसमंधी असा पै ॥ ८५ ॥ हे नीज अंतिचे सांगातीं । याचेनी सोहं मज प्राप्ती ॥ येका जनार्दन ह्मणे भक्त किर्ति । देवभक्त येक पां ॥ ८६ ॥ येथुनी रुक्मीणी-सैवरा । पाणीग्रहणी जी अवधारा ॥ विटंबणी चैद्याही रिपुविरा । पुढील रसप्रेमा अवधारिजे ॥ ८७ ॥

इति श्रीमहाभागवते दशमस्कंदे कृष्णउद्धवसंवादे ऐक्यभावो नाम सप्तत्रिंशतिमोध्यायः ॥ ३७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

एवं संख्या वोवि ३३९७ ॥ श्लोकसंख्या ३ येकुन संख्या ३४०० ॥

एकनाथांच्या ओवीचें एक वैशिष्ट्य म्हणजे ती ज्ञानेश्वरांच्या ओवीसारखी साडे-तीनचरणी नसून साडेचारचरणी असते. ज्या कोणी कवीनें प्रस्तुत दशम स्कंध लिहिला त्याच्या लक्षांत आरंभीं ही गोष्ट असावी, असें दिसतें. कारण वर दिलेल्या पहिल्या अध्यायांतील सुरुवातीच्या दहा ओव्यांत पांच ओव्या साडेचारचरणी दिसतात; परंतु पुढें त्याचें या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें किंवा हें पथ्य त्याला पाळतां आलें नसावें. एकंदरींत हा दशम स्कंध प्रसिद्ध संतकवि एकनाथ यांच्या हातचा नाहीं, हें उघड आहे.

परंतु असें करण्यांत या कवीचा हेतु काय ? दुसऱ्याचें लिखाण किंवा विचार चोरून स्वतःच्या नांवावर खपविणें व अशा रीतीनें स्वतःला महत्त्व आणणें या मागचा हेतु कळूं शकतो. अशा कृत्याला वाङ्मयचौर्य असें अलिकडे नामाभिधान करण्यांत आलें असून या वाङ्मयचौर्याचे प्रकार झाल्याची ओरड मधून मधून वृत्तपत्रांमध्यें किंवा मासिक पुस्तकांत झळकत असते; परंतु स्वतः एकादा ग्रंथ, लेख किंवा कविता लिहून ती एकाद्या प्रसिद्ध व्यक्तीच्या नांवावर खपविलेली फारशी ऐकिवांत नाहीं.

दुष्यंतानें शकुंतलेचा धिक्कार करतांना कालिदासानें त्याच्या तोंडीं शाकुंतलाच्या पांचव्या अंकांत पुढील उद्गार घातले आहेत :

> स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
> संदृश्यते किमुत याः प्रतिबोधवत्यः ।
> प्रागन्तरिक्षगमनात् स्वमपत्यजात-
> मन्यैर्द्विजैः परभृताः खलु पोषयन्ति ॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें कोकिळा जशा स्वतःचीं अंडीं दुसऱ्या पक्ष्यांकडून उबवतात, त्याप्रमाणें स्वतःच्या वाङ्मय-कृति दुसऱ्याच्या नांवानें उब-विण्याचें हें एक वाङ्मयकपट तर नसेल ? दुसऱ्याच्या कृति किंवा विचार स्वतःच्या नांवावर ओढणें याला जसें वाङ्मयचौर्य असें नांव प्राप्त झालें आहे, त्याप्रमाणें स्वतःच्या कृति दुसऱ्याच्या नांवावर खपविणें याला 'वाङ्मयपारभृत्य' म्हणावयास हरकत नाहीं. अशा प्रकारें ज्ञानेश्वरांच्या नांवावर असलेल्या शंकास्पद (apocryphal) मराठी वाङ्मयाचा परिचय मराठी संशोधनपत्रिकेच्या सहाव्या वर्षाच्या पहिल्या अंकांत ( ऑक्टोबर १९५८ ) मीं विस्तारानें करून दिलेला आहे.

एकाद्या प्रसिद्ध कवीच्या नांवावर ज्यावेळीं नकली काव्यें गोळा होतात त्यावेळीं या प्रकाराच्या मुळाशीं 'वाङ्मय-पारभृत्य' असेलच असें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ संत नामदेवाच्या नांवावर आज चार-पांच हजार अभंग प्रसिद्ध आहेत; परंतु त्यापैकीं साठ-आठशें देखील मूळ नामदेवाचे असतील कीं

काय याबद्दल शंका आहे. आद्य नामदेवानंतर नामदेव हेंच नांव धारण करणारे अनेक कवि होऊन गेले. या सर्वांनीं लिहिलेले अभंग पुढील संग्रहकारांनीं गोळा केले आणि आद्य नामदेवाच्या नांवावर लादले असें होणें शक्य आहे. पुष्कळदां गुरुशिष्य किंवा पितापुत्र यांच्या निवृत्ति-ज्ञानदेव, जनार्दन-एकनाथ अशीं नांवें धारण करणाऱ्या जोड्याही होऊन गेल्या असतील, अशीही एक शंका पुढें करण्यांत येते. किंवा ज्ञानदेव अथवा एकनाथ हें नांव धारण करणाऱ्या अलीकडच्या कवींनीं जुन्या ज्ञानदेवएकनाथांचे जे गुरु तेच निवृत्तिजनार्दन आपले गुरु कल्पिले असतील. जुन्या काळीं गुरु हा प्रत्यक्ष किंवा मूर्त असावा लागेच असें नाहीं. एकनाथांनीं गजानन, दत्त व पांडुरंग या देवतांना सद्गुरु म्हटलें आहे. दासोपंत 'पुराणपुरुषेश्वरा गुरुमूर्ति दातारा। लीलाविश्वंभरा दत्रात्रेया' असें म्हणतात. मुक्तेश्वराचा विश्वंभर म्हणजे दत्तात्रय हा अप्रत्यक्ष गुरु होता, हें प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत एकनाथाच्या नांवावरील दशमस्कंधाच्या बाबतींत वाङ्मय-पारभृत्याचें कपट कल्पिण्यापेक्षां पुढील एकाद्या एकनाथानें जनार्दन हा आपला गुरु मानून जुन्या एकनाथानें जें कार्य केलें नाहीं, तें दशमस्कंधाच्या रचनेचें कार्य सुरू केलें असें मानणें योग्य वाटतें.

भागवताच्या दशम स्कंधावरील मराठी जुन्या ग्रंथांची माहिती वर दिलीच आहे. यांशिवाय मल्लारी व अंबाजी नांवांच्या कवींनीं दशम स्कंधावर मराठींत रचना केली आहे, असें रा. शं. बा. जोशी 'हरिवरदा' ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत नमूद करतात. वरील निबंध कंपोज झाल्यावर या माहितीकडे आमचें लक्ष गेलें. हे ग्रंथ कोठें संग्रहीत आहेत हें माहीत नाहीं.

— अ. का. प्रियोळकर.

# मराठींतील आकारांत विशेषणें

संस्कृतमधील विशेषणें निरनिराळ्या स्वरांनीं अन्त पावणारीं आहेत. उदाहरणार्थ : नील, पीत, बहु, स्वादु इत्यादि; पण संस्कृतांत मूळ विशेषणांत 'आ' हा स्वर अन्तीं आढळत नाहीं. प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांतसुद्धां 'आ' या स्वरानें अन्त पावणारीं विशेषणें दिसून येत नाहींत; परंतु मराठींत मात्र तांबडा, काळा, पिवळा, इत्यादि कांहीं विशेषणांच्या मूळ रूपांतच अन्तीं 'आ' स्वर सांपडतो. तेव्हां मुळांतच असलीं आकारान्त विशेषणें असणें, हें एक मराठीचें वैशिष्ट्य आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

येथें अशी एक शंका येण्याचा संभव आहे : हीं विशेषणें मुळांतच आकारान्त आहेत, हें कशावरून? तीं मूळ अकारान्त असून, पुल्लिंगी विशेष्यापूर्वीं त्यांचा उपयोग असतां, तीं आकारान्त होतात, असें कां म्हणूं नये? तेव्हां या आकारान्त विशेषणांविषयीं कांहीं सांगण्यापूर्वीं, प्रथम या वरील शंकेचें निराकरण केलें पाहिजे.

हीं विशेषणें मुळांत अकारान्त असून पुल्लिंगी विशेष्यापूर्वीं तीं आकारान्त होत असतील, असें म्हणतां येत नाहीं. याचीं कारणें अशीं :— ( १ ) मराठींतील अकारान्त विशेषणें हीं विशेष्यांशीं योग असतांनाहि अकारान्तच राहतात. उदा०— आंबट आंबा, गोड पेरू, गरम तवा, इ. ( २ ) तसेंच, आकारान्त पुल्लिंगी विशेष्यापूर्वींच हीं विशेषणें आकारान्त होतात, असेंहि आढळत नाहीं. अकारान्त, इकारान्त, उकारान्त, इत्यादि विशेष्यांशीं योग असतांहि हीं मुळचीं आकारान्त विशेषणें आकारान्तच राहिलेलीं दिसून येतात. उदा०— काळा ढग, निळा मोर, पांढरा पक्षी, पांढरा काजु, इ. ( ३ ) मराठींतील अकारान्त विशेषणें हीं समासांत पूर्वपदीं अकारान्तच राहतात. या उलट, हीं आकारान्त विशेषणें समासांतहि पूर्वपदीं आकारान्तच राहतात[1]. उदा०—तांबडालाल, काळाभोर, हिरवागार, पिवळाजर्द, पांढराशुभ्र, इ. ( ४ ) मराठींत अकारान्त विशेषणांचे विभक्त्यन्त विशेष्यापूर्वीं जे विकार होतात ते, आणि या आकारान्त विशेषणांचे विभक्त्यन्त विशेष्यापूर्वीं जे फरक होतात ते, हे दोन्हीहि भिन्न आहेत. ( ५ ) कोशांत विशेषणें हीं त्यांच्या मूळ रूपांत दिलीं जातात, हें प्रसिद्धच आहे. त्याप्रमाणें हीं विशेषणें कोशांत आकारान्तच दिलेलीं आहेत.

---

१. येथें 'तांबडमाती' हा समास डोळ्यापुढें येईल. आणि येथें 'तांबड' अशा अकारान्त विशेषणाचा उपयोग आहे, असें वाटण्याचा संभव आहे. पण तसें नाहीं. कोशांत 'तांबड' या शब्दाचा अर्थ 'तांबडी माती' असा आहे. त्यामुळें 'तांबड' व 'माती' या दोन नामांचा 'तांबडमाती' हा समास आहे, असें म्हणावें लागतें. असे दोन नामाचे समास संस्कृत, प्राकृत व मराठी यांमध्यें अनेक आढळतात.

या सर्व कारणांवरून एवढें निश्चित ठरतें कीं, हीं विशेषणें मुळांतच आकारान्त आहेत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, पुल्लिंगी विशेष्यापूर्वीसुद्धां हीं आकारान्त विशेषणें तशींच मूळ आकारान्त रूपांत राहतात; न हून तीं अकारान्त असून मग आकारान्त होतात, असें म्हणण्याचें कारण नाहीं.

मुळांत आकारान्त विशेषणें असणें, हें मराठीचें वैशिष्टय आहे, असें वर म्हटलेंच आहे. आतां, प्रश्न असा निर्माण होतो कीं, या आकारान्त विशेषणांचें स्पष्टीकरण काय ? याच प्रश्नाचें उत्तर प्रस्तुत लेखांत दिलें आहे.

( अ ) मराठींतील कांहीं आकारान्त विशेषणांचें स्पष्टीकरण संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश यामधील कांहीं प्रत्ययांत आढळतें. म्हणजे असें :—

संस्कृतांत स्वार्थे 'क' प्रत्यय लागतो. महाराष्ट्री प्राकृतांत या 'क' चा 'अ' असा विकार होतो. साहजिकच, महाराष्ट्री प्राकृतांत एकाद्या अकारान्त शब्दापुढें हा स्वार्थे 'अ' आला, म्हणजे त्या शब्दाचें रूप नील–अ, काल–अ, इत्यादीप्रमाणें होईल. याच्या पुढची पायरी म्हणजे हा अन्त्य अ मागील अ मध्यें मिसळून संधिनियमांनुसार आ होतो. उदा. नीला, काला, इ. बरोबर हाच प्रकार मराठींत झाला आहे. आणि त्यानुसार मराठींतील कांहीं आकारान्त विशेषणें सिद्ध झालेलीं[1] आहेत. उदा.—

काळा ( √काल ), पांढरा ( √पंडुर ), हिरवा ( √हरित ), निळा ( √नील ), मुका ( √मूक ), बहिरा ( बधिर ), काणा ( √काण ), उभा ( √ऊर्ध्व–उब्भ ), तिरका ( √तिर्यक् ), ओला ( √आर्द्र–ओल्ल ), सुका ( √शुष्क–सुस्क ), तरणा ( √तरुण ), खुजा ( √कुब्ज–खुज्ज ), म्हातारा ( √महत्तर ), भला ( √भद्र–भल्ल ), सगळा ( √सकल ).

क्वचित् 'का' असा स्वार्थे प्रत्यय लागून आकारान्त विशेषणें सिद्ध झालेलीं[2] आढळतात. उदा.—धडका, पोरका, इ.

( आ ) कधीं कधीं प्राकृतांत 'ल्ल' ( हेमचंद्र २·१६५ ) अथवा 'ल' ( प्राकृत प्रकाश ४·२६ ) असा एक स्वार्थे प्रत्यय कांहीं शब्दांना लागतो. हा प्रत्यय मराठींत येतांना त्याच्या पुढेंहि आणखी स्वार्थे 'अ' आला[3]; आणि मराठींतील आकारान्त विशेषणें सिद्ध झालीं.[4] उदा.—पिवळा ( √पीत ), पांगळा

---

१. पुढील उदाहरणें याच साम्याभासावर आधारलेलीं असावींत: थोटा, मोठा, शहाणा, खुळा, वेडा, पुरा, आडवा, तिडवा, इ.

२. बोडका हें विशेषण याच धर्तीवर काय?

३. हेमचंद्रहि २·१६४ मध्यें दोनदां स्वार्थे प्रत्यय लागण्याचा उल्लेख करतो. अपभ्रंशांत ( हेम. ४·४३० ) हा प्रकार वरचेवर होतो.

४. या प्रकाराच्या साम्याभासानेंच पुढील आकारान्त विशेषणें बनलीं असावींत : वेगळा, जांभळा, निराळा, आगळा, इ.

( √पंगु ), आंधळा ( √अंधल्ल ), थोरला ( √स्थूल–थोर ), चांगला ( √चंग ), एकला ( √एक्कल्ल ), इ.

( इ ) अपभ्रंशांत अनेक स्वार्थे प्रत्यय आहेत ( हेमचंद्र ४·४२६–४२९ पहा ). त्यांत अड ( डड ) असा एक प्रत्यय आहे ( हेमचंद्र ४·४२९ ). या 'अड' पुढेंहि आणखी 'अ' येऊन हा प्रत्यय कधीं कधीं डाकारान्त होतो. यानुसार बनलेलीं मराठींतील आकारान्त विशेषणें अशीं :

तांबडा ( √ताम्र–तंब ), थेरडा ( √स्थविर–थेर ), इ.

( खोटारडा, कोरडा व करडा हीं विशेषणें याच धर्तीवर असावींत. ).

आतांपर्यंत प्राकृत–अपभ्रंश यांतील प्रत्ययाधारें मराठींत आकारान्त झालेल्या विशेषणांचा विचार झाला. पण एवढ्यानेंच भागत नाहीं. मराठीचीं स्वतःचीं स्वतंत्र अशीं आकारान्त विशेषणें आहेतच. तीं पुढीलप्रमाणें सिद्ध झालेलीं आढळतात :

( १ ) धातूंना 'का' प्रत्यय लागून आकारान्त विशेषणें बनलेलीं आहेत. त्यांतील कांहीं ( अ ) पूर्वक्रियादर्शक असतात, तर कांहीं ( आ ) कर्तृवाचक असतात. उदा०—

(अ) मोडका ( √मोडणें ), बसका ( √बसणें ), तोडका ( √तोडणें ) तुटका ( √तुटणें ), नासका ( √नासणें ), फुटका ( √फुटणें ), फाटका ( √फाटणें ), मळका ( √मळणें ), कुजका ( √कुजणें ), किडका ( √किडणें ) इ.

(आ) गळका ( √गळणें ), सडका ( √सडणें ), मारका ( √मारणें ) इ.

( २ ) मराठींतील लकारयुक्त भूतकालवाचक धातुसाधित विशेषणें हीं आकारान्त आढळतात. उदा०–गेलेला, खाल्लेला, प्यालेला, मेलेला, झालेला, इ.

( ३ ) धातूंपासून साधलेलीं कर्तृवाचक विशेषणें हीं मराठीमध्यें राकारान्त आढळतात. उदा०–करणारा, देणारा, घेणारा, पडणारा, खाणारा, बसणारा, इ.

( ४ ) वरीलपैकीं कोणत्याहि वर्गांत न बसणारीं अशीं कांहीं आकारान्त विशेषणेंहि मराठींत आढळतात. त्यांचा संकीर्ण म्हणून उल्लेख करण्यास हरकत नाहीं. हीं विशेषणें टाकारान्त आहेत[1]. उदा०–धाकटा, सुलटा, करंटा, इ.

मराठींत असलेच कांहीं जे इतर वैशिष्ट्यपूर्ण शब्द आहेत, त्यांचाहि अशा तऱ्हेनें विचार होणें आवश्यक आहे, असें वाटतें.

के. वा. आपटे

---

१. दिवटा आणि नकटा हीं विशेषणें दिवा आणि नाक यांना 'टा' जोडून झालेलीं आहेत, असें म्हणतां येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ ५५१८५ ........ वि: ........ विविध
सांक ........ ९१२० ........ नोंद दिर ........ २८।३।०७

# संशोधनाची भाषा कोणती असावी ?

ज्यावेळीं आपण एकाद्या विषयावर संशोधनात्मक निबंध किंवा ग्रंथ लिहितों, त्यावेळीं आपलें माध्यम म्हणजे हा निबंध किंवा ग्रंथ लिहिण्याची भाषा कोणती असावी, असा नेहमीं प्रश्न पडतो. भारतीय मुद्रणावरील ग्रंथ लिहितांना हा प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला. प्रथम हा ग्रंथ मराठींत लिहिण्याचा आमचा संकल्प होता, परंतु पुढें जास्त विचार करतांना तो इंग्रजीमध्यें प्रसिद्ध करावा, असें आम्हीं ठरविलें. पुष्कळांनीं याबद्दल आमचें अभिनंदन केलें, तर कांहीं लोकांनीं हा ग्रंथ मराठी भाषेंत न लिहिल्याबद्दल खेदही व्यक्त केला. या ग्रंथाच्या पुरस्कारांत डॉ. चिंतामणराव देशमुख लिहितात,

" I am glad that it was ultimately decided to bring out the book in English. Prof. Priolkar is in my opinion undoubtedly right in expecting that the material printed in this volume might prove of interest to a wider public in India and abroad, if presented in English. "

या ग्रंथांत भारतांतील सर्वच प्रसिद्ध भाषांच्या मुद्रणाच्या उगमाची माहिती असल्यामुळें इतर प्रांतांतील बांधवांना त्याचा उपयोग आहे ही गोष्ट खरी; परंतु मराठी भाषा, वाङ्मय, इतिहास, समाज अशा विषयासंबंधींही बाहेरच्या मराठी न जाणणाऱ्या लोकांना जिज्ञासा असते. त्यांना अशा मराठींत लिहिलेल्या लेखांचा लाभ होऊं शकत नाहीं. याच्या उलट संशोधनात्मक विषयांत रस घेऊं शकणाऱ्या मराठी वाचकाला इंग्रजी भाषेचें ज्ञान असतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. डॉ. केतकर यांनीं बडोदें येथें भरलेल्या अखिल भारतीय प्राच्य परिषदेच्या मराठी विभागाच्या अध्यक्षीय भाषणांत या प्रश्नासंबंधीं पुढील मत व्यक्त केलें आहे,

" भारतीय आयुष्याशीं अपरिचय असणाऱ्या लोकांच्या भाषेंत ( संशोधनात्मक ) लिहिणें लेखनपद्धतीवर परिणाम केल्याखेरीज राहात नाहीं. इंग्रजींत लिहितांना मनुष्य अगदींच निराळ्या मानसिक स्थितींत असतो. झालेलें संशोधन इंग्रजींत मांडतांना लेखकास स्वजनसेवा चांगल्या तऱ्हेनें करतां येत नाहीं, यासाठीं ऐतिहासिक आणि मानवी व्यवहारविषयक संशोधन मांडण्याची भाषा देशीच असावी, ही गोष्ट संशोधनाच्या उपयुक्ततेच्या आणि स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट आहे. "

या विषयासंबंधीं जास्त चर्चा होणें अवश्य आहे.

# मराठी व्याकरणावरील इंग्रजीची छाप

मराठी भाषेचें पहिलें व्याकरण कोणीं लिहिलें हें आजहि कोणास ठाऊक नाहीं. राजवाडे यांनीं मद्रास येथील ग्रंथालयांत त्यांना आढळलेल्या व संस्कृतमध्यें लिहिलेल्या एका मराठीच्या व्याकरणाचा उल्लेख केला आहे. हें व्याकरण (राजवाडे—लेखसंग्रह भाग २, संकीर्ण निबंध, शके १८५४, पृ. १०) प्रस्तुत लेखकाच्या पाहण्यांत आलेलें नाहीं.

गिरिधराच्या एका मराठी व्याकरणाचा उल्लेखहि पाहण्यांत येतो (आधुनिक मराठी गद्याची उत्क्रान्ति, डॉ. कृ. भि. कुलकर्णी, १९५६, पृ. ७४). परंतु हा उल्लेख चुकीचा आहे. गिरिधरानें लिहिलेलें हें व्याकरण मराठी भाषेचें नाहीं. तें संस्कृत व्याकरणाचें मराठींत केलेलें एक रूपांतर आहे व कदाचित् सबंध अशा ग्रंथाचा तो एक त्रुटित भाग आहे, असें प्रत्यक्ष त्या हस्तलिखिताचें परीक्षण केल्यावर आढळून आलें. केवळ व्याकरणविषयक असे उल्लेख मराठींत फारसे आढळत नाहींत. एकनाथी भागवतांत आणि 'हरिवरदा' या कृष्णदयार्णवाच्या 'भागवती टीकें'त व्याकरणांतील कांहीं पारिभाषिक शब्द आढळतात. तसेंच निरंजन माधवाच्या ग्रंथांत दिसतात (एकनाथी भागवत, निर्णयसागर प्रत, १९२९, पृ. २७८, ३३९, ३४०-७२० इ.; कृष्णदयार्णव हरिवरदा भाग १, प्रस्तावना, पृ. ७.). परंतु या उल्लेखांपलीकडे असे उल्लेख आढळले नाहींत. महानुभावी पञ्चवार्तिक व्याकरण श्री. मोने यांनीं आपल्या व्याकरणावरील ग्रंथांत उद्धृत केलें आहे. परंतु त्यांतील 'प्रत्ययलोपी' द्वितीयेच्या उल्लेखांवरून मला स्वतःला त्याचा काल विश्वसनीय वाटला नाहीं. इतरहि त्यांतील कांहीं बाबींनीं त्याची विश्वसनीयता मला पटलेली नाहीं; आणि म्हणून कालदृष्ट्या मला त्याची विशेष मातब्बरी पटली नसल्यानें इंग्रज कालापूर्वी मराठीचें पहिलें व्याकरण कोणीं व केव्हां लिहिलें हें अजून अज्ञातच आहे, असें म्हटलें पाहिजे.

यावरून व्याकरणविषयक अभ्यास पूर्वीं होतच नसेल, असें म्हणवत नाहीं. निदान संस्कृत व्याकरणाचें अध्ययन अव्याहत चालूच राहिल्यानें त्या व्याकरणाच्या अनुरोधानें कदाचित् मराठी व्याकरणाचा विचार होत असावा, असें विध्यर्थी विधान करणेंच क्रमप्राप्त आहे. प्राकृत व्याकरणें जरी प्राकृत भाषेपुरतीं उपलब्ध होतीं, तरी त्यांचा अभ्यास फार होत नसावा; कारण, बौद्ध व जैन या पंथीयांव्यतिरिक्त त्या व्याकरणाचा प्रसार इतरत्र असणें शक्य वाटत नाहीं. प्राकृत व्याकरणकारांची व्याकरणेंहि संस्कृताश्रयीच आहेत, हें स्पष्ट आहे. यापुढें इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर पुस्तकरूपानें मराठीचें व्याकरण लिहिण्याचें प्रयत्न झालेले आपणांस दिसतात; आणि येथेंच आजच्या मराठी व्याकरणांवर इंग्रजीचा प्रभाव कां आढळतो, त्याचें उत्तर आढळेल. इंग्रजी अमलांत कांहीं मराठीचीं व्याकरणें इंग्रजींत झालेलीं आहेत. सुदैवानें त्यांच्या अनुरोधानें मराठीचीं व्याकरणें लिहिलीं गेलीं नाहींत; नाहींतर

तीन विभक्त्या किंवा विभक्तिप्रत्यय म्हणजे शब्दयोगी अव्ययें अशा नवीन कल्प्त्या मराठी व्याकरणांत उतरल्या असत्या. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या निबंधांत अशा एका मताचा उल्लेख केलेला आहे. मराठी लेखकांच्याच हस्तें मराठीचीं व्याकरणें लिहिलीं गेल्यानें अगदींच भ्रष्टाकार न होतां स्वत्वाचीं बरींच चिन्हें शिल्लक उरण्याची शक्यता उत्पन्न झाली व म्हणूनच आजचा लेख लिहितां येत आहे. संस्कृत व्याकरणेंसुद्धां इंग्रजी प्रभावानें लिहिलीं गेलीं. तळेकरशास्त्री यांचें संस्कृतचें व्याकरण हें उदाहरणादाखल घेतां येईल. आपट्यांचें 'Guide to Sanskrit Composition' हें पुस्तकहि इंग्रजी व्याकरणाच्या धर्तीवर लिहिलें गेलें आहे. मग मराठीच्या व्याकरणाचा पाड काय? असो. इंग्रजांच्या साहाय्यानेंच नव्हे, तर सल्ल्यानें आणि कदाचित् हुकमतीनें मराठी व्याकरणें लिहिलीं गेलीं. मराठी व्याकरणें हीं मराठी शिकण्याचें साधन म्हणून नव्हे तर परकीय भाषा शिकण्यास साहाय्यभूत होईल या उद्देशानें लिहिलीं गेलीं या गोष्टीविषयीं शंकाच नको.

इंग्रजांचें विद्याखातें, इंग्रजांची नौकरी, त्यांनींच आंखलेला मार्ग इत्यादि कारणांनीं मराठी व्याकरणाचा मराठी भाषेच्या दृष्टीनें स्वतंत्ररीत्या विचार या व्याकरणकारांना करतां आला नाहीं; परंपरेनें आलेल्या संस्कृत किंवा प्राकृत व्याकरणांच्या धर्तीवरहि हीं व्याकरणें रचिलीं गेलीं नाहींत. या प्रकारानें मराठी व्याकरणाचें स्वरूप इंग्रजी बरणींत ओतलेल्या मराठी द्रवासारखें झालें; आणि आज ती छाप या रांध्यावर पूर्णपणें दिसते. ती किती प्रमाणांत आढळते याचा अगदीं स्थूलरीत्या विचार पुढें केला आहे. परंतु तो विचारार्ह आहे येवढें निश्चित असून मराठीचें स्वतंत्र व्याकरण सिद्ध करण्यांत कोठें कोठें लक्ष दिलें पाहिजे, हें दाखवण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

प्रथमतः जें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण इंग्रजी अमदानींत मराठी भाषेंत लिहिलें गेलें, तें मुंबईची 'हैंद शाळा पुस्तक मंडळी' या संस्थेच्या एका 'कमिटी' मार्फत. या संस्थेनें व्याकरण, कोश व इतर पाठ्यपुस्तकें यांची निर्मिति करण्याचें ठरविलें व त्या हेतूला अनुसरून त्या वेळच्या सोसायटीच्या नोकरींतील पंडितांनीं जें व्याकरण रचलें, तेंच मराठी भाषेंत एतद्देशीयांनीं सिद्ध केलेलें पहिलें व्याकरण असावें. या व्याकरणाचे कर्ते जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके व व बाळशास्त्री घगवे हे होत. या व्याकरणाचें हस्तलिखित इ. स. १८२५ च्या आसपास लिहिलें गेलें असावें, हा या व्याकरणाचे संपादक, प्रो. अ. का. प्रियोळकर यांचा तर्क बरोबर दिसतो. तें हस्तलिखित इतर कागदांबरोबर लंडनला गेलें आणि प्रो. प्रियोळकर यांनी परिश्रमानें तें मिळवून १९५४ मध्यें छापवून प्रसिद्ध केलें. यानंतर १८३६ सालीं गंगाधरशास्त्री फडके यांचें स्वतंत्र व्याकरण, जांभेकर यांचें बालव्याकरण, गंगाधरशास्त्री टिळक यांचें व्याकरण (१८५८) इ. व्याकरणें प्रसिद्ध होऊन दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणाची प्रथमावृत्ति याच सालीं बाहेर पडली. त्यानंतरचा मराठी व्याकरणांचा इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे.

पंडितमंडळाच्या प्रथम व्याकरणाची रचना गंगाधरशास्त्री फडके यांच्या म्हणण्याप्रमाणें जरी 'संस्कृत व्याकरणाध्ययनबलेंकरून' झाली तरी प्रत्यक्ष व्याकरणावरून निराळाच अनुभव येतो, व तसें मत बनत नाहीं—लेखकाचें बनलेलें नाहीं. त्याचा ऊहापोह पुढें येईलच. हें मात्र खरें कीं, त्यांत 'कांहीं कांहीं शास्त्रीय कल्पना व युक्ती' यांचा अवलंब झालेला दिसतो. पण या व्याकरणाची रचना संस्कृत व प्राकृत व्याकरणांप्रमाणें झालेली नाहीं; तर इंग्रजीचें अनुकरण करून रचनेचा इंग्रजी आराखडा व इंग्रजीच इतर वर्गीकरण पत्करून, बऱ्याच ठिकाणीं इंग्रजी परिभाषेचें मराठी भाषांतर करूनच झाली आहे--हें कोणाहि वाचकास आढळून येईल.

या व्याकरणांत लिहिलेला 'भाषणप्रकार' म्हणजे Parts of Speech होय. तेहि आठच मानले आहेत. नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद; तसेच अव्ययांचे चार प्रकार : क्रियाविशेषण, उभयान्वित, शब्दयोगी व केवलप्रयोगी (महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, १९५४, पृ. १२). या पुस्तकांत या शब्दांसमोर पुन्हां Noun, Pronoun, Adjective, Verb, Adverb, Conjunctive, Preposition, Interogation (?) हे इंग्रजी शब्दहि लिहिलेले आहेत! संपादक प्रो. अ. का. प्रियोळकरांनीं हे इंग्रजी शब्द कोणीतरी मागाहून लिहिलेले दिसतात अशा अर्थाची तळटीप (पृ. १२) लिहिलेली आहे. संपादकांची टीप मान्य करूनहि हें व्याकरण संस्कृताश्रयी नाहीं हें स्पष्ट दिसतें. 'केवलप्रयोगी' या प्रकारापुढें इंटरॉगेशन असा शब्द नको असून इंटरजेक्शन हवा हेंहि उघडच आहे. भाषणप्रकारविचार, कांहीं व्याख्या इत्यादि या निर्णयाचाच पाठपुरावा करतात. संस्कृताश्रय व्यक्त होण्यास चार पदांचे प्रकार सांगावयास हवे होते, किंवा कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केल्याप्रमाणें तीन पदप्रकारहि (पृ. ४३,४४, **मराठी व्याकरणावरील निबंध**, आवृत्ति तिसरी, १९२३) चालले असते; मग चिपळूणकरांप्रमाणेंच पोटविभाग करून नामें, सर्वनामें, विशेषणें हे प्रतिपदिकांचे प्रकार सांगितले असते तरच संस्कृताश्रय व्यक्त होता. तेव्हां संस्कृत व प्राकृत व्याकरणांतील थोडे पारिभाषिक शब्द वापरल्यानें संस्कृताश्रय होत नाहीं, हें स्पष्ट ठरतें, ही गोष्ट पुढील विवेचनांत स्पष्टतर होईल.

## नामें

नामविचार घेऊं या. या शास्त्रित्रयानें नामांचे सामान्यनाम, विशेषनाम व सर्व-नाम असे वर्ग करून हीं सर्व विशेषणें वा नामें असतात असें जें म्हटलें आहे तें कांहींसें पूर्वपरंपरा दाखवितें. या महाराष्ट्रभाषेच्या व्याकरणांत मराठींत संबोधन न धरतां विभक्त्या सात आहेत, असें जरी म्हटलें आहे, (पृ. १६ वर) तरीहि संबोधनविभक्ति स्वतंत्र दिलीच आहे; आणि महर्षि पाणिनींनीं 'संबोधने च' (२-३-४७) असें म्हटलें आहे, हें जरी खरें, तरी त्यांनीं संबोधनें हीं प्रातिपदिकार्थकहि मानलीं नाहींत किंवा विभक्ति म्हणूनहि म्हटलेलीं नाहींत. 'आख्यातं साव्ययकारक-विशेषणं वाक्यम् (२-१-१ पाणिनीच्या सूत्रावरचें वार्त्तिक) या वार्त्तिकाच्या कक्षेंत

'व्रजानि देवदत्त' यांतील वा अशीं संबोधनपदें येऊं शकत नाहींत. कारण कीं, तीं अव्ययेंहि नव्हत किंवा संबोधनें हीं प्रातिपदिकार्थहि मानलीं नाहींत किंवा विभक्ति म्हणूनहि मानलीं गेलीं नाहींत, 'आख्यातं साव्ययकारकविशेषणं वाक्यम्।' (पाणिनी २-१-१ वरच्या) या वार्त्तिकांच्या कक्षेंत 'व्रजानि देवदत्त' यांतील वा अशीं संबोधनपदें येऊं शकत नाहींत, कारण कीं, तीं अव्ययेंहि नव्हत किंवा कारकेंहि नव्हत; भर्तृहरीच्या मताप्रमाणें तीं क्रियाविशेषणें दिसतात. 'वाक्यपदीयां'त म्हटलें आहेः—

संबोधनपदं यच्च तत् क्रियाया विशेषकम्।
व्रजानि देवदत्तेति निघातोऽत्र तथा सति॥(२-५)

म्हणून वाक्याची व्याख्या अव्याप्तहि ठरत नाहीं; कारण कीं, सामानाधिकरण्यानें जशीं क्रियाविशेषणें वापरतां येतात, तशींच वैयधिकरण्यानें पण वापरतां येतात; आणि 'व्रजानि देवदत्त' यांतील संबोधनपदीं क्रियाविशेषणाची व्यवस्था "वैयधिकरण्येनापि विशेषणं भवति, यथा व्रजानि देवदत्तेति। अत्र हि देवदत्त व्रजानि इति देवदत्तस्य व्रजनक्रियायाश्च सामानाधिकरण्यं नास्ति।" 'व्रजानि देवदत्त' याचा, हाक मारण्याच्या क्रियेनें विशिष्ट अशी व्रजनक्रिया असा अर्थ येथें अभिप्रेत आहे. 'केवल—मामन्त्र्य व्रजति असौ इति देवदत्तामन्त्रणविशेषिता केवला या विलक्षणा व्रजनक्रिया इति आख्यातं सविशेषणमिति।' महाभाष्यांत आचार्य पतंजलींनीं या स्पष्टीकरणास 'अपर आह। आख्यातं सविशेषणमित्येव।' या उक्तीनें वाव दिला आहे. नैयायिकांची या विषयांत थोडी मतभिन्नता आहे. उदाहरणार्थ, व्युत्पत्तिवादांत-प्रथमार्थतादृशेच्छाया-या विषयतासम्बन्धने प्रकृत्यर्थविशेषणतया भानम्। इ.) शास्त्रीत्रयानें हें सर्व लक्षांत घेऊन विवेचन केलें आहे असें न वाटतां इंग्रजी व्याकरणावर विसंबून केलें हें अर्थात् स्पष्ट होतें. पुन्हां पहाः—संस्कृत भाषेंत शब्द चार प्रकारचे मानतात. नाम, आख्यात, उपसर्ग व निपातः—'चत्वारि वाक्-परिमिता पदानि' (ऋग्वेद १-१६४-४५). या चार पदांचाच यास्काचार्यांनीं 'चत्वारि पदजातानि नामाख्याते चोपसर्गनिपाताश्च।' (निरुक्त १·१) असा उल्लेख केला आहे. 'नामाख्याते' व 'उपसर्गनिपाताः' असे दोन भाग करून 'नामाख्याते' या स्वतंत्र पदानें नामें व आख्यात यांचें महत्त्व यास्काचार्यांनीं तारतम्यानें व्यक्त केलें आहे (अत्र नामाख्यातयोः पूर्वमभिधानं प्राधान्यात्।—दुर्गाचार्य); कारण, ते शब्द मूलतः सार्थ आहेत. (उभे अपि नामाख्याते निपातोपसर्गनिरपेक्षे अपि सती स्वमर्थं ब्रूतः।), आणि उपसर्ग-निपातांना स्वतंत्रपणें अर्थ नाहीं (न तूपसर्गनिपातानां नामाख्यातनिरपेक्षाणाम् अपि अर्थः अस्ति।). सर्वनामांचा नामांखालींच अंतर्भाव होतो. विशेषणाप्रमाणेंहि त्यांचा उपयोग होत असल्यानें (वस्तूपलक्षण) त्यांचा स्वतंत्र उल्लेख यास्काचार्यांनीं केला नाहीं. विशेषणें हाहि स्वतंत्र वर्ग संस्कृत व्याकरणांत मानीत नाहींत; त्याचप्रमाणें क्रियाविशेषणेंहि स्वतंत्र नाहींत. क्रियाविशेषणें हीं द्वितीयाविभक्तींत असलेलीं नपुंसकलिंगीं नामेंच होतः—क्रियाविशेषणानां कर्मत्वं नपुंसकलिङ्गता च। सामनाधिकरण्यानें त्यांचा क्रियापदाशीं संबंध असतो; म्हणून 'सामान्ये नपुंसकम्'

या न्यायानें तीं नपुंसकलिंगी होतात; पुन्हां क्रियेशीं होणारा त्यांचा अन्वय कर्मकारकसिद्ध व क्रियासाध्य ठरतो; म्हणून त्यांची द्वितीया विभक्ति होते :–क्रियायाश्च निर्वर्त्यत्वात् कर्मत्वम्––शीघ्रं गच्छति। उपसर्गांना मराठींत स्वतंत्र स्थान नाहीं. निपातांचा अंतर्भाव मराठींत अव्ययांत होईल. ( उपसर्गांचा अंतर्भाव निपातांत केलेला आढळतो : १.४.५९ पाणिनीवरचें महाभाष्य पहाः––प्रादयोऽसत्त्ववचना निपातसंज्ञा भवन्ति। ) या दृष्टीनें पाहिलें असतां कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचेंच वर्गीकरण पूर्वपरंपरेला धरून संस्कृताश्रयी होतें हें सिद्ध होतें.

## शब्दांच्या जाति

मराठीच्या इंग्रजीवरून रचिलेल्या व्याकरणांत आतां आठ जाति मानण्याची आम्हांस संवय झाली आहे. नाम, सर्वनाम, विशेषण आणि धातु हे विकारी, आणि क्रियाविशेषण, उभयान्वयी, शब्दयोगी आणि केवलप्रयोगी असे अविकारी एकंदर आठ शब्द ( Noun, pronoun, adjective, verb, adverb, conjunction, preposition and exclamatory ). ( १ ) प्रातिपदिकें, धातु व अव्ययें असे तीन भेद कांहींनीं मानले व नामें, सर्वनामें व विशेषणें यांचा अंतर्भाव प्रातिपदिकाखालीं केला. वास्तविक प्रातिपदिकांतच अव्ययांचा अंतर्भाव झाला पाहिजे होता. या वर्गीकरणांत अव्ययांचे भेद मानलेले नाहींत व शब्दजाति पांच मानल्या गेल्या. ( २ ) कांहीं दुसऱ्यांनीं सर्वनामें व केवलप्रयोगी अव्ययें गाळून बाकी सहा जाति मानिल्या. येथें सर्वनामांचा नामांत अंतर्भाव झाला व केवलप्रयोगी अव्ययें स्वतंत्र वाक्यें धरिलीं गेलीं. ( ३ ) आगरकरांच्या ' वाक्यमीमांसे 'वरून त्यांनीं केवलप्रयोगी अव्ययें गाळून शब्दांच्या सात जाति मानल्या. ( ४ ) दादोबांनीं चक्क इंग्रजी व्याकरणानुरूप आठ जाति केल्या. ( ५ ) राजवाड्यांनीं अव्ययांचे प्रकार अशास्त्र मानले तें योग्यच होतें; परंतु लौकिकार्थानें तरी त्यांनीं ते कां मानले, हें कोडें उलगडणें कठिण. ( ६ ) दामल्यांनीं आठ जाती मानल्या आणि त्यांच्यानंतर येणाऱ्या ( ७ ) म. पां. सबनिसांनीं नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, उभयान्वयी आणि केवलप्रयोगी अशा सात जाति मानल्या. (आधुनिक मराठीचें उच्चतर व्याकरण, ) त्यांनीं शब्दयोगींची व्यवस्था निरर्थक शब्दांत केली आहे. वरील सात जाति त्यांनी प्रातिपदिकांच्या म्हणून मानल्या आहेत ( पृ. ११३ ). परंतु त्यांच्या प्राकृतेयांतील विवेचनावरून त्यांच्या मनांत याविषयीं स्पष्ट कल्पनाच नव्हती ( पृ. ५७–६४ ), असें म्हणणें प्राप्त आहे. आतां हा सर्व प्रपंच इंग्रजी आश्रयाचा नव्हे काय ?

गुंजीकरांनीं मात्र संस्कृत व्याकरणाचा आश्रय केल्यास " वास्तविकपणें म्हटलें म्हणजे मराठी व्याकरणांत नामाच्या जाती सांगण्याची आवश्यकता नाहीं, " असें स्पष्टपणें म्हटलें आहे. व्युत्पत्तिप्रकरणांतील साधित शब्दांचा विचार सुलभ व्हावा म्हणून त्यांचा उपयोग होतो. एतदर्थ सामान्य, विशेष, भाववाचक, यांची

गणना नामांच्या जातींत करावी हा व्याकरणबाह्य विचार दामल्यांनीं पत्करला. ( शास्त्रीय मराठी व्याकरण, पृ. ९३ ). दामल्यांना, येथें आपण मराठी व्याकरणास इंग्रजी वळण देतों याची जाणीव झाली; परंतु इष्ट अशी स्वतंत्र विचारसरणी मात्र त्यांना व्यक्त करतां आली नाहीं. ( उपर्युक्त, पृ. ९४ ). इंग्रजी भाववाचकांच्या अनुरोधानें अर्थावर विसंबून नामांच्या जाति करावयाचें ठरविल्यास मौल्यवाचक वर्ग इत्यादि स्वतंत्र पुष्कळ भेद करतां येतील, असें त्यांनीं लिहून ठेविलें आहे. समुदायवाचक आणि द्रव्यवाचक हे नामाचे भेदहि इंग्रजीचें अंधानुकरण करून मराठींत उतरणार होते; कांहीं दिवस त्यांचा तळहि मराठी व्याकरणांत होता; परंतु सुदैवानें एका इंग्रजीच्या प्राध्यापकांनींच मराठी व्याकरणांतून या आगंतुकांची हकालपट्टी केली हें बरें. (ग. ह. केळकर, मराठी व्याकरणाचीं मूलतत्त्वें, १९३३, पृ. ३७-३८ ). नाहींतर इंग्रजीची उसनवारी भाषान्तरानें किंवा शब्दान्तरानें करणाऱ्या आमच्या मराठीच्या "प्रोफेसरांनीं" या पाहुण्यांच्या खुणा कायम केल्या असल्या यांत शंका काय ? इंग्रजीचे आदर्श सर्वदूर ठेवणाऱ्या लेखकांवर तशी टीका केली तर त्यांच्या नाकांला मिर्च्या कशा झोंबतात, याचा आम्हांस खूप अनुभव आहे ! असो.

## सर्वनामें

सर्वनामाची निराळी जाति करावयाची ठरविल्यावर मग त्यांचे प्रकारहि मराठी व्याकरणकारांनीं आपोआप केलेच. संस्कृतमध्यें असलेल्या तीन पुरुषांचे वर्ग बदलण्याचें धाष्टर्य आमच्या इंग्रजाळलेल्या व्याकरणकारांनीं केलें नाहीं, तरी परिभाषा मात्र प्रथम, द्वितीय व तृतीय पुरुष अशी करून त्यावरून प्रकार करून पुन्हां आत्मवाचक ( Reflexive ), दर्शक ( Demonstrative ), संबंधी ( Relative ), प्रश्नार्थक ( Interrogative ) असे विभाग सांगितलेच. दामल्यांनीं यापुढें जाऊन अनिश्चित ( Indefinite) व सर्वपुरुषार्थक हे आणखी प्रकार मराठींत आणले. आतां Exclamatory pronoun हा प्रकार कां आणला नाहीं कोण जाणें ! नाहींतर "काय हा मूर्खपणा, मूर्ख मनुष्य आहे हा !" या वाक्यांतील 'काय'चा आणखी एक वर्ग ( नेसफील्ड इंग्लिश ग्रामर सेरीज, बुक ४, सन १९३६ पृ. ४९ प्रमाणें ) सहज करतां आला असता व अर्थसौलभ्य वाढलें असतें ! हें वर्ग पत्करून ही मंडळी थांबली नाहींत, तर प्रत्यक्ष इंग्रजी भाषेच्या व्यवहारांतील नियमसुद्धां मराठींत आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला. उदाहरणार्थ 'तो' व 'हा' या सर्वनामांच्या उपयोगांविषयीं कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं ' प्रथम सांगितलेली वस्तु किंवा वाक्य 'तो' हें सर्वनाम दाखवितें; तर मागून सांगितलेली वस्तु 'हा' हें सर्वनाम दाखवितें, " या अर्थाचा नियम आपल्या नवीन मराठी व्याकरणांत घातला ! हा नियम इंग्रजींमधील former व latter यांच्या वापरावर आधारलेला आहे. दामल्यांनीं मराठी भाषेंत हा नियम आढळत नाहीं, अशा अर्थाचें विधान आपल्या व्याकरणांत केलें आहे (पृ. ११४) व हा नियम नवीनच होय अशी कोपरखळीहि दिली आहे. 'जो'

या सर्वनाम[illegible] नियम देतांना सर्वस्वीं इंग्रजी नियमांचें मराठीकरण केलेलें आढळतें !

शास्त्रिमंडळानें सर्वनामांच[illegible] (सहा ?) भेद मानिले ( महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, पृ. ३६-३७ ). पु[illegible] सामान्य सर्वनाम, प्रश्नार्थक सर्वनाम, परस्पर[illegible] सर्वनाम, दर्शक सर्वनाम, विजाति सर्वनाम ( उदा० सर्व, सगळा इ. ). दर्शक सर्वनामा[illegible] सर्वनाम, आणि इ. उदाहरणें दिलीं असून सामान्य सर्वनामांत ' आपण ' हा शब्द [illegible] त्या ' आहे. परस्परनित्यसंबद्ध सर्वनामांत दोहोंचा प्रयोग झाला पाहिजे ( जो...[illegible] कोणी संकोचानें एकाचाच प्रयोग केला तर ' दुसऱ्याचा अर्थ बुद्धीनें जाणावा ', असें म्हणून ' तो मनुष्य आला ' हें उदाहरण घेतलें आहे. " एथें जा (= ज्या) चें नांव पूर्वीं बोलण्यांत आलें होतें इत्यादिक ' जो ' शब्दाचे अर्थ बुद्धींत आणावे तेव्हां वाक्याचा अर्थबोध होतो, " असें स्पष्टीकरण दिलें आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं ' मराठी व्याकरणांतहि कित्येक शब्दांस सर्वनाम अशी संज्ञा देऊन त्यांचा एक वर्ग करण्यापासून फळ आहे, ' असें आपल्या निबंधांत ( आवृत्ति तिसरी, १९२३, पृ. ४४ ) लिहिलें असून (पृ. ९३वर) ते पुढें म्हणतात– " वास्तविक पाहतां सर्वनामें हा एक नामांतील पोटभेद आहे; नामांच्या बरोबरीचा शब्दांचा विभाग नव्हे. " शास्त्रीबोवांचें हें मत योग्य असून संस्कृत व्याकरणाला धरूनच आहे. ' सर्वनामा 'च्या दादोबांच्या लक्षणांवर त्यांनीं आक्षेप घेऊन 'मीं, तूं, कोण, जो, तो' हीं सर्वनामें त्या लक्षणांत बसत नाहींत, असें दर्शविलें आहे. दादोबांनीं इंग्रजीवरून या व्याख्या मूलतः घेतल्या; म्हणूनच चिपळूणकरांना त्यांत दोष काढतां आले. लक्षणाची व्याप्ति दाखवितांना ते लिहितात; जसें ' सीता शब्दाबद्दल जानकी, वैदेही, भूमिसुता, देवी, राजकन्या इत्यादि शब्दांचा प्रयोग असतो म्हणून तीं सर्वनामें होत नाहींत. ' चिपळूणकरांनीं शास्त्रीमंडळा-प्रमाणेंच सर्वनामांचे पांच वर्ग देऊन ' जो ' हें तृतीयपुरुषवाचक सर्वनाम समजण्यास बाध नाहीं, असें मत दिलें आहे. ' तो ' शब्दास दर्शक सर्वनाम म्हणतां येणार नसून " ' हा ' या शब्दासच केवळ दर्शक सर्वनाम म्हणावें हें बरें दिसतें ", असा निर्णय केला आहे. सामान्य सर्वनामांत पूर्वींच्या मुंबईकर शास्त्र्यांचा निर्णय न धरतां ' कांहीं, सर्व, अमुक, ' इत्यादींस सामान्य सर्वनामें म्हणत असले तरी तसें करण्याचें प्रयोजन नाहीं, हें कृष्णशास्त्री यांनीं सकारण सांगितलें आहे. येथें चिपळूणकर यांचेंपुढें बहुधा दादोबांचें ' महाराष्ट्र भाषेचें व्याकरण ' असावें असें वाटतें ( तृतीय आवृत्ति, १८५७, पृ. १३४ पहा ). दादोबांनीं सामान्यसर्वनामांत ' कोण, काय ' यांचा उल्लेख केलाच आहे. दामल्यांनीं ' सामान्य ' न म्हणतां 'अनिश्चित' ही 'प्रौढबोध'कारांची परिभाषा पत्करली आहे ! आतां विशेषणांकडे वळूं.

## विशेषणें

मराठींत आकारान्त व तदितर विशेषणें एवढाच खरोखर भेद पडतो;

परंतु अर्थभेदावरून इंग्रजी परिभाषेचें अनुकरण येथेंहि [illegible] केलेलें आढळतें. विशेषतः संख्यावाचक विशेषणांचे गणनावाचक ([illegible] Card[illegible]), क्रमवाचक (ordinals), आवृत्तिवाचक (M[illegible]), [illegible]त्ववाचक (Distributive) व प्रत्यक्ष अनि[illegible] defini[illegible] दामले, पृ. १४४) असे वर्ग केलेले आपणांस [illegible] सुदैवानें [illegible] विशेषणांचे प्रकार दिलेले नाहींत; [illegible]tive [illegible]ogative, Possessive Adjectives [illegible] [illegible]लों नसतों.

नाहींत [illegible] [illegible]विशेषण आणि विधिविशेषण यांची भर Attributive [illegible]tive हे विशेषणाचे वर्ग मानून केलीच आहे. ही पद्धति इंग्रजीवरून [illegible]हे. (पहा, नेस्फील्ड, इंग्लिश ग्रामर सेरीज, बुक ४, पृ. ३५,) [illegible]तमध्यें हा भेद आमच्या पाहण्यांत नाहीं.

विशेषणांचा तरतमभाव दाखविण्याचा मराठी मार्ग इंग्रजीपेक्षां निराळा आहे. संस्कृतमधील तारतम्यदर्शक शब्द अर्थदृष्ट्या झिजून गेल्यानें त्यांत फरक करणें आम्हांस इष्ट वाटतें तर ठीकच. परंतु "तो त्याच्यापेक्षां अधिक शहाणा आहे," या शहाणपणाच्या आधिक्याचा आणि 'तो सर्वांत अधिक हुशार आहे' या हुशारीचाहि तारतम्य न बाळगतां आम्ही उपयोग करूं लागलों आहोंत. हा परधार्जिणेपणा आतां केव्हां संपणार? मराठींत खरें म्हटलें तर तारतम्यसूचक विकारच नाहीं (दामले पृ. ४०९). मग दामल्यांनीं हा 'अधिक' शब्द मराठींत कां म्हणून मान्य केला तें समजत नाहीं. सुदैवानें परमावधिवाचक (Intensives) विशेषणांचा (उदा० लालबुंद, लाललाल, लालभडक, लालंलाल इ.) किंवा न्यूनत्वदर्शक विशेषणांचा आणखी बोजा आमच्यावर त्यांनीं लादला नाहीं.

पंडितमंडळाच्या 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' या पुस्तकांत विशेषण ही नामाचीच जाति आहे असें सांगून त्याचे नामासारखेच अंत्यविकारी व अनंत्यविकारी असे दोन प्रकार सांगितले आहेत. ही रचना अर्थातच उत्तम आहे. संख्यावाचक विशेषणांचा नामाशीं विकल्पानें समास धरला आहे, तेंहि योग्य आहे; पण आतां संख्येंत पांच भेद आहेत म्हणून जें सांगितलें आहे––केवलसंख्या, क्रमसंख्या, समुदायसंख्या, भागसंख्या व प्रमाण अथवा गुणसंख्या—तें सर्व इंग्रजीवर आधारित आहे. त्यांनीं विशेषणांचा तरतमभाव पण सामान्य (positive), विशेष (comparative) व अतिविशेष (Superlative) हे भेद देऊन सांगितला आहे. त्याचीं उदाहरणें मराठी भाषेच्या प्रकृतीशीं विसंगत असून तीं इंग्रजीवरून घेतलीं आहेत हें स्पष्ट होतें. त्यांनीं पुढें दिलेल्या पृ. ३४ वरचीं वाक्यगत भेद दर्शविणारीं उदाहरणें मात्र मराठीस धरून आहेत.

मराठीमध्यें शब्दयोगी विशेषणें असा एक प्रकार दामल्यांनीं नवीन मानला आहे (पृ. ४०२). वास्तविक यांचा उपयोग शब्दयोगी अव्ययांसारखा जर आहे असें म्हणावयाचें असेल तर अव्ययांच्या प्रकारांत हवें तर त्यांचा समावेश करा-

वयाचा होता ! पण मराठींतील अव्ययांप्रमाणेंच क्रियाविशेषणांचें स्वरूप नीट न ओळखतां हा खटाटोप होत आहे. संस्कृत व्याकरणांतील क्रियाविशेषणांविषयीं वर किंचित् दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून या प्रश्नांचीं उत्तरें सहज सांपडण्यासारखीं आहेत.

## लिंगभेद

आतां लिंगविषयक विवेचन पाहूं. लिंगविषयक चर्चा स्त्रीप्रत्ययांच्या बाबतींत पण येते. वास्तविक लिंगभेद हा कृत्रिम आहे व तत्संबंधींचीं तत्त्वें जरी सर्व भाषांत जवळजवळ सारखींच आहेत, तरी मराठीचे विशेष हे या विवेचनांत स्पष्ट होणें आवश्यक होतें; परंतु हा भेद इंग्रजी लोकांना मराठी शिकविण्याच्या दृष्टीनेंच सांगितलेला आहे हें सिद्ध करणेंसुद्धां अनावश्यक ठरतें ! लिंगविषयक विवेचनांत दादोबांनीं ( पृ. २६ ) सामान्यलिंग मानावें असें ठरविलें व त्यासच दामले अनिश्चित म्हणणें बरें, असें ( सर्वनामांविषयीं ) सांगतात ( पृ. २७१ ). दादोबांच्या मताप्रमाणें " ज्या नामेंकरून वर सांगितलेल्या कोणत्याहि लिंगाचा ज्या काळीं एखाद्या वाक्यामध्यें निश्चय करितां येत नाहीं, त्या काळीं त्याचें सामान्यलिंग म्हणावें. जसें–मित्र, मीं, तूं, पक्षी इ. " कृष्णशास्त्र्यांनीं, " वाक्यांत बहुतकरून त्यांचा लिंगनिर्णय होतो; परंतु एखादे वेळेस तो झाला नाहीं, तरी तेवढ्यावरून त्या शब्दाचें सामान्यलिंग मानणें बरोबर नाहीं....असल्या शब्दास उभयलिंगी किंवा अनेकलिंगी हें नांव शोभतें....परंतु वरच्या त्यांच्या कल्पनेप्रमाणें सामान्य-वचन असा एकवचनांत प्रकार मानावा लागेल" ( मराठी व्याकरणावरील निबंध, आवृत्ति तिसरी, सन १९२३, पृ. ५३ ) असें म्हटलें आहे. वाक्यामध्यें ज्या अर्थीं एकाच कोणत्या तरी लिंगीं प्रयोग होणार, त्या अर्थीं मराठींत सामान्यलिंगाचा प्रश्नच खरोखर उरत नाहीं ! अनेकलिंगी शब्दांची नोंद कोशांत हवी. इतरत्र त्याची आवश्यकता नाहीं. सुदैवानें पुढील व्याकरणकारांनीं या सामान्यलिंगास फारसें महत्त्व दिलें नाहीं तें योग्यच झालें. परंतु लिंगविषयक विवेचन मराठी भाषेच्या प्रकृतीस अनुसरून करणें अजून अवश्य आहे. या दृष्टीनें कृदंत विशेषणां-कडे अधिक लक्ष पुरवून मराठी प्रयोगरचनेचा विशिष्टपणा दाखवतां येईल आणि इंग्रजी ' प्रयोगां 'चें अनुकरण थांबवितां येईल. तसें न केल्यानें संयुक्त क्रियापदांचे व संयुक्त काळांचे घोटाळे मराठींत शिरले. हें इंग्रजी शिकणें सुलभ जावें म्हणून आणि इंग्रजांना मराठीचा अर्थ सुबोध व्हावा म्हणून ! व्याकरणानें असें दास्य पत्करण्याचा प्रसंग जगांतील वसाहतींतील भाषांवर आलेला आहे. पण स्वतंत्र-पणाचा डौल आम्हांस असतांना हें दारिद्र्य कशाला !

## क्रियाविशेषणें

शास्त्र्यांच्या व्याकरणांत क्रियाविशेषणांचे प्रकारहि इंग्रजीवरून केलेले आहेत ( हे गुणार्थक, पृ. १२५ या सदराखालीं येतात ): संख्यावाचक, कालवाचक, स्थलवाचक, संमति वा विमत्ति (!) बोधक, स्वरूपार्थक इ. हें अनुकरण इंग्रजीचें नाहीं

असें म्हणतां येणार नाहीं ! हें वर्गीकरण अर्थमूलकच आहे हें स्पष्ट आहे. चिपळूणकरांनीं असले प्रकार केलेले नाहींत. ' अर्थासहित ' क्रियाविशेषण अव्ययें दादोबांनीं सांगितलीं आहेत व त्यांचे पुढील भेद त्यांनीं उल्लेखिलेले आहेत:–स्थलवाचक, कालवाचक, संख्यावाचक, क्रमवाचक, निश्चयार्थक, अनुकरणवाचक ( पृ. २५५ ). हा सर्व प्रकारभेद इंग्रजीवरून आला व तो पुढें मराठी व्याकरणांत तसाच टिकून राहिला आहे. दामल्यांनाहि हे प्रकार मानवले !

क्रियाविशेषणांचे अर्थमूलक वर्गीकरण Time, Place, Number, Manner-Quality-State, Quantity-Extent-Degree–या इंग्रजी भेदानुरूप स्थलवाचक, कालवाचक, संख्यावाचक, रीतिवाचक, परिणामवाचक इ. भेद देऊन मराठी व्याकरणकार करतात. दामल्यांनीं संख्यावाचक म्हणजेच परिणामवाचक क्रियाविशेषणें धरलीं आणि पुन्हां थोडा घोटाळा केला आहेच ! याच्या जोडीस Denying निषेधवाचक असा एक अस्पष्ट वर्ग दामले करतातच ( पृ. २१२ ) !! म. पां. सबनिसांनीं आपल्या आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरणांत क्रियाविशेषणें अव्ययें यांचे अर्थावरून प्रकार दाखविले आहेत; परंतु त्यांनीं योग्य ती भूमिका पत्करून " खरें म्हटलें तर वरील प्रकारहि निवळ अर्थाच्या दृष्टीनें केले आहेत. व्याकरणदृष्ट्या ते करण्याची आवश्यकता नाहीं. पूर्वव्याकरणकारांनीं हे प्रकार केले आहेत, म्हणून ते येथें दिले आहेत. " ( पृ. १३४–१३५. स्थूल मुद्रित आमचें. ) असें म्हटलें आहे. हेंहि काय थोडें झालें !

मराठी नामांचें स्थलवाचक, कालवाचक इ. वर्गीकरण न झाल्यामुळें आम्ही फार मोठ्या जंजाळांतून वांचलों; नाहींतर एखाद्या इंग्रजी व्याकरणांत जर हे प्रकार असते तर तोहि पायंडा पडला असता !!! आणि मराठी व्याकरणाचे हालहाल झाले असते !

श्री ग. ह. केळकर यांनीं ( मराठी व्याकरणाचीं मूलतत्त्वें, पृ. २१४–२१५ ) आपल्या व्याकरणांत यासंबंधीं असें म्हटलें आहे:– " क्रियेचें प्रकार दाखविणारे जे शब्द त्यांस क्रियाविशेषणें असें म्हणतात. क्रियेच्या प्रकारांचीं कांहीं उदाहरणें वर दिलींच आहेत. तशाच तऱ्हेनें सर्व निरनिराळ्या प्रकारांची यादी केली व त्याचप्रमाणें गुणधर्मवाचक शब्दांच्या निरनिराळ्या छटा दाखविणाऱ्या शब्दांचीहि, त्यांचे प्रकार करून यादी केली तर एकंदर प्रकार इतके होतील कीं, त्यांचें एक प्रस्थच होईल. उलटपक्षीं क्रियेच्या प्रकारांत आणखी उपप्रकार ते कसले करावयाचे, ते करण्याची कांहीं जरूर दिसत नाहीं, असेंहि म्हणून चालणार नाहीं. केवळ तात्त्विक दृष्टीनेंच पाहावयाचें झालें तर एक, सर्व प्रकार करावें किंवा दुसरें, मुळींच प्रकार करूं नयेत ( स्थूल मुद्रित आमचें ). आतां त्यांनीं केवळ ठळक प्रकार सांगून पुन्हां एक ' मायपोट ' पत्करावें हे विसंगत होय ! त्यांनीं स्थलवाचक, कालवाचक, संख्यावाचक, परिमाणवाचक व रीतिवाचक असे पांच प्रकार केले !

## शब्दयोगी अव्ययें

जवळच येणाऱ्या शब्दयोगी अव्ययांचा वर्ग पाहूं या. शब्दयोगी अव्ययांचे अर्थावरून केलेले प्रकार असेच इंग्रजीपद्धतीनें केलेले आहेत व ते क्रियाविशेषणां-प्रमाणें दिसतात, असें विवेचन येतें. कालवाचक, स्थलवाचक, गतिवाचक, हेतु-योग्यता-सादृश्य-अनुरोध—इत्यादिवाचक, अन्यव्यावृत्तिवाचक किंवा कैवल्य-वाचक, परिणामवाचक, तुलनावाचक, प्रश्नार्थक, पादपूरक इत्यादि ( दामले, पृ. २१८-२२० ). इंग्रजींत Prepositions चें केलेलें वर्गीकरण सामान्यतः निराळें आहे व त्यांत एकेरी (Simple), दुहेरी (double), संयुक्त (compound), कृदन्ती (participle), वाक्यखंडात्मक (phrase), निह्नुत (disguised) इत्यादि आहेत.

शास्त्रिमंडळाच्या व्याकरणांत शब्दयोगी अव्ययांना ' शब्दयुक्त अव्ययें ' म्हटलें आहे व त्यांचे—" या अव्ययांचा प्रयोग बहुतकरून काळ, स्थळ, अवधि-निमित्त या अर्थावर होतो, " ( पृ. १२५ ) असें म्हणून—तीन प्रकार कल्पिलेले दिसतात. हेंहि विसंगतच होय. अर्थ कोशांत हवेत.

चिपळूणकरांनीं आपल्या निबंधांत ( पृ. १९५-२०० ) शब्दयोगी अव्य-यांचें विवेचन करितांना प्रत्यक्ष प्रकार दिलेले नाहींत; परंतु पृ. १९७ वर लिहि-तांना " अभिव्याप्तिवाचक किंवा परिमाणवाचक जें शब्दयोगी अव्यय " असें म्हणतांना त्यांच्याहि मनांत हे प्रकार करावयाचे होते किंवा काय, असा संशय येतो. पण हें केवळ ' भर ' या अव्ययाचा अर्थ दाखविण्यासाठींहि त्यांनीं लिहिलें असेल. त्यांनीं दादोबांच्या अव्याप्तिदर्शक व्याख्येवर ( पृ. १९९ ) टीका केली आहे; त्यावरून त्यांना शब्दयोगी अव्ययांचे प्रकार अभिप्रेत नसावेत असा सारांश दिसतो व हें योग्य आहे असें वाटतें.

दादोबांच्या व्याकरणांत ( पृ. २५६-२५८ ) शब्दयोगी अव्ययांचे स्थल-वाचक व कालवाचक आणि शुद्ध शब्दयोगी असे तीन प्रकार मानले आहेत. ते एक तर पुरेसे नाहींत, आणि त्याचमुळें हे प्रकार करण्याचीहि आवश्यकता नाहीं असें दर्शवितात. कृष्णशास्त्र्यांच्या याविषयींच्या टीकेचा उल्लेख वर आलाच आहे.

दामल्यांनीं आपल्या शास्त्रीय व्याकरणांत (पृ. २१८) " शब्दयोगी अव्य-यांचें वर्गीकरण करण्याची विशेष आवश्यकता नाहीं. तथापि अर्थास अनुसरून त्यांची वर्गवार यादी पुढें दिल्याप्रमाणें " असें लिहून जवळजवळ एकवीस प्रकार दिले आहेत ! आम्हांस वाटतें ही अगदी अंतिम मर्यादा झाली !

म. पां. सबनिसांनीं आपल्या उच्चतर मराठी व्याकरणांत (पृ. ६१ व ९३) " शब्दयोगी " हा निरर्थक शब्दप्रकार ठरविला असून त्यांचे विभक्तिविषयक कार्य करणारे व ( पृ. ९३, टीप ) " विभक्तिकार्याकडे कांहींच संबंध " नसणारे असें चमत्कारिक वर्गीकरण केलें असून त्याला वाक्यांत प्रातिपदिक किंवा पद म्हणून

मुळींच स्थान नाहीं असें म्हटलें आहे! शब्दांच्या जातींत त्यांच्या मतें या शब्दयोगी अव्ययांना स्थानच नाहीं! हा प्रकार सर्वांत अपूर्वच म्हटला पाहिजे; परंतु त्यांत निदान स्वतंत्र विचार करण्याची धमक दिसते, असें आमचें नम्र मत आहे. आतां उभयान्वयी अव्ययांकडे जाऊं या.

## उभयान्वयी अव्ययें

उभयान्वयी हा शब्द व त्या अव्ययाचे प्रधानवाक्यसूचक आणि गौणवाक्यसूचक हे प्रकार आणि प्रधानत्वसूचकांचे समुच्चयबोधक (cumulative), विकल्पबोधक (alternative), न्यूनत्वबोधक (adversative) आणि परिणामबोधक (Illative) हे चार व गौणत्वसूचकांचे कारणदर्शक (causation), उद्देशदर्शक (purpose), संकेतदर्शक (condition) आणि स्वरूपदर्शक (apposition). (दामले, पृ. २४९) इत्यादि चार प्रकार इंग्रजीचें अनुकरण दाखविणारे आहेत. वास्तविक गौणत्वदर्शक निदान नऊ प्रकार हवेत! (नेस्फील्ड, इंग्लिश ग्रामर सेरीज, बुक ४, पृ. १०५). हें सर्व वर्गीकरण वाक्यमीमांसेसाठीं आवश्यक असलें तरी व्याकरणाच्या दृष्टीनें त्यास कितपत अर्थ आहे हा विचारणीय मुद्दा आहे पण असें असूनहि हें वर्गीकरण आमच्या व्याकरणांत चालूच राहिलें आहे!

शास्त्रिमंडळींच्या व्याकरणांत (पृ. १२६) उभयान्वयी अव्ययांना 'उभयान्विताव्यय' असें नांव देण्यांत आलें असून त्यांचे (१) सत्ययोजक, (२) संकेत, (३) भेदक व (४) कारण असे प्रकार कल्पिले आहेत. सत्यता याचा अर्थ 'महत्त्व' असा असून सत्ययोजकें हीं (co-ordinate म्हणजे) समानाधिकरण उभयान्वयी अव्ययें होत (केळकर, पृ. २२६). संकेत उभयान्वितें हीं सध्यांचीं संकेतदर्शकें होत. भेदक म्हणजे न्यूनत्वबोधक, परिणामबोधक अव्ययें होत; कारण उभयान्वित म्हणजे कारणदर्शक, व पक्षभेदक म्हणजे सध्यांची विकल्पबोधकें होत. हें वर्गीकरण पुरेसें नाहीं व तें उघडउघड इंग्रजी अनुकरणच आहे, संस्कृताश्रयी नाहीं, हें काय सांगावयास पाहिजे?

चिपळूणकरांनीं आपल्या मराठी व्याकरणावरील निबंधांत (पृ. २०२) उभयान्वयी अव्ययांचे **पांच** प्रकार मानिले आहेत—(१) हेतुत्वद्योतक किंवा कारणत्वबोधक, (२) विरोधद्योतक, (३) समुच्चयद्योतक, (४) विकल्पद्योतक व (५) स्वरूपबोधक. कृष्णशास्त्र्यांनीं संकेतदर्शकांचा विरोधद्योतकांत अंतर्भाव केला आहे व "कीं, जे" इत्यादिकांस 'स्वरूपबोधक उभयान्वयी अव्ययें' म्हटलें आहे.

दादोबांनीं आपल्या व्याकरणांत (पृ. २५६) उभयान्वयी अव्ययांचे प्रकार न सांगतां केवळ अर्थ सांगितले आहेत. समुच्चयबोधक, न्यूनत्वबोधक [ यांना कृष्णशास्त्री क्रियाविशेषणें मानतात (मराठी व्याकरणावरील निबंध, पृ. २०३)], पक्षांतर, कारणोभयान्वयी व संकेतोभयान्वयी, हे प्रकार वाक्यपृथक्करणासाठींच उपयोगी आहेत.

केळकरांनीं आपल्या व्याकरणांत ( मराठीव्याकरणाचीं मूलतत्त्वें ), समानाधिकरण व व्यधिकरण उभयान्वयी (पृ. २२६ ) असे या अव्ययांचे दोन प्रकार मानून अर्थभेदाप्रमाणें समुच्चयबोधक, विकल्पबोधक, न्यूनत्वबोधक, परिणामबोधक, कारणदर्शक व संकेतदर्शक असे उपप्रकार दर्शविले आहेत. (पृ. २२६-२२८).

सबनिसांनीं आपल्या उच्चतर व्याकरणांत समुच्चयबोधक, विकल्पबोधक, न्यूनत्वबोधक, कारणदर्शक, संकेतदर्शक व स्वरूपदर्शक एवढेच प्रकार केले आहेत. संयुक्त उभयान्वयी हा नवीन प्रकार मानिला आहे; परंतु पृ. १३७ वरील कोष्टकांत यद्यपि, तथापि हे संयुक्तांत घातले नाहींत. त्यांच्या मतानें या अर्थावरून पडणाऱ्या प्रकारांत सर्व उभयान्वयी अव्ययांचा अंतर्भाव होतो. असें मानलें तर अव्याप्ति होते हें उघड आहे.

दामल्यांनीं केलेल्या वर्गीकरणाचा उल्लेख उभयान्वयी अव्ययांच्या विवेचनाच्या आरंभींच आम्हीं केला आहे. दामल्यांनीं पूर्ववैयाकरणांना, त्यांनीं वाक्यमीमांसेच्या दृष्टीनें वर्गीकरण नीट केलें नाहीं म्हणून दोष लाविला आहे; परंतु पुष्कळांच्या मतें वाक्यपृथक्करण हा व्याकरणाचा भाग नसतो हें दामल्यांनीं लक्षांत घेतलें नाहीं. त्यांनीं आपलें वर्गीकरण इंग्रजीनुसार केलें आहे. आतां केवलप्रयोगी अव्ययांचा विचार पाहूं या.

## केवलप्रयोगी अव्ययें

केवलप्रयोगी किंवा उद्गारवाची अव्ययें व त्यांनीं दाखविल्या जाणाऱ्या वृत्ति या सर्व इंग्रजीवरून मराठींत उतरल्या आहेत. हर्ष ( Joy ), शोक ( Grief ), आश्चर्य (amazement), अनुमोदन ( approval ), तिरस्कार ( Weariness ), धिक्कार ( Reprost of ), संबोधन ( calling someone ), विरोध ( doubt ) इ. ( दामले, पृ. २६३, २६४; नेस्फील्ड इंग्लिश ग्रामर सेरीज, बुक ४, पृ. ११० पहा. )

केवलप्रयोगी अव्ययें म्हणजे " ज्याचे प्रयोगास दुसऱ्या शब्दाची अपेक्षा नाहीं तें होय " असें म्हणतांना शास्त्र्यांच्या महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणांत इंग्रजीवरून हा भेद पत्करलेला आहे हें उघड होतें (पृ. १२५). कृष्णशास्त्री यांनीं आपल्या मराठी व्याकरणावरील निबंधांत ( पृ. २०३ ) यांचा उल्लेख " जीं अव्ययें वाक्यांत अन्वय पावणारा अर्थ दाखवीत नाहींत किंवा वाक्यावाक्याचा संबंधहि भासवीत नाहींत, तर केवळ बोलणाराच्या मनांतील हर्ष, शोक, तिरस्कार, अनुमोदन इत्यादि वृत्ति मात्र दर्शवितात, त्यास 'केवलप्रयोगी अव्ययें' किंवा 'उद्गारवाचकें' म्हणतात" असा करून, 'म्हणतात' या शब्दानें त्यांतील संस्कृताश्रयी साहित्य दर्शविलें आहे असें वाटतें. पण हें निर्णायक नाहीं.

दादोबांच्या व्याकरणांतहि यांचा स्वीकार इंग्रजी व्याख्येचें रूपांतर देऊन केलाच आहे (पृ. २५९). त्याच्या उद्धारार्थीं वाक्यांना अव्ययांत टाकतां येईल, या मताविरुद्ध चिपळूणकरांनीं टीका केली आहे ती समर्पक वाटते.

मराठी व्याकरणांत केवलप्रयोगी अव्ययांची ओळख व वर्गीकरण इंग्रजी-वरून केलेलें असल्यामुळेंच वरील प्रकार ( ' काय मौज ' इत्यादि वाक्यांश ) घडलेला आहे हें स्पष्ट होतें. इंग्रजींत अशा ' फ्रेजेस् 'चा उपयोग या वर्गीकरणाखालींच दाखविलेला असतो हें तज्ज्ञांस सांगण्याची आवश्यकता नाहीं.

आगरकरांच्या वाक्यमीमांसेंतहि या अव्ययांचें स्पष्टीकरण विस्तृत तऱ्हेनें केलेलें आपल्यास दिसतें. दामल्यांनीं चिपळूणकरांची टीका ध्यानांत घेऊन ( पृ. २६४-२६५ ) उद्गारार्थ वाक्यांशाविषयींचें विवेचन केलेलें आहे तें न्याय्य वाटेल. येथें हा प्रपंच आतां पुरे झाला.

### क्रियापदें

प्रयोगांची व्यवस्था लावीत असतां मराठी भाषेचें स्वरूप लक्षांत न घेतां व कर्ता, कर्म इत्यादि शब्दांची इंग्रजी व्यवस्था मानून निर्माण केलेले घोंटाळे फारच अवर्णनीय आहेत ! त्याच्याच जोडीला धातूंचे सकर्मक, अकर्मक व साहाय्यक असे तीन भेद करून इंग्रजी वर्गीकरण मान्य केलें आहे. साहाय्यकांच्या अंतर्भावानें इंग्रजी शिकणारांना व मराठी शिकणाऱ्या परदेशीयांना थोडें सौलभ्य प्राप्त झालें असेल हें निर्विवाद दिसतें; पण व्याकरणाची रचना परकीयांच्या उपयोगासाठीं व परभाषा शिकतां यावी म्हणून केली या घटनेस जगांतील भाषांच्या इतिहासांत अन्यत्र थोडीच जोड सांपडेल!

साहाय्यक क्रियापदें हा प्रकार इंग्रजी व्याकरणांतील Auxiliary वरून आला आहे. वास्तविक साहाय्यक क्रियापदें मानल्यानेंच मराठी व्याकरणांत संयुक्त क्रियापदें व संयुक्त काळ मानण्याचा प्रश्न उद्भवला आणि अनेक गुंतागुंती निर्माण झाल्या.

शास्त्रिमंडळाच्या 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' या ग्रंथांत संयुक्त क्रियापदें किंवा संयुक्त काळ मानलेले नाहींत. त्यांत साहाय्यक क्रियापदेंहि मानलेलीं नाहींत, हें ओघानेंच आलें. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं ( निबंध पृ. ११४ ) संयुक्त क्रिया-पदांस मान्यता दिलेली नाहीं. तसेंच त्यांची ' अर्थ ' ( Mood ) याविषयींची भूमिकाहि मूलतः संस्कृताश्रयीच आहे; परंतु ( पृ. ११५ ) त्यांनीं ही परिभाषा मराठी व्याकरणांत आहे असें म्हटलें तें दादोबांचें व्याकरण दृढमूल झाल्यावर लिहिलेलें असावें. येथें कृष्णशास्त्री यांनीं स्पष्टपणेंच हें इंग्रजी मूळ दाखविलें आहे. ते लिहितात—" इंग्रजी व्याकरणांत ' इंडिकेटीव मूड ' म्हणून संज्ञा आहे, तिच्या बरोबरीची संज्ञा मराठी व्याकरणांत आणण्याकरितां....' स्वार्थ ' ही नवीनच संज्ञा

कल्पिली आहे. वास्तविक या संज्ञेचें कांहींच प्रयोजन नाहीं व तशी संज्ञा संस्कृत व्याकरणांत नाहीं." रूपभेद या प्रकारांविषयीं पण कृष्णशास्त्री यांनीं लिहून (मराठी व्याकरणावरील निबंध, पृ. ११७) यांची परकीयता स्पष्ट केलेली आहे. "नकार लागल्यानें क्रियापदाच्या रूपांत कांहीं तफावत होते असें नाहीं," व "निषेधार्थक शब्दांचा जो प्रयोग व्हावयाचा तो कांहीं रूपांच्याच संबंधानें होतो; सर्वांच्या संबंधानें होत नाहीं; किंवा करण्याचा तादृश प्रचारहि नाहीं. हा मराठी भाषेंतील वाक्यरचनेंतील चमत्कारिक विशेष आहे, व हा वाक्यरचनेच्या निरूपणांत सांगावा," पुढें "आतां तीन प्रकारचा भेद दादोबांनीं सांगितला आहे, त्याचेंहि प्रयोजन दिसत नाहीं," (पृ. ११८) असें म्हटलें आहे. तीन शास्त्र्यांच्या व्याकरणांत शक्य व प्रयोजक प्रत्यय प्रकरण १७ व १८ मध्यें सांगितलें आहेत. तेथें हे भेद निराळे मानण्याची सूचना आहे हें निर्विवाद. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं हीं साधित क्रियापदें मानलीं आहेत (पृ. १५३, १५८ इ.). तेंच शास्त्रदृष्ट्या सयुक्तिक आहे. त्याप्रमाणें नामें, विशेषणें इ. पासून इतर धातु सिद्ध होतात, त्याचप्रमाणें शक्यार्थक धातु व प्रयोजकार्थक धातु समजावेत हें सयुक्तिक व उघड आहे. जेथें जेथें सध्यां संयुक्त क्रियापदें मानण्याची पद्धति आहे तेथें तेथें शास्त्रीबुवांनीं त्यांतील कृदंतांचें विशेषणरूप स्पष्टपणें सांगितलें आहे. पहा :—१. भूतकाळीं 'ल' प्रत्ययी रूपें—"चालू मराठी व्याकरणांत ज्या शब्दांस भूतकाळचीं क्रियापदें म्हणतात, ते शब्द मुख्य क्रियापदावरून झाले नाहींत; तर भूतकाळच्या कृदंत विशेषणावरून झाले आहेत." २. भविष्यकाळीं 'णार' प्रत्ययी रूपें धातूस "णार" प्रत्यय लागून जीं धातुसाधित विशेषणें होतात त्यांचाहि भविष्यकाळच्या क्रियापदाप्रमाणें प्रयोग करितात." ३. विध्यर्थक—"संस्कृतांत जशीं विध्यर्थक कर्मणि क्रियापदें आहेत तशीं मराठींत नाहींत....वर्तमानकाळीं कर्तरि, भूतकाळीं कर्तरि व कर्मणि व भविष्यकाळीं कर्तरि धातुसाधित विशेषणाचा जसा क्रियापदाचे जागीं प्रयोग होतो, तसाच विध्यर्थी कर्मणि जीं धातुसाधित विशेषणें, त्यांचा प्रयोग क्रियापदाच्या जागीं होतो. (पृ. १४५; स्थूलाक्षरें आमचीं) त्याचप्रमाणें त्यांनीं संकेतार्थक रूपांविषयीं म्हटलें आहे. (पृ. १५०) यावरून कृष्णशास्त्री संयुक्त क्रियापदें मानीत नव्हते, ही बाब स्पष्ट होते. त्यांनीं संयुक्त काळहि कोठेंच मानलेले नाहींत.

दादोबांनीं आपल्या व्याकरणांत 'साहाय्य' (पृ. १४९) भेद अर्थावरून मानला आहे; परंतु टीपेंत "हा निराळा भेद न मानिला तथापि चालेल, कारण याचा अंतर्भाव सकर्मक आणि अकर्मक यांत केला असतां होईल," असें म्हटलें आहे. पण पुढें पृ. १५४ वर त्यांनीं पुनश्च सहाय क्रियापदें हा प्रकार सांगितला आहे! दादोबांनीं सहाय क्रियापदें मानल्यावर त्यांना आपोआपच काळांचे इतर प्रकार (संयुक्त काळ) मानावे लागले. अपूर्ण, रीति, पूर्ण या अर्थप्रकारांवरून हे काळ त्यांनीं मानले, हा केवळ इंग्रजीचा परिणाम होता. दादोबांच्या व्याकरणरचनेचा उद्देश परकीय भाषा शिकण्यास साहाय्य देणें हा होता. त्यास धरून

त्यांनीं ही रचना केल्यामुळें हा इंग्रजीचा परिणाम या व्याकरणांत घुसला. नाहींतर प्रस्तावनेंत (आवृत्ति ३ री, पृ. २) त्यांनीं ज्या संस्कृत व्याकरणांचा व व्याकरणकारांचा उल्लेख केला आहे त्यांचा परिपाठ वा मार्ग सोडून ते जाते ना! त्यांना या कृत्रिमपणाची जाणीव नव्हती म्हणावी तर पृ. २१० वरील टीपेंत त्यांनीं लिहिलें आहे– "

" रीतिभूत, पूर्णभूत, विध्यर्थी वर्तमान इ० काळीं अशा प्रकारच्या कित्येक रूपांचा यद्यपि बोलण्यांत प्रचार नाहीं, तथापि वर जो काळाचा अनुक्रम सांगितला आहे, त्यास अनुसरून एथें सारीं रूपें लिहिलीं आहेत." पृ. २४२ वर त्यांनीं हेंहि स्पष्ट केलें आहे कीं, "सर्व धातुसाधितांपुढें सर्व सहाय्य धातूंचा योग होतो असें नाहीं." मग हा अशास्त्रीय प्रपंच कां केला? त्याचें उत्तर वर दिलेंच आहे.

दामले यांनीं आपल्या शास्त्रीय मराठी व्याकरणांत संयुक्त क्रियापदांवर एक स्वतंत्र प्रकरणच लिहिलें आहे (पृ. ६९९–७४८). त्यांनीं पण इंग्रजी रचनेप्रमाणें सहाय धातु मानून प्रपंच केला आहे. यांत त्यांनीं वर सांगितलेलीं कृदन्तें व त्यांचें विशेषणत्व हे विशेष ध्यानांत धरले असते तर हा प्रकार झाला नसता! दामल्यांचें हें सर्व विवेचन तर्कदुष्ट आहे; कारण संयुक्त काळ हे तर त्यांना मान्य नाहींत (पृ. ७१४ वरील सूक्ष्माक्षरी टीप). ते लिहितात, "अपूर्ण भूतकाळ, पूर्ण भूतकाळ, भविष्यभूतकाळ हीं मराठी व्याकरणांतील नांवें कितपत शोभतात याचा आतां वाचकांनींच विचार करावा."

पुन्हां काळ व अर्थ यांचें इंग्रजीवरून केलेलें क्रियापदरूपांचें वर्गीकरण दामल्यांना खटकलें नाहीं असें नाहीं. पृ. ७२९ वर ते लिहितात—" हा सर्व घोंटाळा इंग्रजीचे सहवासापासून आमच्यांत उत्पन्न झाला आहे. हा घोंटाळा आणखी किती दिवस चालू राहणार किंवा आम्ही ठेवणार? आमच्या मतें त्याचें समूळ निराकरण जितकें लौकर होईल तितकें चांगलें!!" पण तरीहि हे घोटाळे त्यांनीं शिल्लक ठेवलेच!! भेद व रूपें (पृ. ७३३) त्यांनीं टाकिलीं ही गोष्ट तेवढी बरी झाली. संयुक्त क्रियापदें चिपळूणकरांनीं मानिलीं आहेत हें दामल्यांचें मत चिपळूणकरांच्या निबंधांवरून असिद्ध ठरतें, हें सूक्ष्मपणें वाचणाऱ्या वाचकास सांगणें नलगे. संयुक्त काळांविषयीं (पृ. ७३५) लिहितांना त्यांनीं जें लिहिलें तेंच मत इतरत्र वापरलें असतें तर त्यांच्या व्याकरणांत घोटाळे झाले नसते. संयुक्त काळ मानण्यास हरकत नाहीं, परंतु अडचणी आहेत. त्यांना भिन्नभिन्न नांवें देणें कठिण, त्यांनीं व्यवस्था चांगली होते किंवा शिकणाराची सोय होतें असेंहि मुळींच नाहीं इ. कारणें देऊन त्यांनीं संयुक्त काळ अमान्य केले आहेत. पण एवढाहि फायदा आमच्या मतें कमी नाहीं! दोलायमान, संशयपूर्ण अशा स्थितींत त्यांचा संयुक्त क्रियापदविचार शेवटपर्यंत आहे. (उदा० पृ. ७४० इ.)

उच्चतर मराठी व्याकरणांत सबनिसांनीं संयुक्त क्रियापदें मानलींच आहेत (पृ. १०४). संयुक्त काळहि ते मानितात (पृ. १९३, १९४, १९६ इ.)

हा घोटाळा मराठी व्याकरणांतून निघेल तर बरें असें प्रत्येकास वाटत आहे, हें मात्र निर्विवाद आहे. आतां यांतूनच निघणाऱ्या दुसऱ्या गंमतीकडे लक्ष देऊं. कर्ता म्हणजे काय, धातु म्हणजे काय, इंग्रजी 'सब्जेक्ट' चा अर्थ काय याविषयीं सूक्ष्म विचार करून विभक्त्यर्थ ध्यानांत घेऊन या प्रश्नाकडे लक्ष देणें आवश्यक होतें; परंतु तसें न केल्यानें फार बहार झाली आहे.

## कर्ता

'कर्ता' या शब्दानें दर्शित केलेल्या शब्दाचें महत्त्व वाक्यांत अर्थातच आहे. मराठींत कर्मणि प्रयोग मानण्याची प्रथा पडल्यानें या 'कर्ता' शब्दाचे धिंडवडे हिंदु कायद्यांत पूर्वी येणाऱ्या 'कर्त्या' इतकेच निघाले! 'कर्ता' न मानितां 'धातुरूपेश' मानून मराठींतील कर्मणि प्रयोग काढून टाकून दोनच प्रयोग, कर्तरि व भावे हे ठेवले म्हणजे हा सर्व घोटाळा-कर्ता व कर्म यांचा घोटाळा-संपला असता; परंतु येथेंहि इंग्रजी परिभाषेचा व प्रचाराचा (व संस्कृतमधील रचना नीट लक्षांत न घेतां) केलेला आश्रय दोषरूप ठरला आहे. याच्या जोडीस Voice म्हणजे मुख हा एक नवीन घोटाळा सबनिसांनीं आपल्या उच्चतर व्याकरणांत उत्पन्न केला आहे. त्यास कोठें जोड सांपडेल काय? 'कर्ता' या शब्दाचा 'करणारा' (agent) असा अर्थ करून इतर व्याकरणकारांनीं व दामल्यांनीं (पृ. १६२) मराठी व्याकरणांत खूप घोटाळे निर्माण केले आणि हे सर्व केवळ इंग्रजी तदर्थक वाक्यांतील "Agent" मराठींत आणल्यानें! पुढील उदाहरणें पुरे आहेतः—

(१) त्यानें काम केलें—He did the work.
(२) मला दूध आवडतें—I like milk.
(३) त्याचें पत्र लिहून झालें—He finished writing his letter.
(४) त्याला इंग्रजी येतें—He knows English.
(५) देवाला सर्व दिसतें—God sees everything.
(६) मला वाटतें कीं—I think or feel...
(७) मला काम करवतें—I can do the work.

दामले पृ. १९० वर म्हणतात कीं, "'मला' हाच कर्ता होय!" यापुढें दादोबांच्या भेदव्यवस्थेची जरूरच नाहीं असें ते आपल्या मताप्रमाणें शक्यार्थकांची व्युत्पत्ति लावून सांगतात!

क्रियापदाचे रूपांवर अधिकार चालवणारा (म्हणजे लिंग व वचन या दृष्टीनें) कर्ता हें दामल्यांना मान्य नाहीं (पृ. १६७), आणि यामुळेंच दामल्यांना विभक्तीचें कारकार्थ सांगतांना अधिक घोटाळ्यांत पडावें लागलें हें उघड होय.

दामल्यांची फार मोठी गफलत पुढील वाक्यांत दिसते : ( पृ. १७२ ) " मला वाटतें, त्यानें हें कृत्य केलें असावें. मला वाटलें, तो कालच गेला असावा, " या उदाहरणांत 'वाटतें' आणि 'वाटलें' 'या क्रियापदाचा कर्ता त्यांचेनंतर आलेलें वाक्य होय हें उघड होय'! यावर अधिक टीका करण्याची आवश्यकताच नाहीं. त्यानें काम केलें, त्यानें कामें केलीं, मला दूध आवडतें, मला गाडी लागते, मला, धक्का लागला, त्याचें पत्र लिहून झालें, पोथी लिहून झाली, कागद लिहून झाला त्याला इंग्रेजी येतें, कागद वाचतां येतो, पोथी लिहितां येतें, मला काम करवतें, मला कामें करवतात–कुस्ती करवते, मला टांक चालतो–लेखणी चालते–टोक चालतें, इ. ठिकाणीं क्रियापदांवर अधिकार चालवणारा धातुरूपेश हा प्रथमान्त शब्द धरून कर्तरि रचना ठरवली तर हे घोटाळे नाहींसे होतील; परंतु इंग्रजीच्या सावटाखालींच अजून आम्ही वावरत आहोंत; म्हणून स्वतंत्र विचार आम्हांस शक्य झालेला नाहीं. तो करितां येऊन मराठी व्याकरणाची स्वतंत्र–हवी असेल तर परंपराश्रयी; नको असेल तर मराठी भाषेच्या प्रकृतीनुरूप–व्याकरणरचना करितां येईल तो सुदिन! इति शम्।

—म. अ. करंदीकर

# मोरोपंतविरचित

## श्रीरामाष्टक

( वृत्त – भुजंगप्रयाग )

जगन्नायका ! राघवा ! रामराया !
करीतों तुज्या वंदनें लक्ष पायां.
नको दीन हा तूं उपेक्षूं समर्था !
हरीं बा ! दयासागरा ! या अनर्था. १

जनाला किती भाकितों दैन्य देवा !
शिरीं या तुम्हीं आपुला हस्त ठेवा.
परी भीति वारूनि कोणी न पाळी,
जनाची दिसे रीति कांहीं निराळी. २

न केला असे दोष कांहीं, तथापि
मला मानिती लोक हे सर्व पापी.
परंतु प्रभो ! जाणसी, तूं उपेक्षा
नको बा ! करूं; न प्रभू तूजपेक्षा. ३

असा एक हा दीन कां हो ! न रक्षा ?
अहो ! दीनबंधो ! जगत्त्राणदक्षा !
दया आज कां टाकिली ! रामराया !
उदासीन कां दास हा उद्धराया ? ४

तुजा दास मीं यास तूं मात्र दंडीं,
असे रीति हे नीतिशास्त्रीं उदंडीं ?
तुम्ही सर्वलोकप्रभू सर्व जाणा,
विनंती मनीं किंकराची न आणा ? ५

तुजे पाय संसारसिंधूंत सेतू,
जगद्वंद्य हे विश्वकल्याणहेतू,
मला कां न संरक्षिती ? देवदेवा !
करींनाच मीं काय सप्रेम सेवा ? ६

अशा संकटांतूनि ह्या दीन काढीं,
सुरांचीं भयें नाशिलीं त्वांचि गाढीं.
मज स्वांघ्रिसेवा करायासि लावीं,
प्रभो ! आपुल्या सेवकांमाजि भावीं. ७

नको बा ! उपेक्षा करूं, धांव आतां,
न होयीन मीं आळसी कीर्ति गातां.
बरें तें करावें, मला उद्धरावें,
स्वयें संकटाब्धींत हातीं धरावें. ८

(वृत्त–अनुष्टुभ)

करुणामेघ तूं रामा ! मीं मोर बहु घाबरा,
प्रसाद तन्नावरता करावा अनघा ! बरा. ९*

* ही कविता अप्रकाशित असून पंतांचे वंशज श्री. कृष्णाजी पंत पराडकर (पंढरपूर) यांनीं ती आम्हांस दिली, याबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभारी आहोंत. सं०

## बळी पडलेली "राष्ट्रीय काव्याची बादशाही"

मोरोपंत कर्त्यांच्या स्वहस्तें लिहिलेल्या मूळ पोथ्यांच्या आधारें पंतकाव्यांचे नऊ खंड आमचे मित्र कै. रामकृष्ण पंतपराडकर यांनीं प्रसिद्ध केले, हें सर्वश्रुत आहे. या नऊ खंडांपैकीं आर्याभारताचा पहिला खंड इ. स. १९१२ मध्यें प्रसिद्ध झाला. या खंडाला रसिकवर्य दे. भ. कै. शिवराम महादेव परांजपे यांनीं लिहिलेल्या ७८ पानांचा प्रदीर्घ उपोद्घात छापलेला आहे. आर्याभारतछपाईचें काम चालू असतांना विषयाची विस्तृत अनुक्रमणिका करण्याचें काम मजकडे होतें; आणि ती करून दिल्याचा संपादकांच्या प्रस्तावनेंत उल्लेख आहे. हें विस्तृत सूचीचें काम मजकडे असल्यामुळें छापखान्यांतून मजकूर जसजसा छापला जाई, तसतशा मजकुराच्या षोडशपत्री घड्या मजकडे अनुक्रमणिका तयार करण्यासाठीं येत असत. आणि त्यामुळें कै. पंतांची व माझी बहुधा प्रत्यहीं बैठक होत असे.

शिवरामपंतांचा उपोद्घात तयार झाला तेव्हां त्याची पहिली षोडशपत्री कच्ची घडी नित्यक्रमाप्रमाणें मजकडे आली. या घडींत प्रथमारंभीं सुमारें अडीच पानें मजकूर शिवरामपंतांनीं लिहिला होता. त्यांत मराठीच्या राष्ट्रीय काव्याची बादशाही, राष्ट्रीय भूमिकेवरून चित्रित केली होती. १९०८ ते १९१४ हा काळ लो. टिळकांच्या कारावासाच्या काल होय. आणि या कालांत सरकारची करडी नजर फिरत असे. आणि मंडळी सर्वच चळवळी जरा जपूनच चालवीत असत. मोरोपंती काव्यांचें प्रकाशन हें एक सोवळें कार्य होतें. परंतु त्या कार्याचे प्रवर्तक कै. पंत-पराडकर व त्यांची मित्रमंडळी यांचीं चारित्रें सरकारच्या दृष्टीनें सोंवळीं नव्हतीं. तथापि कै. पंतपराडकर यांनी अंगिकारलेल्या पंतकाव्याच्या प्रकाशनाच्या महोद्योगास प्रोत्साहन देणाऱ्या मंडळींत विनायक कोंडदेव ओक यांच्यासारखे राजनिष्ठ पक्षांत गणले गेलेले "बालबोध संपादक" आणि महाजनी, साने, आगाशे, कानिटकर प्रभृति निवृत्त सरकारी नोकर आणि दा. ग. पाध्ये, हरि नारायण आपटे यांच्यासारखे टिळकविरोधी पक्षांत मोडणारे प्रमुख विद्वान या सर्वांचा समावेश होता. उपोद्घातलेखनाचें कार्य ज्वलज्जहाल म्हणून प्रसिद्ध असलेल्या दे. भ. शिवराम-पंत परांजपे यांच्याकडे होतें. तेव्हां शिवरामपंतांचा राष्ट्रीय बादशाही गादीचा मजकूर प्रसिद्ध करण्याच्या संबंधानें पंतपराडकरप्रभृति मंडळीच्या मनांत अखेरच्या

वेळीं डळमळ उत्पन्न झाली. याचा परिणाम असा झाला कीं, शिवरामपंतांचें मन वळवून तो अडीच पानें मजकूर त्यांच्याकडून बदलून घेतला. या बदलांत राष्ट्रीय काव्याच्या बादशाही गादीचा लोप झाला, आणि त्याजागीं भगवद्भक्तीच्या पवित्र आणि सोंवळ्या भक्तीची योजना करण्यांत आली. येणेंप्रमाणें "शुद्ध" झालेला उपोद्घात ग्रंथाला जोडण्यांत आला आणि तोच लोकांसमोर आहे.

वर वर्णिलेली आंतली घडामोड कांहीं वेचक मंडळीसच माहीत होती. आतां या मंडळीपैकीं वैद्यपंचानन कवडेशास्त्री किंवा पंडित बाळाचार्य खुपेरकर यांच्यासारखा एखादा दुसरा साक्षीदार उरलेला. मागें सांगितल्याप्रमाणें शिवरामपंतांनीं लिहिलेल्या "बादशाही गादी"च्या छापील मुद्रिताची कच्ची घडी यथाक्रम मजकडे आलेली मजजवळील स्थळप्रतींत आहे. आतां ती अन्यत्र कोठेंहि आणि कोणाजवळहि सांपडेल असें वाटत नाहीं. मजजवळ असलेली त्या घडीची प्रत ती माझ्या समजुतीप्रमाणें एकच एक अशी असावी.

मोरोपंतांच्या काव्याचे नऊ खंड पंतपराडकर यांनीं प्रसिद्ध केले, आणि स्फुटकाव्यांचे तीन खंड प्रसिद्ध करण्याचा त्यांचा संकल्प त्यांना पुरा करतां आला नाहीं. सुदैवाची गोष्ट कीं, या स्फुटकाव्यांचा एक खंड मुंबईच्या मराठी संशोधनमंडळानें नुकताच प्रसिद्ध केला आहे. मुंबईचे एक पंतभक्त दामोदर विनायक जोशी यांनीं पंचवीस हजार रुपयांचें दान मुंबई विद्यापीठास मोरोपंतनिमित्तानें केलें आहे. तेव्हां आतां मोरोपंतांचे उरलेले भाग विद्यापीठाकडून प्रसिद्ध होतील या विषयीं कसलीहि चिंता बाळगण्याचें पंतभक्तांना कारण नाहीं. नुकतीच प्रा. प्रियोळकर यांना मीं शिवरामपंतांच्या प्रस्तावनेची वरील हकीकत निवेदन करून माझ्या संग्रहांतील ती एकमेव उपोद्घाताची प्रत दाखविली. तेव्हां त्यांनीं ही नवलकथा लिहून द्यावी आणि तो प्रस्तावनेंतील अप्रकाशित मजकूर प्रकाशित करण्यास द्यावा अशी इच्छा प्रकट केली. असा हा योग साधून आल्यामुळें हें लेखन तयार झालें. वाचकांच्या सोयीसाठीं दोनहि मजकूर एकाखालीं एक एकत्र प्रसिद्ध करीत आहोंत. मर्मज्ञ वाचकांना शिवरामपंतांची खरी नाडी कोठें हातीं लागते तें आतां सहज कळून येईल, आणि कित्येक वेळेला पडद्याआड कशा विलक्षण घडामोडी घडतात तें कळून येऊन एकप्रकारचा विस्मय वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

सौर ज्येष्ठ २३।१८८३
पुणें.

दत्तो वामन पोतदार.

## शिवरामपंतांचा प्रथम छापण्यास दिलेला (रद्द) मजकूर

श्रीः

# उपोद्घात

राष्ट्रीय काव्य आणि राष्ट्रीय शौर्य यांचा परस्परांशीं निकट संबंध असल्याचें पुष्कळ देशांच्या इतिहासांमधून दृष्टोत्पत्तीस येतें. राष्ट्रीय काव्य हें कारण आणि राष्ट्रीय शौर्य हें त्याच्यापासून उत्पन्न होणारें कार्य, अशा प्रकारचा हा या उभयतांमधील कार्य-कारणभावसंबंध पुष्कळ पाश्चात्य पंडितांनीं आपल्या काव्य-विषयक चर्चेच्या पुस्तकांतून प्रस्थापित केलेला आहे. तोच प्रकार आपल्या महाराष्ट्रांतील कवितात्मक वाङ्मयासंबंधानें हि झालेला असल्याचें दिसून येतें. आपल्या महाराष्ट्रामध्यें हिंदूंची हिंदुपदबादशाही मागाहून स्थापिली गेली. परंतु तिच्या आधीं तिला कारणीभूत आणि तिची प्राणभूत अशी जी राष्ट्रीय काव्याची बादशाही, ती श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं महाराष्ट्रामध्यें संस्थापित केलेली होती. त्या बादशाहीचा रायगड ज्ञानेश्वर-महाराजांनीं आळंदी येथें उभारला; आणि इंद्रायणीच्या कांठीं त्यांनीं आपल्या बादशाहीचें तक्त स्थापन केलें. या काव्यात्मक बादशाहीच्या अमलामधील श्रीज्ञानेश्वरमहाराज हे पहिले बादशहा होत. हें जें भगवद्भक्तीचें आणि महाराष्ट्रकवितेचें बादशाही घराणें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं सुरू केलें, त्या घराण्यामध्यें त्यांच्यामागून एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास, वामन, तुकाराम, वगैरे फार मोठमोठे व नामांकित असे बादशहा निर्माण झाले. महाराष्ट्रांतील कर्ते, शूर, लढवय्ये, मुत्सद्दी वगैरे सर्व प्रकारचे लोक त्यांच्या प्रतिभेच्या तेजानें राजकारणांत तेजस्वी कसे झाले, त्यांच्या भक्तीच्या बळानें रणांगणा-वर बलाढ्य कसे झाले, व त्यांच्या काव्यामृतानें इतिहासामध्यें अजरामर कसे झाले, या गोष्टी सर्वांना माहीतच आहेत.

महाराष्ट्रीय कवींची बादशाही गादी

अशा प्रकारच्या या अद्वितीय आणि अवर्णनीय बादशाही घराण्यामधील मोरोपंत हे शेवटचे बादशहा होत. ज्या या बादशाही रियासतीचे ज्ञानेश्वर हे मूळ संस्थापक होते, आणि मोरोपंत हे शेवटचे महापुरुष होत, तिनें आपल्या देशावर आपल्या काळीं किती चांगले परिणाम घडवून आणले, याची कल्पना प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनामध्यें पूर्णपणें जागरूक आहे. हा बादशाही अंमल आपल्या देशावर तसाच अव्याहत चालू राहिला असता, तर फार बरें झालें असतें. परंतु या कवितेच्या साम्राज्यांतील शेवटचे बादशहा मोरोपंत हे निजधामाला गेल्यानंतर ईश्वरी इच्छा बदलली! ज्ञानेश्वरांपासून तों थेट मोरोपंतांपर्यंत अव्याहतपणें चालत आलेलें मराठी कवितेचें हें बादशाही घराणें आतां बंद पाडावें आणि त्याची नक्कल करावी, अशीच बहुधा परमेश्वराची लहर लागली असावी! कारण, मोरोपंतांच्या पाठीमागून (अलीकडचे आधुनिक कवि-खेरीजकरून!) त्या बादशाही घराण्याचें उज्ज्वल नांव पुढें चालविण्यासारखा एक हि कवि निर्माण झाला नाहीं. अशा रीतीनें सर्व राष्ट्रीय व्यवहारांना उदय आणि उत्तेजन देणारी ही भगवद्भक्तीची आणि काव्यामृताची बादशाही गादी मोरोपंतांबरोबर लयाला गेल्यानंतर तिच्या परिसमाप्तीमुळें आपल्या महाराष्ट्रामध्यें काय काय परिणाम झाले, हें आज कोणाला सांगावयाला पाहिजे आहे? नदीचा उगम कोरडा पडल्यावर मग तिचें मुख वाळून गेलें, किंवा दिव्यांतील तेलाचा सांठा संपल्यावर मग त्यांतील निर्जीव कापसाची वात मालवली गेली, तर त्यांत आश्चर्य तें कोणतें!

शेवटचे बादशहा

असो; या मराठी कवितेच्या बादशाही वंशपरंपरेमधील शेवटचे पुरुष मोरोपंत ते परलोकीं जाऊन जरी आज पुष्कळ दिवस झाले आहेत, तरी त्यांचा काव्यमय आत्मा अद्यापि इहलोकीं च आहे.

[पुढें चालू

श्रीः

# उपोद्घात

भगवद्भक्तीसारखी दुसरी उत्कृष्ट गोष्ट या जगामध्यें कोणती आहे ? इहलोकीं हिच्यापासून सर्वांपेक्षां अत्यंत कमी नुकसान आणि सर्वांपेक्षां अत्यंत जास्त फायदा होत असल्याकारणानें हिची योग्यता व्यवहारदृष्ट्या तर फार मोठी आहेच, पण हिच्यापासून प्राप्त होणाऱ्या पारलौकिक फलाकडे पाहिलें, म्हणजे तर हिच्या तोडीचें सुलभ असें साधन दुसरें कोणतेंहि आजवर उपलब्ध झालेलें नाहीं असेंच म्हणणें भाग पडतें. असें उत्तम साधन मनुष्यप्राण्यापुढें वाढून ठेविलेलें असूनहि एखाद्या रोगग्रस्ताप्रमाणें तो त्याच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहत नाहीं. ही खेदजनक स्थिति पाहून ती बदलण्याकरितां आणि या प्रेमळ भक्तिमार्गाकडे त्याचें मन वेधण्याकरितां नारद, वाल्मीकि, व्यास, शुकाचार्य, इत्यादिकांच्या वेळेपासून त्या त्या काळच्या भगवद्भक्तांचे अश्रांत परिश्रम चाललेले आहेत. या भक्त-परंपरेंतील आपल्या महाराष्ट्रामधील आद्य भगवद्भक्त म्हटले म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज हे होत. यांनीं आपल्या उग्र योगबलानें आणि उत्कृष्ट वाक्चातुर्यानें सर्व महाराष्ट्रीयांना तल्लीन करून सोडलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनीं भक्तिमार्गाचा प्रसार करितांना महाराष्ट्रीय कविता ही एक त्या कृत्याला साधन म्हणून हातांत धरली होती. उत्कृष्ट काव्याच्या सुवर्णमय चमसानें त्यांनीं भगवद्भक्तीचें उत्कृष्ट औषध त्रिविधतापसंतप्तांना पाजिलें. आणि अशा रीतीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजरूपी परिसाचा सहजगत्या स्पर्श झाल्यामुळें आपल्या महाराष्ट्रीय काव्याला सुवर्णमयत्व, सुंदरत्व आणि हृदयंगमत्व अनायासें प्राप्त झालें. ही भगवद्भक्तीची आणि कवित्वाची जी मैत्री ज्ञानेश्वरमहाराजांचे वेळीं जमली, ती आपल्या महाराष्ट्रवाङ्मयामध्यें पुष्कळ दिवस अबाधितपणें चालू होती. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मागून जे कवि झाले, त्यांचाहि मुख्य विषय म्हटला म्हणजे

मोरोपंत

या संसारतापांतून सुटण्याचें मुख्य आणि सुलभ साधन जें भगवद्भक्ति तोच होता. व या साधनाचें प्रतिपादन करण्याकरितां तेहि उत्तम काव्यांचा उपयोग करीत आले. ज्ञानेश्वरमहाराजांचे मागून एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास, वामन, तुकाराम वगैरे जे भगवद्भक्त आणि कवि झाले, त्यांनीं ज्ञानेश्वर-महाराजांनीं घालून दिलेली परंपरा अव्याहतपणें चालविली. या भगवद्भक्त कविमालेपैकीं अलीकडच्या काळांतील शेवटले श्रेष्ठ कविवर्य म्हटले म्हणजे मोरोपंत हे होत. यांच्या काव्यामध्यें भगवद्भक्ति तर आहेच; परंतु यांच्या भगवद्भक्तीमध्यें जें काव्य आहे, तें साहित्यशास्त्रदृष्ट्या फार वरच्या दर्जाचें आहे. आपल्या महाराष्ट्रवाङ्मयाचें मोठें भाग्य, म्हणून त्यामध्यें मोरोपंतांच्या काव्यांचा जन्म झाला. इतर देशांतील आणि भाषांतील कवींचीं काव्यें पाहिलीं तर त्यांपैकीं कित्येक सरसपणांत आणि सुंदर-पणांत मोरोपंतांच्या काव्याच्या बरोबरीला येणार नाहींत असें नाहीं. परंतु त्यांच्यामध्यें मोरोपंतांच्या कवितेमधल्याप्रमाणें भक्तिरसाचें अधिष्ठान मात्र क्वचितच सांपडेल. परभाषांतील परदेशीय काव्यांमधील विषय पाहिले असतां ते बहुतेक ऐहिक, व्यावहारिक व क्षणिक असतात व त्यामुळें त्यांचा टिकाऊपणाहि बेताचाच असतो. परंतु भगवद्भक्तीची गोष्ट तशी नाहीं. भगवद्भक्ति हा विषय सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहे. परम-कारुणिक परमेश्वर आणि संसारचक्रांत सांपडलेला मनुष्य, ही जोडी जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत भगवद्भक्ति या विषयाच्या टिकाऊपणाला भीति नाहीं. असल्या टिकाऊ पायाचा आधार घेऊन काव्यरसाची कमाल एक जुन्या महाराष्ट्रवाङ्मयाच्या आरंभीं श्रीज्ञानेश्वरांनीं केली, आणि दुसरी ह्या वाङ्मयाच्या अखेरीस मोरोपंतांनीं केली.

ते मोरोपंत परलोकीं जाऊन आज पुष्कळ दिवस झाले आहेत, तरी त्यांचा काव्यमय आत्मा अद्यापि इहलोकींच आहे.

# कानारी, कोंकणी आणि मराठी

ले.—प्रा. डॉ. वि. बा. प्रभु देसाई, एम्. ए., पीएच्. डी.

सोळाव्या आणि सतराव्या शतकांत युरोपियनांचा राज्यकर्ते आणि धर्मप्रसारक या नात्यानें गोमंतकाशीं घनिष्ठ संबंध आल्यानंतर त्यांनीं गोव्यांतील बोलीचे जे निरनिराळे नामनिर्देश केले, त्यांचा येथें थोडक्यांत विचार करावयाचा आहे.

पोर्तुगीजपूर्व काळांत गोमंतकी बोलींत वाङ्मय निर्माण झालें होतें, याचा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नसल्यामुळें त्यावेळीं या बोलीचा वापर केवळ मौखिक व्यवहारासाठींच होत असे, असें मानावें लागतें. गोव्यांतील जुने शिलालेख, ताम्रपट व नाणीं, यांवरील लिखाण संस्कृत, मराठी, आणि फारशी या भाषांतच काय तें आढळतें, असें प्रो. पिसुर्लेकर यांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे.[1] अशा प्रकारें, गोमंतकींत वाङ्मयनिर्मिति होत नसल्यामुळेंच या बोलीला एखादें विशिष्ट नांव देण्याची गरज त्या काळांत भासली नसावी.

गोमंतकी बोलीला पहिल्याप्रथम ग्रंथनिविष्ट केलें तें युरोपियन मिशनऱ्यांनीं. हें कार्य त्यांच्या हातून घडलें तें भाषेच्या प्रेमामुळें नव्हे, तर धर्मप्रसाराचें एक प्रभावी साधन म्हणूनच होय. पोर्तुगीजांच्या आगमनानंतरहि गोव्यांतील बोलीला एखादें विशिष्ट नांव रूढ झालें नव्हतें, असें दिसतें. कारण पोर्तुगीज राज्यकर्ते आणि धर्मप्रसारक हे या बोलीचा आपापल्या परीनें निरनिराळ्या प्रकारें नामनिर्देश करितांना आढळतात. यासंबंधीं माहिती देतांना प्रो. डॉ. पिसुर्लेकर म्हणतात, " सन १५१२ सालच्या आफोंसु द आल्बुकेर्क याच्या एका आज्ञापत्रांत आंतोनियु नांवाच्या एका बाटलेल्या गोमंतकीयाचा ' कानारी ' या शब्दानें उल्लेख केला आहे. तथापि सन १५१५ त तोमे पीरिश् या पोर्तुगीज लेखकानें लिहिलेल्या आपल्या ' सूम ओरिएंताल ' या पुस्तकांत, " गोव्यांतील बोलभाषेस ' कोंकणी ' म्हणत असून ती दख्खनच्या ( मराठी ) व नर्सिंगच्या ( कानडी ) भाषांहून निराळी अशी स्वतंत्र भाषा आहे, "[2] असें म्हटलें आहे.

यावरून उपलब्ध पुराव्यानुसार १५१२ सालीं पहिल्यांदा एका गोमंतकी-

---

१. P. Pissurlencar, Inscricoes Pre-Portuguesas de Goa, Bastora, ( Goa ) 1938.

२. भारतमित्र, वर्ष २३, अंक १, गोवा, जानेवारी १९६१, पृष्ठ ३४.

याला ' कानारी ' ही संज्ञा दिल्याचें दिसून येतें. आतां निरनिराळ्या जेज्जइतांनीं केलेले पुढील कांहीं गोमंतकी बोलीचे उल्लेख पहा.

पाद्री एंरिकिश् हा आपल्या गोव्याहून कोइंब्र ( पोर्तुगाल ) येथें पाठविलेल्या १२-११-१५४६ च्या पत्रांत गोव्यांतील भाषेचा 'lingua natural' ( एतद्देशीय भाषा ) असा उल्लेख करितो.[३] गोवा बेटांतील देवालयांच्या मालकीचा जमीनजुमला सांव पाव्ल कॉलेजला देण्यासाठीं केलेल्या तारीख ३-१-१५५३ च्या एका प्रस्तावांत ( preambulo ) तो नंतर ' कानारी भाषेंत ' वाचण्यांत आल्याचा निर्देश आहे.[४]

फादर स्टिफन्स आपल्या १६१६ सालीं प्रसिद्ध झालेल्या क्रिस्तपुराणाच्या प्रस्तावनेंत ' ब्राह्मणांची भास ' असा उल्लेख करितो. त्याची १६२२ सालीं प्रसिद्ध झालेली ' दौत्रीन क्रिश्तां ' ' Bramana Canarim ' त असल्याचें त्यानेंच नमूद केलें आहे. ही दौत्रीन छापण्यासाठीं जेजुइत पंथाचा व्हिजिटर आंद्रे पाल्मैरू यानें दिलेल्या २० मार्च १६२२ च्या परवानगींत नुसतेंच ' lingoa Bramana ' म्हटलें आहे. पाद्री दियोगु रिबैरू हा आपली १६३२ सालीं प्रसिद्ध झालेली दौत्रीन ' lingoa Bramana vulgar ' मध्यें असल्याचें लिहितो. १६५५ सालीं प्रसिद्ध झालेला पाद्री आंतोनियु द सालदान्जचा सांत आंतोनीसंबंधींचा गद्य ग्रंथ ' lingua da terra corrente ' (चालू देशी भाषा) मध्यें आहे; तर पाद्री मिगेल द आल्मैद याच्या ' Jardim de Pastores ' चा १६५९ सालीं छापला गेलेला ५ वा खंड ' lingua vulgar da terra ' ( देशी चालू भाषेंत ) आणि ' lingoa Bramana ' ( ब्राह्मणांच्या भाषेंत ) असल्याचें त्यांत नमूद आहे. १६६० सालीं प्रसिद्ध झालेला पाद्री जुवांव द पेद्रोझाचा ' Soliloquios Divinos ' हा ग्रंथ ' lingoa da terra Bramana ' ( ब्राह्मणांच्या देशांतील भाषेंत ), मध्यें आहे.

वरील सर्व उल्लेख ध्यानांत घेतां गोमंतकी बोलीच्या नांवासंबंधीं तत्कालीन जेजुइतांमध्यें एकवाक्यता नव्हती, हें स्पष्टच दिसतें. गोमंतकी बोलीसाठीं त्यावेळीं कोणतेंच निश्चित नांव रूढ नसल्यामुळें त्यांना हे आपापल्या मर्जीनुसार वेगवेगळे उल्लेख करावे लागले असणें स्वाभाविक आहे. पण या सर्व उल्लेखांपैकीं ' कानारी ' हा नामनिर्देश विशेष कुतूहलजनक वाटतो. ' कानारी ' हा शब्द कसा रूढ झाला, ह्यासंबंधीं विद्वानांमध्यें पुष्कळच मतभेद आहेत.

---

३. A. da Silva Rego, **Documentacao para a Historia das Missões do Padroado Portugues do Oriente**, Vol. III, Lisboa 1950, p. 378.

४. J. Wicki, **Documenta Indica**, Vol. II, Rome 1950, p. 576.

रावसाहेब डॉ. चव्हाण यांनीं आपल्या कोकणीसंबंधींच्या छापील व्याख्यानांत गोवा हायकोटाचे न्यायाधीश गोंसालु तेय्शैर पिंतु यांच्या १८२४ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'Memorias sobre as possessões Portuguesas na Asia" या ग्रंथांतील 'कानारी' चें स्पष्टीकरण करणारा एक उतारा इंग्रजींत भाषांतर करून उद्धृत केला आहे, तो असाः—

"In Goa the Portuguese arriving from Europe are called Fringis (Franks). Their sons who are born in India, but of pure Portuguese blood are called Casticos. The sons born of Portuguese fathers and Indian mothers are called Mesticos. The Christians born of Indian parents are called Canarins and the Gentiles are called Concanos."[५]

अशा प्रकारें या 'कानारी' लोकांच्या भाषेला 'कानारी' हें नांव पडलें, असें डॉ. चव्हाणांचें मत आहे. प्रो. पिसुर्लेकर म्हणतात कीं, 'कानारी' हा शब्द 'कानडी' या शब्दावरून व्युत्पन्न झालेला आहे. यासाठीं त्यांनीं Dr. Alvaro da Costa यानें १६१० व ११ सालीं लिहिलेल्या 'Tratado da Viagem que fez D. Alvaro da Costa, da India Oriental nos annos de 1610 –1611' या सध्यां पोर्तुगाल येथें असलेल्या एका हस्तलिखित प्रवासवृत्तांतील पुढील उतारा उद्धृत केला आहेः—

'A gente natural da Ilha (Goa), e das terras della se chamão Canary, porque dali comeca o Canara'.

(गोवा बेट व त्याच्या प्रदेशांतील मूळच्या लोकांना 'कानारी' म्हणतात, कारण तेथूनच कानडा प्रांताला सुरुवात होते)."[६]

याशिवाय, जुवांव द बान्हुस्, दियोगु दु कौतु, पा. से. गोंसाल्विस् इत्यादि इतिहासकार गोव्याचा समावेश कानडांतच करीत असल्यामुळें 'कानडी' वरून 'कानारी' शब्द उत्पन्न झाला, असें प्रो. पिसुर्लेकरांचें मत बनलें आहे, असें दिसतें.

प्रथम दर्शनीं वरील युक्तिवाद बिनतोड वाटत असला तरी तो जशाचा तसा मान्य करितां येणार नाहीं. कारण, जेजुइत धर्मप्रसारक हे 'कानडी'पेक्षां 'कानारी' ही वेगळी आहे हें जाणत होते, असा खात्रीचा पुरावा सांपडतो.

---

५. V. P. Chavan, The Konkan and the Konkani Language, Bombay 1924, p. 15.

६. भारतमित्र, उ. नि, पृ. ३६.

गोव्याच्या सांव पाव्ल कॉलेजसाठीं २७ जून १५४६ रोजीं तयार केलेल्या घटनेंत गोव्यांतील विद्यार्थ्यांसाठीं 'Canaris' आणि कानडी प्रांतांतील विद्यार्थ्यांसाठीं Canaras असे शब्द योजिले आहेत.[७]

फ्रांसिस्क जॉर्ज आणि मिगेल तेय्शैर यांनीं गोव्याहून १५५३ च्या डिसेंबर महिन्यांत लिहिलेल्या एका पत्रांत तेथील कॉलेजांत शिकणाऱ्या निरनिराळ्या प्रदेशांतील तरुण विद्यार्थ्यांची यादी दिली आहे. तींतहि Canaris आणि Canaras असे दोन वेगवेगळे निर्देश आढळतात:—

"Canaris, bramenes, persios, arabios, abexins, cafres, guzarates, decanis, malavares, **Canaras**, bengales, pegus etc."[८]

या 'कानारी' लोकांचा कानडाशीं कांहीं संबंध नाहीं, याचा आणखीहि महत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा सांपडतो. मद्रास सरकारच्या डच रेकॉर्डस्‌मध्यें कोचीन येथील ख्रिश्चनांसंबंधीं माहिती देण्याच्या ओघांत 'कानारी' विषयीं पुढील स्पष्टीकरण दिलेलें आहे:—

"The Canarins, also clan by themselves from the North, came originally, according to their account, from a district by the name of 'Sasta V(B)ardez' (which territory was formerly devided into twelve small provinces).

They admit however that although they are called **Canarins**, they are not called after the Kingdom of **Canara** since they never had any connection with the inhabitants of **Canara**, who are properly called **Canarese and not Canarins**."[९]

आतांपर्यंत सादर केलेल्या निरनिराळ्या ऐतिहासिक पुराव्यांवरून 'Canaris' किंवा 'Canarins' यांच्याहून 'Canaras' किंवा 'Canarese' हे निराळे होत हें स्पष्ट झालेंच आहे. त्यामुळें फारसीमधील 'कानार' या शब्दा-

---

७. "dos **Canari's**, por ser esta casa ffundada nesta terra e aver muitas yrmydas omde podem servir de vigairos benefficiados, avera ate dez moços......e dos **Canara's** avera outros seis moços'

A : da Silva Rego, **op. cit.**, p. 335.

८. A. da Silva Rego, *op. cit.*, Vol. V, Lisboa 1951, p. 331.

९. A. Galletti, and A. J. Van, **The Dutch in Malabar**, Madras (n. d.) 1910, p. 200.

वरून 'कानारी' शब्द आला असावा, हें प्रा. प्रियोळकरांचें म्हणणें अधिक सयुक्तिक वाटतें. ते 'कानारीं' संबंधीं म्हणतात,

"It appears that the term Canarim ( Persian word for "Coaster" ) was first given by the Arab-traders to the people on the Malabar Coast which was subsequently adopted by the Portuguese and applied to the native Christians of Goa."[१०]

पोर्तुगीजपूर्वकाळांत हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारी क्षेत्रांत अरबांचीच मक्तेदारी होती, हें या संदर्भात ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आतां 'कोंकणी' या शब्दासंबंधीं थोडा विचार करूं. १५११ सालीं हिंदुस्थानांत आलेल्या तॉमॅ पीरिश या पोर्तुगीज प्रवाशानें आपल्या 'सूम ओरिएंताल' नांवाच्या ग्रंथांत गोव्यांतील बोलीस 'कोंकणी' ('Conconim') म्हटल्याचा उल्लेख वरती आलाच आहे. तॉमॅ पीरिश्च्या या माहितीवर विश्वास ठेवण्याआधीं कांहीं गोष्टींचा खुलासा करणें अत्यावश्यक आहे. तॉमॅ पीरिश्चा मूळ ग्रंथ अद्यापि कोठेंच उपलब्ध झालेला नाहीं. त्याच्या दोन नकला-एक पारीस येथें व दुसरी लिस्बनला-आहेत, त्यांवरूनच उपर्युक्त माहिती मिळालेली आहे. लिस्बनच्या नक्कलेवर तर लेखकाचें नांव किंवा सालहि नमूद केलेलें नाहीं. एवढें असूनहि तॉमॅ पीरिश् म्हणतो, त्याप्रमाणें गोव्याच्या बोलीला त्यावेळीं 'कोंकणी' हें नांव रूढ असल्यास इतर तत्कालीन लेखकांनीं या नांवाचा निर्देश न करितां दुसरींच नांवें कां द्यावींत, या प्रश्नाचें उत्तर सांपडत नाहीं.

या "कोंकणीच्या" तॉमॅ पीरिश्कृत उल्लेखाची उपपत्ति लावावयाची झाल्यास त्यानें आपला ग्रंथ कोठें लिहिला होता, हेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे. 'सूम ओरिएंताल'चा कांहीं भाग त्यानें मलाया येथें व उरलेला हिंदुस्थानांत कोचीन येथें लिहून तो १५१२ ते १५१५ च्या दरम्यान पुरा केल्याची माहिती मिळते.[११]

कोचीनला राहून त्याला गोव्यांतील भाषेसंबंधीं जी माहिती मिळाली, तीच त्यानें नमूद केली असली पाहिजे. पश्चिम किनाऱ्यावरील साधारणतः सोपाऱ्यापासून कारवारपर्यंतच्या भागाला 'कोंकण' हें नांव प्राचीन काळापासून दिलेलें आढळतें. या नामनिर्देशाच्या कालाची चर्चा येथें आवश्यक नाहीं. पोर्तुगीजांच्या आगमनानंतरच्या काळांत व्हिसेरै दों जुआंव द कास्त्रु याच्या १५३८-३९ सालीं

१०. A. K. Priolkar, **The Printing Press in India**, Bombay 1958, p. 152, Foot note No. 7.

११. Armando Cortesão, **The Suma Oriental of Tome Pires**, London 1944, Introduction, p. lxii.

लिहिण्यांत आलेल्या 'Roteiro de Goa ate Dio' या ग्रंथाची पुरवणी 'Cosmografia e Descrição do Reino do Daquem ( दख्खन राज्याचें भौगोलिक वर्णन ) या निबंधांतील एक उतारा प्रो. पिसुर्लेंकरांनीं उद्धृत केला आहे, तो असा :—

" Entre esta serra e as prayas do mar se chama Conquaom e os moradores Conquanis, onde agora, corrompido o vocabulo, dos Portugueses sam chamados Canaris."

( घाट व समुद्र यांमध्यें असलेल्या प्रदेशास ' कोंकण ' व तेथील रहिवाशांस ' कोंकणी ' असें म्हणतात. तथापि आतां पोर्तुगीज लोक त्यांना ' कानारी ' असें सदर शब्दाच्या अपभ्रंशदर्शक नांव देतात. ) " [१२]

कोंकणांतील लोकांना ' कोंकणी ' हें नांव कोचीनकडे रूढ होतें, अशी माहिती मिळते. त्रावणकोर–कोचीनकडील ' कोंकणी ब्राह्मणां ' संबंधीं लिहितांना अय्यर नांवाचा एक लेखक म्हणतो :—

" For nearly a quarter of a century after the conquest of Goa by the Portuguese they ( Saraswat Brahmins ) continued unmolested under the Portuguese Governors ... but with the establishment of the Inquisition of Goa, and the religious prosecution set on foot by the Portuguese the community left Goa in voluntary exile. While some submitted to conversion, others fled to North and South : and those that fled to the South, settled themselves in Canara and Calicut. Recieving a cold reception at the hands of the Zamorin, they proceeded further South and sought the protection of the rulers of Cochin and Travancore, where they flourish even to this day...... The Brahmin immigrants are called Konkanis, because of their having emigrated from Konkan, and they speak the Konkani dialect of Marathi." [१३]

अशा प्रकारें ' कोंकणां 'त राहणारे ते ' कोंकणी ' आणि त्यांची बोली ती ' कोंकणी ' झाली असावी. फादर स्टीफन्स, पाद्री दियोगु रिबैरू इत्यादि जेजुइत ग्रंथकार ' हिंदु ' या अर्थीं ' कोंकणो ' आणि ' हिंदुत्व ' किंवा ' हिंदु-धर्म ' या अर्थीं ' कोंकणे'पण हे शब्द वापरतात. जेजुइत ग्रंथकारांपैकीं गोव्यांतील

१२. भारतमित्र. उ. नि., पृ. २४.

१३. L. K. Anantha Krishna Iyer, The Cochin Tribes and Castes Vol. II, Madras 1912, p. 348.

बोलीला उद्देशून 'कोंकणी' हा शब्द पहिल्यांदां १६५८ सालीं वापरलेला सांपडतो. या सालीं छापण्यांत आलेल्या पाद्री मिगेल द आल्मैद याच्या 'Jardim de Pastores' ('वनवाळ्याचो मळो') च्या ३ ऱ्या खंडांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहेः—

'घोंकुली नांव जें आस तें दों उतरांचें मांडता, येक उतर फिरिंगे भासेचें, हेर कोंकणिये भासेचें : फिरिंगे जें आस तें दों, कोंकणें जें आस तें कुळी.'

याच ग्रंथांत मराठी भाषेचा उल्लेख आला आहे तो असा :—

'तिसरें नांव जें मारास्टे भासेन आस, तें हें सुरु आइलो, सुरु आइलें, सुरु आइली : म्हणजे स्वर्गिचो लोकु :'

गोव्याची भाषा मराठी आहे, याची जाणीव प्रस्तुत ग्रंथाचा लेखक पाद्री आल्मैद याला होती, असें दिसतें. कारण आपल्या उपर्युक्त ग्रंथाच्या पांचव्या खंडांत तो गोमंतकीय श्रोत्यांना उद्देशून म्हणतो, "मलबारिये भासेन जुन्यु म्हणजे, तिनिः आणी तुमंचिए मरास्ट बोलियेन जेस्ट म्हणजे जिणिः कित्या जेस्ट म्हइनो जो आस, तो मरास्टी भासेन जिणि अर्थता; येणे कर्तो मलबारिये भासेन जुन्यु म्हणजे तिनि, आणी मरास्ट बोलियेन जेस्ट, म्हणजे जिणि," (पा. ३ पु.).

याशिवाय गोमंतकाची भाषा मराठी आहे, हें सिद्ध करणारा आणखीहि पुरावा आहे. फ्रांसिस्कन पाद्र्यांना देशी भाषा येत नसल्यामुळें त्यांची उचलबांगडी करून चर्चच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या जागा देशी पाद्र्यांना द्याव्या, असा एक अर्ज बारदेशच्या म्युनिसिपालिटीनें १७६५ सालीं पोर्तुगालच्या राजाला पाठविला होता. त्याला उत्तर म्हणून फ्रांसिस्कन पाद्र्यांनीं १७६७ सालीं जो अर्ज राजाला पाठविला, त्यांत गोव्याची मातृभाषा मराठी आहे, असें स्पष्टच म्हटलें आहे.[१४]

आतांपर्यंत केलेल्या एकंदर विवेचनावरून पुढील निष्कर्ष काढितां येतीलः—

१. पोर्तुगीजपूर्व काळांत गोमंतकी बोलीचा वापर केवळ मौखिक व्यवहारासाठींच होत असल्यामुळें तिला त्यावेळीं एखादें रूढ नांव नसावें.

२. पोर्तुगीज राज्यकर्ते आणि धर्मप्रसारक हे दोघेहि स्वतःला सुचेल त्याप्रमाणें गोमंतकीचा नामनिर्देश करितात त्याअर्थीं त्यांनाहि या बोलीचें एखादें निश्चित नांव असल्याचें माहीत नव्हतें.

---

१४. "O idioma commum, que ha entre os naturaes, da verdadeira ntelligencia da lingua **marasta**, que he a vernacula."
—J. H. da Cunha Rivara, **Ensaio Historico da Lingua Concanim**, Goa 1858, p. 58.

मराठी ... १५२०४

३. ‘ कानारी ’ हा गोमंतकीचा नामनिर्देश ‘ कानडी ’ या शब्दाच्या पोर्तुगीज उच्चारावरूनच सुचला आहे, असें निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. ‘Canaris’ किंवा ‘Canarins’ ( कोंकणी ) आणि ‘Canaras’ किंवा ‘Canarese’ ( कानडी ) या दोहोंतला फरक जेजुइतांना जाणवला होता, हें त्यांच्या पत्रव्यवहारांत स्पष्ट दिसतें.

पोर्तुगीजांच्या आगमनाच्या काळीं हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारांत अरबांचीच मक्तेदारी होती, हें ध्यानांत घेतां फारशी भाषेंतील ‘ कानार ’ शब्दावरून ‘ कानारी ’ शब्द आला असणें अधिक शक्य वाटतें.

५. तॉमॅ पीरिशानें आपल्या ‘ सूम ओरिएंताल ’ या कोचीन येथें १५१५त पुरा केलेल्या ग्रंथांत गोव्यांतील बोलभाषेचा ‘ कोंकणी ’ असा निर्देश केलेला असला तरी १६५८ पर्यंत इतर कोणींहि तें नांव वापरलेलें आढळत नाहीं. मुख्य गोष्ट म्हणजे तॉमॅ पीरिशचा मूळ ग्रंथ अद्यापि उपलब्ध झालेला नाहीं आणि लिस्बनच्या प्रतींत काल किंवा लेखक यांचाहि निर्देश नसल्यामुळें त्याची माहिती शंकास्पद वाटते.

६. तॉमॅ पीरिशचा ग्रंथ व त्यांतील माहिती विश्वासार्ह मानल्यास त्यानें जेथें आपला ग्रंथ लिहून पुरा केला त्या कोचीनमध्येंच ‘ कोंकणां ’ तून आलेले ते ‘ कोकणे ’ व ‘ कोकण्यांची भाषा ’ ती ‘ कोंकणी ’ या अर्थी हें नांव प्रथम दिलें गेलें असावें. ‘ कोकणस्थ ’ (द्राविड ब्राह्मणांचा एक पोटविभाग) व ‘ शेणवी ’ ( सारस्वत ब्राह्मणांचा एक पोटविभाग ) हीं नांवें पहिल्यांदां देशावरच्या लोकांनीं दिलीं व नंतर तीं रूढ होऊन बसलीं, हें या संदर्भांत ध्यानांत घ्यावें.

७. पाद्री मिगेल द आल्मैद याच्या **Jardim de Pastores** (‘ वनवळ्याचो मळो ’) या १६५८ सालीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत गोमंतकी बोलीसाठीं ‘ कोंकणी ’ शब्द अधिकृतरीत्या वापरलेला आढळतो.

८. पाद्री आल्मैदानें ‘ कोंकणीं ’ चा निर्देश केला असला, तरी गोव्यांतील लोकांची ग्रांथिक भाषा मराठी आहे हें त्याला ठाऊक होतें. उपर्युक्त ग्रंथाच्या पांचव्या खंडांत ‘ तुमचिए मरास्ट बोलियेन ’ असें त्यानें म्हटलें आहे, यावरून तें सिद्ध होतें. याशिवाय ... राजाला पाठविलेल्या अर्जांत फ्रांसिस्कन पाद्यांनीं गो... याचें स्पष्टच नमूद केलें आहे.

REFBK-0015205

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम.................... विः ....................
...................... ...

# मराठी संशोधनमंडळाचें संशोधन व प्रकाशन

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| मुक्तेश्वरकृत महाभारत–आदिपर्व (खंड १ ते ४) | प्रत्येकीं | ५.०० |
| महाराष्ट्र भाषेचें व्याकरण (दादोबांच्याही पूर्वीचे स. १८२४) | | ४.०० |
| अमृतानंदविरचित योगराज-टिळक (दत्तसांप्रदायिक ग्रंथ) | | १.५० |
| मराठी दोलामुद्रितें (संपा.-प्रा. सु. आ. गावस्कर) | | ५.०० |
| सांतु आंतोनिची जीवित्वकथा (क्रिस्ती ओंवीबद्ध भक्तविजय) | | २.०० |
| मुद्रित तुकाराम-वाङ्मय | | १.०० |
| श्रीचक्रधरनिरूपित श्रीकृष्णचरित (महानुभावीय ग्रंथ) | | २.०० |
| ज्ञानेश्वरीचें शब्दभांडार (प्रा. रा. ना. वेलिंगकर) | | १५.०० |
| आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति (डॉ. कृ. भि. कुळकर्णी) | | १५.०० |
| युरोपियनांचा मराठीचा अभ्यास व सेवा (डॉ. श्री. म. पिंगे) | | १५.०० |
| The Printing Press in India (भारतीय मुद्रणाचा इतिहास) | | २०.०० |
| प्रो. केरूनाना छत्रे यांची टिपणवही | | ०.७५ |
| यदुमाणिककृत गणेशपुराण संजीविनी टीका | | १.०० |
| क्रिस्तांचें यातनागीत | | १.०० |
| देवनागरी लिपी, उगम व विकास (श्री. ल. श्री. वाकणकर) | | १.०० |
| अहिराणी लोकगीतें (श्री. वि. गो. पांड्ये) | | १.०० |
| मोरोपंतकृत स्फुट काव्यें खंड १ ला व २ रा (त्यांच्या स्वलिखित पोथ्यावरून) (सं. प्रियोळकर, खुपेरकर व दा. वि. जोशी) | प्रत्येकीं | ५.०० |
| | खंड ३ रा | ८.०० |
| प्राचीन कोरीव मराठी लेख (डॉ. शं. गो. तुळपुळे) | | १.५० |
| श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाभ्यासाचें दिग्दर्शन (बाळाचार्य खुपेरकर) | | १.५० |
| गोष्टीशतक (संपा.-प्रा. अ. का. प्रियोळकर) | | १.५० |
| क्रिस्तांची साख्राजा काथेशिझ्मु (सं. सौ. मीना जोशी) | | २.०० |
| सांतु आंतोनिची अचर्यां (गोमंतकी बोलींतील ग्रंथ) | | ६.०० |
| सतराव्या शतकांतील गोमंतकी बोली (डॉ. वि. बा. प्रभुदेसाई) | | ७.५० |
| फ्रेंच कवीनें लिहिलेलें मराठी पुराण (प्रा. प्रियोळकर) | | १.०० |
| मुसलमानांची जुनी मराठी कविता ( ,, ) | | १.०० |
| विरामचिन्हांची परिभाषा (मे. क्यांडी) | | ०.७५ |
| महानुभाव : इतिहासप्रकरण (सं. प्रा. प्रियोळकर) | | १.०० |
| फा. स्टीफन्स आणि त्याचें क्रिस्तपुराण (डॉ. स. गं. मालशे) | | १.५० |
| उपाहरण-कोश (सं. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई) | | २.०० |
| हेमचंद्रकृत अपभ्रंशव्याकरण (सं. डॉ. के. वा. आपटे) | | २.५० |
| गोविंद नारायण माडगांवकर (अ. का. प्रियोळकर) | | १.०० |